## मेहता मराठी

# ग्रंथजगत

दीपावली विशेषांक २०१०

११ नोव्हेंबर २०१०

# मेहता मराठी ग्रंथजगत

## दीपावली विशेषांक २०१०


११ नोव्हेंबर २०१०

वर्ष दहावे । अंक अकरावा

किंमत ६०रु.

संपादक

**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक

**शंकर सारडा**

संपादन साहाय्य

**वंदना घाटगे**

मांडणी व अक्षरजुळणी

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

मुखपृष्ठ

**आनंद सारडा, सिॲटल**

आतील चित्रे

**सागर धुमाळ**

वार्षिक वर्गणी १५०रु.
तीन वर्षांची ३५०रु.
पाच वर्षांची ५००रु.
३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट

संपादक - मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोनभवन समोर, पुणे ४११ ०३०.



**या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकांची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.**

**दीपावलीच्या शुभेच्छा!**

# अनुक्रमणिका

## दिवस कॉलेजचे... पंख फुटण्याचे... जडणघडणीचे...


१७ स्पर्शाचा वर्ख - डॉ. द. भि. कुलकर्णी
२२ एलफिन्स्टन कॉलेजमधले संस्कार - रत्नाकर मतकरी
२७ आम्ही बि'घडलो, तुम्ही बि'घडाना - चंद्रमोहन कुलकर्णी
३२ भाकरीशी झाली झुंज - उत्तम कांबळे
३७ मराठवाड्यातले जडणघडणीचे दिवस - नरेन्द्र चपळगावकर
४१ गगनभरारी : लेब्राटचे दिवस - डॉ. आनंद पाटील
४५ कॉलेजचे दिवस - शिरीष पै
५२ लंबक - डॉ. छाया महाजन
५७ मंतरलेले दिवस - रेखा बैजल
६१ मजेमजेचे दिवस - डॉ. निर्मला सारडा
६५ मीच माझी पहाट - इंदुमती जोंधळे
७३ अभ्यासाचे दिवस - प्रा. माधुरी शानभाग
७९ माय डियर स्टुडंट्स - रेणू गावस्कर
८२ कॉलेज जीवन : उभारी, भरारी - दिपा महानवर
८७ अनुभवांच्या श्रीमंतीची समृद्धी - डॉ. अशोक कामत
९१ वलय रुइया कॉलेजच्या वातावरणाचे - शोभना शिकनीस
९६ 'वर्गाबाहेर शिका' - अविनाश पंडित
९९ सळसळत्या तरुणाईचे दिवस - शांतिलाल भंडारी
१०६ वर्गात न बसताही प्रथम श्रेणी - संजय सोनवणी
११० दिवस फर्ग्युसनमधले - मंगेश कश्यप


**साहित्य - कला - विश्व**


११४ हळव्या मनाची कवयित्री शैला सायनाकर - रा. अ. कुंभोजकर
११८ 'गीतारहस्या'चे वाचन - डॉ. भा. ल. महाबळ
१२४ खांडेकरांचा पत्रसंवाद - डॉ. सुनीलकुमार लवटे
१३० खांडेकरांच्या साहित्याचे हक्क: सुप्रीम कोर्टाचा निकाल
१३१ माझे गाणे : ऐकणे - डॉ. भवान महाजन
१५४ वाचकस्पर्धा
**१५७ बालनगरी**

# दीपावली स्पर्धा निकाल

## यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन

### वाचक कुठली पुस्तके घेतात? कुठली पुस्तके वाचतात? - स्पर्धा १

**(प्रत्येकी १०००रु. ची पुस्तके)**

१ सौ. लता विद्वांस, इन्दौर ४५२ ००९.
२ सौ. राधिका मुकुंद पांडे, अमरावती ४४४ ६०६

**उत्तेजनार्थ (प्रत्येकी २००रु. ची पुस्तके)**

१ सौ. मंगल नरसिंह कुलकर्णी, वानलेसवाडी, सांगली ४१६ ४१४.
२ श्री. अरविंद श्रीधर पुजारी, सोलापूर ४१३ ००४.
३ सौ. सविता राजेंद्र जाधव, गोडोली, सातारा.
४ श्री. अनिल सावरकर, नागपूर ४४० ०२४.
५ श्री. अजबराव मारोती भगत, दिग्रस, जि. यवतमाळ ४४५ २०३.

### गमतीदार बातमी स्पर्धा

**(प्रत्येकी ५००रु. ची पुस्तके)**

१ ओंकार उदय लोखंडे, १० वी, विश्वास सोसायटी, सांगली, ४१६ ४१६
२ रणजितसिंग डिसले, शिवाजीनगर, बार्शी ४१३ ४११.
३ अपूर्व अश्विन चिटणीस, २४ ताडीवाला रोड, पुणे ४११ ००१.

**स्पर्धकांसाठी सूचना :**

१. पुरस्कार विजेत्यांनी 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ची आपल्या आवडीची पुरस्काराच्या रकमेएवढ्या किंमतीची पुस्तके निवडून दि. ११ नोव्हेंबर २०१० ते दि. ३१ जानेवारी २०११ पर्यंत कळवावी. या अंकात यादी पहायला मिळेल.
२. बाहेरगावच्या स्पर्धकांना पुस्तके कुरियरने/पोस्टाने पाठवली जातील.

# संपादकीय

'मेहता मराठी ग्रंथजगत'चा दीपावली अंक' सादर करताना आनंद होत आहे.

दरवर्षी काहीना काही नावीन्यपूर्ण विषय घेऊन मराठीतील नामवंत व्यक्तींची त्या संदर्भातील मनोगते रसिक वाचकांपुढे ठेवण्याचा आमचा प्रयत्न असतो. या प्रांजल मनोगतांतून त्या त्या व्यक्तींची जीवनविषयक चिंतने आणि कार्यकर्तृत्वामागची प्रेरणास्थाने कळत-नकळत प्रकट होतात; ती आपल्याला उद्बोधक आणि पथदर्शक वाटतील. आपल्या भावजीवनाला नवी परिमाणे देतील. खरे तर हे ललित साहित्याचे एक मुख्य प्रयोजनच असते. ते आपले जीवनविषयक आकलन सर्वांगीण, सर्वंकष, समृद्ध करते. वाचनसंस्कृतीचा प्रसार व्यापक असणाऱ्या देशात किंवा प्रदेशात राहणाऱ्या, पुस्तकांशी आणि कलांशी जवळीक असणाऱ्या व्यक्तींच्या एकूणच जीवनविषयक जाणिवा अधिक प्रगल्भ असतात; त्यांच्या कल्पनाशक्तीचा परीघ अधिक व्यापक असतो, भौतिक सुखसुविधांचा स्तर उंचावलेला असतो. विज्ञानविषयक संशोधन तेथे मोठ्या प्रमाणावर चालते. तेथील शिक्षणसंस्था आणि विद्यापीठे आपल्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला, प्रयोगशीलतेला, कल्पकतेला आव्हान देतात, ज्ञानक्षेत्रात नवी भर घालण्यास किंवा नव्याने सापडलेल्या सृष्टीविषयक माहितीचा प्रत्यक्ष आपल्या जीवनात उपयोग व्हावा या दृष्टीने तंत्रज्ञान विकसित करण्यास अनुकूल अवसर मिळवून देतात. भारतात संस्कृतविद्येच्या घोकंपट्टीवर एकेकाळी भर होता; तो आहे त्या ज्ञानाचीच उजळणी करण्याला पोषक होता. नव्या ज्ञानाच्या निर्मितीला वा शोधाला उत्तेजन देणारा भर नव्हता. पाश्चात्य देशात विद्येच्या पुनरुज्जीवनाच्या, रेनेसान्सच्या काळात धार्मिक पगडा आणि कालबाह्य जीवनमूल्ये यांना झिडकारण्यात आले आणि नव्या विचारांना तसेच नव्या जगाच्या शोधाला चालना मिळाली.

रेनेसान्सनंतर पाश्चात्य देशातील शिक्षणपद्धतीत परिवर्तन झाले. तशात गुटेनबर्गने मुद्रण यंत्राचा शोध लावला आणि ग्रंथ सहजपणे सर्वत्र उपलब्ध होऊ लागले. विद्यापीठांमधील ज्ञानशाखांची संख्या वाढत गेली. नवनव्या बाबतीत संशोधन आणि प्रयोग यांना महत्त्व आले. खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, मानववंशशास्त्र, वनस्पतीशास्त्र, निसर्गविज्ञान, कलाशास्त्र, मानसशास्त्र, आरोग्यशास्त्र, औषधशास्त्र, वाहतूक साधने अशा अनेकविध ज्ञानशांखामध्ये सुसूत्रीकरण होऊ लागले. विद्यापीठांनी याबाबत मोठी कामगिरी बजावली. विविध ज्ञानशाखांमधील संशोधनातले सातत्य टिकवले. विद्यापीठे आणि कारखानदार, उत्पादक यांच्यातील सहकार्याने नवे संशोधन हे मानवी जीवनाला सुखकर करणाऱ्या यंत्रणाही आकाराला येऊ लागल्या. त्यामुळे निरनिराळी वाहतुकीची साधने, करमणुकीची साधने, दैनंदिन गरजा पूर्ण करणारी सोईस्कर उपकरणे यांची निर्मिती होऊ लागली. अवघे जीवनच अधिक सुखावह आणि कष्टक्लेशमुक्त व्हावे असे प्रयत्न सुरू झाले. अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठांमध्ये आणि प्रयोगशाळांमध्ये चाललेल्या संशोधनाने आजच्या तंत्रज्ञानातील आपल्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त झाला.

या वर्षी दिवाळी अंकासाठी आपल्या महाविद्यालयीन जीवनाविषयीची तब्बल वीस मान्यवरांची मनोगते देण्यात आली आहेत. बहुतेकांच्या भावी आयुष्याची आणि कर्तृत्वाची दिशा महाविद्यालयीन काळातच निश्चित झाल्याचे त्यावरून लक्षात येईल. एखाद्या विषयाची आवड निर्माण होणे आणि त्यामध्ये प्रावीण्य संपादन करण्याची आंतरिक ऊर्मी उसळून येणे, त्याबाबत प्राध्यापकांचे, सहकाऱ्यांचे किंवा जाणकारांचे प्रोत्साहन मिळणे, त्यातून करीअरची निवड करण्याची शक्यता दिसणे ही प्रक्रिया महाविद्यालयीन जीवनातच बहुतांशी निर्णायक ठरते. आपल्या अंगच्या कर्तृत्वाची, नेतृत्वगुणांची आणि आंतरिक क्षमतेची कमीजास्त जाणीव याच काळात होते आणि तीच आपल्याला सतत प्रेरणा देत राहते.

आपल्या महाविद्यालयीन दिवसांकडे दोनतीन दशकांनंतर बघताना, सिंहावलोकन करताना त्या दिवसांच्या प्रभावाचे अधिक नेटके योगदान लक्षात येते. या अंकातील मनोगतांमधून ते आपल्यालाही जाणवेल आणि आपल्याही आयुष्यातील तो काळ नव्याने प्रतीत होईल, पुन:प्रत्ययाचा आनंद त्यामुळे मिळेल असे आम्हाला वाटते. बहुतेकांनी अत्यंत हलाखीच्या आणि गरिबीच्या अवस्थेतून 'कमवा आणि

शिका' हे धोरण राबवीत आपले कॉलेज शिक्षण पूर्ण केले; त्यामुळेच त्यांच्या भावी कर्तृत्वाची आणि समृद्धीची कवाडे खुली झाली. महाविद्यालयात जाण्याची किंवा पदवीधर होण्याची संधी मिळाली नसती तर आपल्याला आपल्या काही शाळकरी सोबत्यांप्रमाणे माळरानावर गुरे राखत वा शेतावर काम करीत राबावे लागले असते असे काही जणांनी म्हटले आहे; ते वस्तुस्थितीदर्शकच आहे.

या दिवसांकडे पाहताना काहींनी बहिर्मुख वृत्तीने त्यावेळच्या वातावरणाचे आणि व्यक्तींचे चित्रण केले आहे तर काहींनी अंतर्मुख होऊन आपल्यावर त्यावेळी झालेल्या संस्कारांचे आणि स्वभाववृत्तीतील परिवर्तनाचे अंत:सूत्र शोधण्यावर भर दिला आहे. अनुभवांचा एक विशाल पट त्यामुळे खुला होतो. फर्ग्युसन, एस.पी.कॉलेज, वाडिया कॉलेज, रुइया, एलफिन्स्टन, विलिंग्डन, राजाराम, दयानंद, गोखले कॉलेज, शांतिनिकेतन (सांगली) छत्रपती कॉलेज (सातारा) इत्यादी कॉलेजांचे उल्लेख या मनोगतांतून आले आहेत. ही बहुतेक महाविद्यालये दर्जेदार म्हणून नावाजलेली आहेत. त्यांची विद्यार्थ्यांवर चिरस्थायी संस्कार करण्याची क्षमता निर्विवाद आहे; शैक्षणिक तयारी करून घेत असतानाच जीवनमूल्यांचे संस्कारही ही महाविद्यालये घडवतात हे पुन:पुन्हा या मनोगतांतून अधोरेखित होते. अशी महाविद्यालये आपल्या देशाला मोठे करतात. हार्वर्ड, केंब्रिज, ऑक्सफर्ड, येल, स्टॅनफोर्ड, एमआयटी, वगैरे पाश्चात्य विद्यापीठे जागतिक स्तरावर नावाजली गेलेली आहेत, आणि नोबेल पुरस्काराच्या मानकऱ्यांत त्यांच्या विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असते. अनेक नोबेल पुरस्कार विजेते या विद्यापीठात अध्यापन करतात. ज्ञानक्षेत्रात आणि संशोधनात त्यांची स्पर्धात्मक दौड चालू असते. आपल्याकडेही विद्यापीठांनी आणि महाविद्यालयांनी तसा दृष्टिकोन ठेवून ज्ञानक्षेत्रात जागतिक पातळीवर आपले अस्तित्व दाखवून द्यायला हव, हा या अंकाचा सांगावा आहे.

मराठीतील पहिले ज्ञानपीठाचे मानकरी भाऊसाहेब खांडेकर यांच्या विपुल पत्रव्यवहारासंबंधी डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा एक लेख या अंकामध्ये देण्यात आला आहे. भाऊसाहेबांच्या पत्रांचे संकलन आणि प्रकाशन होणे आवश्यक आहे. खरेतर आपल्या मोठ्या साहित्यिकांच्या पत्रव्यवहाराचे, हस्तलिखितांचे, कागदपत्रांचे, टिपणांचे, ग्रंथसंग्रहाचे जतन करण्याची व्यवस्था व्हायला हवी. त्यासाठी वेगवेगळ्या विद्यापीठांनी आपल्या परिसरातील साहित्यकार आणि कलावंत यांच्याशी संबंधित दस्तऐवजांचे संकलन, जतन व संशोधन करण्यासाठी खास दालने उभारण्याची गरज आहे. शासनानेही या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे.

डॉ. भवान महाजन यांनी आपल्या संगीताच्या श्रवण छंदाबद्दल लिहिलेला स्मरणरंजनात्मक लेख, 'गीतारहस्य' या लोकमान्य टिळकांच्या ग्रंथाचे वाचन केल्यावर त्यातून कोणता संदेश मिळतो याबद्दलचे डॉ. भा. ल. महाबळ यांचे चिंतन, हेही रसिकांच्या विचारांना चालना देईल असा विश्वास वाटतो.

या अंकाच्या मुखपृष्ठावर वॉशिंग्टन डी.सी. येथील लायब्ररी ऑफ काँग्रेसचे छायाचित्र दिलेले आहे. जगातील हे सर्वात मोठे ग्रंथालय आहे. त्यात आज मितीला सव्वातीन कोटी ग्रंथ आणि अकरा कोटी संदर्भ (आयटेम्स)आहेत. जगातील ४७०भाषांतील निवडक नवे साहित्यही या ग्रंथालयात उपलब्ध असते. हजारो अभ्यासक या ग्रंथालयाचा फायदा घेतात. नालंदा-तक्षशिला या प्राचीन विद्यापीठात मोठा ग्रंथसंग्रह होता असे म्हणतात. 'लायब्ररी ऑफ काँग्रेस'ने तोच आदर्श समोर ठेवून आधुनिक काळातले सर्वात भव्य ग्रंथालय निर्माण केले आहे. वाचनसंस्कृतीचे आजचे हे सर्वोच्च प्रतीक आहे.

या अंकातील मनोगतांच्या आरंभी दिलेली चित्रे ही त्या लेखात निर्देश असलेल्या कॉलेजची असावीत असा प्रयत्न होता. परंतु ते जमले नाही. त्यामुळे ती चित्रे आणि मनोगतातील कॉलेज यांचा काहीही संबंध नाही हे कृपया लक्षात घ्यावे.

या दिवाळी अंकाला लेखनसहाय्य करणाऱ्या सर्व साहित्यकारांचे आम्ही आभारी आहोत.

ही दीपावली आणि नवे वर्ष आमच्या सर्व वाचक रसिकांना सुखसमृद्धीचे आणि आनंदाचे जावो ही प्रार्थना.




# मेहता मराठी ग्रंथजगत




**दीपावली २००९ अंकास**
**पुरस्कार प्राप्त**




'महाराष्ट्र साहित्य परिषदे'चे
अ.स. गोखले स्मृत्यर्थ
'रत्नाकर पारितोषिक' २००९




'मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई'चे
'उत्कृष्ट अंक पारितोषिक'
२००९

# पुरस्कार प्राप्त पुस्तके




**‘अवशेष’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - ‘श्री.ना. पेंडसे पुरस्कार २००९’




**‘भोगले जे दुःख त्याला...’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - यशवंतराव चव्हाण पुरस्कार २००९’

‘भैरुरतन दमाणी साहित्य पुरस्कार २००९’



**‘नॉट गॉन विथ द विंड’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - वि. द. घाटे पुरस्कार २००९’




**‘कल्पित-अकल्पित’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - र.धो. कर्वे पुरस्कार २००९’




**‘प्रकाशाची झाडे’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - ग. ल. ठोकळ पुरस्कार २००९’



**‘पॉपकॉर्न’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - मधुकर केचे पुरस्कार २००८- ०९’

# पुरस्कार प्राप्त पुस्तके




**‘छत्रीची जादू आणि इतर कथा’**

‘महाराष्ट्र राज्य पुरस्कार - कवी दत्त पुरस्कार २००९’




**‘प्रेमाचा रेणू’**

‘न. चिं. केळकर ग्रंथालयाचा ‘साहित्य साधना पुरस्कार २००९’




**‘माय फॅमिली इज ऑल आय हॅव’**

‘पुणे मराठी ग्रंथालया’तर्फे उत्कृष्ट अनुवादित साहित्यकृती पुरस्कार २००९




**‘घर’**

पुणे मराठी ग्रंथालयातर्फे ‘राजेंद्र बनहट्टी कथा’ पुरस्कार २००९




**‘अमिना’**

आंतरभरती अनुवाद सुविधा केंद्रातर्फे उत्कृष्ट अनुवादासाठी ‘बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार २००८-०९’




**‘एड्स’**

**मराठी विज्ञान परिषदेचे**

‘चंद्रकांत वागळे पारितोषिक २०१०’

# मेहता पब्लिशिंग हाऊसची २०१० साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| | **कादंबरी** | |
| **प्रस्थान** | रेखा बैजल | १५०/- |
| **द ॲटर्नी :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. अजित ठाकूर | ३५०/- |
| **क्रायसिस :** रॉबिन कुक | अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५०/- |
| **जॅपनीज ऑर्किड :** रेई किमुरा | अनु. स्नेहल जोशी | २००/- |
| **शांताराम :** ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अनु. अपर्णा वेलणकर | ९९०/- |
| **द फकीर :** रुझबेह एन. भरुचा | अनु. सुनीति काणे | १८०/- |
| **वन शॉट :** ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत | ३४०/- |
| **गर्ल्स ऑफ रियाध :** रजा अल्सानिया | अनु. स्नेहल जोशी | २६०/- |
| **द फर्म :** जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ४४०/- |
| **नेक्स्ट :** मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४००/- |
| **अरुणाची गोष्ट :** पिंकी विराणी | अनु. मीना कर्णिक | १८०/- |
| **द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्** : जॉन बायेन | अनु. मुक्ता देशपांडे | १२०/- |
| **पिरॅमिड :** टॉम मार्टिन | अनु. उदय भिडे | ३००/- |
| उद्ध्वस्त | उमेश कदम | १५०/- |
| | **कथासंग्रह** | |
| **कुरुक्षेत्रानंतर :** महाश्वेतादेवी | अनु. वर्षा काळे | ६०/- |
| **भेटीगाठी** | शंकर पाटील | ११०/- |
| **खुश खरेदी** | शंकर पाटील | १००/- |
| **श्रीगणेशा** | शंकर पाटील | १२०/- |
| **गारवेल** | शंकर पाटील | १३०/- |
| **नष्टनीड :** रवींद्रनाथ टागोर | अनु. नीलिमा भावे | १४०/- |
| **तरुणांनो होशियार!** | निरंजन घाटे | १००/- |
| **ज्याचं करावं भलं...** | निरंजन घाटे | १००/- |
| **रोबॉट फिक्सिंग** | निरंजन घाटे | १३०/- |
| | **आत्मकथन** | |
| **कॅच मी इफ यू कॅन :** फ्रँक अबॅग्नेल/स्टॅन रेडिंग | अनु. ज्योत्स्ना लेले | २००/- |

| | | |
|---|---|---|
| **मॅन, इंटरप्टेड :** जेम्स बेली | अनु. विदुला टोकेकर | १८०/- |
| **सर्कल ऑफ लाइट :** किरणजीत अहलुवालिया, राहिला गुप्ता | अनु. उषा महाजन | ३५०/- |
| **द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स :** सोमाली माम | अनु. भारती पांडे | १६०/- |
| **स्लमगर्ल ड्रीमिंग :** रुबिना अली | अनु. मैत्रेयी जोशी | १२०/- |
| **मना सर्जना** | डॉ. अनिल गांधी | २००/- |
| **उधाण वारा :** तसलिमा नासरिन | अनु. विलास गीते | ४००/- |
| **गो किस द वर्ल्ड :** सुब्रतो बागची | अनु. सुनीति काणे | १५०/- |
| **पानगळीच्या आठवणी** | शोभा चित्रे | २००/- |

**व्यक्तिचरित्रे**

| | | |
|---|---|---|
| **थेंबभर पाणी अनंत आकाश :** | सुरेखा शहा | २८०/- |
| **रुसी मोदी : द मॅन हू ऑल्सो मेड स्टील** पार्थ मुखर्जी, ज्योती सबरवाल | अनु. अंजनी नरवणे | २००/- |

**राजकीय**

| | | |
|---|---|---|
| **द पार्लमेन्टरी सिस्टिम :** अरुण शौरी | अनु. अशोक पाथरकर | २२०/- |
| **जिना : हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य** जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये | ५००/- |

**मार्गदर्शनपर**

| | | |
|---|---|---|
| **चार जबरदस्त फंडे** | संजीव परळीकर | ७०/- |

**ललित लेख**

| | | |
|---|---|---|
| **जन्मठेप** | गिरिजा कीर | १५०/- |

**सत्यकथा**

| | | |
|---|---|---|
| **कोल्ड स्टील :** टीम बुके, बायरॉन उसी | अनु. सुभाष जोशी | ३००/- |

**संकलित प्रवचने**

| | | |
|---|---|---|
| **मीरेच्या प्रेमतीर्थावर :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **मीरा एक वसंत आहे :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |

**संकलित व्याख्याने**

| | | |
|---|---|---|
| **अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड :** एन.आर. नारायण मूर्ती | अनु. चित्रा वाळिंबे | २५०/- |

**पाकशास्त्र**

| | | |
|---|---|---|
| **केक्स** | अपर्णा परचुरे | १५०/- |

**चिकन सूप मालिका**

| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द कपल्स सोल :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मार्क ॲण्ड क्रिसी डोनेली आणि बार्बरा डी एन्जेलिस | अनु. अवंती महाजन | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, पॅटी आणि नॅन्सी मिचेल, हेदर आणि केटी मॅकनमारा | अनु.सुनीति काणे | २५०/- |

## चला जाणून घेऊ या! मालिका

| | | |
|---|---|---|
| **प्रार्थना** : जे.पी.वासवानी / संकलन डॉ.प्रभा संपत,कृष्णा कुमारी | अनु. अपर्णा देशपांडे | ४०/- |
| **उच्च रक्तदाब :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **हार्ट अटॅक :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |
| **पोषक आहार :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. स्वाती शहा | ४०/- |
| **स्वयंप्रेरणा :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य** वैद्य सुरेश चतुर्वेदी | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |
| **बद्धकोष्ठता :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **रिलॅक्सेशन :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **शाकाहार :** आर. एन. लखोटिया | अनु. स्वाती शहा | ४०/- |

### नाटक

| | | |
|---|---|---|
| **कथा अकलेच्या कांद्याची** | शंकर पाटील | ७०/- |

### आरोग्य-माहितीपर

| | | |
|---|---|---|
| **उष्ण जलोपचार :** डॉ. पॅट्रिक होरे डेव्हिड हार्प | अनु. सुभाष जोशी | १२०/- |

### वैज्ञानिक लेख

| | | |
|---|---|---|
| **विज्ञानातील सरस आणि सुरस** | राहुल गोखले | १८०/- |
| **स्वप्नचौर्य** | निरंजन घाटे | १२०/- |


# नवे कोरे

## बर्न्ट शॅडोज

**कमिला शामसी**
अनु. रेशमा स. कुलकर्णी



**३२०रु.** पोस्टेज ३०रु.

९ ऑगस्ट १९४५, नागासाकी.
हिरोको तानाका आपल्या घराच्या ओसरीवर उभी राहून समोरचं निसर्गसौंदर्य न्याहाळत असते.
पाठीवर तीन काळ्या बगळ्यांची नक्षी असलेला किमोनो ल्यायलेली हिरोको २१ वर्षांची आहे आणि लवकरच प्रियकर कोनरॅड वेईसशी लग्न करणार आहे.
क्षणार्धात सगळं विश्व शुभ्र पडद्याखाली झाकलं जातं.
बॉम्बहल्ल्यामध्ये हिरोको तिचं सर्वस्व गमावते– उरतात फक्त तिच्या पाठीवर त्या तीन काळ्या बगळ्यांच्या भाजक्या खुणा... जणू तिला तिच्या जुन्या आयुष्याचं स्मरण देत राहण्यासाठी...

## माय कझिन रेशेल

**डॅफने द्यू मोरियेर**
अनु. **स्नेहल जोशी**

माय कझिन रेशेल.
ही गोष्ट आहे स्वरूपसुंदर आणि आकर्षक अशा स्त्रीची आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या दोन इंग्लिश तरुणांची!
ॲम्ब्रोसची काऊंटेस रेशेल संगलेट्टीशी इटालीत भेट झाली, आणि तिथं त्याने तिच्याशी लग्न केले. मात्र त्यानंतर तो कधीच घरी परतला नाही, परंतु त्याच्या चुलत भावाला आलेल्या पत्रांमध्ये त्याच्यावर विषप्रयोग होत असल्याचा संशय व्यक्त केला होता. शेवटच्या पत्रात त्याने फिलीपला ताबडतोब येण्याविषयी लिहिले होते.



**३००रु.** पोस्टेज ३०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# मेहता पब्लिशिंग हाऊसची आगामी पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | अनुवाद |
|---|---|---|
| क्रिटिकल | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| नथिंग टू लूज | ली चाइल्ड | उदय कुलकर्णी |
| वुमन ऑन टॉप | सीमा गोस्वामी | शोभना शिकनीस |
| ती दोघं | डॉ. रमा मराठे | |
| अस्मिता | सूर्यकांत जाधव | |
| युथनेशिया | स्वाती चांदोरकर | |
| दर्पणी पाहता रूप | विद्युल्लेखा अकलूजकर | |
| विल द आयर्न... | अरुण शौरी | कॅप्टन राजा लिमये |
| टेन फिंगर्स फॉर गॉड | डोरोथी क्लर्क विल्सन | नीला चांदोरकर |
| मी, संपतपाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी | मोई संपतपाल | सुप्रिया वकील |
| ब्लड मनी | ख्रिस कोलेट | वैशाली रानडे |
| बिलॉन्गिंग | समीम अली | सिंधु जोशी |
| इनसाइड द गॅस चेंबर्स | श्लोमो व्हनेझिया | सुनीति काणे |
| चिकन सूप फॉर द सोल - भाग ४ | मार्क व्हिक्टर हॅन्सन/ जॅक कॅनफिल्ड | उषा महाजन |
| चिकन सूप फॉर द सोल - भाग ५ | मार्क व्हिक्टर हॅन्सन/ जॅक कॅनफिल्ड | उषा महाजन |
| द स्टार प्रिन्सिपल | रिचर्ड कोच | श्याम भुर्के |
| मेकिंग द कट | मोहम्मद काद्रा | डॉ. देवदत्त केतकर |
| नॉट पेड | हरिशंकर परसाई | उज्ज्वला केळकर |
| शेम | जसविंदर संघेरा | सुनंदा अमरापूरकर |
| सॉल्ट ॲण्ड हनी | कॅन्डी मिलर | वैजयंती पेंडसे |
| अंकरहित शून्याची बेरीज | दिनकर जोशी | अंजनी नरवणे |
| कीप ऑफ द ग्रास | करण बजाज | माधुरी शानभाग |
| द गिफ्ट ऑफ रेन | टॅन ट्वॅन इंग | अशोक पाथरकर |
| ज्ञानज्योती | निरंजन घाटे | |
| असे शास्त्रज्ञ असे संशोधक | निरंजन घाटे | |
| अंतरीचा दिवा : वि. स. खांडेकर | संपादन : डॉ. सुनीलकुमार लवटे | |
| शब्द चर्चा | म.बा. कुलकर्णी | |
| नीळकंठ | स्नेहल जोशी | |

# नवीन




## 'लेट्स किल गांधी!'

**तुषार अ. गांधी**
अनु. **अजित ठाकूर**

**६९५रु.**
**पोस्टेज ६०रु.**

अशी व्यक्ती कधीच मरत नाही. ती जगते, ती उठते.
प्रत्येकाच्याच वाट्याला छोटीमोठी कामं येतात,
नशिबानंच त्याला ती दिलेली असतात; पण जो वैश्विक जिणं जगतो
आणि वैयक्तिक जीवनाचा त्याग करतो, तो मृत्यूनंतरही जिवंतच राहतो.
विचित्र जगाचं अवजड ओझं जो स्वत:च्या पाठीवर घेतो आणि वाहून नेतो.
जो दु:खंही आनंदानं भोगतो, तो कसा बरं मरेल?

मृत्यूचा त्याच्याशी काहीही संबंध नसतो, त्याची सत्ता त्याच्यावर चालत नाही
हे दिसल्यावर, तो मृत्यूनंतरच्या अनंत काळाला एका छोट्याशा तासात बंदिस्त करतो आणि त्याला मृत्यू येतच नाही.

मग आता त्याच्यावरच नजरा रोखा आणि त्याचा 'मृत्युहीन' चेहेरा पाहा.
सर्व माणसांच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या आणि स्मृतिगंधानं दरवळणाऱ्या वसंतवाऱ्यांतून भूतकाळातील प्रत्येक गोष्ट
त्याच्या आयुष्याच्या तेजानं झळाळताना दिसते
मग तिथं... फक्त मृत्यूचाच मृत्यू होतो!

अल्जरनॉन सी. स्विनबर्न
('सुपर फ्ल्युमिना बॅबीलॉनीज'मधून)




## आवा मारू

टायटॅनिक ऑफ जपान

**रेई किमुरा**
**अनु.** चारुलता प्रभाकर पाटील

**२००रु.**
**पोस्टेज २५रु.**

दुसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटलेला... सिंगापूरमधली ब्रिटिशांची सत्ता उलथवून जपाननं तिथे आपले हातपाय पसरलेले... परंतु अल्पावधीतच जपानी साम्राज्याचा सूर्य ढळू लागला. सिंगापूरमधले सारे जपानी पराजयाच्या कल्पनेनं, त्यानंतर उसळणाऱ्या सूडाग्नीच्या दहशतीनं प्रचंड हादरले!
जीव वाचवण्यासाठी, जपानला पळण्यासाठी आटापिटा करू लागले.
जपाननं सिंगापूरमधल्या जपानी नागरिकांना परत आणण्यासाठी 'आवा मारू' नावाची बोट पाठवली. या बोटीला अमेरिकेकडून सुरक्षित प्रवासाची हमी मिळालेली होती. परंतु एकच बोट आणि जपानी असंख्य! बोटीत जागा मिळवण्यासाठी सारे जिवाच्या आकांतानं धडपडू लागले. अखेर, दोन हजार 'निवडक भाग्यवंतां'ना घेऊन बोट २८ मार्च १९४५ या दिवशी सिंगापूरहून निघाली.
परंतु १ एप्रिलच्या त्या भयाण रात्री काही वेगळंच घडलं!... कुठे गेले हे सारे लोक?... तीन दशकांनंतर क्योको तानाका झपाटल्यासारखी या लोकांचा शोध घेऊ लागली.
दुसऱ्या महायुद्धाच्या काळातली ही सत्य घटना काळजाचा ठाव घेते.
रेई किमुरांनी 'आवा मारू' या बोटीच्या घटनेभोवती कल्पित कथानकाचा एक दुपेडी गोफ विणला आहे. उत्कंठावर्धक रहस्यमयतेनं गतिमान होत जाणारं हे पुस्तक वाचकाला खिळवून ठेवतं!

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





# दिवस कॉलेजचे...
# पंख फुटण्याचे...
# जडणघडणीचे...

आपल्या बहुतेकांच्या जीवनात महाविद्यालयीन कालखंड हा आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतो असे मागे वळून पाहताना जाणवते.

कौटुंबिक वा ग्रामीण सुरक्षित जगातून शहरी गदारोळाला सरावणे, विशिष्ट महाविद्यालयात प्रवेश मिळविणे, विशिष्ट अभ्यासक्रमाची निवड करणे, त्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने नवनवी ज्ञानक्षेत्रे गवसणे, आपल्यावर प्रभाव टाकणारे प्राध्यापक भेटणे, समविचारी आणि विविध विषयात रुची व गती असणाऱ्या मित्र-मैत्रिणींशी मैत्री व स्पर्धा होणे, वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे आणि मंडळांद्वारे आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि अध्ययनाला चोखंदळपणा येणे, जीवनाचे ध्येय गवसणे, विविध कलांबद्दलचे आकर्षण वाटणे, समकालीन राजकीय, सामाजिक, बौद्धिक वातावरणाचा, विचारप्रवाहांचा आणि आंदोलनांचा प्रभाव पडणे. हे सर्व स्वाभाविक असते.

त्यावेळच्या माध्यमांची अवस्था आणि उपलब्धता, त्यावेळच्या फॅशन्स, करमणुकीची साधने, चित्रपट, नाटक, क्रिकेट, क्रीडा स्पर्धा... या सर्व वातावरणात स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा, वैशिष्ट्यांचा, कलागुणांचा झालेला साक्षात्कार... पुढे व्यवसाय वा नोकरीच्या मिळालेल्या वा हुलकावणी देणाऱ्या संधी... आशानिराशा...प्रेमप्रकरणे...

कॉलेजमधले एकूणच दिवस असे मंतरलेले असतात. त्या मंतरलेल्या दिवसांबद्दल मराठीतील नामवंत साहित्यकारांनी लिहिलेली ही मनमोकळी मनोगते.







# स्पर्शाचा वर्ख

डॉ. द. भि. कुलकर्णी

**त्या काळी कॉलेज कुमारांमध्ये सुरैय्या-नर्गीस, तलत-मुकेश हे कलावंत फार लोकप्रिय होते. क्वचित त्यांचे सिनेमे पाहणे, सतत त्यांची गाणी ऐकणे हा छदंच त्या पिढीला होता. यौवनाची धुंदी त्यामुळे आणखी दाट व्हायची. सहली, गॅदरिंग इथे ती धुंदी ओसंडून व्हायची. बापे विद्यार्थी अनुभवी. ते काय काय बोलायचे, कसे कसे वागायचे हे न सांगणेच बरे.**

## -१-

घरात गरिबी पण प्रेम– आईचे, शरूताईचे, तात्यांचे, जिजीचे. कॉलेज गरीबच; पण प्राध्यापकांचे, मित्र-मैत्रिणींचे प्रेमच प्रेम. डॉ. दा. ग. लोंढे, प्रा. या. मु. पाठक, प्रा. क्षीरसागर, सेन मॅडम, साहू मॅडम, चॅटर्जीसर असे मातब्बर प्राध्यापक. शिवाय सौ. उषाताई कोलते. प्रत्येकाची शिकवण्याची धाटणी वेगळीच.

लोंढे सर प्राचार्य. पांढरी पॅन्ट, पांढरा कोट. एकदम रेल्वेचे गार्डच वाटायचे. उंची सणसणीत, चेहरा घवघवीत, वर्ण चित्तपावनी, पण कोकणस्थीपणा नावालाही नाही. स्वत:त पूर्ण हरवलेले. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक दिसायचे खरे. ऑफिसमधून वर्गाकडे यायचे तेव्हा मुले मिरवणुकीसारखी त्यांच्या मागे वाकुल्या दाखवत, माकडचेष्टा करीत. सरांना त्याचे भानच नसायचे. रागावणे दूरच, बसून शिकवायचे. मी पहिल्या बेंचवर, त्यांच्या अगदी समोर. त्यांचे शिकवणे आवडणारा मी एकटाच. जिवाचे कान करून ऐकायचो. नाहीतर ऐकू कसे येणार? इतके सर हळू बोलायचे. कपाळ चोळत, शून्यात दृष्टी लावत. त्यांच्या बोलण्यात वक्तृत्व नसायचे. पण संथ, अंतर्मुख लय असायची. ते खोल, काळोखात काहीतरी शोधत आहेत असे वाटायचे. मध्येच केविलवाणे हसायचे, काहीतरी नवेच सापडण्याचा तो बालसुलभ आनंद असायचा. ते त्यांचे शिकवणे नसायचे, जगणेच असायचे. एक उदाहरण आठवते : नीतिशास्त्र शिकवताना त्यांनी शिक्षेचे प्रकार सांगितले.

१) जशास तसे. म्हणाले, ही रानटी पद्धत

२) दहशती पद्धत. एकाने कोकरू चोरले त्याची किंमत पन्नास रुपये. न्यायाधीशाने दंड ठोठावला, पाचशे रुपये, आरोपी म्हणाला, मी दुसरे चांगले कोकरू आणून देतो. न्यायाधीश महाराज म्हणाले नाही, तुला कोकरू चोरल्याबद्दल शिक्षा झाली नसून इतरांनी कोकरू चोरू नयेत म्हणून शिक्षा झाली आहे.

मी मनात म्हटले, ही दहशती शिक्षा समाजाच्या दृष्टीने किती चांगली; व्यक्तीपेक्षा समाजच महत्त्वाचा; पण तेवढ्यात सरांचे शब्द कानात कुजबुजले, इथे एका व्यक्तीला साधन मानून शिक्षा होत आहे हे नैतिकदृष्ट्या गैर. हा न्याय नव्हे, अन्याय आहे. तेव्हा माझे कान चमकले असतील बहुधा. मनाच्या काळोखात तेव्हा लखकन दिवा लागला तो अजून तेवतो आहे.

एकदा कपाळ चोळत-चोळत सर म्हणाले, चारित्र्य काही स्त्री-पुरुष संबंधावर अवलंबून नसते. मग कशावर? इच्छांच्या सुसंगतीवर. ज्यांच्या मनात इच्छांचा पसारा असतो ते कधीच चारित्र्यसंपन्न नसतात. उलट ज्यांच्या मनात इच्छांचा पिसारा नसतो ते चारित्र्यसंपन्न असतात.

संतांच्या मनात पिसारा तर सावचोराच्या मनात ढिगारा. पसाऱ्याचा पिसारा होण्यासाठी सर्व इच्छांना एक केंद्र असावे लागते असं सर त्यादिवशी खूप काही काही बोलले. खिडकीजवळ बाभळीचे झाड होतं काटेरी. तिथे सुगरण पक्षी (पक्षिणी नव्हे) सुबक घरटी बांधत होता. बाया पक्षीण साक्षिभावाने निरीक्षण करीत होती. नागपूरकडे सुगरिणीला बाया म्हणतात. तिच्या कपाळावर हळदीसारखी उभी रेष असते. मग मी कितीतरी वेळ तिच्याकडे टक लावून पाहत राहिलो.

स्वरूपराणी अभ्यासपूर्ण शिकवीत; चॅटर्जी सर कठीण शब्दांचे अर्थ पुस्तकांवर पेन्सिलीने लिहून ठेवीत. त्यांचेही बरोबरच होतं म्हणा. आर. एल. स्टिव्हनसनसचं 'व्हर्जीनीयस प्युरिक' हे एकदम फ्लॉअरी लॅंग्वेजमधलं पुस्तक. पुष्पित गद्य. माझं शब्द भांडार वाढवण्याचं काम या पुस्तकानंच केलं.

सेनमॅडम मायाळू वृत्तीने शिकवायच्या. आम्ही त्यांना आजीबाईच म्हणायचो. गोल्डन ट्रेझरी शिकवायच्या. त्यात नसलेल्या अगदी अपरिचित कविता म्हणायच्या. त्यांना संकोच कशाचाच नसायचा. मधेच टागोरांच्या काव्यमय ओळी सांगायच्या तर मध्येच शाळकरी मुलं लघवी करताना कोणाची धार दूर जाते अशी स्पर्धा लावते असे म्हणायच्या. आता बोला! तेव्हा मी हसतो का हे कुमुद हळूच पाहून घ्यायची. मी कशाला हसणार!

कॉलेजच्या चार वर्षांत दोन घनिष्ठ मित्र लाभले. राजा भिडे आणि मन्या बापट. दोघेही खरेखुरे कोकणस्थ. रंगाने, वागण्याने. प्रत्येकाने आपापल्या पैशाने चहा प्यायचा. मुलींपासून ते फटकूनच असत. म्हणत, अरे कौन इनपर पैसा खर्चा करेगा! तुझ्याशी मुली बोलतात ते तुझ्या नोट्स मिळविण्यासाठी. आम्हाला कोण विचारतंय? ते खरं होतं. कुमुद, सुधा, सरोज अशा माझ्या छान-छान तथाकथित मैत्रिणी होत्या. मीही मग म्हणायचो, अरे यार, मेरेपे भरोसा है उनका! आपको तो वो शक के नजरसे देखती है; ते हसायचे. चकल्लसबाजी. आणखी काय? वस्ताद इतके की म्हणायचे, चल माझ्या सायकलीवरून. मी कॅरियरवर बसायला लागलो की म्हणणार, सायकल तू चला. मी इतका बुद्दू की मैत्रीखातर त्यांचं ऐकायचो. मुलींच्या वाटेला जात नसत पण वाह्यातासारख्या कॉमेंटस आपआपसात करत. गंमत. त्यांच्यासह अंबाझरी तलाव, तेलंगखेडी तलाव इथे फिरायला जाणं हा एक शांत आनंद होता. राजा आपल्या वडिलांबद्दल आणि थोरल्या भावाबद्दल तक्रार करी. गंमत. मन्या बॉसच्या भानगडी सांगे. गंमत. त्यांच्या सहवासात माझ्या आयुष्याला एक वेगळीच डहाळी येई. भावविवश न होता कसे जगावे हे जणू ते एका देशस्थाला शिकवीत होते. हे त्यांचे शिकविणं पुढे शिवरंजनीने चालू ठेवलं. ते मला अजून पुरते आहे. त्यामुळे माझ्या मनातला भावनिक स्पंद आतल्या आत पुष्ट होत गेला. बहुधा त्यातूनच माझ्यातील कवी - कथाकार - समीक्षक जन्मास आला.

त्या काळी कॉलेज कुमारांमध्ये सुरैय्या-नर्गीस, तलत-मुकेश हे कलावंत फार लोकप्रिय होते. क्वचित त्यांचे सिनेमे पाहणे, सतत त्यांची गाणी ऐकणे हा छदंच त्या पिढीला होता. यौवनाची धुंदी त्यामुळे आणखी दाट व्हायची. सहली, गॅदरिंग इथे ती धुंदी ओसंडून व्हायची. बापे विद्यार्थी अनुभवी. ते काय काय बोलायचे, कसे कसे वागायचे हे न सांगणेच बरे. दरवर्षी त्यांच्या जाळ्यात दोन-तीन मुली सापडायच्याच. आमच्या चंदू माडखोलकरचे लग्न त्यामुळेच तर जमले. मीनाक्षी माडखोलकर मात्र आपला आब राखून वागायची. मोठं कुंकू लावायची. तिच्या भोवती मुलं असायची. पण एकजात नेभळट. भाऊसाहेब माडखोलकरांचा वचक होता. पु. भा. भावे यांच्या अनेक कथांमध्ये तत्कालीन कॉलेजजीवन अतिशय कलात्मकतेने चित्रित झाले आहे. 'पैज', 'पस्तीस', 'प्रदक्षिणा', 'सतरावे वर्ष' अशी किती नावे सांगावीत! त्या कथा. त्या काही अश्लील, शृंगारिक म्हणून ओळखल्या गेल्या. तसे त्यांना आज कोण म्हणेल? इतके जग बदलले आहे. आता सगळे खुले आम चालले आहे.

बी.ए. झालो आणि दोन वर्षांसाठी सरकारी नोकरीत शिरलो. कॉलेजजीवनाचा जपानी पंखा मिटला तो मग एम.ए.च्या वेळी पुन्हा उमलला. दरम्यान नाग नदीतून पुष्कळ नाग वाहून गेले होते. आठवणी मोलाच्या असतात, पण त्यातून मिळणारी ऊर्जा अधिक मूल्यवान असते.

**- २ -**

धनतोली पार्क तुम्हाला आठवतो ना? सीताबर्डी आणि कॉंग्रेसनगर यांच्या मधोमध वसलेला. त्याच्या एका कुशीत छोटी धनतोली, तर पलीकडे रामदास पेठ. स्वच्छ, शांत, विरळ वस्ती. सुखवस्तू, बडे लोक. माडखोलकर, कोलते, मा. गो. देशमुख वगैरे. लहानपणापासून या सुखी वस्तीतून माझ्या येरझारा. का नाही होणार? कॉंग्रेसनगरच्या पलीकडे आमची रेल्वे कॉलनी. हॅम्पयार्ड. अरे, तिथे एक दुकान नाही भाजीचं, किराण्याचं.

पिठाची चक्कीसुद्धा नाही. चक्क्या चालत असत लगतच्या जेलमध्ये. टांगा हवा, तर जा धनतोलीत. धनतोलीतून टांगा आणायचा व त्यात बसून पुन्हा धनतोलीत जायचं, घराच्यांसह. डोंगी बाबागाडीत ठेवा दळणाचे डबे आणि जा धनतोलीत. अशी शाळेपासून धनतोली माझ्या ओळखीची.

एक्कावन्नमध्ये मॅट्रिक झालो. कोणत्या कॉलेजमध्ये जायचं, हा प्रश्नच नव्हता. नागपुरातील बेस्ट कॉलेज मॉरिस. जीजीदादा तिथेच. शामू-मधू-राम-मनोहर हे मित्रही तिथेच. मग मीही तिथेच जाणार; पण तेव्हा मी थोडा आज्ञाधारक होतो. तात्या म्हणाले, ''अरे, तू नॅशनलमध्ये जा. ते सकाळचं कॉलेज. दुपारी सटरफटर नोकऱ्या करता येतील.'' मी मान डोलविली. मनात मात्र म्हटलं, ''मोठे बहीण-भाऊ शिकताहेत आणि मी मात्र सटरफटर माणूस. ठीक आहे.'' बडे भाई सो बड़े भाई, छोटे भाई सो सुभान अल्ला! नकटं व्हावं पण धाकटं होऊ नये, असं म्हणतात. मी म्हणतो, नकटं व्हावं, धाकटं व्हावं; पण मधलं होऊ नये. नातेवाइकांची पत्रं येत, त्यात झाडून सगळ्यांची नावे असत. नाव नसे ते फक्त माझं; त्याची भरपाई आता होते आहे.

आमचं नॅशनल कॉलेज ग्रेटच. सकाळी ७ ते १०. नोकरीवाले आणि गृहिणी यांचा तिथे राबता. सगळे एक जात बाप्ये आणि बाया. माझ्यासारखी मुले-मुली थोडीच. त्यामुळे त्यांची चट्कन गट्टी होई.

कुमुदची आणि माझी अशी सहजच गट्टी जमली. आमचे दोघांचेही विषय अगदी सारखे. मराठी, इंग्लिश लिटरेचर आणि फिलॉसॉफी असं कॉंबिनेशन कोण घेणार? राज्यशास्त्र-अर्थशास्त्र हे विषय सोपे. त्याला जोड संस्कृत या स्कोअरिंग विषयाची. हे कॉंबिनेशन सर्वमान्य. महाकवी डॉ. वर्णेकर संस्कृतचे प्राध्यापक. मी आपला एकलव्यासारखा त्यांच्या वर्गात बसत असे. इंग्लिशला सेन मॅडम आणि चॅटर्जी सर. तिसऱ्या स्वरूपराणी साहू. अगदी नावासारख्या. नक्षत्रासारख्या. त्यांच्याकडे पाहतच राहावे. बाप्ये विद्यार्थी वर्गात गर्दी करीत. रजिस्टरवर नावे चार - कुलकर्णी, मैंदरकर, देशमुख, जोशी. वर्गात मात्र विद्यार्थी चाळीस. आम्ही मॅडमना डेस्डीमोना म्हणायचो. ऑथेल्लो नाटक शिकवायच्या ना त्या. ऑथल्लोमधील सुस्वरूप डेस्डीमोनाचा गळा घोटतो नायक; इथे बाप्ये लोक स्वरूपाच्या गळ्याला कोरड पाडत. काही नाही हो, फक्त दृष्टिसुख. आय व्हिटॅमिन. देशमुख आणि जोशी कधीतरी वर्गात यायचे. नियमित मी आणि कुमुद. त्यांत एकमेकांच्या सहवासाचा हेतू होता की काय, कोणास ठाऊक! शेजारी-शेजारी बसत असू.

कुमुद गोकुळ पेठेत राहायची, मी मोदी नंबर एकमध्ये. ती कधी कारने, तर कधी सायकल रिक्षाने आमच्या घरी यायची. घरातल्या सगळ्यांशी बोलायची. शरूताईची आणि तिची विशेष गट्टी. आईही तिला काहीतरी चहा-सरबत द्यायचीच. मग आम्ही दोघं रमत-गमत कॉलेजला. लोक काय म्हणताहेत याचं आम्हाला भानच नव्हतं. तेव्हा कळत नव्हतं, पण आता अनुभवाने आणि पुलंच्या साक्षीपुराव्यानं कळतंय. 'पूर्वरंग'मध्ये पुलंनी बाली बेटांतील आपला अनोखा अनुभव चित्रित केला आहे :

''नाच सुरू झाला. अजंठ्याच्या भिंतीवरून सजीव होऊन उतरलेल्या तरुणींसारख्या दिसणाऱ्या तरुणींनी आपल्या शरीराची चालवलेली उभी नागमोड पाहून मी थक्क झालो आणि नाचाला संगीताचीदेखील साथ होती ती बासऱ्यांची. ह्या नाचाला 'लारी बुंबुंग' म्हणतात. बुंबु म्हणजे बांबू! नाचात तरुण होते. नाचता-नाचता ते त्या तरुणींच्या अगदी जवळ येत, पण अंगाला स्पर्श करीत नसत. त्या नर्तकी मात्र नृत्यव्यवसाय करणाऱ्या होत्या. त्यांच्याबरोबर कुणीही पुरुषाला नृत्य करता येत असे. उदबत्तीच्या सोंगटीतून धूम्रवेल जावी तसे त्या तरुणीचे शरीर लवत होते. ते तरुण नर्तक आणि नर्तकी नाचत-नाचत एकमेकांच्या अगदी जवळ येत आणि काचपात्रात सोनेरी मासळी ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत जावी तशा त्या तरुणी सुळ्कन दूर जात. हा पदन्यास इतका सफाईदार आणि अलगद होता की, त्यांच्या पायतळी ते लाकडी स्टेज नसून हे नृत्य अधांतरी चालल्याचा भास होई. मी मुखाला हळूच विचारले, ''ही जोडपी इतक्या जवळ येऊन स्पर्शदेखील न करता दूर का जातात?'' मुखाच्या चेहऱ्यावर एकदम 'शिरसि मा लिख, मा लिख, मा लिख' असा भाव दाटला आणि तो म्हणाला, ''तरुणीच्या अंगस्पर्शापेक्षाही अंगगंध अधिक मादक असतो. हॅव आय टु टेल यू धिस, सर?'' 'नातिचरामि'च्या घनघोर प्रतिज्ञेवर त्रिवार तोंडी सह्या केलेला मी एक मध्यमवर्गीय हिंदू नवरा आहे, हे त्या माझ्या प्राचीन धर्मबांधवाला कोणत्या शब्दांत पटवून देऊ, ह्या विचारात पडून, मंचावरच्या त्या अंगगंधाचा आस्वाद घेणाऱ्या तरुण भ्रमरांचा मी मनातल्या मनात हेवा करू लागलो.''

खरंच, कुमार वयात गंध पुरेसा असतो, स्पर्शाची निकड नसते; उलट स्पर्शामुळे मन अनावर होते. पु. भा. भावे यांना हे किती अचूक कळलं होतं; म्हणून त्यांची 'सतरावे वर्ष' ही कथा आजही टवटवीत वाटते. फक्त आज तिचे नाव 'सतरावे वर्ष' याऐवजी 'चौदावे वर्ष' असे करावेसे वाटते! कुमुद छान-छान साड्या नेसून यायची. सिफॉन, जॉर्जेट वगैरे नावे सांगायची. तेव्हा आमच्या घराला उतरती कळा लागली होती. शरूताईच्या साड्या साध्याच असत. ती साड्या स्वतःच धूत असे; मी इस्त्री करून देई. त्या साड्यांना साबणाचा जळका वास येई. कुमुद सुस्नात. ती जवळ बसली की प्रसाधनाचा, परफ्युमचा, कोऱ्या वस्त्राचा आणि मुख्य म्हणजे तिच्या झाकल्या अंगाचा धुंद वास येई; तेवढा मला पुरे. कच खाणाऱ्या मित्राला आता रूपवाणीवरची

युवती विचारते, ''आर यू गे ऑर इम्पोटंट?'' असा आचरट प्रश्न कोणी कोणाला तेव्हा विचारत नव्हतं. तो जमाना भडक दृक्‌श्राव्य माध्यमांचा नव्हता. नभोवाणीचा होता, त्याहून अधिक कथा-काव्यांचा होता. भाषेतील सूक्ष्म भाववलयं वाचकाच्या मनात तेव्हा अचूक विस्तारत होती.

कुमुदची आणि माझी मैत्री अर्धस्फुट कलिकेसारखी होती. तिच्यात हवेत पसरणारा गंध होता; पण ओघळणारा मध नव्हता. तिच्यावर क्वचित लाल ठिपक्यांचे काळे फुलपाखरू बसायचे; कधी चकाकत्या रंगांची, इस्त्रीच्या पंखांची फुलचुखी येऊन बसायची– बस, एवढेच. कुमुद 'फ्रेंचमन्स क्रीक' द्यायची, तर मी दादाने आणलेलं 'स्कार्लेट लेटर'. त्या देवाणघेवाणीत हलक्या हाते हळू दिलेल्या हळव्या छटा असायच्या. तो स्पर्शाचा वर्ख कितीतरी दिवस बोटांना झिणझिण्या आणायचा. बस्स, एवढेच.

कुमुदची चण लहानसर होती, मला आवडणारी. उंची बेताची, चेहरा लहानसर. तिला पाहिलं की फुलचुखीची आठवण व्हायची. नाकावर काळा मस होता– मोठा फुगीर तीळ. अशी जन्मखूण असलेल्या स्त्रीला विवाहसुख लाभत नाही, असं म्हणतात; ते खरंच ठरलं. कुमुदचं लग्न झालं

मुंबईच्या युवकाशी. मला माहीतच नव्हतं. तेव्हा मी कोल्हापूरला होतो. मुंबईला ग्रंथसंग्रहालयात उतरलो होतो. संध्याकाळी फोर्टमध्ये जुनी पुस्तके चाळत होतो. भोवती गर्दी घोंगावत होती. अशा गर्दीत ठरवूनसुद्धा कुणाची कुणाशी भेट होणे मुश्कील; तर समोर कुमुद! दोघेही थक्क. टेलिपथी म्हणावी, तर मी तर काही तिचं चिंतन करीत नव्हतो; तीही करीत नसावीच. दरम्यान, कित्येक वर्षांचं पाणी वाहून गेलं होतं. दोघेही थक्क, दोघेही मुग्ध. काळनदी रीती.

नव्या पत्त्यांची देवाणघेवाण झाली. शिरावरच्या बुट्टीत सावळा बाळकृष्ण घेऊन मी कोल्हापूरला. मग पत्रात शिवरंजनी– अभिनंदनबद्दल लिहिले, तर तिची पत्रं येणंच बंद.

पुढे कळलं की, तिचा घटस्फोट झाला. विदर्भातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्याशी तिचा विवाह झाला, गुणी अपत्यं लाभली. तिच्या नाकावरचा तीळ पुसला गेला की नाही, ते मात्र काही कळलं नाही; जन्मखुणा काय अशा पुसल्या जातात?

कॉलेजमध्ये होतो, तेव्हा आमच्या मैत्रीची चर्चा चाले. फार नाही, थोडीच! कारण? आम्ही अभ्यासात चोख, वागण्यात आदबशीर. ती मोटरवाली, मी कवी. तरी प्राध्यापकांना माझी काळजी. आपला मेरिटचा विद्यार्थी त्यांना हातचा घालवायचा नव्हता. म्हणून डॉ. लोंढे तत्त्वज्ञान शिकवता-शिकवता म्हणायचे, ''क्लिओपात्राच्या नाकावर तीळ असता तर जगाचा इतिहास बदलला असता!'' पाठक सर म्हणायचे, ''आजकाल कॉलेजमधल्या मुली 'हजबंड हंटिंग' करतात. मुलांनी सावध राहावं.''

मी सावध होतोच; कुमुदही सावध होतीच. आमच्या स्नेहाच्या सुरईत मद्यच नव्हतं, तर भय कशाचं? सुरई मात्र डौलदार होती, तिच्यात गळाभर वाळ्याचं सरबत होतं. नागपुरी पौगंडावस्थेत ते हवंच होतं. शरूताई आणि तिच्या सख्यांनी त्या सुरईवर बारीक नक्षीकाम केलं होतं; मग भय कशाचं?

आम्ही कोवळ्या कविता लिहीत होतो, पिस्ता कलरच्या लेटर-हेडवर पत्रं लिहीत होतो, 'दीपक'मध्ये चहा पीत होतो. तेव्हा माझ्याभोवती जणू काय आतली गंधवलयंच फिरत होती.

पिरियड ऑफ असला की आम्ही धनतोली पार्कमध्ये. नीलगिरीच्या झाडांना टेकून. आरामशीर, आदबशीर. पुस्तकं वाचीत. तेव्हा नागपुरात 'मराठी जग' नावाचं साप्ताहिक निघायचं. त्यात माझी कविता आहे याच अनुभवावर. 'मेरसोलचा सूर्य' निघाला तेव्हा काही ती सापडली नाही; गेली ती गेलीच.

माझं एक तत्त्वज्ञान आहे : घटना घडतात त्या विभिन्न घटकांच्या सांधणीनं. वेगवेगळ्या जातीचे घटक किती काळ एकमेकांना बिलगून राहतील? ते निखळणारच. ते जुळल्याने हुरळायचे नाही, तसेच ते निखळल्याने विव्हळायचे नाही. मग? त्या जुळणीने एक ऊर्जा निर्माण होत असते. ती जपायची? नाही; तीच आपल्याला जपत असते. आयुष्यभर. ऊर्जा.

कुमुद. एक लहानसर कुपी. तिच्यात एवढेसेच अत्तर होते. पिस्ता कलरचे. त्याचा परिमळ मला अजून पुरतो आहे. आता असं विचारू नका की, ही कुमुद आता कुठे आहे? काय?

**डॉ. द. भि. कुलकर्णी**
'वसुधा', ई-००४, डीएसके विश्व, ऑफ सिंहगड रोड,
धायरी, पुणे - ४११०४१
फोन नं. - ०२०-२४३८०८९४




**द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज्**

**जॉन बायेन**
अनु. **मुक्ता देशपांडे**

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

ही गोष्ट दुसऱ्या महायुद्धाच्या सुमाराची-जर्मनीत घडणारी. या युद्धाचे जगावर झालेले भीषण परिणाम आपल्याला माहीतच आहेत; परंतु या युद्धाशी निगडित छोट्या छोट्या गोष्टींनी एका लहान मुलाच्या भावविश्वात किती मोठी उलथा-पालथ झाली

ही संपूर्ण कहाणी ब्रूनो या नऊ वर्षांच्या मुलाच्या नजरेतून आपल्यापुढे उलगडत जाते.

## जगभरातल्या ३० हून अधिक भाषांमध्ये ५० लाख प्रतींच्या विक्रीचा टप्पा गाठणारी 'बेस्ट सेलर' कादंबरी आता मराठीत

# शांताराम




ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स

**अनु. अपर्णा वेलणकर**

**९९०रु. पोस्टेज ४०रु.**

*दूर देशाहून एक गोरं पाखरू.*
*पळून आलं होतं.*
*तुटलं होतं माणसांपासून... मातृभूमीपासून... जगण्यापासूनच!*
*मागावर असलेले पोलीस आणि स्वत:च्या डागाळलेल्या आयुष्याची लाज वाटणारं मन यापासून त्याला पळून जायचं होतं... लपून राहायचं होतं. ते उतरलं होतं मुंबईत.*
*अंधारी, काळी, कलकलाटाची दुनिया. पिचलेली... तरीही ताठ उभ्या कण्याची!*
*क्षणात नरडीचा घोट घेणारी, क्षणात प्रेमाची पाखर घालून पोटाशी कवटाळणारी दुनिया!*
*घर सुटलेलं, कुटुंब तुटलेलं, जिवलग दुरावलेले, अशा शून्य अवस्थेत भिरभिरणारं ते एकुट पाखरू शिरलं मुंबईच्या कुशीत.*
*– आणि बघता बघता सारं बदललं. एक नवीच दुनिया उलगडत गेली.*
*प्रेमाचा पाऊस... द्वेषाचा जाळ... विश्वासघाताचे सुरे...*
*रहस्यांचं चक्रव्यूह आणि गुपितांच्या गुहा!*
*शरीरसुखाच्या उफाळत्या लाटांवर नाचणारा उत्कट प्रणय*
*आणि तुरुंगाच्या अंधारकोठडीतला रक्तरंजित छळ.*
*जगण्याच्या लढाईत धगधगणाऱ्या झोपड्या आणि पंचतारांकित हॉटेलातलं थंडगार ऐश्वर्य.*
*अंडरवर्ल्डमधल्या टोळीयुद्धांच्या चिखलात रुजलेली तत्त्वज्ञानाची कमळं आणि बॉलीवुडच्या झगमगाटाआडचा सुन्न अंधार.*
*– मुंबई.*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# एल्फिन्स्टन कॉलेजमधले प्रभावशाली संस्कार

रत्नाकर मतकरी

**एल्फिन्स्टन कॉलेजच्या अशा बहुरंगी, बहुढंगी, व्यक्तिविकासाला वाव देणाऱ्या वातावरणात मी एका परीने रमलो, आणि रमलो नाहीही! याचे कारण थोडे लोक विलक्षणच होते! कॉलेजच्या पहिल्याच वर्षी मी आणि पुष्पा संस्कृत सोसायटीचे सेक्रेटरी झालो. शिवाय आम्हाला आकाशवाणीवरून संस्कृत नाटकातल्या छोट्या-मोठ्या भूमिकांसाठीही बोलावले जाई.**

माझे नाव वडिलांनी कॉलेजात घातले, तेव्हा मी मुंबईत नव्हतोच. शेजाऱ्यांच्या नाशिक जिल्ह्यातल्या गावी गेलो होतो.

रिझल्टची काहीच काळजी नव्हती. कारण शाळा (राममोहन हायस्कूल, मुंबई) माझ्याकडून बोर्डात येण्याची अपेक्षा ठेवून होती! त्याप्रमाणे आठवीपासूनच माझ्यावर अनेक निर्बंध घालण्यात आले होते. (शाळेतून आणि घरूनही... नाटकसिनेमांना जायचे नाही, मे महिन्याच्या सुट्टीतही पुढच्या इयत्तेचा अभ्यास करायचा इ. इ.) ८० टक्क्यांच्या वरची मुले बोर्डात पहिल्या दहात यायची; पण मला फक्त ७५ टक्केच मार्क मिळाले. सर्व विषयात ऐंशीच्या जवळपास (गणित या दोन्ही पेपरात तर ९५-९५) मिळूनही. त्यात एक गंमत झाली. माझे मराठीचे पेपर, मराठी निबंध वगैरे नेहमी आदर्श म्हणून दुसऱ्या वर्गामध्ये वाचून दाखवले जात. त्या विषयात माझा नेहमीच पहिला नंबर असे. असे असतानाही अंतिम परीक्षेत मात्र मराठीत मला फक्त ४५ मार्क मिळाले. सप्लिमेंट सुटले असतील, किंवा बेरजेत चूक असेल, म्हणून रिव्हॅल्युएशनसाठी अर्ज करावा, असे माझ्या स्वत:च्या किंवा वडीलधाऱ्यांच्याही लक्षात आले नाही किंवा त्याची गरज वाटली नाही. वडिलांनी माझे ७५ टक्के मार्क स्वीकारून माझे नाव एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये घालून टाकले. एल्फिन्स्टन आणि झेवियर्स ही दोन महाविद्यालये तेव्हा हुशार आणि सुखवस्तू मुलांसाठी असलेली मुंबईतील सर्वांत चांगली महाविद्यालये होती. तिथे ॲडमिशन मिळणे कठीण जात असे. पण माझ्या मार्कांनी, मला ॲडमिशनच काय, पण पहिल्या वर्षासाठी शिष्यवृत्तीही मिळाली. मला आर्ट्‌सलाच जायचे होते की सायन्स किंवा कॉमर्सला? जे जे स्कूल ऑफ आर्ट्‌सला जायचे नव्हते ना, असे प्रश्न कोणीच विचारले नाहीत आणि मी देखील आज्ञाधारकपणे २० जूनला (१९५४) एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये दाखल झालो.

कॉलेजची इमारत असावी, तर एल्फिन्स्टनसारखी असे म्हणावे लागेल. भव्य दगडी ऐसपैस इमारत. त्या तिच्या शिरोभागी कोरीव काम, मध्ये ऐसपैस चौक. तिथल्या भिंतीवर चढत गेलेली

प्रशस्त पानांची वेल, शॅलमध्ये जुन्या पाश्चात्य चित्रकारांनी काढलेली तैलरंगातली प्रचंड व्यक्तिचित्रे, किल्ल्यामध्ये शोभावेत असे कोपऱ्यातले दगडी जिने, काळोख आणि एकेकाचं अरुंद खिडकीतून पडणारे कवडसे... कॉलेजचे हे दर्शन थोडे जरब बसवणारे होते खास... शिवाय समोरच जहांगीर आर्ट गॅलरी, नाक्यावर रीगल सिनेमा आणि त्याच्या पलीकडे 'गेटवे ऑफ इंडिया' आणि ताज... कोवळ्या वयात वातावरणाचा म्हणून एक संस्कार माणसावर अवश्य होतो, असे मानले तर एका नागर सुसंस्कृतपणाचा - 'सोफेस्टिकेशन'चा परिणाम माझ्यावर एल्फिन्स्टन कॉलेजच्या वास्तूने आणि परिसराने केला, हे निश्चित.

कॉलेजमधली मुले आजूबाजूच्या चर्चगेटपासून ते पार दूरच्या मलबार हिलपर्यंत (यात मध्ये गिरगाव आलेच) राहणारी, आणि त्या त्या भागातील विशिष्ट संस्कृतीत वाढलेली होती. त्यातील बरीचशी अमराठी होती. आमच्यासारखी मराठी मध्यमवर्गातली मुले थोडीच होती. अर्थात पुढे मैत्रीमध्ये हे सगळे विसरले गेले. तरीही आम्हा मराठी मुलांचा एक गटच बनला. (या गटातल्या अनेकांनी पुढे नाव काढले, हा योगायोग?) मी, पुष्पा सरकार (आत्ताची भावे), अरविंद देशपांडे (पुणे विद्यापीठाचा इतिहासविभाग प्रमुख), गोपाळ मयेकर (पुढे गोव्याचा शिक्षणमंत्री) आणि अर्थशास्त्राच्या प्राध्यापिका भिडे बाई उर्फ अंबिका सरकार (कथालेखिका) असा आमचा ग्रुप होता. झालंच तर आमच्या दोन वर्षे पुढे होते रामदास भटकळ, प्रभुराम जोशी आणि 'अनफिनिश्ड इनिंग फेम - तत्त्वासाठी राजीनामा देणारे सचिव' माधव गोडबोले. याशिवाय आमच्या वर्गातली लैला पालेकर (टिपिकल चर्चगेट) आणि रजनी पंडित (प्रख्यात शेअरब्रोकर ए.बी. पंडितांची मुलगी, आणि मधुभाई पंडितांची सख्खी बहीण) या मराठीशी फारसा संबंध नसलेल्या पण पुढे पूर्णपणे मराठी झालेल्या. एक रामदास भटकळशी विवाह झाल्यानंतर त्याची भाषा, त्याचा गोतावळा आणि त्याचा व्यवसाय यांच्याशी एकरूप झाल्यामुळे बदलली, आणि दुसरी 'इकॉनॉमिक ॲंड पोलिटिकल वीकली'चे संपादन करताना गरिबांच्या हक्कासाठी भांडू लागून 'लोकशाही हक्क संघटना' चालवता चालवता आमूलाग्र बदलून गेली!

हे सारे सांगण्याचा मुद्दा एवढाच की पन्नास वर्षांपूर्वीच्या या पिढीला, स्वत:ला सुखसोयीत आणि फॅशनेबल वातावरणात वावरत असतानाही सामाजिक बांधिलकीची जाणीव होती आणि शक्य तेवढ्या प्रमाणात त्यांनी ती आपल्या पुढच्या आयुष्यातही पाळली, असे म्हणावे लागेल. पुष्पा भावे, रजनी देसाई, रामदास भटकळ, माधव गोडबोले ही मंडळी तर आजही कार्यप्रवण आहेत. पुष्पाचा थोरला भाऊ रमेशचंद्र सरकार हा कॉलेजात काही वर्षे आमच्या पुढे होता; तो त्याच्या इंग्रजीच्या व्यासंगामुळे प्रसिद्ध झाला. एका वर्षी तो 'मिस्टर एल्फिन्स्टन' सुद्धा होता. दुसरा 'मिस्टर एल्फिन्स्टन' होता माधव आपटे क्रिकेटवीर आणि उद्योगपतींचा वारस. त्याचा भाऊ अरविंद आणि बाळू व सुभाष गुप्ते हे क्रिकेटिअर्स पण आमच्याच कॉलेजात आमच्या पुढे होते. एल्फिन्स्टनचे व कुटुंबातले खानदानी मूल्याधिष्ठित संस्कार या साऱ्यांवरच होते.

माझ्या घरची परिस्थिती खानदान तर नव्हतीच, पण आईने काटकसरीने संसार सांभाळला नसता तर ती अडचणीचीच झाली असती. माझे वडील जरी त्या काळचे एम.ए., एल.एल.बी., बीटी होते तरी जन्मभर शिक्षकी पेशा आणि लिखाणाला संशोधनाला मदत असे पुण्यकृत्य करीत राहिलेले! भावंडे नोकरीला होती म्हणजे स्वत:चा खर्च सांभाळून घराला हातभार लावीत होती! पण मला कधी पैशांची चणचण जाणवली नाही. हॉटेलचे, नाटक-सिनेमाचे, पोशाखाचे असे फालतू नाद नसले, तर तरुण मुलाला पैसा लागतो कशाला? रेल्वेचा पास काढलेला (स्टेशनपासून उरलेले अंतर पैदल), घरी दोन वेळचे पोटभर जेवण (शिवाय आईने सर्व सणवार लक्षात ठेवून केलेले गोडधोड), पुस्तकांसाठी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (वडील तहहयात सभासद) आणि कॉलेजची व विद्यापीठाची वाचनालये... मग पैसा कशासाठी हवा? आमच्यापैकी बऱ्याचजणांची परिस्थिती सामान्य होती... पण कुणाचेच त्यामुळे काही अडले नाही.

कॉलेजांमध्ये त्या काळात उत्तमोत्तम प्राध्यापकांची परंपरा होती. ते आपल्या विषयात तर पारंगत असत, पण विद्यार्थ्यांनाही जिव्हाळ्याने मार्गदर्शन करीत. विल्सनचे प्रा. हरि दामोदर वेलणकर किंवा प्रा. वा. ल. कुलकर्णी हे आमच्या आधीच्या पिढीला शिकवीत असले, तरी त्यांची नावे आमच्या पिढीला माहीत होती. रुईयाचे प्रा. श्री. पु. भागवत आणि एस. एन.डी.टी.चे प्रा. माधव मनोहर यांनी आमच्या पिढीला शिकवले (अर्थात माझा विषय मराठी नसल्यामुळे मी त्यांच्या शिकवण्याला अंतरलो). मी एल्फिन्स्टनला असताना आम्हाला एका वर्षी इंग्रजी शिकवायला प्रा. मं. वि. राजाध्यक्ष होते. मराठी शिकवायला शंकर वैद्य नुकतेच रुजू झाले होते. त्यांची आमच्या ग्रुपशी चांगली मैत्री होती. वॉलपपेरसाठी मी काढलेल्या चित्राला अनुरूप अशी कवितादेखील ते लिहून देत. स्वामीनाथन नावाचे लॉजिक शिकवणारे एक प्राध्यापक विद्यार्थ्यांमध्ये खूप लोकप्रिय होते. तसेच जर्मन शिकवणारे परांजपे. पण मी या दोन्ही विषयांकडे न वळल्यामुळे माझा त्यांचा काही परिचय झाला नाही. आमचे प्राचार्य बॅनर्जी आम्हाला सिव्हिक्स शिकवत, पण त्यांचा आमच्यावर फारसा प्रभाव नव्हता. मात्र अचानकपणे मला, आमचे एक माजी प्राचार्य प्रा. आर. एन. वेलिंगकर भेटले. त्यांनी ज्ञानेश्वरीच्या वेगवेगळ्या प्राचीन पोथ्या जमवून एक अधिकृत प्रत तयार करण्याचा उद्योग

आरंभला होता. त्यांना सुवाच्य अक्षरात ज्ञानेश्वरी लिहून काढण्यासाठी उत्तम हस्ताक्षराचे विद्यार्थी हवे होते, त्यात माझी निवड झाली. पेडर रोडवरच्या त्यांच्या प्रशस्त घरात ते व त्यांची पत्नी दोघेच राहत. प्रा. वेलिंगकर अतिशय गप्पिष्ट होते. मला म्हणायचे ''किती वेळ गेला बघ आपला गप्पांमध्ये! आता गप्प राहून फक्त काम करायचं हं!'' त्यानंतर पाच मिनिटांनी, ''तुला ते हे सांगितलं का मी?'' म्हणून पुन्हा गप्पा सुरू. त्यांचं आपल्या अंध पत्नीवर फारच प्रेम होतं. माझ्या 'चार दिवस प्रेमाचे' मधले शेवटचे प्रगल्भ प्रेमिकांचे जोडपे वेलिंगकर पतीपत्नीवरच बेतलेले आहे.

आम्हा मराठी विद्यार्थ्यांना एकत्र आणणारं ठिकाण होतं आमचं 'महाराष्ट्र वाङ्मय मंडळ'. दरवर्षी आमचं स्नेहसंमेलन व्हायचं. त्यासाठी दिवाळीच्या महिनाभराच्या सुट्टीत मोठं तीन अंकी नाटक बसवलं जायचं. जुनी 'त्राटिका', 'घराबाहेर', 'राणीचा बाग' असली नाटकं बसवायला मामा पेंडसे, रामचंद्र वर्दे, चिंतामणराव कोल्हटकर असे दिग्गज दिग्दर्शक आमच्याकडे येत. नेपथ्य, संगीत, वेशभूषा सारे पारंपरिक पद्धतीने पार पडे. 'नाटक' या विषयावरच्या प्रेमाने आम्ही या उपक्रमासाठी खूप परिश्रम घेत असू, परंतु एक अवघड नाटक करून दाखवले यापलिकडे अधिक काही विद्यार्थ्यांच्या पदरात पडत नसे.

नाही म्हणायला आमच्या कॉलेजच्या शताब्दीनिमित्त आम्ही 'भूमिकन्या सीता' या, तोवर रंगभूमीवर न आलेल्या नाटकाचा प्रयोग केला. (दिग्दर्शन चिंतामणराव कोल्हटकर/पु.ल. देशपांडे) मीरा भांडारकर या विद्यार्थिनीने सीतेची भूमिका समर्थपणे केली. (हिने मनावर घेतले असते तर रंगभूमीवर मोठे नाव कमावले असते, अशी सौंदर्याची आणि अभिनयाची देणगी तिला होती! पण ती वेळच्या वेळी लग्न करून सुखात राहिली!) 'भूमिकन्या सीता'मध्ये पुष्पा सरकार, गोपाळ मयेकर यांनीही लक्षणीय भूमिका केल्या. शताब्दीनिमित्ताने आम्ही संस्कृत 'स्वप्नवासवदत्तम्' पण बसवले. वसंत बापटांनी त्याचे दिग्दर्शन केले आणि सुहासिनी देशपांडे (नंतरची मुळगावकर) हिने शीर्षक भूमिका केली.

मला स्वत:ला मात्र आमच्या मराठी नाटकांचे प्रयोग फार बोजड वाटत. त्यांना करता येईल, तेवढे साहाय्य मी करीत असेच, पण मला त्यातून स्फूर्ती मिळत नसे. ती मिळायची, ती ज्येष्ठ दिग्दर्शक 'नाट्यगुरू' इब्राहिम अल्काझी कॉलेजात येऊन इंग्रजी ग्रुपसाठी इंग्रजी नाटके बसवीत ती पाहताना. विद्यार्थ्यांचे नाटक बसवताना, केवळ प्रयोग चांगला वाटावा यासाठी त्यांच्यावर घाऊक व्यावसायिकतेचे दडपण न आणता, एखादी (मोलिए, बेन जॉन्सन च्या फार्ससारखी) हसतखेळत अकलेच्या चार गोष्टी सांगणारी प्रसन्न सुखात्मिका मुलांच्या कलाने बसवावी, त्यांनाच नेपथ्य, रंगभूषा इत्यादींचा विचार करू द्यावा, बाहेरचे नाट्यगृह भाड्याने न घेता, कॉलेजचे हॉल व चौक यांचाच कल्पकतापूर्ण उपयोग करावा. अभिनय सहज-स्वाभाविक असावा, या अल्काझींच्या आग्रहामधून मला शिस्तबद्ध तरीही स्वैर, कल्पकतेला वाव देणाऱ्या, अशा मोकळ्या रंगभूमीचे जे दर्शन झाले, त्यानेच माझ्यावर 'नाटक म्हणजे काय' या विषयातले पहिले संस्कार घडवले, जे पुढे जन्मभर टिकले. माझ्यावरील या संस्कारांविषयी मी इतरत्र अधिक सविस्तर लिहिले आहे ('माझ्या रंगप्रयोगाचा प्रारंभ' मौज, दिवाळी २००९) म्हणून इथे फार तपशिलात लिहीत नाही.

एल्फिन्स्टनला डिबेटिंगची देखील एक परंपरा होती. महाराष्ट्र वाङ्मय मंडळातर्फे वरचेवर डिबेट्स व्हायचेच, पण आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांमधूनही आमचे विद्यार्थी भाग घ्यायचे. नेहमीच्या डिबेट्समध्ये पुष्पा, गोपाळ मयेकर, प्रभुराम देसाई हे हिरिरीने बोलून प्रतिस्पर्ध्यांची बाजू खोडून काढीत. (पुढे तिघेही प्राध्यापक झाले). इथले वक्तृत्वगुण तर पुढे गोपाळच्या कामी आला तो गोवा मुक्तीनंतर 'महाराष्ट्रवादी'साठी उमेदवार म्हणून प्रचार करताना. आमच्या कॉलेजची आशा दातार नावाची एक मुलगी होती. नावाइतकीच साधी दिसणारी ही मुलगी, वक्तृत्वात सर्वांना हरवून कॉलेजसाठी ट्रॉफीज घेऊन यायची. तिची बुद्धिमत्ता इतकी अलौकिक होती की अर्थशास्त्र घेऊन ती एम.ए. झाली. ती थेट वर्ल्ड बँकेत एका उच्च पदावर विराजमान होण्यासाठी. मात्र, चित्रपटातच शोभावा अशा दैवदुर्विलासाने, ती तरुण वयातच मोटार अपघातात निधन पावली.

एल्फिन्स्टन कॉलेजच्या अशा बहुरंगी, बहुढंगी, व्यक्तिविकासाला वाव देणाऱ्या वातावरणात मी एका परीने रमलो, आणि रमलो नाहीही! याचे कारण थोडे लोकविलक्षणच होते! कॉलेजच्या पहिल्याच वर्षी मी आणि पुष्पा संस्कृत सोसायटीचे सेक्रेटरी झालो. शिवाय आम्हाला आकाशवाणीवरून संस्कृत नाटकातल्या छोट्या-मोठ्या भूमिकांसाठीही बोलावले जाई. एकदा, आजूबाजूला एकांकिका लिहिण्यासाठी कसलेही कारण नसताना, एकांकिकाच मुळात क्वचित लिहिल्या जात असताना, मला एकाएकी 'वेडी माणसं' ही एकांकिका सुचली. ती पूर्ण संवाद, हालचाली, ध्वनी, नेपथ्य यासकट. इतकी परिपूर्ण की, ती लिहून काढल्याशिवाय राहणे अशक्य! लिहिल्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे आकाशवाणीवर गेलो असताना मी ती तिथल्या अधिकाऱ्यांना वाचायला दिली. आश्चर्य म्हणजे स्टेशन डायरेक्टर ल. गो. भागवत यांना ती आवडली, त्यांनी ती लगेच ध्वनिक्षेपित केली आणि आमच्यासाठी वरचेवर लिहीत जा, असेही बजावले.

त्यांनी असे बजावले तरी मला लगेच दुसरी एकांकिका (आकाशवाणीचा शब्द 'श्रुतिका') सुचली नसती, तर ही संधी तिथल्या तिथेच राहून गेली असती! पण... माझ्या डोक्यात जणू

एखादा लोंढा शिरून, त्याने सगळे बांध कोसळून टाकावेत तसे झाले! मला एकसारख्या नवनव्या कल्पना सुचायला लागल्या. त्यांचा, म्हटले तर भागवतांना दिलेल्या शब्दाशी काही संबंध नव्हता. कारण त्यातल्या काही ज्यांचा संवादावर वा ध्वनीवर अधिक भर होता त्या एकांकिका मी आकाशवाणीला दिल्या, पण इतर नेपथ्यासकट संपूर्ण अशा डोळ्यासमोर दिसत राहिल्यामुळे लिहिल्या गेलेल्या एकांकिकांचे स्पष्टीकरण काय? त्या मला कशा सुचल्या होत्या आणि वेळात वेळ काढून मी त्या का लिहून ठेवत होतो (कुठंही न पाठवता) याचे काही स्पष्टीकरण नव्हते.

आकाशवाणीवर सातत्याने माझ्या एकांकिका उत्तम नटसंचात येऊ लागल्यावर दुसऱ्याच एकांकिका 'यंत्र' हिच्यामध्ये आत्माराम भेंडे आणि लिली केळकर यांनी कामे केली. माझे नाव ताबडतोब घरोघरी पोहोचले, कारण त्या वेळी रेडिओइतके सोयीचे दुसरे करमणुकीचे माध्यमच नव्हते; दर बुधवारी 'श्रुतिका' ही ऐकली जायचीच. त्यामुळे कॉलेजमध्ये ताबडतोब माझ्याविषयी एक वेगळे कुतूहल तयार झाले. आधी मी स्कॉलरशिप-होल्डर म्हणजे हुशार मुलगा म्हणून माहित होतो, नंतर मी काढलेली चित्रे आमच्या वॉलपेपरवर लागू लागली होती आणि आता तर आकाशवाणीवरून माझे नाव ऐकू येऊ लागले होते... म्हणजे या मुलाला येते तरी काय काय, अशी एक भावना माझ्याविषयी तयार होऊ लागली होती...

माझ्यासाठी मात्र ही भावना फारशी सुखाची नव्हती. उलट नको असलेल्या जबाबदारीची होती. मला लेखक व्हायचे नव्हते, मी केव्हाच मराठी हा विषय अभ्यासासाठी घेणार नव्हतो! कुठल्याच साहित्यिकाविषयी मला काही ग्लॅमर नव्हते, पण रंगभूमी आणि तिचे अद्भुत वातावरण मात्र मला भुरळ घालत असे. तिथले पाच मिनिटांत अख्खा सेट उभा करणारे कामगार मला किमयागार वाटत. डोळ्यांसमोर हे जग मध्येच अवतरे आणि मला बोलावू लागे. हे भास कॉलेजचा वर्ग चालू असतानाही माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात चालू राहात. कथानके जुळत राहात. संवाद तयार होत राहात. केव्हा एकदा वर्ग संपतो, असे होऊन जाई. पुन्हा घरी निघाल्यावर वाटभर तेच! आणि घरी आल्यावर तर अभ्यासाचे पुस्तक पुढे ओढणेच शक्य नसे, इतकी सुचलेले लिहून काढण्याची घाई!

घरात हे कोणाला कळत नसे. साहित्यिक जाण असलेल्या माझ्या वडिलांना देखील! घरात किंवा बाहेरही, माझा अभ्यास घ्यायला, माझी विचारपूस करायला कोणी नव्हते! त्यातून माझे अभ्यासाचे विषय कठीण होते. मॅथमॅटिक्स, स्टॅटिस्टिक, इकॉनॉमिक्स असले! माझ्या भावाची महत्त्वाकांक्षा होती, मला बँकर करण्याची. माझा त्याला फारसा विरोध नव्हता (चित्रकार होणे मला आवडले असते, पण ते त्या वेळी 'भिकेचे लक्षण' होते! आणि नाटकाच्या विषयांबरोबर चित्रांचेही विषय माझ्या डोक्यात फिरत राहिले असते, तर तिथे रणकंदनच माजले असते!)

यातच, म्हणजे मी कॉलेजच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षाला असताना (वय जेमतेम १७-१८) एकदा माझा पत्ता काढत नंदकुमार रावते आणि आनंद पै, हे दोघे आले. त्यावेळी भारतीय विद्या भवनाने ज्या तरुणांना, त्यांचा उत्साह आणि रंगभूमीविषयीची नवी जाणीव बघून आपल्या नाट्यगृहाच्या मंचावर प्रकाश योजना, नेपथ्य इ. सह मुक्तद्वार दिले होते, त्यापैकी हे दोघे. एक दिग्दर्शक आणि दुसरा नेपथ्यकार. त्यांनी माझ्याकडून दोन-तीन एकांकिका नेल्या (मी स्वत:हून त्या कुठेही पाठवल्या नव्हत्या. माझ्या दृष्टीने त्या लिहून होताच माझी गरज संपली होती!) लगेच त्यांनी त्या भवनच्या नाट्यस्पर्धेत सादर केल्या. त्या क्रमाकांत आल्या आणि मग आकाशवाणीप्रमाणेच स्पर्धांमधूनही माझ्या एकांकिका सादर केल्या जाऊ लागल्या. मग त्या संपादकांनी मागवून घेऊन मासिकात छापल्या, पुढे प्रकाशकांनी त्यांचे संग्रह केले. वगैरे वगैरे.

या सगळ्याविषयी माझा स्वत:चा उत्साह माफक असायचा. माझी एकांकिका बसवली जात असली, तरी तालीम बघायला मी कधीच जात नसे. प्रयोगाला गेलो तर जाई. पण तिथेही प्रयोग चांगला झाला नाही, किंवा विद्यार्थी प्रेक्षकांनी आरडाओरड केली, तरी मी ते मनाला फारसे लावून घेत नसे. आजही नाटकाच्या यशापयशाविषयी माझी तीच भूमिका असते. याचे मुख्य कारण तेव्हाही आणि आजही असे, ते म्हणजे वेळ! तेवढ्यापुरते एखादे काम करणे शक्य असते; पण दिवसेंदिवस त्यात अडकून पडायला वेळ कुणाला असतो? आपल्याला लगेच पुढे जायचे असते. अपयश सोडाच, पण यशाचा आनंदही फार काळ टिकत नाही.. ५००-१००० प्रयोग झालेल्या माझ्या नाटकांचे सुद्धा मी एखाददुसरे प्रयोगच पाहिलेले आहेत! ही वृत्ती कॉलेजपासूनचीच आहे... कारण लिखाण, अभ्यास, घरची कामं यात वेळ वाटून देता देता पुरेवाट व्हायची... शक्य असेल तर मी शाळेत करायचो तसा व्यवस्थित अभ्यास एके अभ्यास केला असता, पदव्यांमागून पदव्या घेऊन नोकरीत एकदम वरची जागा पटकावली असती आणि मग शांतपणे सवडीने लेखन सुरू केले असते. कला... छंद... काहीही म्हणत!

पण ते व्हायचे नव्हते! अचानक एखादा आजार उद्भवावा त्याप्रमाणे माझ्या हातून अभ्यास, माझे करियर या साऱ्याचा ताबा घेतला. स्वभावात काही एक शिस्त असल्यामुळे त्यातूनही मी वाचलो. परीक्षेच्या वेळी स्वत: पुस्तके वाचून झाले तरी गणितासारख्या कठीण विषयाचा अभ्यास केला आणि निभावून

गेलो. पण एरवी हुशार मुले जशी आधीच्या वर्षांचे पेपर्स सोडवतात, एकमेकांत चर्चा करतात. एकसारख्या शंका विचारून प्राध्यापकांचे डोके खातात आणि तसे काही करण्यात कॉलेजजीवनाचा जो आनंद मिळवतात तो मात्र मला (तशी योग्यता असतानाही) मिळू शकला नाही!

मात्र माझ्या या अगदीच तरुण वयात केलेल्या लिखाणामध्ये केवळ उत्साह नव्हता, तर प्रगल्भताही होती, हे आश्चर्य! गेल्याच वर्षी (डिसेंबर ०९) मध्ये कणकवली येथे वसंतराव आचरेकर प्रतिष्ठानने केलेल्या माझ्या एकांकिका-महोत्सवाच्या निमित्ताने ही गोष्ट मला पुन्हा नव्याने जाणवली. दुसरे असे की माझी त्या वेळची लेखनाची उर्मी ही केवळ कॉलेजच्या दिवसांपुरती राहिली नाही. तर तिने माझा कायमचा कबजा घेतला! बीए नंतर एक वर्ष पोद्दार कॉलेजला बीकॉमसाठी काढल्यानंतर मी लगेच नोकरीला लागलो. पण त्याच्या आधीच माझे एक मुलांचे (मधुमंजिरी निर्माते मुंबई मराठी साहित्य संघ) आणि एक प्रौढांचे (वाऱ्यावरचा मुशाफिर, निर्माते नाट्यकलोपासक मंडळ) अशी दोन नाटके रंगभूमीवर आली होती.

कॉलेजमध्ये अभ्यास सांभाळून लेखनाची जी तारेवरची कसरत करावी लागली, ती पुढे नोकरी, संसार, संस्था, दिग्दर्शन इत्यादी अनेक गोष्टी सांभाळत आणखी पन्नास-पंचावन्न वर्षे चालूच राहिली आहे. त्यामुळे कॉलेजचे दिवस लेखनप्रवासातून वेगळे काढणे कठीण जाते. एवढे मात्र खरे की, कळत नकळत एल्फिन्स्टनने माझ्यावर जे शिक्षणाचे, साहित्याचे, कलेचे, संस्कृतीचे आणि सभ्यता-शिष्टाचार यांचे संस्कार केले, त्यांचा फार मोठा प्रभाव माझ्या लेखनावर, दिग्दर्शनावर आणि एकूणच जगण्याच्या पद्धतीवर झाला.

कॉलेजच्या दिवसात माझे काही प्रेमप्रकरण झाले का असा प्रश्न नेहमी मला विचारला जातो. प्रेमप्रकरण कॉलेजमध्ये नाही तर कॉलेज संपल्याबरोबर लगेच झाले! मात्र एल्फिन्स्टनला इतर सर्वच गोष्टींप्रमाणे प्रेमही गंभीरपणे आणि बऱ्याचदा 'लाँग टर्म बेसिसवर करण्याची परंपरा होती. म्हणजे चुटपुटत्या प्रेमप्रकरणांऐवजी इथे विवाहात परिवर्तित झालेली प्रकरणे अधिक! तीही रंगेल, 'प्लेबॉय पद्धतीच्या मुलामुलींची नव्हेत, तर गंभीर स्कॉलर्सची! म्हणूनच आमच्याकडे प्रेमिक दिसत ते लायब्ररीतल्या, कपाटांनीच घडवलेल्या छोट्या-छोट्या क्युबिकल्समध्ये, टेबलाशी समोरासमोर बसून, जगाला विसरून 'अभ्यास' करताना! कोणीतरी आमच्या प्राचार्य बॅनर्जींना एकदा म्हटले, ''हे चांगलं नाही दिसत! तुम्ही ही क्युबिकल्ससारखी रचना बदलून का नाही टाकत?'' त्यावर ते हसून म्हणाले, ''कशी काढून टाकणार? ही एल्फिन्स्टनची परंपरा आहे!... खुद्द माझा प्रेमविवाहही इथे असाच जुळला ना!''


**रत्नाकर मतकरी**
७७६/ए राधा निवास, टिळक रोड,
दादर, मुंबई ४०० ०१४.
फोन नं. - ०२२-२४१८८३८३
matkari_ratnakar@yahoo.co.in



## रत्नाकर मतकरी यांचे साहित्य

| गूढकथा | किंमत |
|---|---|
| स्वप्नातील चांदणे | ७० |
| खेकडा | ८० |
| निर्मनुष्य | १०० |
| कबंध | १०० |
| मध्यरात्रीचे पडघम (फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स २००६ पुरस्कार) | १०० |
| निजधाम | १०० |
| संभ्रमाच्या लाटा | ११० |
| फाशी बखळ | १२० |
| मृत्युंजयी | १५० |
| रंगांधळा | १५० |

| नाटक | किंमत |
|---|---|
| तनमन | ४० |
| जादू तेरी नजर | ६० |







मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,

पोस्टेज खर्च प्रत्येकी २०रु.



# आम्ही बि'घडलो, तुम्ही बि'घडाना!

चंद्रमोहन कुलकर्णी

**आर्ट स्कूलच्या इमारती वर्षानुवर्षं उभ्या असतात. त्यांना दोन प्रवेशद्वारं असतात. एक आर्ट स्कूलचं, छोटं. एक जगाचं, मोठं. छोट्याच्या पोटात मोठं. आर्ट स्कूलच्या प्रवेशद्वारातून तुम्ही आत जायचं, थोडा वेळ थांबायचं. रेंगाळायचं. मजा करायची. काही काळानं दुसरं दार उघडतं– जगाचं. मोठं. तिथून पुढे, तुम्ही पुढे जायचं. जगात. तुमच्या जगात. तिथं काहीही करायचं. तुम्हाला आवडेल ते.**

मॅट्रिक झाल्यावर वडील म्हणाले,

''चला, चित्रकलेच्या शाळेत प्रवेश घेऊन टाकू.''

स्वारगेटच्या पोलीस कॉलनीतून टिळक रोडवरच्या अभिनव कला विद्यालयात सायकलवरनं जायला फार वेळ लागला नाही.

हल्ली कॉलेजात प्रवेश घेताना जशी मार्कांची आणि पर्सेंटेजची मारामारी चालते, तसलं काही त्या काळात नव्हतं. आणि मला चित्रकलेव्यतिरिक्त इतर कोणत्याच विषयात इंटरेस्ट आणि मार्क दोन्ही नव्हते. माझं साधारण प्रगतिपुस्तक असं : सर्व भाषा 'येत' असल्यामुळं इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत ओके. गणित शून्य. इतिहास हरवलेला. भूगोल दिशाहीन. सायन्स बोंब. फक्त चित्रकला चांगली. त्यामुळे सरळच प्रवेश मिळाला.

माझे वडील 'अभिनव'ला कॉलेज वगैरे न म्हणता सरळ 'चित्रकलेची शाळा' असं म्हणत. तसं ते खरंही होतं. चित्रकलेची शाळाच होती ती. आम्ही आपलं प्रतिष्ठित वाटावं म्हणून तिला 'आर्ट स्कूल' किंवा 'कॉलेज' असा वरचा दर्जा दिला होता. प्रवेश घ्यायच्या वेळी आईनं थोडी कुरकुर केली, पण अर्थातच वडिलांपुढे तिचं काही चालेना. इयत्ता नववीपर्यंत शिकलेल्या, पोलीस खात्यात कॉन्स्टेबल असणाऱ्या, रांगडा स्वभाव आणि तशीच देहयष्टी असणाऱ्या पण कोमल मनाच्या वडिलांनी माझ्या तथाकथित 'करिअर' करण्याच्या 'डिसिजन'मध्ये यत्किंचितही ढवळाढवळ न करता स्वत:च्या हातानं मला चित्रकला ह्या अत्यंत बेभरवशाच्या क्षेत्रात आणून बसवलं. खाकी वर्दीनं रंग-रेषांचा मान ठेवला. या शिक्षणातनं पैसे कधी आणि किती मिळणार, हेसुद्धा साधं विचारलं नाही. तीन आकडी उत्पन्न असलेल्या आणि सहा जणांच्या कुटुंबातल्या मुलग्यांपैकी मी मोठा मुलगा होतो. मळलेल्या वाटेवरचं एखादं बीकॉम, बीए वगैरेसारखं करिअर घेऊन लवकर लवकर (शक्यतो सरकारी खात्यात) नोकरीला लागून पैसे कमवून घरखर्चाला हातभार लावावा, अशी त्यांनी अपेक्षा केली असती तरी ती काही फार गैर ठरली नसती.

चित्रकलेच्या शिक्षणात फक्त 'फी'चाच केवळ खर्च नसतो, इतर पुष्कळ खर्च असतात. कागद, रंग, ब्रश, पट्ट्या, पेन्सिली, टी-स्क्वेअर, सेट्स्क्वेअर, रोटरिंग, क्रोक्विल, कंपासबॉक्स, ड्रॉइंग बोर्ड, फुल इंपीरियल, हाफ इंपीरियल; शंभर प्रकार! थोडक्यात : आर्ट मटेरियल ! (ह्यामध्ये इन्स्टुमेंट बॉक्स नावाचा खतरनाक प्रकार असे. प्रचंड महाग असलेल्या ह्या बॉक्समधली प्रत्येक गोष्ट अत्यंत मूल्यवान आणि वापरायला तेवढीच किचकट. मला तर माझ्या त्या 'मरून' कलरच्या, 'स्टेड्लर'चा लोगो गोल्डननं एम्बॉस केलेल्या सर्वांत महागड्या इन्स्टुमेंट बॉक्सची भीतीच वाटायची. 'त्यातला सर्वांत भारी कंपास वापरूनसुद्धा माझ्या संपूर्ण कॉलेजच्या संपूर्ण आयुष्यात संपूर्ण नीट वर्तुळ कधीच काढता आलं नाही. दर वेळेला वेगळ्या ठिकाणी वर्तुळ तुटत असे किंवा आपला मार्ग सोडत असे...) तर हे असले खर्च करायचे म्हणजे पैसा आला. खरं तर फीचा फॉर्म भरताना पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडून फी माफ करून घेता आली असती त्या वेळेला, पण आमचे वडील स्वाभिमानी ना ! त्यांना ते आवडत नसे. कमीपणाचं वाटत असे की काय कोण जाणे, पण आम्हा भावंडांपैकी कुणालाच ते तसला फॉर्म भरू देत नसत. आई प्रॅक्टिकल. तिला हे त्यांचं  वागणं आवडत नसे, पटतही नसे. पण ते काय तिचं ऐकणार? मी आपली इमानदारीत नोकरी धरली. सकाळ-संध्याकाळ नोकरी, (चित्रकलेचीच). दिवसभर कॉलेज.

■

फाऊंडेशनचा वर्ग अजून आठवतो. सर्वांत वरच्या मजल्यावरचा मोठ्ठा वर्ग. पुष्कळ खिडक्या, भरपूर उजेड. खिडक्यांना गडद हिरव्या रंगांचे पडदे. आर्ट मटेरियल न्यायला-आणायला 'शबनम बॅग' नावाची झोळीसदृश बॅग तेव्हा 'इन' होती. आमच्या टोळक्याला हा मस्त हिरवा रंग फार आवडला. तसल्या रंगाची शबनम बाजारात कुठे मिळेना, म्हणून कोपऱ्यातल्या अडचणीच्या ठिकाणी असलेल्या एक-दोन खिडक्यांचेच पडदे मास्तरांच्या नकळत घरी नेऊन त्याच्या झोळ्या शिवून आणल्या. नंतर पुष्कळ दिवस खटावकरसरांचं आमच्या पिशव्यांचं निरीक्षण चाललेलं होतं.

शंभरच्या वर मुलं. आडनावांच्या आद्याक्षराप्रमाणं ग्रुप केलेले. या ग्रुपप्रकरणामुळेच जक्कलची आणि माझी मैत्री झालेली. तो 'जे' आणि मी 'के'. शेजारीशेजारीच बसायचो आम्ही. आता हा जक्कल कोण, हे वर्णन करून सांगण्याची काहीच खास आवश्यकता नाही. आपल्या देशात कुप्रसिद्ध माणसांची वेगळी ओळख करून देण्याची गरज नसते. तशी गरज सुप्रसिद्ध माणसांची ओळख करून देतानाच भासते.

चित्रकलेच्या शाळेतला पहिला धडा मी ह्या माझ्या मित्राकडूनच शिकलो. एक इंच लांब टोक करायचा तो, पेन्सिलीला! अत्यंत शार्प टोक करून (माझ्या) हाताला टोचून दाखवायचा. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, तसं इथं कोणाला 'हात' दिसू शकतील. पुढे पुढे लांब टोक करायची ही सवय मलाही लागली. टू-एच/थ्री-एच असल्या अतिहार्ड पेन्सिलींना तसलं टोक केल्यावर तर फारच मजा यायची. कारण ते टोक खूप दिवस टिकायचं. टोक खूप दिवस टिकायचं, कारण ह्या पेन्सिली मी कधी वापरायचोच नाही. खरं तर असल्या हार्ड पेन्सिली वापरण्यासाठी नसतातच. आर्किटेक्चरला असलेल्या मुलांच्या हातात तसल्या हार्ड पेन्सिली दिसायच्या. तसल्या पेन्सिलींमधून रेष कागदावर फक्त उमटायची, पण दिसायची कधीच नाही.

खटावकरसर फाऊंडेशनला 'थ्रीडी' शिकवत. थ्रीडीचा वर्ग इतर विषयांच्या वर्गापासून वेगळ्या ठिकाणी. कारण इथं पसारा फार. माती, प्लॅस्टर, चुना, फक्की, माऊंटबोर्डचे तुकडे, पट्ट्या असलं काय काय. ठोकळे, गोल, चौकोन, आयत, लांबुळके, उभट, आडवट शंकू, पोकळ्या, भोकं, मूर्ती असं काहीही. खटावकरसर आम्हाला खडूतून खडू वजा करायला शिकवत. खडूतून खडू वजा केला की उरायचं ते थ्रीडी काही तरी. म्हणजे साखळी, खांब, बाई, बुवा, मीनार, दांडू असं काहीही. मजा.

**माझा मित्र पराग**

परागनं मला एकदा खटावकरसरांच्या तुळशीबागेतल्या शिल्पशाळेत नेलं. 'अभिनव'मधला प्रत्येक जण कुणाबरोबर ना कुणाबरोबर तरी खटावकरसरांच्या ह्या स्टुडिओत एकदातरी जातोच. मातीत खऱ्या अर्थानं मी हात घातला, तो तिथं! काहीही करायचं; पण सगळ्यात आधी माती मळायला शिकायचं. पुष्कळ दिवस आधी नुसती माती मळायची. मग मूर्ती वगैरे. आर्मिचर वगैरे जरा सिनिअर झाल्यावर. स्टुडिओत जबरदस्त पसारा. अस्ताव्यस्त कारभार. निम्मे लोक मातीमुळे पांढरे पडलेले. गणपतीसह पौराणिक आणि ऐतिहासिक लोकांचे अवयव इतस्तत: विखुरलेले. जणू युद्धभूमीच. त्या युद्धभूमीवर बनियन आणि चट्ट्या-पट्ट्यांचा पायजमा घालून गणपतीसारखेच दिसणारे खटावकरसर एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे आपल्या कामात गर्क असायचे.

वर्गात वेगळी थ्रीडी कशाला शिकायला लागतेय?

या थ्रीडीमध्ये 'थर्माकोलपासून काहीतरी' करायचं असे. एरवी सबमिशनपुरतं आम्ही वर्गात थर्माकोलचे पिरॅमिड, चौकोनी ठोकळे, चेंडू, शंकू असलं काहीतरी करून असाइनमेंट पूर्ण करायचो. पण दिवाळीच्या दिवसांत या थ्रीडीचा आकाशकंदील करायला फारच उपयोग झाला. परागच्या नव्या पेठेतल्या खोलीवर हा आमचा आकाशकंदिलाचा उद्योग चालायचा. वर्गातल्या कामामुळे

थर्माकोल हाताळायची चांगलीच प्रॅक्टिस झालेली. त्यामुळे नक्षीचे भारी-भारी आकाशकंदील तर करायचोच; पण नुसतेच त्रिकोणी, अर्धवट चौकोनी, आयताकृती असले 'मॉडर्न' कंदीलदेखील करायचो. ते फारसे खपायचे नाहीत, हा भाग वेगळा. दिवसभर सुंदर-सुंदर आकाशकंदील करून ते काठीला लटकवून संध्याकाळी डेक्कनवर विकायला जायचो. चांगल्यापैकी पैसे मिळत. निदान सेकंड टर्मची फी तरी नक्कीच निघत असे त्यातून.

शिक्षण म्हणजे दुसरं काय असतं अजून!

■

दिवाळीच्या सुट्टीत मी फटाक्यांच्या स्टॉलचे बोर्ड रंगवून देत असे. 'अमुक फटाका मार्ट', 'तमुक फटाका मार्ट', लवंगीचा रेट, ॲटमबॉंबचा रेट, 'लक्ष्मी'चा रेट इत्यादी. सुरुवातीला म्हणजे फाऊंडेशन आणि पुढे एलिमेंटरीच्या वर्षात शिकेपर्यंत माझं लेटरिंग चांगलं होतं. तोपर्यंत मी व्ही के आर्ट्‌स या पेंटरच्या दुकानात किंवा पेंटर के. बी. देवांकडे जात असे. त्यामुळे साइनबोर्ड करायची मला चांगलीच प्रॅक्टिस होती. आमच्या दृष्टीनं वहीवर, कागदावर पेननं, पेन्सिलीनं साधं लिहिलेलं ते म्हणजे अक्षर आणि लेटरिंग म्हणजे; स्पेशल केलेलं. म्हणजे ब्रशनं वगैरे, प्रसंगी आऊटलाईन आखून ठरवून मुद्दाम वळणदार केलेलं, सहज वाचता येईल असं, शार्प.

पुढे इंटरमिजिएटला गेल्यावर आम्ही 'कॅलिग्राफी' शिकलो. लेटरिंग मागे पडून कॅलिग्राफीचा नाद लागला. एका दिवाळीच्या सुट्टीत तर फटाक्याच्या बोर्डवरच ह्या कॅलिग्राफीचा प्रयोग करायचं ठरवलं. स्ट्रोक वगैरे. एकदम आर्टिस्टिक.

दुकानदार भडकला. 'सब गिचमिड किया है, अच्छा पढने जैसा करके दो' असं म्हणून सगळे बोर्ड फेकून दिले. इमानदारीत दुसरे साधे सुंदर अक्षरातले करून दिले. पैसे घेऊन फी भरली.

हेही शिक्षणच.

■

दुसऱ्या वर्षाला आम्हाला लाइफ ड्रॉइंग नावाचा आमची सत्त्वपरीक्षा घेणारा आणि जीव खाणारा एक प्रकार होता. एका खुर्चीवर किंवा बाकड्यावर किंवा उंच स्टुलावर एका माणसाला बसवायचं. त्याच्याभोवती समोर त्या ग्रुपमधल्या साधारण पंधरा-वीस मुलांनी आपापले ड्रॉइंगबोर्ड घेऊन अर्धवर्तुळाकार बसायचं आणि त्याचं चित्र काढायचं. वरवर पाहता साधा प्रकार. बहुतेक वेळेला ह्या माणसाला पर्वती पायथ्याच्या झोपडपट्टीतून पकडून आणलेलं असायचं. एका संपूर्ण दिवसभरच्या बसण्याचे त्याला कॉलेजकडून पाच रुपये मिळत. त्याच्या दृष्टीनं मजबूत अमाऊंट! नुसतं बसायचं. बहुतेक वेळा हा माणूस काळ्या वर्णाचा, म्हातारा, पांढऱ्या मिशा असलेला असायचा. कपाळाला गंध. अर्धवट वाढलेल्या पांढऱ्या दाढीचे खुंट चेहऱ्यावर. तंबाखूचा बार भरून हा बसायचा. ह्याला आम्ही मॉडेल म्हणायचो. मॉडेलला दर काही वेळानं दर काही मिनिटांचा ब्रेक. हा मनुष्य मध्येच मोठा ब्रेक घ्यायचा आणि नवटाक मारून यायचा. मॉडेलिंगला बसला की तंद्री लागून तडमडायचा. कसलं ड्रॉइंग नि कसला स्टडी!

कांबळेसर म्हणायचे, ''करा तुम्ही स्टडी, मी आलोच.''

सर उगवायचे दीड वाजता. सकाळचं कॉलेज असलं तर कॉलेज सुटायचं दोन वाजता. बरं, आपलं आपण प्रामाणिकपणाने ड्रॉइंग करायचं ठरवलं; तर आमचे प्रॉब्लेम वेगळेच असायचे. मॉडेलनं झोकलेली असल्यानं त्याचे डोळे अर्धोन्मीलित असायचे. त्यामुळे नीट दिसायचेच नाहीत. कसला स्टडी करता? अर्धवट मिटलेल्या (आणि अर्थातच अर्धवट उघड्या) डोळ्यांचं ड्रॉइंग कोणालाच करता येत नसे. बरं, 'डोळे हे जुलमी गडे' असं म्हणून त्यांच्याकडे नजरअंदाज करून उरलेला चेहरा काढायला घेतला, तर दाढीचा आणि दाढेचा प्रॉब्लेम. दाढेत तंबाखूची गुळणी धरलेल्या मॉडेलचा चेहरा काढणं मायकेल ॲंजेलोलासुद्धा जमणार नाही; आम्हाला काय जमणार! आणि दाढीचा प्रॉब्लेम असा, की दाट काळ्या रंगाच्या चेहऱ्यावरचे पांढऱ्या दाढीचे खुंट पांढऱ्या कागदावर काळ्या पेन्सिलनं कसे दाखवणार? सरांना म्हटलं तर सर म्हणत, 'तुमचा स्टडी कमी पडतो...!' तुम्ही काढून दाखवा म्हटलं, तर कुठल्यातरी ॲक्सिडेंटमध्ये जायबंदी झालेलं प्लॅस्टर लागलेलं उजव्या हाताचं बोट ते वर करीत. हे प्लॅस्टर पुढे वर्षभर तसंच होतं.

जक्कल हुशार होता. त्याचे वडील फोटोग्राफर होते. सिटीपोस्टाजवळ स्वस्तिक फोटो स्टुडिओ होता, तो त्यांचा होता. लाईफ ड्रॉइंग करताना मधल्या मोठ्या ब्रेकमध्ये त्या बेवड्या मॉडेलला जक्कल मोटरसायकलवर बसवून स्टुडिओत न्यायचा. वर्गात बसलेल्या पोझमध्ये त्याला तिथे बसवून त्याचा फोटो काढायचा. पुन्हा त्याला लगेच वर्गात आणून बसवायचा. शाळा सुटली की घरी जाऊन एन्लार्जरखाली ड्रॉइंगपेपर धरून निगेटिव्हवरून ड्रॉइंग करून घ्यायचा. दुसऱ्या दिवशी सबमिशन!

शंभर टक्के परफेक्ट, प्रपोर्शनेट ड्रॉइंग. मला आधी कळायचंच नाही, हा इतकं कसं काय भारी ड्रॉइंग करतो ते. परीक्षेतसुद्धा तो असंच करायचा. एकदा परीक्षा झाल्यावर त्यानंच मला त्याच्या ह्या भारी ड्रॉइंगचं रहस्य सांगितलं होतं.

असं शिक्षण!

■

माझ्या आईला वाचायची फार आवड. मराठी सिनेमांची, गाण्यांची, कवितांची. मराठी साहित्यातल्या आणि सिनेमातल्या चांगल्या-चांगल्या कलाकृतींची ओळख तिनंच मला करून दिली.

तीन वर्षांपूर्वी ती गेली, तेव्हा मृत्युशय्येवर असतानासुद्धा गदिमा साहित्य सहवास वाचत होती. शेवटी कोणत्या पानापर्यंत होती, त्याची खूणसुद्धा माझ्याकडे आहे अजून.

तिच्यामुळं मी फार सिनेमे पाहिले. फार वाचलं. चित्रकलेसारख्या बेभरवश्याच्या क्षेत्रात मला बिनदिक्कत प्रवेश घेऊन देणारे, कविता करणारे, वाचणारे, वाचून दाखवणारे, वाचायला लावणारे, रांगोळ्या काढणारे, सिनेमा-नाटकं आवर्जून आणि भरपूर दाखवणारे आई-वडील लाभले होते मला. यालाच भाग्यवान म्हणतात ना?

परागबरोबर जाऊन मी दुकानं धुंडाळून रद्दी उलथी-पालथी करून सत्यकथा, दीपावली, मौज, हंस, नवलचे अंक आणीत असे. मोठमोठ्या कलावंतांचं काम मी इथेच पाहिलं. इंटरमिजिएटच्या वर्गात असतानाच तर मला हंस-नवलमधून चित्र काढण्याची संधी अंतरकरांनी दिली होती. चित्र काढण्यासाठी हस्तलिखित हातात देताना अंतरकर म्हणाले होते, ''जपून ठेवा. हरवू नका. शंभरची नोट हरवली तरी चालेल एकवेळ, पण हे हस्तलिखित हरवू नका!''

आजही कोणतंही हस्तलिखित मी जपून ठेवतो. झेरॉक्स, डीटीपी, स्कॅनिंग, कॉपिंगच्या काळातसुद्धा.

हेच शिक्षण असतं ना?

■

सुंदर अक्षराची ओळख उडुपीसरांनी करून दिली. एलिमेंटरीला असताना त्यांच्याशी माझी मैत्री झाली. ते मला वर्गशिक्षक म्हणून कधीच आले नाहीत. त्यांनी शिकवलं, ते बाहेरून. डबा खायच्या सुट्टीत उडुपी सर माझ्या वर्गात येत. ते, मी आणि माझा मित्र श्रीकांत लेले, किसन असे तिघं-चौघं सुट्टीभर बसून कागद 'खराब' करत असू. अक्षरं– अक्षरं– अक्षरं– अक्षरं– अक्षरं!

अजूनही उडुपीसरांच्या झोळीत अक्षरं, पँटच्या शर्टच्या खिशात अक्षरं, मागे अक्षरं, पुढे अक्षरं, फोरग्राऊंडला अक्षरं, बॅकग्राऊंडला अक्षरं... अक्षरंच अक्षरं. लायब्ररीतून स्वत:च्या नावावर पुस्तकं घेऊन विद्यार्थ्यांना घरी घेऊन जा म्हणणारे आणि विद्यार्थ्यानं पुस्तक नाही दिलं की स्वत:च्या खिशातून दंड भरणारे एकमेव गुरुजी. ह्या गुरुजींमुळे अक्षराची ताकद तर कळालीच, शिवाय ॲडव्हर्टायझिंगच्या क्षेत्रातल्या दिग्गजांची ओळख त्यांनी वाचायला दिलेल्या पुस्तकांमधनं झाली. ह्या काळात फार काम पाहिलं मी. मी पाहिलं म्हणण्यापेक्षा सरांनी दाखवलं, असं म्हणणं जास्त योग्य.

■

कॉलेजशेजारीच माडीवाले कॉलनीमधील एका बंगल्यात भिडे ब्लॉक-मेकर होते. अजूनही आहेत. त्यांच्याकडे ब्लॉक करायला दिलेली काही चित्रं आणि ब्लॉक आणायला अवचट-सरांनी मला पाठवलं. मी गेलो. ब्लॉक घेतले, चित्रं घेतली. दारातून बाहेर पडता-पडता एका खोलीत खोलीभर पसरलेल्या आकर्षक लाल रंगाच्या पावडरनं माझं लक्ष वेधलं. मी थबकलो. भिड्यांना विचारलं,

''हे काय आहे?''

''ड्रॅगन्स ब्लड पावडर आहे ती.'' - भिडे

ड्रॅगन्स ब्लड ! मला फार आवडला शब्द. उत्सुकता वाढली. मी म्हटलं,

''ही कशाकरता वापरतात?''

खास पुणेरी शैलीत ते म्हणाले,

''तुला काय करायचंय?''

त्यांना वाटलं, मी ऑफिसबॉय वगैरे आहे आणि ब्लॉक न्यायला वगैरे आलोय. खुलासा केल्यावर ते म्हणाले,

''ते इतक्या लवकर तुला कळणार नाही. त्यासाठी सगळं ब्लॉकमेकिंगच शिकावं लागेल!''

दुसऱ्याच दिवसापासून मी रोज सकाळ-संध्याकाळ ब्लॉक-मेकिंग शिकायला जाऊ लागलो, नोकरीला दांड्या मारून.

हे मी कॉलेजमध्ये शिकलो नसतो.

■

गोंधळेकरसर हिस्टरी ऑफ आर्ट शिकवत. लॉटमध्ये. वर्षातून एकदा यायचे, मुंबईहून का कुठूनतरी. एकेका दिवसात चार-चार पाच-पाच लेक्चर्स घेऊन दोन-तीन दिवसांत पोर्शन संपवत. ते म्हणत, '' हे कदाचित कंटाळवाणं वाटेल तुमच्यापैकी काही जणांना. हिस्टरी ज्यांना आवडत नाही, त्यांचं लक्ष लागणार नाही. आणि लक्ष नसणाऱ्या माणसांना शिकवणं मला आवडत नाही, कारण शिकवताना मला डिस्टर्ब होतं. ज्यांना नको असेल, त्यांनी वर्गाच्या बाहेर जावं. मी रागावणार नाही. परीक्षेचा पेपर मीच काढणार आहे. आत्ताच मी तुम्हाला वीस प्रश्न देईन, त्यांपैकीच काही परीक्षेत येतील. पुस्तकातून त्याचा अभ्यास करा. उत्तरं लिहा. नोट्‌ससुद्धा देईन.''

गोंधळेकरसर मला फार आवडत. शिकवत असताना तर फारच. कलेच्या इतिहासाबद्दल मला कधीच आस्था वाटली नाही, पण गोंधळेकरसर तो इतिहास शिकवताहेत ह्याबद्दल तत्कालीन वर्तमानकाळाचे मी आभार मानीत असे. हिस्टरी ऑफ आर्ट शिकवतानाच सरांनी 'आर्ट ऑफ वर्क' आणि 'वर्क ऑफ आर्ट'मधला फरक स्पष्ट करून सांगितला होता.

आजही हा फरक स्पष्ट आहे.

■

गजानन मंगेश रेगे असं पूर्ण नाव लावणारे मुंबईचे एक सर 'ॲडव्हर्टायझिंग : आर्ट ॲण्ड आयडियाज्' असं अवजड नाव असलेला विषय शिकवायचे. त्यांनीच लिहिलेलं 'जाहिरात : कला आणि कल्पना' या नावाचं इंग्रजी इतकंच अवजड, क्लिष्ट आणि किचकट मराठी भाषेत लिहिलेलं पुस्तक समोर ठेवून तोच विषय ते अतिशय मऊ आवाजात, सहजपणानं, साधासोपा करून, सुंदर सुंदर उदाहरणं देऊन आणि अतिशय मनोरंजक पद्धतीनं, सुहास्य मुद्रेनं शिकवत. शिक्षकाची पुस्तकातली भाषा आणि त्याच शिक्षकाची विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकवतानाची भाषा वेगळी असते, हे जर त्या लेक्चर्सना मी थांबलो नसतो, तर शिकलो नसतो.

■

फोटोग्राफी हा स्पेशल सब्जेक्ट घेणाऱ्यांना कॅमेरा लांबून दाखवला जाई. (पाच फुटांवरून). ह्याबद्दल वाईट वाटून फोटोग्राफी शिकवायला व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून येणाऱ्या अप्पा जोशीसरांनी त्यांच्या सदाशिव पेठेतल्या डार्करूममध्ये आम्हाला बोलावून कॅमेरा मनसोक्त हाताळायला देऊन फोटो काढायला शिकवलं. रोल डेव्हलप करायला शिकवलं. एन्लार्जरला हात लावू दिला. कॉलेजात येऊन थिअरी शिकवली. घरी प्रॅक्टिकल. फी न घेता स्वत:चा वेळ, एनर्जी, पैसा खर्च करून.

मोबाईल फोनचा कॅमेरा हा कॅमेरा नव्हे, हे त्यामुळेच पुढे कळलं.

■

असे शिक्षक. काही बाहेरून आत आलेले, काही आतून बाहेर गेलेले. चांगली चित्रकला असणारे काही महत्त्वाचे चित्रकार शिक्षकाच्या नोकऱ्या करत नाहीत. आणि केल्या तरी लवकर सोडतात, हे अवचटसरांनी शिकवलं. आणि अशा शिक्षकांनी नोकरी सोडल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपलं आपणच शिकावं, हेही त्यांनीच शिकवलं.

कमर्शिअल आर्टच्या वर्गात बसून पोर्ट्रेट करतो, तेसुद्धा ऑईल कलरमध्ये, म्हणून अवचटसरांच्या जागी आलेल्या दुसऱ्या एका (तेसुद्धा फाईन आर्टला शिकवणाऱ्या) गुरुजींनी वर्गाच्या बाहेर काढलेला मी एक विद्यार्थी आहे.

मी पोर्ट्रेट काढायला कधी शिकलो?

■

कमर्शिअल आर्टमध्ये प्लेन रंग लावायचे असतात. प्लेन रंग लावता येत नाहीत, ढग-ढग येतात म्हणून ढगा-ढगाचाच अभ्यास आणि प्रॅक्टिस जास्त केली. रंग फासले, खरवडले, घडलो, का बिघडलो; कोणास ठाऊक! आजही प्लेन रंग लावताच येत नाहीत, हे खरं.

थोडक्यात काय, हाताला धरून कुणी तुम्हाला चित्रकला शिकवत नसतं. तशी ती शिकवायचीही नसते. शिकायचीही नसते. चित्रकलेत (बहुतेक सगळ्याच कलांत) आपलं आपणच घडायचं असतं. आपलं आपणच बिघडायचं असतं.

आर्ट स्कूलच्या इमारती वर्षानुवर्षं उभ्या असतात.

त्यांना दोन प्रवेशद्वारं असतात.

एक आर्ट स्कूलचं, छोटं.

एक जगाचं, मोठं.

छोट्याच्या पोटात मोठं.

आर्ट स्कूलच्या प्रवेशद्वारातून तुम्ही आत जायचं, थोडा वेळ तिथं थांबायचं. रेंगाळायचं. टाइमपास करायचा. मजा करायची. काही काळानं दुसरं दार उघडतं– जगाचं. मोठं. तिथून पुढे, तुम्ही पुढे जायचं. जगात. तुमच्या जगात. तिथं काहीही करायचं. तुम्हाला आवडेल ते.

**चंद्रमोहन कुलकर्णी**
३, श्रीशंकरानंद पार्क, वाळवेकर नगर,
पुणे-सातारा रोड, पुणे ४११ ००९.
फोन नं. - ०२०-२४२२९१३१
chandramohan.kulkarni@gmail.com

लंडन मधील 'द बकमन एजन्सीतर्फे' आयोजित प्रदर्शनात 'गोल्डफिंगर' आणि 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस' या दोन अनुवादित पुस्तकांच्या मुखपृष्ठांची निवड झाली. ही दोन्ही मुखपृष्ठे चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी तयार केली आहेत.







मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,



# भाकरीशी झाली झुंज

उत्तम कांबळे

**कॉलेजमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा व्हायच्या. कॉलेज ब्यूटी क्वीन ही त्यापैकी एक. स्पर्धेत विजयी होणाऱ्या मुली कॉलेजचं आकर्षण बनायच्या. त्यांच्या मागं सतत पोरांचा घोळका असायचा. आपणही त्या घोळक्यात जावं, असं वाटायचं; पण त्यासाठीसुद्धा काही पात्रता लागते. चांगले कपडे... काही इमेज असावी लागते वगैरे वगैरे; पण त्यापैकी माझ्याकडं काहीच नव्हतं.**

बेळगाव जिल्ह्यातील रायबागमध्ये 'एसएसएलसी'ची परीक्षा देऊन मी गावाकडं आलो. निकाल लागायला महिना-दीड महिना बाकी होता. गावात मजुरी करून पैसा जमा करू लागलो. उद्या कॉलेजला जायचंच झालं तर कपडे असावेत, वह्या-पुस्तकं घेता यावीत यासाठी पैसा जमवणं आवश्यक होतं. मला डॉक्टर व्हायचं होतं.

थोड्या दिवसांनी संकेश्वरला मावशीकडं गेलो. संकेश्वरमध्येही कॉलेज होतं; पण ते कर्नाटकातलं, आर्ट्स-कॉमर्सचं... तिथं शिकून डॉक्टर होता येणार नव्हतं. कुठं कॉलेजला जायचं याबद्दल विचार करू लागलो.

निकालाची तारीख जवळ आली. संकेश्वरमधूनच रायबागला जायचं, असं ठरवलं. मॅट्रिकमध्ये नापास झाल्यानंतर काही जण आत्महत्या करतात, हे मावशीच्या कानावर आलं होतं. ती मला धीर देत म्हणाली, ''तू असं काही वाईटवंगाळ करू नकोस.'' असं सांगत होती. ''तुझ्यामुळं तुझ्या आईचे पांग फिटणार आहेत. तिचं नशीब उजळणार आहे. तू घरातला कर्ता पुरुष आहेस. असं काही डोक्यात आणू नकोस, झालाच नापास तर पुन्हा पेपर दे, काही बिघडत नाही...'' मावशी बराच वेळ बोलत होती.

निकालाच्या दिवशी मी रायबागला गेलो. मावशीनं एस.टी.साठी पैसे दिले होते. रायबागपासून दोन किलोमीटरवर हायस्कूल होतं. चालत निघालो. या शहरात हायस्कूलसाठी खर्च केलेली तीन वर्षे आठवायला लागली. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरून निर्माण झालेले पेचप्रसंग आठवायला लागले. दहावीच्या परीक्षेअगोदर निरोप समारंभ झाला होता. स्टाफमध्ये सरांचे आशीर्वाद घ्यायला गेलो होतो. घोडकेसर आशीर्वाद देतच म्हणाले होते, की पहिला नंबर नाही मिळवलास ना, तर तोंड नको दाखवूस... आशीर्वादापेक्षा अपेक्षांचे प्रचंड मोठं ओझं खांद्यावर आलं... ते घेऊन अभ्यास करू लागलो. आमच्या हायस्कूलमध्ये दहावीच्या चार तुकड्या. पैकी तीन कानडी व एक मराठीची. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा असायची... कोण पहिला येतो– कानडीचा की मराठीचा?

चालता-चालता एक वाईट विचार मनात आला. आपण नापास झालो तर... असा विचार येण्यामागं एक कारणही होतं ते गणिताचं... या विषयात मला कधी ७०-८०, तर कधी ३० मार्क पडायचे. भरवसा नसलेला हा विषय होता. नऊमाहीच्या परीक्षेत ७४ मार्क पडले होते. त्यामुळे विश्वास वाढला होता; पण खात्री काही नव्हती...

एकदाचं हायस्कूल आलं... डांगे, पटेल वगैरे अनेक मित्र हायस्कूलच्या दारात दिसले... ते सगळे धावत धावत आले आणि ओरडत म्हणाले, ''अरे, तू रायबाग केंद्रात पहिला आलास... तुझं नाव फलकावर लागलं आहे.''

मला खूपच आनंद झाला... पहिल्यांदा रोल ऑफ ऑनर पाहिला. त्यावर लिहिलं होतं– उत्तम मारुती कांबळे...

मी गुणपत्रिका घेतली. सगळ्याच विषयांत चांगले मार्क पडले होते; पण गणितात मात्र फक्त ३४... काठावर पास होतो. आणखी एक मार्क जरी कमी पडला असता, तर माझे बाराच वाजले असते. मी आयुष्यात पुन्हा कधीच गणितात पास झालो नसतो... रायबागमध्ये जाऊन सर्व सरांना भेटलो.

गावाकडं आलो. सांगलीत शांतिनिकेतनला जायचं ठरलं. एक तर तिथं 'कमवा आणि शिका' योजना होती. एस.टी.नं डबा येण्याची सोय होती. सायकलीवरूनही डबा आणण्याची व्यवस्था होती; पण माझ्याबरोबरच माझ्या भाकरीलाही जात चिकटलेली होती. ती तोडून काढणं शक्य नव्हतं...

आमच्या गावातील बंडा चौगुले यांनी काही आर्थिक मदत केली. सांगलीत प्रवेश घेण्यासाठी तयारी केली. भाड्यानं सायकल घेऊन प्रवेशासाठी गेलो. प्रवेश घेतला. 'कमवा आणि शिका' योजनेत नाव लावलं. होस्टेलमध्येही प्रवेश घेण्यासाठी अर्ज केला. पुन्हा गावाकडे आलो. कॉलेज सुरू व्हायला अजून काही दिवस बाकी होते. तेवढ्यात मजुरी करून पैसे जमा करण्याचं ठरलं.

कॉलेज सुरू झालं. कामही सुरू झालं. पंधरा-वीस दिवसांनी कळलं, की डॉक्टर होण्यासाठी मेडिकल कॉलेजमध्ये ॲडमिशन घ्यायची असती. सायकलीवरून मिरज मेडिकल कॉलेजला गेलो. प्रवेश संपलेला होता. पहिल्या सत्राची परीक्षाही जवळ आली होती. आपल्या अडाणीपणाबद्दल खूप पश्चात्ताप झाला; पण आता काही उपयोग नव्हता. कॉलेजला नियमितपणे जाऊ लागलो; पण आणखी एक अडचण आली, आणि ती म्हणजे गणिताची. सायन्समध्ये बहुतेक विषयांत गणित 'आ' वासून पुढं उभं. काहीच कळायचं नाही. सायन्सच्या नादाला लागून नापास होण्यापेक्षा आर्ट्सला गेलेलं बरं, असा निर्णय घेतला. कॉलेजमध्ये अर्ज करून साईड बदलून घेतली. यथावकाश घरीही कल्पना दिली. गावातही कल्पना दिली; पण कुणाला काही कळत नव्हतं. कोणी मनावर घेतलं नाही.

कॉलेज करत-करत रोजगार हमीच्या कामावर राबू लागलो. आर. आर. पाटील यांच्यासारखे काही मित्र या ठिकाणी मिळाले.

गावाकडून माझ्यासाठी बऱ्याच वेळेला ड्रायव्हर केबिनमधून कोरड्या भाकऱ्या यायच्या. आर. आर. पाटील त्यावर भाजी द्यायचे.

आर्ट्स आल्यानंतर थोडं लेखन-वाचनाकडं लक्ष द्यायला लागलो. वाचनाची आवड निर्माण झाली. इतरांचं पाहून लेखनाची प्रेरणाही निर्माण झाली. भित्तिपत्रकावर आपलीही कविता-कथा यावी, असं वाटायला लागलं; पण तेही शक्य होणार नव्हतं. माझी मराठी खूपच कच्ची होती. कर्नाटकातून आल्यामुळं उच्चारांपासून लेखनापर्यंत बोंब होती. व्याकरण कशाबरोबर खातात; माहीत नव्हतं. उच्चारांची पद्धत पाहून मित्र हसायचे. प्रसंगी 'मामा' म्हणायचे.

या काळात मी कविसंमेलने ऐकायला जायचो. सांस्कृतिक कार्यक्रमांना आवर्जून हजर राहायचो. भाषाविकासासाठी रोज एखादं छोटं-मोठं पुस्तक वाचू लागलो. कविता करणाऱ्यांच्या घोळक्यात वावरू लागलो.

गावाकडचा डबा परवडेना. काही वेळा एस.टी. चुकायची. ती चुकली की उपाशी राहण्याची वेळ यायची. गरिबांसाठी असलेली मेस लावून पाहिली; पण तिच्यासाठी साठ रुपये महिना द्यावे लागत असत. एवढी मोठी रक्कम खर्च करणं कठीण होतं. शेवटी गावाकडं जाऊन दर महिन्याला दहा किलो ज्वारी आणायचो आणि त्यातून सकाळी व रात्री प्रत्येकी दोन भाकऱ्या करून घ्यायचो. त्यासाठी महिन्याला वीस रुपये करणावळ द्यावी लागे. पांडुरंग पाटील नावाचा एक शिपाई पंचशील झोपडपट्टीत दहा बाय दहाच्या जागेत मेस चालवायचा. तिथून भाकऱ्या घेऊ लागलो. दोन भाकऱ्यांमध्ये पोट भरायचं नाही. संध्याकाळ झाली, की पोटात खड्डा पडायचा. काही वेळा पोरांबरोबर साखर कारखान्यात जायचो. कच्ची साखर भरपूर खायचो. थोडा वेळ भूक भागायची, नंतर लगेचच तिचं रूप दिसायला लागायचं. पाटलाकडनं भाकऱ्या घ्यायचो. हॉटेलमध्ये जाऊन दहा-वीस पैशांची आमटी किंवा भज्यांचा चुरा घ्यायचो. काही वेळा दहा पैशांचे वाटाणे घ्यायचो. भाकऱ्यांबरोबर ते खायचो. ग्रंथालयात अभ्यासासाठी बसायचो. दर बुधवारी हॉटेलच्या दारात बसून आम्ही सारेच बिनाका गीतमाला ऐकायचो... चित्रपट पाहण्याचा नाद याच काळात लागला. थर्ड क्लासचं तिकीट काढून अनेक थिएटरमध्ये पिक्चर पाहायला जायचो. बससाठी कधीच पैसे असायचे नाहीत. सांगली ते माधवनगर हा प्रवास पायीच करायचो.

स्वरूप थिएटरला पिक्चर पाहायला गेलो, की समोर रेड लाईट एरिया म्हणजे वेश्या वस्ती दिसायची. रस्त्यावर तासन् तास उभा राहून वेश्या पाहायचो. बहुतेक वेश्या कर्नाटकातून आणि माझ्या परिसरातून आलेल्या होत्या. देवाला सोडलेल्या

होत्या. त्या बायकांना पोटासाठी शरीर का विकावं लागतं, हा प्रश्न माझ्या मनात निर्माण व्हायचा. देवी या साऱ्यांना या नरकातून दूर का करत नाही? आपल्या भक्तिणीला पोटासाठी आपल्या शरीराचे रोज लचके का पडू देतात? त्या रोज हजार नाग अंगावर का खेळू देतात? अनेकदा हे प्रश्न घेऊन मी वेश्यांच्या गल्लीत फिरायचो. त्यांना वाटायचं, गिऱ्हाईक आलं. काही जणी शुक्‌शुक् करून खुणवायच्या, आवाज द्यायच्या.

कॉलेजचं पहिलं वर्ष संपलं... पी.डी. पास झालो. गावाकडं आलो. पुन्हा मजुरी सुरू झाली.

सुट्टी संपल्यावर एफ. वाय.ला प्रवेश घेतला.

आता कॉलेज बऱ्यापैकी कळत होतं. तेथील साऱ्या व्यवस्था कळत होत्या. प्राचार्य पी. बी. पाटील क्लासटीचर होते. मी कविता भरपूर करत होतो. स्वत:च स्वत:च्या कवितांवर खूश असायचो. संमेलनात कविता सादर करताना आपल्या कविता किती फोल आहेत, हेही कळायचं.

कॉलेजमध्ये वेगवेगळ्या स्पर्धा व्हायच्या. कॉलेज ब्यूटी क्वीन ही त्यापैकी एक. स्पर्धेत विजयी होणाऱ्या मुली कॉलेजचं आकर्षण बनायच्या. त्यांच्या मागं सतत पोरांचा घोळका असायचा. आपणही त्या घोळक्यात जावं, असं अनेकदा वाटायचं; पण त्यासाठीसुद्धा काही पात्रता असावी लागते. अंगात चांगले कपडे असावे लागतात. कॉलेजमध्ये काही इमेज असावी लागते वगैरे वगैरे; पण त्यापैकी माझ्याकडं काहीच नव्हतं. जो काही वेळ असायचा, तो भाकरी मिळविण्यासाठी खर्च व्हायचा.

एफ. वाय.ला मराठी विषय घेतला होता. त्यात आवडही निर्माण झाली होती. मराठीबरोबरच राज्यशास्त्र, इतिहास हेही विषय घेतले होते. कविता भरपूर करायचो. कवी म्हणून काही टोपणनावं तयार केली होती. उदाहरणार्थ - 'एस. उत्तम' म्हणजे शिरगुप्पीचा उत्तम, 'सुदामाग्रज' म्हणजे सुदामाचा भाऊ, 'के. उत्तम' म्हणजे कांबळे उत्तम वगैरे वगैरे. या साऱ्या गोष्टी अनुकरणातून आल्या होत्या. कुठं गोविंदाग्रज, कुठं कुसुमाग्रज आणि कुठं हा टिनपाट सुदामाग्रज! माझं मलाच हसू यायचं... कांबळे या आडनावावरून जात लगेच लक्षात येते. ती येऊ नये म्हणूनही टोपणनावाचं हे फॅड होतं. ते चटकन काढून टाकलं.

सांगलीतील ते दिवस आणीबाणीचे होते. आणीबाणी कशाला म्हणतात, हे नुकतंच कुठंतरी राज्यशास्त्रातून कळत होतं. एफ. वाय.ला असताना एक गोष्ट जाणीवपूर्वक केली, ती म्हणजे साहित्यक्षेत्रातील उपक्रमांना हजर राहू लागलो. प्रसंगी कॉलेजला दांडी मारून हजर राहू लागलो. प्राचार्य म. द. हातकणंगलेकर, तारा भवाळकर, वैजनाथ महाजन, अंधकवी राम गोसावी आदी समीक्षक, लेखक, कवींना दुरून पाहिलं. वाचन वाढवलं. भाषण करायचा सराव सुरू केला. संधी मिळेल तिथं बोलू लागलो.

मी कॉलेज सोडून नोकरी करावी, असा दबाव वडिलांकडून येत होता. त्यांचं बरोबरही होतं; पण नोकरी काही मिळणार नव्हती. प्रयत्न करूनही मिळणार नव्हती. एकदा एकाला काही पैसे देऊन नोकरी दे, असं सांगितलं. शेळी विकून पैसे दिले होते; पण पैसे घेणारा गायब झाला.

सांगलीत मला बापू ठाणेदारसारखा मित्र मिळाला. त्याची आई माझी आई झाली.

सांगलीतून कोणी तरी एक शहाणा माणूस माधवनगरला यायचा. तो तरुण पोरांना एकत्र करून मार्क्सवाद शिकवायचा. हा वाद कळला, की जग बदलता येतं, असं तो म्हणायचा. खरं तर जग बदलण्याची सगळ्यांत अधिक गरज मला होती; पण का कोण जाणे, मी त्यात फार रमलो नाही. कविता मला अधिक ओढत होती...

जेवणाच्या ठिकाणी एक माणूस भेटायचा. त्याच्याकडे छान-छान वस्तू असायच्या. एकदा त्यानं मला अशीच एक चौकोनी वस्तू दिली. त्यात गाणी भरली आहेत, असं तो म्हणाला. 'होस्टेलवर जाऊन ऐक', असा सल्ला त्यानं दिला. ती वस्तू घेऊन रूमवर आलो. खाली-वर केली. तिला कुठं बटण वगैरे नव्हतं. वारंवार हलवून पाहिली; पण गाणं काय ऐकायला येईना. एका मित्राला ती दाखवली. तो म्हणाला, ''ही कॅसेट आहे. ती ऐकायची असेल, तर रेकॉर्डर लागतो. टेपरेकॉर्डर लागतो. आहे का तुझ्याकडं?'' मी नाही म्हणालो. कॅसेट काही ऐकता आली नाही.

बापूची सायकल घेऊन प्रताप थिएटरवर चित्रपट पाहायला गेलो. त्या ठिकाणी सायकल चोरीला गेली. ती शोधण्यासाठी सांगली पालथी घातली; पण ती काही मिळाली नाही. बापूनं सायकल मागितली नाही म्हणून बरं, अन्यथा कोठून दिली असती सायकल?

त्या अनोळखी माणसानं एक इम्पोर्टेड सूटकेस अगदी रद्दीच्या भावात मला विकली. खूप सुंदर सूटकेस होती. थोड्या दिवसांनी आणीबाणीतील कायदे कडक झाले. एव्हाना माझी एफ. वाय.ची वार्षिक परीक्षाही जवळ आली होती. एक-एक पेपर सुरू झाला. मध्येच चर्चा सुरू झाली. आणीबाणीत साऱ्या स्मगलरना अटक होत आहे. जे इम्पोर्टेड वस्तू विकत होते आणि जे विकत घेत होते, त्यांचीही चौकशी होईल. त्यांनाही अटक होईल. मला भीती वाटायला लागली. मी सूटकेस आणि कॅसेट विकणारा माणूस शोधून पाहिला; सापडला नाही. कुणी तरी म्हटलं, त्याला अटक झालीय. कुणी म्हणालं, तो घाबरून पळून गेला. कुणी तरी म्हणालं, त्यानं ज्यांना ज्यांना वस्तू विकल्या, त्यांचाही पोलिस शोध घेताहेत... आम्हाला धक्काच बसला. पेपर संपल्या-संपल्या सांगली सोडण्याचं ठरवलं. त्यानुसार

केलंही.

निकाल लागल्यानंतर कॉलेज सोडण्यासाठीच सांगलीत आलो. कॉलेज सोडताना खूप वाईट वाटायला लागलं. आम्ही पोरापोरांनी 'कमवा आणि शिका' योजनेत केलेले रस्ते, खोदलेली विहीर, बांधलेल्या भिंती सारं नजरेसमोर उभं राहू लागलं. या साऱ्या गोष्टी आमच्या घामातून उगवल्या होत्या. याच ठिकाणी मी घामाची कविता लिहायला शिकलो. भित्तिपत्रिकेवर एकदा तरी माझी कविता झळकावी, असं वाटत होतं; पण ते घडलं नाही. या ठिकाणी प्राचार्य पी. बी. पाटील यांच्यासारखे सर मिळाले. आर. आर. यांच्यासारखे मित्र मिळाले. ल. रा. भिंगारदिवे, डॉ. घोडके यांच्यासारखे शिक्षक मिळाले. सर्वांत महत्त्वाचे, म्हणजे घामाची किंमत कळाली. ही सृष्टी घामातून फुलते आणि सुगंधित होते, हा मंत्र मिळाला.

शिकंदर डांगे याच्या मदतीनं मी कोल्हापुरात आलो. गोखले कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. कॉलेजची मेस सुंदर होती. खोल्या सुंदर होत्या. सारं काही बरं चाललं होतं, त्यात कॉलेजमधील प्राध्यापकांचा संप सुरू झाला. महाराष्ट्रभर तो गाजला. आम्ही पोरांनी संपाला पाठिंबा दिला. परिणामी, मेस बंद झाली. अनेक पोरांनी होस्टेल सोडलं. काहींनी होस्टेल आणि कॉलेज सोडलं. माझे दोर कापले गेले होते. आमच्या मेसमध्ये काम करणाऱ्या शिंदेमावशींनी डबा द्यायचं मान्य केलं. काही वेळा आम्ही खोलीतल्या टेबलावर भाकऱ्या थापायचो. दहा पैशांचे सुकलेले झिंगे आणून पातेलेभर रस्सा करायचो. थाळी तोंडाला लावून तो प्यायचो. पोट जाळण्यासाठी कार्यक्रम विविध मार्गांनी सुरू होता. काही पीरियड होत नव्हते, काही व्हायचे.

गोखले कॉलेजमध्ये प्रा. शरद वराडकर भेटले. ते स्वत: लेखक होते. नाशिकमधून निघणाऱ्या 'गावकरी' व 'रसरंग'साठी बातम्या पाठवायचे. त्यांनी अनेक वेळा माझ्या कथा-कविता तपासल्या. वक्तृत्व स्पर्धेत जाण्याची संधी प्रा. राणे, कुमार देसाई, ग्रंथपाल बेंद्रे यांनी दिली. मी भाषा सुधारू लागलो. चांगल्या कविता लिहिण्याचा प्रयत्न करू लागलो. कोल्हापुरातील सर्व दैनिकांमध्ये साहित्य पाठवू लागलो. छोट्या-मोठ्या अनियतकालिकांमध्ये जाऊ लागलो. तिथं साहित्य देऊ लागलो. निदान पेपरात नाव तरी छापून यावं म्हणून वाचकांची पत्रं लिहू लागलो. 'सत्यवादी'त अग्रलेखाचं कौतुक करणारं पत्र लवकरच प्रसिद्ध व्हायचं. अंक विकत घ्यायला पैसे नसायचे. मंगळवार पेठ किंवा बाजापराव माने तालमीत पेपर वाचता-वाचता आपलं प्रसिद्ध झालेलं पत्र अलगदपणे फाडायचो. होस्टेलवर साऱ्या विद्यार्थ्यांना ते दाखवायचो. होस्टेलवर आंबेडकर जयंती साजरी केली. भाषण केलं. पुढं होस्टेलचा आणि कॉलेजमध्ये मॅगेझिनचा सेक्रेटरी झालो. मॅगेझिनमध्ये माजी मंत्री व्ही. एल. पाटील यांच्यावर लिहिलेला लेख व एक कविताही प्रसिद्ध झाली. लेखक होण्याच्या प्रक्रियेला आकार मिळत होता. पुण्याच्या रानडे वादविवाद स्पर्धेपर्यंत जाऊन पोहोचलो होतो. कोल्हापुरात त्या वेळेला विश्वास पाटील, ज्ञानेश्वर मुळे, मंगला पाटील हे वेगवेगळ्या कॉलेजचे चुणचुणीत विद्यार्थी होते. कवी, लेखक, वक्ता म्हणून हे सारे नावारूपाला येत होते. याच काळात प्रा. श्रीकांत नरुले काव्याक्षता लिहिण्यासाठी प्रसिद्ध होते. त्यांना पैसेही खूप मिळायचे. मीही प्रयत्न केला; पण जमलं नाही. पुढं प्रभाकर शिंदेंच्या लग्नात लिहिलेल्या काव्याक्षता छापून आल्या. पहिल्या आणि शेवटच्या.

जेवणाचा प्रश्न शेवटपर्यंत सुटला नाही. कधी कुठं, तर कधी कुठं; भाकरी शोधत राहिलो. खूप कठीण काळ होता. याच काळात भाकरीनं कविता लिहायला शिकवली–

भाकरी छिनाल असते
घोड्याचा लगाम असते
टाटाची गुलाम असते

गोखले कॉलेजमध्ये कल्याणी इनामदार मॅडमशी ओळख झाली. त्या मराठी शिकवायच्या. मी राज्यशास्त्राचा विद्यार्थी. त्यांची मला खूप मदत झाली. याच काळात रमेश ढावरे यांच्याशी ओळख झाली. दलित पॅन्थरशी ओळख झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या स्टुडंट फेडरेशनशी ओळख झाली. सुरेश शिपूरकर, प्राचार्य एम. डी. देशपांडे, सुनीलकुमार लवटे आदी अनेकांशी ओळख झाली. चळवळी कळू लागल्या. का लिहावं, याची कारणं कळू लागली. मार्क्स, फुले, आंबेडकर, शाहू यांच्या विचारांकडं वळलो. भरपूर वाचन केलं. साहित्याचे सर्व प्रकार वाचून काढले. जसा वाचत जाई, तसं आत काहीतरी घडतं आहे, कोणती ऊर्जा सळसळते आहे, असं वाटायला लागलं. कविसंमेलनं गाजवू लागलो. रेडिओवर जाऊ लागलो. भाकरी गंभीरच बनत होती. एक दिवस तिनं पंचगंगा स्मशानभूमीच्या अलीकडं असलेल्या भुताच्या ओढ्यात भुतांसाठीचा नैवेद्य खायला लावला. यामुळं भूक भागली; भुतांविषयीची भीती तशीच कायमची संपली. याच काळात नामांतराची चळवळ, एक गाव एक पाणवठ्याची चळवळ, भूमिहीनांची चळवळ, देव संपवण्याची चळवळ सुरू झाली. यापैकी बहुतेक सर्व चळवळींकडे स्वाभाविकपणे ओढला गेलो. याचं प्रतिबिंब लेखनात पडू लागलं.

बी.ए.चं शेवटचं वर्ष संपलं. एलएल.बी. आणि एम.ए.ला ॲडमिशन घेऊन पाहिली. भाकरी कॉलेजपर्यंत मला पोहोचू देत नव्हती. शिक्षणाची वाट लागली होती. मिरजकर तिकटीतील शहापूरकरांच्या दवाखान्यात कंपाऊंडर म्हणून काम करू लागलो. मंगळवार पेठेत नटराज बुक बायंडिंगमध्ये शिकाऊ बायंडर म्हणून काम करू लागलो. याच ठिकाणी मी तिथंच उपलब्ध

असणाऱ्या कागदावर काहीतरी लिहीत होतो. प्रेसचे मालक तावडे यांनी माझी एक कथा आणि कविता 'समाज'च्या दिवाळी अंकात दिली. अतिशय सुंदर अशा अंकात दोन्ही गोष्टी छापल्या गेल्या. अंक आणण्याच्या निमित्तानं 'समाज'च्या कार्यालयात गेलो. तिथं अंकही मिळाला आणि अंक घेता-घेता बिनपगाराची नोकरीही मिळाली. उड्या मारत भवानी मंडपातून होस्टेलकडे निघालो होतो. भवानी मंडपाच्या अलीकडे तेव्हा 'अजब पुस्तकालय' हे मेहतांचं दुकान होतं. शोकेसमध्ये लावलेल्या पुस्तकांवर नजर टाकली. तसं नेहमीच करायचो; पण या वेळी काय वाटलं, कुणास ठाऊक? एक दिवस आपलंही पुस्तक या शोकेसमध्ये झळकेल... अशी भावना निर्माण झाली. एक स्वप्न जन्माला आलं. मुठीत आणि डोळ्यांत हे स्वप्न गच्च पकडलं... आयुष्याच्या नव्या पर्वात पाऊल टाकलं... अक्षरपर्व हे त्या नव्या पर्वाचं नाव होतं.

**उत्तम कांबळे**

'चार्वाक्षय', पटणी इस्टेट, देवधर शाळेसमोर, म्हसरूळ, नाशिक - ४२२ ००४.

फोन नं. - ९८८१०९९१४३

uttam.kamble@esakal.com



# अ बेटर इंडिया
# अ बेटर वर्ल्ड

**एन. आर. नारायण मूर्ती** अनु. चित्रा वाळिंबे




**२५०रु** पोस्टेज ३०रु.

लाखो भारतीयांसाठी नारायण मूर्ती हे एक आदर्श व्यक्तिमत्त्व आहे. केवळ त्यांच्या औद्योगिक क्षेत्रातील कर्तृत्व आणि नेतृत्वामुळे नाही, तर मूल्याधिष्ठित वागणूक आणि व्यक्तिगत आचरणामुळे नारायण मूर्ती हे अवघ्या देशासाठी आदर्श ठरले आहेत. ते जगासमोर भारताच्या नव्या, प्रगतिशील चेहऱ्याचं प्रतिनिधित्व करतात. त्यांनी दिलेल्या व्याख्यानांचा हा संच येणाऱ्या पिढ्यांना माहितीपर, प्रेरणादायक आणि मार्गदर्शक ठरेल याची मला खात्री आहे.

**- डॉ. मनमोहन सिंग, पंतप्रधान, भारत**

नारायण मूर्ती यांनी अनेक अडथळे पार करून हे दाखवून दिलं आहे, की भारतात जागतिक दर्जाच्या, मूल्याधिष्ठित कंपनीची उभारणी करणं शक्य आहे. मूर्तींच्या दूरदृष्टी आणि नेतृत्वामुळे नावीन्य आणि उद्योजकतेच्या जगात चमक आली आहे, आपली स्वत:कडे पाहण्याची आणि जगाची भारताकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. व्याख्यानांच्या या संचाद्वारे, व्यवसायामधील मूल्यं आणि नेतृत्वगुणाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं आहे.

**- बिल गेट्स- अध्यक्ष, संचालक मंडळ, मायक्रोसॉफ्ट कॉर्पोरेशन**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,**



# मराठवाड्यातले जडणघडणीचे दिवस

नरेन्द्र चपळगावकर

**मिलिंद महाविद्यालयात आल्यापासून मला मूळचीच असलेली वाचनाची गोडी आणखी वाढली होती. डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथप्रेमामुळे महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध व अद्यावत होते. ग्रंथपाल वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना मदत करीत. एखाद्या प्राध्यापकाचा तास रटाळ वाटत असेल, तर मी तासाला न जाता सरळ ग्रंथालयात जाऊन बसत असे.**

माणूस तसा लहानपणापासून घडतच असतो. आई-वडलांचे, मित्रांचे, शिक्षकांचे, भावलेल्या काही इतरांचे संस्कार होत आपण घडत असतो. तरीही कळते वय थोडे प्रौढ झाले म्हणजे आपल्या आवडीनिवडी निश्चित होतात, आपले आदर्श सापडतात, आपल्या दिशा ठरतात. आपले घडणे वेग घेऊ लागते. अशा दिवसांना जडणघडणीचे दिवस म्हणता येईल.

औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात बी.ए.च्या पदवीसाठी मी पंचावन्नमध्ये प्रवेश घेतला आणि १९६२ च्या शेवटी बीडला वकील म्हणून स्थिर झालो. या सहा-सात वर्षांच्या कालखंडात वेगाने घडणाऱ्या अनेक राजकीय व सांस्कृतिक घटनांनी मला वेढून टाकले. वडलांचा स्वातंत्र्य चळवळीतला सहभाग आणि घरात असणारे वातावरण यामुळे राजकारण, भाषिक आणि सांस्कृतिक चळवळी यात मला रस उत्पन्न झालाच होता. आता घडणाऱ्या गोष्टींनी एवढा वेग घेतला होता की, मला केवळ अभ्यासावर मन केंद्रित करणे अशक्य झाले.

जूनमध्ये महाविद्यालय सुरू झाले आणि महिनाभरातच गोव्याच्या मुक्तीसाठी सत्याग्रह सुरू झाला. मराठवाड्यातून सत्याग्रही गोव्याकडे जाऊ लागले. या सत्याग्रहींची नोंदणी आणि पाठवणी यात पुढाकार असे औरंगाबादचे समाजवादी पुढारी विजयेंद्र काबरा यांचा. शहागंजातल्या बालाजी मंदिरात सत्याग्रहींना निरोप देणाऱ्या सभा होत. सभा छोट्याशाच असत. ७५ ते १०० च्या आसपास उपस्थिती असे. दर आठवड्याला एक तरी जथा पाठवला जाई. अशाच एका सभेला मी गेलो असताना या सभेत 'तू भाषण कर', असे एकदा काबरांनी मला सांगितले. माझे भाषण बरे झाले असावे. कारण नंतर प्रत्येक निरोपसभेत काबरा मला बोलावयाला लावत. बीडला शाळेत असताना किंवा अमरावतीत इंटरला असताना बोलण्याचा चांगला सराव असला तरी राजकीय विषयावर भाषणाचा प्रसंग आला नव्हता. राजकीय घडामोडी हा अर्थातच माझ्या कुतूहलाचा विषय होताच. गोवा सत्याग्रहींच्या या निरोपसमारंभांच्या निमित्ताने मला राजकीय वक्तृत्वाचे धडे गिरवायल मिळाले.

त्याच वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात राज्यपुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाला. विदर्भाचे वेगळे राज्य करावे आणि उर्वरित महाराष्ट्राबरोबर गुजरातची मोट बांधून एक द्विभाषिक राज्य करावे,

अशी शिफारस आयोगाने केली होती. मराठवाड्याच्या जनतेचे सर्व लक्ष हैदराबाद राज्याचे त्रिभाजन होऊन आपण महाराष्ट्राशी जोडले जातो की नाही, याकडे होते. ती मुख्य गोष्ट अहवालात मान्य झाली होती. परंतु सर्व मराठी भाग एकत्र न आणता विदर्भाला वेगळे काढण्यात आले होते, याबद्दल मराठवाड्यात नाराजी होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रकृती त्या काळात बरी नसे. पूर्वी ते औरंगाबादला आले म्हणजे छावणीतल्या कुकरी हाऊसमध्ये उतरावयाचे. नंतर ते आमच्या महाविद्यालयातच थांबू लागले. त्यांच्या विचारांची प्रखरता आणि स्पष्टता मात्र अबाधित होती. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याला बाबासाहेबांचा सक्त विरोध होता. मात्र, मराठी भाषकांचे एकच राज्य करण्याऐवजी सामाजिक संतुलन राखण्यासाठी महाराष्ट्राची तीन राज्ये करावीत, अशी त्यांची सूचना होती. आपली ही योजना समजावून सांगणारे एक भाषण बाबासाहेबांनी महाविद्यालयात दिले. त्या वेळी गावातल्या निमंत्रित नागरिकांबरोबरच आम्ही विद्यार्थीही हजर होतो.

आमच्या महाविद्यालयात उदार वातावरण होते. विविध मतांच्या नेत्यांना निमंत्रित करून विद्यार्थ्यांसमोर बोलण्यास पाचारण केले जाई. संयुक्त महाराष्ट्र समितीचे सरचिटणीस शंकरराव देव होते. त्यांना आपण बोलावू, अशी प्राचार्य चिटणीसांनी सूचना केली. देवांच्या भाषणापूर्वी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे महाराष्ट्रगीत म्हटले गेले. नंतर देवलांच्या 'शारदा' नाटकातील शारदा, वल्लरी आणि मैत्रिणींचा प्रवेश आमच्या वर्गातल्या मुलींनी करून दाखवला. प्राचार्य चिटणीस कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल सूचना करीत; परंतु प्रत्यक्ष संचालन विद्यार्थ्यांनाच करावयास लावत व त्यांना उत्तेजन देत. 'तू देवांचे स्वागत करून प्रास्ताविक कर', असे चिटणीसांनी मला सांगितले.

मी प्रास्ताविकादाखल पाच-सात मिनिटेच बोललो असेन. देवलांच्या या नाटकात पात्रांच्या तोंडी असलेल्या मध्यमवर्गीय मराठी घरातल्या भाषेबद्दल मी बोललो आणि भाषेबद्दल वाटणाऱ्या आपुलकीबद्दलही उल्लेख केला. तो धागा धरून भाषिक राज्य हा कसा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, हे सांगून मी देवांना भाषणाची विनंती केली. आपले भाषण संपवताना ''महाराष्ट्रगीत मी ऐकले. महाराष्ट्राच्या अस्मितेच्या वर्तुळाबाहेर भारताचे एक वर्तुळ आहे व आम्ही मराठी आहोत, या अस्मितेच्या बरोबरच आम्ही भारतीय आहोत, हीही अस्मिता आपण जपली पाहिजे,'' असे देवांनी सांगितले व महाराष्ट्रगीत प्रारंभी म्हटले, आता राष्ट्रगीत म्हणा, अशी सूचना केली. राष्ट्रगीत म्हटले जाणारच होते. ते गायिलेही गेले. नंतर माझ्या छोट्याशा भाषणाची चिटणीसांनी स्तुती केली व माझे कौतुक केले. हे छोटेसे प्रास्ताविक भाषण म्हणजे एखाद्या वाङ्मयकृतीबद्दल आपले मत जाहीरपणे व्यक्त करण्याचा माझा पहिला प्रयत्न होता. शंकररावांचे महाराष्ट्रप्रेम तर वादातीत होते. पण चळवळीच्या रणधुमाळीतही एकराष्ट्रीयत्व न विसरणाऱ्या नेतृत्वाचा ते भाग होते. वातावरण तापलेले असतानाही संतुलन न गमावण्याच्या त्यांच्या या विशेषाची नोंद माझे मन घेत होते.

अमरावतीला शिवाजी महाविद्यालयात इंटरसाठी शिक्षण घेत असताना आमचे इंग्रजीचे प्राध्यापक रामा राव यांनी विद्यार्थ्यांकडून शेक्सपिअरच्या 'मर्चंट ऑफ व्हेनिस' नाटकातील खटल्याचा प्रवेश बसवून घेतला होता. त्यात मी शायलॉकची भूमिका केली होती. आमचे इंग्रजी संवादाचे उच्चार स्वत: रामा रावांनी लक्ष देऊन व्यवस्थित करून घेतले होते. १९५४ मध्ये घेतलेल्या या अभिनयाच्या पहिल्या धड्यानंतर मिलिंद महाविद्यालयात आल्यानंतर मला आणखी एक संधी मिळाली. महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात एक नाटक बसवायचे होते. मुली नाटकात भूमिका करण्याची शक्यता नव्हती, त्यामुळे स्त्रीपात्रविरहित नाटक निवडावे लागणार होते किंवा एखादे उपलब्ध नाटक फेरफार करून स्त्रीपात्रविरहित करावे लागणार होते. आयरे नावाच्या एका नाटककाराचे 'घरजावई' नावाचे एक नाटक मला सापडले. त्यात स्त्रीपात्राचा रंगभूमीवर दोन मिनिटांचाच प्रवेश होता. तोही आम्ही वगळून टाकला आणि संदर्भ जोडण्यासाठी आवश्यक असलेली हाक विंगेतूनच मारण्याची जबाबदारी एका वर्गभगिनीने स्वीकारावयाचे कबूल केले. नाटकात दोन अविवाहित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या भूमिका मुख्य होत्या. परतूडचा वसंत राखे या नावाचा एक वर्गमित्र आणि मी, अशा आम्ही दोघांनी त्या भूमिका केल्या आणि महाविद्यालयीन जीवनातलेच कथानक असल्यामुळे प्रेक्षकांना त्या खूपच आवडल्या. नाटकाचे नेपथ्यसुद्धा फार सोपे होते. आम्ही ज्या अवस्थेत त्या वेळेला होतो, ती अवस्थाच रंगभूमीवर दाखवावयाची होती. माझ्या खोलीतील अस्ताव्यस्त पडलेले कपडे, पुस्तके आणि अंथरूण - पांघरूण खोलीच्या मध्यभागी आडव्या बांधलेल्या दोरीसह रंगभूमीवर नेऊन मी जसेतसे लावले होते. त्यामुळे नेपथ्य फारच वास्तववादी झाले होते. बीडला असताना गणेशोत्सवातील कार्यक्रमात छोट्याशा नाट्यप्रयोगात मी एक भूमिका केली होती; ती वगळता नाटकात भूमिका करण्याचे हेच दोन प्रसंग.

निजामाने आपल्या सगळ्या प्रजेच्या विकासाकडे दुर्लक्ष केले होते; त्यातही मराठवाड्याची उपेक्षा अधिक झाली होती. स्वातंत्र्यानंतरही तोच प्रकार सुरू होता. विभाजनाच्या तयार झालेल्या पंचवार्षिक योजनेत हैदराबाद राज्यातील कन्नड भागाला २१ कोटी ४९ लाख, तेलंगणला १५ कोटी २३ लाख व मराठवाड्याच्या वाट्याला फक्त २ कोटी ७३ लाख रुपये आले होते. या रकमेत वाढ करावी व काही महत्त्वाच्या गोष्टींचा

त्यात समावेश करावा, अशी मराठवाड्याच्या नेतृत्वाने मागणी केली होती. त्यातली एक प्रमुख गोष्ट होती मराठवाड्यासाठी वेगळे विद्यापीठ. मावळत्या राज्याच्या सरकारने तत्त्वतः ती मागणी मान्य केली; परंतु प्रत्यक्षात त्यासाठी काही आर्थिक तरतूद केली नव्हती. नोव्हेंबर ५६ मध्ये मराठवाडा नव्या विशाल द्विभाषिकात सामील झाला. त्यानंतर नव्या महाराष्ट्र सरकारने यासाठी पावले उचलावीत म्हणून लोकमताचा दबाव वाढू लागला. २६ जुलै १९५६ रोजी औरंगाबादेतील विद्यार्थ्यांनी मराठवाडा विद्यापीठ स्थापनेची मागणी करणारा एक मोर्चा काढला. हा मोर्चा मिलिंद महाविद्यालयाच्या मैदानावर विसर्जित झाला व तेथे एक जाहीर सभा झाली. प्राचार्य चिटणीस मोर्चात नव्हते, पण सभेच्या वेळी जवळच उपस्थित होते. या सभेचे अध्यक्षस्थान मी स्वीकारावे, असे त्यांनी सांगितल्यावरून माझे नाव सुचविण्यात आले व मी सभेचा अध्यक्ष झालो. पुढे विद्यापीठाच्या स्थापनेचा तपशील सुचवण्यासाठी एक आयोग नेमण्यात आला. २३ सप्टेंबर १९५७ रोजी आयोगाने बीडला भेट दिली. त्या वेळी मी तेथील चंपावती विद्यालयात शिक्षक म्हणून काम करीत होतो. आयोगासमोर मी साक्ष दिली आणि एक लेखी निवेदनही दिले.

राजकीय चळवळीचे मला आकर्षण असल्यामुळे गोवामुक्ती, संयुक्त महाराष्ट्र आणि विद्यापीठाची मागणी या प्रश्नांसाठी होणाऱ्या या चळवळींबद्दल मला आकर्षण वाटे. अर्थात, माझा सहभाग हा केवळ नाममात्र व माझ्या समाधानापुरता असे. कारण मी फक्त एक विद्यार्थी होतो; राजकीय नेता वगैरे काही नव्हतो. माझे वडील काँग्रेस पक्षात होते, पण त्यांचे नेते स्वामी रामानंद तीर्थ आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी १९५६ च्या सुमारास कृतिशील राजकारणातून निवृत्ती घेतली होती. सप्टेंबर १९५७ मध्ये माझ्या वडलांनीही काँग्रेसचा राजीनामा दिला. काँग्रेसच्या बदलणाऱ्या स्वरूपात त्यांना त्या संघटनेत काम करणे शक्य नव्हते. जे घडत होते, ते मीही पाहत होतो. सत्ताकांक्षी पक्षात काम करणे आपल्याला मानवणारे तर नाहीच, पण ते आपल्याला अशक्यच आहे, हे मला उमजू लागले होते.

मिलिंद महाविद्यालयात आल्यापासून मला मूळचीच असलेली वाचनाची गोडी आणखी वाढली होती. डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथप्रेमामुळे महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध व अद्यावत होते. ग्रंथपाल के.द. वडजीकर वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना आवर्जून मदत करीत. एखाद्या प्राध्यापकाचा तास रटाळ वाटत असेल, तर मी तासाला न जाता सरळ ग्रंथालयात जाऊन बसत असे. प्राचार्य चिटणीस एक - दोन वेळा तरी संपूर्ण महाविद्यालयात फिरून लक्ष ठेवत असत. मुलांनी वर्ग सोडून फिरू नये, त्या वेळेत उपाहारगृहात बसू नये, असा त्यांचा कटाक्ष असे. परंतु एखादा मुलगा वर्गात न बसताना ग्रंथालयात वाचत बसला असेल, तर त्याकडे ते क्षमेच्या बुद्धीने पाहत. एकदा माझ्या एका प्राध्यापकांनी मी वर्गात नियमित बसत नाही, अशी चिटणीसांकडे तक्रार केली. चिटणीसांनी त्यांच्यासमोर मला बोलावून घेतले आणि वर्गात नियमित हजर राहात जा, असे मला सांगण्याचे आपले कर्तव्य बजावले. मात्र त्याच वेळी त्या प्राध्यापकांच्या हातातील हजेरी पुस्तक त्यांनी आपल्या हातात घेतले आणि प्राध्यापकांनी नोंदवलेली माझी अनुपस्थिती उपस्थितीत बदलून टाकली. इतर सर्व तासांना नियमित हजर राहणारा मी याच प्राध्यापकाच्या तासाला का हजर राहत नाही, हे चिटणीसांनाही माहीत होते.

महाविद्यालयात असताना जे मित्र जोडले गेले, त्यात एक होता त्र्यंबक महाजन. नुकत्याच सुरू झालेल्या मिलिंद विद्यालयात तो शिक्षक म्हणून लागला होता. चमकदार वक्तृत्व लाभलेला त्र्यंबक हा चळवळ्या होता. त्यामुळे त्याचे-माझे ताबडतोब जमले. मराठवाडा साहित्य परिषदेचे मुख्य कार्यालय तेव्हा हैदराबादेत होते. औरंगाबाद येथे परिषदेची एक शाखा काम करीत असे. ही शाखा आपण चालवावी, असे त्याच्या मनाने घेतले. मराठवाड्यातील लेखनाची उमेदवारी करणाऱ्या अनेकांना पुण्या-मुंबईकडे प्रकाशन संस्था आणि नियतकालिके असल्यामुळे आपले लिखाण दुर्लक्षिले जाते, असे वाटे. त्यात काहीसे तथ्य असले तरी ते पूर्णांशाने खरे नव्हते. या समजुतीने काहींचे आत्मसमाधान मात्र होत होते. एक प्रकारचा न्यूनगंड मात्र या समजुतीतून निर्माण होत असे. मराठवाड्यातील मराठी भाषा व साहित्य यांना उत्तेजन देणारी मराठवाडा साहित्य परिषद निजामकाळातच स्थापन झाली होती व तिचे मुख्य कार्यालय त्या वेळच्या राजधानीत - हैदराबादेत - होते. बुजुर्ग साहित्यिक आपल्यावर अन्याय करतात, असे नवोदितांना नेहमीच वाटते. त्या वेळच्या जुन्या लेखकांची नव्या लेखकांना उत्तेजन देण्यासाठी वापरलेली भाषा काहींना, नव्यांना न आवडणारी असे. नवे लेखक मग एकत्र येऊन, संस्था स्थापन करून एकमेकांच्या वाङ्मयाबद्दल उत्साहाने बोलत. काही लोक प्रसिद्ध झालेले नवे लेखन मिळवून वाचत. 'कुमार साहित्य मंडळ' आणि त्यानंतर 'युवक साहित्य मंडळ' अशा दोन संस्था औरंगाबादेत काही दिवस अस्तित्वात होत्या. त्या दोन्हींच्या कार्यकर्त्यांत त्र्यंबक महाजन आणि पुरुषोत्तम हौजवाला हे दोघेही होते. मी औरंगाबादेत आलो त्यापूर्वी या संस्था अस्तंगत झाल्या होत्या. खाराकुव्यातील हौजवालाच्या घरावर युवक साहित्य मंडळाची छोटीशी पाटी मात्र अद्याप लटकत होती.

हस्तलिखित मासिकापासून वादविवाद स्पर्धेपर्यंत महाविद्यालयाच्या आणि गावातल्या अनेक उपक्रमांत वर्षभर गुंतल्यामुळे परीक्षेच्या अभ्यासाला वेळच राहत नसे. दर वर्षी परीक्षेच्या अगोदर आठ-दहा दिवस फक्त अभ्यास करायचा आणि उत्तीर्ण व्हायचे, हा प्रयोग शालांत परीक्षा आणि इंटर या दोन्ही वेळी जमून गेला होता. बी.ए. च्या परीक्षेत मात्र इंग्रजी

विषयांत दोन मार्क कमी पडले आणि हा प्रयोग नेहमीच यशस्वी ठरत नाही, हे लक्षात आले. वर्षभर बीडला शाळेत शिक्षक म्हणून काम करता-करता पुरवणी परीक्षा दिली व इंग्रजी विषयात उत्तीर्ण होऊन मी औरंगाबादला पुढील शिक्षणासाठी पुन्हा आलो, तेव्हा यापुढच्या परीक्षेपूर्वी निदान दोन महिने तरी कसून अभ्यास केला पाहिजे, हे ठरवले होते.

वडील वकिली करीत होते आणि सार्वजनिक काम करण्याचे स्वातंत्र्य आणि वेळ तो व्यवसाय देऊ शकतो, हे मी घरी पाहिले होते. वाङ्मयाच्या आवडीने मला प्राध्यापकीबद्दल आकर्षण निर्माण केले होते. एलएल.बी. होऊन वकील व्हावे की मराठी विषयांत एम.ए. ची पदवी मिळवून प्राध्यापक, याबद्दल माझी द्विधा मनःस्थिती होती. शेवटी या दोन्ही पदव्या मिळवाव्यात व वकील व्हायचे की प्राध्यापक याचा निर्णय नंतर घ्यावा, असे मी ठरवले. माणिकचंद पहाडे यांच्या स्मरणार्थ औरंगाबादेत एक विधी महाविद्यालय दोन-तीन वर्षांपूर्वीच सुरू झाले होते. त्यात मी प्रवेश घेतला. एलएल. बी.साठी माझा बीडचा एक मित्र मधुकर वाडगावकर औरंगाबादेत आला होता. त्याने आपण एकत्र राहू, असा प्रस्ताव मांडला. मधू अत्यंत काटकसरी होता. अधूनमधून नोकरी करीत त्याने बी.एस्सी.ची पदवी मिळवली होती. नोकरीत बचत केलेल्या थोड्याशा पैशात त्याला एलएल.बी. करावयाचे होते. अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींकडे अजिबात लक्ष न देण्याचा त्याचा स्वभाव होता. आम्हीही निदान परीक्षा जवळ आली म्हणजे तसेच वागावे, असा त्याचा आग्रह असे. मला आणि आमच्याबरोबर अभ्यासाला येणाऱ्या परभणीच्या वसंत पाटलाला मधूच्या या कटाक्षाचा उपयोग झाला. गावात कुठेही सार्वजनिक कार्यक्रम असेल, भाषण असेल तर आपण ऐकायला जावे, असा मोह मला व्हायचा आणि कोणाचेही गाणे गावात असेल आणि परीक्षा आठ दिवसांवर आली असेल तरी ते ऐकावे, असे वसंत पाटलाला वाटे. परीक्षेच्या अगोदर निदान दोन महिने तरी खोलीच्या बाहेर आम्हाला निघूच न देण्याची कामगिरी मधूने खोलीमित्र म्हणून पार पाडली. एलएल.बी.च्या परीक्षेत आम्हा तिघांनाही जे यश मिळाले, त्याचे थोडेसे तरी श्रेय मैत्रीसाठी मधूने केलेल्या आमच्या या नाकेबंदीला होते.

१ नोव्हेंबरपासून राज्य पुनर्रचना अमलात येणार होती. मराठवाडा द्विभाषिक मुंबई राज्यात सामील होणार होता. हैदराबाद राज्यातील मराठी भाषकांच्या ज्या संस्थांचे केंद्रीय कार्यालय हैदराबादेत होते, त्यांना आता ते औरंगाबादला हलवावे लागणार होते. 'मराठवाडा' हे स्वातंत्र्य चळवळीत जन्माला आलेले आ. कृ. वाघमाऱ्यांचे वृत्तपत्र व 'मराठवाडा साहित्य परिषद' ही प्रातिनिधिक साहित्य संस्था याच त्यातील महत्त्वाच्या संस्था होत्या. मराठवाडा अर्धसाप्ताहिक छापले जाणारे 'जयहिंद मुद्रणालय' आणि वृत्तपत्राचे संपादकीय कार्यालय यासाठी सराफ्यात एक जुनी पण मोठी जागा भाड्याने घेण्यात आली. संपादक अनंत भालेराव जाधवमंडी भागातील चौधरी बंगल्याच्या आवारातील एका माडीवर भाड्याने राहू लागले. अनंतराव औरंगाबादेत आल्यावरच माझा त्यांचा परिचय झाला. स्वातंत्र्य चळवळीत असलेल्या कनिष्ठ मध्यमवर्गीय खादीधारी कार्यकर्त्यांची जी प्रतिमा (माझे वडीलही त्यापैकीच असल्यामुळे) माझ्या परिचयाची होती, तशीच अनंतरावांची होती. अहंतेचा स्पर्शही नसलेल्या अनौपचारिक शैलीच्या अनंतरावांच्या वागण्या-बोलण्यामुळे तीन-चार भेटींतच मला आदर वाटू लागला. माझे वडील स्वातंत्र्य चळवळीतले त्यांचे सहकारी असल्यामुळे अनंतराव आणि मी यांच्या संबंधाला पितापुत्रासारखेही थोडे स्वरूप आले.

त्र्यंबक महाजनमुळे ज्याची माझी ओळख झाली, असा एक मित्र म्हणजे चंद्रकांत भालेराव. त्याचे आणि अनंतरावांचे आडनाव एकच असले तरी त्यांचे नाते नव्हते. मात्र चंद्रकांतचे अनेक नातेवाईक अनंतरावांना परिचित होते. संभाषणात चमकदारपणा असलेला चंद्रकांत मराठी हायस्कूलमध्ये शिक्षक होता. शाळेच्या वेळातच सवड काढून तो आठवड्यातून तीन-चार वेळा मराठवाडा कार्यालयात अनंतरावांना भेटायला जाई. त्याच्याबरोबर मीही जाऊ लागलो. मोठ्या दरवाज्यातून इमारतीच्या आवारात प्रवेश केला की उजव्या हातालाच अनंतरावांची खोली होती. हैदराबादहूनच आलेले जुने लाकडी फर्निचर त्यात होते. अनंतरावांच्या टेबलावर समोर पाच-सहा खुर्च्या असत आणि तिन्ही बाजूंच्या भिंतींना लागून लाकडी कपाटे ठेवलेली होती. कपाटे, खुर्च्या किंवा टेबल कधी नवे आले नाहीत एवढेच नव्हे, तर त्यांना कधी पॉलिशही करण्यात आले नाही. टेबलावर लोकमान्य टिळकांचा अगदीच छोटा अर्धाकृती पुतळा असे. चैन म्हणजे पाच-सहा बॉलपेन मात्र टेबलावरच्या ट्रेममध्ये ठेवलेली असत. त्यात आवड-निवड नसे. एक चालला नाही, तर दुसरा लगेच हाताशी असावा, एवढीच दृष्टी असावी.

आम्ही आलो म्हणजे 'काय महाशय?' असा औपचारिक प्रश्न सवयीने विचारून अनंतराव हातातली लेखणी खाली ठेवत आणि आमच्याशी गप्पा मारायला सुरुवात करीत. माणसे भेटायला येण्याने व्यत्यय आल्यासारखे त्यांना कधीच वाटत नसे. त्यांना भेटायला केव्हाही येण्याची सर्वांनाच मुभा असे. भेटणारा माणूस परत गेला म्हणजे त्यांचे थांबलेले लेखन विनातक्रार पुन्हा सुरू होई. 'लिंक' तुटली वगैरे त्यांच्याबद्दल कधी होतच नसे. अनंतरावांचे आणि आमचे बोलणे संपादक - लेखक किंवा संपादक - वाचक यांच्यातल्या संवादासारखे नसे. अनंतरावांचा एखादा अग्रलेख आवडला तर तेवढ्यापुरता त्याचा उल्लेख होई. इतर गप्पांत 'मराठवाडा'चा संदर्भ फारसा नसे.

**(पृष्ठ १४१ पहा)**



# गगनभरारीला बळ देणारे लेब्राटचे दिवस

डॉ. आनंद पाटील

**सातार्‍यातलं हे एकमेव कॉलेज. दोन-अडीच हजारांवर विद्यार्थी. भाऊराव अण्णांचा पुतळा आणि त्याच्या भोवतीची बाग सुंदर आहे. खळीच्या पांढर्‍या कापडाचा शर्ट आणि विजार माझ्या अंगावर खसखसत होती. त्यांचा वास अंगभर भिनला होता. कॉलेजमधला पहिला दिवस लेब्राटांसाठी कायमचा ठरला होता.**

Say not the struggle nautht availeth,
The labour and the wounds are vain,
The enemy faints not, nor faileth,
And as things have been, things remain.
Aurthur Hugh (laugh 1819-61 : 'Say not the struggle naught availeth', 1855)

कॉलेज शिक्षण घ्यायला मिळेल, असं वाटत नव्हतं. पण अडाणी आई म्हणायची, ''बाळा, तू येवडा ह्या गावच्या उकिरड्यातनं भाईर जा. जीव गहान टाकीन, पर तुला शिकवीन.'' तिची उकिरड्याची उपमा सहज आली नव्हती. आमच्या घराशेजारी भाऊबंदांनी शेणघाणीच्या गारी खोदल्या होत्या. पावसाळ्यात ती गावची हागणदारी होती. जीव नको व्हायचा. कर्मवीर भाऊराव पाटलांनी १९५७ मध्ये कोल्हापूर-रत्नागिरी रस्त्यावर बांबवड्यास महात्मा गांधी विद्यालय सुरू केले. ते नसते, तर मी गावच्या इनामदार पाटलांच्या म्हशी राखल्या असत्या. चार मैलांवरच्या हायस्कूलला जाता-येता आणि सकाळी म्हैस व गाय राखताना माझं इंग्रजी सुधारलं. वर्गात नेहमी पहिला नंबर टिकवला. मॅट्रिकनंतर अल्पभूधारक बैलगाडीवान बाबांचा एकच ठेका : ''तलाठी नायतर मास्तर हो...'' सहा भावंडांत मी मोठा. त्यांचं गणित बरोबर होतं. आर. के. शिंदे सरांचा मी लाडका विद्यार्थी. त्यांनी सातार्‍याच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील यांना माझ्यासाठी शिफारसपत्र दिले. त्यातील एक वाक्य किती द्रष्टेपणाचे होते, याचे आज नवल वाटते. ''याचे हस्ताक्षर व इंग्रजी चांगलं आहे. संस्थेतील एक चांगला प्राध्यापक आपल्या हाताखाली तयार होईल...'' हे केंब्रिज प्रकाशनाच्या मान्यतेने पुढे सिद्ध होणार होते.

मुक्काम शित्तूर तर्फ मलकापूर, पो. पिशवी, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर या पत्त्यावरून मी १० जून १९६३ रोजी सातार्‍याला 'पलायन' केले. एक विजार-शर्ट, १५ रु. आणि जुनी मोडकी पत्र्याची ट्रंक– एवढंच भांडवल चड्डीतील आंदाकडं होतं. योग्य वळणावर चांगली माणसं भेटणं,

हे आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरतात. पहिली ते पीएच.डी.पर्यंत नियमित विद्यार्थी असताना मी हे अनुभवले. शिंदेसर स्वत: रयत शिक्षण संस्थेच्या 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थी होते. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या उपस्थितीत संस्थेची सेवा आजन्म करण्याची शपथ घेणाऱ्यांपैकी ते एक होते. माझ्या अंतरंगात आकार घेत गेलेले हे पहिले आदर्श मॉडेल. त्या आधीच्या प्राथमिक शाळेतील जिनगरवाडीचे कै. बळवंत ज्ञानदेव जिनगर व पिशवीचे कै. दादोबा चंद्राप्पा लोहार यांना अलीकडे माझा 'शोध एका चळवळ्या मित्राचा' हा कथासंग्रह अर्पण केला आहे. 'तुमच्याच कंदिलाच्या उजेडात माझे आयुष्य उजळले, गुरुजी...' मात्र, मला गावातून उड्डाण करायला माझी आई व मुंबईला ड्यूक सोडा वॉटर कंपनीत बॉक्स उचलणाऱ्या नामूमामानं पंख दिले. त्याच्या दुसऱ्या दिवशी 'मला फूस दिली' म्हणून बाबानं आईला खूप मारझोड केल्याचं सहा महिन्यांनंतर शेजारच्या म्हातारीकडून कळलं. दारिद्र्याचे दुष्परिणाम कळण्याचं ते वय नव्हतं. पण माझा चुलता नारायण देवगुणी होता. तो दीर्घकाळ एकत्र राहिला, म्हणून मला कॉलेज करणं शक्य झालं.

अशा परिस्थितीत कॉलेजजीवनाची गुलाबी स्वप्नं मला कधी पडली नव्हती. गावात एकच इनामदारपुत्र कोल्हापूरला कॉलेजकुमार होता. तो बी. ए. नापासच राहिला. त्याच्या भानगडींची चर्चा गावभर व्हायची. मी कुठलंच कॉलेज पाहिलं नव्हतं. किमान शिंदेसरांच्यासारखं हायस्कूल टीचर व्हायचं, एवढीच महत्त्वाकांक्षा वाढली होती. मॅट्रिकची फी भरायला पैसे कमी पडले. तेव्हा मी आणि आई बळी गुरवाचे बांध रचायची मजुरी करायला गेलो होतो. त्यामुळं बी.ए.पर्यंत मजल कशी मारता येईल, ही चिंता होती. भेडसगाव-मुंबई गाडी सायंकाळी ४ वाजता साताऱ्याच्या एस.टी. स्टँडवर थांबली. शिवाजी कॉलेजचा रस्ता विचारायला कुणी सापडतो, याचा शोध मी घेत होतो. एवढ्यात आवाज आला–

"एबी, इकडं कुणीकडं?"

"टीडी, तू इथं कसा?"

माझ्या मागच्या वर्गातील गोगव्याचा टीडी पाटील आपल्या भावाकडं शिकायला आला होता. त्यानेच मला टांग्यातून कॉलेजच्या वसतिगृहात पोचवलं. त्याचा भाऊ यशवंतराव हा भूसंधारण खात्यात नोकरीला होता. त्या घरचा आधार योगायोगाने लाभला, याचेही आज नवल वाटते. शिंदेसर कधीतरी कॉलेजमधील आठवणी सांगायचे. त्यात कर्मवीर भाऊराव पाटलांनी इंग्लंडला शिकायला पाठवलेल्या गोरगरीब घरच्या धडपड्या मुलांच्या नवलकथा असायच्या. त्यांचे अर्थशास्त्राचे गुरू बी. के. पाटील हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची पदवी संपादन करून आले होते. मराठीत अर्थशास्त्राचे पहिले पाठ्यपुस्तक त्यांनी लिहिले. मी आदर्श विद्यार्थी म्हणून स्नेहसंमेलन समितीचा विद्यार्थी सचिव होतो. तेव्हा प्राचार्य शंकरराव उनउने यांना शिंदेसरांनी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले होते. कोष्टी समाजामधील सावळजच्या मुलाला भाऊराव अण्णांनी इंग्लंडला बी.टी. करायला पाठवलं. हॅट व फुल सुटातील बापूसाहेबांची ती मूर्ती आजही माझ्या डोळ्यांसमोरून हलत नाही. तेव्हाच केव्हा तरी नकळत बीज रुजले असेल, 'मला घडेल कशी विलायतची वारी?'

पंचवीस वर्षांनंतर ती मला दोन वेळा घडली!

या लेखाचे शीर्षक मुद्दाम निवडले आहे. मी १९८६ मध्ये इंग्लंडला गेलो, तेव्हा लिहिलेल्या लेखात पै. मुमताज रहिमतपुरेनं 'गगनभरारी' हे शब्द योजिले होते. आर्थर क्लोव्हच्या कवितेच्या ओळी प्रथम एकपाठी बॅरिस्टर पी. जी. सरांच्या वर्गात पुढे ऐकल्या. आज मी शिंदेसरांची चिठ्ठी घेऊन त्यांच्या कल्याणीनगरातील स्टाफ क्वार्टरसमोर उभा होतो. त्यांची अफाट स्मरणशक्ती आणि इंग्रजीवरील प्रभुत्वाच्या अनेक चित्तरकथा शिंदेसरांनी आधीच सांगितल्या होत्या. वाटलं होतं, सुटाबुटातील प्राचार्यांच्या पुढं शुद्ध मराठीत नीट बोलायचं, पण साध्या पांढऱ्या खादीतील विजार-शर्टातील बटू मूर्तीनं स्वत: दार उघडलं. धारदार नाक, गोरा रंग, भेदक डोळे. मी हात जोडले आणि घाईत चिठ्ठी पुढं केली. ती वाचून लगेच त्यांनी सांगितलं,

"ठीक आहे. तुमच्या भागातला दिंडे आहे लेबर स्कीमला, जा. कामचुकारपणा करायचा नाही. शिस्त पाळायची... स्कीमचे रेक्टर प्रा. नारायणराव भगरे आहेत. त्यांना उद्या भेट. सेक्रेटरीला सांगा... प्रवेश द्यायला. शिंदेसरांना कळव.."

वसतिगृहात तीन मजल्यांवर यू आकारात तिन्ही शाखांची पाच-सातशे मुले असतील. लेबर स्कीममध्ये जवळजवळ दीडशे मुलांनी प्रवेश घेतला होता. त्यातील अर्धीच पुढे टिकतात, असे कळले. पूर्वी आमच्या गावचा एक जण पहिल्याच वर्षी सैन्यात भरती झाला होता. लेबर स्कीममधल्या मुलांना 'लेब्राट' व मागासवर्गीय बीसी स्कॉलरशिपवाल्यांना 'बेसकाट' ही नावं असल्याचं जेवणाच्या पंगतीत कळलं. एका खोलीत दहा-बारा मुलांची राहायची सोय होती. लेबरवाल्यांना वेगळ्या, एका बाजूच्या खोल्या होत्या. कल्हई केलेलं पितळी ताट आणि वाटी भली मोठी होती. ती नावावर घेतली. मेस मुलंच चालवायची. कॉलेजला कॉर्पोरेशननं दिलेली वीस एकर बाग आहे. मोठी विहीर आहे. उम्या-गाम्याची बैलजोडी, डझनभर म्हशी ही उत्पन्नाची साधनं तेव्हा होती. वसतिगृहांची दळणं, इमारतीवरील खडी फोडणे, बागकाम हे सारं माझ्या दृष्टीनं कठीण नव्हतं. सकाळी ७ ते दहा व सायंकाळी ४ ते ६ या कामाच्या वेळा होत्या. तेव्हा १२०० च्या आतील फी सवलत होती. पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वी प्रत्येक

तालुक्याला कॉलेज नव्हतं. राहायला, जेवायला आणि पुस्तकासह शिक्षण फुकट, ही मोठी संधी होती. रात्री वसतिगृहातील तेलाच्या चपात्या, भात, डाळीची झणझणीत आमटी ताव मारायला घावली. चापून जेवलो. घरात चपाती नावाला नसायची. यंदाच्या पावसाळ्यात अर्धा कोंडा मिसळून केलेली भाकरी आणि भाताच्या लोंब्या पिकायच्या आत सडलेला भात खावा लागणार नाही, याचाच जास्त आनंद झाला. त्या उकिरड्यापासून दूर पळायचा निर्धार पक्का झाला.

साताऱ्यातलं हे एकमेव कॉलेज. दोन-अडीच हजारांवर विद्यार्थी. भाऊराव अण्णांचा पुतळा आणि त्याच्या भोवतीची बाग सुंदर आहे. खळीच्या पांढऱ्या कापडाचा शर्ट आणि विजार माझ्या अंगावर खसखसत होती. त्यांचा वास अंगभर भिनला होता. कॉलेजमधला पहिला दिवस लेब्राटांसाठी कायमचा ठरला होता. तिन्ही शाखांतील विद्यार्थ्यांसाठी प्राचार्यांचे भाषण व्हायचे. त्याला गेल्यानंतर नियमित तासांना जायला मिळे. तातडीची कामं निघाली, तर तास बुडे. बॅ. पी. जी. सर इंग्रजी, मराठीचं संतुलन साधत बोलत. मला गावाकडचे कीर्तनकार आठवत. ते कॉलेजची एक इमारत हा ग्रॅन्ट डफ इतिहासकाराचा बंगला असल्याचा तपशील पुरवायचे. त्यात कॉलेज स्थापनेचा इतिहास यायचा. लेबर स्कीम हा कॉलेजचा आत्मा आहे. वार लावून शिकणं फार सोपं आहे. मनगट व मान ताठ ठेवून स्वकमाईवर शिकणं, हा पराक्रम आहे. मोडेन पण वाकणार नाही, हे कर्मवीर अण्णांचे ब्रीदवाक्य आहे... अशी सुरुवात करीत ते जॉर्ज वॉशिंग्टनच्या गोष्टीला आत्मकथन जोडत. शाहूमहाराज ते सयाजीराव गायकवाडांसंबंधीच्या संस्थेतील आठवणी सांगत. संस्कृतमध्ये पहिल्या आलेल्या मांगाच्या मुलाला महात्मा गांधींनी आपल्या गळ्यातील हार घातला. जातपात मोडत, समता व बंधुभाव वाढवण्याचा हा प्रयोग आहे. दारिद्र्यात जन्मणं हे पाप नाही, दारिद्र्यात राहणं हा गुन्हा आहे. हे तास-दीड तासाचं विनोदाचा शिडकावा व उद्धृतांची उधळ असलेलं भाषण म्हणजे तेव्हा लाभलेला चैतन्याचा एक झरा होता. आदर्शाचा हा नमुना catch them young वयात अंतरंगांत एवढा मुरला, की आज मी विदर्भ-मराठवाड्यात जरी भाषण द्यायला गेलो तरी वृद्ध लोक विचारतात, 'तुम्ही पीजींचे विद्यार्थी का?' मात्र, पुढे तुलनाकार-संशोधक म्हणून अर्धा डझन विदेशवाऱ्या केल्या, तेव्हा ही कीर्तनी वक्तृत्वपूर्ण शैली विसंगत व अपूर्ण ठरू लागली. पण त्या गगनभराऱ्यांचे बळ लेब्राटच्या दिवसांनीच मला दिलं यात शंका नाही. माझ्या लेखनाला ते व्यापून उरतात. 'कागूद'चा नायक लेब्राट आहे. इतर बरेच काही...

पहिल्याच सहामाहीत दोन चमत्कार घडले. ऑगस्टमध्ये कुणा श्रीमंत बागवानाच्या हीरोनं आमच्या बागेतील फुलं तोडून एका मुलीच्या वेणीत माळण्याचा प्रयत्न केला. आमच्या पुढच्या वर्गातल्या मुलाणी, बन्या पाटील, मांगलेकर आणि दिंडेला ही बातमी लागली. मुलाणीनं स्टार्च टाईट कपड्यातल्या त्या हीरोला वर्गात गळपट्टी पकडून थेट व्हरांड्यात आणला. बन्या, बोधे नि भारत्यानं त्याची धुलाई जाहीरपणे केली. दिंड्यानं दाढी राखलेली. बागवाननं चिखलानं माखलेले कपडे झटकत आव्हान दिलं,

''धमक असेल तर या गावात मारामारी करायला.''

''कुठं येऊ रे गाभण्या?'' –बन्या.

''राजवाडा चौकात, पाच वाजता!'' –बागवान दोस्त.

''डन्! सहाला येऊ, तयार राहा.''

संध्याकाळी वसतिगृहाची घंटा जोरात वाजली. ती जेवणाचीच झाल्याचे समजून सर्व होस्टलर्स जमले. बन्यानं खड्या आवाजात मारामारीचं वृत्तांतकथन केलं. 'शहरातलं आणि बाहेरचं' या वादाला तोंड फोडलं. घाईत चढाईची तयारी सुरू झाली. खोरी-कुदळींचे दांडे निखळून पोत्यात भरले. तिखटाच्या पुड्या लेब्राट सैनिकांनी लपवल्या. कॉलेजात शिस्त व स्वच्छता राखणे, हे त्यांचे आद्य कर्तव्यच होते. वेगवेगळ्या गटाने जायचे मार्ग ठरले. पण पहिल्या गटालाच शत्रूने कर्मवीर अण्णांच्या समाधीसमोरच मुद्दाम गाठले. आरडाओरडा होताच वसतिगृहातील फौज धावली. गदारोळ उडाला. माझ्या पाठीत एक रट्टा बसला. तो नक्की शत्रूचा की आमच्यापैकी कुणाचा, हे कळायला मार्ग नव्हता. पोलीस आले. आजीव सेवक सुखटणकरसाहेब पळत पोरांना संस्थेच्या आवारात चलायला सांगत सुटले. त्यांनी मध्यस्थी केल्याने आमच्यापैकी कुणालाही अटक झाली नाही. मात्र, बागवान मंडळी आधीच काळ्या यादीत असल्याने खोड्यात अडकली. पोलिसांत अनेक अधिकारी संस्थेचे माजी विद्यार्थी होते. पण पीजीसाहेब काय म्हणतील याची काळजी सिनिअर्सना होती. ते विजार-शर्टातच कॉलेजच्या व्हरांड्यातच फिरत होते. ते आघाडीवरच्या वीरांना बघताच फार खवळले– ''एखाद्याचा जीव गेला असता तर रे? कुणाला विचारून लढाई करायला गेलात? मूर्ख कुठले... विचारून तरी जायचं.'' हे शेवटचं वाक्य साभिनय म्हणताच सैनिकांच्या जीवात जीव आला. रक्ताळलेल्या बन्या, दिंडे, बोधे वगैरे सिनिअर्सना खुणावून त्यांनी जवळ बोलावलं. जखमांविषयी चौकशी केली आणि वीरांची पाठ थोपटली. टाळ्यांचा कडकडाट झाला. आजच्यासारखं विकृत रॅगिंग तेव्हा नव्हतं, पण भांडणं असायची.

सहामाही परीक्षेचा निकाल, हा असाच एक अविस्मरणीय प्रसंग. प्रा. एस. आर. माधव आठवडाभर वेगवेगळ्या रंगांचा फुल सूट घालून यायचे. श्रीमंत नगराध्यक्षांचे सुपुत्र. कडक शिस्त. इंग्रजीच्या पेपरातील गुण-दोष सांगत ते वर्गात उत्तरपत्रिका परत करत होते. माझा नंबर लवकर लागेना. शेवटी तो पुकारला.

मी जरा घाबरतच उभा राहिलो. मला चांगला न्याहाळून नाव विचारलं, अभिनंदन करून मोठ्या कौतुकानं त्यांनी जाहीर केलं– ''He stands first. Correct English, the best hand and extraordinary memory. Good luck, Patil.''

या शाबासकीनंच पुढं मला इंग्लंडमधील ऑक्सफर्ड हॉलंडमधील लायडेन आणि चीनच्या पेकिंग विद्यापीठाचे दरवाजे उघडले नसतील? १८५७ पासून महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या इंग्रजी विभागाचा प्रमुख पाटील-भोसले-मोहिते निवडपद्धतीने झालेला नाही. तो मान प्रथमच मला गोवा व नांदेड येथील विद्यापीठांत मिळाला. माझे गुरुजनांच्या बाबतीत भाग्य एवढे थोर, की मी गोवा विद्यापीठात असताना माझे चार कॉलेज टीचर्स रिफ्रेशर कोर्समध्ये माझ्या तासाला बसत होते. पहिला तास होताच चौघेही अभिनंदन करायला आले. तेव्हा जाधवसर म्हणाले, ''I am proud of you 'AB' A-one lecture. But it was too advanced for me to understand it!'' अंगावर मूठभर मांस चढलं.

पुढे एस. वाय. बी. ए.ला स्पेशलचे विषय निवडताना लेबरच्या गरीब पोरांना प्राध्यापक गळाला लावायचे. हिंदी, पाली, अर्धमागधी अशा काही विषयांसाठी स्कॉलरशिपचं मधाचं बोट होतं. अर्धमागधीच्या सरांना मी इंग्रजीच घेणार असल्याचं सांगितलं. मला अर्थात त्या विषयात कमी मार्क्स मिळाले. खोटं बोलले, त्यांना डिस्टिंक्शन! ब्रह्मचारी का राहिलो यावर पहिल्याच वर्षी लेख लिहिणारे प्रा. के. एस. अय्यर हे माझी काळजी घ्यायचे. त्यांचे इंग्रजी उच्चार अप्रतिम होते. त्यांनी परीक्षेच्या काळात वापरायला मला आपले गजराचे घड्याळ दिले होते. कॉलेजातील विषयाची निवड आपल्या संपूर्ण आयुष्याला विशिष्ट वळण देते. नशीब ठरवते. पीएच.डी.साठी 'मराठी नाटकावरील पाश्चात्त्य प्रभाव' हा विषय निवडण्याचे मी धाडस केले. म्हणून 'आंतरराष्ट्रीय पाटील' झालो याविषयी मी 'पाटलाची लंडनवारी' व अन्यत्र लिहिले. त्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्याशी माझं नाव जोडलं गेलं.

कॉलेजमध्ये मी कुठल्याच मुलीशी बोलल्याचं आठवत नाही. 'लेब्राट' ही एक वेगळीच स्वावलंबी शिक्षणाची भट्टी आहे. प्लेटोच्या आदर्श राज्यातील शिक्षणपद्धतीशी तिचे नाते आहे. पुढे ते एक व्रतच बनले. जाधवसरांनी जाहीर कौतुक केल्याने 'स्कॉलर' ठरलो. मराठी शाळेत यामुळेच मला 'ईश्वर' हे टोपण नावच गुंगानं पाडलं होतं. वसतिगृहातील देशमुख व सुतार नावाच्या मुली मला म्युनिसिपल बागेतील शेडमध्ये शोधत आल्या. इंग्रजीत नंबर काढल्याबद्दल अभिनंदन करणारं कुणीतरी असावं, हेच मुळी नवल होतं. इंग्रजी सुधारण्याबद्दलचा सल्ला व नोट्स मिळवण्यासाठी मी आलो होतो. पण फार घाबरलो होतो. 'पीजी सरांना हे कळलं तर?' ते Victorian moral code भलतेच कडक होते. या वळणावर गेलेल्या रोमिओ लेब्राटना लेबरमधून हाकललं गेलं होतं. विस्तवाजवळ लोणी वितळणारच, हे सूत्र बिंबवलं जात होतं. ती आमची गरजच होती. तक्षशिला-नालंदा विद्यापीठात दगडी बाके विद्यार्थ्यांना बसायला असत.

याचा अर्थ असा नव्हे की, शिवाजी कॉलेज हा प्राचीन आश्रम होता. चावट पोरं लेडीज वसतिगृहाकडं चकरा मारायची. एक भिडू सतत सिव्हिल हॉस्पिटलला ॲडमिट व्हायचा. तो परीक्षेत नापास झाल्यानंतर नर्सच्या लफड्यात अडकल्याचं कळलं! एक रंगेल रंग्या, लफंगा प्राध्यापक ऑफ पिरियडला शामळू सहकाऱ्याच्या घरात भर दिवसा तास घ्यायला जातो, याचा आँखो देखा हाल सांगणारे होते. बागेत रात्री फळं, भाज्या, लाकडं चोरायला येणाऱ्या पोरी-बायांना पकडायला जागत बसणारे लेब्राट होते. या वादळात मी मात्र सापडलो नव्हतो. मुळात बाबानं आईला जास्तच छळायला सुरुवात केलेली. मामा तेलपाणी नि वह्यांसाठी पैसे द्यायचा. चीनच्या युद्धाचा फायदा झाला. सक्तीच्या एन.सी.सी.त दोन ड्रेस, साबण व भत्ता मिळू लागला. एस. एस. भोसलेसरांच्या ओळखीमुळे कॅम्पमध्ये आम्ही मार्केटिंग कमिटीत गेलो. परेड चुकवून आमची टोळी गावात भटकत होती. एवढ्यात आर्मी मेजरची गाडी आडवी आली. तो ओरडला, ''क्या भंगी परेड चली है? परेड कहाँ है? रिपोर्त करो, आओ...'' आम्ही खाटकाकडचं स्पेशल मटण एनसीसीच्या ऑर्डरआडून दोन दिवसांनतर वसतिगृहात नेलं. शंकर दुधाळेनं ते शिजवायला मावशीकडं दिलं. आम्ही परेडला गेलो. दुपारी खोलीत आलो, तर मटणाच्या भांड्यात पाणीच पाणी! खेळाडू मोरे आणि कंपनीनं ते हडप केलं होतं! वर्टीकर मॅडमनी एनसीसी सुरू केली मुलींची. आमच्या वर्गातील वॉच कंपनीवाली 'वॉचनीय' भागवत सार्जंट म्हणून निवडली. पहिल्याच दिवशी तिनं जोरात ऑर्डर दिली!

''अगं ऽ बाई ऽ सावधान ऽऽ!''

वर्गात नटासारखे देखणे, सुटबुटातले प्रा. एस. आर. सूर्यवंशीसर कंपल्सरी इंग्लिशला शेक्सपिअरचे 'द मर्चंट ऑफ व्हेनिस' शिकवत होते. शेवटच्या रिंग एपिसोडमध्ये पोर्शिया ही बसानिओकडे आणि नेरिसा ग्रॅशियानोकडे आपापल्या एन्गेजमेंटच्या अंगठ्या परत मागतात. त्या ॲन्टोनिओच्या खटल्यातील वकील व क्लार्कला या प्रियकर महाशयांनी फी म्हणून दिलेल्या असतात. तेव्हा भांडणात चिडून पोर्शियानं म्हटलेलं वाक्य सरांनी वाचलं,

''जर तू माझी अंगठी परत केली नाहीस, तर मी तुझ्याशी झोपणार नाही!''

''सर, हे वाक्य आमच्या पुस्तकात नाही.'' भागवत सार्जंटताईनं लगेच उठून सरांना अडवलं. नाजूक मवाळ गडी

**(पृष्ठ १४७ पहा)**



# आयुष्याची पुढची वाट दाखवणारे कॉलेजचे दिवस

शिरीष पै

**वाडिया कॉलेजमधल्या पहिल्या वर्षाने माझ्या आयुष्यात क्रांती केली. जेव्हा जेव्हा माझ्या आयुष्यात खूप अंधार पसरतो, तेव्हाच लखख उजाडते. ज्या लॉ कॉलेजात मी रोज निराश अंत:करणाने पाय ठेवत होते, त्याच कॉलेजात एके दिवशी मला आयुष्याची पुढची वाट सापडली. ती वाट मला दाखवणाऱ्या व्यक्तीचे नाव होते, व्यंकटेश पै.**

मला नव्याने घडवणारे जे-जे कालखंड माझ्या आयुष्यात आले, त्यांतला एक गमतीदार कालखंड मी कॉलेजमध्ये पाऊल टाकले तेव्हाच सुरू झाला. कॉलेजचे शिक्षण पूर्ण करून मी जेव्हा कॉलेजमधून बाहेर पडले, तेव्हा संपूर्ण बदललेली होते. हे माझे कॉलेजचे जीवन म्हणजे पुढच्या आयुष्याचा एक लहानसा तुकडाच होता.

मी १९४६ मध्ये मॅट्रिकची परीक्षा पास झाले आणि पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये फर्स्ट इयर आर्ट्सच्या वर्गात नाव दाखल केले. वाडिया कॉलेजमध्ये माझे नाव माझ्या वडिलांनीच घातले. एवढेच नव्हे, तर कॉलेजच्या वसतिगृहात मला ठेवले. ते म्हणाले, ''एस. पी. कॉलेजमध्ये मला तुला घालायचे नाही. त्या भटुर्ड्यांच्या कॉलेजमध्ये घालून मला तुला बावळट होऊ द्यायचे नाही. मला तुला अशा कॉलेजमध्ये घालायचे आहे की, जिथे शिक्षण घेतल्याने तू जगाच्या कानाकोपऱ्यात आत्मविश्वासाने वावरू शकशील.''

मला आठवते, कॉलेजच्या पहिल्या दिवशी वडील मला स्वत: कॉलेजमध्ये घेऊन गेले. माझी फी त्यांनी स्वत: भरली. वसतिगृहाच्या माझ्या खोलीत (रूम नं. एक) ते स्वत: घेऊन गेले. मी कॉलेजमध्ये प्रवेश केला याचा माझ्यापेक्षा त्यांनाच जास्त आनंद झाला होता. त्या काळात शालेय शिक्षण संपवून आपला मुलगा किंवा मुलगी कॉलेजमध्ये गेली याचा आई-वडिलांना अतिशय आनंद वाटत असे. कॉलेजशिक्षणाचा विलक्षण दबदबा सुशिक्षित मनांवर होता. तोपर्यंतचे माझे शालेय शिक्षण नाशिकला झाले होते.

फारशी सुधारणा न झालेल्या नाशिकसारख्या गावात पाच वर्षे राहिल्याने माझ्यात एक प्रकारचा बुजरेपणा आणि बावळटपणा होता. त्या वेळी शाळेतल्या विद्यार्थ्यांवर सानेगुरुजींच्या 'श्यामची आई'ची विलक्षण पकड होती. नटणे, मुरडणे, दागिने घालणे याचा तिटकाराच मनामध्ये होता. कॉलेजमध्ये पारशी, ख्रिश्चन, ज्यू, मुसलमान मुले शिकत होती; ज्या कॉलेजमध्ये श्रीमंतांच्या फॅशनेबर मुली मोटारीतून कॉलेजला येत होत्या, त्या पुणे कँपमधल्या वाडिया कॉलेजात माझ्यासारख्या साध्या सुती कपडाच्या साड्या नेसणाऱ्या आणि तेलकट केसांच्या दोन घट्ट वेण्या घालणाऱ्या

मुलीने मोकळेपणाने वावरायचे तरी कसे? म्हणून भीत-भीत वडिलांबरोबर कॉलेजमध्ये जाताना मी त्यातल्या त्यात झुळझुळीत अशी पांढरी फुलांची वायल नेसले होते. केस त्यातल्या त्यात जरा सैल बांधले होते. पायात उंच टाचांचे बूट घातले होते. लंगडत-लंगडत अंगाभोवती घट्ट पदर गुंडाळून आणि खाली मान घालून अखेर मी वडिलांच्या मागे-मागे चालत वाडिया कॉलेजमध्ये प्रवेश केला.

कॉलेज सुरू झाले, पण मला फार उदास वाटायचे. भोवताली आत्मविश्वासाने हसणाऱ्या, बोलणाऱ्या मुली पाहिल्या की माझे मन आतून खट्टू व्हायचे. मुलांशी त्या ज्या मोकळेपणाने बोलत, कॉलेजच्या कॉरिडॉरमध्ये मुलांशी तासन्‌तास गप्पा मारत उभ्या राहात, हे पाहून मला आश्चर्य वाटे. मुले आणि मुली नि:संकोचपणे एकत्र हिंडत-फिरत, हॉटेलमध्ये चहा प्यायला जात. हे सारेच मला पूर्ण अनोळखी होते. माझे तोपर्यंतचे बालपण आईच्या करारी शिस्तीत, मुलींच्या बोर्डिंगमध्ये गेलेले. घंटेच्या ठोक्यासरशी सारे जीवन चालायचे. तिथे सकाळी प्रार्थना, संध्याकाळी प्रार्थना, अभ्यासाचा तास, साडेआठच्या ठोक्याला दिवे विझवून झोपायला जाणे वगैरे सगळे प्रकार फारच आखीव होते. आणि बोर्डिंगात पुरुषांचा वावरच मुळी नव्हता, म्हणूनच मला वाडिया कॉलेजमध्ये फार बुजल्यासारखे वाटायचे.

एके दिवशी गमत झाली. वर्ग संपवून मी माझ्या मैत्रिणीबरोबर वसतिगृहाकडे चालले होते. वसतिगृहाच्या दारात मी पाऊल टाकले, तो शिरीष अत्रे– माझे नाव– जिच्यावर लिहिले होते, अशी एक चिठ्ठी मला पायरीवर ठेवलेली दिसली. साहजिकच मी ती चिठ्ठी उत्सुकतेने उचलली व वाचली. तिच्यावर असे लिहिण्यात आले होते, 'आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची मुलगी आपल्या वर्गात आहे आणि ती फार अबोल आहे.' मला एकदम हसूच आले. ते अक्षर कुणा मुलीचे नव्हते. कदाचित कुणा मुलानेच ती चिठ्ठी खोडकरपणे वसतिगृहावरून जाताना आत फेकून दिली होती. मला समोरून येताना पाहून ती चिठ्ठी वाचताच माझ्या मनात सारखा एकच विचार घोळू लागला– हा मुलगा कोण असेल? तो माझ्यावर सारखा नजर ठेवून असेल का? कुणीतरी आपल्या हालचालींचे निरीक्षण सारखे करीत असेल का? नक्कीच करीत असला पाहिजे. शिवाय त्याने लिहिले होते, 'आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची मुलगी' म्हणजे मी अत्र्यांची मुलगी आहे, हे कॉलेजमधल्या मराठी मुलांना माहीत होते तर! ती चिठ्ठी हाती पडल्यापासून मी कॉलेजमध्ये एका वेगळ्याच जाणिवेने वावरू लागले, की मी अत्र्यांची मुलगी आहे. मुले मला ओळखतात; जणू सगळे जगच मला ओळखत होते!

अल्पावधीतच कॉलेजमधल्या विविध उपक्रमांना आरंभ झाला. त्यातला एक महत्त्वाचा म्हणजे मराठी साहित्य मंडळाचे उद्घाटन. वाडिया कॉलेजमध्ये मराठी साहित्य मंडळ दर वर्षी एका प्रख्यात नाटककाराचे मराठी नाटक बसवीत असे आणि वाडिया कॉलेजचे वैशिष्ट्य असे, इथे बसवल्या जाणाऱ्या नाटकात मुले आणि मुली एकत्र भूमिका करीत. अशी परवानगी एस. पी. किंवा फर्ग्युसन कॉलेजमध्ये नव्हती. तिथे मुलांची आणि मुलींची नाटके वेगळी बसविली जात. एके दिवशी मी वसतिगृहात जात असताना समोरून सायकलवरून एक मुलगा वेगाने आला आणि माझ्याजवळ सायकल थांबवून उतरला. सायकल उभी करून तिच्या दांड्यावर ऐटीत हात ठेवून त्याने हाक मारली–

''अहो मिस् अत्रे ऽ ऽ''

मी त्याच्याकडे दुर्लक्ष करून घाबरून तशीच पुढे निघाले. तो म्हणाला,

''अहो, अहोऽऽ मी तुम्हाला हाक मारतोय.''

नाइलाजाने मी थांबले. तो म्हणाला,

''मी तुम्हालाच भेटायला बोर्डिंगकडे येत होतो. माझे तुमच्याकडे एक काम आहे. साहित्य मंडळातर्फे आम्ही गडकऱ्यांचे 'पुण्यप्रभाव' हे नाटक बसवायचे ठरवले आहे. त्यासाठी कॉलेजमधल्या निवडक मुलांना आणि मुलींना आज संध्याकाळी पाच वाजता इंटरच्या वर्गात जमायला सांगितले आहे. आम्ही त्यांच्याकडून नाटक वाचून घेणार आहोत आणि त्यातून पात्रांची निवड करणार आहोत. तुम्ही याल का?''

मी एकदम घाबरून म्हणाले, ''नको, नको. मला घरून परवानगी मिळेल की नाही, माहीत नाही.''

तो खो-खो हसत म्हणाला, ''अहो, अत्र्यांच्या सुपुत्री ना तुम्ही? तुमच्या बाबतीत परवानगीचा प्रश्न उद्‌भवतोच कुठे?''

(मी मनातच म्हटले, पण लेका, माझ्या आईचे काय?)
''ठीक आहे, येते मी.'' असे म्हणून मी पुढे सटकले.

या मुलाचे नाव उमेश असून, तो वाडिया कॉलेजच्या नाटकातून दर वर्षी काम करीत असे, असेही त्याने मला जाता-जाता सांगितले.

संध्याकाळी बरोबर पाच वाजता इंटरच्या वर्गात नाट्यवाचन सुरू झाले. आठ-दहा मुली आणि पंधरा-वीस मुले जमली होती. प्रोफेसरमंडळी होती. नाट्यवाचन सुरू असताना माझी वेळ आली. सरांनी मला नाटकाची नायिका वसुंधरा हिच्या तोंडचे भाषण वाचायला सांगितले. मी एका दमात भराभरा वाचन पुरे केले. बाकावर येऊन बसले, तेव्हा अंगाला घाम फुटला होता. भोवतालच्या मुली म्हणाल्या, ''छान वाचतेस तू.'' नाट्यवाचनाचा कार्यक्रम संपल्यावर आम्हाला निरोप देण्यात आला. मला माहीत होते, हे काम आपले नव्हे. दुसऱ्या दिवशी सकाळी कॉलेजमध्ये वर्ग सुरू होण्यापूर्वी उमेश सरळ माझ्या वर्गाच्या दाराशी येऊन उभा राहिला आणि त्याने मला खूण करून बाहेर बोलविले. तो हसत म्हणाला,

''अभिनंदन! वसुंधरेच्या कामासाठी तुमची निवड झाली.''



मला आनंद निश्चित झाला; पण भीती अधिक वाटली, की आता या मुलांबरोबर नाटकाच्या तालमी करायच्या. सुरुवातीला नाटकाची तालीम सुरू झाली की मला रडूच यायचे. मला वाटायचे, सगळी मुले माझी सारखी टिंगल करतात. मी नाटकातले संवाद म्हणते, तेव्हा मला हसतात, असे मला वाटायचे. रोज तालीम संपली की वाटे, सरांना सांगावे, मला नाटकात काम करायचे नाही; पण तरीही 'हो' म्हटल्यावर तालमीला जाणे भागच होते. एके दिवशी सरांनी ठरवले, नाट्यदिग्दर्शन करण्यासाठी नटवर्य नानासाहेब फाटकांना आणायचे. नानासाहेब फाटकांच्या मार्गदर्शनाखाली नाटकात तालमी सुरू झाल्या आणि सर्वांच्याच अंगात एक नवचैतन्य संचारले. खरोखरच आमचे भाग्य थोर. इतक्या श्रेष्ठ कलावंताच्या सहवासात आम्ही नाट्यशिक्षणाचे पहिले धडे घेतले. स्वत: नानासाहेबांची वृंदावनाची भूमिका ('पुण्यप्रभाव'मधला खलनायक) महाराष्ट्रात गाजली होती. त्यांचे शब्दोच्चार अतिशय अर्थपूर्ण असत. संवाद सफाईदार म्हणत आणि चेहऱ्यावरचे हावभाव विलक्षण प्रेक्षणीय असत. एखाद्या वडिलांनी मुलीच्या पाठीवरून ममतेने हात फिरवून उपदेश करावा, तसे नानासाहेबांनी मला नाटक शिकविले. ज्या कोवळ्या वयात विद्यार्थी घडत असतात, तेव्हा त्यांना कुठल्याही विषयाचे श्रेष्ठ गुरू भेटले, तर त्यांचा समग्र जीवनविषयक दृष्टिकोन बदलून जातो. आदर्शाचा प्रत्यक्ष सहवास, हेच खरे शिक्षण. आमच्या अगदीच प्राथमिक अवस्थेतल्या पुण्यप्रभावात नानासाहेबांनी जणू प्राण ओतला. प्रत्येक पात्रातला आत्मा जिवंत केला. जागृत केला. शेवटी नाटकाचा प्रयोग एकदा झाला. मी अतिशय मन:पूर्वक भूमिका केली. (आत्मविश्वास मात्र नेहमीप्रमाणे मुळीच नव्हता.)

माझ्या कॉलेजजीवनातला तो आनंदाचा पहिला दिवस होता की, धाडसाने काहीतरी करून दाखवायला मी रंगमंचावर उभी होते. समोर जमलेल्या रसिकांच्या गर्दीसमोर मला कल्पनाही नसताना एक आश्चर्यकारक पण सुखद घटना घडली. वसुंधरेच्या भूमिकेबद्दल मला अभिनयाचे प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात आले. नाटक संपल्यावर कितीतरी लोकांनी आत येऊन अभिनंदन केले. 'पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रयोग झाला आणि वाडिया कॉलेजमध्ये मला माझे खास स्थान मिळाले. वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी वेगवेगळ्या कॉलेजमधली मंडळे मला मुद्दाम बोलावू लागली. उर्दू वाङ्मय मंडळाने मला त्यांच्या कार्यक्रमाच्या आरंभी ''सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ताँ हमारा'' हे गीत म्हणण्यासाठी बोलविले. कारण मुसलमान मुली त्यांना मिळेनात. झाले! आमच्या कॉलेजमधल्या दोन ब्राह्मण मुलांची डोकी फिरली. ती मुले राष्ट्रीय स्वयंसेवक संघात काम करत होती. ती मला धमकावू लागली– तुम्हाला आपल्या धर्माचा अभिमान नाही का? तुम्ही मुसलमानांबरोबर गायला उभ्या आहात, हे आम्हाला मुळीच पसंत नाही. हे तुम्हाला मुळीच शोभत नाही. मुसलमानांनी आपल्या आयाबहिणींवर अत्याचार केले, हा इतिहास तुम्ही विसरलात का? मला त्यांच्याशी वाद घालता येईना. पण मी इतकेच म्हणाले, आज तरी आपण सारे एकाच कॉलेजमध्ये शिकणारे विद्यार्थी आहोत. एकमेकांचे जणू बहीण-भाऊच आहोत. ज्या मुलांनी मला गीत म्हणायला बोलाविले, ती मुले सभ्य आहेत, सुसंस्कृत आहेत आणि ते गीतही आपल्या देशाचे गौरव करणारे आहे. मग मी त्यांना नाही कसे म्हणू? त्या मुलांच्या विरोधाला न जुमानता मी उर्दू वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात मुसलमान विद्यार्थ्यांबरोबर गीत म्हटले. या घटनेनंतर कॉलेजमधल्या मुसलमान विद्यार्थ्यांमध्येही मला नेहमीच मान दिला जाऊ लागला.

एकदा आमचा वर्ग सुटला आणि वर्गातून घाईघाईने जाताना मी कॉलेजमधल्या लायब्ररीतून वाचायला घेतलेले 'गारगोटी' नावाचे पुस्तक वर्गात विसरले. दुसऱ्या दिवशी वर्गात आल्यावर मी मुलींना विचारू लागले, की माझे गारगोटी नावाचे पुस्तक

तुम्हाला मिळाले का? वर्गातल्या मुलांना विचारण्याचे धैर्य अजूनही माझ्यापाशी नव्हते. माझे पुस्तक मात्र मला मिळाले नाही. २-३ दिवसांनी वर्गातल्या एका मैत्रिणीने ते पुस्तक मला परत दिले आणि ती हसून म्हणाली,

''आतमध्ये काय लिहिलेय, ते वाच.''

मी पुस्तक उघडताच कागद मला मिळाला. त्यात एक कविता लिहिली होती, ती पुढीलप्रमाणे...

'सांगा ना कुठे गेली गारगोटी....'

पुढच्या ओळी मला आठवत नाहीत. पण ती एक विनोदी कविता होती आणि तिच्यात गारगोटी हे पुस्तक शोधणाऱ्या माझी थट्टामस्करी केली होती. मी तिला विचारले,

''कुणी लिहिली ही कविता?''

ती म्हणाली, ''माझ्या मावसभावाने. तो आपल्याच वर्गात आहे. तुला ठाऊक नाही का?''

(मला कसं ठाऊक असणार?) वर्गात मुलांच्या दिशेने मी चुकूनही पाहत नसे. वर्गातली जी मुलं आपणहून माझ्याशी बोलत असत, तीच मला ठाऊक होती.

''तुझ्या भावाचे नाव?''

ती म्हणाली, ''पांडुरंग अंबिये.''

घरी परत आल्यावर (एव्हाना मी बोर्डिंग सोडले होते) कविता वाचून मी स्वत:शीच एकसारखी हसत होते. माझ्यातली व्रात्य आणि खोडकर अशी एक मुलगी एकदम जागी झाली. मी त्या विनोदी कवितेला कवितेनेच विनोदी उत्तर द्यायचे ठरवले. मी एक विनोदी कविता लगेच लिहून टाकली.

'जय देव जय देव<br>
जय पांडुरंगा,<br>
गारगोटीसाठी किती<br>
करिसी दंगा.'

दुसऱ्या दिवशी वर्गात माझ्या मैत्रिणीने म्हणजे पांडुरंग अंबियेच्या बहिणीने ती विनोदी कविता त्याच्या हाती दिली आणि मग मुलांच्या ग्रुपमध्ये एकच हास्यकल्लोळ उडाला. या दोन्हीही कवितांनी वर्गातील मराठी मुलामुलींची चांगलीच करमणूक केली. मात्र, पांडुरंग अंबियेशी मात्र मी प्रत्यक्षात कधी बोलले नाही. तोही मला पाहताच अनोळखी चेहरा करून पुढे सटके.

आमच्या वर्गात अशोक नावाचा एक मुलगा दुसऱ्या सहामाहीत प्रवेश मिळवून आला. त्याचे मराठी साहित्यावर विलक्षण प्रेम होते. तो कुमार साहित्य चळवळीतला एक कार्यकर्ता होता. त्याने माझ्याशी आपणहून ओळख करून घेतली आणि तो म्हणाला, ''आपण आपल्या वर्गाचे एक हस्तलिखित मासिक काढू या. काही मदत कराल का?''

मी उत्साहाने 'हो' म्हटले. एव्हाना माझ्या अंगातली पूर्वीची मरगळ पार गळून पडली होती आणि नवीन काही करण्याची, करून दाखविण्याची उमेद जागी झाली होती. मोठ्या उत्साहाने आमच्या वर्गातल्या साहित्यप्रेमी मुलामुलींचा एक गट हस्तलिखित मासिकाची जुळवाजुळव करण्याच्या कामी लागला. सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावरकर ह्यांची पत्नी यशोदा ही माझ्याच वर्गात होती. तीही हस्तलिखिताच्या कामात रस घेऊ लागली.

अशोक हा स्वभावाने बोलका, मनमिळाऊ आणि आनंदी होता. पण तो फार बारीक आणि अशक्त होता. लहानपणी पोलिओ झाल्यामुळे त्याच्या दोन्ही पायांत व्यंग होते आणि तो कसातरी फरफटत-फरफटत चालत असे. हस्तलिखित मासिकाचे काम संपले आणि तो माझ्या घरी सतत भेटायला येऊ लागला. एकदा तर त्याने आपल्या आयुष्याची दु:खद गोष्ट मला ऐकवली. पोलिओने आजारी असताना एकदा लहानपणी इस्पितळाच्या खाटेवर कसे एकटेच टाकण्यात आले होते आणि त्याच्या दोन्ही बाजूंच्या खाटेवरची माणसे त्या रात्री त्याने तडफडून मरताना पाहिली होती, हे त्याने मला सांगितले. दोन मुडद्यांच्या मध्ये तो त्या इस्पितळात एकटा तळमळत पडला होता.

त्याच्या आजाराची करुण कहाणी ऐकून मला त्याची फार दया आली. मी नेहमी त्याच्याशी अत्यंत सहानुभूतीने वागू लागले. तोही घरातील माणसे मला 'नानी' अशी जी हाक मारतात, तीच हाक मारू लागला. माझ्या आईला तो 'अहो नानीच्या आई' असे म्हणे. पण का कुणास ठाऊक, माझ्या आईला मात्र अशोकचे ते सलगीचे वागणे मुळीच आवडत नसे. एके दिवशी ती त्याला संतापाने म्हणाली,

''तुम्ही मला नानीच्या आई म्हणू नका आणि माझ्या मुलीला नानी तर मुळीच म्हणू नका. मला तुमचे तोंडही पाहायचे नाही.''

यानंतर अशोकची आणि माझी मैत्री तुटली. तो लांबूनच हसे. पण माझ्याशी बोलत मात्र कधीच नसे. ही गोष्ट माझ्या मनाला अतिशय लागून राहिली. पण तो काळच असा होता की, सुशिक्षित स्त्रियांनाही आपल्या मुली मुलांमध्ये मोकळेपणाने मिसळू लागल्या की त्यांचे भय वाटे. मुख्यत: आपली मुलगी कुणाच्यातरी आहारी जाऊन स्वत:चा सत्यानाश तर करून घेणार नाही ना, अशी काळजी वाटे म्हणून माझ्या आईवर मला रागवता येत नव्हतं. मी तिला समजू शकत होते. कॉलेजमध्ये नाटकाच्या तालमी जेव्हा सुरू होत्या, तेव्हा उमेश आम्हा मुलींना इराण्याच्या हॉटेलमध्ये चहा प्यायला घेऊन जाई, तेव्हा माझ्या छातीत विलक्षण धडधडे. मी मैत्रिणींना सांगे, ''चुकूनही ही गोष्ट आईला सांगू नका; नाही तर ती मला बदडून काढेल.''

उर्दू वाङ्मय मंडळाच्या हकिगतीनंतर आणखी एक घटना घडली, ती म्हणजे हिंदी साहित्य मंडळाची. त्यापूर्वी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी फीवाढीविरोधात आंदोलन केले होते. काही विद्यार्थी उपोषणाला बसले होते. विद्यार्थ्यांची सभा झाली. तेव्हा त्यात दिनेश नावाचा एक गुजराती मुलगा फार आवेशपूर्ण बोलला,

हिंदीमधूनच. त्याने प्रथम कॉलेजमध्ये हिंदी साहित्य मंडळाची स्थापना केली. एके दिवशी तो आपणहून माझ्याकडे आला आणि म्हणाला,

''मिस अत्रे, तुम्ही हिंदी साहित्य मंडळाच्या सेक्रेटरी व्हाल का?''

का, कुणास ठाऊक, मी 'हो' म्हणून गेले. ते दिवस असे होते, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभाषेचा विलक्षण अभिमान होता. काहीतरी एक मोठे कार्य आपण करणार आहोत, असे मला 'हो' म्हणताना वाटले.

दिनेश हा एका श्रीमंत कुटुंबात जन्माला आला होता. तो काँग्रेसचा भक्त होता. त्याच्या डोक्यात नुसते पूज्य बापूजी भरलेले होते. खादीची टोपी असे. खादीचाच पोशाख करी. त्याचे दिसणे, वागणे, बोलणे सोज्वळ आणि सात्त्विक होते. हिंदी साहित्य मंडळाच्या निमित्ताने मी त्याच्याबरोबर सायकलवरून हिंडू लागले. लायब्ररीसाठी हिंदी पुस्तकांची खरेदी आम्ही बरोबर केली. कॉलेज सुटल्यानंतर सायकलवरून तो माझ्याबरोबर पुष्कळदा मला घरापर्यंत पोहोचवत असे आणि माझ्या छातीत नेहमी धडधडू लागे, 'आई पाहील की काय?'

एकदा घरी परत जाताना त्याने मला सायकल कँपच्या दिशेने वळवायला लावली आणि ई. मेरेटोअर या कँपमधल्या एका पॉश हॉटेलात तो मला घेऊन गेला. त्याने माझ्यासाठी उंची केक्स मागवले. मी तर त्याच्या औदार्याने दडपून गेले. बोलता-बोलता तो म्हणाला,

''ताई, तुम्ही उमेशशी का बोलता? तो तुमच्या मागून तुमच्याबद्दल फार वाईट बोलतो. तो सारख्या सिगारेटी ओढतो. त्याचं अभ्यासात लक्ष नाही. तो इंटरला दोनदा नापास झाला. एकूण, तो वाह्यात मुलगा आहे, असं माझं मत आहे.''

मी त्याला म्हणाले, ''पण त्याच्यामुळेच मी नाटकात काम केले. तो माझ्याशी तरी वाईट वागत नाही. तो कसाही असला तरी मला त्याच्याशी कर्तव्य नाही.''

ई. मेरेटोअरमधून आम्ही बाहेर पडलो, तेव्हा का कुणास ठाऊक, दिनेश माझ्या मनातून उतरला. नेहमी उच्च मूल्यांची भाषा बोलणारा हा गांधीवादी तरुण इतका मत्सरी का होता?

ज्या-ज्या वेळी दिनेश कॉलेजमध्ये भेटे, त्या-त्या वेळी तो उमेशचा विषय उकरून काढी. एकदा तर त्याने मला घरच्या पत्त्यावर एक पत्रही पाठवले. अर्थात ते एक साधेच पत्र होते. पण त्यातही उमेशचा उल्लेख होता. आई घरी नव्हती. मी घाबरून ते पत्र फाडून टाकले. त्यानंतर का कुणास ठाऊक, मी दिनेशला टाळू लागले. विचित्र गोष्ट अशी घडली की, दिनेशची आणि माझी मैत्री संपली आणि उमेशशी मात्र वाढतच गेली. त्याबद्दल मी मला कधीच क्षमा करणार नाही. हे असे का घडले? कारण जगातली सज्जन माणसे आतून कुठे तरी क्षुद्र असतात आणि वरकरणी वाह्यात वाटणाऱ्या पुरुषांचेच अंत:करण उमदे आणि दिलदार असते. म्हणून सज्जनांशी संगत सोडून स्त्रिया वाह्यात समजल्या जाणाऱ्या माणसांशी मैत्री करतात.

दिनेश आणि माझी मैत्री संपुष्टात आल्यानंतर मला आश्चर्य वाटले. पुढे या एकाच शहरात राहून आम्ही एकमेकांना कधीच कसे पुन्हा पाहिले नाही? मी फर्स्ट इयर पास झाले, तेव्हा दिनेश बी.एस्सी. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन कॉलेजमधून निघून गेला होता; उलट उमेश नापास होऊन पुन्हा माझ्याच वर्गात आला होता. उमेश माझ्याशी नेहमीच चांगला वागला. पण ऐन मोक्याच्या वेळी त्याने मला म्हटले, ''उद्या जरी माझे लग्न झाले तरी आपली मैत्री तशीच राहील.'' मी त्याला म्हटले, ''हे अशक्य आहे. एका वेळी पुरुषाच्या आयुष्यात एकच स्त्री असू शकते आणि स्त्रीच्या आयुष्यात एका वेळी एकच पुरुष असू शकतो.''

इथेच उमेश आणि माझी मैत्री संपली. या घटनेचे पडसाद फार दूरगामी ठरले. जवळजवळ चार वर्षे मी एका उदास मन:स्थितीत काढली. वास्तविक, फर्स्ट इयरला मी पहिली आले होते. वाडिया कॉलेजमध्ये मानाचे स्थान पटकावले होते. पण या घटनेनंतर माझी उमेद मावळली. मला काही करावेसे वाटेना. मी पुढे ना धड अभ्यास केला, ना कधी नाटकात काम केले. इंटरला असताना 'आंधळ्यांची शाळा' या नाटकातून केवळ प्रोफेसरांच्या आग्रहाखातर काम केले. पण ते नायिकेच्या आईचे; नायिकेचे नव्हे. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे ह्यांनी हे नाटक उत्कृष्ट दिग्दर्शित केले होते. ह्या काळात त्यांची माया हाच माझा खरा आधार होता. पण आतून मी खचत-खचत चालले होते. मला पुणे शहर नकोनकोसे झाले. १९५१ मध्ये माझ्या वडिलांनी आम्हा दोघा बहिणींना मुंबईला शिकायला आणले. मी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्या वेळी मी सेकंड एलएल.बी.च्या वर्गात शिकत होते. केवळ पप्पांच्या आग्रहाखातर मी लॉ-कडे गेले. पण मला काही तो विषय मनापासून आवडत नव्हता. उगाच जायचे म्हणून मी कॉलेजमध्ये जात होते. वाडिया कॉलेजमधल्या पहिल्या वर्षाने माझ्या आयुष्यात जी क्रांती केली, मला एक आत्मविश्वास दिला; ते दिवस आता दूर गेले होते आणि पुन्हा काळ्याकुट्ट नैराश्याची सावली माझ्यावर पडली होती.

पण तीही सावली फार दिवस टिकायची नव्हती. हे माझ्या आयुष्यात नेहमीच घडते. जेव्हा जेव्हा माझ्या आयुष्यात खूप अंधार पसरतो, तेव्हाच लख्ख उजाडते. ज्या लॉ कॉलेजात मी रोज निराश अंत:करणाने पाय ठेवत होते, त्याच कॉलेजात एके दिवशी मला आयुष्याची पुढची वाट सापडली. ती वाट मला दाखवणाऱ्या व्यक्तीचे नाव होते, व्यंकटेश पै.

याच काळात माझ्या आईला माझ्या लग्नाची चिंता पडली होती. माझ्यासाठी अनुकूल वर तिला काही सापडत नव्हता. वडील म्हणत, ''शिकू दे तिला, मला तिला खूप शिकवायचे

आहे.'' तर आई म्हणे, ''तिचे लग्न करा; नाही तर कार्टी भलतेच काही करून बसेल, अशी मला भीती वाटते.'' शेवटी आईला वाटत होते तेच झाले. व्यंकटेश पैशी मी लग्न करणार आहे, हे मी घरात घोषित करताच एकच हलकल्लोळ उडाला. ज्याच्याविषयी धड काही माहिती नाही, ज्याला मुंबईत घरदार नाही, जो अजून आपल्या पायावर उभा नाही; त्या मुलाशी ही मूर्ख कार्टी एकदम लग्न करायला निघते म्हणजे काय? वडील आणि आई एकदम खवळले. घरात खूपच भांडणे झाली. मीही हट्टाला पेटले होते. बावळट, भित्री मुलगी; पण तिने आपले संपूर्ण भविष्यच आपल्या हातात घेतले होते, याचीच भीती सर्वांना वाटली. कॉलेजमध्ये आई-वडील मुलांना घालतात, उच्चशिक्षण देतात; यासाठी, की स्वत:चे निर्णय घेण्याचे सामर्थ्य त्यांच्या हातात यावं, पण निर्णय घेण्याची वेळ येताच आई-वडील निर्णयाचे स्वातंत्र्य नेहमीच मुलांकडून हिरावून घेतात. पुष्कळदा मुलांचे निर्णय चुकीचे असू शकतात. पण त्याचे प्रायश्चित्त नेमके स्वत:च घेत असतात. खलील जिब्राननने एके ठिकाणी म्हटले आहे की, आई-बाप म्हणजे धनुष्ये, जी मुलांचे बाण भविष्याकडे सोडतात आणि एकदा सोडलेला बाण मागे कधी येत नसतो.

व्यंकटेश पैशी विवाह होताच माझे कॉलेजचे जीवन समाप्त झाले आणि मी संसारात आकंठ बुडाले. कॉलेजची एकूण सहा वर्षे... एक विलक्षण संस्मरणीय काळ. पुढच्या सर्व आयुष्याची जणू तयारी करून गेला. ह्या सहा वर्षांत यशापयशाच्या किती घडामोडी घडल्या, पण काळाने मला खंबीर बनविले. एका अनभिज्ञ मुलीला पुरुष म्हणजे काय, हे समजावून दिले.

**शिरीष पै**
८ श्रॉफ हाऊस, पार्क क्लबसमोर, केळुसकर मार्ग (N),
शिवाजी पार्क, मुंबई - ४०० ०२८.
फोन नं. - ०२२-२४४५१५७१

**टी बुक क्लब १९ मधील पहिले पुस्तक**

# पिरॅमिड

**टॉम मार्टिन**
अनु. उदय भिडे




**३००रु.**
टी बुक क्लब सभासदांना **१५०रु.**
**पोस्टेज ३०रु.**

जर मी परत आलो नाही तर... युरेका!

४० १० ४ ४०० ३० ९ ३० ७० १०० ५ २०० ३० १० ४० १ ८० ५

१०० ४०० ४० १० ५० १० २०० ३०० १०० ८ ७० ९ १ ५० ३००
१० २० ८०० १० ३०० १० २०० ००५११७२५४३६७२

ऑक्सफोर्ड विद्यापीठातील एका नामवंत प्राध्यापकाचा खून झाला आहे; पण ही आत्महत्या आहे, असं तपास अधिकारी सांगताहेत.

तपास अधिकाऱ्यांच्या या म्हणण्यावर – विशेषत: मृत्यूने गाठण्याआधीच्या काही तासांदरम्यान प्राध्यापकांनी सांकेतिक भाषेत तिला पाठवलेला संदेश आणि अतिप्राचीन काळातले काही अत्यंत मौल्यवान नकाशे मिळाल्यानंतर – सुंदर, तरुण आणि विद्वान प्राध्यापिका कॅथरीन डोनोव्हान अजिबात विश्वास ठेवायला तयार नाही.

पौराणिक वाङ्मय-विषयात तज्ज्ञ असलेल्या प्राध्यापक जेम्स रुदरफोर्डच्या साथीने सुरू झालेला हा सत्यशोध त्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठ नावाच्या स्वप्ननगरीतून खेचून नेत पेरू आणि इजिप्तमधल्या ऐतिहासिक, प्राचीन वास्तूंची सफर घडवतो.

त्यांचा हा शोध-प्रवास पूर्णत्वास जाऊ न देण्यासाठी काय वाट्टेल ते करायला तयार असलेल्या एका महाभयंकर, दुष्ट यंत्रणेच्या मारेकऱ्यांनी त्यांना गाठून त्यांची शिकार करण्यापूर्वी आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलेले ते रहस्य उलगडण्यात कॅथरीन आणि जेम्स यशस्वी होतील का?

त्या दोघांच्या जिवाला निर्माण झालेल्या धोक्यापेक्षाही – संपूर्ण जगावरच कोसळण्याची शक्यता असलेल्या प्रलयंकारी निसर्गापत्तीबद्दलचे – त्या सांकेतिक संदेशातून देण्यात आलेले धोक्याचे इशारे खरे असतील का?

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## 'चिकन सूप' मालिका

**मूळ लेखक -** जॅक कॅनफिल्ड / मार्क व्हिक्टर हॅन्सन / जेनिफर रीड हॉर्थोर्न / मार्सी शिमॉफ/ मार्टीन रूट / मायदा रॉजरसन/ टीम क्लूस / किम्बर्ली किर्बर्जर

**चिकन सूप फॉर द सोल**
अनु. उषा महाजन
१६०/-

**चिकन सूप फॉर द सोल -** भाग २
अनु. प्रज्ञा ओक
२००/-

**चिकन सूप फॉर द सोल -** भाग ३
अनु. उषा महाजन
२००/-

**चिकन सूप फॉर द वुमन्स सोल**
अनु. श्यामला घारपुरे
१६०/-

**चिकन सूप फॉर द सोल ॲट वर्क**
अनु. श्यामला घारपुरे
१६०/-

**चिकन सूप फॉर द मदर्स सोल**
अनु. सुप्रिया वकील
२००/-

**चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल**
अनु. सुनीति काणे
२५०/-

**चिकन सूप फॉर द टीनएज सोल**
अनु. सुप्रिया वकील
१६०/-

**चिकन सूप फॉर द कपल्स सोल**
अनु. अवंती महाजन
१६०/-

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज २५रु.**

**नवे कोरे**

# केक्स

**अपर्णा परचुरे**




**१५०रु. पोस्टेज २५रु.**

परमेश्वराकडे माणसं बनवण्याचा साचा नाही. तो प्रत्येक माणूस वेगळा बनवतो. त्यासाठी तो कशात कायकाय घालतो हे त्यालाच माहीत (देवाच्या बाबतीत 'देवालाच माहीत' कसं म्हणणार म्हणून) माझ्या बहिणीकडे केक बनवायचा कुठलाही साचा नाहीये. ती प्रत्येक केक वेगळा बनवते. त्यासाठी ती कशात कायकाय घालते ते तिचं तिलाच माहीत (इथे मात्र देवालाही माहीत नसणार, मग 'देवालाच माहीत' कसं म्हणणार म्हणून) ती प्रत्येक केक अक्षरश: घडवते.

मूर्तिकार एखादी मूर्ती घडवतो, चित्रकार एखादे चित्र चितारतो, मी एखादी भूमिका साकार करतो त्याप्रमाणे ते एक क्रिएशन असतं 'A Unique Creation' आणि मग ती त्यात प्राण ओतते म्हणून तिनं केलेल्या केकच्या म्हातारीच्या बुटाच्या गॅलरीत तुम्हाला हवा खात उभं राहावसं वाटतं, गार्डनच्या केकमध्ये फेरफेटका मारावासा वाटतो, कुत्र्याच्या पिल्लाला फिरवून आणावसं वाटतं. केकचं फुलपाखरू तर कधी कापूच नये, असं वाटतं आणि ह्या सगळ्या केक्ससाठी वापरलेले सर्व पदार्थ चक्क खाण्याजोगे असतात.

तुम्ही म्हणाल मी माझ्या बहिणीचं जरा जास्तच कौतुक करतोय, पण हे पुस्तक वाचा. त्यानंतर जर तुम्हीही कौतुक केलं नाहीत ना, तर मी माझं नाव बदलून तुम्ही म्हणाल ते ठेवीन, जे सध्या आहे डॉ. गिरीश रत्नाकर ओक.

- डॉ. गिरीश ओक.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# लंबक

डॉ. छाया महाजन

**आम्हाला मिसेस भगत इंग्रजी शिकवायच्या. मला एकदम आवडल्या होत्या. उंचीनं थोड्या कमी. केसांचा फ्रेंच रोल, ओठांवर लिपस्टिक, चेहऱ्यावर मृदू हसू. त्या उंच स्टेजवरून शिकवायच्या, तेव्हा मी जीव कानांत घेऊन त्यांना ऐकायची. त्यांच्याशी बोलण्यात, त्यांना निरखण्यात, त्यांचे आंग्लीय उच्चार ऐकण्यात आनंद वाटायचा. इंग्रजीचं प्रेम त्यांच्यामुळे जास्त वाटायचं.**

''घरी येऊन असं रडत बसायचं असेल, तर कॉलेज बंद!'' आई-वडिलांच्या या फर्मानावर 'कॉलेजमधून रडत रडत आलीये' अशी सहसमजुतीची टिप्पणी सोबतच्या मैत्रिणीनं केली. याचा परिणाम दोघांचा राग वाढण्यावर झाला.

''काय झालं?'' असा साधा प्रश्नही न विचारता वडील म्हणाले, ''आधी कष्ट करायचे नाहीत, मग कमी मार्क पडले म्हणून रडायचं. कॉलेजात घातलं तर रडत घरी यायचं. छान नाव कमावताय!''

त्यांचा राग त्यांच्या अपेक्षेइतके मार्क्स मी न मिळवू शकण्यावर होता. त्यांचं शिक्षण पुण्यात झालेलं. तेव्हा उत्तम गुणांवर पुढे मी पुण्यात शिकावं, ही त्यांची इच्छा. पण त्याला पहिल्याच दिवशी चूड.

''उठ आता!'' आई तुटक म्हणाली.

स्कर्ट ब्लाऊज, गळ्यात वर बांधलेल्या दोन वेण्या, रडून ओला चिकट झालेला चेहरा... त्यात आई-वडिलांनी दिलेला शाब्दिक चोप. यातून माझं ध्यान कसं दिसत असेल याची जाणीव देत आईनं फर्मावलं,

''जा आधी तोंड धुवा–''

मी लंगडत उठले.

''काय झालं?''

मी पायाकडे बोट दाखवलं. घोट्याजवळ खोल जखम झालेली. त्यावर रुमाल बांधलेला. पाय सोलून निघालेला. आई द्रवली, पण ठामपणे म्हणाली, ''तुला पुढे शिकायचंय. अशा छोट्या गोष्टींनी डगमगलीस, तर कसं निभणार? घट्ट हो. रडूबाई नाही. ज्यांना खूप काही मिळवायचं असतं, त्यांच्याच मार्गात अडथळे येतात, हे विसरू नकोस. आज झालं ते झालं. काय झालं ते मला नंतर सांग, पण पुन्हा असं मार खाऊन रडत घरी यायचं नाही, याची खूणगाठ बांध.''

**कॉलेजचा पहिला दिवस**

दहावी पास झाले. तेव्हा १०+२+३ हा आकृतिबंध शिक्षणात नव्हता. पीडी आणि पीपी एकाच शाळेत शिकणं, म्हणजे एकाच संस्थेशी संबंध. कॉलेजबद्दल एक गूढ भय होतं आणि वातावरणाबद्दल साशंकताही. घरी मित्रत्वानं आई-वडिलांकडे येणाऱ्या प्राध्यापकवर्गाबद्दल अत्यंत आदर. ते ज्ञानदानाचं काम करतात म्हणून आणि त्यांचा शैक्षणिक दर्जा खूपच उच्च आहे, ही भावना सतत मनामध्ये असल्याबद्दलही.

तरीही शाळा संपली की कॉलेजला जाणं म्हणजे दुसरीतून निश्चितपणे तिसरीत जाण्यासारखंच होतं. अधीरतेचा भाग होता तो पीपीचा. कारण त्यावर आमचं करिअर अवलंबून होतं.

कॉलेजमध्ये रॅगिंग हा प्रकार त्या वेळी नसावा. निदान मी तसं ऐकलेलं नव्हतं. होस्टेलमध्ये असेलही कदाचित. पण मुलींच्या मागे लागणं, हा नैसर्गिक प्रकार होता. आतासारखं मुलंमुली सरळ-सरळ 'हाय, हॅलो' करत नव्हते. ओळख करून घेण्यासाठीचा डायरेक्ट ॲप्रोच नव्हता. त्यामुळे फक्त नेत्रसुखदर्शनावरच मुलांना संतुष्ट राहावं लागायचं. अर्थात त्याही काळात प्रेमात पडणारी जोडपी असायचीच. धाडसी. चोरून प्रेम ते लग्न, हा प्रवासच जास्त केलेले. मुलींच्या मागे लागणे, हा भाग मात्र प्रचंड प्रमाणात होता.

सायन्सला प्रवेश घेऊन सगळ्या तरतुदी करून आयकार्ड करवून घेणे बाकी होते. ते कॉलेज सुरू झाल्यावर मिळणार होते.

नगर कॉलेज हे एकमेव कॉलेज त्या वेळी अहमदनगरमध्ये होते. कॉलेजचा परिसर मोठा. मोठमोठ्या इमारती, लॅब्ज, होस्टेल्स, सुंदर तलावात उभारलेलं चॅपल. सगळं भव्य. चॅपलजवळून जाणाऱ्या रस्त्याचं काम चाललेलं होतं. आम्ही तिघी मैत्रिणी सायकलवर होतो. रस्त्यावर मोठी गिट्टी पसरलेली होती. घरापासूनच तीर-चार टगे आमच्या मागे-मागे सायकलवर होते. गाणे, शिट्ट्या आणि कॉमेंट्स. कान किटले होते. कॉलेजमध्ये शिरल्यावर गेटपासून ते अगदी मागे होते. खडीवरून निघून जाऊ, या कल्पनेनं आम्ही बाजूने सायकली घेतल्या. मी शेवटी होते. माझ्या अगदी मागेच एका मुलाची सायकल होती. दुसऱ्या बाजूला उभ्या एका मुलाला तो हॅलो म्हणाला आणि एकदम मोठ्यांदा ओरडला,

''ए ऽ इकडे पाहायचं नाही रे, तुझी वहिनी आहे!''

त्याच्या ओरडण्यानं मी घाबरले. सायकल डळमळली आणि गिट्टीवर मी पडले. अणकुचीदार दगड पायात घुसला. थोडी पुढे ओढली गेले. त्यात पाय सोलून निघाला. वेदना आणि लाज. माझे डोळे भरून आले. आजूबाजूची प्रेक्षकमंडळी.

एकूण हा पहिला दिवस.

आईचे शब्द लक्षात राहिले. मुळूमुळू रडण्याचा काळ मागे ठेवला गेला.

कॉलेज एक. त्यामुळे खऱ्या अर्थाने कॉस्मोपॉलिटन. ख्रिश्चन मिशननं चालवलेलं. त्यामुळे त्यांची संख्या जास्त. सगळ्या जाती-धर्मांचे विद्यार्थी आणि प्राध्यापकही. काही दुरून आलेले विद्यार्थी.

पहिल्या दिवशी वर्गात पहिल्या बाकावर एक मुलगी बसलेली. तंग, शरीराला चिकटलेला वनपीस ड्रेस, उंच निमुळत्या टोकांचे बूट आणि डोक्यावर उंच केलेली वैशिष्ट्यपूर्ण केशरचना, मेकअप, लिपस्टिक– आम्ही सगळ्या स्थानिक मुली उत्सुक आणि चकितही. अगदी सारखी दिसणारी ती सावळी स्मार्ट मुलगी, एकाच वेळी आमचा आदर्श आणि जेलसी. ती नेहमी एकटी वावरे. ताठ. कुणाची गरज नसलेली. होस्टेलला होती. आमच्या होस्टेलच्या मैत्रिणी तिचे किस्से सांगणार, हे निश्चित होते. माझे विषय असलेली एक मैत्रीण होस्टेलला होती. अतिशय गरीब स्वभावाची. कन्व्हर्ट ख्रिश्चन होती. सज्जन. ती रीटा मेफेअरबद्दल सांगे. रीटाच्या प्रभावाखाली येऊन पाच-सहा मुलींनी केस कापून घेतले. तिच्यापुढे सगळ्या आम्ही 'काकू' दिसत असू. वास्तविक, चांगल्या दिसणाऱ्या बऱ्याच होत्या. पण त्या रीटापुढे 'बावळ्या' वाटत. दोन वेण्या– त्याही तेल लावलेल्या केसांच्या. स्कर्ट-ब्लाऊज (म्हणजे मॉडर्न), काही साड्याही घालत.

स्फूर्ती घेऊन मी केस कापण्याचा हट्ट धरून बसले. आईने विविध धाक घातले, पण मी ऐकेना. आमचा वाद सुरू असतानाच आमचे फॅमिली डॉक्टर आजीला तपासायला आले. वास्तविक ते मुंबईचे, मेडिकल पोस्ट ग्रॅज्युएट आणि परदेशात राहून आलेले, पण स्वत:च्या गावी प्रॅक्टिसला परतलेले. आमचे कुटुंबीय असावेत, एवढे जवळचे.

त्यांनी आमच्यातला ताण जाणला. कारण विचारलं. मला बसवलं. त्यांच्या परदेशी जाण्यानं ते जाणतील, हे वाटून मी कारण सांगितलं. त्यांना हसू आलं.

''नवी पिढी!'' ते पुटपुटले. मला म्हणाले,

''वेडी आहेस तू. किती लांबसडक सुंदर केस देवानं तुला दिलेत. सगळ्यांना दिलेत का? ते कापून तू काय मिळवणार? फक्त वेगळं दिसणं? त्यानं नाक, डोळे बदलतील का? तुझ्या बुद्धीत बदल होईल? तू जास्त ज्ञानी, जास्त हुशार होशील? तुझ्या जास्त लक्षात राहील? तू किती बदलशील? तुझ्या चालण्या-बोलण्यात आणि मुख्य आत्मविश्वासात फरक पडेल?''

माझी नकारार्थी मान हलत होती.

''आपली संस्कृती आपण जपली, तर आपण मागासलेले ठरतो का? नाही. उलट, परदेशात मला वाटत राहायचं की, आपण आपली संस्कृती जपायला हवी. वेगळं दिसण्यासाठी वेगळं कर्तृत्व करून दाखवावं. तुला डॉक्टर व्हायचंय ना? मग केस कापल्यानं किंवा दोन मोठ्या वेण्या असण्यानं अभ्यासात फरक होतो? दिसणं महत्त्वाचं नाही; असणं आहे.''

मला पटलं. इतकं, की पोदार मेडिकलला गेल्यावर कुणीतरी सुचवलं की, मी शाळकरी दिसते. परिणाम फक्त– दोनची एक वेणी झाली, इतकाच.

आजही राहणीमानावरून बुद्धिमत्ता, कर्तृत्व याचा अंदाज बांधण्याची आणि त्यावरून पुरोगामी वा मॉडर्न किंवा मागासलेले ठरवणाऱ्यांची मला कीव येते.

तरीही आधुनिकतेचं खूळ मला राहिलंच. एक आणखी प्रयत्न झाला. अर्थात तो माझ्या टेलरमुळे. सरोश टॉकिज भागात खोजे, ख्रिश्चन वस्ती होती. हा टेलर खरं तर परदेशातच जायचा. ब्रिटिशांचे कपडे - मडमांचे कपडे त्याच्या पूर्वजांनी शिवलेले. अनेक अत्याधुनिक मासिकं आणि टेलरिंगची पुस्तकं त्याच्याजवळ असायची. त्याच्याचकडे कपडे शिवले जायचे. मला निरनिराळे फ्रॉक्स आणि स्कर्ट-ब्लाऊज तो सुचवायचा. त्यात टाइट पँटची फॅशन आली. त्याने खूप आग्रह केला की, मला ते सूट होईल. वडिलांच्या परोक्ष मी पँट आणि टॉप शिवून घेतला. पांढरी कॉड्रा पँट आणि फिका निळा टॉप. आईसुद्धा माझ्या रूपानं सुखावली, पण हे घालायचं कुठे?

दुपारी कॉलेजला गर्दी कमी. फक्त सायन्स फॅकल्टी. मी आणि मैत्रीण धाडसानं या कपड्यात गेलो. अर्थातच प्रेक्षक अत्यल्प. मग आम्ही आमच्या फिजिक्स लॅबला गेलो. आम्हाला पाहताच लॅबचा प्यून आणि असिस्टंट आश्चर्यानं पाहू लागले. आम्हाला अपेक्षित होतंच. पण कसे काय की, डेमॉन्स्ट्रेटर सर आणि आमचे प्राध्यापक तिथे आले. हे माझ्या कुटुंबाला ओळखणारे. त्यांचेही चेहरे बदलले. आम्ही प्रचंड संकोचून गेलो. काय बोलावं; कळेना.

''काय पाहिजे?''

या प्रश्नावर 'जर्नल विसरलो होतो' हे कमकुवत कारण मैत्रिणीनं पुढे केले.

विलक्षण ताणात, अत्यंत संकोचात आम्ही बाहेर पडलो. एकच ठरवून– ज्या वेशात आपल्याला मोकळेपणी स्वत्वानं वागता येत नाही, ते न घालणं बरं, असं तीव्रतेनं वाटलं. तरीही आधुनिक राहणीमानाचं आकर्षण सुटलं नाही. त्याचं कारण आमचा रमण टेलर. त्यानं शिवलेला ड्रेस घातला का नाही, असं विचारलं, तेव्हा त्याला हा किस्सा मी सांगितला. तो गुजराती-कच्छी, कधी तरी महाराष्ट्रात येऊन स्थिरावलेला अन् फॅशन आणि क्लायंटपायी मुंबईच्या संपर्कात. मला म्हणाला,



''घालायचा नाही तर शिवायचा कशाला? आणि तुम्ही काई नवीन केला तर लोकांना सरप्राईज होणारच. त्यांना तुमाला त्या ड्रेसात पहायची सवय नसती. आपणच त्यांचा संकोच तोडायचा. मात्र धाडस लागणार, हां!''

साधारण दोन महिन्यांत मुलींच्या चांगल्या ओळखी झाल्या. त्याचं कारण पुस्तकं, नोट्सची देवाण-घेवाण. बुडलेली आणि बुडवलेली प्रॅक्टिकल्स, त्यामुळे पूर्ण करायची जर्नल्स आणि बोअर झालेल्या लेक्चर्सना कॉमेंट्स एकमेकींना वहीच्या मागच्या पानावर लिहून सरकवणे– हे करताना साळसूद चेहऱ्यांनी एकाग्र असल्यासारखे प्राध्यापकांकडे पाहणे आणि नंतर बेंचमध्ये तोंड लपवून खुदखुदत हसणे.

त्रिभुवन म्हणून माझी अगदी जिवलग मैत्रीण झाली. राहायला आम्ही अगदी जवळ होतो. तिच्याबरोबर मी चॅपलमध्ये दोन-तीन वेळा गेले. एकदा तिने रविवारच्या प्रेअरसाठी आमंत्रण दिले. त्या वेळी बहुसंख्य ख्रिश्चन्स तिथे जमत. चर्च प्रोटेस्टंट होते. स्वच्छ परिसर, चकचकीत पॉलिशचे बेंचेस, त्यावर ठेवलेल्या बायबलची प्रत, पवित्र हिम्स. समोर मोठा लाकडी क्रूस. त्यासमोर चकचकीत तांब्याच्या घंगाळात ठेवलेली सुंदर फुलं. सगळं वातावरण प्रसन्न. हसरे लोक. मग पियानोवर संगीत. छोटी-छोटी पांढऱ्या शुभ्र गाऊनमधली मुलं. मागून गंभीर चेहऱ्याचे पाद्री. न कळणाऱ्या संगीतात गुंफलेली देवाची स्तुती.

मला हे फार आवडलं. आपल्या धर्माबद्दल अप्रीती नसली तरी या धर्माबद्दल मला विलक्षण उत्सुकता वाटली. त्या पाद्रींशी बोलल्यावर त्यांनी मला ओल्ड आणि न्यू टेस्टामेंट हे दोन ग्रंथ वाचावेत, असा सल्ला दिला. मी त्वरित ओल्ड टेस्टामेंट मिळवलं आणि हावऱ्यासारखं वाचलं. मॅट्रिक पास माझ्या बुद्धीला ते किती पचलं, माहिती नाही; पण महाभारतात अशा एकात एक गुंफलेल्या कथा आहेत तसं जाणवत राहिलं. रूढी पाळण्यासंबंधी हिंदू पुढे आहेत. दोन्ही धर्म सारखे असले तरी रूढींची संख्या आपल्यात जास्त आहे. धर्माचा माझा सखोल अभ्यास नव्हता तरी त्याविषयीचे लेख दिसले तर वाचणं सुरू झालं. लहानपणापासून आजी-लोकांबरोबर घरात साजऱ्या होणाऱ्या कितीतरी गोष्टी परंपरेने केल्या गेल्या होत्याच; त्यांचा नव्यानं शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार सुरू झाला आणि तुलनात्मकही.

सुंदर हिरवीगार बेलाची पानं, मंगळागौरींना जमवलेली विविध आकारांची आणि रंगांची पानं, सुगंधानं भरलेली किंवा रंगानं भारलेली विविध फुलं ही पूजेची होती. सजावटीची होती. ती आता विच्छेदित होऊन कॅलिक्स, करोलात वाटली जात होती. तसं सणांचं; मग तो कोणाचाही असो. घराशेजारी पारशी समाजाची अग्यारी

होती. तिथे इतरांना प्रवेश नव्हता, पण मागे राहणारे कुटुंब ओळखीचे होते. त्यांच्याकडून माहिती मिळवत गेले. हे सगळं एक परिवर्तन होतं. आपल्याला इतरांपेक्षा खूपच ज्ञान असल्याचा (फुसका) गर्व होता.

यातूनच नंतर रामकृष्ण मिशननं काढलेली विवेकानंदांची एकवीस पुस्तकं वाचली, तेव्हा तर बहुधा स्वत:ला मी परमेश्वराच्या सगळ्यात जवळ पोचल्याचा आनंदही झाला होता. वास्तविक, त्यांच्या तत्त्वज्ञानातलं मला कितपत कळलं होतं, देवच जाणे!

माझ्या चर्चला जाण्यानं घरातले धास्तावले होते. विशेषत: माई. माझ्या वडिलांची आई. ती धार्मिक होती. सोवळी होती. मला जवळ बसवून एकदा ती म्हणाली,

''कुंकू का लावत नाहीस गं?''

''मला अजिबात आवडत नाही.''

''त्यात आवडायचं काय असतं?''

''मला काहीच आवडत नाही. तुमचे सणवार, व्रतं, सत्यनारायण...''

''पण पुरणाची पोळी, साबुदाण्याची खिचडी, पायस कसं आवडतं? तेही खाऊ नये. उगाच नवी फॅड काढता. जुनं ते सोनं. प्रत्येक जण आपला धर्म जपतो; मग तुम्हाला का लाज वाटते? आणि परीक्षेच्या वेळी तो न आवडणारा देव कसा आठवतो? एकजात सगळ्या देवांच्या पाया पडता....''

''पण त्यांचं चर्च सुंदर आहे. हळदीकुंकू, नारळ असलं काही नाही. तू चल, मी तुला घेऊन जाते.'' मी तिला चिडवीत म्हणाले.

''अर्ध्या हळकुंडाचा प्रकार– शिवाय सगळ्या रूढींना काही पर्याय आहे का तुमच्याकडे? असेल तर बंद करतो आम्ही.'' ती म्हणाली. कशाचाही आग्रह धरला नाही असं जरी दाखवलं तरी मधूनच म्हणायची, ''बदलायचंय म्हणून नाही बदलू. कळून घेऊन मग बदला. त्या देवळात जाते, हरकत नाही. श्रद्धा तर तीच की गं; ती तर बदलत नाही! मनही बदलत नाही. देवही तोच असतो.''

मला तिचा जाम राग यायचा. तिच्याशी वाद घालत राहायची. तिला चिकार मागासलेली वगैरेही चिडवायची, पण न बदलणाऱ्या श्रद्धेबद्दल केव्हातरी पटून गेलं.

तिचा देव मला नको होता, कारण शास्त्रं निर्माण होत होती. विज्ञान प्रगत होत होतं. रूढी-परंपरा बुरसटलेल्या वाटत होत्या. पण आयुष्य अनुभवांनी भरून गेलं, तसा तो देव अनेक वेळेला मानसिक आधार देऊन गेला.

तो सायकॉलॉजिकल डिपेंडन्स आहे, हे कळूनही ती सुरक्षितता मान्य केली. अनेक अडचणी, मानसिक वादळं, झंझावाती घटनांतून त्या अदृश्य आधारानं दोन पावलांवर ताठ उभं राहण्याची क्षमता दिली.

कोणतीही स्पर्धा असो - वक्तृत्वापासून रांगोळीपर्यंत– आईच्या मते, आम्ही त्यात भाग घ्यायलाच हवा. याचा मला मनस्वी राग येई. मी कथक शिकत होते, पण कॉलेजला आल्यावर ते सोडून द्यायचं मनात होतं. त्याचं कारण नृत्य म्हणजे व्यासपीठ. व्यासपीठ म्हणजे प्रेक्षक आणि नाव माहिती होणं आणि त्यातून मागे लागणाऱ्यांची वाढणारी संख्या. त्याचा वैताग म्हणून नाच नकोच.

पण सत्तेचाळिसावं साहित्य संमेलन नगरला होणार होतं आणि सरस्वती वंदना मी करावी, अशी सूचना आली. अर्थातच घरात हे मान्य झालं. पण एकूणच कॉलेजमध्ये आल्यावर आपण वयानं मोठे झालोत, आता शाळकरी नाच नकोत; हाही भाग मुलांच्या मागे लागण्याशिवाय होताच.

आता नृत्यादी कलांना समाजात स्थानही आहे आणि त्याला प्रोत्साहनही मिळतंय. नगरसारख्या लहान शहरात आम्ही कथक शिकणाऱ्या तीन जणी होतो. मग डॉ. रानडेंची मुलगी नंदिनी असेल तरच मी करीन, ही अट मी घातली. नंदू माझ्या पुढे होती कॉलेजला. पुढे तो नृत्याविष्कार झाला. पण आम्ही दोघींनी प्रॅक्टिस करताना धमाल केली आणि चांगल्या मैत्रिणी होतो. पुढे घट्ट मैत्रीही झाली.

तेच नाटकांच्या बाबतीत.

त्या वेळी 'यूथ फेस्टिव्हल' ह्या नावाखाली नसलं तरी इंटरकॉलिजिएटमध्ये एकांकिका स्पर्धा व्हायच्या. सदाशिव अमरापूरकर हा माझ्या नात्यातला. त्याला रंगमंच अंगणासारखा वाटायचा. त्याचा वावर अगदी सहज. त्याच्याबरोबर एकांकिकेत मी होते. त्याच सुमारास तो नाजूक आणि सुंदर दिसणाऱ्या सुनंदाच्या प्रेमात पडलेला होता. तो, खरे (हा दिग्दर्शक), आम्ही सगळेच सारख्या टवाळ्या करीत हसत राहायचो. एकांकिका आणि प्रॅक्टिस हा एक आनंदाचा भाग होता. पुढे सदाशिव– याला आम्ही बंड्या म्हणायचो– मोठा कलावंत म्हणून पुढे आला. त्याने सिनेसृष्टी गाजवली. त्याचा रंगमंचावरचा सहज वावर मला खूप काही शिकवून गेला. पुढे पोद्दार मेडिकलला इंटरमेडिकल कॉलिजिएटच्या एकांकिकेत मुंबईला मी काम केलं, तेव्हा मोठ्या गावाचा ताण मला अजिबात नव्हता.

सुनंदानं तिच्या कवितेत त्याला 'विठोबाच्या बुक्क्यासारख्या' रंगाची उपमा दिलेली मी आजही विसरलेली नाही. प्रेमात पडणं वगैरे हा भाग विस्मयजनक होता आणि त्याची 'इन एव्हिलिबिलिटी' तेव्हाच पटायला सुरुवात झाली होती. फ्रॉइडची गरजही वाटली नव्हती. नैसर्गिक गोष्टींना तात्त्विक भागात नेऊन ठेवलं जातं, हे गावीही नव्हतं.

आम्हाला मिसेस भगत इंग्रजी शिकवायच्या. कॉलेजचे फाऊंडर श्री. बार्नबस यांच्या कन्या. मला एकदम आवडल्या होत्या. उंचीनं थोड्या कमी. केसांचा फ्रेंच रोल, ओठांवर लिपस्टिक,

चेहऱ्यावर मृदू हसू. त्या उंच स्टेजवरून शिकवायच्या, तेव्हा मी जीव कानांत घेऊन त्यांना ऐकायची. उगाचच शंका काढून तासानंतर भेटायची. त्यांच्याजवळ जाऊन बोलण्यात, त्यांना निरखण्यात, त्यांचे आंग्लीय उच्चार ऐकण्यात आनंद वाटायचा. इंग्रजीचं प्रेम त्यांच्यामुळे जास्त वाटायचं.

पण पहिल्या टर्मच्या शेवटी त्या बहुधा अमेरिकेला गेल्या. त्या शिकवणार नाहीत, या कल्पनेनं आम्ही खट्टू झालो आणि प्रा. मधुकर तोरडमल आम्हाला इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून आले. छपरी मिशा, सरळ नाक, काहीसा चौकोनी चेहरा. थोड्या काळात आम्हाला ते चांगले वाटले; पण आम्ही खरे प्रभावित झालो ते त्यांच्या नाटकांमुळे. 'सैनिक नावाचा माणूस' हे नाटक गॅदरिंगमध्ये झालं आणि 'काळं बेट लालबत्ती'ही. पुढे ते व्यावसायिक रंगभूमीवर आले; पण त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात नगर कॉलेजमध्ये झाली. वडिलांचे मित्र होते मधुकर देशमुख. ते सुंदर अभिनय करायचे. विशेषत विनोदी. तेही अनेक नाटकांत काम करायचे. पुढे दोघे आमच्या घरी आले. लग्नानंतर तोरडमलांचं एक नाटक औरंगाबादला होतं. आम्ही बघायला गेलो. हे माझे शिक्षक होते, असं मी हळूच भवानला बोलले. त्याला आश्चर्य-आनंद वाटला. मी त्यांना बॅकस्टेजवर भेटावं, असं त्यानं सुचवल्यावर आम्ही त्यांना भेटलो. त्यांना तर आनंद झालाच; पण आपलेपणाच्या पोटी ते दुसऱ्या दिवशी आमच्या घरी आले. आईची त्यांची चांगली ओळख होती. गप्पा झाल्या. आपले गुरू हे त्यांच्या विषयातच नाही तर नाट्यक्षेत्रातले अग्रणी आहेत, हे पाहून मला फार अभिमान वाटला. या क्षेत्रात आपणही जावं, हे मलाही वाटलं; त्यांनीही सुचवलं. पण एका आयुष्यात करायला खूप इच्छा, उदंड आकर्षणही अफाट. याचा मेळ बसणं अवघड, हे बऱ्याच काळानं जाणवलं. वर्ष गोगलगाईच्या गतीनं जात असती, तर कुणी सांगावं; मी अभिनेत्रीही झाले असते. तो गमतीचा काळ होता, असं आज वाटतं. मन एवढं संवेदनशील की, भेटलेली प्रत्येक व्यक्ती सावलीसारखी मनात राहायलाच आली. त्यांना माहिती नसेल इतकी जवळची झाली. मनात कुठेतरी रुतलीच.

इच्छेचा लंबक कितीतरी विरोधी परमोच्यांना शिवत झोका घेत होता! एकीकडे अत्याधुनिक रीटा, दुसरीकडे संस्कृतात प्राचीन संस्कृती शिकवणारे सर, एकीकडे मिसेस भगत आणि सौंदर्य, विचार आणि साहित्य तत्त्वप्रणाली; तर दुसरीकडे गंभीर फिजिक्ससारखा नव्या आव्हानांना पेलणारा विज्ञानयुगाचा विषय शिकवणारे जॉन बार्नबस. खेळांचं उलगडणारं जोशिलं विश्व आणि डोळ्यांतून मनात उतरवणारं नाटक, साहित्य, समाजशास्त्रासारखे आयुष्य समजावून देणारे विषय आणि डॉक्टर होण्याचं स्वप्न.

मागे पाहताना आयुष्याच्या वाटेवर कितीतरी अपेक्षांची निर्माल्यं दिसतात आणि वाटतं की, ही निर्माल्यं नाहीत, काजवे आहेत. अंधारात लुकलुकणारा त्यांचा उजेड आजही सुप्त आशेच्या रूपानं आपल्या मनात आहेच की!

**डॉ. छाया महाजन**
कल्याणी नर्सिंग होम,
न्यू समर्थ नगर, औरंगाबाद ४३१ ००१
फोन नं. - ०२४०-२३३६४९२/२३३१९१२

**मानसी**

डॉ. छाया महाजन



**१२०रु.**
**पोस्टेज २५रु.**

काय दिलं माझ्या प्रेमानं? फक्त दुःख...?
ऑसमंडच्या गाण्याचा मुखडा आहे बघ,
'लव्ह इज ओन्ली फॉर टुडे.' प्रेम फक्त आजच्यापुरतंच,
या क्षणापुरतंच असतं. ते आज जगून घे.
हे खरं असावं, पण कळलं कधी नाही.
माणसाच्या मनाचीच नाती खरी,
हे गृहीतक होतं माझं. प्रेमाबरोबर मीही एक नातं
विणायला घेतलं.
सामाजिक नात्याला झुगारून..
तरीही सामाजिक होतंच ते...
मग लक्षात आलं, की माणसाच्या मनाच्या नात्याला
तर स्थानच नाहीये
आणि किंमतही. सत्य हे की,
सामाजिक नात्यांचा शिक्का
खोलवर रुतून बसलाय आपल्या मानसिकतेत.
एखाद्या गुणसूत्रासारखा रुजलाय आपल्यात.

सध्याच्या महाविद्यालयीन
वातावरणातील मूल्यहीनतेचा सर्वंकष
आलेख काढणारी आणि अंतर्मुख
करणारी सामर्थ्यशाली कादंबरी

**कॉलेज**

डॉ. छाया महाजन



**२००रु.**
**पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# मंतरलेले दिवस

रेखा बैजल

**आयुष्यात दोन वळणं वयाच्या एकाच खंडावर येणं, हे खरं तर अवघड. एकीकडे करिअर, स्वची ओळख, कलागुण ह्याकडे धाव घेणारी ऊर्जा, अंगभूत गुणांना फुटणारे धुमारे आणि त्याच वेळी मन अन् शरीर ह्यांचं सुरू झालेलं गारूड. दहावी, बारावीचा जोरदार अभ्यास आणि एकीकडे मनात कुणा अस्पष्ट प्रतिमेची रुंजी... नकळत होणारी हुरहुर...**

ज्या मुलीचं लहानपण, नववीपर्यंतचं शिक्षण पन्नास वर्षांपूर्वीच्या मराठवाड्यातल्या दोन-तीन हजार लोकसंख्या असलेल्या खेड्यात गेलं, कंदिलाच्या प्रकाशात अभ्यास झाला, अशा एका मुलीचा मॅट्रिकनंतर महाविद्यालयात प्रवेश झाला; पण हे महाविद्यालय केवळ पुस्तकं आणि बिल्डिंगपुरतं मर्यादित नव्हतं. सगळं आयुष्य, जगच महाविद्यालय होण्याचे हे दिवस. निर्व्याज बालमनावर आपोआपच जीवनाची, निसर्गाची, नातेसंबंधांची अक्षरं उमटली होती आणि आता या वयात त्या अक्षरांवर विचार करण्याची, प्रतिक्रियास्वरूप वागायची वेळ येऊन ठेपली होती.

मामाची सायकल आईनं शाळेसाठी वापरली, नंतर तीच सायकल मनात काहीही उणेपणा न येता मी मॅट्रिकपर्यंत वापरली. पण आता आपल्याला 'नवीन' सायकल हवी, ही जाणीव मनाला झाली. हे नवेपण वस्तूतलं वगैरे नव्हतं; हे नवेपण माझंच माझ्यातलं होतं

जन्मताना मुलगी म्हणून जन्मले, पण हे मुलगीपण सप्रेंच्या घरी कधी जाणवलं नाही. बाबांना तर बहिश्चर प्राण असावा एवढं कौतुक होतं. पण माझ्या जाणिवेत मी मुलगी म्हणून पुन्हा आता... मॅट्रिकमधे... जन्मले.

खेड्यात राहून खेडवळपण, भाबडेपण, भोळसटपण आणि न्यूनगंडानं अबोलपण (एकदम सोलापूरसारख्या शहरात आल्यानं) असं व्यक्तिमत्त्व घडलं होतं. आपल्याला निसर्गानं काय काय ठेवे दिले आहेत, ते माहिती नव्हतं.

नाही कसं म्हणू?... निसर्गशक्तीनं गळ्यावरून, स्वरयंत्राच्या तारांवरून फिरवलेलं मोरपीस लहानपणापासून माझ्या जाणिवेत होतं. मी म्हणजे गाणं म्हणणारी सप्रेंची मुलगी, ही माझी ओळख होती. कुणीही यायचं, 'रेखा, गाणं म्हण ना!' म्हटलं की, माझा गळ्यातला रेडिओ सुरू व्हायचा. त्या लहान वयात मदनमोहन यांची गाणी मी आळवायचे. तलत मेहमूदचा आवाज काढू पाहायचे, मन्ना डेंचे शुद्ध सूर गळ्यात बसवू पाहायचे. आधी नुसते सूर आणि शब्द गायचे. मन जाणतं झालं तशी सूरांबरोबर भावनाही आळवू लागले.

'रसिक बलमा' म्हणताना 'मा'वर येणारे लतादीदींचं आर्तपण माझ्याही गळ्यात येऊ लागलं. 'जीवलगा ऽऽ राहिले रे दूर घर माझे' म्हणताना आलापी, शास्त्रोक्त ढंगातसुद्धा व्यापून उरलेलं आर्तपण पकडू लागले.

नववी-दहावीतच गाणं म्हणजे परमेश्वरानं मला दिलेला ठेवा आहे, हे समजू लागलं.

सोलापूरमध्ये 'जीवलगा' म्हटल्यावर मिळालेली पारितोषिकं आठवतात. हळूहळू आपण 'स्पेशल' आहोत, हे जाणवू लागलं. हे 'स्पेशल' असणं 'निसर्गाचं देणं'. त्या चैतन्याची फिरलेली गळ्यावरची बोटं. हळूहळू चैतन्याची बोटं आपल्या बोटांवरून फिरली आहेत, हेदेखील जाणवायला लागलं. एका विशिष्ट वयात कविता प्रत्येक-जण करतं. पण मी कॉलेजमध्ये जायच्या आधीपासून लहान कविता लिहू लागले. फारसं अनुभवविश्व नसलेल्या कवितांचा आवाका तेवढाच होता, पण अनुभवविश्व वाढत होतं, वाचनातून.

त्या वेळी दूरदर्शन नव्हतं. चित्रपट पाहणं फारसं आवडायचं नाही. मग काय, पुस्तकाचं पान उघडायचं... एका विश्वाचं दारच ते... त्या विश्वात प्रवेश करायचा आणि रमायचं. सुरात आणि शब्दांत रमल्यानं व्यवहारात रमले नाही. शाळेच्या दुकानात पुस्तकं विकत मिळायची. सोबत वर्गातल्या दोन-चार मुली मला पुस्तक खरेदीच्या वेळी मदत म्हणून यायच्या. पुढे त्या मुली मैत्रिणी झाल्यावर, 'रेखा, त्या वेळी तुझ्या हिशोबातून आम्ही पाच रुपये मारले होते,' अशी कबुली दिली गेली. पाच रुपये... बापरे! किती पैसे! तेव्हाचे ते पैसे खूपच होते.

मॅट्रिकमधून कॉलेजमध्ये यायचं वय... एका उंबरठ्यावर उभं असलेलं. स्वची जाणीव, क्षमतांची जाणीव आणि दुसरीकडे शरीरमनात जगणारा निसर्ग. मैत्रिणींच्या माफक गप्पा. त्यातून आकार घेऊ पाहणारं, हुरहूर लावणारं एक पुसट चित्र– एका पुरुषाचं.

त्या वेळी मुलगी-मुलगा असे दोन पक्के विभागच होते.

मित्र ही संकल्पना या १५-२० वर्षांतली. त्या वेळी पुरुषवर्गातली नाती म्हणजे वडील, भाऊ आणि प्रियकर.

आयुष्यात दोन वळणं वयाच्या एकाच खंडावर (स्पॅन) यावीत, हे खरं तर अवघड. एकीकडे करिअर, स्वची ओळख, कलागुण ह्याकडे धाव घेणारी ऊर्जा, अंगभूत गुणांना फुटणारे धुमारे आणि त्याच वेळी मन अन् शरीर ह्यांचं सुरू झालेलं गारूड. हे सगळ्यांचंच होतं. दहावी, बारावीचा जोरदार अभ्यास आणि एकीकडे मनात कुणा अस्पष्ट प्रतिमेची रुंजी... नकळत होणारी हुरहुर... एकीकडे आदर्श, एकीकडे स्वप्नं...

माझे आदर्श माझे वडील श्री. दि. श्री. सप्रे. एक प्रामाणिक, शेतकऱ्यांविषयी तळमळ बाळगणारे, अत्यंत झोकून देऊन काम करणारे शेतकी अधिकारी. देवपूजा, जातिभेद न मानणारे, मात्र रोज गीता वाचणारे. विचारांच्या शुद्धतेवर भर देणारे. शांत, अबोल, छक्केपंजे न जाणणारे असे देवमाणूस. माझ्या आयुष्यातला पहिला मित्र मला माझ्या घरातच भेटला. माझे वडील... माझा मित्र. किती विषयांवर गप्पा व्हायच्या. बुद्धीच्या किती वाटा ते शोधून द्यायचे. जेवताना, जेवण संपल्यावर हात वाळेपर्यंत त्या चर्चा चालायच्या. अबोल स्वभावामुळे बाबांनाही मित्र नव्हते. आज विचार केल्यावर जाणवतं... त्यांनाही मैत्रीची, मन मोकळं करायची गरज होती. बाबांच्या मैत्रीनं मला प्रगल्भपण दिलं. सामाजिक जाणीव दिली. अंतर्मुख, घुमी असणारी मी बाबांसोबत खुलायचे. रोज सकाळी रियाजासाठी बाबा तंबोरा आणून हातात द्यायचे. चित्र काढावं वाटलं की कॅनव्हास आणून द्यायचे, लिहावं वाटलं की चर्चा करायचे.

जॅक ऑफ ऑल आर्ट्स असं ते वय होतं. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' अशी अनेक विषयांत रमत होते.

त्याच वेळी अंतरीची प्रतिमा मला हाकारत होती. एखाद्या व्यक्तीला पाहून... असा असेल?... की तसा असेल?



मनातल्या अनेक प्रतिमांमधून एक चेहरा हळूहळू उभरून वर आला.

वय सतरा. फर्स्ट इयरला मी. जालन्याला कॉलेजात. मी आणि माझी मैत्रीण प्लँचेट करत होतो. मी जालन्यात नवीन

होते. कुणाची माहिती नव्हती.

मैत्रिणीनं यौवनसुलभ प्रश्न केला–

''रेखाचं लग्न कुणाशी होणार?''

''BAIJAL'' प्लँचेटवर उत्तर. बैजल हे आडनाव कधी आयुष्यात ऐकलं नव्हतं.

म्हटलं ''हे काय गं, बी ए आय जे ए एल?''

''अगं, ह्या नावाचा मुलगा आहे.'' –लीना.

''हं...'' मी फारसा इंटरेस्ट घेतला नाही.

मग एक दिवस गाण्याच्या क्लासला जाताना एक उंचापुरा, धारदार नाकाचा स्मार्ट मुलगा क्रॉस झाला. मी सायकलवर, तो स्कूटरवर. सोबत लीना होतीच.

''अगं, हाच बैजल!''

मी ताडकन उडाले.

''हा? एवढा हँडसम! छे, ते प्लँचेट चुकीचं असणार! आणि बैजल म्हणजे कोण गं?''

''पंजाबी.'' –लीना.

''हं, दिसतोच तसा.''

गाण्याच्या निमित्तानं नंतर शिवकुमारांशी ओळख झाली. १७व्या वर्षी.

त्यांचा विनोदी आणि गप्पिष्ट स्वभाव... हसतमुख, आनंदी. खूप छान मैत्री झाली आमची.

तेवढ्या दीड वर्षात बाबांची बदली नगरला. आणि शेवटच्या महिन्यात आमच्यातल्या मैत्रीला प्रेमाचाही साक्षात्कार झाला.

मित्रच प्रियकर आणि नंतर पती झाला. ते मंतरलेले दिवस होते. नगरला सेकंड इयर, थर्ड इयर झालं; पण मनात सतत प्रेम. लग्न होईल की नाही, ही चिंता. बैजलांच्या घरून, जुन्या वळणाच्या त्यांच्या नातेवाइकांकडून चाललेला विरोध. केवढा आंतरिक संघर्ष होता तो! ज्याच्याशिवाय जगू शकणार नाही असं वाटतं, ती व्यक्ती आपली होणार की नाही; ह्या ताणात ती दोन-तीन वर्षं काढली.

पण एकीकडे नाटकात कामं, गाणं, चित्र, अभ्यास, वादविवाद स्पर्धा आणि हो, लिखाणही सुरूच होतं.

प्रेमाचा षड्ज लावून मी कॉलेजची तीन वर्षं जगले. हो. जगले, उत्कटपणे जगले.

प्रत्यक्षात अबोल असलेली मी स्टेजवर गेले, की वेगळीच होऊन जायचे. जबरदस्त आत्मविश्वास, नैसर्गिक क्षमता आणि भावनिक उत्कटपण मजजवळ होतं.

गाणं हा माझा श्वास होता.

आजही वाटतं की, गाण्याएवढी विशुद्ध कला दुसरी नाही. तंबोऱ्यावर षड्ज छेडायचा. डोळे मिटून कान लावायचा. तो षड्ज कधी ॐकार होतो, हे कळतच नाही.

खेड्यातल्या मुलीला शहरीकरणात सावरायला वर्ष-दीड वर्ष तरी लागलं. पण सगळ्यांमध्ये मला न्यूनगंड जाणवायचा. आपण खेडवळ, असं वाटायचं आणि मग धडपडत ड्रास्टिक चेंज घडवून आणला.

बाह्य रूपात आणि अंतरातही. खरं तर न्यूनगंडातून सावरलं गाण्यानंच. गाणं म्हटलं की, लोक आश्चर्यानं ऐकत राहायचे. सोलापूरच्या पार्क मैदानावर गाण्याच्या स्पर्धेत गाणं म्हटलं... वन्स मोअर झालं... दुसऱ्यांदा म्हटलं... पण वन्स मोअर थांबेना. दुसऱ्या कुणाला ऐकून घ्यायला लोक तयारच नव्हते. शेवटी संयोजकांना कार्यक्रम बंद करावा लागला.

अजूनही आठवतं... डोळ्यांपुढे चित्र उभं राहतं... नगरला पंधरा ऑगस्टला परेडच्या वेळी सर्व मुलं, प्राध्यापक, प्रिन्सिपॉल विश्राममध्ये उभे आणि मी 'ऐ मेरे वतन के लोगों' गायलं. परेड संपल्यावर प्रिन्सिपॉलनी स्टाफरूममध्ये बोलावलं. सर्व प्राध्यापक, प्राचार्य एकत्र जमलेले. माझ्यासोबत माझी जीवश्च-कंठश्च मैत्रीण सुषमा (लाखे-चौसाळकर). तो कौतुकाचा वर्षाव! माझा कापणारा हात सुषमानं गच्च धरलेला.

मनातला आनंद... सार्थक!

आजही सुषमानं तो धरलेला मैत्रीचा हात सोडला नाही.

ते प्रसंग आजही जसेच्या तसे आठवतात. तेच लीनाचंही.

माझ्यातला न्यूनगंड पुसत गेला तो अशाच क्षणांमुळे. हे सगळं करून म्हणजे प्रेम, गाणं, नाटक, स्पर्धा... मला नेहमी हायर सेकंड क्लास असायचा. ४० वर्षांपूर्वी आजसारखा मार्कांचा वर्षाव नसायचा. मेरिटमध्ये आल्यासारखा फर्स्ट क्लास असायचा. साठ टक्क्यांना मेडिकलला प्रवेश मिळायचा. हायर सेकंड क्लास म्हणजे हुशार म्हटलं जायचं.

आज विचार करते, हुशारी म्हणजे काय? आपल्याला गणित कधीच जमलं नाही. तेरा, सतरा, तेवीस, सत्तावीसचे पाढे अंगावर काटे आणायचे. पावकी, निमकी तर दूरच. फक्त दहा आणि वीसचा पाढा आवडायचा. बाकी गणित माझ्याकडे सतत डोळे वटारूनच पाहायचं. विज्ञान, भाषांच्या शिक्षकांची मी आवडती विद्यार्थिनी असायचे आणि गणिताच्या शिक्षकांची नावडती. ह्या गणितानं डिप्रेशन काय कमी दिलं? मेडिकलला जायची इच्छा, पण त्या वेळी पी.सी.बी. आणि पी.सी.एम. असे ग्रुप नव्हते आणि सायन्स साईडला जायचं म्हणजे पी.सी.बी.एम.– तेही हायर मॅथ्स घ्यावंच लागायचं. पहिल्या वर्षी कसंबसं धापा टाकत सहा महिने सायन्स साईडला गेले. पण ते कोशंट, लॉग टेबल, ट्रिग्नॉमेंट्री वगैरे पहारेकऱ्यासारखे मेडिकलच्या बाहेर बसलेले होते. जेवढा मी प्रयत्न करायचे, त्याहून त्यांचं गौप्यतेचं सामर्थ्य माझ्यासाठी अधिक जोरदार होतं. मी त्या ज्ञानाची गोपनीयता दूर करू शकले नाही आणि सहा महिन्यांनी कला शाखेत दाखल झाले.

आज विज्ञान शाखेच्या काही मुली आठवतात, ज्या आता

माझ्यासारख्याच प्रौढ, आजी वगैरे झाल्या असतील. ती पटवर्धन काय करत असेल बरं? ती पाटील?... मी मनात विचार करते आणि मग आरोळी ठोकून त्यांना कळवावंसं वाटतं, 'अगं मैत्रिणींनो, तेव्हाची रेखा सप्रे... सहा महिन्यांत साईड बदलणारी... ती म्हणजे आजची रेखा बैजल.'

कॉलेजचं आयुष्य चार वर्षांचं, पण तो आयुष्याचा एक झगमगता काळ होता. भूतकाळात जमा झाला तरी मी त्याला भूतकाळात जमा करू इच्छित नाही. माझं आत्मिक सामर्थ्य जागं केलं त्याच विश्वानं.

बाबांची कौतुकाची थाप पाठीवर आजही आहे; पण त्या वेळी काही शिक्षकांचा... नव्हे गुरूंचा... माझ्यावर संस्कार झालाच. आजकाल पाहते, 'कॉमन ऑफ' असणं किंवा लेक्चररनी न येणं सर्रास झालं आहे. पण त्या वेळी ट्युशन, क्लास लावणं म्हणजे आपण 'ढ' असल्याची कबुली देणं असायचं. आम्ही वर्गात अक्षरश: 'ओंजळ' करून असायचो.

माझ्यातल्या विचारक्षमतेला बाबांच्या पाठोपाठ प्रोत्साहन दिलं ते जालन्यातल्या जे. ई. एस. कॉलेजमधल्या समाजशास्त्राच्या ती. बर्दापूरकरसरांनी. किती रस घेऊन शिकवावं ते सरांकडे पाहून कळायचं. आपण एम. ए. केल्यावर लेक्चरर व्हायचं ते सरांसारखं, असं वाटून जायचं.

एम.ए. केलं. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. पण प्राध्यापक होऊ शकले नाही, ही गोष्ट वेगळी.

बर्दापूरकरसर आदल्या दिवशी सामाजिक समस्येचा एक विषय घ्यायचे. जसा हुंडा, जात... दुसऱ्या दिवशी वर्गात आम्ही तीस-चाळीस मुलं सरांबरोबर त्या विषयावर अक्षरश: भांडत असायचो. सर रेफरी असायचे. सर कौतुक करायचे. माझ्यातला आत्मविश्वास वाढायचा. शिक्षक अनेक असतात, गुरू एखादाच असतो आणि तो आपल्या जाणिवेत नेहमी आसपास असतो. मन किंकर्तव्य झालं की, आपलंच मन त्या गुरूप्रमाणे विचार करतं आणि समजावतं. असंच गुरुपद आणि ज्यात थोडी मैत्रीचीही छटा होती, त्या श्रीमती लीला गोविलकर मॅडम... नगरला ज्यांनी मराठी समरसून शिकवलं होतं.

जालन्याच्या शैक्षणिक कालखंडाच्या दीड वर्षात आत्मविश्वास दृढ झाला. त्याला फुटत चाललेली शब्दांची पालवी गोविलकर मॅडमनी कौतुकानं पाहिली. ते तर पालवीचे फुटवे होते. पण कदाचित त्या फुटव्यांतून एक बरंसं झाड उभं राहणार आहे, हे त्यांनी जाणलं असावं.

एम.ए.ला ॲडमिशन घेतली आणि बैजलांकडून होकार आला. घरच्यांना शिवकुमारांनी अखेर मनवलं. मी लिहीत असतानाच, मध्यमा पूर्णची संगीत परीक्षा दिली असतानाच, 'तुझे आहे तुजपाशी' नाटकात गीताची भूमिका अजून मनातून उतरलीही नसताना कॉलेजच्या चार वर्षांचा झगमगता अध्याय संपला. सप्तपदी चालत मी शिवकुमारांच्या घरात नव्या अध्यायासाठी प्रवेश करत गेले.

जॅक ऑफ ऑल आर्ट्सची दोलायमान स्थिती आता संपणार होती. गृहिणी होत... मास्टर ऑफ समथिंगची आयडेंटिटी मला जोपासायचीच होती.

पत्नी, भाभी, बहू, माँ ही सर्व नाती मला विरघळून टाकणार होती. पण मला स्वत:ला मी म्हणून जपायचं होतं. 'स्व'च्या ओळखीसाठी झगडायचं होतं. घरात डोक्यावर पदर घेऊन वावरायचं असताना मान मोडू द्यायची नव्हती. त्यासाठी हवं होतं प्रचंड आत्मिक बळ, आत्मविश्वास.

कॉलेजच्या आणि तारुण्याच्या चार वर्षांनी जो आत्मविश्वास आणि बळ दिलं होतं, ते घेऊन मी वैवाहिक जीवनात प्रवेश केला आणि पावलं टाकू लागले होते.. टाकते आहे.

पण आजही पंधरा ते वीस वर्षांतली आपलीच रूपं डोळ्यांपुढे येतात. जीवनाच्या दुर्दम्य इच्छेनं भरलेली, आनंदी आणि उत्साह ओसंडून जाणारी. पावलं पुन्हा भूतकाळात जाऊ शकत नाहीत, हे माहिती असूनही वाटतं– परमेश्वराला विनवावं आणि पुन्हा ती चार-पाच वर्षं जगण्यासाठी मागून घ्यावीत... अगदी उरलेल्या आयुष्याच्या बदल्यात.

**रेखा बैजल**
'शब्द', आयकर कॉलनी, जालना ४३१ २०३
फोन नं. -०२४८२-२३२८३१/९८५०३४७२५२



# प्रस्थान

**रेखा बैजल**

**१५०रु. पोस्टेज २५रु.**

निश्चल उभा हिमालयही असतो. हे सुख दु:ख अंगावर चालून येतं. वादळासारखं! व्यक्तिमत्त्वाच्या चिंध्या करत, पण एक लक्षात ठेव प्रणव, समुद्री वादळात जेव्हा जहाज अडकतं आणि कॅप्टन गोंधळतो तेव्हा त्याला 'आय ऑफ स्टॉर्म' दाखवला जातो. त्या वादळाचा मध्यबिंदू म्हण. त्या मध्यबिंदूत निरव शांतता असते. अगदी आश्चर्यकारक. जहाजाला त्या 'आय ऑफ स्टॉर्म'मध्ये नेलं की जहाज सुरक्षित राहतं.
तसंच अंतर्मनात एक कोपरा एवढा निश्चल, निवांत निर्माण करावा लागतो की आयुष्यात कितीही वादळं आली तरी त्या क्षणी मनाला त्या कोपऱ्याचा आसरा घेता यायला हवा. असा कोपरा प्रयत्नानंच निर्माण करता येतो. स्वत:ला विसरून, विखरून, ध्यानात किंवा एखाद्या कामात. हे जीवनाचं रूप आहे.



# मजे मजेचे ते दिवस

डॉ. निर्मला सारडा

**बी. ए. प्रथम, द्वितीय वर्षाच्या मुली व्हरांड्यात किंवा ग्राऊंडवर मुलांशी बोलत उभ्या राहायच्या. आम्हाला फार गंमत वाटायची. त्यांचं काहीतरी लफडं असणार असं वाटायचं. आणि खरं होतं ते! दोघीतिघींची प्रेमप्रकरणं पुढे चांगलीच गाजली. आम्हाला तर घरच्यांची सक्त ताकीद, 'सरळ घरी परतायचं, मुलांशी बोलायचं नाही.'**

लातूर येथील गोदावरीदेवी लाहोटी कन्याशाळेत इ. स. १९६८ साली मी अकरावीची परीक्षा प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. मी शाळेत पहिली होते. रिझल्टच्या वेळी मी माझ्या आजोळी दौण्डला होते. लहानपणापासूनच मी अभ्यासात बऱ्यापैकी हुशार. त्यामुळे ९वीत शिकत होते तेव्हापासून डॉक्टर व्हायची स्वप्नं मी बघायची. पण माझे वडील जुन्या विचारसरणीचे होते.

सन १९७० पर्यंत लातूरचा माहेश्वरी समाज मुलींना उच्चशिक्षण देण्याच्या विरोधात होता. मला उच्च शिक्षण घ्यायचे होते पण वडील आईला म्हणाले की हिला शिकवून काय करायचंय? शेवटी चूल आणि मूल हेच तिच्या वाट्याला येणार आहे.

माझ्या खास मैत्रिणी कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणार होत्या. त्यावेळी लातूरचे दयानंद कॉलेज प्रसिद्ध होते. मी आजोळी असतानाच मैत्रिणी वडिलांकडे आल्या व माझ्या ॲडमिशनबद्दल विचारू लागल्या. शाळेतल्या १-२ बाईंनी देखील वडिलांना आग्रह केला. मग वडिलांनी मला कला शाखेत पाठवायचा निर्णय घेतला.

ते दौण्डला आले. मग आई व आम्ही भावंडं त्यांच्या बरोबर लातूरला परत आलो. मी वडिलांना म्हणाले, ''मला डॉक्टर व्हायचंय. विज्ञान शाखेत घाला मला!'' वडील म्हणाले, ''विज्ञान शाखेत मी ॲडमिशन घेऊ देणार नाही. तू डॉक्टर झालीस की डॉक्टर मुलगा शोधावा लागणार आणि आपल्या समाजात ते काम अवघड आहे.'' नाइलाजाने मी कलाशाखेत जायचे कबूल केले. माझ्या मैत्रिणी कमला असावा, शकुंतला अग्रवाल, आशा राठी, शकुंतला मुंदडा व इतर बऱ्याच जणी दयानंद कॉलेजमध्ये शिकू लागलो.

सहशिक्षणाचे ते पहिले वर्ष! आमच्या वर्गात एकूण विद्यार्थी १५०. तेव्हाचे ते पी.यू.सी. चे वर्ष. हिंदी, इंग्रजी. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र हे माझे विषय. कॉलेजमधले सर्व प्राध्यापक चांगले होते. हिंदीचा स्टाफ तर उत्तमच होता. प्रा. भूदेव पाटील, प्रा. सूर्यनारायण रणसुभे, प्रा. चंद्रभानू सोनवणे, प्रा. भुतडा सगळे उत्तर भारतातून शिकून आलेले. त्यामुळे हिंदी साहित्याचे उत्तम

जाणकार व उत्तम हिंदी बोलणारे! प्रा. भंडारी अर्थशास्त्र उत्तम शिकवायचे. कला आणि वाणिज्य शाखेचा अर्थशास्त्राचा पिरीयड एकत्र व्हायचा.

बी. ए. प्रथम, द्वितीय वर्षाच्या मुली व्हरांड्यात किंवा ग्राऊंडवर मुलांशी बोलत उभ्या राहायच्या. आम्हाला फार गंमत वाटायची. त्यांचं काहीतरी लफडं असणार असं वाटायचं. आणि खरं होतं ते! दोघीतिघींची प्रेमप्रकरणं पुढे चांगलीच गाजली. आम्हाला तर घरच्यांची सक्त ताकीद, 'सरळ घरी परतायचं, मुलांशी बोलायचं नाही.'

घरापासून कॉलेज बरंच लांब होतं. आम्ही मैत्रिणी कॉलेजला पायी जायचो. कॉलेजला पोचायला अर्धा तास लागायचा. पण आम्ही दोघी-तिघी गप्पा मारत सोबत जायचो. त्यामुळे थकवा जाणवायचा नाही.

पी. यू. सी. मधील एक घटना फार मजेशीर घडली. मी पी. यू. सी.त शिकत असताना डिसेंबर महिन्यात माझी पुण्याची आतबहीण आशा लातूरला आली होती. ती लातूरला आली की आम्ही दोघी जास्तीतजास्त वेळ सोबत असायचो. ती माझी मैत्रीणच जणू! मी दिवसभर कॉलेजमध्ये असणार म्हणून ती थोडी निराश झाली. मला म्हणाली, ''दीदी, मी तुझ्याबरोबर कॉलेजला येऊ का?''

ती खरं तर नववीत शिकणारी मुलगी. तिला कॉलेजमध्ये घेऊन जायचे म्हणजे...? माझ्यासमोर प्रश्न उभा राहिला. ती म्हणाली, ''हे बघ दीदी, कॉलेजमधल्या एवढ्या मुलामुलींमध्ये कुणाच्या ध्यानात येणार आहे? आणि आलं तर सांग ना नवीन विद्यार्थिनी आहे म्हणून !''

दुसऱ्या दिवशी आशा माझ्याबरोबर सायकल रिक्षात बसून कॉलेजला आली. माझ्या सर्व मैत्रिणींशी मी तिची ओळख करून दिली. माझ्या मैत्रिणींना आशा खूप आवडली.

आशा म्हणजे अफलातून पात्र. अतिशय बडबडी आणि दिसायला स्मार्ट. स्लीव्हलेस ब्लाऊज आणि स्कर्ट घालून कॉलेजमध्ये आली होती. माझ्याबरोबर चक्क सगळ्या पिरीयड्‌सना वर्गात बसली.

आम्ही दोघी वर्गात शिरलो. समोरून दुसऱ्या डेस्कवर बसलो. सर्व मुलामुलींच्या नजरा तिच्यावर खिळल्या होत्या. सर वर्गात आले. इंग्लिशचा पिरीयड होता. सरांनी या नवीन विद्यार्थिनीचं स्वागत केलं. सर्वांप्रमाणे आशा देखील लक्ष देऊन सर काय शिकवतात ते ऐकत होती. पीरियड संपताच ती म्हणाली, ''चल बाहेर. कँटीनमध्ये जाऊन काहीतरी खाऊ या.'' आम्ही चौघीजणी कँटिनमध्ये गेलो. गरमागरम कांदेपोहे खाल्ले व कॉफी घेतली.

मग लेडीजरूम मध्ये गेलो. तेथे देखील सगळ्या मुलींना आशा खूप आवडली. आमच्या वर्गात काही मारवाडी मुलं होती. लाहोटी, धूत, अग्रवाल वगैरे. त्या मुलांशी आशाची ओळख करुन दिली. मदन धूत नावाचा मुलगा तिला खूप आवडला. लातूरला आल्यावर ती प्रथम त्याची चौकशी करायची. पूर्वी सेल फोनचा जमाना नव्हता नाहीतर तिने धमाल केली असती.

पुढे आमच्या दोघींच्या लग्नानंतर जेव्हा जेव्हा आम्ही भेटायचो ती कॉलेजमधल्या त्या रंगीत दिवसांची आठवण काढायची व आम्ही खूप हसायचो. आमच्या लहान भावंडांना व घरातील इतर माणसांना आमचा हा दंगा म्हणजे वेडसरपणाच वाटायचा.

पहिलं वर्ष थोडं घाबरण्यात, लाजण्यातच पार पडलं. पी. यू. सी.त आमच्या बॅच मधल्या आम्ही दोघी मैत्रिणी युनिव्हर्सिटीत टॉपर होतो. अंजली दिवाण विद्यापीठात दुसरी व मी तिसरी होते.

रस्त्यात अचानक भेटलेल्या कॉलेजमधल्या शिपायाने ही गोड बातमी मला सांगितली. माझ्या वडिलांनी त्याला माझ्याशी बोलताना पाहिले. घरी आल्यावर त्यांनी मला बजावले, 'कॉलेजमध्ये जायचं असेल तर शिस्तीत वागायचं. मुलांशी बोललेलं मला खपणार नाही. आज तो शिपाई रस्त्यात काय बोलत होता?''

मी वडिलांना सांगितलं, 'खरे तर तो घरी येऊनच ही बातमी सांगणार होता. पण मी रस्त्यात भेटल्यामुळे त्याने रस्त्यात सांगितली.''

मी विद्यापीठात तिसरी आल्याचे वडिलांना काही कौतुक वाटले नाही. आईला मात्र खूप आनंद झाला. तिने काकांना सांगून पेढे मागवले. शेजारपाजाऱ्यांना पेढे वाटले व मला शाबासकी दिली.

कॉलेजमध्ये मी काव्यवाचन, निबंध, वक्तृत्व इ. स्पर्धांमध्ये भाग घेऊन पारितोषिके पटकावित असे.

पुढे बी. ए. च्या प्रथम वर्गात मी हिंदी ऑनर्स घेतले. स्पेशल ऑथर मध्ये संत कबीर, सूरदास, महाकवी निराला यांचा अभ्यास केला. हरिवंशराय बच्चन यांचे 'मधुशाला' हे पुस्तक मला फार आवडायचे म्हणून लग्नानंतर पीएच. डी. करताना मी 'बच्चन के साहित्य का मनोवैज्ञानिक अध्ययन' असा विषय निवडला.

बी. ए. ला विद्यापीठात मी पहिली आले व कडेपूरकर पारितोषिकाची मानकरी ठरले. ते १९७२ साल होतं. माझ्यासाठी वरसंशोधन सुरू झालं होतं. पण मला तर एम.ए. करायचं होतं. वडील मात्र पुढील शिक्षणासाठी विरोध करत होते, आता काय करावे? माझ्यापुढे प्रश्नचिन्ह होते.

जालन्याला माझी एक मावशी राहते. तेथून रामजीवनजी भक्कड हे माझे मासाजी काही कामानिमित्त लातूरला आले होते. त्यांनी एम.ए. साठी दयानंद कॉलेजात फॉर्म भरून टाकला. लग्न

जमेपर्यंत मला शिकवायला सांगितले.

दयानंद कॉलेजमधली आमची एम.ए. ची पहिली बॅच. प्राचार्य व हिंदी विभागातील सर्व प्राध्यापकांना मी एम.ए.च्या परीक्षेत विद्यापीठात प्रथम यायला पाहिजे अशी अपेक्षा. अर्थात माझं हिंदी भाषेवर चांगलं प्रभुत्व होतं. उत्तम प्रोफेसर्स शिकवायला व मार्गदर्शन करायला होते. माझा आत्मविश्वास देखील वाढलेला होता. पण खात्री कशी देणार?

एम.ए. प्रथम वर्षाच्या परीक्षेत मी विद्यापीठात प्रथम होते. पण द्वितीय वर्षाच्या परीक्षेत मात्र एक पेपर थोडा निराश करणारा गेला. मी सरांना सांगितलं, ''माझ्याकडून यंदा अपेक्षापूर्ती होणं कठीण दिसतंय सर.''

१९७४ साली लाहोटींची मुलगी शालांत परीक्षा उत्तीर्ण झाली. तिच्या बाबांनी तिच्यासाठी लाहोटी कन्याशाळेच्या बिल्डिंगमध्येच महिला कला महाविद्यालय सुरू केले. अद्याप माझा एम.ए.चा रिझल्ट लागायचा होता पण तरीही मी प्राध्यापिकेच्या जागेसाठी इंटरव्ह्यू दिला. माझी निवड झाली.

मग काय? त्या महिला कलामहाविद्यालयात चार वर्षे मी नोकरी केली. माझ्या प्राध्यापकांचा माझ्यावर प्रभाव होता त्यामुळे मीपण जीव ओतून मुलींना शिकवायची. सर्व विद्यार्थिनी माझ्या शिकवण्यावर खूष होत्या.

''आपकी हिंदी भाषा सुनकर हमे बडा अच्छा लगता है। और मॅडम, आपका पढाया हुआ हर पाठ और हर कविता तुरंत समझ में आ जाती है। हम लोग आपके पीरियड को कभी मिस नही करते।''

यूथ फेस्टिव्हलसाठी मी मुलींचे पुरुषपात्रविरहित नाटकही बसवले होते. 'येथे नवरे मिळतात' या नाटकाचा हिंदी अनुवाद 'यहाँ पति मिलते है' या नावाने मी केला होता. विशेष म्हणजे या नाटकाला यूथ फेस्टिव्हलमध्ये प्रथम क्रमांक मिळाला. आमच्या प्राचार्या सौ. वसुधा पाटील खूष झाल्या. नाटकात काम करणाऱ्या मुली तर एकदम आनंदात होत्या.

या कॉलेजमध्ये रुजू झाल्यावर महिन्याभरानंतर एम.ए.चा रिझल्ट आला व मी विद्यापीठात प्रथम श्रेणीत प्रथम आले. माझ्यावर सगळीकडून अभिनंदनाचा वर्षाव झाला.

पढील आयुष्यात मला हिंदीत बोलण्याचा खूप फायदा झाला. रोटरी, इनरव्हील, महिला मंडळे व इतर ठिकाणी मी नेहमी हिंदीतच बोलते आणि लोकांना ते आवडते. प्रा. सूर्यनारायण रणसुभे सर अतिशय छान शिकवायचे. त्यांचा तास कधीच कंटाळवाणा वाटला नाही.

सोनवणे सरांची शरीरयष्टी किरकोळ पण वाचन दांडगं. रस्त्यातून चालताना देखील पुस्तक उघडून वाचायचे. त्यांचा आवाजही एकदम खणखणीत. संत कबीर, सुरदास यांचे काव्य त्यांनी अप्रतिम शिकवले त्यामुळे कबिराचे दोहे व सुरदासांची काही पदे अजूनही ओठांवर रेंगाळतात.

मला लेख, कविता लिहायची आवड कॉलेजमध्ये असतानाच लागली. वर्गात बसल्या बसल्या मी आमच्या प्राध्यापकांवर कविता करुन तो कागद मैत्रिणींमध्ये फिरवायची. पुण्यातून 'राजस्थानी वीर' नावाचं मासिक निघायचं. त्यातही मी सामाजिक समस्यांवर लेख लिहून पाठवायची. ते लेख छापूनही यायचे तेव्हा फार अप्रूप वाटायचं.

कॉलेजमध्ये शिकत होतो ते दिवस खरंच खूप मजे मजेचे होते. आम्ही सगळ्या मैत्रिणी एका माळेच्या मणीच जणू.कित्येकदा आम्ही मैत्रिणी कॉलेजमधूनच मॅटिनी शोला जायचो आणि त्यावेळचे गाजलेले सिनेमे बघायचो. खास करून जया भादुरी व अमिताभ बच्चनचे. गुड्डी, अभिमान, शोले पाहिलेले मला आठवतात.

लग्नानंतर सातारला आले. पतिराजांच्या प्रोत्साहनामुळे पीएच.डी. केले. आमचा प्रिंटींग प्रेस. प्रेसमध्ये माझी खूप मदत व्हायची . हिंदी भाषांवर प्रभुत्व असल्यामुळे प्रूफं तपासणं, कामकाजाकडे लक्ष देणं ही कामे मी करीत असे. अध्यापक आणि प्राध्यापक उत्तम शिकवणारे भेटले की आपल्याला त्या विषयांची गोडी लागते व त्यांच्या वागण्याबोलण्याचा आपल्यावर परिणाम होतो हे मला आवर्जून सांगावेसे वाटते.

**डॉ. निर्मला सारडा**
ई-१०, पाटील रिजन्सी, १५, एरंडवणे
पुणे ४११ ००४.
फोन नं. - ०२०-२५४२२२२३
nirmalasarda@yahoo.com

***पुणे मराठी ग्रंथालयाचा 'राजेंद्र बनहट्टी कथा पुरस्कार २००९'***




**घर**

**शुभदा गोगटे**

**१६०रु** पोस्टेज २५रु.

आजच्या प्रगत विज्ञानानंही ज्याचं स्पष्टीकरण देता येत नाही अशा गूढ, अगम्य घटनांच्या कथा!

# वाचलेच पाहिजे असे...

## जिना

**जसवंत सिंग** अनु. **अशोक पाध्ये**

हिंदुस्थान । फाळणी । स्वातंत्र्य




**५००रु. पोस्टेज ३०रु.**

१९०६ ते १९४७ या कालखंडातील भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील फारच थोडा भाग आपल्या समोर ठेवला गेला होता. टिळक, गांधी, सत्याग्रह, चलेजाव चळवळ, क्रांतिकारकांचे प्रयत्न... बस्स. एवढेच आपल्याला ठाऊक आहे.

परंतु याखेरीज असलेला ९० टक्के इतिहास हा श्री. जसवंतसिंग यांनी संशोधन करून बाहेर काढला. जिनांचे चरित्र अभ्यासताना हे सारे त्यांच्या हातात येत गेले. पाच वर्षे ३० माणसांची तुकडी हे काम करत होती. सुमारे ५००० संदर्भ गोळा केले गेले. त्यातील सार या पुस्तकात एकवटले आहे.

''खादीने कुठे स्वातंत्र्य मिळते?'' नेहरूंचा महात्मा गांधींना सवाल.

जिनांनी ठरवून कोलकात्यात दंगल करवली व ६००० हिंदूंची कत्तल घडवली.

'हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दूत' असे प्रमाणपत्र गोपाळ कृष्ण गोखले यांच्याकडून घेणारे जिना शेवटी हिंदूंचे कर्दनकाळ बनले.

आपल्या कौशल्याने, कॉंग्रेसच्या नेत्यांना भोंगळपणाचा फायदा उठवत, धमकी देत जिनांनी पाकिस्तान निर्माण केले. पुन्हा एकदा दाहीर राजाचा पराभव ८०० वर्षांनी जीना नावाच्या महंमद कासिम याने केला.

अत्यंत खळबळजनक माहितीने भरलेले पुस्तक.

## द पार्लमेन्टरी सिस्टिम

**अरुण शौरी** अनु. **अशोक पाथरकर**




**२२०रु. पोस्टेज २५रु.**

इंटरनॅशनल प्रेस इन्स्टिट्यूटने 'ज्यांच्या कृतीमुळे स्वातंत्र्याचे रक्षण झाले अशा 'वर्ल्ड प्रेस फ्रीडम हिरोज'पैकी एक' म्हणून गौरवले आहे.

'बिझिनेस वीक'ने 'स्टार ऑफ एशिया' म्हणून; 'दि इकॉनॉमिक टाइम्स' ने खाजगीकरणावरील कामामुळे 'बिझिनेस लीडर ऑफ दि इयर' म्हणून गौरवले आहे.

भारतीय कंपन्यांच्या प्रमुखांनी 'श्री अटल बिहारी वाजपेयी सरकारमधील सर्वांत उल्लेखनीय मंत्री' म्हणून गौरवले आहे. मॅगसेसे अवॉर्ड, दादाभाई नौरोजी अवॉर्ड, ॲस्टर अवॉर्ड, इंटरनॅशनल एडिटर ऑफ दि इअर, पद्मभूषण या व अशा अनेक सन्मानांनी विभूषित, अरूण शौरी हे भारतातील अतिशय प्रसिद्ध असे वर्तमान आणि राजकीय घडामोडींवरील भाष्यकार आहेत.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी मंत्रिमंडळात त्यांनी दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान व निर्गुंतवणूक अशी अनेक महत्त्वाची खाती सांभाळली.

हे त्यांचे एकविसावे पुस्तक.



# मीच माझी पहाट...
# मी नव्या जगाची वाट...

इंदुमती जौंधळे

**यौवनात आल्यावर भावभावना अलवार होतात. शारीरिक आकर्षणाचा तो काळ, बहुतेकांच्या आयुष्यात येतोच. त्याला मी तरी कशी अपवाद असेन? एक छान स्मार्ट, गोरापान, देखणा, तरुण नजेरत भरला. आमची नजरानजर झाली... हुरहूरऽ... धडधड... काहीतरी वेगळं आतूनच होऊ लागलं. मी रात्रंदिवस हवेतच तरंगत होते.**

एखादं गाव आपलं आयुष्य किती प्रकारे समृद्ध करतं आणि आपल्यावर त्या काळात किती खोलवर संस्कार होतात, ते ती व्यक्तीच जाणते. तो गाव, परिसर, आजूबाजूचे वातावरण... सहवासात येणारी माणसं स्मरणातून आजन्म जात नाहीत.

१९७०-७१ला एच. एस. सी. पास झाले. कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाच्या उषाराजे गर्ल्स हायस्कूलमधून कोरगावकर ट्रस्टच्या छात्रालयात राहून पहिली ते अकरावी शिक्षण घेतले आणि कॉलेजसाठी औरंगाबादच्या श्री सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयात पी. यू. सी. ला प्रवेश घेतला. एच. एस. सीला फर्स्ट क्लास असल्याने सहज प्रवेश मिळाला, तोही विज्ञान शाखेत. शहर नवे, कॉलेज नवे, सर्व परिसर नवा. एकही चेहरा ओळखीचा नाही. भांबावलेली, घाबरलेली मी... वर्ग कोणता, क्लासेस कुठे, कोणत्या ठिकाणी सुरू; कळतच नव्हते. त्यात मुला-मुलींचे घोळके आपापल्या कंपूसह हसत-खिदळत इकडे-तिकडे फिरत होते. मुली छान-छान रंगीबेरंगी फुलपाखरांसारखे उंची ड्रेसेस घालून इकडून-तिकडे फिरत होत्या. कुणी एखादे प्राध्यापक दिसले तर तेही खडू-डस्टर घेऊन घाईघाईने वर्गात जाताना दिसायचे. त्यांना कुणाला विचारायचे धाडस नव्हते. गांगरलेली मी घाबरत-घाबरतच कॉलेजचा जिना चढून वर गेले. समोरच शिपाई दिसला (गणवेशावरून), त्याला पी. यू. सी.चा वर्ग विचारला. त्यानं बोटानेच दाखवला. मागच्या दारातून वर्गात जाऊन बसले. मागच्याच बेंचवर... एका मुलीजवळ. ती एकदम मॉड. मिनिस्कर्ट, हाफ स्लीव्हज ब्लाऊज, केस कट करून मोकळेच सोडलेले... तिनं माझ्याकडे अशा काही नजरेने पाहिले की, छी ऽ ऽ कोण हीऽऽ? मी साडी नेसलेली– जाडी-भरडी काठापदराची, दोन्ही खांद्यांवरून पदर, केसांची गच्च आवळून वेणी बांधलेली... काकूबाईच की! व्वा, काय ध्यान!

समोर उंच स्टेज... त्यावर टेबल-खुर्ची. सर फळ्यावर भराभर लिहून देत होते... लिहून झाले की इंग्लिशमधूनच एक्स्प्लेन करत होते. शेजारची मुलगी रनिंग लिपीमध्ये भराभर लिहून घेत होती. मी मात्र मख्ख. सर नेमका कोणता विषय शिकवत होते, कशाच्या नेमक्या आकृत्या काढत होते...

ओ ऽऽ की ट्टो कळत नव्हते. अकरावीपर्यंत मराठी माध्यमात शिकलेली मी, आता एकदम सर्वच विषय इंग्रजीतून... छाती धडधडू लागली... हातपाय गार पडू लागले... घाम फुटला... घशाला कोरड पडली.. काय करावं, काहीच सुचेना. मान खाली घालून डोकं बेंचवर टेकून डोळे मिटले. अंधार... सगळाच अंधार... कसं व्हावं आपलं? कुठे येऊन पडलोत? काहीच कसं येत नाही आपल्याला...? पी. यू. सी. नंतर मेडिकलला जायचंय का? हं ऽऽ फार हुशार... शाळेत सर्वांमध्ये दुसरी आलीस का? फार हुशार समजतेस का स्वत:ला? बापरेऽऽ! भीतीने सर्वांगाला कंप सुटला. डोकं वर करून पाहिलं तर... सर्व वर्ग रिकामा... अरे देवाऽऽ! आता कुठे गेले असतील सगळे? कुणाला काय विचारू? जाऊ दे, बरेच झाले. घाम पुसला. दीर्घ श्वास घेतला. उभी राहून सरळ वर्गाबाहेर, मग कॉलेजबाहेर; तेथून थेट बी. सी. होस्टेलला पदमपुऱ्यातच.



होस्टेलच्या सुपरिंटेंडेंट नंदाताई धावरे-कांबळेंना सर्व सांगितले. रडूच कोसळलं... त्यांनी जवळ घेतलं. समजावून सांगितलं, ''अगं बेटा, पहिल्यांदा सर्वांची अशीच फजिती होते. घाबरू नकोस. सर्व नीट होईल.'' मग २-४ दिवस कॉलेजला गेलेच नाही. पण किती दिवस चुकवणार? गेलेच नाही, तर येणार कसं? म्हणून पुन्हा गेले. ज्या वर्गात गेले, तेथे बहुतेक वरच्या मुलांचे सायन्स प्रॅक्टिकल सुरू होते. दोन मुलांनी बेडकाला उलटं करून त्याचे चारी पाय चार खिळ्यांना बांधलेले होते. बेडूक अर्धमेलं, जिवंत. त्याचं खाली-वर होणारं पांढरं-फटक पोट फटफट उडत होतं... त्याचा विचित्र आवाज... ते मी पाहिलं मात्र... डोळ्यांसमोर काजवे चमकू लागले. दरदरून घाम आला. समोर सगळीच रूम... ते बेडूक, मुलं, मुली गरऽऽ गरऽऽ फिरू लागले आणि मी धाडकन कोसळले. पुढं काही आठवलं नाही. शुद्ध आली, तेव्हा प्राचार्यांच्या खोलीत होते. कुणी पाणी दिलं. कुणी कॉफी दिली. मग प्राचार्य शरद्‌चंद्र देशपांडेसरांनी विचारलं, ''जाधव, बेटी, क्या हुआ था तुम्हे? अचानक चक्कर कैसी आयी? सुबहसे कुछ खाया था या नहीं? कोई प्रॉब्लेम है... तो बताओ मुझे...!'' प्रॉब्लेम है सर... आणि एकदम रडूच कोसळले... किती दिवसांपासून काय करावे... सुचत नव्हते. एकदम सरांनीच विषय काढला. प्रॉब्लेम? फार मोठा प्रॉब्लेम... ''सर, इस शहरमें... कॉलेजमे मैं नयी हूं! क्लासमें क्या पढाते, मुझे कुछ भी नहीं समझता... अगर मुझे कुछ नहीं आयेगा तो मै कैसे पास हो जाऊंगी? सर, मुझे सायन्स साइड नहीं लेनी! बहुत डर लगता है. प्लीज, मुझे आर्ट्स में ॲडमिशन दे दिजीए!''

''अरे बेटी, आप मराठी माध्यमसे पढी है न?''

''हाँऽऽ...''

''एखाद महिनेमें आपको सब समझमें आ जाएगा! अक्सर मराठी माध्यमसे पढ़े बच्चोंका यही हाल होता है! दो-तीन महिने के बाद पुरी सिलॅबस आप कव्हर कर सकती है! बस्स... बाहर कही ट्युशन लगा लो, सब समझमें आ जाएगा!''

बापरे ट्युशन...! ट्युशन कसली? त्याला पैसे कुठून... कसे देणार? आतापर्यंत माहीत होते की, ट्युशन फक्त 'ढ' मुलांसाठीच लावतात किंवा फार फार तर श्रीमंत मुलांसाठीच; तेही शिक्षक त्यांच्या घरी जाऊन शिकवतात. मग मी यापैकी कशात मोडते? 'ढ'मध्ये? मन मानायला तयार नव्हते... आता काय करायचे? तिथेच, त्याच क्षणी मनाचा पक्का निर्धार केला आणि सरांना सांगितले, ''सर, मी ट्युशन लावू शकत नाही, मी बी.सी. होस्टेलला राहते. प्लीज सर, मला आर्ट्सला प्रवेश करून द्या.''

सरांनी माझी अगतिकता ओळखली. एका शिपायाबरोबर चिठ्ठी देऊन आर्ट्स फॅकल्टीला पाठवले. निम्मा जीव भांड्यात पडला.

त्या वेळी आर्ट्स-कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य होते श्री. जोगेंद्र पॉलसर. उंचच-उंच, धिप्पाड... अत्यंत करारी, एकदम अपटुडेट व्यक्तिमत्त्व. पहिल्यांदा पाहताक्षणीच भीती वाटावी, असे. मला शिपाई त्यांच्या केबिनमध्ये घेऊन गेला. सरांनी चिठ्ठी वाचली. बेल वाजवली. दोन मुलींना बोलावून घेतले. त्या दोन मुली म्हणजे चित्रा उत्तमराव देशपांडे व लतिका वांगीकर. सरांनी त्यांना सांगितले, ''आजसे तुम्हारे क्लासमें ये बैठेगी! ध्यान रखना इसका! नयी है!'' बापरे! पॉलसरांना केवढी काळजी माझी! किती आपुलकीने सांगितले त्या मुलींना... ध्यान रखना इसका! नयी है! असे प्रत्येक नवागताला समजून-उमजून घेणारा (विशेषत: ग्रामीण भागातल्या मुला-मुलींना) प्राचार्य मिळाला तर... अगोदर माझ्यावर जी वेळ आली, ती कुणावरच येणार नाही... नाही का?

चित्रा-लतिकाबरोबर वर्गात गेले. वर्ग एकदम फुल्लऽऽ! गडबड-गोंधळ... प्राध्यापक यायला बहुतेक वेळ असावा, म्हणूनच वर्गातील मुलं-मुली बिनधास्त वागत होती. मधेच एका बाकावर

त्या दोघींच्या मध्ये मी बसले. सुरक्षित आणि एकदम रिलॅक्स.

श्री. लक्ष्मण देशपांडे ('वऱ्हाड चालले लंडनला' फेम... तेव्हा ते फक्त प्रा. होते) वर्गावर आले, मराठी शिकवायला. त्यांनी नेमका कोणता विभाग शिकवला (कथा-कविता-व्याकरण-ललित इ.) आता काही आठवत नाही; पण त्यांच्याबरोबर चंद्रकांत भालेराव, तु. शं. कुलकर्णी, मंगला वैष्णव; तर इंग्रजी शिकवायला भालचंद्र नेमाडे, बक्तूल होते. हिंदीला भगवानदास वर्मा, चंद्रकांत न्यायाधीश, नारायणदास शर्मा होते. भगवानदास शर्मासरांनी हरिवंशराय बच्चन यांची 'मधुशाला' शिकविली. ते शिकवत असताना नुसतं ऐकतच राहावं वाटायचं.

हिंदीच्या वर्गात रेखा वरू नावाची अत्यंत बुद्धिमान, हसरी-खेळकर मैत्रीण भेटली. पण पुढे वर्ष-सहा महिन्यांतच तिच्या पालकांनी तिचे लग्न करून दिले. एका चांगल्या मैत्रिणीला आम्ही पारख्या झालो.

संध्या सुपेकर, सुमेधा तालीकोटकर, अंजली देशपांडे आणि आणखी दोन-चार जणी. खून छान ग्रुप जमला आमचा. अंजली आठल्ये वरच्या वर्गात होती, तरीही आमची तिच्याशी मैत्री होती. चित्राचे मोठे भाऊ ए. व्ही. देशपांडे कॉमर्स साईडला प्राध्यापक होते. त्यामुळे तिला त्यांचा भक्कम आधार होता, पर्यायाने आमच्या ग्रुपलाही खूप सेफ वाटायचे.

कॉलेज सुरू असतानाच बांधकाम सुरू होते. जे वर्ग तयार होते, तेथेच बेंच; बाकी सगळीकडे इतस्तत: रेती, माती, खडी, सिमेंट, फळ्या, लोखंड पसरलेले असल्याने जपूनच जावे-यावे लागायचे. बाकांवरील माती पुसून घेऊन मगच क्लासला बसायचे. कॉलेजच्या पायऱ्या चढताना वा उतरताना रेतीवरून पाय कधी घसरेल नि कधी आपण आपटू, नेम नसायचा आणि कधी अशी फजिती झालीच तर? कॉलेजच्या प्रवेशदारातच टारगट पोरांचे कंपू उभे असत. फार भीती वाटायची. काहीही कॉमेंट्स ऐकू येत. जोरजोरात हसणं, खिदळणं... एकमेकांना टाळ्या देऊन शिट्ट्या वाजवणं. मुली दिसल्यावर तर फारच जोर यायचा त्यांच्या एकूणच मस्तीला. समोरच फळ्यावर लिहिलेल्या नोटिसा, सूचनाही आम्हाला कोणाला वाचता येत नव्हत्या, कारण ह्या मुलांचाच गराडा त्या नोटिशींभोवती असायचा... मनात यायचं, ही मुलं कॉलेजात फक्त मस्ती करण्यासाठीच येत असतील का? यांना कोणी विचारणारं नाही... आणि तेवढ्यात पॉलसर यावेत... बघता-बघता काही मिनिटांत सारी पोरं गायब...

मध्यंतरात साऱ्या मैत्रिणी मिळून डबे खायच्या. लेडिज रूम किंवा वेटिंग रूममध्ये. हसत-खेळत, वाटावाटी करत. आम्हीही काही कमी नव्हतो. डबे खाताना एकमेकींच्या खोड्या काढ, तर कुणाची वेणी सोड, तर कुणाचं दप्तर पळव. वेटिंग रूममध्ये आमचाच सर्व मुलींचा गोंधळ, गडबड. बाहेर नाही बरं!

आमची दंगा-मस्ती... वरच्या वर्गातल्या मुलांनी व काही आमच्याच वर्गातल्या मुलांनी पाहिली. आम्ही वर्गाच्या बाहेर पडलो की ते आमच्या मागे. दुसऱ्या वर्गात जाऊन बसलो की आमच्या मागच्या बेंचवर ते. तास संपला, आम्ही मागच्या मैदानावर गेलो की तिथेही ते. एक दिवस झाला, दोन दिवस, चार दिवस... आठवडा झाला. आमचा पिच्छाच सोडेनात. रेखा वरू आणि मीच फक्त हिंदीला होतो. मी घाबरट आणि ती माझ्यापेक्षा दहापट घाबरट. काय करायचं? नंतर तर त्यांनी तिचं घर आणि माझं होस्टेलही बघून घेतलं. म्हणजे तिथपर्यंत मागावर आले. काय करावे; सुचेना. मग मी चित्राला सांगितले.

चित्रा म्हणाली, घाबरू नकोस. ये माझ्याबरोबर. ती थेट पॉलसरांकडेच घेऊन गेली. मी सरांना भीतभीतच सगळं सांगितलं. आमच्या वेटिंग रूमभोवती कसे फिरतात, शिट्ट्या मारतात, विचित्र आवाज काढतात, फालतू कॉमेंट्स करतात. पॉलसरांनी सगळं ऐकून घेतलं आणि म्हणाले, ''आता तुमच्या लेडिज रूमजवळ आले की मला बोलवा.'' एवढे बोलून आम्ही लेडिज रूममध्ये बसतो न बसतो तोच त्या चार-सहा पोरांचं टोळकं–भुंग्यासारखं घिरट्या घालणारं... आलं की लेडीज रूमजवळ.

आमच्यापैकी गुपचूप एक जण सरांकडे गेली आणि तिच्या पाठोपाठ सर आले. ती मुलं पुढं आणि सर मागे... पॉलसरांनी एकेकाची गचांडी अशी धरली म्हणता; त्यांना कुणाला काहीच हालचाल करता येईना. तसंच दोघातिघांना पकडून वेटिंग रूममध्ये आणले नि म्हणाले, ''हां, बेटियो... यही बदमाश तुम्हे परेशान करते है ना? बोलो, क्या किया इन्होने?'' आम्ही साऱ्या घाबरून उभ्या राहिलो... त्या दोघा-चौघांची गचांडी सोडली आणि अश्शी एकेकाच्या गालफडात लगावली म्हणता.. सण्ण सण्ण! बिचारे तिरीमिरी होऊन तिथून जे निसटले, ते पुन्हा कधीही आमचीच नाही, कुणाही मुलीची छेडछाड करायला धजावले नसतील.

असा दरारा, वचक फक्त पॉलसरांचाच होता.

बघता-बघता वर्ष संपत आलं. सर्व सिलॅबसही संपत आलं होतं. कोणी लायब्ररीत बसून अभ्यास करत, तर कोणी रिकाम्या वर्गखोलीत. पॉलसरांना कोणीतरी येऊन सांगितलं की, तुमच्या कॉलेजची मुलं सिनेमागृहात आहेत. झालं... पॉलसर पाच-सहा मिनिटांत जवळच असलेल्या त्या सादिया टॉकिजमध्ये गेले. अगोदर सिनेमा बंद केला. (करायला लावला.) एक्झिटचा एकच दरवाजा उघडा, बाकी सर्व बंद करायला लावले, लाईट लावायला लावले आणि दारातच दोन्ही हात कमरेवर ठेवून मोठ्यांदा गरजले, ''जो जो बच्चे एस.बी.के है वो सब यहाँ आओ!'' तासाभरापासून सिनेमात गुंग झालेले दुसऱ्या क्षणात प्राचार्यांसमोर. वीसेक जण. माना खाली घालून. ''अब तुम सब मेरी केबिन में जा के खडे रहेना.'' ते सारे जण भीतीने पांढरेफट्ट! सुतासारखे

सरळ होऊन सरांच्या केबिनमध्ये गेले. पश्चात्तापदग्ध.. त्या मुलांची काय हिम्मत होती पुन्हा अशी चूक करायची! तर, असा धाक आणि प्रचंड आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवून आणणारे, कडक शिस्तीने वागणारे; पण तितकेच प्रेम करणारे प्राचार्य एस.बी.ला पुन्हा झाले नाहीत. मिळाले नाहीत. स्वकर्तृत्वाने स्वत:चा एक वेगळा दबदबा निर्माण करणारे, नैतिकतेचा एक आदर्श घालून देणारे प्राचार्य पुन्हा होणे नाही. सहकारी प्राध्यापकवर्गालाही उशिरा येण्याची वा पिरियड बुडविण्याची हिम्मत नव्हती. एक शिस्त, वळण, आदर्शच जणू त्यांनी एस.बी.ला घालून दिलेला होता. स्नेहसंमेलनात तर ते आमच्याच वयाचे व्हायचे. निवडणूक असो वा गॅदरिंग; अत्यंत खेळीमेळीने उल्हसित वातावरणात, आनंदात पार पडत असे. असे प्राचार्य त्या महाविद्यालयाच्या, संस्थेच्या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने फार मोलाचे आणि भाग्याचेच असतात; त्या दृष्टीने खरेच आमची बॅच भाग्यवानच!

तेव्हा औरंगाबाद फार लहान होतं. रस्त्यावर वाहनांची गर्दी नाही की माणसांचीही. कॉलेजला जाणं-येणं पायीच असायचं. एखाददुसरी सायकल दिसायची. एखादा टांगा दिसायचा. बाकी सारे रस्ते आमच्यासाठीच रिकामे. आम्ही हातात हात, तर कधी गळ्यात गळे घालून रस्त्याने ओळीने घरी जायचो. कधी हातगाडीवरच्या भाजलेल्या भुईमुगाच्या शेंगा खा, तर कधी मक्याची कणसे, तर कधी हरभऱ्याचे टहाळ, तर कधी पेरूच्या दिवसांत लाल-पिवळे पेरू. मस्त खात-खातच घरी जायचं. एकमेकींना चिडवत. पांचट जोक करत, हसत-खिदळत. लतिका जोक करायची नि चित्रा सात मजली हसायची. रस्त्याने येणारे, जाणारे मग आमच्याकडे बघत कदाचित मनात म्हणत असतील, 'काय पोरी या! यांना काही कळतं की नाही, रस्ता आणि घर? वाह्यातच दिसतात.' असं चालत-चालत उस्मानपुऱ्यात आलो की पहिलं घर लतिकाचं. तिच्या आईनं म्हणजे नानींनी आमच्यासाठी खायला काही तरी केलेलं असायचं, ते खायचं. थोड्या गप्पाटप्पा झाल्या की पुढचं घर चित्राचं. अशोकदादाचं नुकतंच लग्न झालेलं. मग वहिनी आम्हाला विचारायच्या– काय करू खायला? मग एकेक फर्माईश.. कुणी म्हणे उप्पीट... तर कुणी म्हणजे आत्ताच पोहे खाल्लेत लतीकडे, वहिनी थालिपीठ... की झालं! वहिनी झटपट भाजणीचे थालिपीठ दोन-दोन तव्यांवर लावून गरमगरम खायला द्यायच्या. त्यावर लिंबाच्या लोणच्याची फोड... व्वा... काय चव होती! सर्वोत्तम आनंद म्हणतात, तो हाच ना! तेथून मी पदमपुऱ्यात सहा-साडेसहाच्या आत होस्टेलवर. दिवस मोठे छान फुलपाखरांसारखे स्वच्छंदी-आनंदी बागडण्याचे, मौजमजा करण्याचे. परीक्षा आली की रात्र-रात्र जागून अभ्यास करण्याचे, एकमेकींना अभ्यासात मदत करण्याचे. पी.यू.सी.ला आम्ही साऱ्या जणी उत्तम प्रकारे पास झालो.

बी.ए.च्या प्रथम वर्षाला सायकॉलॉजीसाठी आम्ही काही जणींनी कॉलेज बदलून Govt College of Arts and Science मध्ये प्रवेश घेतला. भव्य-दिव्य प्रचंड मोठी, ऐतिहासिक वारसा असल्यासारखी ही वास्तू. कॉलेजमध्ये प्रवेश करायचा तो मोठ्या कमानीतून. त्या अगोदर सुभेदारी गेस्ट हाऊस, त्याला लागून कॉलेजच्या मुलांचं होस्टेल. त्याच्या पलीकडे हे कॉलेज, त्याचे मोठे प्रवेशद्वार. समोरच मोठा आडवा ब्लॅक-बोर्ड. त्यावर 'सुस्वागतम'ने येणाऱ्याचे warm welcome. खूप छान वाटले. डाव्या-उजव्या बाजूला मोठमोठे जिने. त्यापलीकडे वर्गखोल्या. उजव्या बाजूला बरीच मोठी स्टाफ रूम. त्या पलीकडे कार्यालय. कार्यालयाच्या पलीकडे प्राचार्यांचे ऑफिस.

प्राचार्य नईमोद्दीन अत्यंत शांत, गंभीर, कायम झोपाळलेले... तर उपप्राचार्य भगवंतराव देशमुख यांचा देशमुखी रुबाब. बोलणं ढगांच्या गडगडाटासारखं, चालणं दाणदाण. एकेक पाऊल उचलून दाबून टाकूनच– जणू जमीन हादरणारच. मराठी शिकवायचे, शुद्ध मराठी. एकही शब्द इंग्रजी येणार नाही याची काळजी घेणारे. शब्दांवर जोर देऊन ठाशीवपणे उच्चारत व पाठाचा आशय सांगितला की त्या अनुषंगाने लेखक-कवी– त्यांचे साहित्य, साहित्यातले लालित्य, कविताच्या कविता त्यांना पाठ.

वसंतराव कुंभोजकरही मराठीला होते. बारीक किनरा आवाज, पण त्यात स्पष्टता, अर्थपूर्णता असायची. त्यांनी आम्हाला शिकवले ते नाटक. गॅदरिंगमध्ये नाटक बसवायचे म्हणजे नाटक निवडण्यापासून ते संपूर्ण सादरीकरणापर्यंत कुंभोजकरसरच जबाबदारी घेत. त्यातील पात्र-संवाद-संवादातील चढउतार, शब्दोच्चार, ऱ्हस्व-दीर्घ, 'ण' आणि 'न'मधील फरक सर आम्हाला समजून सांगत. अख्खं नाटक, त्यातील घटना जणू आमच्या समोरच घडताहेत... सारं नाटकच जिवंत होऊन आमच्यासमोर उभं करण्याचं दिग्दर्शनकौशल्य सरांमध्ये होतं. त्यांच्या जोडीला लिमयेसर असत. ते आमचे खूप लाड करायचे. कुंभोजकरसरांसमोर टंगळमंगळ करता येत नसे, ती लिमयेसर आले की आम्ही रिलॅक्स व्हायचो. चहा मागव, जवळच्याच कँटीनमधून खायला मागव. थोडी दंगा-मस्ती, एकमेकांच्या खोड्या काढणं, नावं ठेवणं, वेळ दवडणं चालायचं.

त्या वेळी रंगभूमीवर गाजलेलं नाटक 'सुंदर मी होणार' आम्ही बसवले. प्रमुख भूमिकेत श्यामल जोगदेव होती; तर बाकी सारी आम्ही म्हणजे संध्या बरिदे, राजेंद्र जोशी, अष्टीकर, शिराळकर आणि इतर काही जण. आता नावं आठवत नाहीत. तेव्हा बी.ए. फायनल होतं, शेवटचं वर्ष. पुन्हा कॉलेजात यायला थोडंच मिळणार होतं? म्हणून मनापासून कामं केली. कव्वालीही बसवली होती. सर्वांनीच तिलाही मनापासून दाद दिल्याचे आठवते.

मुलींनी मला एल.आर. म्हणून निवडून दिले होते. N.C.C. under officer ही होते. रायफल शूटिंगमध्ये औरंगाबाद जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला होता. शंभर मुलींचा troop तयार केला होता. ज्युनिअर/सिनिअर मुली. सर्वच ॲक्टिव्हिटिजमध्ये सगळ्या जणी मनापासून जबाबदारीने काम करायच्या. सिनिअरमधील मंगल सोमाणी, सुचेता पटेल तर माझ्या खास मैत्रिणी झाल्या होत्या. त्या वेळी Annual Camp दार्जिलिंगला गेला होता. काय विचारता...! रेल्वेने जाणं-येणं, चार-चार दिवस प्रवासात, दहा दिवस कॅम्प... तेथे दिवसभर ऊन-रात्रभर पाऊस, कापडी टेन्टमध्ये राहायचं, एकेका टेन्टमध्ये चार-पाच जणी. बाहेर बर्फ, थंडी, पाऊस. पावसाचं पाणी आत येऊ नये म्हणून दोन-तीन फूट खोल बाहेरून चर खणायचे टेन्टभोवती. अंगात कपड्यावर कपडे, पण थंडी काही जायची नाही. कितीही एकमेकींना चिकटून झोपा... झोप लागेपर्यंत उठायची वेळ. उकळलेल्या पाण्यानं तोंड धुवायचं, उकळलेला दार्जिलिंग चहा. फुळूक पाण्यासारखा चहा. मग-मग भरून प्यायचा. थंडी जावी म्हणून. जरा एखादं मिनिट जरी उशीर झाला प्यायला, तर थंडगारच. म्हणून उकळलेला चहा प्या, उकळलेलं पाणी प्या, तरच तिथल्या वातावरणात तुम्ही तग धरू शकता, नाहीतर गारठून गेलाच म्हणून समजा. पहाटेच पांढरे शुभ्र कपडे घालून वॉर्म-अप करण्यासाठी डोंगर उतारावरून खाली पळत जायचो. चारी बाजूंनी हिरवेगार चहाचे मळे... हिरवेगार उंच उंच डोंगर, त्यावर उतरलेल्या पांढऱ्या शुभ्र ढगांच्या रांगा. ढगांच्या आडून थोड्या वेळाने दिसणारे तेजस्वी लाल-तांबूस-सोन्यासारखे सूर्यकिरण. आम्ही दौडायचो, पण सगळं लक्ष आसमंतात. हिरव्यागार, दूरवर पसरलेल्या मखमलीवर. केवढे ते सृष्टीचे अपूर्व रूप! डोळ्यांत मावायचे नाही. मनात किती किती साठवून घ्यावे! ती सारी हिरवाई, मधूनच दिसणारे लाल-केशरी, छोटी उतरत्या छपराची कौलारू घरे... जणू एखादे लँडस्केप पाहतोय! पण तो तर सारा जिवंत देखावा होता. किती-किती मजा केली म्हणून सांगू? आसाम, बंगाल, केरळ, आंध्र, काश्मीर सर्व प्रांतांतून आम्ही मुली एकत्र जमलो होतो. सायंकाळी cultural (activities) program त्यामध्ये आपापल्या प्रांतांची वैशिष्ट्ये घेऊन सांस्कृतिक कार्यक्रमांचं सादरीकरण करायचं... इथं वेगळेपण जाणवायचं. Unity in diversity. पण परेडच्या वेळी एका गणवेषात हम सब भारतीय है! एक ही भूमि की संतान. काय अभिमान वाटायचा! गर्व व्हायचा की किती युनिटी आमच्यात! कोणीच अलग नाही. गणवेषात मार्चपास्ट... खाण्या-पिण्यात-राहण्यात... एकीचे महत्त्व तेव्हा जाणवायचे. फुलपाखरी बागडण्याचे... मयूरपंखी दिवस मनाच्या कोपऱ्यात तसेच जपून ठेवलेत जसे आपण लहानपणी मोरपीस/ पिंपळपान/ गुलाबपाकळ्या वहीच्या पुस्तकाच्या पानात जपून ठेवतो ना, तसेच! यौवनाचा तो काळ सुखाचा.

यौवनात आल्यावर भावभावना अलवार होतात. शारीरिक आकर्षणाचा तो काळ, बहुतेकांच्या आयुष्यात येतोच. त्याला मी तरी कशी अपवाद असेन? एक छान स्मार्ट, गोरापान, देखणा, उंचा-पुरा, हँडसम तरुण नजरेत भरला. आमची नजरानजर झाली... हुरहूरऽ... धडधड... काहीतरी वेगळं आतूनच होऊ लागलं. मी रात्रंदिवस हवेतच तरंगत होते. तो कमावता होता, घरची परिस्थिती बेताचीच... पण प्रेमात काय परिस्थिती येते का? मी जणू त्याच्या प्रेमातच पडले! त्याच्या नातेवाइकाने माझी माहिती घेतली; कुठून माहिती नाही! वडिलांचा गावाकडचा पत्ताही घेतला आणि मी धाडऽऽकन जमिनीवर आले. अगं बाई, काय चालवलंस हे? अजून कशात काही नाही, शिक्षण पूर्ण नाही, घरदार नाही... आई-वडिलांचा पत्ता नाही; कशातच काही नसताना हे काय? असा कसा विचार करतेस? आधी ग्रॅज्युएट हो... पायावर उभी राहा नि मग पुढे पाहू. अण्णा/काका आहेत ना विचार करायला? तुला कसली एवढी घाई झालीय? छे ऽ छे ऽ! हे काही बरोबर नाही. किती अव्यवहारी तू? मूर्खऽऽ महामूर्ख तू! स्वत:लाच जोरात टपली मारून घेतली... अंगावर पडलेलं झुरळ जितक्या चटकन आणि भीतीने झटकतो तितक्या झटकन तो विचार आणि विषय मनातून झटकून दिला. ज्या वाटेला आताच जायचे नाही, त्या वाटेचा पुढील रस्ता कुणाला कशाला विचारायचा? ये अंदर की बात अंदरही रखी! वेड्या मनाला समजावलं... पण मला वाटलं, ते वयच असावं तसं... दिवस तसे ते फुलायचे! झोपाळ्यावाचून झुलायचे! स्वप्नावर स्वार व्हायचे!

या सगळ्या प्रसंगांमधून स्वत:ला बजावत होते... तू एकटी आहेस. तूच तुला संयमाने घडवणार आहेस. सुट्ट्यांमध्ये अण्णासाहेबांबरोबर राहतेस. राष्ट्र सेवा दलाच्या शिबिरात भाग घेतेस, बाबा आमटेंच्या श्रमसंस्कार छावणीत जातेस... काय घेतेस या मोठ्या माणसांकडून? त्याग, साधेपणा, सच्चाई, कष्ट करण्याची पूर्ण तयारी... खरंच ज्या गोष्टीसाठी तू औरंगाबादला एकटी राहतेस, ती गोष्ट साध्य करण्यासाठी किती मेहनत घेतेस? आहेस स्वत:शी प्रामाणिक... की फसवतेस सर्वांना? मग माझं मलाच रडू कोसळायचं... रात्री बिछान्यात एकटीच रडून घ्यायची– पोट भरून. माझ्या सुहृदांची क्षमा मागायची आणि दुसऱ्या दिवशी पहाटेच उठून निश्चयाने अभ्यासाला लागायची. मन लावून एकेका विषयाचा अभ्यास करून संपवायची. जे समजायचं नाही, त्या संदर्भातील पुस्तकं मिळवण्यासाठी ग्रंथालयात बसायची. टिपणं-नोट्स काढायची. मैत्रिणींकडून नोट्स मिळवायची.

कॉलेजात- वर्गात बसण्याची आता फारशी गरज नव्हती, कारण सिलॅबस संपत आलं होतं. पण आम्ही साऱ्याजणी एकत्र

जमायचो. या तीन वर्षांत या कॉलेजात ज्या मैत्रिणी मिळाल्या, त्या आजतागायत जिवाभावाच्या होऊन राहिल्या. आजही आम्हा साऱ्या जणींचा एकमेकींशी कॉन्टॅक्ट आहे. प्रसंगाच्या निमित्ताने (लग्नकार्य) एकत्र भेटतो कडकडून. मन भरून, रात्र-रात्र जागून एकमेकींची सुख-दु:खं वाटून घेतो. भारती तुळजापूरकर, लतिका वांगीकर, संगीता बिंदू, छाया जवंजाळ, रेखा डोळे आणि संध्या सुपेकर. आमचा ग्रुप म्हणजे पोरं टरकायचीच आम्हाला. कुणाची बिशाद नव्हती आमच्यावर कुणी कॉमेंट्स करायची. तर तेव्हा आम्ही कॉलेजच्या मागच्या बाजूच्या हिमायत बागेत जाऊन दुपारच्या वेळी घनदाट-थंडगार हिरव्या सावलीत अभ्यासाला बसायचो. अर्धा-एक तास झाला की बागेतला माळी आम्हाला हिरव्या कच्च्या कैऱ्या, गाभुळलेल्या चिंचा... तर कधी काळीशार गोड-गोड जांभळं आणून द्यायचा. तेथील पेरू तर इतके गोड, की बस्, खातच राहावेत. पोट भरून खायचो. बरोबर आणलेले डबे तसेच ठेवायचो. माळीदादा आमच्याच ग्रुपवर एवढा मेहरबान का होता, कोण जाणे! बाकी दुसऱ्या मुला-मुलींना तिकडे फिरकूसुद्धा द्यायचा नाही... तर, असा आमचा अभ्यास चालायचा फळं खात-खातच.

मग एखाद्या विषयावर, प्रश्नावर चर्चा व्हायची. कुणी सायकोमधला प्रश्न विचारायची, तर कुणी मराठी-इंग्रजीतला. मग सायकोच्या बोरुडेसरांनी त्या प्रश्नाचे उत्तर कसे काय दिले, यावर चर्चा... यावरून त्यात्या विषयशिक्षकाची काय वेगळी खासियत.. त्यावरून आमच्यात भांडणं... कारण कोण सर कोणाचे वीक पॉइंट असतील (आदरयुक्त) आणि कोण कधी दुखावेल... कुणाचा कधी मूड जाईल; सांगता यायचं नाही. पण आम्ही एकमेकींना पुरत्या ओळखून होतो, त्यामुळे मजेमजेतच चिडवत अभ्यास पूर्ण करायचा, सायंकाळ होईपर्यंत. माळीदादा शिट्टी वाजवायचा; मग आम्ही उठायचो. त्याला चार-पाच रुपये देऊ करायचो, पण तो घ्यायचा नाही.

मग आमची सर्वांची सवारी पायी-पायीच निघायची रंगार गल्लीकडे. काय होतं तिथं? 'गायत्री चाट भांडार'! अगदी एवढंसं, कोंदट. दाटीवाटीने मांडलेले बेंच. आधीच गर्दी, त्यात आमची 'टोळधाड' सर्वांना सरकून जागा करून तिथंच बसायची. दाटीवाटीत. गल्ल्यावर बसलेला लाल, गुबगुबीत मालक आमच्याकडे बघून तेथील पोऱ्याला सांगायचा... त्यांना काय पायजे ते दे.. एकेका द्रोणात द्रोण भरून एकच गरम गरम कचोरी, तिचं पोट फोडून तीत तो चिंचेचं आंबट-गोड घट्ट पाणी ओतायचा, त्यावर पुन्हा हिरवी तिखट पुदिन्याची पातळ चटणी सोडायचा आणि आमच्या हातात द्यायचा. खमंग वास, कुरकुरीत टेस्टी कचोरी खाताना व्वा... काय सुख मिळायचं म्हणून सांगू? दोनेक मिनिटांत ती संपली की मग द्रोणभर मूगभजी. त्यावर पुन्हा तीच चिंचेची-पुदिन्याची चटणी... पुन्हा कचोरी... एकमेकींना आग्रह करून खाणार. तोंड भाजणार... हा ऽ हूऽऽ हू ऽऽ करतच खाणार, पण खाणार. पलीकडच्या कळकट पडद्याआडच्या मळकट घाणेरड्या पिंपातलं पाणी तो पोऱ्या पाच बोटांतून पाच ग्लास भरून आमच्यासमोर आणून आपटणार. आम्हाला तेव्हा काहीऽऽ वाटायचं नाही. तोंड पोळलेलं असायचं. झक्कत ते पाणी पिण्याशिवाय गत्यंतरच नसायचं. ५ का १० पैशाला कचोरी होती. तेव्हा जास्तीत जास्त ८-१० रुपयांपर्यंत बिल व्हायचं. नंबरप्रमाणे एकेकीने पैसे द्यायचे. मग तिथून आम्ही आपापल्या घराचा रस्ता धरायचो आणि तोही पायी. होस्टेलवर यायला सहा-साडेसहा व्हायचे. मग कसली आलीय भूक? हात-पाय धुवायचे, कपडे बदलायचे आणि अभ्यासाला बसायचे. फायनलला असताना खूप झटून अभ्यास केला.

बी.ए.च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा फी भरायची होती. कॉलेजच्या नोटीस बोर्डवर नोटीस लागली होती. माझ्याजवळ तर पैसे नव्हते; पण मी एवढी मोठी रक्कम अद्यापि कुणा मैत्रिणीकडे कधी मागितली नव्हती. कोल्हापूरच्या काकांना पत्राने कळवले. काकांचे उलटटपाली पत्र आले, 'तुझ्याच महाविद्यालयात संस्कृत विषयाचे प्रा. अशोक व्हटकर आहेत. तो माझ्या मित्राचाच मुलगा आहे. त्यांच्याकडून सध्या पैसे घे आणि फी भर. तो इकडे आला की मी (ते) त्याचे पैसे देऊन टाकेन.' तसेच ते पत्र व्हटकरसरांना दाखवले, तेव्हा ते म्हणाले, "अरे, इतक्या दिवसांपासून तुम्ही इथे आहात; कळवले /सांगितले का नाही? चला ऑफिसात." त्यांनी क्लार्ककडे नेले आणि लगेचच फी रु. ३६ आणि काही पैसे भरले आणि पावती माझ्याकडे दिली. पुन्हा काही अडचण आली तर नि:संकोच सांगा म्हणाले आणि निघून गेले. मी अत्यंत कृतज्ञभावाने त्यांच्याकडे पाहतच राहिले. केवढे मोठे काम केले होते त्यांनी माझे; आयुष्यातले माझे महत्त्वाचे वर्ष वाचवले होते.

परीक्षा झाली. सर्व पेपर उत्तम गेले. सुट्टीत कोल्हापूरला गेले. काकांना विचारले, व्हटकरसरांच्या पैशाबाबत. तेव्हा ते म्हणाले, अशी अशोकसारखी किती तरी माझी मुलं कमावती झाली आहेत आणि ती महाराष्ट्रभर विखुरलेली आहेत. तू कमावती झालीस की अशाच गरजू - होतकरू - गरीब मुलांची अडचण दूर कर, म्हणजे त्याचे पैसे त्याला मिळाल्यासारखेच होईल. किती सहज पण मौल्यवान सल्ला दिला मला. 'परतफेड', 'देणं' समाजाप्रति देण्याचा विचार रुजवण्याचं काम ही मोठी, निर्मोही माणसं करत असतात. गायकवाडकाका, अण्णासाहेब, बाबा आमटे, विनोबा भावेंसारख्या महान, उत्तुंग व्यक्तींच्या सहवासात राहायला मिळाले, त्यांच्यात राहून चांगुलपणा जपता आला - 'परिसासंगे लोह होय सुवर्ण'! व्हटकरांसारख्या कथा-कादंबरीकार

प्राध्यापक लेखकाने मला अडचणीच्या वेळी मदत केली, हे ऋण आजन्म आहेत... मीही मग माझ्या शाळेतल्या गरीब-होतकरू मुलांसाठी मदतीचा हात पुढे करते. थोड्या अंशाने का होईना, ऋणमुक्त होण्याचा प्रयत्न; नव्हे, कर्तव्य करते.

जीवनातील ती महत्त्वाची चार वर्षे खऱ्या अर्थाने पंख फुटण्याची-विचाराची-भावभावनांची, मैत्रीची-अभ्यासाची होती. विविध उपक्रमांद्वारे चुकत-माकत आम्ही शिकत गेलो. कधीमधी चोरून चित्रपटही पाहिले, पण कोणत्याही गोष्टींचा अतिरेक केला नाही. वाहवत गेलो नाही. वर्गमित्र होते, पण निखळ मैत्रीचे. जीवनाचं ध्येय होतं– आर्मीतला एक रुबाबदार ऑफिसर व्हावं... पण नाही होता आलं. अनेक अडचणी... पण त्या अडचणींवर मात करण्याचं सामर्थ्य आपल्यात बरोबर येतं. ते मी केलं. बी.ए. झाल्यावर बी.एड.साठी वर्ध्याला गेले. अण्णासाहेबांकडे. अगदी उशिरा प्रवेश घेतला, म्हणजे ५ सप्टेंबर १९७५ला. स्वावलंबी अध्यापक महाविद्यालयात. रोज सेवाग्राम ते वर्धा पाच-सहा किमी. ये-जा करून कॉलेज करीत होते. पुन्हा येथे नवे वातावरण- नवे कॉलेज- नवे मित्र-मैत्रिणी... पण आता माझ्यात आत्मविश्वास आला होता. धैर्याने कोणत्याही गोष्टीला तोंड देण्याचं शिकले होते. जून ते ऑगस्ट जवळजवळ अडीच महिन्यांचा बुडलेला/झालेला अभ्यासक्रम तेथील प्राध्यापक-हुषार विद्यार्थ्यांकडून मिळवून घेतला आणि पूर्ण केला.

सेवाग्राम म्हणजे महात्मा गांधीजींची कर्मभूमी. गांधी सेवा संघ– महादेवभाई भवनात अण्णासाहेब राहत होते, म्हणजे मीही त्यांच्याजवळ. इथे खूप मोठी लायब्ररी आहे. या ग्रंथालयात बापूंच्या जीवनावरील खूप मोठे चित्रसंग्रहालय आहे. ग्रंथपाल आपटेगुरुजी. तेही गांधीजींचे एकेकाळचे सहकारी. तेथून जवळच सेवाग्रामाश्रम. बा-बापू कुटी, ग्रामोद्योग, चर्मोद्योग, दुग्धालय, खादी भांडार, शेती, पशुपालन, गोधन– सर्व स्वावलंबनाचे उद्योग तिथे चालायचे. २/४ दिवसांनी सायंकाळी मी अण्णांबरोबर फिरत फिरत जायचे. बापूंची लहान स्नुषा 'निर्मलाबेन' गांधीही आश्रमातच राहत होत्या. दादा धर्माधिकारी, गोविंद देशपांडे, गोविंद शिंदे. रामभाऊ म्हसकर, आचार्य अत्रे, गुरुजी-मशसानकर, निर्मला देशपांडे, मामा क्षीरसागर... या साऱ्या मंडळींची ये-जा सतत असायची. या सर्वांच्या सहवासाचा-पुण्यात्म्यांचा आशीर्वाद मला मिळाला. सत्संगाने माझ्या दुर्गुणांची वजाबाकी केली. तेथून जवळ दत्तग्राम-दत्तवाडी, कुष्ठधाम... हाता-पायांची बोटं झडलेली, कान तुटलेले, नाक गळलेले... पण सुंदर निर्मिती करणारे त्यांचे सुंदर हात पाहिले. त्यांची कलाकुसर पाहिली. धरती हिरवीगार- सुफलाम केलेली पाहिली आणि मला माझ्या धडधाकट नाकर्तेपणाची लाज वाटली. किती क्षुल्लक आपण.. तसेच आनंदवन-वरोरा येथील बाबा आमटेंचे सुंदरबन पाहून वाटले होते. स्वत:च्या कर्तृत्वावर प्रचंड विश्वास असणारा, जीवनाच्या मांगल्यावर श्रद्धा असणारा, ज्वाला आणि फुले समसमान मानणारा हा महाकवी या भूलोकी स्वर्ग निर्माण करणारा, मेलेल्यांमध्ये प्राणज्योत पेटवणारा, पोटच्या पोरांनी नाकारलेल्यांना पोटाशी घेणारा हा आजच्या काळातला महामानवच नव्हे का! आणि त्यांना सावलीसारखी साथ देणाऱ्या साधनाताईही तेवढ्याच महान. सारं आयुष्य 'समिधा' होऊन जगल्या.

वर्ध्याच्या पूर्वेला आचार्य विनोबा भावेंचा पवनार आश्रम. आध्यात्मिक क्षेत्रात आणि शिक्षणावर सूक्ष्म अभ्यास करणारे, चिंतन-मनन करून शिक्षणाला दिशा देणारे खरे आचार्य. आसेतु-हिमाचल 'भूदान' यज्ञातून हजारो-लाखो भूमिहीनांना जमीन मिळवून देणारे 'बाबा' म्हणजे विनोबाजी. 'जय जगत'चा नारा भारतभर दुमदुमत ठेवणारे. ही सारी माणसं समाजासाठी अखंड काम करीत होती. निर्मोही, नि:स्वार्थी बुद्धीनं अन् सर्व संगपरित्याग करून. प्रसिद्धी त्यांना माहिती नव्हती... 'सब भूमी गोपालकी' या मंत्राने भारतभर पदयात्रा काढण्यात आल्या. त्यांचा प्रभाव आमच्या तरुणाईला प्रोत्साहित करत होता. या साऱ्या महान विभूतींच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा माझ्या मनावर उमटत होता. नकळत चांगुलपणाचे, सत्याचे, मेहनतीचे, सत्संगाचे संस्कार माझ्या व्यक्तिमत्त्वात आतपर्यंत झिरपत होते.

१९७५-७६ला इंदिरा गांधींनी देशभर आणीबाणी पुकारली होती. मी वर्ध्यात बी.एड.चा अभ्यास करत होते. व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्यावरच घाला घातल्याने देशहितवादी - गांधीवादींनी जाहीर निषेध नोंदवला. अशा देशविघातक शक्तींचा पुरा बीमोड करण्यासाठी देश पेटून उठला. हजारो देशाभिमानी, लोकशाहीचे पुरस्कर्ते, कार्यकर्ते, साहित्यिकांनी इंदिरा गांधीविरोधी आवाज उठवला. जागोजागी सभा-भाषणाला आम्हीही जाऊ लागलो. निषेध (काळा दिन) म्हणून काळ्या फिती लावून रस्त्यावर उतरलो. आमच्या अण्णासाहेबांना व अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडून जेलमध्ये नेले. आम्हीही जोरजोरात निषेधाच्या घोषणा देत होतो, पण सर्वोदयी-समाजवादी तरुण शांती सेनेच्याच कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडून तुरुंगात टाकले. आमच्याकडे कुणी बघितलेही नाही... फार वाईट वाटले, आपल्याला पोलिसांनी पकडले नाही म्हणून! म्हाताऱ्या-कोताऱ्यांना, वयस्कर व्यक्तींना धरले आणि आम्हा तरुणांना सोडून दिले. पुढे वर्षभराने कळले की, तेथील त्या वेळचे पोलीस अधिकारी जे पूर्वी औरंगाबादला होते, ते मला ओळखत होते. मला किंवा अन्य विद्यार्थ्यांना उचलून तुरुंगात टाकले असते; तर आमच्या भवितव्यावर त्याचा परिणाम झाला असता, कदाचित पुढे नोकरी मिळण्यास अडचणी आल्या असत्या... तेव्हा राग आला होता, पण त्यांनी आमच्यावर केवढे उपकार केले होते! मी ज्या परिस्थितीतून वर आले होते,

त्या दृष्टीनेच त्यांनी पाऊल उचलले होते, पण तेव्हा माझ्या लक्षातच आले नव्हते. अशी ‘माणूस’कीची माणसं मला पदोपदी भेटली... आणि सतत काहीतरी ‘देत’च गेली आणि हातांनी-मनाने मी घेतच राहिले. त्यांच्यातील चांगूलपणा-माणूसपण, करुणा, क्षमा, शांती, भक्ती. मला वाटतं, या साऱ्या शब्दांचा उपयोग ‘स्त्री’च्या प्रकृतिधर्माचे द्योतक तर नव्हते? ते जिवंत स्पंदनांशी आहे. ही स्पंदनं आपणाला जाणवता आली पाहिजेत. सगळीकडेच सारा अंधार... अंधार म्हणण्यापेक्षा मी माझी एक छोटीशी पणती पेटवलीच पाहिजे. म्हणजे पाहा– सर्वदूरपर्यंत प्रकाशच प्रकाश. आत्मविश्वासच तुम्हाला जगवतो. पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही. जो जन्म मिळाला, तो सत्कारणी लावावा. स्वत: जगावे, दुसऱ्याला जगू द्यावे. आनंदयात्री व्हावे. कागदावरचा हिशेब चुकला तर खोडून पुन्हा दुसऱ्या कागदावर मांडता येतो... पण आयुष्याचाच हिशोब चुकला तर? खोडून दुरुस्त करायला दुसरं पर्यायी आयुष्य मिळत नाही. म्हणून कविवर्य सुधीर मोघे म्हणतात, त्याप्रमाणे (थोडा बदल करून)–

एकाच या जन्मी जणू
फिरून मी जन्मेन मी!
लहरेन मी, बहरेन मी, तरीही...
मला लाभेन मी!
आशा उद्याच्या डोळ्यांत माझ्या...
पूर्तीस्तव अखंड लढेन मी!
...कारण माझा मलाच विश्वास आहे...
मीच माझी पहाट...
मी नव्या जगाची वाट...!!

**इंदुमती जोंधळे**
ओ-४०६, पिनाक सोसायटी, फेज II,
कोथरूड, पुणे ४११ ०३८
फोन नं. - ०२०-२४४५४८४१/९६८९९१०९४९

# जॅपनीज मॅग्नोलिया

**रेई किमुरा । अनु. निर्मला मोने**




**२००रु.** पोस्टेज २५रु.

“ तू आहेस का फुसावो? किती काळ मी तुझ्याशिवाय होतो? मला चैन पडत नव्हतं. ये. मला सुख दे. तू नेहमी देतोस तसं......”
फुसावो त्या विश्वास ठेवणाऱ्या चेहऱ्यापासून दूर झाला. एक बारीकशी किंकाळी फोडून आपल्या थरथरत्या हातातला सुरा त्यानं आपल्या प्रियकराच्या छातीत जोरानं खुपसला. तो सुरा मुठीपर्यंत आत जाईतो, तो थांबला नाही. बाहेर काढून आणखी एकदा, त्याच, त्याच्याविषयीच्या प्रेमानं, विश्वासानं आणि त्याच्या इच्छेनं भरलेल्या हृदयात...
त्याला जाणवलं की खोलीत कोणीच नव्हतं आणखी. आणि ओकिमोटोच्या ओठांवर शब्द होते, “फुसावो, फुसावो, तू आलास?” त्याच्या दगडी बनलेल्या चेहऱ्यावरून अश्रूंचा लोट वहात होता. धक्का बसलेल्या त्या मुखातून त्याचंच नाव पुन:पुन्हा येत होतं, आणि एकच प्रश्न – का, का? रक्ताचा एक प्रवाह छातीतून, फुसावोला परिचित, अतिपरिचित असलेल्या त्या शरीरातून वाहू लागला.
समलिंगी आकर्षणाच्या गर्हणीय प्रवाहात वाहवत गेलेल्या सामुराई आणि सामान्य शेतकऱ्याचा मुलगा यांच्या प्रमाथी प्रेमकहाणीची हृदय हेलावणारी शोकांतिका.



# कॉलेजचे दिवस जास्त करून अभ्यासाचेच...

प्रा. माधुरी शानभाग

**या काळात वाचन अन् फिजिक्स या दोन गोष्टी माझ्या आयुष्यात इतक्या घट्ट रुजल्या की, आज या दोघांशिवाय मी माझे आयुष्य कल्पूच शकत नाही. बाकी कुणी कुणी पत्रे लिहिली, कविता केल्या, कुणी धीटपणे विचारणाही केली; ते सगळे आवडत होते, हे मी नाकबूल करणार नाही. पण पुढे भरपूर शिकायचे, हे डोक्यात फिट्ट बसलेले होते**

मी ज्या कॉलेजमध्ये शिकले, त्याच कॉलेजची आज प्राचार्या आहे. त्यामुळे या वास्तूवर माझे जरा जास्तच प्रेम आहे. या लेखाच्या निमित्ताने परत भूतकाळात गेले अन् सगळ्या कॅम्पसभर एक फेरफटका घेतला; तोदेखील साडेपाचनंतर... भरपूर बदल झालेले मला नव्याने जाणवले. मी परत एकदा विद्यार्थिनी झाले आणि सगळ्या स्मृती वेगळे संदर्भ लेऊन समोर आल्या.

मॅट्रिकला मी शाळेत पहिली आल्यामुळे कॉलेजात सायन्सला प्रवेश घ्यायचा, हे ठरवलेलेच होते. १९६७ ते १९७१ या चार वर्षांत मी बी.एस्सी. अन् ७१ ते ७३ एम.एस्सी. ही सहा वर्षे मी कॉलेजजीवन अनुभवले. त्या वेळी कर्नाटकात दहा वर्षात शालेय अन् चार वर्षात मास्टर्स पदवी घेता येई. नंतर मात्र अकरावी अन् बारावी असा दोन वर्षांचा अभ्यासक्रम झाला. त्यामुळे वयाच्या एकोणिसाव्या वर्षी पदवी अन् एकविसाव्या वर्षी एम.एस्सी. होता आले. माझ्या दोन मोठ्या बहिणी या जी.एस.एस. कॉलेजात आधीच शिकत होत्या अन् एकत्र कुटुंबात चुलत भाऊबहिणीही होत्या. वडिलांना आपल्या सर्व मुलींनी मुलाप्रमाणे उत्तम शिक्षण घ्यावे, असे वाटत होते अन् त्यासाठी त्यांनी आम्हाला कधीही काही कमी पडू दिले नाही. या कॉलेजात माझे वडीलच स्थापनेपासून संचालक मंडळात असल्याने तिथे होणारे चांगले कार्यक्रम शालेय वयापासून आम्ही पाहत आलेलो होतो. त्यामुळे जागा व परिसर ओळखीचा होता. जवळजवळ सर्व प्राध्यापकही आधीच ओळखीचे होते. इतर अनेक उपक्रम केले व कशातही भाग घेतला तरी भरपूर अभ्यास करून फर्स्ट क्लास मिळवणे, यावरचे लक्ष कधीही ढळले नाही. पहिली प्राधान्यता अभ्यास आणि अभ्यास, हीच राहिली. माझे अभ्यासाचे विषय सायन्सचे अन् आवडी मात्र संगीत अन् साहित्य या होत्या. वाचनाचे संस्कार अगदी बालपणी झाले, पण वाचन चौफेर अन् सातत्याने कॉलेजातच झाले. कॉलेजात जाईपर्यंत मी कधी अभ्यासक्रमाची सोडून इंग्लिश पुस्तके वाचलेली नव्हती. कॉलेजात अभ्यासक्रमात असलेली 'सिलॅस मार्नर अन् ॲपल कार्ट' शिकताना त्या लेखकांची इतर पुस्तकेही वाचली गेली. इथे पहिल्यांदा बाह्य वाचन म्हणून नॅन्सी ड्र्यूपासून सुरुवात करत, पेरी मेसन, अगाथा ख्रिस्ती, मिल्स ॲन्ड बून, सर्वांत आवडता जेम्स हॅडली चेस, हेरॉल्ड रॉबिन्स, आर्थर हॅले अशा पायऱ्या

चढत गेले अन् विद्यापीठात जाईतो क्लासिक पुस्तके वाचेपर्यंत मजल गाठली. फार गंभीर इंग्लिश पुस्तके मी अजूनही वाचत नाही; पण गाजलेली, पुरस्कार मिळालेली, भारतीय लेखकांनी लिहिलेली अशी बरीच वाचली जातात. त्याचे मूळ मात्र महाविद्यालयीन दिवसांत रोवले गेले. त्यात आमचे तरुण अभ्यासू लायब्ररियन श्री. सुरेश जोशी अनेक उत्तम पुस्तके, त्यातही अगदी नवी 'ही वाचा' म्हणून मुद्दाम राखून ठेवत. पुढे मराठीतच एम.ए. करून ते देवगडला प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तिथून प्राचार्य म्हणून निवृत्त झाल्यावर बेळगावातच परतल्याने आता कधी क्वचित भेट होते.

आम्हा सायन्सच्या विद्यार्थ्यांना मराठी हा विषय पहिली दोनच वर्षे होता. त्यात पहिल्या वर्षी प्रा. प्रभाकर गाडगीळ, पत्रम-पुष्पम हे अभ्यासक्रमात लावलेले संकलन शिकवताना अनेक संदर्भ पुस्तके सुचवत असत. मग मी लायब्ररीत जाऊन मिळवून वाचणे, नंबर लावणे, ज्याच्याकडे पुस्तक आहे ते कार्डवरून शोधून काढून, त्याला जाऊन लवकर परत करा, मला वाचायचे आहे, असा तगादा लावणे– असे उद्योग केलेले स्पष्ट आठवतात. त्या काळात प्रकाशित झालेल्या 'श्रीमान योगी', 'ऑक्टोपस', 'कोसला' यांसारख्या पुस्तकांना असे नंबर लावलेले आठवतात. पण हे वाचन फारसे डोळस नव्हते, हे आज जाणवते. त्या वेळी आमच्याच संस्थेचे आर. पी. डी. आर्ट्स कॉलेज, जे याच जागेत सकाळच्या सत्रात भरते; त्यामध्ये प्रा. अरविंद याळगी, प्रा. अनंत मनोहर यांसारखे प्राध्यापक मराठी भाषेच्या संवर्धनासाठी शारदा मंडळातर्फे अनेक उपक्रम राबवत असत अन् आम्ही सायन्सचे विद्यार्थी आवडीने अन् धडपड करून त्या कार्यक्रमांना उपस्थित राहत असू. त्याला कधी कुणी अटकाव केला नाही. एक नवी कादंबरी वा गाजणारे पुस्तक घेऊन त्यावर विद्यार्थी अन् प्राध्यापक एक-एक पैलू घेऊन चर्चा किंवा आजच्या भाषेत परिसंवाद ठेवत. कोसला, लव्हाळी यावर असे परिसंवाद झालेले आजही लक्षात आहेत. पहिल्या वर्षी मी सायन्स अन् आर्ट्स मिळून मराठी विषयांत पहिली आले. तेव्हा त्या विषयात पहिल्या आलेल्या विद्यार्थ्याला दरमहा पन्नास रुपयांची स्कॉलरशिप होती. (मौलिचंद्र फडके असे जबरदस्त नाव असलेल्या मुलाला ती मग मिळाली.) मला वाटले की, आता आपण सायन्स शाखा सोडून आर्ट्सला जावे. भाषाविषय आपला अभ्यासविषय व्हावा. वडिलांनी मग समजूत घातली. ''पन्नास रुपये मिळतात म्हणून जायचे, असे करू नये आणि साहित्याची आवड म्हणशील, तर ती तुला पुढे केव्हाही जोपासता येईल. सायन्स मात्र अभ्यासक्रमात शिकले नाही, तर नंतर स्वतंत्रपणे शिकणे जवळजवळ अशक्य आहे. ज्ञानाचा एवढा मोठा खजिना, तुझी बुद्धीची अन् माझी पैशाची कुवत असताना तू त्यापासून वंचित राहावेस, हे मला पटत नाही.''

आज माझ्या वडिलांचे या समजावणीसाठी मला मनापासून आभार मानावेसे वाटतात. सायन्स नावाचा ज्ञानाचा अद्‌भुत सागर मला निदान किनाऱ्यावरून तरी पाहता आला अन् भाषेचे प्रेम मी माझ्या आनंदासाठी जपत राहिले. या दोन्हींवर मी मनापासून आज प्रेम करते. लेखन करताना अनेक तऱ्हेने सायन्सचे शिक्षण पूरक ठरते, असा माझा अनुभव आहे.

मी माझ्या आई-वडिलांची ओळीने सातवी मुलगी असूनही त्यांनी कसेतरी मुलींना उजवायचे, हा त्या वेळचा रिवाज न पाळता सर्वच्या सर्व मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे, मग पाहिजे तर अर्थार्जन करावे किंवा नाही; हा बेळगावात तरी त्या काळी पंचवीस वर्षे पुढे असलेला विचार अमलात आणला. सर्वच मुली दिसायला सुरेख, शिकलेल्या, एकत्र संस्कारी कुटुंबात वाढलेल्या असल्यामुळे अन् मोठा गोतावळा असल्याने सतत कुणी कुणी नवरे सुचवत राहत. पण शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय लग्नाचा विचारही नको, यावर ते ठाम राहिले. वडिलांच्या अनेक मित्रांना, आईच्या मैत्रिणींना वाटे; यांना इतक्या मुली आहेत, एक आपण करून घ्यावी, तेवढीच त्यांना मदत होईल. पण बाबा असे कुणी म्हटले तर हसण्यावारी घालवत. आमच्या चुलत, आते वा इतर बहिणींना कॉलेजात घालावे अन् लग्न जमेपर्यंत शिकवावे, असेच वर्तन त्यांच्या पालकांनी केले. पण आई वा बाबा ठाम होते. मोठ्या दोघींनी तर लग्नापूर्वी प्राध्यापक, डॉक्टर अशा नोकऱ्याही केल्या. मग मनासारखे मुलगे मिळाल्यावर लग्ने केली. त्यामुळे आपण शिकायलाच हवे, हा संस्कार मनात नकळत पक्का होता. अगदी उत्तम, श्रीमंत घरातून, शिकलेल्या मुलांच्या पालकांकडून मागण्या आल्या, तरी ते मोहात पडले नाहीत. त्यांच्या या ठामपणाची मधुर फळे आम्हा सर्व बहिणींना जन्मभर चाखायला मिळाली. मुंबई वा अमेरिकेत गेल्या, त्या बहिणी तर कमावत राहिल्याच; पण बेळगावसारख्या छोट्या गावात राहूनही अन् नवऱ्याची परिस्थिती बऱ्यापैकी असूनही आम्ही इथल्या दोघी बहिणी संसार सांभाळून नोकऱ्या करत राहिलो. स्वत:चे असे स्थान समाजात निर्माण करू शकलो. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा आमच्या आवडीप्रमाणे विकास करू शकलो. जेव्हा अगदी अटीतटीचे प्रश्न जीवनात उभे राहिले, तेव्हा आर्थिक बळ अन् वैचारिक प्रौढतेमुळे माझ्या बहिणींनी योग्य निर्णय घेऊन आपली आयुष्ये स्वत: घडवली. शिक्षणामुळे हे होऊ शकले. या सर्वांचे शंभर टक्के श्रेय (माझे श्रम सोडून) मी माझ्या आई-वडिलांना (अन् नंतर अर्थातच नवऱ्याला) देईन.

कॉलेजात असताना त्यामुळे कधी मुलांनी विशेष रस दाखवला तरी त्यांना प्रतिसाद देणे, भानगडी यांपासून मी जरा लांबच राहिले, असे म्हटले तरी चालेल. असले प्रकार मात्र वाट्याला खूप आले. आता माझ्या विद्यार्थ्यांपैकी कुणीतरी हा लेख वाचेल म्हणून का होईना, मी त्यावर विस्ताराने लिहू इच्छित नाही.

अर्थात, आजच्या इतका मोकळेपणा मुलामुलींत तेव्हा अजिबात नव्हता. आमच्या वर्गातल्या मुली अगदी भाविकपणे प्रेमात पडल्या अन् आई-वडिलांनी बोहोल्यावर उभे केल्यावर समोरच्याच्या गळ्यात माळ घालून त्यांनी सुखाने संसार केले. अगदी फर्स्ट इयरपासून गळतीला सुरुवात व्हायची. अनेक मुली अशा लग्न ठरलेल्या मुलींचा उघड-उघड हेवा करत. काहींनी डिग्रीचा टिळा फक्त आणखी चांगला नवरा मिळावा म्हणून कपाळी लावला. घरची परिस्थिती फार चांगली नसलेल्या काही जणी त्या वेळी सायन्स पदवीधारकांना सहजपणे मिळणाऱ्या बँकेतील नोकऱ्यांत चिटकल्या. एम.एस्सी.च्या पहिल्या वर्षाला असताना पंजाब नॅशनल बँकेत अधिकारी पदासाठी मलाही मुलाखतीला बोलावणे आले होते; पण शिक्षण सोडून नोकरी, हा आज सहज वाटणारा निर्णय तेव्हा अगदी उलटा वाटला होता. यासाठी घरून वडिलांची परवानगी मिळणार नाही याची खात्रीच होती. आज त्यातल्या कुणी बँकेत लागलेल्या वर्गातील मुली भेटल्या, तर त्या दिवसांची आठवण निघते अन् स्मृतिरंजनात रमून जायला मिळते. आज वाटते, तेव्हा ती नोकरी पकडली असती तर आयुष्य अगदी वेगळे गेले असते. प्राध्यापकी, संसार अन् लेखन हे आज सहज सांभाळता आले; ते बँकेतील बदल्या असणाऱ्या नोकरीत करता आले नसते.

त्या वेळी व्याख्याने ऐकणे अन् मैत्रिणींबरोबर सिनेमे पाहणे, हा प्रकार काही काळ केला. राजेश खन्ना हा त्या वेळी अगदी फॉर्मात होता. अनेक जणी त्याचे फोटो वह्यांत ठेवत अन् त्याच्यासारखे दिसायचे, स्टाईल मारायचे प्रयत्न करणाऱ्या मुलांना बऱ्यापैकी भाव मिळत असे. पण मी जरा हुशार अन् त्यामुळे शिष्ट असा शिक्का बसलेली (हा का व कसा मिळाला, मला खरेच कल्पना नाही) असल्याने त्यापासून चार हात लांबच होते. मला मात्र सिनेमांपेक्षा व्याख्याने ऐकणे जास्त आवडे. कॉलेजात तर होतंच, पण बेळगावातही चांगले वक्ते येत अन् आपापले विचार मांडत. संघाचे अनेक वक्ते त्या काळात ऐकायला मिळाले. जगन्नाथराव जोशी, जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी असे राजकीय वा साहित्यातील अनेक दिग्गज त्या वेळी धडपडून वेळा सांभाळत ऐकले आहेत. विवेकानंदांचे स्मारक उभे करण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले श्री. एकनाथजी रानडे यांच्या व्याख्यानाने तर मी इतकी प्रभावित झाले होते की, कन्याकुमारीला जाऊन एक वर्ष राहायच्या त्यांनी मांडलेल्या योजनेत नाव घालू का, असे मी घरी आल्यावर बाबांना विचारले. एका आठवड्याने सांगतो, असे उत्तर देऊन नंतर बाबांनी मला त्यापासून परावृत्त केले. पुढे मात्र विवेकानंद यांची व्याख्यानांची पुस्तके वाचली अन् त्यांनी विशेषत: शिक्षणाबद्दल मांडलेले काही विचार याची मोहिनी अजूनही माझ्यावर आहे. कन्याकुमारीला जाऊन यायला हवे, हे तेव्हा मनाने ठरवले अन् लग्नानंतर माझे ते स्वप्न पूर्ण झाले.

कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असताना आम्हाला भा. रा. तांब्यांचा 'प्रणयसखा' हा काव्यसंग्रह अभ्यासाला होता. प्रा. अनंत मनोहर तो अगदी रंगून जाऊन शिकवत असत. मूळ कवितेपासून बरेच दूर भटकत एकूण मराठीचे संदर्भ देत ते शिकवत असत. अनेक नवी-नवी पुस्तके– ज्यांचा अभ्यासाशी काहीच संबंध नाही– त्यांचे ते दाखले देत. मग त्या पुस्तकात रस उत्पन्न होई अन् धडपड करून ती मिळवावीत, वाचावीत असे वाटे. परीक्षा जवळ नसेल तर तेही केले जाई. रविकिरण मंडळातील त्यांतील काही कविता आजही तोंडपाठ आहेत. त्यातील गेयता इतकी मनात रुतलेली आहे की, आजही मुक्तछंदातील वाचलेले, आवडलेले काव्य लक्षात राहत नाही; पण गेयतेमुळे ते काव्य मात्र परत-परत ओठांवर येत राहते. बाकी सायन्सचे विद्यार्थी आज भाषाविषय उरकून टाकतात तसे त्या वेळी खात्रीने करत नसत. भाषेसाठी वर्ग बदलावा लागत असे अन् सगळ्या म्हणजे केमिस्ट्री, फिजिक्स, बॉटनी, झूलॉजी, मॅथ्स मेजर वा मायनर असलेले एका भाषेचे विद्यार्थी एकत्र येत. तेव्हा धावत जाऊन वर्गात पुढचे बाक पकडण्यात आम्ही ठरावीक मुली अगदीच चपळाई दाखवत होतो. त्यावरून त्या वर्षी गॅदरिंगला मराठी मॅरॅथॉन या अर्थाचा फिशपाँडही घेतलेला आठवतो. आमच्या कॉलेजचे गॅदरिंग त्या वेळी भलते गाजत असे. अनेक मुले-मुली आपला कलाविष्कार त्या वेळी सर्वांपुढे आणत. त्यातील दोन डान्स वा गाण्याच्या कार्यक्रमाच्या मधल्या वेळेत कॉलेजचे वर्षभराचे बातमीपत्र तुकड्यातुकड्याने वाचण्यात येई. त्या वेळी कॉलेजातील सर्व मजेदार घडामोडी विनोदी ढंगात सांगितल्या जात. त्यात काही तरुण प्राध्यापकांचीही फिरकी घेतली जाई. कुणाकुणाच्या खास मैत्रीचे आडून उल्लेख होत. एकतर्फी प्रेमाची अनेक प्रकरणे असत त्याचे भजे तळले जाई. सगळ्या मुलांना संबंधित मुलगा वा मुलगी ठाऊक असे, पण नावे, स्पष्ट नावे घेतली जात नसल्याने कुणाला तक्रार करता येत नसे. उदा. शनिवार दिनांक सतरा डिसेंबर. दुपारचे दोन वाजले होते अन् फिजिक्स प्रयोगशाळेच्या बाहेर एक समरप्रसंग घडला, असे आमचा खास बातमीदार सांगत आहे. श्रीयुत सोमाजी गोमाजी कापसे यांनी कुमारी अमकी ढमकी टिमकी यांना अडवून हातात गुलाबी पत्र ठेवले. त्या पत्राचा सुगंध बाजूच्या रसायनशास्त्राच्या लॅबमधून येणाऱ्या एचटूएस (हा एक उग्र दुर्गंध असलेला वायू आहे) पेक्षा तीव्र होता. कुमारी टिमकी यांनी त्याच पत्राचे तुकडे करून श्रीयुत कापसे यांच्या तोंडावर इतक्या जोराने फेकले की, श्रीयुत कापसे बेशुद्ध पडले. मग वर्षभर बंद असलेली प्रथमोपचाराची पेटी उघडून फिजिक्सचे लॅब सुपरवायझर श्री. बडमंजी (हे नाव तेवढे खरे असे) यांनी प्रसंगावधान दाखवून त्यांच्यावर उपचार केले. या कामी प्राध्यापक न्यूटन यांनी विशेष कामगिरी बजावून प्रकरण प्राचार्यांपर्यंत जाऊ दिले नाही, असे आमचा खास बातमीदार कळवतो.

अर्थात, असे काहीतरी वर्षभरात घडलेले असे अन् ते सर्व विद्यार्थ्यांना ठाऊक असल्याने मोठमोठ्याने आरडाओरडा करून

त्या बातमीला दाद दिली जाई. संपूर्ण कार्यक्रमभर असल्या बातम्या दिल्या जात. फिशपॉन्ड घ्यायला तर मला चारही वर्षे स्टेजवर जावे लागले आहे. कॉलेजात त्या वेळी मोजून दहा-बारा जणी सायकल घेऊन येत. (आज आमचा प्रशस्त पार्किंग लॉट शेकडो स्कूटर्सनी भरून वाहत असतो) त्यांतील एक मी होते. पावसाळ्यात मग एकदोनदा कुणाकुणाशी टक्कर झाली तर लगेच त्याचे फिशपॉन्डमधून पडसाद उमटले, 'हमसे जो टकरायेगा, हमारे साथ मिट्टीमे मिल जायेगा', 'कधी मी सायकलवर, तर कधी सायकल माझ्यावर' हे त्यातले काही आजही स्मरणात आहेत.

शेवटच्या वर्षाला असताना एका मुलाने गॅदरिंगला मला उद्देशून कोणते तरी गाणे म्हटले, हे सर्वांना कळले अन् नंतर लगेचच एक दिवस त्याच्या मित्राने आपल्या वळणदार अक्षरात हाताने लिहिलेली पत्रिका माझ्या हातात कोंबून सुंबाल्या केला. त्यात उल्लेख होता– ''कु. अभ्यासे यांचा शुभविवाह श्रीयुत मुकेशकुमार यांच्याबरोबर निश्चित केला आहे. हा सोहळा लायब्ररीत साजरा होईल, कारण कु. अभ्यासे यांची तशी इच्छा आहे. मंगलाष्टके खुद्द नवरा मुलगाच म्हणणार आहे. एका आयकार्डवर एकच जिलबी इश्यू करण्यात येईल अन् वरात सायकलवरून काढण्यात येईल. रात्री नाईट लायब्ररीची वेळ संपल्यावरच कु. अभ्यासे बाहेर येतील अन् वरातीचा कार्यक्रम होईल. तरी सर्वांनी एन.सी.सी. पोषाखात उपस्थित राहावे.'' वगैरे वगैरे.

या मित्राचे आज बेळगावातच औषधाचे दुकान आहे अन् ते कॉलेजच्या वाटेवर आहे. कधीतरी औषध घेण्यासाठी माझे जाणे होते. आता त्याच्यासोबत त्याचा मुलगा असतो, 'तुझ्या बापाने कॉलेजात असताना कसले कसले उद्योग केले होते पाहा' असे त्याला सांगावेसे माझ्या मनात येते.

कॉलेजात खेळांनाही चांगले प्रोत्साहन दिले जाई; पण मला तेव्हापासून गुडघ्याचा त्रास होता, म्हणून मैदानी खेळात कधी भाग घेतला नाही. पण टेबलटेनिस खेळलेले आठवते. एक वर्ष कॉलेजातील सर्वांत उत्तम खेळणाऱ्या अन् युनिव्हर्सिटी ब्ल्यू असलेल्या मुलाबरोबर मिक्स डबल्स खेळून कपही मिळवला. पण त्यात काहीच अर्थ नव्हता. सगळा खेळ त्यानेच सांभाळला होता.

शाळेच्या हस्तलिखितात मी काहीबाही लिहिले होते, पण कॉलेजात मात्र काही लिहिले नाही. कारण काहीच नाही. मासिकात लिहायची वेळ अन् प्रिलिम्स एकाच वेळी येत असल्याने असे झालेले असावे.

या काळात वाचन अन् फिजिक्स या दोन गोष्टी माझ्या आयुष्यात इतक्या घट्ट रुजल्या की, आज या दोघांशिवाय मी माझे आयुष्य कल्पूच शकत नाही. बाकी कुणी कुणी पत्रे लिहिली, कविता केल्या, कुणी धीटपणे विचारणाही केली; ते सगळे आवडत होते, हे मी नाकबूल करणार नाही. पण पुढे भरपूर शिकायचे, हे डोक्यात इतके फिट्ट बसलेले होते की, ती वाट आपली नाही, हे ठाम ठरवूनच टाकले होते किंवा मनापासून त्यातील कुणी भावले नाही, असेही झाले असेल. अपेक्षेप्रमाणे बी.एस्सी.च्या शेवटच्या वर्षात मला फर्स्ट क्लास मिळाला अन् विद्यापीठात प्रवेशही मिळाला. माझे घडणे विद्यापीठात जास्त खोलवर झाले, असे आज मी खात्रीने म्हणू शकते. माझ्या फिजिक्स विषयात अठ्ठेचाळीस मुले अन् आम्ही दोघीच मुली होतो. त्यात सॉलिड स्टेट फिजिक्स अन् इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची काही लेक्चर्स एकत्र असत. त्या वर्गात मी एकटीच होते. त्यामुळे वर्गात पहिल्याच बाकावर बसावे लागे अन् प्राध्यापक शिकवत असताना जांभई आली तर फार पंचाईत होई. डॉ. कृष्णमूर्ती हे क्वांटम स्टॅटिस्टिक्स हा कठीण विषय अगदी सोपा करून शिकवणारे माझे अतिशय आवडते प्राध्यापक, तर अनेकदा माझ्याचकडे बघून शिकवत. तेव्हा जर काही कळले नाही, तर तसे भाव आपसुक चेहऱ्यावर उमटत अन् मग ते वर्गात सरळ विचारत, ''मिस प्रभू, आय थिंक यू आर नॉट अटेन्टिव्ह इन द क्लास.'' डॉ. मुलिमनी यांचे फिजिक्सचे आकलन इतके थोर होते की शिकवताना ते क्वचितच पुस्तक वा नोट्सचा वापर करत. पुढे ते गुलबर्गा विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले. चंद्रशेखर सुब्रमणियम यांच्यावर मी पुस्तक लिहावे, अशी त्यांनीच मला प्रथम सूचना केली अन् आपल्याजवळ असलेली त्यांच्यावरची पुस्तकेही पाठवून दिली.

विद्यापीठात मात्र मी पहिल्या वर्षी होस्टेल अन् दुसऱ्या वर्षी लेडिज सेक्रेटरी होते. अर्थात दोघी जणी असल्याने ती जबाबदारी पेलणे सोपे जात असे. तिथे भाषणे द्यायला खूप मोठे नावाजलेले लोक येत. 'युजिब' ही विद्यार्थ्यांची संघटना होती अन् त्यातर्फे पक्षितज्ज्ञ सलीम अली यांनी भेट दिली होती.

जेमतेम तिशीत असलेले देखणे गिरीश कर्नाड यांना सेक्रेटरी म्हणून बुके देताना मी मुद्दाम इतर मुलींशी पैज लावून शेकहॅन्ड केला होता. अव्वल इंग्रजीत त्यांनी भारतीय अन् इंग्लिश नाटकांवर युजिबच्या व्याख्यानमालेत इतके अप्रतिम भाषण दिले होते की, दिडेक तास सर्व विषयांचे प्राध्यापक अन् आम्ही विद्यार्थी 'स्पेलबाऊंड' अवस्थेत होतो. आजही डोळे मिटले की, त्यांची पांढरा शुभ्र झब्बा अन् सुरवारमधील गोरीपान उंच मूर्ती डोळ्यांसमोर येते. त्यांची शरीर भाषा इतकी जिवंत, की आजही मी ऐकलेल्या सर्वोत्कृष्ट व्याख्यानात त्या व्याख्यानाचा नंबर अगदी वरती आहे. त्या भाषणानंतर मी अनेक इंग्लिश नाटके अगदी रस घेऊन वाचली. आज लिहिताना शब्दांतून डोळ्यांसमोर दृश्य उभे करताना त्या वाचनाचा मला नकळत उपयोग होतो.

एक वर्ष प्रकाश पदुकोण बंगलोर विद्यापीठातर्फे आंतरविद्यापीठीय बॅडमिंटन स्पर्धा खेळायला आला होता. त्याने तर सगळे कॅम्पस जिंकले. इतका ग्रेसफुल खेळ क्वचितच पाहायला मिळतो. दुसऱ्या वर्षी खो-खो सामने झाले, तेव्हा महाराष्ट्रातील पुण्याची टीम करंडक पटकावून गेली होती. या अन् अशा सर्व कार्यक्रमांच्या आयोजनात सेक्रेटरी म्हणून भाग घेताना बरेच काही शिकता

आले. कॉलेजात मी कधी स्टेजवर नाटकात वा इतर कशात भाग घेतला नव्हता, ती कसर विद्यापीठात भरून काढली. तसा अभ्यासही दणकून केला. त्याशिवाय गत्यंतरच नव्हते. रात्री जागणाऱ्या मुली अडीच वाजता सकाळी उठणाऱ्या मुलींना जागे करून मग झोपत असत. मग सकाळपर्यंत अभ्यास करून सात वाजता फिरून यायचे अन् येताना बाहेरचा चहा अन् डोसा खायचा, हे ठरलेले. तिथल्या होस्टेलच्या जीवनात ज्या मैत्रिणी झाल्या, त्या आजही माझ्याशी संपर्कात आहेत. दोन्ही वर्षीची एकतीस डिसेंबरची रात्र, रंगपंचमी असले सण तर कधीही विसरू नयेत इतक्या त्यांच्या आठवणी रंगतदार आहेत.

मला वाटते की, प्रत्येक मुलीने व मुलाने काही काळ तरी होस्टेलमध्ये राहायला हवे. स्वतंत्र राहिल्याने अनेक नव्या गोष्टी शिकता येतात. आम्ही जरी एकत्र कुटुंबात होतो तरी जेवण्या-खाण्याच्या बऱ्याच खोडी होत्या. पडवळ आवडत नाही अन् मासळीशिवाय जेवण घशाखाली उतरत नाही. रोज ग्लासभर तरी ताक हवे. घरी रात्री दूध प्यायचे म्हणजे प्यायलाच हवे, असा नियम. पण इथे सगळ्यांबरोबर पानात पडेल ते खाताना आपोआप या खोडी नाहीशा झाल्या अन् सुग्रास आवडीच्या अन्नाची किंमत कळली. त्यानंतर कधीही, काहीही खायला पोटाने नकार दिला नाही. घराची सुरक्षितता इथे नसल्याने पहिल्यांदा बावरायला झाले, पण नंतर कधी एकटी कुठेही जायला कधी भीती वाटली नाही. अगदी परदेशातही एकटीने फिरायला कधी धास्ती वाटली नाही. मी व माझी एकच वर्ष पुढे असलेली बहीण दसऱ्याला म्हैसूरला जाऊन तो सोहळा बघून आलो. कुंदगोळला भीमसेन जोशी तेव्हा सवाई गंधर्व पुण्यतिथीला मैफल करत, तिला हजेरी लावली. त्या दोन वर्षांनी अगदी बोल्ड केले.

प्रवेशासाठी जेव्हा माझी मुलाखत घेतली गेली, तेव्हा फिजिक्स विभागप्रमुख अन् माझ्या विषयाचे म्हणजे सॉलिड स्टेट फिजिक्सचे प्राध्यापक डॉ. सूर्यनारायण राव होते. त्यांनी सरळ म्हटले, फक्त मार्क आहेत म्हणून एका मुलाची जागा कशाला अडवता? तुम्ही मुली उद्या लग्न करून शिकलेले सगळे वायाच घालवणार आहात. त्यांच्यासोबत डॉ. उमाकांत हे पुढे अगदी फेव्हरिट झालेले प्राध्यापक होते. त्यांनी लगेच म्हटले, ''मिळवलेले ज्ञान अन् शिक्षण कधीच फुकट जात नाही.'' तेव्हाही विभागात बरेच तू-तू, मै-मै चालायचे अन् ते आम्हा विद्यार्थ्यांसमोर असे प्रकट होत असे. अर्थात, हे मला नंतर बऱ्याच दिवसांनी कळले. माझ्या दोघी मोठ्या सख्ख्या बहिणी याच विभागात स्पेक्ट्रोस्कोपी घेऊन एम.एस्सी. झालेल्या होत्या अन् त्या उमाकांतसरांच्या भक्त होत्या. न्यूक्लिअर फिजिक्स शिकवावे तर त्यांनीच, असे त्यांनी मला आधीच सांगून ठेवलेले होते आणि ते अगदी शंभर टक्के खरे ठरले.

मग मी जेव्हा या कॉलेजात प्राध्यापकी स्वीकारली, तेव्हा डॉ. एस. एन. रावसरांना मुद्दाम जाऊन भेटून सांगून आले आणि त्यांनीही हसत-हसत मला शुभेच्छा दिल्या.

त्या वेळी वर्गात बहुसंख्य मुले कानडी होती. नव्याने उदयाला येणाऱ्या संगणकक्षेत्रात बहुतेक जण गेले अन् मोठमोठ्या नोकऱ्या त्यांना उपलब्ध झाल्या. काही जण बँकेत एकदम अधिकारी ग्रेडला गेले. तेव्हाचे डॉ. सवदती, डॉ. कोरवार यांचे शिकवणे अतिशय आवडलेले होते. जेव्हा मी प्राध्यापकी पत्करली, तेव्हा डोळ्यांसमोर त्यांचेच शिकवणे आदर्श म्हणून ठेवले होते.

विद्यापीठात स्वातंत्र्य जास्त असल्याने आयुष्य जास्त रंगीत होते. कितीतरी मुलींनी जोडीदार पकडले होते. माझी अन् मोहनची भेटही तिथेच झाली. नंतर शिक्षण संपल्यावर दोन्ही घरी सांगून लग्न झाले.

असे हे फुलपाखरासारखे उडून गेलेले दिवस! रंग, गंध अन् सूर असलेले. शनिवारी बेळगावला यायची ओढ तीव्र की सोमवारी परतायची, हे सांगणे कठीण व्हावे इतके तिथे रमून जायला झाले.

एक मात्र खात्रीने सांगेन– असे जडणघडणीचे दिवस प्रत्येकाच्या आयुष्यात जन्मल्यापासून सुरू होतात; ते आपली नवे शिकण्याची ऊर्जा असेपर्यंत सोबत करतात. कॉलेजजीवनात चमकलेल्या मुली नंतर अगदी स्वस्थ बसून आपल्या कोशात गुरफटून गेलेल्या मी अनेकदा पाहिल्या आहेत. अन् तिथे अगदीच सामान्य असलेल्या मुली नंतर आयुष्यात भरीव असे काहीतरी केलेल्या पाहिल्या आहेत. मी स्वत: लेखिका होईन, हे इतरांना सोडाच, खुद्द मलासुद्धा कधी वाटले नव्हते. लेखनात, प्राध्यापकीत अन् संसारातही आनंद असतो; तो आपण शोधायचा असतो. नाहीतर लेखन हे कष्ट वाटतात, प्राध्यापकी पाट्या टाकणे होते अन् संसार तर असार आहे, हे सर्वांनी इतक्यांदा कंठशोष करून सांगितले आहे की कुणी कधीच लग्न केले नसते. हे सगळे सुखाचे मार्ग आपल्या आत बंद असतात. शिक्षणाने त्यांची दारे किलकिली होतात; प्रामाणिक कष्ट अन् दैवाची साथ मिळाली की, आपल्याला सापडू शकतात. सदैव सकारात्मक भूमिका ठेवली तर वाट्याला आलेली दु:खे चटकन विसरता येतात. जे वाट्याला आले, त्याची चांगली बाजूच पाहता, अनुभवता येते.

आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना सगळे जीवनच एक शाळा व कॉलेज आहे, असे मी खात्रीने म्हणू शकते आणि 'थांबला तो संपला' हे कविवर्यांचे उद्गार 'शिकायचे थांबला तो संपला' असे बदलायला हवेत, याची प्रचीती येते.

**प्रा. माधुरी शानभाग**
७९४, खानापूर रोड, टिळकवाडी,
बेळगाव ५९० ००६.
फोन नं. - ०८३१-२४४०५४०
mmshanbhag@rediffmail.com

# किरण बेदी यांची साहित्यसंपदा अनु. माधुरी शानभाग




## ॲज आय सी... स्त्रियांचे सक्षमीकरण...

''सतत शिकणे अन् मिळालेले ज्ञान वाटून घेणे यावर माझा पूर्ण विश्वास आहे. मी जे पाहते, ऐकते, वाचते त्यातील जे मला अस्वस्थ करते, त्याबद्दल लिहिणे हे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते. विशेषत: स्त्री आणि तरुण यांच्या सक्षमीकरणासाठी सर्वांनी सजग राहून कृती करायची गरज आहे. लेखणीची ताकद वापरून, सामान्यांचा आवाज जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी हाती निशाण धरायचे काम मी यापुढेही करत राहीन.''

डॉ. किरण बेदी यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या प्रश्नांवर लिहिलेल्या लेखांचे हे संकलन, वाचकांना स्त्रीप्रश्नांबद्दल संवेदनशील करेल आणि प्रतिसाद द्यायला, कृती करायला उद्युक्त करेल.

**१४०रु.** पोस्टेज २५रु.

---

## ॲज आय सी...भारतीय पोलीस सेवा...




''आपण सर्व स्वत:च्या कृतीचे पोलीस झालो तर ती फार मोठी क्रांती ठरेल.''

''सुधारणा, वाईट गोष्टी रोखणे आणि चांगल्याचा अंमल करणे, यासाठी पोलीससेवेची सत्ता वापरता येते.''

''ही सेवा मानवी हक्कांचे संरक्षण करू शकते अन् पायमल्लीही करू शकते, यातील काय निवडायचे ते या सेवेत असणारे आणि येऊ पाहणारे, यांनीच ठरवायचे आहे.''

''आज आपल्या देशातील पोलीस सेवा काही राजकारणी वापरतात, आपला वापर होऊ द्यायचा की नाही हे आपणच ठरवू शकतो.''

''ही सेवा सुलभ आणि परिणामकारक व्हायची असेल, तर सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने वाटचाल करायला हवी. असे द्रष्टे, कुशल, समर्पित नेतृत्व या सेवेतून पुढे यायला हवे अन् ते तळापर्यंत झिरपायला हवे आहे.''

पोलीससेवा अधिकाधिक लोकाभिमुख आणि नीतिमान कशी होईल यावर आपल्या दीर्घ, डोळस अनुभवाचे विचार मांडणाऱ्या डॉक्टर किरण बेदी, वाचकांना या पुस्तकाद्वारे आपल्या संवेदना, सहभाग आणि प्रतिक्रिया देण्यासाठी उद्युक्त करतात.

**१३०रु.**
पोस्टेज २५रु.

---




## ॲज आय सी...नेतृत्व आणि प्रशासन...

आपल्या स्पष्ट आणि निडर स्वभावाला अनुसरून डॉ. किरण बेदी अनुभवाला आलेल्या अनेक आक्षेपार्ह बाबींवर, भावलेल्या विषयावर कळकळीने लिहीत असतात. साध्या अनलंकृत शैलीतील हे लेखन सामाजिक अन् नैतिक विषयावरील त्यांची मते मांडत असते. या विषयांवर जनतेने जागृत होऊन विचार करावा, सजग व्हावे आणि एकत्र येऊन कृतिशील व्हावे हा हेतू मनात धरून त्या लिहीत असतात. देशातील सर्वसामान्यांना माहीत असलेल्या, नसलेल्या समस्यांवर लिहिलेले वाचताना, वाचकांना डॉ. किरण बेदींची एक संवेदनशील अधिकारी म्हणून ओळख होते. त्यांचे लिखाण वाचकांना सरकार, प्रशासन याबद्दल विचारप्रवृत्त करते.

**१८०रु.** पोस्टेज २५रु.



# माय डियर स्टुण्डट्स

रेणू गावस्कर

**वसंत बापटांनी आम्हाला मराठी शिकवलं. बापटसर शुद्धलेखनाच्या संदर्भात अतिशय कडक होते. मराठी भाषेच्या विषयांत त्यांना जराही ढिसाळपणा चालत नसे. सर कविता शिकवायला लागले की, अंतर्बाह्य बदलून जात. सरांची कविता म्हणण्याची तडफ, शब्दांवरचं त्यांचं प्रभुत्व– या सगळ्यांची आठवण येते व मन भरून येतं.**

शालांत परीक्षेत मला बऱ्यापैकी मार्क मिळाले. बऱ्यापैकी म्हणजे त्या काळी (चाळीस वर्षांपूर्वी) जेवढे मार्क मिळत, त्या तुलनेनं बरे-किंवा चांगले. आताच्या तुलनेत तेवढे मार्क म्हणजे प्रचंड निराशाच. तर, असे बरे मार्क मिळाल्यामुळे कोणत्या शाखेत प्रवेश घ्यावा, याविषयी आप्तजनांकडून प्रेमळ सूचना येऊ लागल्या. पण मी मात्र आर्ट्स शाखेकडे प्रवेश घ्यायचा, असं नक्की ठरवून टाकलं होतं. त्याचं अगदी नेमकं कारण आठवत नसलं तरी इंग्रजी भाषेकडे असलेला माझा ओढा, हे असावं. माझ्या वडिलांचा माझ्या या निर्णयाला बऱ्यापैकी पाठिंबा होता. तेव्हा माटुंग्याचं रामनारायण रुईया कॉलेज हे अभ्यासू मुलांचं कॉलेज म्हणून ओळखलं जाई. त्यामुळे तिथं प्रवेश घ्यावा, असं सर्वानुमते ठरलं व मी कॉलेजात दाखल झाले.

'दाखल झाले' असं लिहिलं आणि लेखणी थांबली. वाटलं, तसं खास काय झालं आपल्या कॉलेजजीवनात? उल्लेखनीय असं काहीच नाही. एकापाठोपाठ शैक्षणिक वर्षांत उत्तीर्ण होत गेले. बी. ए. झाल्यावर त्याच कॉलेजमधून एम. ए. करायचं ठरवलं व तेही पूर्ण झालं.

मला वाटलं, फक्त एवढंच झालं? वरवर अगदी सामान्य वाटणाऱ्या कॉलेजजीवनातही जडणघडणीची एक प्रक्रिया घडतच असते. खूप वर्षांनी मागे वळून बघताना ती जाणवते, समजते व तिचं अप्रूप वाटतं. याचं एक छोटंसं उदाहरण देते. कॉलेजच्या पहिल्या वर्षात तास बुडवणं, कॉलेज बुडवून सिनेमाला जाणं याचं फार अप्रूप वाटायचं. आपण असं काही करतो आहोत म्हणजे खास काही करतो आहोत, असा समज व्हायचा. पहिली एक-दोन वर्षं तो टिकलाही. मग हळूहळू त्याची नशा उतरत गेली आणि असं करण्यातलं वैयर्थ्य जाणवायला लागलं. मला आठवतंय की, मी एम. ए.ला असताना इतका अभ्यास करायला लागले की, प्रथम वर्षापासून अत्यंत अभ्यासू असणाऱ्या माझ्या मैत्रिणी माझ्या घासूगिरीवरून मला चिडवायला लागल्या.

रुईया कॉलेज हे तसं मौजमजा, धमाल करणाऱ्यांचं म्हणून कधीही प्रसिद्ध नव्हतं. आमच्या वेळेला धमाल करणाऱ्यांचा रूपारेल कॉलेजकडे ओढा होता. कीर्ती कॉलेज तर त्याहून मक्ता 'नावाजलेलं' होतं. त्या मानानं रुईया कॉलेज 'स्कॉलर' मुलांचं कॉलेज होतं. खरं तर ती एक

सुधारित शाळाच होती म्हणा ना! फक्त शाळेच्या मानानं खूप प्रशस्त, विशाल आणि सुंदर.

त्या दिवसांची आठवण काढताना सर्वांत आधी आठवतात ते आमचे महाशब्दे सर. आम्हाला अकरावी, बारावीला संस्कृत शिकवायचे. पण वर्गात आले की, गच्च भरलेल्या वर्गाकडे बघून (चष्म्यावरून) म्हणायचे, My dear students... मग एक-दोन मिनिटं संपूर्ण शांतता. नंतर शिकवणं सुरू.

चष्म्यावरून बघणारे ते प्रेमळ डोळे, मोठ्या चेहऱ्यावरचे ते अतिशय सुंदर भाव कायमचे मनात घर करून बसले. आज इतक्या वर्षांनी महाशब्देसरांनी काय शिकवलं, कसं शिकवलं यापैकी काहीच आठवत नाही. आठवतंय ते एवढंच की, वर्गात प्रवेश केल्या-केल्या लागलीच त्यांनी आम्हाला केव्हाच शिकवलं नाही, ते काही क्षण थांबायचे, आमच्याकडे अतिशय प्रेमानं बघायचे आणि म्हणायचे, My dear students...

हे इतकं सविस्तर अशासाठी लिहिलं की, त्या वयात आपल्याला काय मिळालंय याची कल्पनाच आली नव्हती; पण पुढे अनेक लहान मुलांशी जोडली गेले, त्यांचं भावविश्व समजून घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा आपल्याला काय मिळालं होतं याची अचानक जाणीव झाली. रोहित नावाचा एक अतिशय बुद्धिमान व संवेदनशील मुलगा माझ्याकडे इंग्रजी पुस्तकं वाचायला यायचा, काही वर्षांपूर्वी. एकदा सहज बोलता-बोलता तो म्हणाला, ''शाळेत आमचे सर वर्गात आले की आमच्याकडे बघतच नाहीत. सरळ शिकवायला लागतात. असं झालं की, माझं अभ्यासात लक्षच लागत नाही. काहीतरी चुकलंय, असं वाटतं.''

हे ऐकताना रोहितचं संवेदनशील मन तर जाणवत होतंच, पण त्या जाणिवेसोबतच एकदम आठवण आली ती महाशब्देसरांची. त्यांच्या My dear students... या प्रेमळ शब्दांची. त्यानंतर त्यांनी घेतलेल्या 'पॉझ'ची. त्या प्रेमळ डोळ्यांनी, त्या मधुर शब्दांनी व त्या पॉझनं आम्हाला एक संवेदना बहाल केली.

वसंत बापटांनी आम्हाला मराठी शिकवलं. बापटसर शुद्धलेखनाच्या संदर्भात अतिशय कडक होते. किंबहुना, मराठी भाषेच्या विषयांत त्यांना जराही ढिसाळपणा चालत नसे. त्यांचा आम्हाला वचक वाटायचा. पण सर कविता शिकवायला लागले की, अंतर्बाह्य बदलून जात. सरांची कविता म्हणण्याची तडफ, शब्दांवरचं त्यांचं प्रभुत्व– या सगळ्यांची आठवण येते व मन भरून येतं. पुढे खूप वर्षं गेली व बापटसरांच्या ऐंशीव्या वाढदिवसाला जाण्याचा योग आला. व्यासपीठावर बापटसर, श्री. पु. भागवत व इतरही कितीतरी मान्यवर मंडळी बसली होती. किती विकल दिसत होते बापटसर! माझ्या नजरेसमोर मात्र तारुण्यातले तडफदार सरच दिसत होते. कार्यक्रमाच्या दरम्यान बापटसरांना बोलण्याची विनंती करण्यात आली. सर उठून बोलू शकत नव्हते, म्हणून माईकची टेबलापाशी व्यवस्था करण्यात आली. सुरुवातीला अगदी हळू आवाजात बोलणाऱ्या सरांची गाडी अगदी हळूहळू शुद्धलेखन या विषयावर आली व तोपर्यंत विकल दिसणारे बापटसर सावकाशीनं बदलताना दिसले. मराठी भाषेशी खेळ करणाऱ्यांवर त्यांनी चांगलंच तोंडसुख घेतलं व असं केल्यास भाषाप्रेमिक कडक भूमिका घेतल्याशिवाय राहणार नाहीत, अशी सक्त ताकीदही दिली. ते दृश्य बघताना मन समाधानानं भरून आलं. कॉलेजचे दिवस आठवले व बापटसरांची 'दख्खनची राणी' ओठांवर अवतरली. मात्र कार्यक्रमाच्या शेवटी बापटसरांच्या एकुलत्या एक मुलाच्या अकाली मृत्यूचा उल्लेख झाला व श्री. पु. भागवतांनी 'भिंत खचली, कलथून खांब गेला' या काव्यपंक्ती म्हटल्या, त्या वेळी सारं सभागृहच गदगदून गेलं.

मेधा पाटकर या रुईया कॉलेजच्या विद्यार्थिनी होत्या. माझ्या एक-दोन वर्ष मागे होत्या त्या. त्या वेळी त्यांचं नाव मेधा खानोलकर होतं. वक्तृत्व स्पर्धेतील सगळी बक्षिसं त्या घेऊन जायच्या. सामाजिक कामात पुढं असायच्या. त्यांच्या नावाला तेव्हाही वजन होतं. आमच्या कॉलेजात सामाजिक कामाला खूप प्रोत्साहन मिळायचं. अंधांना वाचून दाखवणं, गरीब-गरजू विद्यार्थ्यांना मदत करणं, अशी काम विद्यार्थी आनंदानं करायचे. खूप व्याख्यानमाला व्हायच्या. अनेक नामवंत वक्ते कॉलेजात यायचे. वक्तृत्व स्पर्धांत भाग घेण्यासाठी उत्तेजन दिलं जायचं. या वातावरणाचा मनावर परिणाम होत असलाच पाहिजे किंवा तो होतोच, असं मला वाटतं. फक्त कित्येकदा या गोष्टी त्या वेळी जाणवत नाहीत.

मेधा पाटकरांचा उल्लेख करतेय, तेव्हाच आणखी एका सहाध्यायीची आठवण झाली नाही, असं होणारच नाही. या सहाध्यायीचं नाव आहे उल्हास गुंजाळ. उल्हास गुंजाळ हा आम्हा शंभर-एक मुलींच्या वर्गातला एकमेव मुलगा असावा. एखाददुसरा मुलगा आणखीही असेल वर्गात, पण नियमित हजेरी असायची ती उल्हासचीच. उल्हासच्या व्यक्तिमत्त्वाचा माझ्या मनावर खूप खोल परिणाम झाला. आमचं सर्वांचं वय किती कोवळं होतं त्या वेळी. पण तेव्हाही उल्हासमध्ये असलेली विलक्षण समज आणि मार्कांकडे बघण्याचा अलिप्त दृष्टिकोन याचा अगदी हेवा वाटायचा. उल्हासला प्रत्येक परीक्षेत खूप मार्क मिळायचे. शिक्षकांच्या हातून पेपर्स घेऊन येताना आम्ही मुली त्याचे पेपर्स मागायचो. अतिशय निर्विकार मुद्रेनं ते पेपर्स उल्हास आमच्या हातात द्यायचा. त्यानं ते पेपर्स आमच्यापाशी कधीच परत मागितले नाहीत. जणू त्या पेपर्सशी, त्या मार्कांशी त्याचा काहीच संबंध नव्हता! उल्हास कधीच केस विंचरत नसे. त्याचे केस कायम विखुरलेले असत. त्यामुळे प्रत्येक स्नेहसंमेलनात त्याला एक कंगवा भेट मिळायचा. उल्हास ती भेटही तितक्याच निर्विकारपणे स्वीकारत असे. असा अलिप्त दृष्टिकोन आपल्यामध्ये रुजावा, असं तेव्हापासून वाटत आलं.

जवळपास पंचवीस वर्षांनी उल्हासची पुन्हा एकदा एका लग्नात भेट झाली. आता तो वर्ल्ड बँकेत एका मोठ्या पदावर आहे. मोठ्या मानसन्मानाचा धनी झाला आहे, पण आहे तसाच. होता तितकाच साधा आहे. फक्त आता केसांनी रजा घेतली आहे. (कंगव्याचा उपयोग नाही.)

उल्हास भेटल्यावर पुन्हा एकदा जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. कॉलेजच्या कितीतरी आठवणी निघाल्या. खूप हसू आलं; पण त्याचसोबत आता ते सोनेरी दिवस फिरून कधीच येणार नाहीत, आपण परत कधीच मागे जाऊ शकणार नाही, या जाणिवेनं मन उदास झालं.

कॉलेजजीवनाकडे वळून बघताना मनात रेंगाळत राहिलेल्या व्यक्ती जसं आपलं अस्तित्व दाखवून देतात, तसेच कितीतरी प्रसंगही खुणावत राहतात. आश्चर्य वाटतं की, इतकं सगळं जसंच्या तसं राहिलं मनात? इतकी वर्षं झाली आहेत हे प्रसंग घडून, पण त्यावर विस्मरणाची धूळ बसलीच नाही? जडणघडण म्हणतात ती हीच तर नव्हे? क्षणाक्षणानं आणि कणाकणानं आयुष्य बांधलं जातं, म्हणजेच ते घडतं; होय ना?

तर आठवतंय असं की, मी एकदा कोणत्यातरी स्पर्धेत भाग घेतला होता. त्या स्पर्धेतील विजेता म्हणून मला ब्रेबॉर्न स्टेडियमवरील एका क्रिकेट सामन्याचं तिकीट लागलं. ज्यांना-ज्यांना ते कळलं; त्यांनी एकच जल्लोष केला. ओळखीच्या मुलांनी मला घेरलं व ते तिकीट माझ्याकडून अलगद काढून घेतलं. मीही ते दिलं. मिळालेल्या धन्यवादावर मी खूष झाले. हल्लीच्या काही तरुणांना ही गोष्ट सांगितल्यावर त्या तरुणाईनं मला वेड्यातच काढलं, ''अहो, त्या मुलांनी ते तिकीट ब्लॅकमध्ये विकून पैसे केले असणार. तुमचा वाटा होता त्यात.'' असं सांगत असताना आजच्या तरुणाईच्या डोळ्यांत माझ्या बावळटपणाचं (ज्याला मी साधेपणा म्हणते) प्रतिबिंब स्पष्ट उमटलेलं दिसलं. मला मात्र वाटलं की, त्या वेळी आम्ही कोणीच इतके स्मार्ट नव्हतो. मागितलं तिकीट; दिलं ते. ज्यांना दिलं, ते जाऊन मॅचच बघतील, अशी खात्री वाटली.

आणखी एक प्रसंग आठवतो. एकदा अगदी सकाळीच कॉलेजजवळच्या परिसरात एकाएकी पोलिसांच्या गाडीचे हॉर्न वाजू लागले. गाड्या आल्या, त्यातून धडाधडा पोलीस खाली उतरले. कॉलेजजवळच्याच एका इमारतीला त्यांनी वेढा घातला. गर्दी करणाऱ्या आम्हा विद्यार्थ्यांना घालवून दिलं. पुढे कळलं की, त्या इमारतीत कॉलगर्ल्सचा व्यवसाय चालत होता. चांगल्या घरांतील मुली घरी नोकरीला जाते, असं सांगून तिथं येत होत्या. तो सगळा प्रकार भयानक होता. कितीतरी दिवस त्या घटनांचे पडसाद उमटत होते. नंतर समजलं की, काही मुली यावर आपल्या पूर्ण कुटुंबाचं-पालन पोषण करीत होत्या, तर काही मुली चैनीसाठी हे पैसे वापरत होत्या.

आज याच गोष्टी किती सर्वदूर पसरलेल्या पाहतो आहोत आपण. सामाजिक विषमता हेच कारण त्याच्या मुळाशी आहे. जे दुसऱ्यांना सहज मिळतं, ते आपल्याला मिळू शकत नाही; ही जाणीव अनेक अनिष्ट गोष्टी करण्यास प्रवृत्त करते.

वाईट अशाचं वाटतं की, हे सगळं समजण्याइतकी माझी बुद्धी परिपक्व नव्हती. मी कॉलेजमध्ये असताना कोणत्याही सामाजिक चळवळीत भाग घेतला नाही. समस्या समजून घेतल्या नाहीत. अभ्यास केला आणि उत्तम मार्कांनी पास झाले. त्या वेळी याचं अप्रूप वाटायचं, कुटुंबात कौतुक व्हायचं. आज त्यातलं वैयर्थ्य समजतं. मार्क मिळाले, पण त्या-त्या विषयातलं किती समजलं, असा विचार मनात येतो. त्याहीपेक्षा त्या सोनेरी दिवसांची मजा लुटतानाच आसपासच्या पर्यावरणाशी नातं जोडून घेतलं नाही याची खंत वाटते. पण कधी कधी मनात येतं– पुढं वंचित मुलांशी जोडून घेताना अनेकदा शाळा-कॉलेजातील अनेक बाबी आठवल्या, शिक्षकांचं स्मरण झालं, त्यांनी दाखवलेली कळकळ, आस्था विसरली गेली नाही, हेही नसे थोडके; असं मानायचं की नाही?

**रेणू गावस्कर**
७, इंदिरा अपार्टमेंट, चिंतामणी नगर,
सहकारनगर नं. २.पुणे - ४११ ००९.
फोन नं. - ९८५०८९४५०४

किरणजीत अहलुवालियाची कहाणी ही खूपच भयानक व धक्कादायक असली तरी तिचा शेवट मात्र आश्वासक आहे.

अतिशय कठीण परिस्थितीतही जगण्याची दुर्दम्य इच्छा व आशावाद यांचं ज्वलंत उदाहरण म्हणजेच ही जीवनगाथा!



**सर्कल ऑफ लाइट**

**किरणजीत अहलुवालिया**
**राहिला गुप्ता**

अनु. उषा महाजन

**३५०रु. पोस्टेज ३०रु.**




# कॉलेज जीवन : उभारी, भरारी!

दिपा महानवर

**घाटालगत रात्री उघड्यावर झोपायचो. संगम-माहुली म्हणजे साताऱ्याची स्मशानभूमी. आडवं झाल्यावर समोरची जळती प्रेतं भेसूर दिसायची, परंतु विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनामुळं भुता-खेतांची भीती वाटायची नाही. डाव्या विचारसरणीला पोषक असं कॉलेजचं पुरोगामी वातावरण! बुद्धिप्रामाण्यवादी जडणघडण होत चालली होती.**

गाव वाई तालुक्यात डोंगराळ लगडवाडी. हायस्कूल शिक्षण आजोळी, स्टेशन लोणंदला. वर्गात पहिला नंबर. गणितात नव्वदपेक्षा जास्त. तेव्हा डॉक्टरपेक्षा इंजिनिअरची चलती. इंजिनिअर हेच माझं ध्येय ठरलं.

साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजमध्ये जूनपासून सायन्स शाखा सुरू होणार होती. गरिबीमुळं कॉलेज निवडीला वाव नव्हता. अकरावीची परीक्षा संपताच, उन्हाळ्यात शिवाजी कॉलेजच्या 'कमवा-शिका' योजनेत दाखल झालो. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या रयत शिक्षण संस्थेचे 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद!' हे बोधवाक्य उपयुक्त ठरले.

सायन्स प्रॅक्टिकलला गॅस लागतो. गॅस-प्लँटसाठी इमारत बांधकाम सुरू होतं. गवंड्याच्या हाताखाली बिगारीकाम लागलं. दीडेक महिन्यात त्या इमारतीवर सिमेंटपत्र्याचं झाकण पडलं. गिलावा सुरू. वाळू चाळत होतो. तेवढ्यात कुणी तरी म्हणालं, ''वर्तमानपत्रात अकरावीचा निकाल आलाय.'' लगेच पेपर पाहिला. माझा नंबर फर्स्ट क्लासमध्ये. लोणंदला जाऊन मार्कलिस्ट घेतली, सहासष्ट टक्के. स्पेशल बीजगणित-भूमितीत शंभरपैकी पंचाण्णव!

प्री-डिग्री सायन्सला ॲडमिशन घेतली. होस्टेलला घेतली. आर्ट्सचे चार वर्ग आणि सायन्सचा एक मिळून शिवाजी कॉलेजमध्ये सहाशे विद्यार्थी-विद्यार्थिनी. तेव्हा कोल्हापूरचं शिवाजी विद्यापीठ नव्हतं. आमचं कॉलेज पुणे विद्यापीठाशी संलग्न.

लेबर स्कीममध्ये काम करताना हायस्कूल - युनिफॉर्मचे दोन्ही ड्रेस फाटून बोतार झाले. एक निळी हाफपँट, दुसरी सफेद हाफपँट व दोन पांढरे हाफशर्ट शिवले. इनशर्ट करून, भांग पाडून झुकत कॉलेजला जायचो. गांधी टोपीला राजीनामा. झाला कॉलेजकुमार!

लेक्चर्स-प्रॅक्टिकल्स सुरू, लेबरही सुरू. कॉलेज– ॲप्रोच रोड वळणावरल्या पडकात खडी फोडायचो. पत्रापट्टीच्या रिंगमध्ये दगड ठेवून हातोड्यानं एकसारखे कडक घाव घालून-घालून हाताला झिणझिण्या यायच्या, फोड यायचे न् फुटून घट्टे पडायचे. पावसाळ्यातही घामाच्या धारा.

पण मित्रांच्या संगतीत, चेष्टा-मस्करीत शिणवटा जाणवायचा नाही. खडी फोडता-फोडता अचानक एका लेबरर मित्राला वात्रटपणाची हुक्की आली. रस्त्यानं जाणाऱ्या कॉलेजकुमारीला त्यानं हळूच खडा मारला. प्राचार्य बॅ. पी. जी. पाटलांना तडक भेटून ती म्हणाली,

''सर, तुमच्या लेबरच्या मुलानं मला खडा मारला. असला वाह्यातपणा त्याला शोभतो का?''

लेबरचे विद्यार्थी म्हणजे प्राचार्यांची लाडकी मुलं. ते तत्काळ उत्तरले, ''काबाडकष्ट करणारा मुलगा असं करणं अशक्य. त्यानं तुम्हाला खडा मारला नसेल; उलट तुम्हीच त्याला डोळा मारला असेल!''

निरुत्तर मुलगी गर्रकन् वळली अन् वर्गात शिरली.

असेच एकदा कॉलेजलगतच्या तालीत आम्ही माती खणत होतो. एकाच्या अंगात हीरोगिरी संचारली. कॉलेजकडं जाणाऱ्या 'हुदली' आडनावाच्या मुलीकडं पाहून तो नाचत, ठुमकत गाऊ लागला,

''माझ्या कुदळीला पडलंय सपान रं,
माझ्या हुदलीला पडलंय माझं सपान रं!''

असे होते ते दिवस : अडीअडचणींचे, पण मंतरलेले!

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर अल्पावधीतच दोन महान विभूतींची संस्मरणीय भाषणे ऐकली. ना. यशवंतराव चव्हाण तेव्हा मुंबई द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री. संस्थेने सायन्स फॅकल्टीचा उद्घाटन समारंभ आयोजित केला. कॉलेज प्रांगणात भव्य शामियाना. स्टेजवर मुख्यत्वे नामदार यशवंतराव चव्हाण, कर्मवीर भाऊराव पाटील. प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील यांच्या प्रास्ताविकानंतर कर्मवीर आपल्या भाषणात म्हणाले, ''रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी-शिक्षकांची एकजूट ताकद एवढी प्रचंड आहे की, अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याची छोटी टेकडी खणून शाहू बोर्डिंगची इमारत बांधली. मनावर घेतलं तर अजिंक्यतारा किल्लादेखील आम्हाला भारी नाही.''

उद्घाटनपर भाषणात ना. यशवंतरावजी म्हणाले, ''भाऊराव पाटलांनी संस्थेच्या प्रचंड ताकदीबद्दल रास्त अभिमान व्यक्त केला. तथापि, त्या ताकदीचा उपद्रव अजिंक्यतारा किल्ल्याला पोचता कामा नये. छत्रपतींच्या सातारा गादीचा तो मानबिंदू आहे. कर्मवीरांच्याही मनात त्याबद्दल आदर आहे. त्यांच्या भाषणातून गैरअर्थ न काढता, त्यात ठासून भरलेला आत्मविश्वास ध्यानात घेऊन सर्वांनी संस्थेच्या प्रगतीची घोडदौड सुरू ठेवावी.''

डहाणू तालुक्यातला चुणचुणीत सुभाष चुरी पीडी सायन्सला. होस्टेलला तो माझ्या खोलीत. जिवलग मित्र. मिळून अभ्यास करायचो. कोलाटी समाजातला भोला गाडे पीडी आर्ट्सला. पेटी वाजवून सुरेल गाणी म्हणायचा. गाण्याची आवड असल्याने भोलाशी गट्टी जमली. सिनेमा बघणं क्वचित, पण गाण्याचं दांडगं वेड. पडत्या पावसातही बुधवारी रात्री बिनाका गीतमाला ऐकायला कँपातल्या होस्टेलपासून दीडेक मैल चालून सिटीतल्या हॉटेलात जायचो. जोडीला सुभाष व भोला. दर बुधवारी रात्री आठ ते नऊ रेडिओ सिलोनवर लागणारी बिनाका गीतमाला त्या काळी आनंदाची पर्वणी. अनाउन्सर अमीन सयानी गळ्यातला ताईत. दरसाल डिसेंबरच्या शेवटी दोन बुधवारी वर्षभरातली टॉपची बत्तीस सिनेगीतं चढत्या क्रमाने वाजायची. चित्रपटाची पद्यावली पानपट्टीवर पाच पैशांत मिळायची. ती घेऊन आवडती गाणी पाठ करायचो.

'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा' हे पी. सावळारामचं भावगीत बँडवाल्यांनी वाजवल्याशिवाय त्या काळी लग्न पार पडत नसे. त्या सुप्रसिद्ध गीतकाराचं व्याख्यान प्राचार्यांनी आयोजित केलं. व्यासपीठावर पी. सावळाराम, प्रा. पी. जी. पाटील. कर्मवीर भाऊराव पाटील स्टेजलगत खाली खुर्चीवर बसले होते. आम्ही पहिल्या रांगेत भाषण ऐकता-ऐकता कर्मवीरांना निरखत होतो. पी. सावळारामांनी शेवटी नखरेल लावणी हावभावासह म्हटली,

'राया तुमी माज्यासंगं भांडणार कधी?
कुलपात कोंडून, छळवाद मांडून
पुरुषाची जात तुमी दावणार कधी?'

टाळ्यांचा कडकडाट!

तोवर रयत शिक्षण संस्थेत आठ वर्षे शिकलो होतो. शिक्षकांनी केलेले प्रबोधन व झालेले वाचन यामुळे महात्मा गांधी माझं श्रद्धास्थान. त्यांचे जीवन, विचार याबद्दल नितांत आदर. सत्य, अहिंसेइतकीच स्वच्छतेवर निष्ठा. म. गांधी जयंतीनिमित्त दोन ऑक्टोबरला होस्टेलच्या पाटी संडासांची साफसफाई करायचो. संडासखोल्या केरसुणीनं झाडून जाळ्या-जळमटं काढून टाकायचो. मदतीला सुभाष चुरी.

सायन्सचा क्लास नवा असला तरी प्राध्यापकवर्ग नामवंत. फिजिक्सचे डॉ. बी. एस. पाटील. सायन्स विभागाचे हेड होते. पुढे ते कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ स्थापना समितीचे सदस्य झाले. बॉटनीचे डॉ. शां. ब. मुजुमदार यथावकाश सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती झाले. झूलॉजीचे प्रा. एस. डी. पाटील पुढे रयत शिक्षण संस्थेचे सचिव बनले. प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील तर इंग्रजी-मराठीचे ख्यातनाम व्यक्ते म्हणून उभ्या महाराष्ट्राला परिचित. या सर्व प्रज्ञावंत प्राध्यापकांचे सकस अध्यापन, चौफेर शिकवण, सहवास यामुळे आमच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण जडणघडण झाली, आमच्यात सामाजिक बांधिलकी रुजली.

प्री-डिग्री सायन्सची विद्यापीठ परीक्षा संपली. उन्हाळ्यात

लगेच लेबर सुरू झालं. संस्था सायन्स बिल्डिंग बांधणार होती. त्यासाठी कॉलेजच्या लेबर स्कीमने कॉलेजजवळच्या संगम-माहुलीस वीटभट्टी प्रकल्प सुरू केला. कृष्णा-वेण्णा संगमाच्या घाटावरील पुराण्या महादेव मंदिरात आम्हा साठेक विद्यार्थ्यांचा तळ पडला. नदीकाठचा गाळ भिजवून आदल्या दिवशी गारा करायचो. दुसऱ्या दिवशी विटा घालायचो.

घाटालगत रात्री उघड्यावर झोपायचो. संगम-माहुली म्हणजे साताऱ्याची स्मशानभूमी. आडवं झाल्यावर समोरची जळती प्रेतं भेसूर दिसायची, परंतु विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनामुळं भुता-खेतांची भीती वाटायची नाही. कॉम्रेड जी. बी. मानेसरांची हायस्कूलमधली साम्यवादी-नास्तिकी शिकवण आणि डाव्या विचारसरणीला पोषक असं शिवाजी कॉलेजचं– होस्टेलचं पुरोगामी वातावरण! बुद्धिप्रामाण्यवादी जडणघडण परिपूर्ण होत चालली होती.

विटा घालण्याचं काम भरात आलं असताना लेबर सेक्रेटरी साताऱ्याहून दुपारी अचानक आला आणि रडक्या सुरात सांगू लागला, ''फार वाईट घडलंय! आपले अण्णा– कर्मवीर भाऊराव पाटील आज पुण्यात ससून हॉस्पिटलमध्ये हार्ट ॲटॅकने वारले! काम बंद करून ताबडतोब सारे साताऱ्याला चला.''

...वीज कोसळल्यागत सारी चिनभिन. रडारड. साताऱ्याकडं चालत निघालो. आईबाप गेल्यागत राहून-राहून उमाळा दाटून येत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी अजिंक्यताऱ्याच्या पायथ्याशी रयतभूमीत अंत्यविधी झाला. त्या दुर्दैवी घटनेनंतर विटा घालण्याचं लेबर संपुष्टात आलं. आमचा माहुली मुक्काम हलला.

प्री-डिग्री सायन्सचा निकाल हार्ड लागला. नव्वदेक विद्यार्थ्यांपैकी सत्तावीस सुटले. मी पास!

एफ.वाय. सायन्सला प्रवेश घेतला. इंजिनिअर व्हायचं म्हणून बायॉलॉजी सोडून गणित घेतलं.

त्या वर्षी यशवंतराव चव्हाण सरकारनं क्रांतिकारी निर्णय घेतला. पालकाचं वार्षिक उत्पन्न नऊशे रुपयांपर्यंत असणाऱ्यांना फी- माफी! आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना मिळणारी ऐतिहासिक ईबीसी सवलत! त्यामुळे लेबर स्कीममध्ये काम करण्याची गरज उरली नाही. अकरावीच्या मार्कांवर सरकारी कर्जाऊ शिष्यवृत्ती सातशेवीस रुपये मिळाली. प्रथमच बिन्नीचा चौकडा ओपन शर्ट व हरकचा सफेद लेंगा शिवला. कॉलेजजीवनाला साजेशी माफक फॅशन! जावळ-दाढीवर कंगवा फिरवून मिशीला पीळ भरायचो.

रनिंग व कुस्तीत भाग घ्यायचो, पण नंबर यायचा नाही. खेड्यात विटीदांडू खेळलो होतो. बॅट-बॉलला कधी हात लागला नव्हता. क्रिकेट कॉमेंट्री कळायची नाही. नावावरून तरी कॉंट्रॅक्टर इंग्लंडचा क्रिकेटियर वाटला. प्राचार्यांनी आयोजित केलेलं माजी कर्णधार विजय हजारेंचं भाषण ऐकून मात्र भारावून गेलो.

जिद्दीनं अभ्यास करीत होतो. पूर्वपरीक्षेत डिस्टिंक्शन मिळालं. सायन्स हेड डॉ. बी. एस. पाटलांनी शाबासकी दिली.

पण पुढे परिस्थिती पालटत गेली. इंजिनिअर महत्त्वाकांक्षेला ताण व जोरकस अभ्यास. गरीब, निरक्षर आई-वडिलांची व्याकूळ आठवण व मनाची उलघाल. विद्यापीठ परीक्षा आठवड्यावर आली असताना, अचानक डोक्याचा मागचा भाग दुखू लागला. एकाग्रता भंगू लागली. झोप चाळवली.

परीक्षा सुरू झाली. फिजिक्सचा पेपर सुरू असताना डोक्याचा ठणका असह्य झाला. संध्याकाळी सिटीत जाऊन इंजेक्शन घेतलं. जरा बरं वाटलं, पण डोकेदुखी पूर्णपणे थांबली नाही. पेपर्स सुरू होते, डोकं दुखणंही सुरू होतं. इंजिनिअर होण्याचं ध्येय उद्ध्वस्त होणार, हे समजून चुकलं. रिझल्ट लागला. आजारातूनही सेकंड क्लास मिळाल्याचं समाधान. इंजिनिअर-स्वप्न धुळीला मिळाल्याचं मात्र राहून-राहून दुःख वाटे.

एस. वाय. बीएस्सीला प्रवेश घेतला. फिजिक्स, केमिस्ट्री, गणित हे विषय निवडले. अभ्यासक्रम सुरू झाला. समोर ज्वलंत प्रश्न होता, विचित्र डोकेदुखीवर मात्र करणे. साताऱ्याच्या डॉ. गोखलेंची ट्रीटमेंट सुरू. लेक्चर्स-प्रॅक्टिकल्स सुरू. डोकेदुखीमुळं कधी तरी उदास वाटायचं. विरंगुळा म्हणून प्रभात टॉकीजला 'जगाच्या पाठीवर' चित्रपट पाहिला. सुधीर फडकेंनी संगीत दिलेली सारी गाणी आवडली. पानपट्टीवर पद्यावली विकत घेतली. 'नाच नाचुनी अति मी दमले' व 'एक धागा सुखाचा, शंभर धागे दुःखाचे' ही गीतं विशेष भावली. ती गाताना गुंगून जायचो.

आम्हाला सक्तीचा मराठी विषय. 'सोन्याचा कळस' प्रा. ह. कि. तोडमल व 'आणखी चिमणराव' प्रा. ल. रा. नसिराबादकर छान शिकवायचे. सायन्स अभ्यासावेळी डोकं दुखू लागलं, तर मराठीची पुस्तकं वाचायचो. त्यामुळे मराठी वाचनाची गोडी वाढली. कॉलेज ग्रंथालयातले कथासंग्रह, कादंबऱ्या, काव्यसंग्रह वाचायचो. नगर वाचनालयात जाऊन सत्यकथा, किर्लोस्कर, मनोहर, साधना, अमृत ही साप्ताहिके-मासिके वाचायचो.

डोकेदुखी थांबत नव्हती, म्हणून मग डॉ. गोखलेंच्या सल्ल्याने मुंबई गाठली. मुंबईला प्रथमच गेलो होतो. मरीन ड्राइव्ह चौपाटीला आयुष्यात पहिल्यांदा अथांग समुद्र पाहिला. नजर पोचत होती तिथवर पाणीच पाणी! क्षितिजाला भिडलं होतं. दिङ्मूढ होऊन पाहत होतो. मराठा मंदिर टॉकीजला दुपारी 'मुगल-ए-आझम' पिक्चर पाहिला. आवडता हीरो दिलीपकुमार, जोडीला लावण्यवती मधुबाला. लाडक्या नौशाद अलीचं नादमधुर संगीत. तीन तास मंत्रमुग्ध. नंतर चालत-चालत फोर्ट भागात फिरलो. जिकडं-तिकडं माणसंच माणसं! घड्याळावर-चाकांवर चालणारा, पळणारा, कष्टणारा जनसागर. अथांग जलसागराच्या सोबतीनं जगणारा

अफाट जनसागर! मनात उसळत्या नवललाटा.

सायंकाळी ख्यातनाम न्यूरॉलॉजिस्ट डॉ. आर्जी गिंडेंना ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये भेटलो. पार्श्वभूमी विचारत तासभर विविध तपासण्या केल्या व ते शेवटी म्हणाले, ''तुमच्या गरिबीचा दुष्परिणाम! टेबलखुर्चीविना खाली वाकून केलेल्या अभ्यासामुळे डोकेदुखी उद्भवली. नेक-कॉलर दीर्घकाळ वापरावी लागेल. शिवाय सर्वांगसुंदर आसने शिकून घ्या आणि नियमितपणे करा. सारे ठीक होईल. चिंता करू नका.''

साताऱ्याला परतलो. दोन-तीन दिवसांनी सायन्स बिल्डिंगचं उद्घाटन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते झालं. मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण अध्यक्ष. राष्ट्रपतींचं दर्शन व भाषण प्रेरणा देऊन गेलं. पुढच्या आठवड्यात कॉलेज गॅदरिंग. विविध गुणदर्शन कार्यक्रमात 'मुगल-ए-आझम'मधील 'मोहे पनघटपे नंदलाल...' हे सेमी-क्लासिकल गीत मी सादर केलं. मन प्रसन्न झालं.

फिजिक्सच्या प्रा. गुजराथींकडून आसनं शिकून घेतली. मत्स्यासन, भुजंगासन, वक्रासन, व्याघ्रासन, शीर्षासन, शवासन ही सारी आसनं नियमितपणे करू लागलो. नेक-कॉलर मानेभोवती सातत्यानं बांधली. तरीही कधीमधी डोकेदुखी. विद्यापीठ परीक्षेची काळजी. रोज दहा-बारा तास अभ्यास करीत होतो. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून डोकेदुखीवर मात करीत होतो. वार्षिकचे पेपर समाधानकारक. प्रॅक्टिकल परीक्षा व्यवस्थित. निकाल लागला; पास झालो!

कॉलेजचं शेवटचं वर्ष सुरू. टी. वाय. बीएस्सी. फिजिक्स स्पेशल नक्की केला. फिजिक्सला आम्ही चौघे. विज्ञान मंडळाचा मी सेक्रेटरी. कराडच्या सायन्स कॉलेजचे जर्मनी रिटर्न प्राचार्य डॉ. आर्डी शिंगटेंनी विज्ञान मंडळाचं उद्घाटन केलं. यशस्वी समारंभामुळे सायन्स फॅकल्टीचे प्राध्यापक-विद्यार्थी खूष. मनाची उभारी वाढली.

तमाशा ही खेड्यातली आमची लाडकी करमणूक. गायनामुळं टीवाय बीएचा कोलाटी कलावंत भोला गाडेशी दाट मैत्री. तमाशा, संगीत बारी हा त्याचा पिढीजात धंदा. एका दुपारी तो म्हणाला, ''दिपा चल, तुला आज ए वन् संगीत बारी दाखवतो; वाठार स्टेशनच्या मावळतीला पिंपोडे गावी.''

अभ्यास बुडेल म्हणून नाखुषी. तरीही विरंगुळा हवा म्हणून तयार झालो. एस्ट्या बदलत बदलत रात्री उशिरा पिंपोड्यात पोचलो. भोलाचा चुलतमामा फकीराची संगीत बारी रंगात आली होती. चंद्रा व नर्मदा नाचत होत्या. फकीरा पेटी वाजवत होता. त्यांच्या मांडीला मांडी लावून गोधडीवर एका बाजूला मी, दुसऱ्या बाजूला भोला. कमळामामी संथ लयीत गाणं म्हणत होती–

माझा होशील का? होशील काऽऽ?
...नसेल ठाऊक तुला कधी ते
रोज तुझ्या मी स्वप्नी येते
त्या स्वप्नांच्या आठवणीला
ओटा देशील का? ऽ ऽ ऽ

तेवढ्यात तरणा गुलहौशी पाटील उठला अन् दहाची नोट नाचवत म्हणाला, ''त्ये भज्यान बंद करा! सोळावं वरीस ठासून, घोळून झालं पायजेल!''

मामीनं ठसकेबाज लावणी नखरेल सुरात सुरू केली.
आज अचानक गुपित कळलं
जत्रंमधल्या धक्क्याचं!
सोळावं वरीस धोक्याचंऽऽऽ

दौलतजादा प्रथमच पाहत होतो. एकाचढ एक रंगेल-रगेल लावण्या मनमुराद ऐकल्या. मध्यरात्रीनंतर संगीत बारी संपल्यावर भोलासोबत त्यांच्यातच झोपलो. सकाळी लवकर उठून कॉलेज गाठलं.

थिअरी तास, अभ्यास नियमित सुरू. उपकरणांअभावी प्रॅक्टिकल्स मात्र होत नव्हती. दुसरी टर्म सुरू झाली तरी चाळीसपैकी केवळ दोन-तीन प्रयोग झाले होते. फिजिक्स स्पेशलच्या आम्हा चौघांना प्रॅक्टिकलची भयंकर चिंता. प्राचार्यांना भेटलो. त्यांनी उडवा-उडवीची उत्तरं दिली. विज्ञान मंडळ उद्घाटनामुळे कराडच्या सायन्स कॉलेजचे प्रा. डॉ. शिंगटेंची माझी चांगली ओळख. चौघांच्या वतीने त्यांना भेटलो. दुसऱ्या टर्मला प्रवेश देऊन सर्व प्रयोग पूर्ण करून घेण्याचे अभिवचन त्यांनी दिले. चौघांनी सातारच्या टीसी काढून कराडला ॲडमिशन घेतलं.

युद्धपातळीवर काम करून सारे तास, प्रयोग पूर्ण केले. विद्यापीठ परीक्षेचं थिअरी सेंटर कराडला मिळालं. परंतु विद्यार्थी कमी असल्याने फिजिक्स प्रॅक्टिकल परीक्षेचे सेंटर मिळाले नाही. प्रयोग परीक्षेसाठी पुण्याच्या एस. पी. कॉलेजमध्ये जावे लागणार होते. क्लासमेट देशपांडे म्हणाला, ''पुण्यात प्रयोग - परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांचं इंप्रेशन महत्त्वाचं! महानवर, तुझ्या लेंगाशर्टाचं काही खरं नाही!''

लागलीच आयुष्यातला पहिला पँट-मॅनिला शिवून घेतला. सॉक्स-सँडल खरीदलं.

विद्यापीठ परीक्षा संपली. निकाल लागला. सेकंड क्लास! बी.एस्सी. (ऑनर्स) पदवी मिळाली! पुढे यथावकाश फर्स्ट क्लास मिळवून एम.एस्सी. फिजिक्स झालो. कमवा-शिका योजना, कर्जाऊ शिष्यवृत्ती, उधारउसनवारी यामुळे उच्च शिक्षण पूर्ण झाले. अडथळ्यांची शर्यत जिद्दीने पूर्ण केली, जिंकली. सतरा वर्षांच्या अध्ययनपर्वात गरिबीमुळं आर्थिक शोषण झालं, पण आत्मिक पोषण घडलं!

कॉलेजला असताना तीन नामवंत प्राध्यापकांनी आमच्या तीन क्लासमेट विद्यार्थिनींशी लव्ह मॅरेज केलं. एका होस्टेलमेटनं क्लासमेट मुलीशी प्रेमविवाह केला, पण बदामी प्रेमाची गुलाबी झुळूक आम्हाला शिवली नाही.

नवल म्हणजे, लोणंदला दहावीत असताना मात्र पुण्याची एक गोरी-गोंडस परी हायस्कूलमध्ये येऊन मला दोनदा भेटली होती. दिलखुलास गुजगोष्टी करून, स्वत: विणलेला गुलाबी स्वेटर आठवण म्हणून देऊन गेली. पण ते काफ-लव्ह किंवा प्लेटॉनिक-लव्ह असावं! पुढं लग्न होऊन ती परी कल्याणला नांदायला गेली. कल्याणचा खजिना पुन्हा कधी दिसला नाही. तो उबदार गुलाबी स्वेटर मात्र मी जपून-जपून दहा वर्षे वापरला.

पुढं प्राध्यापक झाल्यावर प्रचलित पद्धतीनं एका सुंदर सोनपरीशी लग्न करून मी सुफळ संसार केला.

अभियंता होण्याचं पहिलं-वहिलं ध्येय हुकलं; पण नाउमेद न होता जिद्दीनं पदवी, पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून प्राचार्य झालो. पुणे व शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणी सदस्य झालो. शिकारीत वाघ निसटला, पण सिंह पकडला!

**दिपा महानवार**
'पिताश्री', शासकीय विश्राम गृहाजवळ,
मु. पो. लोणंद, ता. खंडाळा,
जि. सातारा ४१५ ५२१
फोन नं. - ०२१६९-२२६१४५

फक्त तुम्हाला कसं जगायचं एवढंच तो शिकवत नाही... तर मरण कसं स्वीकारायचं हेही तो शिकवतो. अशी अजब विनोदबुद्धी असलेल्या फकिराचा जीवनप्रवास तुमचं आयुष्य बदलू शकेल. कसे? ते वाचा

**द फकीर**

**रुझबेह एन. भरुचा**
अनु. सुनीति काणे

**१८०रु** पोस्टेज २५रु.



***समाजप्रवृत्तींशी लढा देत, स्वत्वाची जपणूक करत, प्राचार्यपद भूषविलेल्या एका धनगर कुटुंबातील माणसाचं मनमोकळं आत्मकथन!***

# विमुक्ती

**दिपा महानवर**

**२ री आवृत्ती**




न्यायाची चाड बाळगायची तर
केवळ चर्चा करून,
सोयीस्करपणे गप्प बसून
भागत नसते.
दुष्प्रवृत्तीविरुद्ध कधी ना कधी
लढा पुकारावाच लागतो.
आणि लढाई झाली की
वार होणारच!
ते झेलण्याची,
प्रसंगी होणाऱ्या जखमा
सहन करण्याची
तयारी ठेवावीच लागते.
प्रासंगिक फायद्यावर नजर ठेवून
सर्वांनी वागायचे ठरवल्यास
सत्य कधीच प्रस्थापित होणार नाही!

**२२०रु.** पोस्टेज २५रु.




# अनुभवांच्या श्रीमंतीची घरंदाजी देणारे स. प. मधील दिवस

डॉ. अशोक कामत

**पु.गं.ची आवडती कल्पना होती : गेंडा क्लब! म्हणायचे : तुमचा एक मित्र चुनाभट्टी, वीटभट्टीवाला हवा. एखादा बोहरी आळीतला व्यापारी असावा. साऱ्या प्रकारची मित्रमंडळी असावी. महाविद्यालयातच त्यांची मैत्री होऊ शकते. मग तुम्हाला फार काही नाही जमले तरी स्वत:चे घर उभे करता येईल. केवळ कविता करीत बसलात, तर मिळालेला जन्म वाया घालवाल.**

आमचे महाविद्यालयीन जीवन अतिशय संपन्न होते. आम्हाला मिळालेले अनेक प्राध्यापक आपापल्या विषयाचे व्रतस्थ अभ्यासक आणि समाजमनस्क मार्गदर्शकही होते. त्यांनी आम्हाला ज्ञानाच्या प्रशस्त वाटा दाखवीत असतानाच कालमान परिस्थितीची आव्हानं स्वीकारण्याची एक समर्थ दृष्टी देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

कलागुणांचा, मनोरंजनाचा अभिजात आनंद मिळविण्याची सवय आम्हाला लागली. आमच्या समवयस्क मित्रमैत्रिणींनी आम्हाला निखळ स्नेह दिला. काहींनी एकमेकांची कायमची सोबतही केली, पण हा एक थोड्यांनाच लाभलेला आनुषंगिक फायद्याचा भाग. आम्ही सगळेच अनुभवांच्या श्रीमंतीची घरंदाजी मिळवू शकलो. आजही ती टिकवून आहोत. म्हणूनच निवृत्तीनंतरही जगण्याचा उत्साह आणि मौज कायम आहे.

**कला शाखेकडे ओढा**

घरी सर्वच प्रकारचे दारिद्र्य होते. जवळच्या नात्यागोत्याचेही, राहण्याखाण्याचेही. त्यामुळे लोकाश्रयाने राहून कसातरी शिकलो. मॅट्रिकपर्यंत आश्रयदात्यांच्या मर्जीनुसार कितीतरी शाळा बदलाव्या लागल्या. अकरावी पूर्ण केली आणि स. प. महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला.

नोकरी करून शिकायचे, असा बेत होता. खूप वणवण केली, पण नोकरी मिळाली नाही. वशिला नव्हता, वयही लहान अन् व्यक्तिमत्त्व शून्य! मग मोडकगुरुजींच्या कृपेने भारत वाणी हिंदी वर्गात शिकविण्याची सोय झाली. शिकायला मदतही मिळू लागली. हे वर्ग स. प. समोरच होते. मोडकमास्तर हे नू.म.वि.त होते. मी त्यांच्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी. हिंदी भाषेत प्रवीण. त्यामुळे हे नाते लगेच जुळले.

त्या काळी प्रवेशासाठी फारशी अडचण नसायची आणि आजच्यासारखा विज्ञान-वाणिज्य शाखांकडे ओढाही कमीच असायचा. भरपूर वाचायचे. अभ्यास करून स्पर्धा परीक्षा द्यायच्या, अधिकारी व्हायचे, अशी महत्त्वाकांक्षा ठेवून शालांत परीक्षेत चमकणारे विद्यार्थी कला शाखेकडे

आवर्जून वळत असत.

जून अठ्ठावन्नमध्ये पी. डी. आर्ट्‌सच्या आमच्या वर्गात, बोर्डात पहिला आलेला रवींद्र श्रीपाद कुलकर्णीही होता आणि गुणवत्ता यादीत झळकलेले अशोक अकलूजकर, पुष्पा आगाशे असे इतर दहा विद्यार्थीही होते.

स. प.मध्ये गेल्यामुळे भव्य इमारत, खेळांचे प्रचंड मैदान, सुरेख कॅम्पस, कॉलेजसमोरच 'जीवन'सारखे छान उपाहार गृह. बाजूलाच 'उदयविहार', 'कॅफे ग्रीन'. कमी वर्दळीचा निवांत टिळक रस्ता. मा. का. देशपांडे यांचे इंग्रजीचे वर्ग हे त्याचे एक आकर्षण. आम्ही जाता-येता त्या वर्गापाशी पदपथावर उभे राहून 'माकां'चं बहारदार इंग्रजी ऐकत असू. स. प.मध्ये अनेक बुद्धिमान, कलावंत सखेसोबती मिळाले. सकाळी ७॥ पासून रात्री ११पर्यंत ग्रंथालयात बसायची संधी मिळाली.

**दिग्गज प्राध्यापक**

त्या वेळच्या स. प.मध्ये फार मोठे प्राध्यापक होते. प्राचार्य सोनोपंत दांडेकरांचे विद्यार्थी श्री. गो. हुल्याळकर आमचे प्राचार्य होते. ते आम्हाला तर्कशास्त्र शिकवायचे. अतिशय खुसखुशीत इंग्लिश बोलायचे. हसत-हसवत विषय समजून द्यायचे. उपप्राचार्य मालेगावकरही आपल्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वाने आम्हाला भारावून टाकत. त्यांचा इंग्लिश काव्याचा तास ही पर्वणीच वाटायची. डॉ. व. मं. सिरसीकर नागरिकशास्त्र आणि इतिहास शिकवीत. त्यांचे इंग्लिश बोलणे आणि अनेक ऐतिहासिक घडामोडींबद्दलची परखड मतं आम्हाला विचार करायला प्रवृत्त करणारी असत. पंचशील आणि हिंदी-चिनी भाईभाईचा उद्‌घोष सुरू असताना १९५८ मध्येच त्यांनी चिनी आक्रमणाचे भाकीत केले होते. ऑस्ट्रेलियात जे आपल्या विद्यार्थ्यांना सोसावे लागते आहे, त्याबद्दलही काही ते त्या वेळीच बोलले होते. डॉ. दि. ब. केरूर अगदी रंगून जाऊन अर्थशास्त्र शिकवत. तशाच डॉ. कुमुद पोरे, राज्यशास्त्राचे राम गोखले. विज्ञान शाखेकडे पदार्थविज्ञानाचे डॉ. एम. के. परांजपे, रसायनशास्त्राचे डॉ. भिडे, डॉ. घाटे, गणिताचे डॉ. केरकर असे अनेक दिग्गज होते. मौज म्हणजे, आम्ही कला शाखेची चांगलं ऐकायला, नामवंतांना अनुभवायला हपापलेली विद्यार्थी मंडळी, या सर्वच प्राध्यापकांच्या तासांना अधूनमधून जाऊन बसायचो. नाही परवानगी मिळाली तर बाहेर उभे राहून ऐकायचो.

या ज्ञान-मानवंतांविषयी आम्हाला कमालीचा आदर वाटायचा. बहुतेक सगळेच टाय-सूट-बूट घालून रुबाबदार पोषाखात वावरत. काही अपवादही होते. रसायनशास्त्राचे प्राध्यापक भिडे यांची दाढी कशीतरी केलेली, बहुधा कधीतरी करायची म्हणून केलेली असायची. कपड्यांचाही गबाळेपणाच असायचा, पण ते पेनिसिलिनचे संशोधक अलेक्झांडर फ्लेमिंगच्या तोडीचे शास्त्रज्ञ असल्याचे आम्हाला ठाऊक झाल्यामुळे आम्ही त्यांच्यात जगदीशचंद्र बसूच पाहायचो. मौज म्हणजे, ते आवारात कुठेही आपल्याच नादात फिरताना एखाद्या वळणावर उभे राहून वाहतुकीचे पोलिसासारखे नियंत्रणही करत असत! त्यांचा एक नैतिक धाक वाटायचा.

**मदतीचा हात**

काही प्राध्यापक त्यांच्या वर्गातील वक्तृत्वाबरोबर वर्गाबाहेर होणाऱ्या गाठीभेटींमुळेही बरेच काही देऊन गेले. ग्रंथालय निरीक्षक डॉ. श्री. र. कावळे हे त्यांपैकी एक. ते सामाजिक मानसशास्त्र तर उत्तम शिकवायचेच, पण अनेक वैयक्तिक अडीअडचणी सोडविण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांशी जो मैत्रीभाव ठेवला, त्याला तोड नाही. मला आठवते, आम्ही जवळजवळ रोजच त्यांना ग्रंथालयात भेटायला जात असू. प्रत्येकाशी केवळ दोन-तीन मिनिटांत ते अत्यंत प्रसन्नपणानं बराच संवाद साधीत असत.

हिंदीच्या डॉ. स्नेहलता श्रीवास्तव आणि मालतीबाई परांजपे अशाच वात्सल्यभावाने वागणाऱ्या. श्रीवास्तवांमुळे मला अनेक हिंदी संदर्भग्रंथांची माहिती झाली. पुढे माझ्या हिंदी प्रदेशातील अनेक शोधयात्रांनाही त्यांची मदत मिळत राहिली.

पुरात माझे घरदार वाहून गेले, तेव्हा मालतीबाई मला शोधीत आल्या. 'यापुढे तू आमच्या घरी राहा' म्हणाल्या. नंतर माझ्या घरासाठी त्यांनी पैसेही परस्पर भरले. मी घरंदाज होऊ शकलो. परांजपे पतिपत्नीनं माझ्यावर पुत्रवत प्रेम दीर्घकाळ केलं.

डॉ. प्र. न. जोशी फार थोडा काळ स. प.मध्ये होते. त्यांची वर्गाबाहेरची सोबत आयुष्यभर राहिली. असे कितीतरी शिक्षक-प्राध्यापक. ते आमचे मार्गदर्शकच होते. त्यांच्यापाशी जातपात नव्हती, की कुठले पैशाचे लोभ नव्हते. आपला विद्यार्थी हा परिस्थितीवर मात करून पुढे यायला हवा, हीच त्यांची जिद्द असायची.

**पु. ग. सहस्रबुद्ध्यांच्या सभा**

त्या काळी मराठी प्राध्यापक डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे हे एक विचारवंत लेखक आणि मुख्यत: फर्डे वक्ते म्हणून लोकमान्य होते. त्यांचा पोषाख, वक्तृत्व आणि बरेच काही लोकमान्य टिळकांची आठवण करून देणारे होते, असे म्हटले जायचे. मौज म्हणजे, पं. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, यशवंतराव चव्हाण, कर्मवीर भाऊराव पाटील असे कितीतरी समकालीन नेते आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा नेमका शोध-बोध त्यांनी घेतला होता. त्यांची एकूणच अभ्यासविषयांची व्याप्ती पुष्कळ मोठी होती.

वर्गात ते मराठी शिकवीत, तेव्हा विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचीही प्रचंड गर्दी व्हायची. स. प.तील मोठी सभागृहे तुडुंब भरायची. मुले-मुली खिडक्यांतूनही उभी राहत. त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव

अफाट असायचा. त्यांचे ऐकले की, आता कुणाचे ऐकण्याआधी कुठेतरी बसून चहा पीत ऐकले आहे त्यावर चर्चा करावी, अशी आम्हाला हुक्की यायची. मग आम्ही पुढचे तास चक्क बुडवायचो.

आठवते... चिनी आक्रमण झाले... आम्ही पु.गं.ना म्हणालो, आम्हाला या राष्ट्रीय संकटाविषयी तुमचे ऐकायचे आहे. लगेच पंधरा दिवसांनी रोज संध्याकाळी दोन तास रमाबाई सभागृहात पु. ग. बोलत राहिले. अशाच त्यांच्या रशिया-अमेरिका, पाकिस्तान, काश्मीर प्रश्न इत्यादींवरील व्याख्यानमाला. आम्ही त्या कानीमनी साठविल्या. त्या वेळी ते जे जे बोलले, त्याची आजही आठवण आल्याशिवाय राहत नाही.

### कला मंडळांची समृद्धी

आज जशी कला महाविद्यालये मागे पडली आहेत, तशीच महाविद्यालयातील वाङ्मय चर्चा मंडळे, कला मंडळे निष्प्राण झाली आहेत. आमच्या कॉलेजच्या दिवसांत मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्लिश अशा चारही भाषांचे विद्यार्थी साहित्यचर्चेत रस घेणारे होते. जाणकार समीक्षक, जनमान्य साहित्यिक, रसिक कलावंत, गायक-अभिनेते यांची व्याख्याने, प्रकट चिंतन, मुलाखती आमचे भाषाध्यापक आवर्जून ठेवीत असत. त्यात राजकारण्यांचा समावेश कधीच नसायचा किंवा राजकीय हेतूने प्रेरित असणाऱ्या जयंत्या-पुण्यतिथ्याही नसत.

कला, विज्ञान, वाणिज्य, वैद्यकीय शाखेकडेही कलागुणी विद्यार्थी पुष्पळ असायचे. कला मंडळे, भाषा मंडळे जोरदार कार्यक्रम करीत. स्नेहसंमेलने चार-चार दिवस गाजत-वाजत होत. त्यात आम्ही पुस्तकी विद्यार्थ्यांवर मात करायची, इतकीच निकोप स्पर्धा असायची. कुठलेच हेवेदावे आणि मारामाऱ्या नव्हत्या.

स.प., फर्ग्युसन, बी. जे. मेडिकल अशा कितीतरी महाविद्यालयीन मंडळांची आपापसात चांगली स्पर्धा चालायची.

मराठी हा विषय घेतलेला असो-नसो, आम्ही सगळेच अनेक जातीपाती आणि विविध धर्मीयदेखील मराठी साहित्यसंस्कृतीचे भोक्ते होतो.

स. प.मध्ये रवींद्र भट, विश्वास मेहेंदळे, श्रीनिवास पाटील, सुभाष-शरद अवस्थी, शैला आपटे अशा कितीतरी कलावंतांनी आमचे भरभरून मनोरंजन केले. त्यांपैकी काही अभिनयकलेच्या क्षेत्रात पुढे येत गेले.

### अनेक मैत्र-मैत्रिणी

स. प.च्या दिवसांत मला जसे समाजहितैषी जीवनशिक्षक प्राध्यापक मिळाले, तसेच अनेक जिवलग साथीसोबतीसुद्धा मिळाले. उत्तम वातावरण, उत्तम विचार सांगणारे आचारवंत मार्गदर्शक आणि पुण्यासारख्या त्या वेळच्या विद्येच्या माहेरी येऊन व्यापक जग अनुभवायला मिळालेले गावोगावचे विद्यार्थी अशी त्रिवेणी होती. कला शाखेकडे उत्तम गुणवत्तेची मुलं आणि त्यांच्या सर्व कलागुणांना वाव देणारी मंडळी होती. विश्वविद्यालयात असावे असे समृद्ध ग्रंथालय होते. सकाळी महाविद्यालयाचे तास. मग दुपारी घरी जाऊन पुन्हा ग्रंथालयात येऊन सहापर्यंत बसायचे. संध्याकाळी कुठल्या ना कुठल्या मंडळाचा कार्यक्रम असायचाच. जर नसेल तर आमची कविमंडळं असायची. कधी वसतिगृहातल्या मुलांबरोबर संध्याकाळी संभाजी बागेपर्यंत फिरायला जायचे. कधी फर्ग्युसन, तर कधी लॉ कॉलेज. वाटेत कुठेतरी चहापान, काव्यवाचन चालायचे. पालखीच्या दिवशी पालखीबरोबर चालत असू. गणेशोत्सवात दहाही दिवस रात्रभर रस्त्यावर. आम्ही फिरोज दस्तूर, भीमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, गजानन वाटवे, माणिक वर्मा, मालती पांडे, सुरेश हळदणकर, बबनराव नावडीकर अशा कितीतरी मंडळींचे गायन गणपतीच्या दिवसांत कान भरून ऐकले आहे.

विजय सुराणा, बाळ कार्ले, यशवंता भिमाले, रवींद्र भट अशा अनेक कविमित्रांचे पहिले श्रोते आम्हीच होतो. उत्तमोत्तम कवितासंग्रह विकत घेऊन वाचणे, हा आमचा छंद होता. आठवते, आम्हीच आमचा 'शिल्प' नावाचा एक काव्यसंग्रहही प्रकाशित केला होता.

आमच्या मित्रमंडळात मुलीही असायच्या. त्यातून अनेकांची लग्नं जमली. कुणाचे 'पहिले प्रेम' म्हणून कायमची आठवण राहिली.

### गेंडा क्लब

आधुनिक, विशेषत: नव्या कवितेची पु. ग. सहस्रबुद्धे खिल्ली उडवायचे. कवींना वाटेल तसे टाकून बोलायचे. आम्ही त्यांच्या नकला करायचो. पण कवितेला शरण असायचो.

पु.गं.ची आवडती कल्पना होती : गेंडा क्लब! म्हणायचे : तुमचा एक मित्र चुनाभट्टी, वीटभट्टीवाला हवा. एखादा बोहरी आळीत व्यापार करणारा असावा. काही काम करणारे अधिकारी व्हावेत. साऱ्या प्रकारची मित्रमंडळी बरोबर ठेवा. महाविद्यालयातच त्यांची मैत्री होऊ शकते. मग तुम्हाला फार काही नाही जमले तरी स्वत:चे घर उभे करता येईल. केवळ कविता करीत बसलात, तर मिळालेला जन्म वाया घालवाल.

'पु.ग.' त्यांचे हे जीवनदर्शन वेळोवेळी विविध संदर्भांत आमच्यापुढे ठेवीत. ते पटण्यासारखे होते. त्यामुळे आमची मैत्री निखळ स्नेहप्रेमाची, जातीपातीपलीकडे जाणारी तर झालीच, पण जीवनवस्त्र बळकटपणे विणणारी बनली.

### हिंदीकडे वळण्याचे कारण

मी हिंदीकडे योगायोगाने वळलो. एक तर राष्ट्रभाषा हिंदी शिकण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. डॉ. प्रभुदास भुपटकरांसारखे प्राध्यापक होते. ते चांगले नट होते. जणू दुसरे मुगलेआझम

पृथ्वीराज कपूर. त्या काळात गद्धेपंचविशीजवळ आलेल्या वयात पु.ग. किंवा भुपटकरांसारख्या आत्मविश्वाससंपन्न व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव न पडला तरच नवल. शिवाय हिंदीकडे विविधधर्मीय ज्ञातिपंथीय मुलं-मुली यायची. भुपटकरांचे 'हिंदी संगठन'ही जोरकस होते.

पावसाळा भरात आला की 'वर्षाविहार' हा त्यांचा खंडाळा, लोणावळ्याला जायचा कार्यक्रम असायचा. कवी-शायरांचे मुशायरेही त्यांच्यामुळे आम्हाला लाभत. 'महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा' ह्या त्या काळीच महाराष्ट्रभर पसरलेल्या एका मोठ्या भाषा संस्थेत ते वावरत. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार त्या संस्थेचे अध्वर्यु. अशी कितीतरी आकर्षणं होती. पण आम्ही हिंदीचे होतो, तितकेच मराठीचेही होतो. संस्कृत, इंग्लिशचेही आम्हाला वावडे नव्हते.

एम. बी. शहा, पीतांबर सरोदे, सुधा जोशी-ओक, श्रीनिवास पाटील, रवींद्र भट, संभाजी जाधव, सुराणा, कार्ले, भिमाले, ज्ञानू गायकवाड अशी कितीतरी मित्रमंडळी हिंदी-मराठीमुळे मिळाली.

**काही प्रेमप्रकरणे**

त्या काळात विज्ञानासाठी फर्ग्युसन, कलेसाठी स. प. अशी सर्वसामान्य निवड होती. दोन्ही महाविद्यालयांची वसतिगृहे मोठी. तिथे सोय होईल त्याप्रमाणेही बाहेरगावचे विद्यार्थी प्रवेश घेत असत. पण मजामौज करायची, त्यांचा कल वाडियाकडे राहायचा. प्रेमप्रकरणेही तुलनेने स. प.मध्ये कमीच. शामळू पोरींचे कॉलेज किंवा शामळू पोरांचे भाऊ कॉलेज, अशीही आमची संभावना केली जायची.

आमच्या वेळी मंडळी अगदी प्रेमात पडतच नसत, असे नाही. बहुतेक प्रकरणे एकतर्फी निकालात निघायची. काही चांगली आठवतात...

आमचा एक स्वयंसेवक दोस्त रामकृष्ण-विवेकानंद वाचू लागला. अधिकच ध्येयवादी झाला. त्यात त्याला एका अत्यंत बुद्धिमान मुलीविषयी नको ते वाटू लागले. ती गणिताकडे रंगलेली. हा पठ्ठ्या भाषेकडे आलेला. दोघांचे बरेच वाद झडत. आमची मध्यस्थी कायम अपयशी. परिणाम इतकाच झाला, दोघेही ब्रह्मचारी राहिले. त्यांचा दादाभाई 'नवरोजी' झाला नाही. मात्र, त्यांच्या ध्येयवादी कार्यात खंड पडला नाही.

एक कवी आणि अभिनेता बऱ्याच मुलींच्या प्रेमात अधूनमधून पडायचा. खरे तर त्याच्याविषयी मुलींमध्येच चढाओढ अधिक असायची. त्या साऱ्या प्रकारात त्याला बी.ए. व्हायला तीन वर्षे लागली. पुढे तो बराच चमकला. त्याच्या एकेक प्रिया चांगल्या पोक्त गृहिणी होऊन गेल्या. मग यानेही केव्हातरी एका पूर्वीच्या प्रियेशी संसार मांडला. तो यशस्वीही झाला, पण अखेरपर्यंत तो लहान मुलासारखाच वागत होता. त्यानं अनेक कथा-कादंबऱ्या लिहिल्या. त्याचीही एक कथाच झाली, हळहळ वाटावी अशी.

एक बव्हंशी काळा आडदांड वाटावा असा गावच्या पाटलाचा लाडाचा लेक होता. गबर श्रीमंत शेतकरी. मित्रमंडळींशी उमदेपणाने वागणारा. एका गोऱ्यापिट्ट मुलीकडे वर्गात सारखा बघत राहायचा. कविता वगैरे त्याला जमत नसे. एकदा मालेगावकर सर 'ला बेले दाम् सान्स मर्सी' वर्गात फेऱ्या मारीत रंगून जाऊन शिकवीत होते. ती वर्गसुंदरी ताडकन् उठली. आम्हाला वाटलं, आता ती आमच्या पहिलवान मित्राच्या श्रीमुखात लगावणार. पण ते काही झाले नाही. फणकाऱ्यानं म्हणाली, ''सर, सर– हा पाहा माझ्याकडे सारखा पाहतोय.'' मालेगावकरसर रसिक होते. म्हणाले, ''हे तुला कसं समजलं?'' वर्गात एकच हशा पिकला. बिचारी चांगलीच गोंधळली. सरांनी नंतर दोघांना आपल्या कार्यालयात बोलावून घेतलं. आमच्या पाटलाच्या पिताश्रींनाही त्या मुलीबद्दल सांगितलं. त्यांनीही आपल्या चिरंजीवांच्या पसंतीला दादच दिली. ती कन्या अभागी होती. तिच्या वडिलांचं नाव तिला ठाऊक नव्हतं. आश्रमात राहायची.

आम्हाला त्या प्रेमविवाहाचा अभिमान वाटला; सरांच्या पौरोहित्याचा ही अभिमान त्यापेक्षा जास्त वाटला.

**अनुभवाची श्रीमंती**

स. प. महाविद्यालयातील आमची चार वर्षे ही आमच्या जडणघडणीची तर ठरलीच, पण अनेक प्रकारच्या अनुभवांची घरंदाजी श्रीमंती आम्हाला कमावता आली. आम्ही केवळ पदवीधर नाही झालो; आम्हाला अनेक नवी क्षितिजे पार करण्याची उमेद मिळाली. समविचारी सन्मित्र मिळाले. जीवनाला सुयोग्य दिशा देतील, असे मार्गदर्शकही लाभले. आमच्या अध्ययनाला व्यापक बैठक मिळण्याबरोबर आम्हाला उदार विचारांची कालोचित ठरावी अशी दृष्टी येत गेली. आम्ही आमच्या सीमित-मर्यादित जगातून बाहेर पडलो. जीवनावर अधिक डोळसपणे प्रेम करू लागलो.

महाविद्यालयातून विश्वविद्यालयाकडे जाताना आम्ही केवळ उत्साही नव्हतो, तर आमच्यापाशी एक समर्थ पाथेय होते. त्यामुळे आमचा एकूणच प्रवास दमदार होऊ शकला.


**डॉ. अशोक कामत**

'शिवश्री' २५८ सहजीवन कॉलनी,
पर्वती, पुणे ४११ ००९
फोन नं. - ०२०-२५४१५५७५



नवीन पुस्तकांची माहिती, नवीन योजना
कळविण्यासाठी आपला Email ID
आमच्याकडे हवाच!
info@mehtapublishinghouse.com

www.mehtapublishinghouse.com




# वलय रुइया कॉलेजच्या आत्मविश्वास वाढवणाऱ्या घरेलू वातावरणाचे!

शोभना शिकनीस

**रुईयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी समाजाच्या संमिश्र अशा स्तरांतून आलेले असल्याने जवळच असलेल्या पारसी कॉलनीतील आखूड, टाइट स्कर्ट आणि वर शर्ट-टाइप ब्लाऊज घालणाऱ्या, बॉबकटवाल्या, गोऱ्यागोमट्या, ख्रिश्चन-पारशी मुली जशा फिरताना दिसायच्या; तशाच पारंपरिक पोशाखातल्या मुलींचे घोळकेदेखील आढळायचे.**

आजमितीला रुईया कॉलेज ह्या नावाचा जेवढा दबदबा आहे, तेवढाच तो १९६०च्या दशकातही होता आणि त्या कालखंडातील मॅट्रिकची, म्हणजेच दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या, कॉलेजात जाऊन उच्च शिक्षण घेण्याची अभिलाषा बाळगणाऱ्या प्रत्येक शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनीला रुईया कॉलेजभोवती असलेलं वलय खेचून घेण्याइतकं प्रभावी होतं. विशेषत: दादर-माटुंगा-माहिम ह्या मुंबईच्या त्या काळच्या 'टिपिकल' मध्यमवर्गीय मराठी वस्तीतल्या आणि सुखवस्तूच नव्हे तर आमच्यासारख्या दादरच्या चाळीत राहणाऱ्या मुलींना 'तुमच्यासाठी रुईया अगदी सेफ आहे; कीर्ती, रूपारेलचा विचारदेखील करू नका' असा सल्ला कॉलेजची पायरी आमच्याआधीच चढलेल्या मुलींकडून दिला गेल्याने, 'रुईयातच प्रवेश मिळवायचा', अशी मानसिकता आपोआपच तयार झाली होती. पण प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक पात्रता मॅट्रिकची टक्केवारी, तसंच प्राचार्य घेत असलेल्या मुलाखतीवर अवलंबून असल्याचं कानावर आल्याने मनात एक प्रकारची उत्सुकता, धाकधूक दाटून येत होती.

पण कॉलेज प्रवेशाचा टप्पा गाठण्याआधी घरातूनच होणाऱ्या खुद्द वडिलांच्याच विरोधाला तोंड द्यावं लागेल, ह्याची मला कल्पनाच नव्हती. मी आता नोकरी शोधावी, एवढेच नव्हे तर जी मिळेल ती करावी; असं आई-वडिलांचं निव्वळ मत नव्हे, तर त्या दृष्टीने पाऊल म्हणून रोजगार विनिमय केंद्रात माझं नावही नोंदवून झालं होतं. तिथल्या इंटरव्ह्यूनंतर मला आलेले रिझर्व्ह बँक, बॉम्बे म्युनिसिपल कॉर्पोरेशन ह्यांचे कॉल्स, इतर अनेक उमेदवारांबरोबर दिलेल्या मुलाखती आणि काही महिन्यांतच कॉर्पोरेशनकडून एका पोस्टकार्डावर आलेली ज्युनिअर क्लार्कच्या पोस्टची ऑफर... त्या वेळेस जर ती घरच्यांच्या दबावाला बळी पडून स्वीकारली असती, तर आज एक 'रिटायर्ड क्लार्क' म्हणून पेन्शन किंवा फंड घेऊन स्वस्थ बसले असते!

पण आमच्या चाळीतीलच एका माझ्यापेक्षा वयाने बऱ्याच मोठ्या, पण होमिओपॅथी शिकणाऱ्या मैत्रिणीने आग्रह धरल्याने मला नैतिक बळ आलं आणि शेवटी एकदाची आईने 'जाऊ दे शोभाला कॉलेजात', अशी निर्णयात्मक परवानगी देऊन बाबांना कुरकुरत का होईना तयार केलं आणि मला

रुईयाचा अर्ज भरून प्रवेशासाठी मुलाखतीला पाठवलं.

भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या, काळसर काचांमधून बुद्धिमत्तेची झलक दाखवणाऱ्या चमकदार डोळ्यांच्या, गंभीर भासणाऱ्या, तरीही ऋजू अशा उपप्राचार्यांनी– मला वाटतं, त्यांचं नाव डॉ. व. म. परांजपे असावं– माझी मुलाखत घेऊन एकदाचा मला एफ. वाय. आर्ट्सला प्रवेश दिला.

त्या काळातही सायन्सकडे प्रवेश घेण्याकडे विद्यार्थ्यांचा विशेष कल होता किंवा मग कॉमर्सला आणि आर्ट्सकडे जाणारे विद्यार्थी म्हणजे उगाचच 'टाइमपास'साठी आलेली मुलं-मुली, असा एक फारच चुकीचा समज प्रचलित होता.

रुईयाचे विद्यार्थी-विद्यार्थिनी समाजाच्या संमिश्र अशा स्तरांतून आलेले असल्याने जवळच असलेल्या पारसी कॉलनीतील आखूड, टाइट स्कर्ट आणि वर शर्ट-टाइप ब्लाऊज घालणाऱ्या, बॉबकटवाल्या, गोऱ्यागोमट्या, फर्डं इंग्रजी बोलणाऱ्या ख्रिश्चन-पारशी मुली जशा फिरताना दिसायच्या; तशाच पारंपरिक, जरीच्या काठांचे, गर्द गुलाबी, ऑरेंज, जांभळे भडक रंगाचे घोळदार रेशमी परकर, तसाच ब्लाऊज, अंगाभोवती पांढरी ओढणीवजा परकरात अर्धवट खोचलेली साडी, तेल लावून चापूनचोपून बसवलेल्या केसांची वेणी, त्यावर माळलेले 'मल्लिगे' फुलांचे गजरे, कानांत चमकदार शुभ्र हिऱ्यांच्या कुड्या, गळ्यात लालसर मद्रासी सोन्याच्या साखळ्या अशा पेहरावांत वावरणाऱ्या दाक्षिणात्य मुलींचे घोळकेदेखील आढळायचे. साधेसुधे सलवार-कमीज किंवा उफाड्याच्या असल्या तर साडी नेसून येणाऱ्या महाराष्ट्रीय मुली लगेच ओळखू यायच्या. त्यातल्या त्यात 'स्लीव्हलेस' ब्लाऊज घालणारी मुलगी 'फॅशनेबल' समजली जायची. बाकीच्या मुलींवर 'काकूबाई'चा शिक्का बसण्याचा धोका असायचा.

इंग्रजी बोललेलं समजत असलं, तरी त्या माध्यमातून शिकून आलेल्या मुलींसारखं इंग्रजी संभाषणकौशल्य नसल्याने अन् वर्गात प्राध्यापकांनी काही विचारलंच, तर उत्तर द्यायला जमेल की नाही, ह्या विचाराने मनावर एक प्रकारचा ताण निर्माण व्हायचा. पण बहुतेक सगळाच प्राध्यापकवर्ग, अर्थातच काही अपवाद वगळता, मनमिळाऊ आणि विद्यार्थ्यांना समजून घेणारा असल्याने इंग्रजीतून उत्तर देण्याचा प्रयत्न करण्याचं धैर्य आपोआपच वाढत होतं. लायब्ररी, जिमखाना, कॉलेजचे कार्यालय ह्या विभागांत तर बव्हंशी महाराष्ट्रीय स्टाफ असल्याने ते आमच्याशी मराठीतूनच बोलायचे आणि त्यामुळे कॉलेजच्या दैनंदिन व्यवहाराचे नियम समजावून घेणं, फी भरणं– ह्या गोष्टी सुसह्य व्हायच्या.

रुईयाची वर्षानुवर्षं सेवा करताना काळ्याचे पांढरे झालेले तिथले प्यून्स म्हणजे कॉलेजचा एक अविभाज्य घटक होता. खाकी युनिफॉर्म्समध्ये वावरणारे हे प्यून्स आणि नवथर तरुण-तरुणींच्या कित्येक वर्षांच्या निरीक्षणातून समृद्ध झालेलं त्यांचं अनुभवविश्व... ते म्हणजे, नवीनच प्रवेश घेतलेल्या मुलामुलींचे 'काऊन्सेलर'च होते. प्राध्यापकमंडळींचीही सगळी कामं हेच लोक बिनबोभाट पार पाडत.

रुईयाचा आर्ट्स शाखेचा प्राध्यापकवर्ग अतिशय नावाजलेला होता. नर्मविनोदाची पखरण करत, प्रसंगी 'गजगामिनी'चं वर्णन करताना, 'Have you seen an elephant from behind while he is walking' अशी चावटपणाची मजेशीर मल्लिनाथी करत संस्कृतसारख्या अवजड विषयालाही सुसह्य आणि मनोरंजक बनवणारे, संस्कृत नाटकांतील सौंदर्यस्थळं त्यांच्या शैलीदार वक्तृत्वाने विद्यार्थ्यांना नेमकी दर्शवणारे प्राध्यापक महाशब्दे... अंगावर 'नायगारा' कोसळावा, अशा ओघवत्या, अत्यंत प्रभावी, भारावून टाकणाऱ्या मराठी भाषेचा परिचय करून देत ज्ञानेश्वरीचा पंधरावा अध्याय शिकवणारे, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक असूनदेखील वादविवादासाठी 'ह्या टाळकुट्यांनी देश बुडवला' अशी प्रक्षोभक विधानं करून विद्यार्थ्यांना हरखून टाकणारे नामवंत समीक्षक आणि प्रख्यात टीकाकार डॉ. रा. शं. वाळिंबे... नीटनेटक्या, चलाख, अंबाड्यात न चुकता रोज ताज्या फुलांची वेणी माळून येणाऱ्या, पाणीदार डोळ्यांच्या 'बोल्ड' आणि पुणेरी खोचकपणाची नमुनेदार झलक– विशेषत: त्यांच्या 'बनेल' ह्या आवडत्या शब्दाच्या वापरातून– आणि परखड, प्रसंगी फटकळ, बोचऱ्या वाटणाऱ्या बोलण्यातून दाखवणाऱ्या 'बाई' म्हणजेच प्रा. डॉ. सरोजिनी वैद्य... इंग्रजी वाङमयाचे गाढे अभ्यासक आणि 'परफेक्ट' उच्चारांवर भर देणारे, तरतरीत, उमद्या व्यक्तिमत्त्वाचे प्रा. श्रीकुमार... स्वत:ची जीभ जड असूनदेखील विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायला प्रोत्साहन देणारे, स्वत:च्या सामान्य रूपावर त्यांच्या मार्मिक विनोदशैलीच्या अचूक निरीक्षणशक्तीने आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाने मात करत विद्यार्थ्यांना जिंकून घेणारे 'पी.जे.' किंवा प्रभुजोशी त्यांचा इकॉनॉमिक्स विषय अतिशय तयारीने शिकवत. इंटर आर्ट्सला असताना मला 'मी रविवारची सुट्टी कशी घालवते?' ह्या किर्लोस्कर मासिकाच्या निबंध स्पर्धेत पारितोषिक मिळालं, तेव्हा पीजेंनी न विसरता मला तास संपल्यावर, त्यांच्या मागोमाग मीही बाहेर पडताच 'काय मग, असाच घालवता का रविवार?' हा मिस्कीलपणे विचारलेला प्रश्न माझ्या अजूनही लक्षात आहे.

अशा ह्या अभ्यासपूर्ण 'लेक्चर' देणाऱ्या आणि वक्तृत्व अवगत असलेल्या अनुभवी प्राध्यापकांच्या जोडीला, काही हास्यविषय ठरणारे, नवीनच आलेले तरुण, अननुभवी असेही काही प्राध्यापक होते. दीड-दोनशे विद्यार्थ्यांच्या चुलबुल्या, नटखट वर्गाला तोंड द्यायच्या कल्पनेनेच घाम फुटलेले, पण तसं न दर्शवण्याची निष्फळ खटपट करतानाच त्यांच्या 'Body language'मधून ती नकळत व्यक्त करणारे प्रा. भांडारे आणि एक साऊथ इंडियन प्राध्यापिका... त्यांची वक्षस्थळं जरा अधिकच नजरेत भरण्याइतकी भरदार होती– वयाने त्या ३०-३५च्या असाव्यात... त्यांचे हात सारखे घसरणाऱ्या सिल्क साडीचा पदर

अंगावरून घट्ट लपेटून घेण्यात गुंतलेले... एक प्राध्यापकांना तर आम्ही 'केनेडी' ठरवून टाकलं होतं! अशा ह्या सगळ्या प्राध्यापकांनी माझ्या स्मृतिपटलावर त्यांची मोहोर कायमची उठवून ठेवली आहे.

कॉलेज म्हणजे केवळ लेक्चर बुडवून कॅन्टीन, समोरचा कॉलेजकट्टा (जिथे अर्थातच 'सॉफ्ट रॅगिंग' करणाऱ्या लाइफमेंबर प्रौढ विद्यार्थ्यांचा ठिय्या असायचा आणि त्यांच्या अंगावरून जायलाही आम्ही बिचकत असू!), नाहीतर कॉलेजमागची हिरवळ किंवा जवळपासची उडिपी हॉटेलं... इथे मजेत टाइमपास करत कॉलेजलाइफ 'एन्जॉय' करण्याचं ठिकाण नसून ज्ञानाची भांडारं तुमच्यापुढे अक्षरश: खुली करून देऊन, 'लुटा कितीही; आमचं ज्ञान त्यामुळे कमी न होता उलट वृद्धिंगतच होणार आहे', असा संदेश कॉलेजच्या जेवढ्या विद्यार्थ्यांना देता येईल, तेवढा पोहोचवत ज्ञानदानाला वाहून घेतलेले प्राध्यापक... त्यांच्यामुळेच आपणही भावी आयुष्यात त्यांच्यासारखं कोणीतरी होण्याची प्रेरणा मनात



**स्पोर्ट्स डे**

जागृत होत होती.

शालेय जीवनात स्कूल गॅदरिंग, प्राईझ डे, स्नेहसंमेलन, स्पोर्ट्स डे, सेंड ऑफ अशा सगळ्या कार्यक्रमांचं स्वरूप आणि कॉलेजमध्ये प्रथमच अनुभवाला येणारे, प्रचंड उत्साहात पार पाडणारे कॉलेज डे, कॉलेज पिकनिकसारखे कार्यक्रम, ह्यांच्यात एक छोटासा तलाव आणि फेसाळणारा समुद्र ह्यात असावा तेवढा फरक असल्याने सुरुवातीला भांबावून गेलेल्या आम्ही एफ.वाय.च्या विद्यार्थिनी, इंटर आर्ट्सच्या टप्प्यापर्यंत मजल मारल्यावर मात्र बऱ्याचशा स्थिरावू लागलो होतो. अर्थात् त्या वर्षी अभ्यासक्रमात नव्याने भर पडलेले वर्ल्ड हिस्ट्री, लॉजिक, इकॉनॉमिक्ससारखे अपरिचित विषय आणि इंटरला अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ह्यामुळे 'अभ्यास व्यवस्थित झाला पाहिजे, नाहीतर...' अशी दोलायमान अवस्था असूनदेखील मी त्या वर्षी कॉलेज डे निमित्ताने ठेवण्यात आलेल्या 'फॅन्सी ड्रेस' स्पर्धेत भाग घेतला आणि चक्क पहिलं बक्षीस मिळवलं! विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांत किंवा विशेषत: विद्यार्थिनींत इतरांपेक्षा जरा अधिकच प्रिय असलेल्या इंग्लिश लिटरेचरच्या हुशार, तरुण प्रो. पकरासी ह्या बंगाली प्राध्यापकांनी बरीच मेहनत घेऊन शेक्सपिअरच्या नाटकांतल्या पात्रांची वेशभूषा रंगभूषा त्यांच्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांना त्याच स्पर्धेसाठी रंगमंचावर सादर केलं होतं.

पण माझी मेहनत अधिक वास्तववादी, लक्षवेधी ठरली.

आईबरोबर चक्क वरळी कोळीवाड्यात जाऊन, कोळिणीसारखी अंगाला चोपून-चापून बसणारी गुडघ्यापर्यंतची, चक्क पोटऱ्या दाखवणारी आखूड साडी नेसवून घेऊन, वर पांढरी ओढणी, 'स्टफ' केलेला मोठ्ठा पिळाचा अंबाडा, त्यावर माळलेला गजरा आणि कानांत वजनदार, चापाने बसवलेल्या रिंगा, हातात एक टोपली आणि त्यात पुठ्ठ्यावर चंदेरी कागद चिकटवून तयार केलेली पापलेट... अशा जाम्यानिम्यासह अस्मादिकांची स्वारी टॅक्सीने कॉलेजमध्ये अवतरली अन् स्टेजवर जाऊन 'म्हावरं घ्या, म्हावरं ऽऽ ताज्या पाण्याचं म्हावऽऽरं... ए चष्मेवाल्या, हावर ये, हावर ये...' अशी 'रिहर्सल' केलेली वाक्यं ठसक्यात म्हणून मी परीक्षकांना जिंकलं! अर्थात, वरळी कोळीवाड्याच्या म्युनिसिपल शाळेत शिकवणाऱ्या माझ्या आईचा जनसंपर्क त्या वेळी उपयोगी पडला होता.

नंतरचे २/३ दिवस प्रो. पकरासी मात्र त्यांचा पराभव खिलाडूपणाने न पचवता 'fish market, fish market' अशी गमतीदार टोलेबाजी करत होते.

दीडशे-पावणेदोनशे विद्यार्थ्यांनी भरलेल्या वर्गातून इंटर आर्ट्सची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आता बी.ए.ला मात्र आपापल्या विषयांनुसार मर्यादित विद्यार्थ्यांबरोबर अध्ययन करायचं होतं. कोणता विषय निवडायचा, ह्या विचाराने डोक्यात गोंधळ निर्माण व्हायला लागला होता.

'इकॉनॉमिक्स?'... सर्वाधिक विद्यार्थ्यांचा कल असलेला विषय? छे, जमणार नाही. संस्कृत? नाही, नको... इंग्रजी साहित्य? इच्छा तर खूप होती, पण प्रा. श्रीकुमार विभागप्रमुख. ते म्हणाले, ''तुमची सेकंड लँग्वेज फ्रेंच नाही किंवा तुम्ही इंग्रजी माध्यमातूनही शिक्षण घेतलेलं नाही, त्यामुळे तुम्हाला ते जड जाईल...'' नियमानुसार मला ह्या विषयासाठी प्रवेश देणं कठीण.

सायकॉलॉजी किंवा सोशियॉलॉजी घ्यायचीदेखील माझी इच्छा होती, पण रुईयाला हे विषय घेऊन बी.ए. करण्याची त्या वेळी सोय नव्हती. आश्चर्य म्हणजे, नंतर नावारूपाला आलेलं 'रूपारेल कॉलेज' त्या वेळेला बदनाम होतं; तर सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये सधन, उच्चभ्रू वर्गातून आलेल्या मुलामुलींनी आणि

त्यांच्या त्या वेळेस आमच्यासारख्यांना अतिशय पुढारलेल्या वाटणाऱ्या, पाश्चात्त्य धर्तीच्या फॅशन्सनी आणि एकंदरीतच अतिशय वेगळ्या वातावरणाने अप्राप्यच ठरलं.

शेवटी माझी लिखाणाची आवड लक्षात घेऊन मी मराठी स्पेशल आणि सोबत इथिक्स हे विषय घेऊन रुईयातच बी. ए. करायचं ठरवलं आणि नंतर त्या निर्णयाचा मला कधीही पश्चात्ताप झाला नाही. कारण पदव्युत्तर शिक्षणासाठी मी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसमध्ये प्रवेश मिळवण्यात यशस्वी ठरले आणि १९६७ मध्ये एम.ए. सोशल वर्क, स्पेशलायझेशन फॅमिली ॲन्ड चाईल्ड वेलफेअर– ही पदवी मिळवली. सगळ्याच अप्लाईड सोशल सायन्सेसचा अभ्यास करण्याची माझी हौसही पूर्ण झाली.

बी.ए.च्या अभ्यासक्रमाची दोन वर्षं वसंत बापटांसारख्या अष्टपैलू, प्रतिभावान, शब्दप्रभू, रसिक ऋजू व्यक्तिमत्त्वाच्या प्राध्यापकांकडून मराठी भाषेसोबत एक काव्यमय, खोलात जाऊन केलेला प्रवासच जणू काही पार पडला. फक्त एकच उणी बाजू म्हणजे बापटसरांच्या नानाविध उपक्रमांमुळे त्यांची खटकणारी अनियमित उपस्थिती. पण ते जेव्हा यायचे, तेव्हा मात्र सगळी उणीव भरून निघायची, खूप मजा यायची त्यांच्या तासांना. शांता शेळकेंनीही सुरुवातीचे काही दिवस आम्हाला शिकवलं... अतिशय साध्या आणि निगर्वी.

मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने बरेच समीक्षक भेटले. दिलीप प्रभावळकरांबरोबर एका विनोदी एकांकिकेत काम करण्याची संधी मिळाली. अतिशय स्वाभाविक विनोदाची उपजतच देणगी.

कॉलेजच्या काही प्राध्यापकांची प्रेमप्रकरणं (त्यांच्या विद्यार्थिनींबरोबरची!) आणि त्यांचं रूपांतर विवाहबंधनात होईल की नाही, ह्यावर आमची 'स्पेक्युलेशन्स'; पीजे आणि एम. ए. संस्कृत करणारी मृदुला आगासकर... तिचं ते भलंमोठं कुंकू, एक वेणी, तिच्या काठाच्या पांढऱ्या साड्या, गोरा रंग आणि ठसठशीत नाक-डोळे, बऱ्यापैकी उंची आणि बांधा असूनदेखील तिचं ते ढांगा टाकत धपाधप चालणं... दोन विभिन्न व्यक्तिमत्त्वं परस्परांकडे कशी आकर्षित होतात, त्याचा तो एक आदर्श नमुनाच ठरावा! एवढ्या 'स्मार्ट' श्रीकुमारसरांना आवडलेली ती एक साधीसुधी, अबोल, नाजुक महाराष्ट्रीय कॉलेजतरुणी आणि नंतर झालेले ह्या दोन्ही जोड्यांचे विवाह... खरं सांगायचं म्हणजे, मुलींच्या घोळक्यामागे कॉमेंटरी करत हिंडणाऱ्या आचरट कॉलेज तरुणांपेक्षा आम्हाला आमचे काही प्रगल्भ प्राध्यापकच सगळी अंतरं ओलांडून अधिक मोहित करत होते. (श्रीकुमारांचं लग्न झाल्यावर तर मी चक्क उदास झाले होते!)

प्रो. पकरासी आणि त्यांच्याभोवती सदैव असलेला त्यांच्या इंग्रजी विषयाच्या विद्यार्थिनींचा गराडा, हेही आमच्या नजरेतून सुटलं नव्हतं आणि कॉलेजच्या 'फिशपॉन्ड' कार्यक्रमासाठी मी आणि माझी 'गावठी वैजयंतीमाला' हे बिरूद कॉलेजतरुणांनी बहाल केलेली उंचीपुरी, बरीचशी स्थूल, पण रेखीव भुवया, जाडसर ओठांचा चंबू करण्याची 'स्टाईल' आणि 'संगम' स्टाईल साडी नेसण्याची पद्धत ह्या गुणविशेषणांनी युक्त मैत्रीण शोभा आजगावकर आम्ही दोघींनी मिळून एक 'फिश' तयार केला, जो मला अजूनही आठवतो; तो असा– 'The Sun may not shine as bright as ever, the moon may appear less lovelier, but you without the circle of girls, never... never... never!'

कार्यक्रमात 'फिश' वाचून दाखवण्यात आला आणि आम्ही तो 'बॉक्स'मध्ये टाकताना अर्थातच आमची नावं त्याच्याखाली न लिहिल्याने सुटलो आणि आमच्या कवित्वाची दखल घेतली गेल्याने चांगल्याच खूश झालो!

मराठी विषय बी.ए. साठी घेतलेला फक्त एकच पुरुष विद्यार्थी आमच्या बॅचमध्ये होता, त्यामुळे सहाध्यायी विद्यार्थ्यांबरोबर प्रेम वगैरे जमण्याचे विशेष काही चान्सेस नव्हते. तसंही कॉलेज म्हणजे देखण्या, उठून दिसणाऱ्या, फॅशनेबल, तोऱ्यात राहणाऱ्या श्रीमंत तरुणींच्या मागे घोटाळत मुलांनी त्यांच्यावर जीव टाकणं, अशीच काहीशी संकल्पना मनात रुजत चालली होती.. कॉलेजच्या कक्षेच्या बाहेर, पण रंगमंदिरच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या संदर्भ विभागात परिचय झालेल्या, एक नोकरी करून मराठी विषयात एम.ए. करणाऱ्या, कवितेची आवड असल्याने सायक्लोस्टाईल स्वरूपात का होईना पण एक छोटंसं साप्ताहिक चालवणाऱ्या मनस्वी तरुणाशी मैत्री झाली होती. त्याचं अक्षर फार सुरेख, तिरपं आणि जलद गतीने लिहिलेलं तरीही रेखीव होतं, हे अजूनही आठवतं. त्याने केलेल्या कविता तो मला प्रथम वाचायला द्यायचा. (आज तो मान्यवर कवी आहे) मलाही वाटायचं, आपणही कविता कराव्यात; पण ते काही कधी जमलं नाही. कवीचा पिंड असावा लागतो, म्हणतात ना!

एरवी आणि विशेषतः ह्या लेखाच्या निमित्ताने पूर्वायुष्याकडे वळून पाहताना, आजची 'तरुणाई' आणि आमची पिढी, ह्यातला कॉलेजजीवनाच्या संदर्भातला आर्थिक 'फॅक्टर' प्रकर्षाने जाणवतो. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आयुष्यात काहीतरी साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण घेण्याच्या ध्येयाने झपाटलेल्या काही मोजक्या तरुण-तरुणींचे अपवाद वगळले, तर बाकीची मुलं-मुली कशासाठी कॉलेजात जात असतील?

अंगावर डिझायनर कपडे, उडवायला ××खाली मोटरसायकली, 'पब' कल्चर आणि फटाकड्या मैत्रिणी किंवा ऐटबाज 'हीरो टाइप' मित्र, हे आत्ताचं चित्र आई-वडिलांनी हातचं न राखता केलेल्या 'डोनेशन'पासून ते पॉकेटमनीपर्यंतच्या खर्चाशी कितपत इमान राखतं? आमच्या वेळेस एखाद्या सिगारेट ओढणाऱ्या तरुणाकडेदेखील काहीसं नाराजीनेच बघण्याचा कल होता आणि

आता मुलींनीदेखील अगदी 'पब्लिकली' सिगारेट ओढल्या तरी कोणाला काही विशेष वावगं वाटत नाही!

एकूण चौदा पैसे दादर-पोर्तुगीज चर्च ते रुईया कॉलेज, माटुंगाला, बसचं जाण्यायेण्याचं भाडं आणि नेमके तेवढेच खिशात ठेवून कॉलेजला जाताना जेव्हा परतताना बसमध्ये चढल्यावर माझ्या खिशात सात पैसेदेखील नाहीत, असं कळून आल्यावर घाबरून गेलेली मी... कॅन्टीनमध्ये वडा-पाव खाण्याइतकेदेखील पुरेसे पैसे खिशात नसणं... मग 'कोक' तर दुर्मिळच... फॅशनेबल कपडे घालण्याची ऐपत नसल्याने आईच्या साड्या नेसणं आणि विरोधाभास म्हणून इतर मुलामुलींच्या लाइफस्टाइलकडे विस्मयाने बघणं. स्वत:च्या खिशातून खर्च करून माटुंग्याच्या उडप्याकडे डोसा खाऊ घालणाऱ्या काही दिलदार मित्र-मैत्रिणी...

सगळे कटुगोड अनुभव पचवत शेवटी त्या वेळी कठीण भासणाऱ्या टाटा इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश मिळवण्याची जिद्द दिली, ती रुईया कॉलेजच्या जडणघडणीच्या त्याच चार वर्षांनी... आणि नुकत्याच फुटलेल्या पंखांना फुलारून शिक्षण-नोकरी स्पर्धेच्या क्षेत्रात भरारी घेण्याची उमेदही दिली, तीही त्याच कॉलेजच्या दिवसांनी... वाटचालीला दिशा देणाऱ्या आणि पथदर्शक दिवे ठायी- ठायी दाखवणाऱ्या माझ्या प्राध्यापकांचं ऋण माझ्यावर नेहमीच राहील.

**शोभना शिशिरकुमार शिकनीस**
बंगला नं. १०९, लेन ४ बी,
कोरेगाव पार्क, पुणे - ४११००१
फोन नं. - ९८६००९८९५७
shobhana_shiknis@yahoo.com

अपहृत मुलांचं त्यांच्या मातांबरोबर पुनर्मीलन घडवून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणाऱ्या डोन्याची खरीखुरी चित्तथरारक कहाणी...

**हिरॉईन ऑफ द डेझर्ट**

**डोन्या अल् - नहि**
अनु. शोभना शिकनीस



**१५०रु.**

कॉर्पोरेट विश्वातल्या स्त्रीच्या भावभावनांचे, द्वंद्वाचे मिश्किल अनेकरंगी पॅकेज...

**पीस ऑफ केक**

**स्वाती कौशल**
अनु. शोभना शिकनीस



**२००रु.**

हिटलरच्या काळातील कल्पनातील मानवी हालअपेष्टा आणि संहाराच्या कालखंडाची थरारून टाकणारी मेरी बर्गची डायरी...

**द डायरी ऑफ मेरी बर्ग**

**एस. एल. श्नायडरमन**
अनु. शोभना शिकनीस



**१८०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



# ‘वर्गाबाहेर शिका’ असा धडा देणारे कॉलेजमधले दिवस

अविनाश पंडित

**आमच्या कॉलेजमधील प्राध्यापकांनी ‘वर्गाबाहेर शिका’ अशी दृष्टी दिली. अमृते सर पहिल्या चार-पाच सेकंदातच मधुकंस, अभोगी, कलिंगडा असे गोत्रप्रवर ओळखायचे. काहीजण सपाटून वाचायचे. त्या प्राध्यापकांनी आम्हाला बर्ट्रांड रसेल वगैरेंची दीक्षा दिली. दोन-चार प्राध्यापकांनी मुलांना खेळाची गोडी लावली.**

तसे म्हटले तर माझ्या कॉलेजमधील दिवसांचे दरवर्षी एक याप्रमाणे चार टप्पे पडतात. पाचवा टप्पा घ्यायचाच झाला तर तो पुढच्या दोन वर्षांमधील एम. ए. मधला.

आमचे मराठीचे एक प्राध्यापक टप्पेवारीत बोलत. बस कंडक्टर टप्पे बघत तिकिटे फाडतो तसे हे गृहस्थ मराठी काव्याचे टप्पे, इतिहासाचे टप्पे, लघुकथेचे टप्पे अशी चिरफाड करत असत. ‘वाङ्मय कालसापेक्ष असते’ असले बाण सोडले तर एरवी कवी/लेखक/निबंधकार यांच्याबद्दल पोलीस रिपोर्टमध्ये असल्यासारखी माहिती देत. नशीब एकच की त्यांना वि. मा, द. वि. असल्या नावाने संबोधून त्यांचे प्रस्थ कोणी वाढवले नव्हते. माणूस अभ्यासू होता, पण मराठी साहित्यसेवा करणाऱ्यांबाबत आमच्या मनात प्रचंड नावड निर्माण करायची महान करामत त्यांनी केली आणि मराठीचा अभ्यास माझ्या टप्प्यात कधीच आला नाही. हे असले प्राध्यापक आणि एन.सी.सी.मधील काही असंतुष्ट लष्करी अधिकारी, जे निष्कारण डाफरत, सोडले तर कॉलेजमधील दिवस आनंदात गेले. (या लोकांकडून देखील कसे वागू नये याचे शिक्षण मिळाले.)

अकरावी शालान्त परीक्षा वेळेवर झाली. निकाल वेळेवर जाहीर झाले, प्रवेश प्रकियेचा घोळ घालणारे बहुधा जन्माला यायचे होते. क्लासला जाऊन अचाट मार्क मिळवणारे व त्यावरून हुशार ठरवले जाणारे सायन्सला गेले, काहींनी कॉमर्सची वाट धरली. मी प्रथमपासूनच आर्ट्सला जाण्याचे ठरवले होते आणि त्याप्रमाणे मुंबईतील गावावरून ओळखल्या जाणाऱ्या एका कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मार्क बरे होते आणि फर्स्ट इयरला रु. ७५ इतकी शिष्यवृत्ती मिळाली.

काय करायचे ते अगोदरच ठरवल्याने वेल बिगन इज हाफ डन ही इंग्रजी म्हण खरी ठरली. खरे म्हणजे भाषांखेरील इतर काय विषय असतात हे मला फर्स्ट इयर आर्टसचा फॉर्म भरेपर्यंत माहीतदेखील नव्हते. गणित नको हे (चुकीचे) ध्येय होते. त्यामुळे इतिहास, भूगोल, लॉजिक वगैरे विषयांची कास धरली. बी.ए.ला भूगोल घ्यायची आमच्या कॉलेजात सोय होती. मला पदवीसाठी

तोच विषय हवा होता. त्यामुळे अन्य विषय आणि भाषा दोन वर्षेच आहेत याचे समाधान होत.

खरे तर माझा प्रॉब्लेम या भाषा किंवा विषय यांच्याशी नव्हता. जे शिकवले जायचे त्याच्याशी होता. सिव्हिक्स किंवा इकॉनॉमिक्समध्ये ओ की ठो माहीत नसताना तो विषय आर्ट की सायन्स की दोन्ही हे शिकवण्याचा अट्टाहास का ते उमगत नव्हते. आमचे भिसे मालक सोडून द्या पण कुठला मालक रिकार्डो सांगतो त्याप्रमाणे भाडे आकारतो?

'पर्वतप्रदेशमे पावस' अशी सुमित्रानंदन पंत यांची कविता होती. आता हिमालयातील कोणत्यातरी प्रदेशातील पाऊस काय असतो हे शिकवायची काही आवश्यकता होती काय? 'गगनबावडामे वर्षा' अशी कविता कोणी उत्तरप्रदेशमध्ये किशवेल काय? मला तर सुरुवातीला ही कविता कोकणातल्या पावस या गावाबद्दल आहे असेच वाटले. हिंदी भाषिकांची दृष्टी आपल्या प्रदेशाच्या पलीकडे जात नाही हे फार उशीरा कळले.

सणासुदीच्या दिवसांत तोंडापूर्वी तेल आणि साखर हे पदार्थ बाजारातून गायब होतात तसे फ्रेंचची *कोलंबा* ही कादंबरी मिळेनाशी झाली. मग सरकार रेशनवर पाम तेल देते तशी कोणीतरी टाईप करून त्या कादंबरीच्या सायक्लोस्टाईल प्रती बाजारात आणल्या. साहित्यिक मूल्य काय होते ते अजून गुलदस्त्यात आहे. पण सिलेक्शन भाषा शिकवण्यात मजा आणली. गी द मॉपाँसाची द लास्ट लेसन किंवा अन्य फ्रेंच लेखकांच्या कथा फ्रेंचमध्ये वाचल्या.

इंटर आर्ट्सला *द स्नोमन* नामक कादंबरी अभ्यासाला होती. ही का लावली गेली असावी याचे कोडे मला अजून सुटलेले नाही. कदाचित रद्दड कादंबरी विकण्याची प्रकाशकांची शक्कल असावी. त्यात शेरी या मादक पेयाचा उल्लेख हा काय त्या कादंबरीतील एकमेव रोमँटिक भाग होता. ओरिएंट लॉंगमनमध्ये शेरी नावाची आकर्षक तरुण सहकारी होती ती एकदम डोळ्यांसमोर आली. पण तुम्हाला त्या गोष्टी काय करायच्या आहेत? शिवाय त्या शेरीला उचक्या लागतील ते वेगळेच!) *स्नोमन*च्या तासाला मी कंटाळा घालवायला शेवटच्या बाकावर शेखर या मित्राबरोबर गाण्यांची विडंबने करत होतो. वैभव या चित्रपटात 'अबोल झालीस का साजणी' असे महेंद्रकपूरचे गाणे आहे. 'अंघोळ केलीस का साजणी' या माझ्या प्रश्नाचे साजणीने उत्तर देण्यापूर्वी मांजरेकरसरांनी मला पकडले. माझी धडगत नाही असे मला वाटू लागले.

पण मी थोडक्यात सुटलो. सरांनी मला तबला-पेटी वाजवताना पाहिले होते, सोशल सर्व्हिस लीगच्या शिबिरात श्रमदान करतो वगैरे ऐकले होते म्हणून मुलींच्या रोमध्ये पहिल्या बाकावर बसण्याची 'सुखद' शिक्षा दिली. मी तबला वाजवत असे म्हणजे कॉलेजमध्ये, क्लासमधील क्लासिकल गाण्यांना साथ करत असे. तशी एकदा युनिव्हर्सिटी यूथ फेस्टिव्हलमध्येही कोणाचीतरी साथ केली आहे. पेटीचा व्याप देखील कॉलेजच्या स्टार तबलजींबरोबर चंद्रकौंसातील लेहरा धरण्याइतकाच होता. पण त्या उपक्रमांमुळे शिक्षा टळली एवढेच नव्हे तर एकूणात थोडासा सभाधीटपणा आला. त्याचा पुढे खूपच उपयोग झाला.

तरी बरे, मांजरेकर सरांना माझा एक उद्योग माहीत नव्हता. कॉलेजमध्ये संत मीराबाईंच्या ४००व्या जयंतीनिमित्त मीरा भजन स्पर्धा होती. आमच्या वर्गातील, पोलीसमध्ये असणाऱ्या मित्राला, कुठलेतरी चित्रपटातील एकच भजन येत होते. त्याच्या शेवटी 'मीरा के प्रभू गिरीधर नागर' या ओळी लावून मी त्याच्याकडून सराव करून घेतला; श्याम, मीरा के प्रभू वगैरे आळवून परीक्षकांवर इम्प्रेशन मारायला सांगितले व चक्क दुसरा क्रमांक आणवून दिला. मांजरेकरसरांना या माझ्या 'कृष्ण'कृत्याचा पत्ताच नव्हता.

कॉलेजमध्ये अभ्यासातेर गोष्टींनी बरेच काही दिले. त्यातील एक म्हणजे सोशल सर्व्हिस लीगचे कॅम्प्स काही आठ-दहा दिवस कुठल्यातरी आडरस्त्यावरच्या खेड्यात राहायचे, सकाळी-संध्याकाळी चार-चार तास रस्ता तयार करण्यासाठी कुदळीने खडक फोडणे व फावड्याने माती गोळा करणे, विहिरीतून पाणी काढून नित्यकर्मे आटपणे आणि शेवटच्या दिवशी नाना दारशेतकर यांच्या हातचा स्वयंपाक खाऊन 'बडा खाना' साजरा करणे. वास्तविक नाना कोणाच्यातरी हाताखाली बुंदी पाडायचे. पण कॅम्पमध्ये ते एखाद्या पंचतारांकित हॉटेलचे मुख्य चेफ असल्यासारखे वावरायचे. बडा खान्याला ते दुधी भोपळ्याची खीर करायचे. बाँबाँ, स्यूस, आसुकारडो, आमाई वगैरे नावांनी नाना ती खीर विकते तर त्रिखंडात त्याचे नाव दुमदुमले असते व *गृहिणी* यासारख्या मासिकामधून विविध अन्नपूर्णांनी त्यामध्ये चॉकलेट वगैरे घालून त्याची लज्जत नंतर वाढवली असती!

सोशल सर्व्हिस लीगची चिटणीसपदाकरता मी निवडणूक लढवली. व मी निवडून आलो. चिटणीस असताना मला सर्वांत मोठे आव्हान वाटले ते म्हणजे आपणच आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांना प्रवृत्त करणे हे होय. अनेक खोट्यानाट्या सबबी सांगून माणसे जबाबदारी कशी टाळतात याचे प्राथमिक धडे मला त्यावेळी मिळाले. इमानेइतबारे रक्तदान करणारे न बोलवता आले.

बी.ए.ला ज्युनियरच्या वर्गात मी आलो तेव्हा भूगोल हा आवडता विषय मिळाला. आमच्या आईला वाटले की मला फर्स्टक्लास मिळणार. पण तसे अर्थात घडायचे नव्हते. एकतर भूगोलात जर्नल राखायचे असे, दोन वर्षांच्या शेवटी एकदम सहा पेपर्सची परीक्षा असे, फिल्डवर्कसाठी दरवर्षी दोन-चार लहान आणि दीर्घ मुदतीच्या सहली असत. त्यांचे अहवाल नकाशासहीत लिहिणे असे. शिवाय हे नियमित करावे लागे आणि माझ्यासारख्या गैदी माणसाला हा व्यवहार पेलवणारा

नव्हता. दुसरे म्हणजे अलका, शैला, शकुंतला, लिओनी फर्नांडिस वगैरे वगैरे मोहिनी होत्या.

ज्यांनी शिकायला मिळते अशा अनेक गोष्टी या दोन वर्षात मला उपलब्ध झाल्या. सहलीत प्रवास करताना आमचे अरुणाचलम सर रनिंग कॉमेंट्री करत आजूबाजूच्या प्रदेशाचे वर्णन करत असत. शहरात पायी फिरत असताना शहरातील ठळक वैशिष्ट्ये सांगायचे. जगाकडे बघायची त्यांनी नवी दृष्टी दिली. ते आम्हाला संख्याशास्त्र व नकाशाशास्त्र शिकवत. अभ्यासात माझी कामगिरी 'सरासरी' होती. पण आकृती, नकाशे काढताना किंवा उदाहरणे सोडवताना फळ्याचा वापर कसा करायचा त्याचे संसार त्यांनी दिले. भूगोलमहर्षी म्हणून महाराष्ट्रात ज्यांचा आदराने ओळख करून दिली जाते त्या डॉ. सी. डी. देशपांडे यांनी संशोधन कसे करावे याचे प्राथमिक धडे दिले. त्यांनी शिकवावे कसे हे नर्मविनोदी पद्धतीने दाखवून पुढच्या माझ्या प्राध्यापकीचा पाया घातला. शिक्षकाचे, अगदी तो भूगोलाचा का असेना, भाषेवर प्रभुत्व का असावे ते सीडी यांनी पटवून दिले. एक कप चहा प्यायला जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळात ते टाईम्समधील शब्दकोडे सोडवत.

मग काय, भाषा चांगली करणे हे ध्येय बनले. रेडिओ हे त्याचे प्रभावी माध्यम ठरले. शूरजित सेन, लोतिका रत्नम यांच्या इंग्रजी, देवकीनंदन पांडे, अशोक बाजपेयी यांच्या हिंदी आणि कुसुम रानडे, शरद चव्हाण यांच्या मराठी बातम्या मेजवानी ठरायच्या. पिअर्सन सुरिता, डिकी रत्नागेर, विजय मर्चंट यांच्या रसाळ इंग्रजी समालोचनाचे श्रवणाने भाषेबरोबरच क्रिकेटमधील रूची वाढवली. उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्याच्या वेळी स्क्वेअर लेगला उभा असणाऱ्या क्षेत्ररक्षणाची पोझिशन लगेच डाव्या हाताने फलंदाजी करणाऱ्याच्या वेळी पॉइंट होते हे टी.व्ही. बघणाऱ्यांना कळते की नाही माहीत नाही. पण अनंत सेटलवाड यांनी निव्वळ आवाजाच्या सामर्थ्यावर ते समजावले. दिल्लीच्या कसोटीत (१९६९) बेदी व प्रसन्न यांच्या चेंडू वळवण्यामुळे ऑस्ट्रेलियन खेळाडूच नव्हे तर यष्टिरक्षक फरूक इंजिनियरदेखील चक्रावला आहे ही गंमत रेडिओवरून कळली. (त्या मांजरेकर सरांनी वर्ग लवकर सोडून दिला म्हणून हे साध्य झाले म्हणून त्यांनाही प्रणाम.)

आमच्या कॉलेजमधील प्राध्यापकांनी 'वर्गाबाहेर शिका' अशी दृष्टी दिली. अमृते सर पहिल्या चार-पाच सेकंदातच मधुकंस, अभोगी, कलिंगडा असे गोत्रप्रवर ओळखायचे. काहीजण सपाटून वाचायचे. त्या प्राध्यापकांनी आम्हाला बर्ट्रांड रसेल वगैरेंची दीक्षा दिली. दोन-चार प्राध्यापकांनी मुलांना खेळाची गोडी लावली. अर्थात ते पूर्ण यशस्वी ठरले नाहीत कारण एका हॉकी सामन्याच्या वेळी वर्गातल्या स्कॉलर मुलीने या गोलपोस्टकडून त्या गोलपोस्टकडे धावणाऱ्या खेळाडूंकडे पाहून मला विचारले की इतक्या रन्स झाल्या तरी स्कोअरबोर्ड शून्य-शून्य का?

भूगोलाच्या सहली तर घडवण्याकरताच असाव्यात. गुन्नार मिर्डाल यांचे एशियन ड्रामा त्यावेळी नुकतेच अवतरले होते. तज्ज्ञांना ते पचवायचे कसे हा प्रश्न होता तर आमचे काय? आनंद हाच होता की वर्गातील काही ज्ञानियांच्या राजांप्रमाणे मला ते नाटक वाटले नव्हते. अर्थात त्याचे मोठे श्रेय लायब्ररीयन शिवदे सरांनी ड्यूई पद्धतीने ग्रंथालय कसे लावले आहे ते सांगितले त्याला.

मॅरिशस नव्यानेच स्वतंत्र झाले होते. तथील एक मुलगा व दोन मुली आमच्या वर्गात आले आणि सात पिढ्यांची ओळख असल्यासारखे आमचे झाले. कॉलेजमध्ये या सहलींमध्ये आम्हाला एकमेकांचे स्वभाव जवळून कळायचे. हॉटेलवाले, ड्रायव्हर यांच्याशी हुज्जत कोण घालू शकतो, पोलिसांना कोण पटवतो, सामान कोण भरभर लावतो, नोट्स-नकाशे कोण चटकन काढतो, कोणाला कसली ॲलर्जी आहे इत्यादी समजायचे. इंग्रजीत हूज् हू (Who's Who) या धर्तीवर माझ्यासकट हूज हूज (Who's Whose) काढण्याइतका माझा अभ्यास झाला होता.

पण सहलीत अलका माझ्याकरता जेवायची का थांबते आणि स्वत:च्या ताटातली स्वीट डिशची वाटी मला का देते हेसुद्धा मला कळले असते तर?

**अविनाश पंडित**
९/बी इंद्रधनु को. ऑ. हौ. सोसा.,
तेजसनगर, कोथरूड, पुणे ४११ ०३८.
फोन नं. - ०२०-२५३८२२२६
avinash_s_pandit@yahoo.co.in

'अंडरवर्ल्ड' मधल्या भिन्न पातळीवर वावरणाऱ्या
माणसांमधले विलक्षण नातेसंबंध दाखवणारी
आगळीवेगळी कलाकृती!



**जिगर**

**'अग्नी' श्रीधर**
अनु. उमा कुलकर्णी

**६०रु** पोस्टेज २०रु.



# सळसळत्या तरुणाईचे झगमगते दिवस

शांतिलाल भंडारी

**विलिंग्डन कॉलेजात मी शरीरानं 'सायन्स' वर्गात असायचो, मनानं मात्र 'आर्ट्स' विभागात वावरायचो. इंजिनिअरिंगला जायचं असल्यानं अभ्यासात कुचराई चालणार नव्हती. त्यामुळे फिजिक्स विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. व्ही. बर्वे यांचे माझ्यावर विशेष लक्ष होते. विलिंग्डनमध्ये इंटर सायन्सला असताना प्रा. बर्वे मला घरी बोलावून जादा शिकवायचे.**

'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं,' असं काही लुसलुशीत मनानं खुशखुशीत शब्दात गुलगुलीत म्हणायचे वा सांगायचे आमचे त्या काळातले कॉलेजचे दिवस नव्हते. आमचे म्हणजे माझे आणि माझ्या पिढीतल्या तरुणांचे. अनेक तरुणांचे आणि तरुणींचे असं काही मी इथं म्हटलेलं नाही, हे लक्षात घेण्यासारखं आणि अधोरेखित करण्यासारखंही आहे. त्या दिवसांत आमच्या कॉलेजातल्या, एवढंच नव्हे तर, अन्य कुठल्याही कॉलेजातल्या कुठल्याही वर्गात पाच-सात मुलीच असायच्या आणि वर्गातल्या चाळीस-पन्नास मुलांच्या संख्येच्या तुलनेत मुलींची ही संख्या थोडकी म्हणून नगण्य होती. 'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं' असं फुशारकीनं सांगायची अथवा ऐटीनं कुणावरही ठसवण्याची त्या काळी स्टाइल नव्हती, शैली वा पद्धत नव्हती. त्या काळच्या प्रेमाच्या संदर्भात काही बोलायचंच झालं, सांगायचंच झालं, तर असं म्हणता येत होतं, 'प्रेम एके प्रेम होतं, जिंकेल त्याची गॅरेंटी नव्हती, हरली तर शुअर शेम होती, चर्चेसाठी झकास गोम होती.' त्या काळात असंही म्हणता येत होतं, 'प्रेम एके प्रेम होतं, पिकेल याची हमी नव्हती, नासलं तर हमखास छीथू होती, टर उडवायला नामी संधी होती.' त्या काळी 'व्हॅलेंटाइन डे' मनावण्याची टूम नव्हती, गुलाबाचं फूल देऊन प्रेम व्यक्त करण्याची सोय नव्हती. गुलाबाचं फूल असं जाण्याऐवजी ते एक तर थेट देव्हाऱ्यात आणि गेलंच तर एखाद्या नारीच्या अंबाड्यात किंवा वेणीत जात होतं. त्या काळी आजच्यासारखी झिंग नव्हती, रीत मात्र तशी काही न्यारी होती. त्या काळी माझ्या सारख्यांच्या लेखीजोखी 'क्रांती एके क्रांती होती, आवेशानं लढणारी छाती होती.' तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता.

अशा या स्वातंत्र्यपूर्व काळात प्रेमाच्या विषयात मी अगदीच कोरा 'नर्मदेचा गोटा' होतो असा काही प्रकार नव्हता. मी तसा काहीसा 'शाळिग्राम' होतो. पण या विषयी मी इथं काही बोलणार नाही आणि लिहिणारही नाही. एवढं मात्र सांगतो की अशा प्रकारच्या विशुद्ध प्रणयाची परिणती पवित्र परिणयात, विवाह बंधनात झाली नव्हती. हे सांगायला मला संकोच वाटत नाही. तूर्त एवढं मी सांगू शकतो. अपवादानं का होईना माझ्या विषयात 'प्रेम म्हणजे प्रेम होतं, तुमचं आमचं सेम

होतं' आणि विशेषत्वानं 'क्रांती एके क्रांती होती, आवेशानं लढणारी छाती होती.' म्हणूनच की काय आंतरजातीय विवाह करण्याची आकांक्षा व महत्त्वाकांक्षा ध्यानी मनी राहून गेली.

माझ्या कॉलेज-जीवनाचा कालावधी इ.स. १९४१ च्या जून १९४५ एप्रिल-मे पर्यंतचा चार वर्षांचा होता. त्या काळी 'दहा दोन तीन' असा शैक्षणिक आकृतिबंध (पॅटर्न) नव्हता, तर अकरा चार असा होता. पूर्वीचे व आताचे ढाचे पंधरा वर्षांचे होते. स्वातंत्र्यपूर्व काळात मॅट्रिकनंतरची म्हणजे त्या काळातील अकरावी नंतरची चार वर्षे महाविद्यालयातील शिक्षणाची होती.

माझे महाविद्यालयीन शिक्षण स्वातंत्र्यपूर्व काळात झाले होते. इ. स. १९४१ मध्ये 'बॉम्बे युनिव्हर्सिटी'ची परीक्षा देऊन मी मॅट्रिक झालो होतो. १९४१ ते १९४२ व १९४२ ते १९४३ ही दोन वर्षे त्या काळातील एफ.वाय. सायन्स व इंटर सायन्ससाठी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात, १९४३ ते १९४४ हे एक वर्ष ज्युनिअर बी.एस्सीचे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात व १९४४ ते १९४५ हे शेवटचे सिनिअर बी.एस्सीचे वर्ष पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात असे त्या काळाप्रमाणे चार वर्षांचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून मी १९४५ मध्ये मुंबई विश्वविद्यापीठाची 'बी.एस्सी ऑनर्स' ही पदवी मिळवली. आता या परीक्षा विभागीय विद्यापीठांकडून - युनिव्हर्सिटीकडून घेतल्या जातात. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे असे होणे स्वाभाविक व क्रमप्राप्त होते.

चार वर्षांच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी माझी सांगली, कोल्हापूर व पुणे अशी त्रिस्थळी यात्रा झाली. मुंबई इलाख्यातील मराठी भाषिक पट्ट्यात त्या काळी मुंबई, पुणे, सांगली व कोल्हापूर या चारच शहरांत महाविद्यालये होती. आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक अथवा एकाहून अधिक; एवढेच नव्हे तर तालुक्याच्या गावी व अन्य काही लहान-मोठ्या शहरात महाविद्यालयांचे जाळे पसरले आहे.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी ओघाने एकाहून अधिक विद्यापीठांची निर्मिती झाली. स्वातंत्र्याची जी फळे मिळाली त्यातील हे महत्त्वाचे फळ आहे. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर त्याची खोली वाढली का हा प्रश्न बाजूला ठेवून असं निश्चित म्हणता येतं. आजकाल बाळ पाळण्यात असतानाच त्याचं नाव केजी स्कूलमध्ये घालण्याची धडपड सुरू झालेली आहे. प्ले ग्रुप, केजी आणि अप्पर केजी असं वयाच्या तिसऱ्या वर्षापासून मुलांना गुंगवणं, गुंतवणं चालू आहे. 'सोकॉल्ड वेल टू डु' श्रीमंतांच्या मुलामुलींसाठी ही जणू नवी 'पाळणाघरं'च. पूर्वीची 'इन्फंटी'पासून पदवीपर्यंतची सोळा वर्षे ही जर 'एज्युकेशन बुका'ची पेपरबॅक एडिशन गमतीने मानली तर सध्याची प्ले ग्रुपपासून पदवीपर्यंतची अठरा वर्षे ही 'एज्युकेशन बुका'ची 'हार्ड बाऊंड एडिशन' म्हणता येते. तसा हा गमतीचा विषय असला तरी विचार करण्यास भाग पाडणारा आहे.

माझं जन्मगाव सातारा जिल्ह्यातील खटाव. माझं प्राथमिक शिक्षण खटाव कोरेगाव या गावी झालं. त्या काळी प्राथमिक मराठी पाचवी, सहावी व सातवी या वर्गांबरोबर इंग्रजी पहिली, दुसरी व तिसरी असे वर्ग होते. सरांनी बरोबर इंग्रजीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना सातवीनंतर एका वर्षात तीन इंग्रजी इयत्ता करून मग इंग्रजी चौथीसाठी माध्यमिक शाळेत प्रवेश मिळत होता. मी मराठी सातवी बरोबर इंग्रजी तिसरी केल्याने इंग्रजी चौथीसाठी कोरेगाव येथील प्रायव्हेट इंग्लिश स्कूलमध्ये व परीक्षेसाठी सातारा येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घ्यावा लागला होता. पुढील माध्यमिक शिक्षणाची सोय साताऱ्यात होती, पण राहण्याची हवी तशी तेथे सोय नव्हती. सांगलीला श्वेतांबर व दिगंबर जैन बोर्डिंग होती. साहजिकच या सोईसाठी मी सांगलीचा रस्ता धरला. कुटुंबातील कोणीच इंग्रजी न शिकल्याने मला माझी वाट शोधावी लागली होती. पुढे कॉलेजमधील प्रवेशासाठी असाच स्वावलंबनाचा अवलंब करावा लागला होता. इंग्रजी पाचवीपासून इंटर सायन्सपर्यंतची पाच वर्षे मी, सांगलीत श्वेतांबर जैन बोर्डिंग असूनही व मी स्वत: श्वेतांबर जैन असून ही दिगंबर जैन बोर्डिंगात वास्तव्य केले होते.

सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये त्यासमयी इंटर सायन्स नंतरचे वर्ग नसल्याने ज्युनिअर बी.एस्सी.साठी कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला तो कोल्हापूर येथील दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये राहण्याची सोय झाली म्हणून. खरं तर, ज्युनिअर बी.एस्सीमध्ये पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश घेण्याची इच्छा होती, पण उन्हाळ्याची सुट्टी संपून गेल्यानंतर पंधरा-वीस दिवसांनी कॉलेज प्रवेशासाठी धाव घेतली. उशीर झाल्याने उपयोग झाला नाही. वेळीच प्रयत्न करावयास हवा होता, पण 'मिळेल ॲडमिशन' या फाजील विश्वासावर झालेली दिरंगाई भोवली. ही दिरंगाई कशामुळे, तर 'होम सिकनेस'मुळे. सुट्टीला घरी आल्यानंतर सुट्टी लवकर संपू नये असं वाटायचं आणि सुट्टी संपली तरी घरातून लवकर पाय निघायचा नाही. जिवापाड प्रेम करणाऱ्या आईला व इतर कुटुंबीयांना सोडून जावं असं वाटायचंच नाही.

या 'होम सिक' प्रकरणाला जोडूनच एका गोष्टीचा उल्लेख करणे मला महत्त्वाचे वाटते. सुट्टी संपल्यावर कॉलेजसाठी घरून लवकर परतू नये असं वाटायचं तसंच सुट्टी लागल्यावर सांगली काय, कोल्हापूर काय किंवा पुणे काय, येथून घरी लवकर जावे असे वाटत नसे. चाणाक्षांना या मागचं कारण उमजू शकेल. 'त्या तिथे अलीकडे पलीकडे कुठे तरी असलेल्या प्रियेचे झोपडे' असे खिळवून ठेवायचे. पहिल्याचं कारण 'होम सिकनेस', तर दुसऱ्याचं कारण बहुधा 'लव सिकनेस'. दोहोंच्या मुळाशी प्रेम, पण वेगवेगळ्या प्रकारातलं. तरीही 'प्रेम हे प्रेमच असतं' हा अनुभव बहुतेक सगळ्यांच्याच वाट्याला येणारा, म्हणून 'तुमचं आमचं सेम असतं!'

माझे धाकटे बंधू मोतीलाल. 'होम सिकनेस'मध्ये माझ्यावर कडी करणारे. मी विलिंग्डन कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला होतो. तेव्हाचा प्रसंग. उन्हाळ्याची सुट्टी संपल्यावर आम्ही सांगलीला आलो. मोतीलाल त्यावेळी मॅट्रिकमध्ये होते. विलिंग्डन कॉलेजातून मी परत आल्यावर मला कळले की बंधूराजांनी करमत नसल्याने पोबारा केला होता व कोरेगावला जाण्यासाठी माधवनगर स्टेशन गाठलं होतं. त्या काळी पुणे-हुबळी या रेल्वेमार्गावर सांगली हे स्टेशन नव्हतं. मिरजेहून सांगलीसाठी छोटा रेल्वे फाटा होता. कोल्हापूरसाठी असाच एक फाटा. पुण्याहून सांगलीकडे येणारे व सांगलीकडून पुण्याकडे जाणारे प्रवासी त्यासाठी माधवनगर स्टेशनवर गाडी पकडायचे. कोरेगावला जाण्यासाठी बंधूराज माधवनगरला गेल्याचे समजताच मी सायकलवरून तिकडे धाव घेतली. गाडीला वेळ होता म्हणून मी मोतीलालला गाठू शकलो. मोतीलाल यांच्या समवेत सांगलीला शिकायला असलेले त्यांचे कोरेगावपासूनचे वर्गमित्र हणमंतराव बर्गे होते. पुढं शिकायचं नाही, सरळ घरी परतायचं अशी गट्टी करून दोघांनी माधवनगर गाठलं होतं. त्या दोघांच्याही हातापाया पडून व समजूत घालून मी त्यांच्यासह सांगलीला परतलो. असा प्रसंग एकदाच नाही तर चार-पाच वेळा घडला असावा. अशा 'होम सिक' मोतीलाल यांचा मी थोरला भाऊ, पण त्यांच्याइतका 'होम सिक' नव्हतो. तसा असतो तर कदाचित पदवीधर झालो नसतो. मी बी.एस्सी. झालो आणि माझ्यानंतर एका वर्षाने मोतीलाल बी.ए. झाले. या 'होम सिक'च्या कारणानेच त्यांनी बी.ए.ची एक्स्टर्नल परीक्षा पुण्यातून दिली होती. त्यांच्यापेक्षा कमी प्रमाणावर असलेलं माझं 'होम सिक'पण ज्युनिअर बी.एस्सी.साठी फर्ग्युसन कॉलेजचं प्रवेशद्वार उघडू शकलं नाही. सिनिअर बी.एस्सी.साठी याच कारणाने फर्ग्युसनमध्ये प्रवेश मिळू शकला नसता, पण विलिंग्डन कॉलेजात फिजिक्स डिपार्टमेंटचे प्रमुख असलेले प्रा. डॉ. आर. व्ही. बर्वे फर्ग्युसन कॉलेजात फिजिक्स डिपार्टमेंटचे हेड म्हणून बदलून आले होते आणि विलिंग्डनमध्ये असताना मी त्यांचा लाडका विद्यार्थी होतो, म्हणून फर्ग्युसनमध्ये प्रवेश मिळणे शक्य झाले होते.

मला आताही एका गोष्टीचे आश्चर्य वाटते ते अशासाठी महिना महिना, दोन-दोन महिने कॉलेजात उशिरा जाऊनही अभ्यासात मी सर्वांत पुढे असायचो. कॉलेजला दांड्या मारणारे विद्यार्थी आजही काही थोडके नाहीत. त्या काळाप्रमाणे आजही वर्गातील 'रोल कॉल' उडत्या पाखरांची पिसे मोजल्याप्रमाणे अधलीमधली नावे पुकारून घेतले जातात. खेडेगावातल्या प्राथमिक शाळेतील मास्तरांप्रमाणे एकेक नाव पुकारून हजेरी घेणे, 'प्रेझेंटी मार्क' करणे कॉलेजातल्या प्राध्यापकांना अगदी 'चीप' व गावठीपणाचे वाटते. साहजिकच कॉलेजातल्या मुलामुलींना स्वच्छंदपणे वागायला यातून स्फुरण मिळते. मी तांदळासारखा होतो अशी प्रौढी मिरवत नाही, पण मी शाळा-कॉलेजात सदैव प्रथम श्रेणीत राहिलो होतो खरा!

सांगली हायस्कूलमध्ये दहावी व अकरावी (त्या काळची इंग्रजी सहावी-सातवी) करीत असताना मला प्रथम क्रमांकासाठी स्कॉलरशिप होती. विलिंग्डन कॉलेजमध्ये पहिल्या व दुसऱ्या वर्षासाठी ती मिळत राहिली. हायस्कूलमध्ये ही स्कॉलरशिप मासिक पाच रुपये होती, तर विलिंग्डन कॉलेजात मासिक दहा रुपये. बोर्डिंगमधील जेवणाच्या क्लबचा खर्च महिन्याला पाच रुपयांच्या आसपास असायचा. गणित हा माझ्या आवडीचा विषय असल्याने सांगलीत वर्गातल्या एखाद-दुसऱ्या मुलाची मी 'मॅथेमेटिक्स'ची शिकवणी घ्यायचो. या कामाचे दहा-पंधरा रुपये मिळायचे. पैसे खर्च होऊन साठायचे. त्यामुळे घरून पैसे मागवावे लागत नव्हते. उरलेल्या पैशांतून कोट, पँट असे कपडे शिवायचे. शिवू की नको असे मात्र घरी पत्र पाठवून विचारत असे. कला शाखेची आवड असूनही सायन्स शाखेला गेलो तो गणितातील प्राविण्यामुळे. इंटर सायन्सच्या परीक्षेत मला मॅथेमेटिक्सच्या पेपरात दानशे पैकी दोनशे मार्क होते. बी.एस्सी.साठी मी 'प्रिन्सिपल फिजिक्स' व 'सबसिडरी मॅथेमेटिक्स' असे विषय घेतले होते. ज्युनिअर बी.एस्सी.ची परीक्षा मॅथेमेटिक्सचे गणिताचे पेपर देऊन व सिनिअर बी.एस्सी.ची परीक्षा फिजिक्सचे पेपर देऊन उत्तीर्ण झालो होतो.

फिजिक्स हा विषय मी हेतूपूर्वक निवडला होता. इंटर सायन्सनंतर इंजिनिअरिंगला जाण्याची इच्छा होती. पण ॲडमिशन मिळू शकली नव्हती. तेव्हा बी.एस्सी करून इंजिनिअरिंगला जायचे ठरवले. त्यासाठी उपयोगी पडणाऱ्या विषयांची निवड केली होती. प्रवेशासाठी जो इंटरव्ह्यू घेण्यात आला होता त्यात 'तुम्ही क्रिकेट खेळता का, क्रिकेटमध्ये तुम्ही प्रवीण आहात का?' असे प्राचार्य तारापूरकर, प्रा. सरकार व प्रा. तोलानी यांनी विचारले होते. इंटरव्ह्यू घेणाऱ्या समितीचे हे तिघे सदस्य होते व कॉलेजातल्या तीन विभागांचे ते प्रमुखही होते. विलिंग्डन कॉलेजमध्ये असताना दर रविवारी मी क्रिकेटच्या मॅचेस पाहायला जायचो. कधीतरी बॅटला व बॉलला शिवायचो. एवढ्या तुटपुंज्या ज्ञानावर मी 'होय' असे उत्तर दिले. सुटका झाली असे क्षणभर वाटले. पण पाठोपाठ दुसरा प्रश्न येऊन कानावर थडकला. 'तुम्ही कॉलेज एलेव्हनमध्ये होता की ट्वेल्वमध्ये' यावर चांगलाच गोंधळलो. कॉलेज एलेव्हन म्हणजे काय, कॉलेज ट्वेल्व म्हणजे काय, मुळीच ठाऊक नव्हते. पण अशावेळी गडबडून चालणार नव्हतो. बेधडकपणे उत्तर दिले, 'कॉलेज ट्वेल्व.' आणखी बरेच काही विचारले गेले. निवड होऊन ॲडमिशन मिळाली. नंतर उलगडा झाला की 'कॉलेज एलेव्हन' म्हणजे कॉलेजची अकरा खेळाडूंची टीम आणि 'कॉलेज ट्वेल्व' म्हणजे बारावा राखीव खेळाडू. 'कॉलेज एलेव्हन' हे उत्तर दिले नव्हते, हे एका परीने

माझ्या पथ्यावर पडले होते. क्रिकेट शौकीन तासन् तास टीव्हीवरच्या क्रिकेट मॅचेस का पाहतात याचे आजही मला आश्चर्य वाटते. 'एफई, एसई, बी.ई' इलेक्ट्रिकल या तीन वर्षांच्या इंजिनिअरिंग कोर्ससाठी निवड होऊनही मी कड गाठू शकलो नाही. एफईमधूनच बाहेर पडलो. एका वर्षातच या शिक्षणाला पूर्णविराम दिला तो मी सुरू केलेल्या 'जयभारती' या देशपातळीवरच्या धंद्याच्या वाढीसाठी व प्रगतीसाठी. या विषयीचा इतिहास मोठा रोमांचकारक असून तो विस्तारानं वेगळा लिहावा असा आहे. निमंत्रण-पत्रिकांचा हा व्यवसाय कलागुणांना वाव देणारा होता.

एकोणिसशे बेचाळीसच्या 'चले जाव - भारत छोडो' या चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन १९४२ ते १९४५ दरम्यान अडीच तीन वर्षे भूमिगत कार्य केले, त्यामुळे अनन्य साधारण समाधान मिळाले. स्वातंत्र्यसैनिकांसाठी असलेलं 'पेन्शन' मला नाही याचंही समाधान काही आगळं वेगळंच. माझ्यावर पकड वॉरंट असताना मी कुठेही व कधीही पकडला गेलो नव्हतो. पोलिसांचा ससेमिरा चुकवायला सांगली, कोल्हापूर व पुणे ही तीन शहरे आणि नातलगांची अन्य गावेही दडायला सोयीस्कर ठरली होती. शाळेत नाव घालताना माझं आडनाव 'गुजर' होतं. माध्यमिक शाळेत मी ते 'गुजर' एवेजी 'गुजराती' करून घेतलं आणि मॅट्रिकच्या परीक्षेआधी हेही बदलून घेऊन घराण्याचं 'भंडारी' हे आडनाव गॅझेट करवून घेतलं. पकड वॉरंट 'गुजराती' नावावर होतं म्हणून 'भंडारी' या नावानं मी कॉलेजच्या परीक्षा वेळच्या वेळी व पोलिसांच्या काहीशा सहानुभूतीने निर्विघ्नपणे देऊ शकलो. तरीदेखील अशा या मंतरलेल्या दिवसात 'क्रांती एके क्रांती' हा ध्यास होता. स्वप्नपूर्तीसाठी आवेशाने लढणारी छाती होती.

तर सांगली, कोल्हापूर आणि पुणे असा हा माझा महाविद्यालयीन शिक्षणाचा चार वर्षांचा प्रवास. त्याविषयी सांगत असताना माननीय स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची आठवण झाल्यावाचून राहत नाही. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात यशवंतरावजी म्हणतात, ''मी राजारामीयन (राजाराम कॉलेजचा विद्यार्थी) होतो याचा मला अभिमान वाटतो, पण मी फर्गसोनीयन (फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी) नव्हतो याचं मला दु:ख होतं.'' यशवंतरावजी किती मोठे होते याची साक्ष इतिहास देतो. पण कॉलेजच्या या विषयात मी त्यांच्यापेक्षा 'दोन अंकांनी मोठा' होतो याचा मला गर्व आहे. कारण मी विलिंग्डनीयन होतो. राजारामीयन होतो आणि फर्गसोनीयनही होतो.

विलिंग्डन कॉलेजच्या 'होस्टेल'मध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी मला त्या काळी आकर्षण वाटत होते, हे सांगावेसे वाटते. होस्टेलमध्ये राहणारे विद्यार्थी मोठ्या कुलांतील, गर्भश्रीमंत घराण्यातील, मोठ्या पगारदारांच्या वा वतनदारांच्या घरातील असतात अशी माझी त्या काळी समजूत होती. आपण अशा मुलांइतके मोठे नाही याची दुखरी जाणीवही असायची. घरचा पैसा न घेता शिक्षण करायचा असा निर्धार असल्याने काटकसरीनं राहण्याकडे कल होता. जैन बोर्डिंगमध्ये राहण्यामागे जी काही कारणे हाती त्यापैकी लहानपणापासून राष्ट्रीय विचारांचा मनावर प्रभाव हे एक कारण होतं. बोर्डिंगात काही नातलगही होते व 'होम सिकनेस'वरचा हा एक उपाय होता, हे दुसरं कारण होतं. कँटिनची क्रेझ, पार्लरचं फॅड, मॉलचं कल्चर अशा डीसंसीचा तो काळ नव्हत्या. स्वप्नांच्या शॉवर्सचे मात्र फवारे होते, ड्रीम फ्लॉवर्सचे ताटवे होते.

विलिंग्डन कॉलेजात मी शरीरानं 'सायन्स' वर्गात असायचो, मनानं मात्र 'आर्ट्स' विभागात वावरायचो. इंजिनिअरिंगला जायचं असल्यानं अभ्यासात कुचराई व ढिलाई चालणार नव्हती. त्यामुळे फिजिक्स विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. आर. व्ही. बर्वे यांचे माझ्यावर विशेष लक्ष होते. विलिंग्डनमध्ये इंटर सायन्सला असताना प्रा. बर्वे पाच हुशार विद्यार्थ्यांना घरी बोलावून जादा शिकवायचे. या पाच विद्यार्थ्यांत मी एक होतो. संक्रांतीला तिळगूळ देण्यासाठी आम्ही जेव्हा प्रा. बर्वे यांच्या घरी जायचो तेव्हा तेथे तिळगुळाचा मोठा लाडू मिळायचा. त्या तिळाच्या लाडवाची चव जिभेवर तरळत राही. पुण्यात याच प्रा. बर्वे यांच्या प्रेमामुळे व ते सांगलीहून बदलून येऊन फर्ग्युसनमध्ये फिजिक्स डिपार्टमेंटचे हेड झाल्याने, मला सिनिअर बी.एस्सी.साठी फर्ग्युसनमध्ये प्रवेश मिळाला होता. राहण्याची सोय फर्ग्युसन कॉलेजपासून जवळ असलेल्या व बी.एम.सी. कॉलेजच्या शेजारी असलेल्या भारत जैन विद्यालयात झाली होती. या भारत जैन विद्यालयाचे महावीर जैन विद्यालय असे पुढे रूपांतर झाले.

विलिंग्डन कॉलेजात एफ वाय सायन्सच्या वर्गात आल्यावर 'जिऑमेट्री' या विषयाच्या जोडीला 'ट्रिग्नॉमेट्री' आली. मॅथेमेटिक्स हा एकंदर विषय माझ्या आवडीचा. प्रा. केरकर हा विषय झकास शिकवायचे. प्रा. केरकर आम्हाला जर्मन हा एक ऐच्छिक विषयही शिकवायचे.

प्रा. शंकर केशव कानेटकर अर्थात कवी गिरीश मराठी विभागाचे प्रमुख होते. हे कोरेगाव तालुक्यातील रहिमतपूर गावाचे. यांचा जन्म फत्यापूर या त्यांच्या आजोळच्या गावी झाला होता. कोरेगाव-रहिमतपूर अशा जवळिकीनं कविवर्य गिरीश या भलरी दादाविषयी मला आपुलकी व आदर वाटत होता. यांच्या संपादनाखाली निघणाऱ्या 'विलिंग्डोनीयन' या नियतकालिकात माझ्या काही कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. विलिंग्डन, पुढे फलटणचे मुधोजी विद्यालय अशा शिक्षकी प्रवासानंतर कविवर्य गिरीश विश्रामबाग सांगली येथील त्यांच्या 'कोंदण' या छोट्याशा बंगलीत निवृत्तीनंतरचे दिवस आनंदात व्यतीत करीत होते. राहणारे रहिमतपूरचे असल्याने त्यांचे एक प्रकरण कोरेगाव येथील कोर्टात होते. त्या कामासाठी ते कोरेगावला यायचे तेव्हा माझ्या 'राज'बंगल्यात रहायचे. आमच्या या स्निग्ध जवळिकीची आठवण ठेवून ते

'शांतिलाल माझा शिवधडा आहे' असा आवर्जून उल्लेख करायचे. रहिमतपूर व कोरेगाव या गावांच्या सीमाजवळजवळ असल्याने ते मला 'शिवधडा' म्हणायचे व मानायचे. या ऋणानुबंधाचा पोत असा रेशमी मुलायम होता.

विलिंग्डन कॉलेजात असताना स्वातंत्र्यासाठी आपणही काही करावं अशी उर्मी उसळी घेत होती. ८ ऑगस्ट १९४२ ला महात्मा गांधींनी ब्रिटिश सत्ताधीशांना 'क्विट इंडिया' असे खडसावून सांगितले. या इशाऱ्यासरशी सगळा देश खडबडून जागा झाला. तुम्ही सगळेच पुढारी आहात. तुमचे नेते पकडले गेल्यावर तुम्ही स्वत: तुमचे नेतृत्व करावे व ब्रिटिश सत्तेला या देशापार घालवावे या गांधीजींच्या आदेशाने सगळा देश पेटून उठला. १४ ऑगस्ट १९४२ला सांगलीत मोठा उठाव झाला. शाळा कॉलेजवर बहिष्कार टाकण्यात आला. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सदसद्विवेक बुद्धीला आवाहन करून अहिंसक मार्गाने हरताळ करा असा सल्ला विलिंग्डचे प्राचार्य व्ही. के. गोकाक यांनी दिला होता. त्यांची सहानुभूती आमच्या पाठीशी होती. पण 'नऊ ऑगस्टवाल्यांचे वारे' आमच्या मस्तकात शिरले होते. विश्रामबाग स्टेशनहून विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या मिरज-सांगली रेल्वे गाडीची करता येईल तेवढी नासधूस आम्ही केली. गाडी सांगली स्टेशनात आल्यावर पोलिसांनी विद्यार्थ्यांचा लोंढा अडवला आणि वेटिंगरूममध्ये गराडा घालून त्यांना बडवायला सुरुवात केली. लाठी हल्ल्याने जमाव बिथरला. मग बंदुकीच्या दस्तांनी मारपीट होऊ लागली. एका पोलिसाच्या बंदुकीची बायोनेट माझ्या डोक्यात घुसली. पाऊण एक इंच खोल जखम झाल्याने अंगावरचा खादीचा पांढरा शुभ्र पोषाख रक्तानं लाल झाला. तशा अवस्थेत डॉ. जी. ए. देशपांडे यांच्या दवाखान्यात माझ्यावर उपचार झाले नसते तर काय घडले असते हे आजही सांगणे कठीण आहे. एक मात्र खरे की, या प्रसंगी कुणी तरुणीने माझ्याकडे धाव घेतली नव्हती. असे काही घडले असते तर आचार्य अत्रे यांनी रंगवलेल्या 'ताई टोळ आणि भाई पोळ' यांच्यासारखे थरारनाट्य माझ्या वाट्याला आले असते. प्रा. ना. सी. फडके यांच्या कादंबरीतील नायक होण्याचे भाग्यही मला लाभले असते. तरीही 'क्रांती एके क्रांती होती, आवेशाने लढणारी छाती होती' हे तसे कमी नव्हते!

कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधलं ज्युनिअर बी.एस्सी.चं डॉ. सेन यांच्या अध्यापनाखालील एक वर्ष असंच अविस्मरणीय. गणित विषयाची पुस्तके त्याही काळी त्या काळच्या आर्थिक स्तरावर महागडी वाटणारी. घरचा पैसा घ्यायचा नाही आणि काटकसरीनं रहायचं या ध्येयनिष्ठेने पुस्तके विकत घ्यायची नाहीत; अभ्यासासाठी कॉलेजच्या लायब्ररीत जायचं असं ठरवलं. पहाटे चारला उठून दोन एक मैलाचं जॉगिंग करायचं, स्नानादि विधी उरकून कॉलेज लायब्ररीचा रस्ता धरायचा, वाटेवर पापाच्या तिकटीजवळ थांबून म्हशीचं गवळ्यानं समक्ष काढून दिलेलं ग्लासभर निरसं दूध प्यायचं व लायब्ररी उघडायच्या आधी तिच्या दाराजवळ जाऊन उभं राहायचं, ही अशी घाई असायची की हवी ती गणिताची जाडजूड पुस्तकं इतरांनी घेण्याआधी आपण ती पटकवायची. रात्री दहा वाजता सर्वांत शेवटी बाहेर पडायचं.

या कार्यक्रमात अधून-मधून म्हणजे मुंबई नभोवाणीच्या केंद्रावर कुमारांसाठीच्या कार्यक्रमात सकाळी आठच्या सुमाराला माझ्या कथांचं वाचन होत असे तेव्हा थोडा खंड पडे. त्या वेळी मी 'टाऊन हॉल' जवळील एका हॉटेलात बसलेला असायचो. त्या काळी अमीन सयानीच्या कार्यक्रमाचा बराच गवगवा असतानादेखील माझ्या विनंतीला मात्र देऊन हॉटेलचा मालक तो कार्यक्रम बंद करून माझ्यासाठी मुंबई केंद्र लावायचा. एका कथेसाठी मुंबई नभोवाणीकडून पाच रुपये मिळायचे. मानधनाचे हे पाच रुपये मला कुबेराच्या धनभांडारातील रत्नमाणकांहून अधिक मौल्यवान वाटायचे. माझा हा पराक्रम माझ्याकडे आकर्षित झालेल्या एका युवतीला ऐकवल्यावर तिच्या गौरमुद्रेवर पसरलेलं समाधान पुनवेच्या टपोर चांदण्याहून अधिक सतेज वाटायचं.

राजाराम कॉलेजात प्रा. ना. सी. फडके शिकवायचे. त्यांचं आणि कु. कमल दीक्षित यांचं प्रेम प्रकरण मी इंग्रजी चौथीसाठी साताऱ्याच्या न्यू इंग्लिशमध्ये शिकत होतो त्या सुमाराचं होतं. कमल दीक्षित आम्हाला मराठी शिकवायच्या. त्या कु. कमल दीक्षित सौ. कमला फडके झालेल्या होत्या. राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश करताना कॉलेजच्या प्रत्येक पायरीवर ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्यांतील नायिकांसमवेत 'कु. कमल दीक्षित' यांची आठवण यायची. साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलचं पटांगण कु. कमल दीक्षित यांनी प्रा. ना. सी. फडके यांच्यासमवेत रात्ररात्र जागवलं व गाजवलं होतं. अशा गोष्टीवर पहारा ठेवण्याचं आमचं ते वय होतं. विलिंग्डनमधलं मुकुंदराव किर्लोस्कर व शांता वैद्य यांचं प्रेम, वसंत कानेटकरांचं एकतर्फी प्रेम. अशा दृश्यांचे म्हणून चर्चेचे विषय थोडके, तरी 'प्रेम हे प्रेम असतं' आणि 'हेच तर खरं असतं' असं जणू ही प्रेमप्रकरणं सांगायची, पहाऱ्याचेच हे फुकट फौजदारी विषय.

राजाराम कॉलेजचं १९४३-४४ मधलं वार्षिक स्नेहसंमेलन विशेष आठवणीत रहावं असं होतं. कॉलेजचे प्राचार्य बॅ. बाळासाहेब खर्डेकर कॉंग्रेस विचारसरणीचे. पुढे त्यांनी कागल येथे शाहू कॉलेजची मुहूर्तमेढ रोवली. बॅ. खर्डेकरांनी सी. राजगोपालाचारी यांना संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण केलेलं हातं. त्या समयी हिंदुस्तानच्या फाळणीचा विषय ऐरणीवर होता. या विषयावर उलटसुलट चर्चा रंगत होत्या. पाकिस्तान देऊन टाकावं अशी सी. राजगोपालाचारी अर्थात राजाजी यांची भूमिका होती व ती त्यांनी त्यांच्या 'हार्ड नट टू क्रॅक' या भाषणातून मांडली होती. राजाजी हे महात्माजींचे व्याही. त्यांच्या कन्येशी गांधीजींचे चौथे पुत्र देवदास गांधी यांचा विवाह झाला होता. फाळणीचे समर्थन

करणारी राजाजींची भूमिका त्यांचे व्याही म. गांधीजी यांना मान्य नव्हती. या पार्श्वभूमीवर स्नेहसंमेलनातील राजाजींचे भाषण खूप गाजले व पुढे अनेक दिवस यावर प्रचंड वादळही उठले.

या आधी सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये बॅ. एम. आर. जयकर, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, डॉ. सरोजिनी नायडू यासारख्या दिग्गजांची व्याख्याने ऐकायला मिळालेली. पुढे पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये फिजिक्स सेमिनारचा सेक्रेटरी असताना झालेलं विख्यात शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन यांचं विज्ञानविषयक व्याख्यान भावी आयुष्याची शिदोरी ठरण्यासारखं होती.

कोल्हापुरातली आणखी एक आठवण म्हणजे मास्टर विनायक या जगावेगळ्या दिग्दर्शकाची 'हंस पिक्चर्स' ही चित्रपट कंपनी. मीनाक्षी ही अभिनेत्रीला काळच्या तरुण-तरुणींची आजच्या शब्दांत 'धडकन' होती. 'स्विमिंग कॉश्युम' मधली हसरी तरतरीत मीनाक्षी 'यमुनाजळी खेळू खेळ कन्हैय्या' म्हणून 'ब्रह्मचारी विनायका'ला बोलावते तेव्हा ती आपल्यालाच आमंत्रित करीत आहे असं प्रेक्षकांना जाणवायचं आणि तरुणांची झोप उडायची. मा. विनायक, बाबूराव पेंढारकर, दामुअण्णा मालवणकर यांच्या बरोबर मीनाक्षीला पाहिल्यावर या 'प्रेमवीरां'ना स्वप्नपूर्ती झाल्याचा आनंद मिळत असे. 'मास्टर विनायक' तसे वेगळ्या मुशीतले दिग्दर्शक होते. शाहुपुरीत त्यांचा बंगला त्यांना विकावा लागला होता. पण या रस्त्यावरचा बंगल्याजवळचा बसस्टॉप अद्याप 'विनायक बंगला' या नावानंच ओळखला जातो. आणि हा बंगला आजही आपलं नाव 'विनायक' असल्याचं ऐटीत सांगतो! कलावंत गेला तरी त्याची कला व त्याचं नाव असं त्याच्यामागे वर्षानुवषे तळपत राहतं.

या 'कलाप्रेमा'ला जीवनाची जोड देणारे वि. स. खांडेकर कोल्हापुरात रहात होते. त्यांना पुढं ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला.

पुण्यातले फर्ग्युसन कॉलेजातले दिवस तर अधिक मंतरलेले, अधिक भारावलेले, सळसळत्या तरुणाईचे, झगमगणारे. एकोणीसशे पंचेचाळीसच्या सुमारास वारंवार झालेल्या कॉंग्रेस कार्यकारिणीच्या पुण्यातील बैठका, यानिमित्तानं महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलम आझाद, सरहद्द गांधी खान अब्दुल गफार खान, आचार्य जे. बी. कृपलानी अशा अनेक नेत्यांचे झालेलं दर्शनच नव्हे, तर त्यांचा चरणस्पर्श व हस्तस्पर्श हे सर्व मला वरदान ठरावे असेच होते.

पुण्यातील कॉलेजजीवनावर व त्या काळातील अनेक घटनांवर मी या आधी या ना त्या रूपानं लिहिलेलं आहे. 'शेवटी शिल्लक शून्य' या माझ्या आत्मकथनात हे बरंचसं वगळून आणखी काही काही आलेलं आहे. तेव्हा माझ्या कॉलेज जीवनावर आणखी काय आणि किती लिहावं?

'प्रेम म्हणजे प्रेम असतं, तुमचं आमचं सेम असतं' यापासून 'क्रांती एके क्रांती होती, आवेशाने लढणारी छाती होती' यापर्यंत मागं-पुढं व पुढं-मागं म्हणणारे व त्याचा सर्वंकष प्रत्यय घडवणारे 'पुणे तिथे काय उणे' हे माझ्या ध्यानीमनी इतके ठसलेले आहे म्हणून तर १५ ऑगस्ट १९७८ला मी सातारा जिल्ह्यातल्या कोरेगाव या गावापासून या पुण्यनगरीला आलो!

**शांतिलाल भंडारी**
४०/४७ चारुश्री, अभिमानश्री सोसायटी.
बाणेर रोड, पुणे ४११ ००८.
फोन नं. - ०२०-२५६५१००२

तेरा वर्षे मिलिटरी पोलीस असलेल्या जॅक रीचरला अडकवण्यासाठी एका निरपराध व्यक्तीचा खून करण्यात आला. यामागील खरा गुन्हेगार कोण?




**वन शॉट**

**ली चाइल्ड**
अनु. बाळ भागवत

**३४०रु** पोस्टेज ३०रु.

स्कॉट ग्रॅहॅम आणि मायरीड फॅरेल यांच्या असाधारण प्रेमाची कहाणी आणि जगाला हादरवून सोडणाऱ्या तीन हत्यांचं चित्तथरारक सत्यकथन!




**शूट टू किल**

**स्कॉट ग्रॅहॅम**
अनु. डॉ. देवदत्त केतकर

**१५०रु** पोस्टेज २५रु.

## नवीन प्रकाशने

# शिंडलर्स लिस्ट

**थॉमस केनेली**
अनु. संजय दाबके




**३००रु.**
पोस्टेज ३०रु.

१९३९ ते १९४५ या काळात एका विकृत राजवटीच्या हट्टापायी सगळ्या जगाला वेठीला धरलं गेलं होतं. युरोपची भूमी बेचिराख होत होती.

ज्यूंचा वंश नष्ट करायची प्रतिज्ञा नाझी भस्मासुराने केली होती. त्या आगीत सगळ्यात जास्त होरपळून निघालेला देश म्हणजे पोलंड. नाझींनी उघडलेल्या ३२० छळछावण्यांपैकी ३०० पोलंडमध्ये होत्या. त्या सगळ्या देशाचाच तुरुंग झाला होता. माणसामधल्या सैतानी वृत्तीने कळस गाठला होता पण त्याच बरोबर काही ठिकाणी माणसांच्या रूपातला देव संकटात सापडलेल्यांच्या मदतीला धावून जात होता.

'शिंडलर्स लिस्ट' ही अशीच एका देवमाणसाची कथा आहे.

स्वत: जर्मन असूनही त्यानं स्वत:चं सर्वस्व पणाला लावून बाराशे ज्यूंचे प्राण वाचवले. लिओपोल्ड पेफरबर्ग हा ऑस्कर शिंडलरने वाचवलेल्या १२०० ज्यूंपैकी एक. त्यानं ही जगावेगळी कथा लोकांसमोर आणण्यासाठी अतोनात कष्ट केले. थॉमस केनेलीसारख्या सिद्धहस्त प्रतिभावंताने ही कथा १९८३ साली लिहिली. प्रतिष्ठेच्या बुकर पुरस्कारासह जगभरात तिला अनेक मानसन्मान लाभले.

१९९३ साली या कथेवर आधारित चित्रपटाची निर्मिती दिग्दर्शक स्टीव्हन स्पिलबर्ग याने केली. विस्मृतीच्या पडद्याआड गेलेल्या ऑस्कर शिंडलरचं नाव या कलाकृतीमुळे दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासात चिरंतन झालं.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**

---

# प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स

शृंखला आपुल्याच जीवी

**ॲलेक्स पॅटाकोस** अनु. **डॉ. विजया बापट**

लहानपणी वाचलेल्या गोष्टीतील राजा, 'मी हात लावलेले सारे सोन्याचे होऊ दे' असा वर मागत आजही सोन्यामागे धावत आहे. साऱ्या जगभर तो वावरत असलेला दिसतो. त्याच्या कृतीचे परिणाम त्याला व इतर सर्वांना जाणवू लागले आहेत. परंतु प्रगतीचा मार्ग अजूनही धूसरच दिसतो आहे.

व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात त्या मार्गाची दिशा दाखविणारे, सुप्रसिद्ध मनोवैज्ञानिक व नाझी छळछावणीतून तावूनसुलाखून बाहेर पडलेले डॉ. व्हिक्टर फ्रँकल ह्यांच्या तत्त्वांवर आधारित, डॉ. ॲलेक्स पॅटाकोसलिखित 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स' नावाचे हे पुस्तक. हल्लीच्या काळातही समृद्ध व अर्थपूर्ण जीवन जगायला प्रेरणा देईल.

**१४०रु. पोस्टेज २०रु.**

# अर्थाच्या शोधात

**व्हिक्टर फ्रॅन्कल** अनु. **डॉ. विजया बापट**

'दररोज, दर तासाला, दर मिनिटाला स्वत:च्या वागण्यासंबंधी निर्णय घेण्याची संधी समोर येत असते. तुमच्या अस्मितेचा नाश करणाऱ्या, तुमचे मनोबल हिरावून घेऊ पाहणाऱ्या शक्तींना शरण जायचे का नाही हे पदोपदी ठरवावे लागते. तुम्ही केवळ नियतीच्या हातातील खेळणे बनता का नाही हे तुमच्या निर्णयांवर अवलबूंन असते. आपले मानसिक स्वातंत्र्य घालवून, आत्मसन्मान गमावून, मेंढरांसारखे मनानेदेखील कैदी व्हायचे की नाही हे ठरविण्याचे तुमचे स्वातंत्र्य अबाधित असते...

**१३०रु. पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**



# वर्गात न बसताही प्रथमश्रेणी देणारे माझे कॉलेजचे दिवस

संजय सोनवणी

**पाबळला एक तरुण पोस्टमास्तर आले. ते रजनीशांचे भक्त होते. त्यांची माझी मैत्री जुळली. मी त्यांच्याकडील उपलब्ध समग्र रजनीश वाचला. काही काळ भारावूनही गेलो... पण नंतर त्यांच्यातील त्रुटीही लक्षात आल्या. त्यावर आम्ही भरपूर वाद-विवाद घालत असू.**

कॉलेजात प्रवेश घेणार म्हटलं की तरुणांचा उत्साह अवर्णनीय असतो. ते एक वेगळंच विश्व असतं. कॉलेजातल्या सुखद-दु:खद आठवणी आयुष्यभर सोबत करीत राहतात. अन्य लेखकांनी लिहिलेल्या अशा अनेक आठवणी मी आसुसून वाचल्या आहेत. त्यांच्या नशेबद्दल काही प्रमाणात मत्सरग्रस्तही झालो आहे.

याचे कारण म्हणजे माझ्या स्वत:च्या अशा कॉलेज जीवनाच्या विशेष आठवणी नाहीत.

म्हणजे मी कधीच कॉलेजात गेलो नाही असं नाही. गेलो, पण बव्हंशी प्रवेश, सेमिनार व परीक्षा एवढ्यापुरताच. त्यामुळे प्राध्यापकांशी, सह-विद्यार्थ्यांशी माझा तोंडओळखीचा संबंधच आला नाही मग कॉलेजमधली धमाल, मित्र-मैत्रिणी, एकतर्फी का होईना प्रेम प्रकरणे, स्पर्धांमधील सहभाग, इ. इ. शी कसा संबंध येणार?

मी ज्युनिअर कॉलेज पाबळ येथे केले. वडील प्राथमिक शिक्षक होते. जवळच्याच वाडीवर त्यांची बदली झाली होती. माझी इच्छा होती आर्ट्सला जायची, पण आमची आर्थिक परिस्थिती भीषण होती. वडिलांना तेव्हा मटक्याचा नाद लागला होता. आणि पाबळच्या नुकत्याच सुरू झालेल्या ज्युनिअर कॉलेजमध्ये एकच शाखा होती. ती म्हणजे वाणिज्य. त्यामुळे मला तेथेच प्रवेश घ्यावा लागला. दहावीपर्यंत मी काही हुशार विद्यार्थ्यांत गणला जात नव्हतो, एक टवाळ, वाया गेलेला मुलगा अशीच माझी तोवर प्रतिमा होती.

पण पाबळमधील जवाहरलाल नेहरू वाचनालयाने माझे अंत:स्वरूपच बदलून टाकले. पोटासाठी कंपाउंडर ते व्यापाऱ्यांचा वसुली प्रतिनिधी म्हणून काम करत करत कॉलेजलाही अधून-मधून जात राहिलो. पाबळ हे गाव तेव्हा धेडगुजरी बनले होते. लफड्या-कुलंगड्यांना ऊत आलेला होता. त्यातून प्राध्यापक मंडळीही सुटलेली नव्हती. पाबळमध्ये तेव्हा १९७८-७९ साली ग्रामपंचायतीचा एकमेव टी. व्ही. होता. सवंग चित्रपटांचा तरुणांवर मोठा प्रभाव होता. प्रेम म्हणजे शरीरसंबंध ही प्रेमाची सरळ-साधी व्याख्या होती. मला मात्र या सगळ्याचाच तिटकारा वाटू लागला होता आणि तो मी माझ्या वर्तनातून-बोलण्यातून दाखवूनही देत असे. त्यामुळे मी आपसूक वाळीत पडलो.

चांगलेच झाले. माझ्या स्वभावामुळे २-३जण माझे मित्रही झाले, परंतु आमच्या आर्थिक स्तरात पराकोटीचा फरक असल्याने जो न्यूनगंड निर्माण झाला त्यामुळे मीही शक्यतो त्यांना टाळायचो.

जवाहरलाल नेहरू वाचनालय हे माझे तीर्थच बनले. पूर्वीही मी वाचतच होतो, पण एवढा मोठा खजिना मला कधी गवसला नव्हता. मी बेभानपणे वाचतच राहिलो. मुन्शी प्रेमचंद ते गुलशन नंदा आणि गो. ना. दातार ते जी. ए. कुलकर्णी, कशातही भेदभाव न करता मी आसुसून वाचत राहिलो. या वाचनालयात कवितासंग्रह फारसे नव्हते, पण मायकोवस्कीच्या कवितांचा 'पॅन्ट घातलेला ढग' हा सदानंद रेगे यांनी अनुवादित केलेला कवितासंग्रह मी येथेच वाचला. अल्बेर कामू यांच्या आऊटसायडरचा 'परका' हा कोणीतरी केलेला अनुवादही माझ्यावर कमालीचा परिणाम करून गेला आणि माझ्या मन:स्थितीशी खोलवर जाणीव सांगून गेला. जे. कृष्णमूर्तींचीही काही अनुवादित पुस्तके तेथे होती...

आणि मग मी तत्त्वज्ञानाकडे वळलो. तशीही मी दहावीत असताना 'जीवनधर्म' नावाच्या धर्माची स्थापना केली होती. या धर्माला मला प्रशांत पोखरकर नावाचा मित्र चक्क अनुयायी होता. अर्थात तो बालिशपणा होता... पण मला त्याला सखोल धर्मतत्त्वांची आवश्यकता होती. मी 'भारत में अब नये धर्म की जरुरत' असा लेखही लिहिला होता आणि तो मी बारावीत असतानाच 'आज का आनंद' या हिंदी दैनिकात संपादक श्याम अग्रवाल यांनी आवर्जून प्रसिद्धही केला, तसेच त्यांनी मला प्रत्यक्ष भेटायलाही बोलवले. मी अक्षरश: वखारीच्या ट्रकने प्रवास करून संपादक श्याम अग्रवाल यांना भेटलो. समोर १६ वर्षांचा पोरगा त्या लेखाचा लेखक आहे उभा हे पाहून श्याम अग्रवाल उडालेच! त्यांचा विश्वासच बसेना, पण नंतर त्यांनी मला खूप प्रोत्साहन दिले.

पाबळला एक तरुण पोस्टमास्तर आले. ते रजनीशांचे भक्त होते. त्यांची माझी मैत्री जुळली. मी त्यांच्याकडील उपलब्ध समग्र रजनीश वाचला. काही काळ भारावूनही गेलो... पण नंतर त्यांच्यातील त्रुटीही लक्षात आल्या. त्यावर आम्ही भरपूर वाद-विवाद घालत असू.

बारावीला मी दुसरा आलो. मला तशी मुळीच अपेक्षा नव्हती. माझ्याकडे ना पुस्तके होती ना गाईडस्. मित्रांचीच पुस्तके उसनी आणून मला वापरावी लागायची. लाज वाटे हे खरे, पण कसलाही इलाज नव्हता.

बारावीनंतर एकमेव पर्याय होता तो म्हणजे पाबळपासून २४ किलोमीटरवर असलेल्या राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय. मी प्राथमिक-शिक्षकाचा मुलगा असल्याने मला फी माफ होती. त्यामुळे प्रवेश घ्यायला काहीएक अडचण आली नाही. अडचण होती ती म्हणजे रोज कॉलेजला कसे जाणार? पाबळला दांड्या मारणे सोपे होते. येथे सारेच अपरिचित. रोज एसटीने जाणे-येणे शक्य होते. इतरांनी तोच मार्ग अवलंबला. विद्यार्थ्यांचा पास महिना ४० रुपयांत उपलब्ध होता. मला ते शक्य नव्हते. आमच्याकडे सायकलही नव्हती. सायकल सोडा, बी.कॉम. होईपर्यंत माझ्या पायात चप्पलही नव्हती. शेवटी मी हिय्या करून प्रिन्सिपलाना भेटलो. साळुंखे सर म्हणून होते, मी त्यांना नम्रपणे माझी परिस्थिती समजावून सांगितली. मी घरीच अभ्यास करीन आणि परीक्षांना येत जाईल... नापास होणार नाही वगैरे सांगितले. त्यांनी मला हे सारे कसे अवघड आहे हे समजावले. तासांना न बसता तुला हे अवघड विषय समजणे अशक्य आहे... हवे तर तुझ्या वडिलांना घेऊन ये... मी त्यांच्याशी बोलतो... वगैरे बोलले.

पण मला हे खरेच अशक्य होते. माझ्या डोळ्यांत अक्षरश: पाणी आले. साळुंखेसरही गंभीर झाले. त्यांना माझी दया आली. शेवटी म्हणाले, हे बघ; पहिल्या सेमिस्टरपुरती तुला परवानगी देतो, पण एका जरी विषयात तू नापास झालास तर मात्र ही परवानगी रद्द!

मी त्यांना 'मी पास होणार' अशी ग्वाही दिली, आभार मानून खुशीत पाबळला परतलो. परीक्षेला कधी पायी तर कधी वाळूच्या ट्रकने प्रवास करत गेलो. मी सारे विषय पास झालो. माझी अनुपस्थितीची परवानगी जी एक्स्टेंड झाली ती झालीच!

या काळात माझे लेखनही सुरू होते. कथा-कविता काही मासिकांतून प्रकाशित होत होत्या. गावात मान ताठ करण्यासाठी एवढेच काय ते भांडवल माझ्याजवळ होते. माझी डॉ. वैद्यांबरोबरची कंपौंडरगिरी सुरूच होती. ते आसपासच्या आठवडा बाजाराच्या दिवशी मला घेऊन जात. कोणाच्या तरी दुकानात वा चक्क रस्त्यावर पथारी टाकून 'दवाखाना' सुरू होई. तेव्हा गावात डॉक्टर असणे संभवच नव्हते. त्यामुळे गोर-गरीब शेतकरी स्त्री-पुरुष गर्दी करून असत. मलेरिया तेव्हा तर कॉमनच होता. शिवाय चिघळलेल्या जखमा असणारे, दमेकरी ते गुप्तरोगाने पछाडलेलेही असत. मीही आता अनुभवाने डॉक्टर बनलो हातो. इंजेक्शन द्यायलाही शिकलो होतो. या लोकांकडून खूप काही ऐकायला मिळे, पहायला मिळे. दैन्य-दारिद्र्य याचा कहरच होता. माझी परिस्थिती मला बरी वाटे. या 'पाहण्यातून' आणि 'अनुभवण्यातून' आणि 'वाचनातून' मी घडत होतो. एवढेच काय ते म्हणता येईल.

मी १२वीला असतानाच डॉ. कलबाग नावाचे गोरेपान, प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ पाबळला अनेक चकरा मारून गेले होते. पुढे वर्षभरातच त्यांनी पाबळच्या माळावर 'विज्ञान आश्रम' या संस्थेची सुरुवात केली. या माळावर मी नेहमी सायंकाळी फिरायला जात असे. अनेकदा रात्री उशिरापर्यंत एका खडकावर बसून 'ध्यान' करत बसलेला असे. त्यामुळे डॉक्टरांशी व

संगीताकाकूंशी परिचय झाला. उभयतांनी माझ्यावर खूप ममता केली. अनेकदा सायंकाळचे जेवणही त्यांनी आग्रहाने करायला लावले. त्यांच्या 'सॉइल-सिमेंट ब्लॉक्स' स्वस्त डोमच्या आकारातील घरे, शेतातून सहज नेता येईल अशा स्वस्त गाडीचे प्रयोग, भूजल स्रोत शोधण्यासाठीच्या मशीनचा शोध इत्यादी प्रयोगांचा मी सुरुवातीकाळचा साक्षी आणि कार्यकर्ता आहे आणि त्याचा मला अभिमान आहे. मी या उभयतांना केंद्रस्थानी ठेवून 'सूर्य' नावाची कादंबरी पुढे लिहिली. माझ्यातील संशोधक घडला तो येथेच. डॉक्टरांशी खूप चर्चा होत. पुढे डॅनीएल रोज नावाचा एक ब्रिटिश तरुण या आश्रमात येऊन दाखल झाला. माझं इंग्रजी त्याला कळत नाही आणि त्याचं मला... अशी अवस्था. तरीही आम्ही मित्र बनलो.

मी बी. कॉम. पास झालो. आता मोठ्या पगाराची नोकरी मिळावी हा आग्रह... पण मला शिकायचे होते. वडिलांचा पराकोटीचा विरोध होता. भांडणे झाली. शेवटी त्यांनी परवानगी दिली... पण पुण्यात जाऊन माझे मी पाहायचे. राहायची सोय महिना ५ रुपये भाड्याने शनिवारवाड्याजवळ असलेल्या शिक्षकांच्या मुलांच्या वसतिगृहात झाली. वडिलांचे हे माझ्यावर मोठे उपकार आहेत. फर्स्ट क्लासने पास झालो असल्याने बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स या नामांकित कॉलेजमध्ये सहज प्रवेश मिळाला. नोकरी मिळवली ती 'सांज-समाचार' या वृत्तपत्रात. खायला वडिलांच्या ओळखीच्या गृहस्थांकडे मेस लावली. पण या वृत्तपत्राने माझा पगार बुडवला. आठवण झाली श्याम अग्रवालांची. त्यांना भेटलो. त्यांनी मला तत्क्षणी नोकरी दिली. पत्रकाराची. हे विलक्षण जग होते. नित्यक्षणी, नित्यनव्या अनुभवांचे भांडार होते. मी येथेही रोज कॉलेजला जाऊ शकत नव्हतो आणि त्याही प्राध्यापकांना काही पर्वा आहे असेही दिसत नव्हते.

पत्रकारितेच्या या आरंभकाळात मला बुकसेलर्सपासून ते पार वाजपेयीजी, अडवानीजी, राजीवजी यांच्या पत्रकार परिषदा अटेंड करायला मिळाल्या. हे एक अद्‌भुतच होते. मी एवढ्या मोठ्या माणसांना प्रश्न विचारू शकलो ही जाणीवच विलक्षण होती. माझ्यातील न्यूनगंड त्यामुळे दूर व्हायला फार मोठी मदत झाली. एकदा नव्या आत्मविश्वासाने मी जागाला तोंड द्यायला सिद्ध झालो. प्रेसटुरच्या निमित्ताने शरद जोशींच्या आंबेठाण (चाकण) येथील शेतावर जाण्याची संधी अनेकदा मिळाली. शेतीचे मूलभूत प्रश्न समजावून घ्यायला मिळाले. तसेच मराठी लाइट इनफंट्री (बेळगाव) येथे जाऊन सैनिकांना कसे खडतर प्रशिक्षण घ्यावे लागते हे प्रत्यक्ष पाहता आले. सैनिकांना दुर्धर प्रसंगात साप-सरडे ते बेडकंही कधी भक्षण करावे लागतात हे पाहिले. मी स्वत: त्याची चवही घेतली.

थोडक्यात, जीवन अजून व्यापक स्वरूपात माझ्यापुढे उघड झाले होते... होत होते. मला पदवीची काहीएक मातब्बरी वाटेना झाली. मी एम. कॉम. पुन्हा फर्स्ट क्लासने उत्तीर्ण झालो खरा, पण मी आजतागायत विद्यापीठातून डिग्री सर्टिफिकेट आणलेले नाही. मला त्याचा कधीच वापर करायचा नव्हता. आयुष्यात पुन्हा नोकरी करायची नाही हा निर्णय झालेला होता. कॉलेजमधील ओळखीच्या मुलांची जीवनस्वप्ने, जीवनविषयक विचार इ. मला बालिश - अप्रगल्भ वाटू लागले होते.

कारण मी जीवन पाहिलं होतं... पाहात होतो... आणि पाहात राहणार होतो. अनुभवातील सुख-आनंद आणि वेदना उपभोगण्यातली मौज अनिवार श्रद्धेने पाहणार होतो.

आणि जीवन हेच माझं खरं कॉलेज होतं. कॉलेज काळातील ७ वर्षांच्या जीवनात मी अभ्यासक्रम तर पूर्ण केलाच पण त्याहीपार जाऊन मानवी जीवनक्रमाला हादरून सोडणाऱ्या गहन समस्यांचा अभ्यास केला. त्या समस्यांची उत्तरे सापडलीच असे नाही... अजूनही अगणित प्रश्न अनुत्तरित आहेत... ही अत्यंत अवघड परीक्षा आहे... त्यात मला नाही वाटत कोणी उत्तीर्ण होत असेल...

आणि तरीही मी अविरत धडपडत आहे...
अनिवार जिज्ञासा आहे...
हे कधी न संपणारे कॉलेज आहे...!

**संजय सोनवणी**
फोन नं. - ९८६०९९१२०५

**नवीन**

संपूर्ण मानवजातीचा बळी घेण्याऱ्या भयानक
विषाणूंची लस गायब झाली...
महायुद्धापेक्षाही एक अनर्थकारी घटना
घडणार होती...
अंगावर काटा आणणारी रहस्यमय कादंबरी



**द सटन बग**

**ॲलिस्टर मॅक्लीन**
अनु. अशोक पाध्ये

**२८०रु** पोस्टेज ३०रु.

## बेस्टसेलर्स पुस्तके




२००रु.

# फाईव्ह पॉइंट समवन

**चेतन भगत** अनु. सुप्रिया वकील

राष्ट्रीय स्तरावर 'बेस्टसेलर' ठरलेली कादंबरी.
तुम्हाला या पुस्तकात आयआयटी या भव्यदिव्य स्वप्नाची पूर्ती कशी करावी किंवा तिथे कसा प्रवेश मिळवावा किंवा तिथे कसं तरून जावं याचं मार्गदर्शन मिळणार नाही, पण जर तुमची विचारसरणी 'सरळ' नसेल तर तिथं काय घडू शकेल, ते मात्र नक्की समजेल!
अतिशय तरल विनोदाचा शिडकावा करतानाच अनेक सूक्ष्म गोष्टींवर नेमकं बोट ठेवणाऱ्या ओघवत्या कथनशैलीतील वाचनीय कादंबरी. आयआयटी कॅम्पस व कॉलेज-जीवनाची पार्श्वभूमी लालेली ही कादंबरी तीन मित्रांची कथा सांगतानाच आजूबाजूच्या अनेक गोष्टींवर भाष्य करत वाचकाला खिळवून ठेवते आणि एका आगळ्या विश्वाचं भावपूर्ण दर्शन घडवते, ते सुद्धा हलक्याफुलक्या शैलीत.

---

# वन नाईट @ द कॉल सेंटर

**चेतन भगत** अनु. सुप्रिया वकील

लेखकाला रात्रीच्या प्रवासात एक तरुण, देखणी मुलगी सहप्रवासी म्हणून भेटते. वेळ घालवण्यासाठी ती त्याला एक गोष्ट सांगू इच्छिते. मात्र ती त्याला अट घालते की त्या गोष्टीवर त्यानं दुसरं पुस्तक लिहावं. लेखक सुरुवातीला ते मान्य करायला धजत नाही; पण त्याला ती गोष्ट जाणून घ्यायचं औत्सुक्यही असतंच. त्यानंतर ती मुलगी लेखकाला कॉल सेन्टरमध्ये काम करणाऱ्या सहा लोकांच्या एका रात्रीची कथा सांगते. 'फाईव्ह पॉईंट समवन' नंतर चेतन भगत यांचं हे तितकंच चर्चेत आलेलं पुस्तक वाचकांना निश्चितच निराळ्या अनुभवविश्वाची सफर घडवेल.
नर्मविनोदाचा सुखद शिडकावा करणारी ही कादंबरी सद्य:स्थितीवर भेदकपणे प्रकाश टाकत वाचकांना नक्कीच अंतर्मुख करेल.




२२०रु.

---




२२०रु.

# द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ

**चेतन भगत** अनु. सुप्रिया वकील

'फाईव्ह पॉईंट समवन' व 'वन नाईट ॲट द कॉल सेन्टर' नंतरची चेतन भगत यांची ही तिसरी कादंबरी.
चेतन भगत यांच्या चित्रदर्शी शैलीतली ही कादंबरी वाचकांना त्या विश्वात नेऊन खिळवून ठेवते. लेखकाच्या खुसखुशीत भाषेमुळं ही कादंबरी अधिक वाचनीय बनली आहे.
तीन मित्र... स्वत:च्या इच्छा-आकांक्षा, स्वप्नं असणारे; वास्तव जीवनाच्या धगीचा सामना करत त्याला तोंड देणारे... सत्य घटनांच्या संदर्भाशी सुरेश मिलाफ साधणारी ही कादंबरी. सध्याची पिढी, तिच्यापुढचे प्रश्न, सद्य:परिस्थिती यांचा वेध घेतानाच; बिझिनेस, क्रिकेट व धर्म याही विषयांची सुरेख गुंफण करून वाचकांना एक विलक्षण अनुभूती देते.

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**



# दिवस फर्ग्युसनमधले... क्षितिजे विस्तारणारे...

मंगेश कश्यप

**फर्ग्युसनचे दिवस तसे माझ्यासाठी निवान्त नव्हते. कमवा व शिका हे पथ्य पाळत असल्याने पाक्षिक मनोहरमध्ये 'पोलीस तपास कसा करतात?' हे सदरलेखन करणे तितकेच आवश्यक होते आणि मनोहरचे संपादक त्यासाठी मला पैसेही चांगले देत असत, चांगले अशासाठी की माझ्या गरजाच कमी होत्या. तेव्हाही मला ते पैसे खूपच कमी वाटले असते...**

एखाद्या व्यक्तीला स्वत:बद्दल मुलाखत द्यावी आणि त्यातून आपलं व्यक्तिमत्व व्यक्त व्हावं, यापेक्षा वेगळा असा प्रकार संपादकांनी या अंकात साधला. स्वत:बद्दल लिहिताना आत्मस्तुतीचा रोष पत्करण्याची भीती मनात कुठेतरी होती आणि आहे, तरी सुद्धा माणसं वाचण्याची सवय असणाऱ्या माझ्यासारख्याला 'स्वत:चंच वाचन' करताना खूप तारेवरची कसरत करावी लागली... स्वत:विषयी जरी लिहायचं असलं तरी, त्याची एक लय, ताल आणि 'सम' सांभाळावी लागते... आपण अनेक वाटांनी जगत असतो... अनेक प्रवाहात डुंबून जात असतो... अनुभवांच्या साखळीतून जात असताना बरंच काही हातून निसटतं... आणि एक प्रकारची जीवघेणी हुरहूरही लागून जाते... आपली जडणघडण कशी झाली, मी आता आहे त्या टप्प्यापर्यंत कसा पोहोचलो, कसा झाला आतापर्यंतचा प्रवास... थोडक्यात मी कसा घडलो.. कसा वाढलो हे शब्दांकन करताना शब्दांची मर्यादा पाळून, काही ठळक गोष्टीच आपल्यापुढे मांडू शकतो... अजूनही बरंच काही राहून गेलंय... या लेखाच्या पलीकडचं...

'आम्ही चार भावंडं, आई-वडील, चुलते, त्यांचं कुटुंब अशी बारा माणसं आम्ही एकत्र राहत होतो. सुरुवातीला सगळं ठीक होतं. मग अशा काही गोष्टी घडल्या की आमची स्थिती खालावतच गेली तेव्हा आईनं वर्षभर शाळेत नोकरी केली. पण घरातल्या एवढ्या माणसांसाठी राबून तिला कामावर जाणं कठीण व्हायला लागलं. मग ती घराच्या रहाटाला जुंपली गेली.'

आईचं माहेर तसं गरिबीचं. पण इकडे आल्यावर तिला परिस्थितीची झळ अधिक सोसावी लागली. आईनं एकत्र कुटुंबात आणि नंतरही किती आणि काय सोसलं ते मी पाहत होतो. मी लहान होतो, पण कळत होतं, दिसत होतं ना! पण एक सांगतो, तिनं आम्हा मुलांना काही कमी पडू दिलं नाही. कधी 'नाहीचा' पाढा वाचला नाही. तिचा दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असायचा. जगायचं कसं हे तिनं शिकवलं. स्वाभिमानानं, ताठ मानेनं जगायला शिकवलं. कुणाकडून फुकट काही घ्यायचं नाही, कुणी चार आण्याचं दिलं तर त्याच्यासाठी चार रुपये खर्च करायचे हेच तिनं

मनावर ठसवलं.

'मी म्युनिसिपालिटीच्या शाळेत पहिली ते सातवीपर्यंत शिकलो. पण एक सांगतो, आम्हाला एक-एक शिक्षक असे मिळाले की, आज कृतज्ञतेनं मला त्यांचा उल्लेख करावासा वाटतो. आमचे मोरे सर म्हणजे प्रति सानेगुरुजी. वाघबाईंच्या आडनावातच 'वाघ' होता. एरवी त्या एवढ्या प्रेमळ होत्या की, एखाद्या मुलाच्या डब्यात भाजी नसेल तर आपल्या डब्यातली द्यायच्या. ओतुरकर हिंदी फार सुरेख शिकवायच्या. आमच्या गाडेकर गुरुजींनी तर्खडकर असा शिकवला की, जन्मभर आम्ही विसरू शकणार नाही. माणूस म्हणूनही ते फार थोर होते. नुसतं शाळेपुरतं नाही तर बाहेर कसं जगायचं याची दृष्टी आमच्या शिक्षकांनी आम्हाला दिली. आज विद्यार्थ्यांपुढे जेव्हा उभा राहतो तेव्हा कसं आणि काय शिकवलं पाहिजे याचा आदर्श वस्तुपाठ मी त्या-त्या वेळच्या शिक्षकांकडून घेतला हे आठवतं.'

राजा धनराज गिरजी हायस्कूलमधून आठवीनंतरचं शिक्षण घेतलं, रोहिणी बर्वे आणि अरुणा बर्वे या आदर्श शिक्षिका होत्या. त्यांनीच मला आकाशवाणी केंद्राची ओळख करून दिली. 'बालोद्यान'मध्ये विविध उपक्रमात मला सक्रिय सहभागी होता आलं... अर्थात तत्कालीन बालोद्यानचे संचालक 'हरबा'... त्यांच्यामुळं रेडिओचे संस्कार झाले आणि करिअर करताना मला रेडिओवर थोडावेळ कॅज्युअल अनाउन्सर म्हणूनही अनुभव घेता आला. आमचे बुलबुले सर तर वेगळेच होते. विद्यार्थ्यांनी काही चूक केली तर ज्ञानेश्वर माऊलींच्या फोटोसमोर उभं करून क्षमा मागायला लावायचे आणि दुसरे किशोरभाऊ पटवर्धन तर कधी रागवायचेच नाहीत.

त्या काळात मी प्रा. रमेश आंबेगावकर यांच्याकडे दुधाचा रतीब टाकत असे. महिन्याला पंचवीस रुपये पगार मिळायचा. सरांनी मिलिटरी कॅम्पमधून मला सायकल घेऊन दिली. त्यासाठी दर महिन्याला मी वीस रुपयांचा हप्ता देत असे. ते कुटुंब सुविद्य होतं. सरांचे वडील स्वातंत्र्य चळवळीत होते. त्यांच्या घरी मी बऱ्याचदा जात असे. तो माझ्या आयुष्यातला टर्निंग पॉइंट म्हणावा लागेल.

माझे वडील. आम्ही त्यांना नाना म्हणतो. नाना वाचनालयातून विविध विषयांवरील पुस्तके आणायचे. वाचनाची आवड हा संस्कार नानांनी कृतीतून केला. ही जडणघडण घरातून झाली. वर्गातल्या हस्तलिखिताचा मी संपादक होतो. शाळेच्या वार्षिकातूनही लिहीत असे. या काळात मी पेपर टाकत होतो. एक दिवस थोडा उशीर झाला तर त्यांनी मला उद्यापासून येऊ नकोस सांगितलं. खूप वाईट वाटलं. शाळेची फी भरता आली पाहिजे. मग मी दिवाळी अंकाची लायब्ररी सुरू केली. राखी, फटाके, मद्रासी पापड विकायचो. खूप काम करायचं. मज्जा करायची...

पुण्याच्या पूर्वभागात सारस्वत कॉलनी आहे. तिथे मी साठे बाईंच्या क्लासला जायचो. त्या गणित खूप छान शिकवायच्या आणि त्या छान पण होत्या. गणित या विषयावर माझा फार राग होता, पण साठे बाईंच्या शिकवणुकीमुळे पुढे माझी गणिताशी चांगलीच मैत्री झाली.

पुण्याचा पूर्वभाग म्हणजे तसा शैक्षणिक आणि सांस्कृतिकदृष्ट्याही उपेक्षितच म्हणावा लागेल. आजही त्यात काही फरक पडलाय असं म्हणायचं नाही; परंतु काही काही ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, ज्ञानेश्वरीचा सप्ताह यासारखे उपक्रम राबवले जायचे. वज्रदेही चौकात विठाबाई नारायणगावकर यांचा सामाजिक अथवा तत्कालीन घडामोडींवर भाष्य करणारा तमाशा व्हायचा आणि त्याचबरोबर दारुवाला पुलावर देवजीबाबा मठात बाबामहाराज सातारकरांचं कीर्तनही चालायचं... श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टद्वारा आयोजित व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे एक पर्वणीच असायची, मोठमोठे नामांकित वक्ते, कलाकार त्या व्यासपीठावर यायचे, गीतरामायण मी पहिल्यांदा तिथेच ऐकलं आणि बाबूजींची ओळख करून घेतली. आमच्या वाड्यातसुद्धा धार्मिक वातावरण होते, आमच्या शेजारी राहणारे जाधवमामा वारकरी सांप्रदायाचे खरे उपासक, दर शनिवारी रात्री उशिरापर्यंत वाड्यात भजन चालायचे. विविध वाद्यांच्या तालावर संतांच्या रचना, भारूडं, विरहिणी, गौळण, ऐकता ऐकता कान आणि मन हळूहळू समृद्ध होत गेलं...

कॅम्प एज्युकेशन सोसायटी ज्युनिअर कॉलेजमध्ये मी ११ वी व १२वी केलं. तिथं प्राचार्या अमिता साळुंखे यांनी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात सुरेख नातेबंध निर्माण केला होता. अजूनही साळुंखेमॅडम कुठे भेटल्या की नकळत मनात ओळ येते: 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती... तेथे कर माझे जुळती.'

पुढे, मी फर्ग्युसनला गेलो. तिथं माझ्या कल्पनांना मुक्त वाव मिळाला. मी सायन्सला गेलो. का गेलो ठाऊक नाही, तसा कुणी मार्गदर्शक नव्हता. त्यावेळी मी 'एका ड्रग ॲडिक्टची डायरी' हा लेख लिहून 'किर्लोस्कर' मासिकाच्या श्री. भा. महाबळांकडे पाठवला. त्यांनी पत्र टाकून मला बोलावून घेतलं, चांगली संधी दिली. माझ्या लेखनाची पूर्वतयारी महाबळांमुळं घडली. त्यांनी मला किर्लोस्करसाठी २५ मुलाखती घ्यायला सांगितल्या. फर्ग्युसनचे दिवस म्हणजे नुसती धमाल... नाटकं, वक्तृत्वस्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, बाहेर लेखन... खूप मज्जा! चिक्कार बक्षिसं मिळवली. ते दिवस आठवले की खूप छान वाटतं.

नाटक, सिनेमा... कधी कधी घरी न सांगता तर कधी लेक्चर बंक करून पाहण्यातली गंमत काही औरच! 'अरे चोरा' नावाचं सतीश दुभाषी आणि भक्ती बर्वे यांचं नाटक खूप गाजलं होतं. त्या नाटकाला आम्ही काही मित्र लेक्चर बंक करून दुपारी १२ वाजता गेलो. व्यवस्थित खुर्चीवर जाऊन बसलो आणि पाहतो तर काय... बाजूच्या खुर्चीवर साक्षात खेडकर सर...

आम्ही अत्यंत सावधपणे लक्षात येणार नाही अशा पद्धतीने सोईस्कर असलेल्या रांगेत जाऊन बसलो आणि दुसऱ्या दिवशी खेडकरांच्या तासाला मुद्दाम भक्ती बर्वेच्या अभिनयाबद्दल आपसात बोलत बसलो. सरांच्याही ते लक्षात आले... पण अळी मिळी गुप चिळी.. तसंच वसंतराव देशपांडे यांचं 'कट्यार काळजात घुसली' हे नाटक. खरोखरच या नाटकाने जादू केली आणि नाट्यसंगीत हा माझा आवडता विषय झाला.

निसर्गाशी एकरूप होणं यासारखा आनंद नाही. ट्रेकिंग, निरर्थक भटकंती, तासन्‌तास आकाश न्याहाळणे, ढगांचे विविध आकार पाहणे... या सगळ्यात मी फार रमतो, अजूनही रमतो... हे सगळं पाहत असताना मन कसं आकाश होतं! एकंदरीत आजूबाजूचं वातावरण, ज्याच्याशी आपलं जगणं जोडलेलं असतं ते असं निकोप होतं... जीवनविषयक जाणिवा समृद्ध होत गेल्या. बीटविन् द लाईन मधील अर्थ कळू लागला. त्यात सकारात्मक, नकारात्मक अशा अनेक भावभावनांचा कल्लोळ असला तरी कुठेतरी येणाऱ्या दिवसाला धैर्याने तोंड देण्यासाठी, चैतन्याचा एक अव्यक्त झरा अंतरात अव्याहतपणे पाझरत असतो.

फर्ग्युसनचे दिवस तसे माझ्यासाठी निवान्त नव्हते. कमवा आणि शिका हे पथ्य पाळत असल्याने पाक्षिक मनोहरमध्ये 'पोलीस तपास कसा करतात?' हे सदरलेखन करणे तितकेच आवश्यक होते आणि मनोहरचे संपादक त्यासाठी मला पैसेही चांगले देत असत, चांगले अशासाठी की माझ्या गरजाच कमी होत्या. नाहीतर तेव्हाही मला ते पैसे खूपच कमी वाटले असते... त्यावेळेस तत्कालीन पोलीस निरीक्षक प्रभाकर शुक्ल आणि डॉ. कुंदा शुक्ल यांचा परिचय झाला आणि ते माझ्या कुटुंबातीलच एक झाले.

एकदाचं कॉलेज संपलं आणि पत्रकारितेमध्येच करिअर करायचं ठरवलं... औरंगाबादला देवगिरी तरुण भारत नव्यानेच सुरू होणार होते, मी त्यासाठी अर्ज केला आणि काय आश्चर्य? मला तिथे उपसंपादक म्हणून नोकरीही मिळाली... आता लोकमतचे संपादक असलेले मनोहर कुलकर्णी तिथे संपादक होते. त्यांनी दैनंदिन पत्रकारितेचे चांगले संस्कार केले, वेळोवेळी मार्गदर्शन करून दैनिकाच्या कामातील गांभीर्य आणि आनंद याचा मेळ कसा घालायचा याचा जणू वस्तुपाठच दिला.

दीड-एक वर्ष औरंगाबादला काढलं. देवगिरी तरुण भारत सोडून पुन्हा पुण्याला आलो. काय करायचे हा प्रश्न होताच... मग पुण्याला येऊन पुन्हा किर्लोस्करचं दार ठोठावलं. तिथं काम करत असताना पथनाट्यं केली, अनिल अवचट, दिलीप शिंदे यांच्याबरोबर व्यसनमुक्तीवर पुस्तिका लिहिल्या. पोलीस आयुक्त भास्करराव मिसर यांच्या सहाय्यानं, व्यसनमुक्तीच्या संदर्भात महाविद्यालयात जाऊन जनजागृती केली. (त्याकरता पुढे आमचा गौरवही करण्यात आला) अनेक अंकांतून, पुरवण्यांतून लेखन केलं, सदरं लिहिली. पहिल्या पिढीचे उद्योजक यावर, 'श्रमगंगेच्या काठी' हे सदर लिहिलं. त्या पुस्तकाला राज्यपुरस्कार मिळाला. लक्षात आलं, सृजनाचा आनंद घ्यायचा तर लेखनाला पर्याय नाही.

मिटकॉनमध्ये नगण्य पैशात विविध व्यवसाय कसे सुरू करतात याचं मार्गदर्शन गंगाधर महांबरे यांनी केले. १९९६ मध्ये मी, अथर्व कम्युनिकेशन्स् ही माझी संस्था त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभी केली. रिसर्चशी संबंधित अनेक कामं आम्ही हाती घेतली आणि त्यासाठी मी दिल्ली गाठली. तिथं तीन वर्षे राहून एक प्रकल्प पूर्ण केला. मग असा आत्मविश्वास निर्माण झाला की, संशोधनाशी संबंधित कामं मी यशस्वीरीत्या करू शकतो. त्यावेळी मधुकर देशपांडे माझे सहकारी होते.

सेवाक्षेत्रात अनेक नवनवे प्रयोग मी राबवले. त्यातले काही यशस्वी झाले तर काही अयशस्वी. यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'चाईल्डकेअर' हा उपक्रम सपशेल आपटला. खूप मोठं आर्थिक नुकसान झालं... आता मंगेश संपला असं वाटण्याएवढी परिस्थिती निर्माण झाली, परंतु माझ्या या सगळ्या धाडसात माझी पत्नी - गृहिणी - सखी - सचिव सौ. प्रसन्ना, अथर्वचे कर्मचारी आणि मित्र संदीप अवचट भक्कमपणे माझ्या पाठीशी उभे राहिले. त्यामुळे मी एवढं मोठं अपयश पचवू शकलो... आता अपयशाला मी घाबरत नाही.

आमच्या दादा बीडकरांचा वाटा 'अथर्व कम्युनिकेशन्स्'मध्ये फार मोलाचा आहे. त्यातर्फे जो वार्षिक अंक निघतो तो आध्यात्मिक असतो. त्यात त्यांचं सहकार्य महत्त्वपूर्ण आहे.

अभिनंदन थोरात आणि माझे रोटरीतले सहकारी राम कुतवळ यांचा मी आवर्जून उल्लेख करीन. अथर्व कम्युनिकेशन्स् सुरू करताना त्यांनी फार मोलाची मदत केली. आपल्या घडण्यामागे किती हात असतात!

रोटरीचा सदस्य असताना मी ओल्ड क्लॉथ बँक सुरू केली. त्याद्वारे वंचित विकास, ठाणे जिल्ह्यातल्या आदिवासी संस्था, कोसबाड, जव्हार, मावळ वगैरे ठिकाणी जाऊन कपडे वाटपाचं काम केलं. आजपर्यंत चाळीस हजार कपड्यांचं वाटप केलं. हा उपक्रम रोटरी इंटरनॅशनलने गौरवला.

या दरम्यान अनेक शैक्षणिक, सामाजिक संस्थांशी माझा परिचय झाला होता. काही काही ठिकाणी व्याख्यानांसाठी बोलावलं जात होतं, त्यातून आत्मविश्वास तर वाढलाच शिवाय एक नवा शैक्षणिक दृष्टिकोन मिळाला.

शिक्षणक्षेत्रात तुम्हाला नवे प्रवाह कळतात. नवे नवे प्रयोग करता येतात. तुमच्यात फक्त आत्मविश्वास हवा आणि धाडस हवं. धडपडणं, हार न मानता काम करत राहणं, दुसऱ्यांनी आपल्यासाठी काही केलं असेल तर त्याची जाण ठेवणं हे मी आईकडून शिकलो. तर वाचनाचं व्यसन मला नानांमुळं लागलं. उद्योग नेटकेपणा निष्ठा मी गुरुजनांकडून शिकलो.

सुदैवानं मला प्रत्येक थांब्यावर चांगली माणसं भेटली. २००८ पासून मी, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या संस्थेचा संचालक म्हणून जबाबदारी सांभाळत आहे.

आमचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील हे संवेदनशील शिक्षणतज्ज्ञ आहेत. नव्या संकल्पना राबवण्याचा ते सातत्याने विचार करतात आणि हे करताना त्यांच्या मनात फक्त विद्यार्थी असतो, त्याच्या भवितव्याची चिंता असते. माझ्या विचारांना इथं चांगली चालना मिळाली.

माझे मित्र चित्रकार मंगेश तेंडुलकर तर सतत नवे विषय मांडतात. त्यांच्याशी चर्चा करून माझी बौद्धिक भूक लागते. महांबरे काकांचा तर मी मुलगाच होतो. त्यांच्याकडून मला संगीताची नजर मिळाली.

फादर फ्रान्सीस दिब्रेटो, महांबरे कुटुंबीय, प्रदीप निफाडकर, अतुल पवार, शेखर साने, गिरीश मुरुडकर, मकरंद माळवे जितेंद्र पवार, देवेंद्र आणि प्रसेनजीत फडणवीस असे अनेक स्नेह मित्र आणि आप्तांनी माझं आयुष्य श्रीमंत केलंय असंच मी म्हणेन.

अनेक विषयांवर लेखन, चिंतन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे आपली आपण विकसित केलेली नजर की जी आपल्या आत आणि बाहेर चाललेल्या सगळ्या गोष्टी अचूकपणे टिपून घेते... अशी नजर विकसित होण्यासाठी समर्थ गुरूंची आवश्यकता असते... मला असे समर्थ गुरू लाभले... एक वेगळा दृष्टिकोन डेव्हलप झाला आणि सगळंच बदलून गेलं. अगदी हेच पहाना, कुठे तरी पुण्याच्या पूर्व भागात जन्मलेला, पेपर टाकणे, दिवाळी अंकाची लायब्ररी चालविणे, पेशंटजवळ रात्रभर सेवा देणे, आकाश कंदील विकणे, राखी विकणे... असे अनेक उपद्व्याप करणारा, मी आयुष्याच्या एक वेगळ्याच टप्प्यावर येऊन ठेपलो...

दहा वर्षांपूर्वी जर कोणी मला म्हटलं असतं की तू परदेशात जाशील तर मला ती अतिशयोक्ती वाटली असती. पण काही काही घटनाच अशा घडल्या की,

२००६ साली मॉस्कोला, 'भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते प्रवाह' या विषयावरच्या चर्चासत्रात सहभाग होता.

थायलंड-बँकॉक इथं, 'पर्यटन व्यवसायापुढील जागतिक आव्हाने' या परिसंवादात भाग घेतला.

फिलाडेल्फिया, टेक्सास युनिव्हर्सिटी (२००९) कॅलिफोर्निया स्टेट युनिव्हर्सिटी वगैरे ठिकाणी व्याख्यानं झाली.

न्यूयॉर्क स्टेट युनिव्हर्सिटीनं, 'शैला, अॅन इन्स्पायरिंग कॉन्फिडन्स' हे पुस्तक त्यांच्याकडील कॅन्सरच्या विद्यार्थ्यांकरता, केस स्टडी म्हणून अभ्यासक्रमासाठी अप्रूव्ह केलंय. त्या लेखनाचं सार्थक झालं असं मला वाटतं.

'व्यवस्थापन तज्ज्ञ संत ज्ञानेश्वर' या पुस्तकाला पुरस्कार मिळाला. ज्ञानेश्वरांच्या संदर्भात मी वेगळ्या पद्धतीने विचार मांडला आणि तो जाणकारांकडून गौरवला गेला. त्या लेखनाचं चीज झालं.

ज्येष्ठ विधिज्ञ भास्करराव आव्हाड यांचे जीवनावरील पुस्तक. 'तेजोनिधी'लाही पुरस्कार मिळालाय. लिहायचं ते अव्वल दर्जाचचं असा माझा स्वत:कडे आग्रह असतो. मेहता पब्लिशिंग हाऊसने काही अनुवादित पुस्तकं प्रकाशित केली. त्याला विविध गावांतून प्रतिसाद आला. हा आनंद काही वेगळाच असतो.

अलीकडे डॉ. अशोक कामत यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली माझं डॉक्टरेटचं काम पूर्ण झालयं. 'किर्लोस्कर मासिकानं केलेलं वाङ्मयीन आणि सामाजिक कार्य' हा विषय. यात मुकुंदराव किर्लोस्करांनी फार मदत केली. गेल्या ऐंशी वर्षांतले किर्लोस्करचे अंक उपलब्ध करून दिले. त्यांच्याशी झालेल्या चर्चाही मला उद्बोधक वाटल्या.

सध्या शिक्षण क्षेत्रात कार्यरत असण्याबरोबर मी समुपदेशन (कौन्सिलिंग) करतो आहे... मुळात कम्युनिकेशन हा माझा विषय असल्यामुळे घराघरात हरवत चाललेला 'संवाद' पुन्हा साधण्याचा हा प्रयास आहे, अनेक विद्यार्थी आणि त्यांचे पालक कौन्सिलिंगसाठी येतात. शेवटी मानवी मनाचा अभ्यास महत्त्वाचा. किती माणसं भेटतात...! त्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या... आपण एखाद्याचं आयुष्य उभं करतो, घर जोडून देतो ही किती छान गोष्ट आहे ना! 'मला माणसं, पक्षी, फुलं, पानं यांचं आकर्षण आहे. मी पाण्यावर खूप प्रेम करतो. तुम्ही पाण्याकाठी जाऊन बसा. त्याच्याकडे पहा. किती अर्थ पोचतात तुमच्यापर्यंत! ढगांचे रंग पाहा, आकाशाचा अर्थ लावा... परमेश्वराचं हे जग किती सुंदर आहे!'

आपल्या जगण्याची बैठकच अध्यात्मावर आहे, असं मी मानतो. आपण बोलतो, आपण करतो, अॅवॉर्ड्स मिळवतो, आनंदाचा अनुभव घेतो या सगळ्यांमागे भगवंताचे अधिष्ठान आणि गुरूंचे आशीर्वाद आहेत आणि ते आहेत म्हणूनच तर मी घडलो आणि वाढलो.

**प्रा. मंगेश कश्यप**
१२७/१, यशोवर्धन सोसायटी,
तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर नं.२,
पर्वती, पुणे ४११ ००९.
फोन नं. - ९८५०५००३३४
mangeshkashyap11@gmail.com



# हळव्या मनाची दिवंगत कवयित्री कै. शैला सायनाकर

रा. अ. कुंभोजकर

**शैलाची माझी मैत्री एक तपाची. ती माझ्याशी आदराने वागे. पुढारी रविवार अंकाचे काम पाहात असताना ललित लेख देण्याबद्दल मी दोन-तीन वेळा तिला विनंती केली. माझ्या मागणीनंतर तिने तसे लेख अगत्याने पाठवूनही दिले. ललित लेख हा माझ्या आवडीचा प्रकार आहे, हे तिच्या लक्षात आले होते**

साहित्यरसिकांना प्रा. शैला सायनाकर हे नाव तसे अपरिचित नाही. इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात ती इंग्रजीची प्राध्यापिका होती. अनेक विद्यार्थ्यांच्या मनात 'मॅडम' हा आदराचा आणि अभिमानाचा विषय होता. स्वत: शिकत असताना कधीतरी तिच्या मनात कवितेचे बीज पडले आणि ते विकसित होत गेले. प्राध्यापिका असताना 'कविता सायलीच्या' आणि पाठोपाठ 'रक्तकमळाचं रान' हे तिचे दोन कवितासंग्रहही प्रसिद्ध झाले.

'कविता सायलीच्या' संग्रहाला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले. १९९२ साली कॅथेरिन मॅन्सफिल्ड यांच्या कथा तिच्या वाचनात आल्या. या कथा तिला एवढ्या आवडल्या की त्यांचा अनुवाद केल्याशिवाय तिला राहवेना. मेहता पब्लिशिंग हाऊसने 'गाण्याचा तास' या नावाने अनुवादित कथांचा संग्रह लगेच प्रसिद्ध केला.

शांतीनाथ देसाई यांच्या 'बीज' या हिंदी कादंबरीचा अनुवाद करून अनुवादक्षेत्रात तिने आणखी थोडी उंच उडी मारली. मानवी सामंजस्य जतन करणे हे या कादंबरीचे सूत्र होते. सद्य:स्थितीमध्ये सामाजिक परिवर्तनाचा नेमका अर्थ काय यावर प्रकाश टाकणारी ही कादंबरी नवमानवतावादी विचारप्रणालीकडे पाहायला आपल्याला प्रवृत्त करते. अनुवादात शैला सायनाकरने हे सर्व ताकदीने उचलले आहे. कादंबरीचा अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसनेच प्रसिद्ध केला आहे.

चार पुस्तके प्रसिद्ध होऊनही शैलाने लेखिका असण्याचा डौल कधीच मिरविला नाही. लिहीत राहणे एवढेच तिला माहीत होते. तिचा प्राध्यापकीय व्यवसाय चालू असताना मी पुढारी, कोल्हापूर – सकाळ, बेळगाव – तरुण भारत अशा नोकऱ्या पालटीत होतो. जिथे जाईन तिथे रविवार पुरवणी माझ्या ताब्यात येई. शैलाला त्या त्या वेळी मी हे कळवीत असे. या काळातच तिची पुस्तके प्रसिद्ध होत गेली. आपले पुस्तक प्रसिद्ध झाले की मी काम करीत असलेल्या वृत्तपत्र कचेरीत ती येई. तिच्या हातात तिचे नवे पुस्तक असे. ते मला देऊन ती आदराने नमस्कार करायची आणि आशीर्वाद मागायची.

मी पुढारीत असताना एकदा ऑफिस सुटण्याच्या सुमारास ती यायची. माझ्या टेबलासमोरच्या खुर्चीवर बसायची. मग मी, अपर्णा वेलणकर आणि शैला आम्ही तिघे शाहुपुरीतील 'गोकुळ'मध्ये जायचो. तिथे गेल्यानंतर मसाला डोसा चापून वर कॉफीचा आस्वाद– असे प्रसंग मला आठवतात.

शैलाची माझी मैत्री एक तपाची. ती माझ्याशी आदराने वागे. पुढारी रविवार अंकाचे काम पाहात असताना ललित लेख देण्याबद्दल मी दोन-तीन वेळा तिला विनंती केली. माझ्या मागणीनंतर तिने तसे लेख अगत्याने पाठवूनही दिले. ललित लेख हा माझ्या आवडीचा प्रकार आहे, हे तिच्या लक्षात आले होते म्हणून कोल्हापूरला येताना ती न विसरता एक तरी ललित लेख घेऊन येत असे. पुढच्याच आठवड्यात मी त्याला प्रसिद्धी देई.

एन.सी.सी. ऑफिसर हे पद तिने भूषविले, त्यातली वरची पदेही तिने मिळविली. या संबंधात ठिकठिकाणी भरणाऱ्या शिबिरांना उपस्थिती लावणारी शैला लेखनाबरोबर उत्तम रेखाटनेही करायची, तिच्याबरोबर असलेल्या पिशवीत ड्रॉईंगचे कागद, काळी शाई, ब्रश हे नेहमी असायचे. कोल्हापूरची नीलांबरी कुलकर्णी किंवा बेळगावची उर्मिला शहा या तिच्या खास मैत्रिणी त्यांच्या घरी मुक्कामाला गेल्यानंतर हे साहित्य तिला उपयोगी पडे.

काव्यक्षेत्रात शैलाला मानाचे स्थान होते. एकदा मी तरुण भारतच्या दिवाळी अंकाच्या वेळी शैलाला कविता पाठविण्याबद्दल माझे पत्र गेले होते. मात्र तिच्याकडून काही उत्तर आले नव्हते; कोणाकडून तरी ती आजारी आहे असे मला कळले. त्यामुळे आता तिची कविता येण्याची शक्यता नाही असे मी समजून चाललो. ती १९९५ ऑक्टोबरची २८ तारीख होती. तरुण भारत दिवाळी अंकाचा शेवटचा फॉर्म मशीनवर जाणार होता. तासाभरात छपाईला प्रारंभ होऊन दुपारी चारपर्यंत छपाई आटोपणार होती.

एवढ्यात कोणीतरी एक जाड पाकीट माझ्या हाती दिले. मी उत्सुकतेने फोडून पाहिले. त्यात शैलाच्या दोन हृदयस्पर्शी कविता आणि सहा उत्तम रेखाटने होती. आजारामुळे कविता पाठवायला उशीर झाल्याबद्दल तिने पत्रात दिलगिरीही व्यक्त केली होती.

शेवटचा फॉर्म तर मशीनवर जाण्याची छपाई लवकर संपविण्याची घाई. अशावेळी कविता फोटो कंपोझ करून घेणे आणि चित्रे स्कॅन करून घेणे या दीड-दोन तास सहज मोडणार होते. व्यवस्थापक अशोक धोंड यांची परवानगी घेऊन, छपाई सुरू करण्याची वेळ मी पुढे ढकलली.

शैलाच्या कविता लगेच फोटो कंपोझ करून घेतल्या. चित्रेही स्कॅन झाली. कवितांना चित्रांची जोड देऊन मी पान तयार करून घेतले. पण हे करताना अर्ध्या पानाची जाहिरात काढून ठेवावी लागली. अशी ही एका पानाची कहाणी. चित्रकलेत शैलाचा हात किती सफाईदार चालतो याची प्रचिती मला पूर्वी आली होती. यावेळी ती अधिक सुखदपणे जाणवली.

'तुझ्या प्रकृतीस आराम पडो. दिवाळी अंक आटोपताच मी येऊन तुला भेटतो' असे दुसऱ्या दिवशी मी घाईघाईत कळवले.

शैलाच्या मला आलेल्या पत्रांपैकी सहा पत्रे आणि आठ रेखाटने देत आहे.

शैलावरील एक लेख काही प्रयोजन नसताना मी तरुण भारतच्या अक्षरयात्रात प्रसिद्ध केला. १९९८ सालच्या पत्रात ती याबद्दल आपली प्रतिक्रिया अशी व्यक्त करते :

*इस्लामपूर*

२३-६-९८

ती. नानांना,

सा.न.वि.वि.

'सायली' बघून, वाचून सुखद धक्का बसला. माणसाच्या आयुष्यात सातत्यानं दुःख पाठलाग करीत सोबत करीत राहतं, पण एखाद्या वळणावर सुखाची बरसात व्हावी अशा फारच कमी भाग्यवंतांपैकी मी एक आहे. औपचारिक धन्यवाद देत नाही; परंतु या अनपेक्षित लेखानं सुखावले खरी!

माझ्या कविता नि कुंचल्याच्या सहाय्यानं अंजनकुमारभाईंनी रेखाटलेल्या व्यक्तिचित्राला तुमच्या चौकटीनं आणखीन गहिरेपणा आणला. तो प्रसंग वाचता वाचता माझेही डोळे भरून आले आणि माधवीताईंबरोबरची गळामिठी आठवली. त्यांनी तर खूप सोसलंय. अशाच माणसाच्या खांद्यावर आपलं दुःख बोलकं होतं.

मला एक समजलं नाही की हा लेख अधेमधेच कसा? बऱ्याचजणांना मी बहुधा 'कै.' झाले की काय अशी शंका येईल.

दिवाळीच्या पत्राची वाट बघते. एक वर्षापूर्वी तुम्ही माझी रेखाटनं छापून त्यावर टिप्पणी लिहिली होती. या घटना पुन्हा पुन्हा आयुष्याकडं वळायला लावतात.

नीलांबरीची दोन पुस्तकं निघालीत. (निरुक्त : कविता), गौरीचं आठवं पाऊल (कथा). इतर कुणी यावर अभिप्राय लिहिणार नसेल तर मी लिहावं म्हणते. तिच्याच एका कथेत - चेतना (दिवाळी अंक) तुमचं व्यक्तिचित्र तिनं रेखाटलंय. बघा आठवतं का?

पत्राची वाट पाहतेय.

*आपली*

*शैला*

मी बेळगावात असताना खालील पत्र शैलानं लिहिलेलं आहे. त्यामुळे संदर्भही बेळगावचेच आहेत.

*इस्लामपूर*
*२४-८-९९*

ती. नानांना

शि. सा. न.

तुमची दोन्ही पत्रं मिळाली.

राजस्थानची कथा तयार करून पाठवतेय. तुमच्या दिलेल्या वेळेत. त्याबद्दल नि:शंक राहा.

कॉलेजमधले व्याप, एन.सी.सी. आणि 'प्रिय तब्येत' यांची सांगड घालता घालता थकून जातेय.

पुरेशी सवडही मिळेना. म्हणून तुम्हाला लिहिणं घडलं नाही.

क्षमस्व.

तुमची तब्येत कशी आहे?

तुमच्या बोलघेवड्या स्वभावामुळं तुम्ही कधी एकटे पडत नसाल. होय ना?

'तरुण भारत' परिवारास स. न. सांगावा.

या महिनाअखेर कथा पाठवतेय.

ती कशा उतरेल सांगता येत नाही.

काही सूचना असल्या तर जरूर कळवा.

मा. निकुम्बसरांचं जाणं मनाला चटका लावून गेलं. इंदिरा अक्कांची तब्येत कशी आहे?

सौ. उर्मिला शहाची अलीकडं भेट झाली होती का? तिचा कविता संग्रह या महिन्यात यायचा होता. त्याबद्दल कळवायला सांगा.

ती. माधवीताईंची बेळगावला एखादी फेरी? त्यांचीही बेळगाव-संमेलनापासून खबर नाही.

मीराच्या कविता 'सकाळ'मधून वाचायला मिळतात. सौ. नीलांबरी नुकतीच भेटली. मजेत. कथा, दुकान, संसारात छान रमलीय.

सवडीनुसार तुम्ही लिहित चला.

*आ. आ*
*शैला सायनाकर*

इस्लामपूर
जि. सांगली
१२-१०-२००१

ती. नानांना

सा. न. वि. वि.

प्रत्यक्ष भेटीचा योग नाही. तिथं येऊनही.

कविता व काही चित्रे पाठवलीत. कविता प्रसिद्ध करा. चित्रे तुमच्याकडे ठेवून घ्या. यापूर्वी काही चित्रे श्री. अध्यापक यांच्याकडे पाठविली होती.

योग्य त्या ठिकाणी त्यांचा वापर होत असल्यास जरूर करावा.

तुम्ही कसे आहात?

'सांगाती' प्रकाशनाच्या वेळी येणार आहे, तेव्हा भेटेनच.

आपली
शैला सायनाकर

*इस्लामपूर*
*२१.१०.९९*

तीर्थरूप नानांना,

शि. सा. न.

फोनवर २-३ वेळा संपर्क साधायचा प्रयत्न केला. शैवटी सौ. उर्मिलाकडे निरोप दिला.

गेल्या दिवाळी अंकात 'सकाळ'ला ही दीर्घकविता आली होती. त्यामुळं त्याच कवितेवर लेख करण्यापूर्वी त्यांची परवानगी आवश्यक होती. श्री. दीक्षितांची भेट (फोनवर) होत नव्हती, त्यात इलेक्शन्स. शेवटी काल त्यांच्याशी फोनवर बोलणं झालं आणि त्यांनी अपवाद म्हणून मला परवानगी दिली. मात्र लेखाच्या शेवटी 'सकाळ'च्या सौजन्याचा उल्लेख करा म्हणालेत.

आज बसून एकटाकी लेख लिहिलाय व लिहिताक्षणी पार्सल करतेय.

तुम्ही एव्हाना रागावण्याच्याही पलीकडच्या मन:स्थितीत असणार.

क्षमस्व! इतकंच म्हणू शकतेय.

बाकी ठीक. तब्येत जरा बोलते.

तुम्ही कसे आहात?

फोन कराल? फोन नं. ०२३४२/२२०८७

*तुमचीच,*
*शैला सायनाकर*

कॉलेजात शिकविण्याएवढेच कवितेवर शैलाचे मनापासून प्रेम होते. त्यामुळे ती समानधर्मी मैत्रिणीत रमलेली असे. एन.सी.सी.च्या अंगावर घेतलेल्या जबाबदारीकडे तिने कधीही दुर्लक्ष केले नाही. पण हे सर्व सांभाळताना आपल्या प्रकृतीकडे तिचे दुर्लक्ष झाले. ' 'एन.सी.सी.' आणि 'प्रिय तब्येत' यांची सांगड घालताना थकून जाते' असे तिने एका पत्रात म्हटले आहे.

पत्राच्या शेवटी ती कधी 'आपली' असे लिही, कधी आ. आ. (म्हणजे आपली आज्ञाधारक) तर कधी 'तुमचीच' असे

लिही. हे त्या त्या वेळच्या तिच्या मन:स्थितीवर अवलंबून असावे. कॉलेज सुटल्यावर मन रमविण्यासाठी ती हातात कुंचला घेई. समोरच्या ड्रॉईंग पेपरवर तिची रेखाटने तयार होत. अशी रेखाटने करणे हा तिचा विरंगुळा होता.

शैलाचा कर्करोग वाढू लागला तसे तिचे पत्रलेखनही हळूहळू कमी होत गेले. तिच्या आजाराची बातमी बेळगावात माझ्यापर्यंत येऊन पोचली, तेव्हा दिवाळी अंक आवरण्याच्या मी गडबडीत होतो. त्यातून मोकळा होताच इस्लामपूरला जाऊन शैलाला भेटून यायचे ठरविले. एवढ्यात तिला मिरजेच्या हॉस्पिटलमध्ये हलविल्याचे समजले आणि पुढे दोन दिवसात तिच्या मृत्यूचीच बातमी येऊन थडकली. या बातमीने हळहळण्याखेरील माझ्या हाती काही नव्हते.

मित्र-मैत्रिणींच्या घोळक्यात रमणारी, जिद्दी स्वभावाची पण हळव्या मनाची शैला सर्वांना सोडून आणि चाहत्यांच्या डोळ्यांत अश्रू ठेवून कायमची निघून गेली. परिस्थितीच्या वादळात एक निरांजन कायमचे विझले...!


**रा. अ. कुंभोजकर**
कार्यकारी संपादक, चतुरंग अन्वय
एफ-४, दुसरा मजला, कलाश्री आर्केड,
सांगली ४१६ ४१६.
फोन नं. -०२३३-२३२२५१५/२३७४००७
chaturang.ads@gmail.com






**२८०रु.** पोस्टेज ३०रु.

## थेंबभर पाणी अनंत आकाश

**सुरेखा शहा**

‘भवरलाल, ही दगडाधोंड्यांची ओसाडी विकत घेऊन तू काय करणार आहेस? या दगडांतून काहीतरी उगवेल का?’ त्याच्या मनाने त्याला प्रश्न विचारला. पण व्यवहारी मनाच्या आत एक सृजनशील अंतर्मन दडले होते. त्याने सांगितले, ‘तू हे करच. कारण केवळ तूच हे करू शकशील. तूच या दगडांतून एक संजीवक स्वप्नशिल्प निर्माण करू शकशील.’

ही संजीवक कहाणी आहे, ओसाडीतून नंदनवन निर्मिणाऱ्या, पाण्याच्या थेंबाथेंबातून जीवन देऊन शेतकऱ्यांना समृद्ध करणाऱ्या, भूमीवर व भूमिपुत्रांवर प्रेम करणाऱ्या पद्मश्री डॉ. भवरलाल जैन या पुरुषोत्तमाची! त्याने केलेल्या संघर्षाची. त्याने निर्माण केलेल्या वेगळ्या वाटेची.

श्रम, बुद्धी, संस्कार आणि निसर्ग प्रेमाच्या महामंत्राची आणि त्यातून निर्माण झालेल्या उत्तुंग यशाची!

## उधाणवारा

**तसलिमा नासरिन** अनु. विलास गीते

१९९९ साली प्रकाशित झालेल्या तसलिमा नासरिन यांच्या ‘आमार मेयेबेला’ (माझं कुवारपण) या आत्मकथनाने बंगाली साहित्यविश्वात खळबळ माजवली. एक अविस्मरणीय आत्मकथन म्हणून आता ते पुस्तक मान्यता पावले आहे. ‘उतोल हवा’ (उधाण वारा) हा त्याच आत्मकथनाचा दुसरा भाग आहे. या भागात तसलिमांच्या सोळा ते सव्वीस वर्षापर्यंतच्या वयाची कहाणी आहे.

या धारदार आत्मकथनाचा मराठी अनुवाद समर्थ अनुवादक विलास गीते यांनी तितक्याच प्रत्ययकारीपणे केला आहे.

**४००रु.** पोस्टेज ३०रु.





# गीतारहस्याचे वाचन

भा. ल. महाबळ

**लो. टिळकांना गीतारहस्यातून व्यावहारिक कर्मयोगही सांगायचा होता. म्हणून तर संन्यासमार्गाला समांतर असणारा, नव्हे त्याहून सरस असणारा कर्मयोग जमेल तेवढा आचरणात आणा, पारलौकिक कल्याण विसरा व कर्मे करून देशाचे ऐहिक कल्याण साधा हे मांडले आहे.**

दोनएक वर्षांपूर्वी बाळकृष्ण ठाकुरदेसाई या पार्लेनिवासी मित्राचा मला फोन आला. हा फोन गीतारहस्याबाबत होता. आम्ही दोघेही वयस्कर आजोबा असल्याने म्हणजे शरीराने दुर्बल झाल्यामुळे एकमेकांकडे जाण्याचा खटाटोप करत नाही. ठाकुरदेसाई पार्ल्यास राहतो, मी मुलुंडला. जाणे-येणे फार अवघड वाटते. फोनवर भरपूर बोलत असतो.

आम्ही दोघे १९५५ पासूनचे, वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज, सांगली येथे विद्यार्थी असल्यापासूनचे मित्र आहोत. मैत्री स्थिर व जिवंत आहे याचं कारण दोघांची वाचनाची आवड. मैत्री आजकाल वाढली आहे याचं आणखी एक कारण म्हणजे हयात मित्रमंडळी कमी होत चालली आहेत. दोघेही हळवे झालो आहोत.

ठाकुरदेसाई दोन वर्षांपूर्वी मला फोनवर म्हणाला, ''महाबळ, मी गीतारहस्य वाचले. एकदम अफाट ग्रंथ आहे, तूही वाच.''

''तू गीतारहस्यापर्यंत कसा पोहोचलास?''

''पार्ल्याच्या, लोकमान्य सेवा संघाच्या ग्रंथालयातून मी वाचायला आणला. तूही कोठून तरी मिळव.''

''ठाकुरदेसाई, माझ्याकडे गीतारहस्याची मालकीची प्रत आहे. तिच्यावर ९-४-९५ अशी तारीख आहे.''

''याचा अर्थ तू फार पूर्वीच गीतारहस्य वाचले आहेस. तू ग्रेट आहेस!''

मी खुलासा केला, ''वाचले आहे असे म्हणणार नाही. मी वाचतो आहे असं म्हणेन.''

मराठी माणसानं ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबांची गाथा, दासबोध, गीतारहस्य वगैरे केव्हा ना केव्हा वाचायला हवं असं मी वर्षानुवर्षं थोरांच्या तोंडून ऐकतो आहे, त्यांच्या

लिखाणातून वाचत आलो आहे. हे ग्रंथ वाचनालयातून आणून कसे वाचाल? कथासंग्रह, कादंबरी वाचून हातावेगळे करता येतात. तसे या ग्रंथांचे नाही म्हणून मी हे व अशा प्रकारचे ग्रंथ विकत घेऊन ठेवले आहेत. हे सर्व मी जमेल त्याप्रमाणे वाचत असतो म्हणजे समजून घेण्याच्या प्रयत्नात असतो.

### गीतारहस्य वाचनाची ओढ

गीतारहस्य वाचावे असे का वाटले याची दोन-तीन कारणे आहेत. निश्चित आठवत नाही; पण १९८८-९० या काळात मी कविवर्य प्रा. शंकर वैद्यांना सहज फोन केला होता व सहज 'हल्ली काय वाचताय?' हा प्रश्न विचारला होता. वैद्य म्हणाले होते, 'गीतारहस्य मी वाचले होते, आता तो अभ्यासतो आहे.' म्हणजे गीतारहस्य हा वाचण्याचा नाही तर अभ्यासण्याचा ग्रंथ आहे तर! मी मनात नोंद केली.

'गेल्या शंभर वर्षातील मराठीतील श्रेष्ठ पुस्तके कोणती?' यावर कोणत्या तरी नियतकालिकाने काही वर्षांपूर्वी मते मागविली होती. मते देणारे मातब्बर लेखक व वाचक होते. त्या यादीत गीतारहस्य पहिल्या स्थानावर होते. या मतमोजणीमुळे गीतारहस्य श्रेष्ठ ठरले नसून, मतदार वाचक सुजाण आहेत हे सिद्ध झाले' असा मी माझ्यापुरता निष्कर्ष काढला.

१९०८ साली, लो. टिळकांची ब्रिटिशांनी ब्रह्मदेशातील मंडाले येथील तुरुंगात रवानगी केली. लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली होती. तुरुंगवासाच्या काळात, लोकमान्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ गीता सांगणाऱ्या भगवान श्रीकृष्णाप्रमाणे कारागृहात जन्माला यावा हा योगायोग कोणालाही माझ्याप्रमाणेच थरारक व नाट्यपूर्ण वाटेल.

### गीता-रहस्य तरुणपणीच समजायला हवे

'केल्याविण काही होत नाही' हा सृष्टीचा नियम आहे. काम करत रहावे हेच गीता सांगते. काम करण्याचे महत्त्व हे तरुणपणीच नव्हे, कुमारवयातच कळायला हवे. फळाकडे म्हणजे मोबदल्याकडे नजर ठेवून काम करू नये, काम उत्तम तऱ्हेने, कसोशीने पूर्ण करणे हाच हेतू असावा असे गीता सांगते. त्यामुळे काम फत्ते झाल्यावर, कामापोटी मिळावयाचा पगार, मोबदला, प्रतिष्ठा, श्रेय पूर्णपणे मिळाले नाही तरी पदरी निराशा येत नाही. काम करण्यापूर्वी, आपण मनाला काय करावयाचे, कामच करावयाचे, कामापासून लाभ काय हा विचार करावयाचा नाही असे शिकवले असल्याने, कामात अपयश आले तरी हिरमोड होत नाही, वैफल्य जाणवत नाही, नाउमेद टळते, पुन्हा नव्याने काम करण्याची जिद्द कायम राहते.

कामाबाबतचा गीतेचा दृष्टिकोन तरुणपणीच समजणे गरजेचे आहे.

गीता असेही शिकवते की तुझ्या वाट्याला आलेले काम तू टाकू नकोस, टाळू नकोस, काम कंटाळवाणे आहे, आवडीचे नाही, धोक्याचे व कष्टाचे आहे, मोबदला अपुरा आहे अशा विचाराने काम सोडू नकोस हे सारे काम करण्यासाठी लागणारी शारीरिक शक्ती अंगी असते त्या वयातच करावयास हवे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गीता 'शुद्ध बुद्धीने काम कर' असे सांगते. शुद्ध बुद्धीने वागणं म्हणजे सर्व मनुष्यात एकच आत्मा आहे असं समजून वागणं. इतरांनी आपल्या बाबतीत जे करावं, जसं वागावं असं आपल्याला वाटतं तसंच आपण इतरांबाबत वागणं.

शुद्ध बुद्धीची ही एक अट सोडली तर गीतेची बाकी शिकवण पूर्णपणे व्यवहारी आहे म्हणून तर ती तरुणपणी समजायला हवी. निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीने संसार करून झाल्यावर, म्हणजे तारुण्य व प्रौढपण चुकीनं वापरून, म्हातारपणी थकल्याभागल्या गात्रांनी गीतारहस्य समजून घेणे म्हणजे काळ उत्तम प्रकारे चालवणे! ठीक आहे, निवृत्तीनंतरचा माझा काळ असा बरा जातो आहे हेही काही कमी नाही. माझा हा विचार, बुद्धी शुद्ध होते आहे याचा निदर्शक आहे!

### गीतेची तोंडओळख विद्यार्थी दशेतील

गीतेचे दर्शन मला विद्यार्थी असतानाच घडले. हे उपकार आहेत मिरजेच्या हायस्कूलमधील बोडसमास्तरांचे. इंग्रजी चौथी (म्हणजे आजची आठवी) ते एसएससी (म्हणजे आजची अकरावी) १९४५-४९ या काळात मी संस्कृत शिकलो. बोडसमास्तर हे स्वत: संस्कृतचे जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर होते, वरती अध्यात्ममार्गी होते. के. ना. वाटव्यांच्या पाठ्यपुस्तकातील संस्कृत शिकवण्यापूर्वी, ते रोज गीतेतील एक श्लोक, क्रमवार, फळ्यावर लिहीत. त्या श्लोकाचा अर्थ समजून देत व उद्या श्लोक पाठ करून या असे सांगत. बोडसमास्तर म्हणत, 'संस्कृत भाषा येण्यासाठी हे श्लोक उपकारक ठरतीलच; पण गीतेतील तत्त्वज्ञान पूर्ण आयुष्यभर उपयोगी पडेल.'

बोडसमास्तरांचे वडील माझ्या आईला, तिच्या आईमुळे ओळखत. या आईच्या माहेरच्या ओळखीमुळे, 'कशी आहेस?' हे विचारण्यासाठी ते अधूनमधून आमच्या घरी डोकावत. मी चार वर्षांचा असताना ते मला, 'तुझे नाव काय? तू केव्हा जन्माला आलास?' असले प्रश्न विचारत. या प्रश्नांची मी त्यांनी शिकवलेली, 'मला नाव नाही, मी परमात्म्याचा अंश आहे, मी जन्माला आलो नाही, मला मृत्यूही नाही, भालचंद्र हे माझ्या देहाचे नाव आहे' ही उत्तरे अचूक देऊन खडीसाखरेचा खडा कमवत असे. आज गीता विनोबांची, गीता प्रवचने, गीतारहस्य, ज. स. करंदीकरांची गीतातत्त्वमंजिरी वगैरे डोळ्यांपुढे धरताना, मला हे सर्व आठवते. बोडसमास्तर व त्यांचे वडील यांच्याविषयी कृतज्ञता वाटते.

## पुन्हा पुन्हा मित्रसंवाद

बाळकृष्ण ठाकुरदेसाई या मित्राचा पहिला फोन आला, तीन महिन्यांनी दुसरा आला, ''महाबळ, मी गीतारहस्य पुन्हा वाचले. हा ग्रंथ सहज थोडाच वाचता येतो? काही भाग वाचायचा, त्यावर विचार करायचा, पुन्हा काही पाने मागे जायचे अशा पद्धतीने तो वाचायला हवा. मी अमुकतमुक भाग वाचतो आहे. सिद्धांत कसा मांडावा हे गीतारहस्यापासून शिकावं.'' ठाकुरदेसाईचे असे फान थांबून थांबून येतच राहिले. प्रत्येकवेळी तो मला, त्याने काय वाचले, त्याला काय खूप खूप आवडले हे सांगत असे. ठाकुरदेसाईने, कमीतकमी चार वेळा, गीतारहस्य अथपासून इतिपर्यंत वाचले आहे, मात्र गीतारहस्याची मालकीची प्रत माझ्याजवळ असून मी ते अजून वाचतोच आहे!

## गीतारहस्यावर आक्षेप कोणते?

भारतीय युद्धाच्या प्रारंभी, ऐनवेळी रणांगणावर समोर शत्रुपक्षात पितामह भीष्म व गुरू द्रोण यांना पाहिल्यावर आपण युद्ध नव्हे तर पाप करत आहोत या विचाराने अर्जुन गोंधळला. युद्ध करावे, शत्रूचा नाश करावा व राज्य भोगावे हा अर्जुनापुढचा एक मार्ग होता, पण असे करावे तर भीष्यद्रोणासारख्या गुरुजनांचा आपल्या हातून वध होणार, पाप घडणार व आपण पारलौकिक कल्याणाला म्हणजे मोक्षाला मुकणार ही अर्जुनाची धारणा होती. याउलट शस्त्रसंन्यास करून म्हणजे कर्म त्यागून, रणांगणातून निघून जाण्याचा मार्ग आपण स्वीकारला तर भले ऐहिक वैभवाला आपण मुकू, पण आपल्याला मोक्ष लाभेल. अर्जुनाला हा दुसरा विकल्पही उपलब्ध होता. अर्जुनाला ऐहिक कल्याणाहून मोक्षाची मातब्बरी अधिक होती कारण मोक्ष हे भारतीय तत्त्वज्ञानानुसार, जीवनाचे परमोच्च ध्येय मानले गेले आहे. भारतीय युद्धकाळी, कर्मसंन्यासाने मोक्ष मिळवण्याचा सांख्यमार्ग हा रूढ व सर्वमान्य होता.

श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की मोक्षप्राप्तीसाठी कर्मसंन्यास हा एकच मार्ग नाही. कर्म बंधकारक असते. ते मोक्षाच्या आड येते व ते जन्ममृत्यूच्या चक्रात अडकते हा विचार म्हटले तर तसा योग्यच आहे, पण बंधकारक न होईल अशा पद्धतीनं कर्म करण्याची एक युक्ती आहे. फळाची आशा सोडून, शुद्ध म्हणजे समत्वबुद्धीने, ईश्वरी सेवा समजून तू युद्ध करशील तर युद्धकर्मही तुला बंधकारक होणार नाही. हा एक वेगळ्या तऱ्हेचा कर्मसंन्यासच होय. असा हा कर्मयोग सांख्यांच्या कर्मसंन्यासाहून सरस आहे. हा तू आचरशील तर तुला ऐहिक ऐश्वर्यही मिळेल व तुझ्या मोक्षालाही हानी पोचणार नाही.

गीतेत, हा दुहेरी लाभ देणारा कर्मयोग सांगून कृष्णाने अर्जुनाचा गोंधळ दूर केला. अर्जुनाचे समाधान झाले व त्याने युद्ध केले.

लो. टिळकांनी गीता कर्मसंन्यासपर नाही, निवृत्तिमार्गी नाही तर ती प्रवृत्तिपर आहे, कर्मयोग हेच गीतेचे मुख्य प्रतिपाद्य आहे हे ठासून मांडले. एवढेच नाही तर पुढे जाऊन त्यांनी समत्वबुद्धी प्राप्त झाल्यावरही, अशा आत्मज्ञानी पुरुषाने लोकसंग्रहासाठी व समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी कर्माचरण केले पाहिजे व हा कर्मयोगाचाच भाग होय असे मांडले.

टिळकांच्या आक्षेपकांचे म्हणणे असे की समत्वबुद्धी प्राप्त झाली, 'तत् त्वम् असि' म्हणजे विश्वाचे परमतत्त्व व जीव यांची एकता आहे हे ज्ञान झाले, म्हणजेच आत्मसाक्षात्कार झाला की मोक्ष मिळालाच. मोक्ष मिळवण्यासाठी मरण्याची गरज नाही. अशा मुक्त व्यक्तीपासून युद्ध होणे म्हणजे अज्ञाननिर्मित संसारात राहणे हे तर्कसंगत नाही. आक्षेपक असेही म्हणतात की टिळकांनी मुत्सद्दीपणाने, देशाची राजकीय व सामाजिक गरज ओळखून, आपले विचार जुन्या व पूज्य गीताग्रंथात उगम पावले आहेत असे मांडले.

## लोकमान्य टिळकांचे जीवनध्येय :

लो. टिळकांचे देणेघेणे देशाच्या उत्कर्षासाठी व देश स्वतंत्र होण्याशीच होते हे स्पष्ट आहे. एका लेखांशात ग. प्र. प्रधानसर विनयाने म्हणतात, ''मी त्याग असा काही केला नाही. शिकवणे, लिहिणे, वाचणे व समाजाचे प्रश्न सोडवणे याचीच मला आवड होती. मी तेच केले. त्यात त्याग असा काय केला. लो. टिळकांचा त्याग खरा. त्यांचे गणितावर खरे प्रेम असूनही त्यांनी देशाची अग्रक्रमाने गरज म्हणून राजकारण केले. स्वराज्य अस्तित्वात असते तर लो. टिळकांनी गीतारहस्य लिहिले नसते, ते त्यांच्या आवडीच्या गणित विषयाकडे वळले असते.''

मंडालेच्या तुरुंगात सक्तीच्या विश्रांतीच्या काळात लो. टिळकांनी गणितावर ग्रंथ न लिहिता, गीतारहस्य लिहिले याचे कारण त्यांना देशाच्या राजकारणाच्या सिद्धीसाठी गीतेतील कर्मयोगाला उजाळा देऊन देशवासियांना कार्यप्रवण करावयाचे होते.

'गीताध्यायसंगती' या प्रकरणात लो. टिळक लिहितात, ''आपला हिंदुस्थान देश ज्ञानाचे, वैभवाचे, यशाचे आणि पूर्ण स्वराज्याचे सुख अनुभवीत आहे अशी जेव्हा त्याची ख्याती झाली होती तेव्हा एक सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियाने दुसऱ्या महान धनुर्धरास क्षात्रधर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यासाठी गीता उपदेशिली आहे हे वाचकाने प्रथम लक्षात ठेवले पाहिजे.''

आपल्या देशाला ज्ञान, वैभव, यश, पूर्ण स्वराज्य मिळवायचे असेल तर गीतेची शिकवण अंगी बाणवली पाहिजे हेच तर लो. टिळकांना सांगायचे आहे.

**'सुखदुःखे विवेक' या प्रकरणात लोकमान्य लिहितात, ''ऐहिक समृद्धी आपणास किंवा आपल्या देशास प्राप्त**

**करून घेण्याची आवश्यकता व नैतिक हक्क आहे. म्हणून मनुष्याने जगातील परमसाध्य ज्ञान व ऐश्वर्य या दोहोंचा समुच्चय हेच आमच्या कर्मयोगशास्त्राचे शेवटचे उत्तर आहे.''**

लोकमान्य, देशाच्या ऐहिक समृद्धीची व ज्ञानी होण्याची चिंता वाहतात. व्यक्तीला होणाऱ्या आत्मज्ञानाची, साक्षात्काराची व मोक्षाची काळजी करत नाहीत.

'कर्मविपाक व आत्मस्वातंत्र्य' या प्रकरणात ते नोंदवतात, ''एका मनुष्याप्रमाणेच एका राष्ट्रास आपापल्या कर्माचे फळ भोगल्याशिवाय सुटका नाही.''

व्यक्तीला पूर्वजन्म असतो त्याचप्रमाणे राष्ट्राला मागची पिढी असते, इतिहास असतो. इतिहासात आपल्या पूर्व पिढ्यांनी केलेल्या चुका आज आपण भोगतो आहे. आपल्या पिढीने चुका दुरुस्त केल्या पाहिजेत हे लोकमान्यांना सांगावयाचे आहे हे स्पष्ट आहे.

'संन्यास व कर्मयोग' या प्रकरणात लोकमान्य नोंदवतात, **''लोकसंग्रह म्हणजे लोकास एकत्र, संबद्ध करून त्यांच्या परस्पर अनुकूल्याने जे सामर्थ्य उत्पन्न होते ते त्यांच्या अंगी येईल अशा रीतीने त्यांचे पालन, पोषण, नियमन करणे व तद्द्वारा त्यांची सुस्थिती कायम ठेवून त्यांस श्रेयप्राप्तीच्या मार्गास लावणे.''**

गीतारहस्यातील प्रकरणे लिहिताना लो. टिळकांच्या मनात फुटीर भारतीय होते. 'सिद्धावस्था व व्यवहार' या प्रकरणात ते तरुणांना व्यवहार सांगतात, ''बुद्धी पूर्ण शुद्ध होईपर्यंत कर्मे करणाऱ्याने वाट पाहिली पाहिजे असे नाही. अशी वाट न पाहता शक्य तितक्या निष्काम बुद्धीने आपली लोकसंग्रहार्थ कामे करत जावी, म्हणजे त्यानेच बुद्धी शुद्ध होईल.''

''सध्या कर्मयोगमार्ग लुप्तप्राय होऊन सर्व संसार त्याज्य मानणाऱ्या संन्यासमार्गाचे प्रस्थ चोहोकडे वाढले आहे. निर्वैर म्हणजे निष्प्रतिकार नव्हे. सभोवतालचे लोक किंवा राष्ट्रे खालच्या पायरीवर असताना एखादे राष्ट्र आपण वरच्या पातळीवर राहू असं म्हणेल तर ते शक्य नाही.''

''सर्वभूतात्मैक्य ओळखण्याइतकी सर्व मनुष्यांची मजल जात नाही तोपर्यंत तत्काली श्रेयस्कर होईल असा देशाभिमानादी धर्मच समाजाला शिकवला पाहिजे.''

लो. टिळकांना गीतेतील कर्मयोग गीतारहस्यातून मांडायचा होताच; पण त्याचबरोबर व्यावहारिक कर्मयोगही सांगायचा होता. म्हणून तर संन्यासमार्गाला समांतर असणारा, नव्हे त्याहून सरस असणारा कर्मयोग जमेल तेवढा आचरणात आणा, पारलौकिक कल्याण विसरा व कर्मे करून देशाचे ऐहिक कल्याण साधा हे लोकमान्यांनी मांडले आहे.

'भक्तिमार्ग' या प्रकरणात ते नमूद करतात, ''एकाचा निराकार व दुसऱ्याचा साकार देव यात श्रेष्ठ कोणता याविषयी तंटे अमाप चालू आहेत. या तंट्यांचा निकाल लावण्यास काही मार्ग आहे का? हिंदुस्थानच्या सध्याच्या स्थितीत या प्रश्नाचे योग्य उत्तर देणे विशेष महत्त्वाचे आहे.''

**''मंदिर व मशीद ही चित्ताची प्रवृत्ती परमेश्वराकडे वळवणारी साधने म्हणजे प्रतीके आहेत. मग तुझे प्रतीक चांगले की माझे चांगले अशी भांडणे करण्यात काय अर्थ आहे?''**

ब्रिटिश हिंदू व मुस्लिम यांच्यात मतभेद पेरतात, त्यामुळे स्वातंत्र्याचा लढा कमकुवत होतो. म्हणून ब्रिटिशांच्या फूट पाडण्याच्या धोरणापासून सावध रहा असे गीतारहस्यातून लो. टिळक सुचवतात.

गीतारहस्यात अशा प्रकारच्या कितीतरी नोंदी आहेत. आपला देश पारतंत्र्यात आहे, ऐश्वर्यहीन आहे, हिंदुमुसलमान वादामुळे देशात दुफळी आहे, एक होणे गरजेचे आहे, राष्ट्राने ऐश्वर्य व स्वातंत्र्य मिळवले पाहिजे अशा प्रकारचा संदेश लो. टिळकांना द्यायचा होता. सध्याच्या देशाच्या दु:स्थितीवर कर्मयोगाचा अवलंब करणारा कार्यप्रवण समाज हा उतारा आहे हे लो. टिळकांनी जाणले होते. गीतारहस्याच्या माध्यमातून जनतेला शहाणे करण्याचा उद्योग त्यांनी केला.

लो. टिळकांच्या आठवणी हेच सांगतात. (संदर्भ : लो. टिळकांच्या आठवणी संग्राहक : स. वि. बापट)

वासुदेव कुलकर्णी हे मंडाले तुरुंगातील लो. टिळकांचे सेवक. कुलकर्णी हे स्वत:ही कैदीच होते. लोकमान्यांनी घरी पुण्यास पत्र लिहिले होते. पत्रे सेन्सॉर होऊन पाठवली जात. जेलरला पत्रातील एक वाक्य खटकले. जेलरनी टिळकांना पूर्ण पत्रे ते वाक्य वगळून पुन्हा लिहावयास सांगितले. त्यावर टिळक उद्गारले, 'परवशता शतगुणे करी जाल'. ही आठवण कुलकर्णी यांनी सांगितली आहे.

आपला देश परतंत्र आहे ही जाणीव सतत टिळकांच्या मनात होती. त्याच मनात अर्जुनाला आश्वासन देणारे खालील वचनही होते.

'तस्मात् सर्वेषु कालेषु माम् अनुस्मर युध्य च।
मयर्पितमनोबुद्धि: माम् एव एष्यसि असंशय:।।(८.७)'

(म्हणून सर्व काही माझं स्मरण कर आणि लढ म्हणजे तू तुझे कर्तव्य कर - मन व बुद्धी वाहून माझ्याच ठायी. मलाच येऊन मिळशील. शंका बाळगू नको)

गीतारहस्य लेखन हे लोकमान्यांनी आपलं कर्तव्य मानलं होतं.

करवीरपीठाचे श्रीशंकराचार्य सांगतात, ''राजकारणापेक्षा

विद्याव्यासंगाकडेच टिळकांचा ओढा असूनही, त्यांनी स्वार्थत्यागपूर्वक जन्मभर आपल्या मनाचा हिरमोड करून घेऊन देशाच्या सद्य:स्थितीमुळे राजकारण हेच आपले कार्यक्षेत्र आखून घेतले. यामुळे ते इतर चळवळीत प्रत्यक्ष भाग घेत नसत, पण देशाला हितकारक असलेल्या प्रत्येक बाबतीत कार्यकर्त्याला ते बिनतोड असा सल्ला व उत्साह द्विगुणित करणारे प्रोत्साहन देत.''

वासुदेव विठ्ठल दास्ताने (वकील) यांचे स्नेही केळकर यांनी लोकमान्यांना प्रश्न केला, ''इतके परिश्रम करून, आज २५-३० वर्षे चाललेली चळवळ, भगवतांचे अधिष्ठान नाही म्हणून यशस्वी होत नसावी असे का म्हणता येणार?'' केळकर हे गृहस्थ भजनपूजन करणारे होते. लोकमान्य उत्तरले, ''भजन, पूजन, आराधना यांचे स्वरूप तुम्ही समजता तेवढेच नाही. चळवळी हेही आराधनेचे स्वरूप आहे. तसे नसते तर अशी चळवळ चालू ठेवता येणे शक्यच झाले नसते. होमरूल लीग उद्या ठार झाली किंवा काही घडले तरी मला मुळीच वाईट वाटणार नाही. हल्ली ईश्वराची उत्कृष्ट आराधना अशाच प्रकारच्या कामात निमग्न राहणे ही दिसत आहे. लोकांच्या दृष्टीने स्वराज्यप्राप्ती हे फळ आहे! मला या आशेचे प्रलोभन नाही.''

'कर्मणि एव अधिकार: ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतु: भू: मा ते संग: अस्तु अकर्मणि ॥(२.४७)'

(म्हणजे कर्म करण्यावरच असावा तुझा भर, ना कधीही फळावर. कर्माच्या फळावर दृष्टी ठेवणारा होऊ नकोस. त्याचबरोबर कर्म टाळण्याचा विचार करू नकोस) या गीतावचनाप्रमाणे वर्तन ठेवणारे लो. टिळक, गीतेतील कर्मयोग देशबांधवांपर्यंत पोचवायला उतावीळ होते.

ग्रंथरचनेकरता लागणारी सवड त्यांना, ब्रिटिशांच्या कृपेमुळे मिळाली.

दत्तात्रय विनायक पटवर्धनबुवा लिहितात, ''लोकमान्यांच्या दर्शनाकरता गायकवाड्यावर गेलो व रामनवमीच्या उत्सवाकरता पुण्यात आलो आहे असे सांगितले. तेव्हा लोकमान्य म्हणाले, ''बुवा, कीर्तनात राम देव होते ते सांगत जाऊ नका. श्रीरामाचे चरित्र अत्यंत यत्नप्रधान आहे. आमच्या लोकांना असे म्हणण्याची सवय अनेक जन्म हाडीमांसी खिळून गेली आहे की, राम देव होते, कृष्ण देव होते, आम्ही काय पामर, आमच्या हातून काय होणार? पण ही दुर्बल विचारसरणी राष्ट्राचा घात करते. म्हणून श्रीरामचंद्राचे चरित्र यत्नप्रधान कसे आहे यावर जोर देऊन ते सांगतानाच, 'यत्न तोचि देव जाणावा' अशी रामदासस्वामींची शिकवणूक आहे असेच नेहमी प्रतिपादित जावे.''

गीता ही कर्मसंन्यास सांगणारी नाही तर कर्मयोग सांगणारी आहे म्हणूनच ती लो. टिळकांना गीतारहस्यातून उलगडावी असे वाटले.

**लो. टिळकांचा मुत्सद्दीपणा कोणता?**

'लो. टिळकांनी आपली विचारसरणी गीतेवर लादली व देशाची सामाजिक व राजकीय गरज ओळखून, गीता कर्मसंन्यासपर असूनही कर्मयोगपर आहे असे मुत्सद्दीपणे मांडले.' असे काही अभ्यासकांना वाटते. गीता असे म्हणते म्हटल्यावर लोक, आपला 'कर्मयोग' स्वीकारतील असे म्हणे लो. टिळकांना वाटले!

लो. टिळकांच्या जीवनाचे एकमेव ध्येय, देशाचा उत्कर्ष साधणे व देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे होते हे त्यांच्या संबंधींच्या आठवणींतून स्पष्ट होते. आठवणी त्यासाठीच दिल्या आहेत. लो. टिळकांची गीतारहस्याची प्रस्तावना, त्यांनी 'रहस्याचा' शोध का व कसा घेतला यावर प्रकाश टाकणारी आहे. वडिलांच्या अखेरच्या दुखण्यात १८७२ साली त्यांना गीता व त्यावरील भाषाविवृत्ती नावाची प्राकृत टीका वाचून दाखवण्याचे काम टिळकांवर आले. त्या वेळी त्यांचे वय सोळा होते. त्या वयात टिळकांच्या मनात अर्जुनाचा विषाद दूर करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठी सांगितलेल्या गीतेत ब्रह्मज्ञानाने किंवा भक्तीने मोक्ष कसा मिळवावा म्हणजे नुसत्या मोक्षमार्गाचे विवेचन कशाला ही शंका आली होती. 'गीतेची अनेक पारायणे केल्यावर, टीकाकारांच्या छापेतून सुटका होऊन मूळ गीता निवृत्तिपर नसून कर्मयोगपर असा बोध झाला व महाभारत, वेदान्तसूत्रे, उपनिषदे आणि वेदान्तशास्त्रावरील इतर संस्कृत व इंग्रजी ग्रंथांच्या अध्ययनानेही तेच मत दृढ झाले व या विषयावर चार-पाच ठिकाणी जाहीर व्याख्याने दिली. (१९०२-१९०४)' अशी माहिती लो. टिळकांनी प्रस्तावनेत दिलेली आहे.

१९०८-१९१४ या काळात लो. टिळक मंडालेत होते. गीतारहस्याचा खर्डा त्यांनी १९११ मध्ये केला असे ते प्रस्तावनेत नमूद करतात. याचा अर्थ १९०४ ते १९११ या काळात, गीतारहस्याचा विचार त्यांच्या मनात चालू होता. या मधल्या काळात, गीता कर्मयोगपर म्हणजे प्रवृत्तिमार्गी आहे, कर्मसंन्यास शिकवणारी नाही या टिळकांच्या विचारात कोणताही बदल झालेला नव्हता.

अनेक पारायणे करूनही लो. टिळकांना गीता आकळली नव्हती, असे विचारवंतांना वाटत असेल तर ते एक वेळ समजून घेणे शक्य आहे. 'संन्यास व कर्मयोग' या प्रकरणात टिळकांनी, आद्य श्रीशंकराचार्यांबद्दल पूर्ण आदर दाखवूनही, शंकराचार्यांनी ईशावास्योपनिषदातील ११व्या मंत्राची स्वसंप्रदायाला म्हणजे संन्यासमार्गाला अनुकूल अशी केलेली अर्थाची ओढाताण दाखवून दिली आहे! लो. टिळकांना गीतेचे रहस्य समजलेच नाही असे म्हणणे वेगळे आणि लो. टिळकांना गीता कर्मसंन्यास सांगणारी आहे हे कळूनही त्यांनी समाजाची गरज ओळखून, गीतेला कर्मयोगपर बनवण्याची मुत्सद्देगिरी दाखवली असे म्हणणे वेगळे!

विष्णुशास्त्री बापटांनी, लोकमान्यांची लोकमान्यांविरुद्ध जाणारी आठवण लिहिली आहे. त्यात बापटशास्त्री म्हणतात, ''लो. टिळक मला म्हणाले की शंकराचार्य ज्ञान कशाला म्हणतात, कोणत्या कर्मसमुच्चायाचे खंडन करतात, कोणत्या कर्मयोगावर त्यांचा कटाक्ष आहे हे सर्व मी जाणतो. पण मला गीतेतील प्रवृत्तिमार्गच पुढे आणावयाचा आहे. लोकांना आळशी बनवणारा निवृत्तिमार्ग हल्ली कामाचा नाही. हल्लीचे संन्यासी आमच्या काय कामाचे? आमच्या मते शंकराचार्यही कर्मयोगीच आहेत.''

ही आठवण मुळात एकतर्फी आहे. लोकमान्य काय म्हणाले हे बापटशास्त्री सांगतात. कर्मयोगाची मांडणी करणारा गीतारहस्य हा ग्रंथ एका बाजूला, १८७२ सालापासून म्हणजे वडिलांच्या अखेरच्या दुखण्यापासून ते १९११ सालापर्यंत म्हणजे गीतारहस्याचा कर्मयोगपर कच्चा खर्डा लिहिण्यापर्यंतचा लोकमान्यांचा ठाम व अविचल विचारप्रवास एका बाजूला आणि लोकमान्यांनी, गीतेत कर्मसंन्यास सांगितला आहे ही बापटशास्त्री यांच्याकडे दिलेली तोंडी कबूली व तीही बापटशास्त्री यांनी सांगितलेली दुसऱ्या बाजूला यांची तुलनाच होऊ शकत नाही. बापटशास्त्री विद्वान होते, म्हणून तर लो. टिळक व ते यांच्यात चर्चा होत असणार. दोघेही आपल्या आपल्या विरुद्ध मतांवर ठाम होते. आपणा दोघांत मतैक्य होणे शक्य नाही हे लो. टिळकांना एकदा निश्चितपणे समजल्यावर लो. टिळक, 'ठीक आहे, ठीक आहे, तुमचे म्हणणे समजले. तरीही मला माझेच म्हणणे, चुकीचे असले तरी मांडावयाचे आहे असे समजा' असे विषय संपवण्याचे दृष्टीने व दोघांचाही अमूल्य वेळ वाचवण्याच्या विचाराने म्हणाले असतील! माझ्यासारख्या सामान्य बुद्धीचा माणूस अशी व्यावहारिक माघार घेतो, टिळकांसारख्या बुद्धिमान व अनंत व्यापात असणाऱ्या व्यक्तीने हा मार्ग अवलंबिला असणे सहज शक्य आहे. आपल्या मृत्यूनंतर, बापटशास्त्री ही आठवण लिहितील अशी टिळकांना कल्पना कशी यावी?

लो. टिळकांना अनेक वर्षांच्या मननचिंतनानंतर गीता प्रवृत्तीपर नाही व निवृत्ती म्हणजे कर्मसंन्यास सांगणारी आहे. असे जाणवले असते तर त्यांनी 'गीतारहस्य' लिहिलेच नसते. मंडालेच्या तुरुंगात देशहिताला पोषक असे काहीही करणे आपल्याला शक्य नाही हे त्यांना समजले असते तर मनाविरुद्ध त्यांनी गणितावर काम केले असते; ते खरे कर्मयोगी असल्याने स्वस्थ बसले नसते एवढेच.

पण वेगळा मुत्सद्दीपणा लोकमान्यांनी दाखवलाही!

गीतेच्या दृष्टीने, साक्षात्कारी माणूसही सामाजिक कर्तव्य करण्यास बांधील आहे, हे टिळकांचे प्रतिपादन आहे. भले, सामान्य जनाप्रमाणे स्वत:साठी म्हणजे स्वत:च्या लाभासाठी, आत्मज्ञानी व्यक्तीला काहीही करण्याची गरज नसेल, पण लोकसंग्रहासाठी व समाज कर्तव्य मार्गावर राहावा यासाठी, त्याने फळाची अपेक्षा न ठेवता कर्मे करत राहिलेच पाहिजे. मन निरपेक्ष असेल तर कर्म बंधनकारक होत नाही व त्यामुळे ते मोक्षाला बाधक ठरत नाही. कर्मे करण्याच्या या युक्तीला (व सक्तीलाही) गीतेनं कर्मयोग हे नाव दिले आहे. लो. टिळकांच्या मतानुसार, कर्मयोगाचीही महती मांडणे हे गीतेचे उद्दिष्ट आहे. शतकानुशतके, वेदान्त परंपरेनुसार कर्मसंन्यास हाच मुक्तीचा मार्ग होता. त्याला शह देणारा व लोकांना कार्यप्रवण करणारा गीतेतीलच, पण मागे पडलेला कर्मयोग, लो. टिळकांनी गीतारहस्यातून घासून पुसून पुढे आणला. यात लो. टिळकांनी कर्मयोगाची वकिली केली नाही, चलाखी किंवा व्यवहारी मुत्सद्दीपणा दाखविला नाही. जे त्यांना अभ्यासांती स्पष्ट दिसले तेच त्यांनी मांडले. गीतेतील कर्मयोग विशद करताना, त्यांनी या विषयाच्या आसपास असणाऱ्या पाश्चात्त्य दृष्टिकोनाचाही परामर्श घेतला. त्यांचा मुत्सद्दीपणा असला तर तो यात आहे! आरिस्टॉटल, कांट, कान्फ्यूशियस, ग्रीन, मॅक्मिलन, मर्टिनो, मोर्ले, रोसनी, स्टीफन, शोपेनहॉवर, श्रडर, सार्क्रेटिस, स्पेन्सर, हार्टमन, हेगेल, ह्यूम वगैरे परदेशीय पंडित, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ यांची नावे माझ्यासारख्याने क्वचित् कधीतरी ऐकलेली असतात. या नावांचा उच्चार करून कोणीतरी तिकडेच तत्त्वविचार, नीतिशास्त्र मांडू लागला की भांबावल्यासारखे होते. हे सर्व लेखक आधुनिक आहेत. आमची उपनिषदे व त्यावर आधारलेली गीता हे तसे फार जुने! त्यामुळे तत्त्वविचारातही आम्ही मागासलेले आहोत की काय असे वाटते. पण गीतारहस्यात या अलीकडच्या पंडितांच्या विचारांचा धांडोळा घेतला आहे. नीती, सदाचरण, कर्माकर्मविवेक याबाबतचे या पंडितांचे विचार कोठे गीतेशी जुळणारे आहेत, कोठे नाहीत आणि गीतेतील तत्त्वज्ञान कसे परिपूर्ण आहे हे लो. टिळकांनी गीतारहस्यात सिद्ध करून दिले आहे. पाश्चात्त्यांच्या शहाणपणावर गुजराण करणाऱ्यांच्यापुढे, आमच्यासारख्यांची मान एरवी खाली गेली असती, परंतु गीतारहस्याच्या वाचनानंतर, आपले तौलनिक ज्ञानबळ वाढते. अध्यात्मशास्त्र हे केवळ मोक्षाचा विचार करत नाही तर ऐहिक स्वास्थ्य व उत्कर्ष याचाही विचार करते हे ध्यानी येते.

आमच्यासारख्यांचा, गीतेतील सर्व काळ उपयोगी ठरणाऱ्या तत्त्वज्ञानावरचा विश्वास लो. टिळकांनी वाढवला आहे.

**भा. ल. महाबळ**
१७, चंद्रविजय गृहसंस्था, लो. टिळक रस्ता,
मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१
फोन नं. - ०२२-२१६३१९४०



# नव्या युगाला साद घालणारा खांडेकरांचा पत्रसंवाद

डॉ. सुनीलकुमार लवटे

**आत्मीय खांडेकर कुणाच्या श्रद्धेचा तर कुणाच्या असुयेचा भाग ठरले. पण खांडेकरांनी त्याचा विचार न करता आपलं मैत्र जपलं. हे मैत्र बाबा आमटे, बाबा मोहोड, विनोबांशी होतं. डॉ. श्रीराम लागू, वसंत कानेटकर, रणजित देसाईंशी होतं. नाटक आणि खांडेकर, सिनेमा आणि खांडेकर, समाजसेवक आणि खांडेकर असेही अभ्यासाचे विषय होऊ शकतील.**

वि. स. खांडेकरांचा नि माझा परिचय सन १९६३ पासूनचा. त्यावेळी त्यांनी आंतरभारती विद्यालय कोल्हापुरात सुरू केलं होतं. त्या शाळेच्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकी मी एक. ते शाळेत येत, व्याख्याने देत, प्रसंगी शिकवतही! नंतर मी त्याच शाळेत शिक्षक झालो नि त्यांचा माझा तिथल्या चळवळीच्या अनुषंगाने संबंध आला. नंतर कधीमधी त्यांची पत्रं लिहायला गेल्याचंही आठवतं! त्यांच्या मृत्यूशी झुंजीच्या काळात मिरेजला केलेल्या फेऱ्याही आठवतात. त्यांच्या शेजारच्या खोलीत त्या वेळी क्रांतिसिंह नाना पाटीलही आपले शेवटेच क्षण मोजत होते... त्यांच्या कॉटच्या शेजारच्या खुर्चीवरील विठोबा-रखुमाईची तसबीरही मी पंढरपूरचा असल्याने अजून लक्षात आहे. (लक्षात असल्याचं आणखी एक कारण, त्यांचं कम्युनिस्ट असून भक्त असणं!) खांडेकर निवर्तले तेव्हा ती बातमी सर्वदूर पसरण्यापूर्वी मी शशिकांत महाडेश्वरांच्या निरोपामुळे दक्ष होतो. अंत्ययात्रेतील महानगरपालिकेच्या सजवलेल्या ट्रकच्या केबिनमध्ये अंत्येष्टीचा माठ, त्यांत चंदन, फुलं, कापूर, पान, सुपारी इ. साहित्य मांडीवर घेऊन बसलो होतो... ही जबाबदारी माझ्यावर माझे प्राचार्य अमरसिंह राणेंनी सोपवली होती. (बहुधा आज्ञाधारक विद्यार्थी म्हणून!) जणू मी त्यांच्या जीवनाचा अमृतकुंभच जपत वागवत होतो. पुढे मी एम.ए.पीएच.डी. झालो. मंदाताईंच्या स्नेहामुळे मला त्यांच्या कथा, कादंबरी, रूपक कथांचे हिंदी अनुवाद करता आले. नंतर त्यांच्याच प्रेम व विश्वासामुळे मी भाऊंचं अप्रकाशित, असंपादित, असंग्रहित साहित्य मराठी वाचकांना देऊ शकलो... सोळा पुस्तकं झाली. आणखी तितकीच होतील इतकं साहित्य वि. स. खांडेकरांच्या शोधयात्रेत हाती आलंय... काही मंदाताईंकडून, काही समकालीनांकडून तर काही प्रकाशक, संपादक, वाचक, स्नेही, नातलग, आप्तइष्ट, संस्था, संघटना, वाचनालयं, स्थानिक स्वराज्य संस्था,

विद्यापीठे, साहित्य अकादमी, ज्ञानपीठ, शासन प्रकाशन विभाग, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, आकाशवाणी, दूरदर्शन, साहित्यिक. ज्यांनी दिलं नाही ते आळशी वाटावे असा सुखद अनुभव! छायाचित्रे, ध्वनिफिती, सीडी, पत्रे, जुने अंक, पुस्तके, संदर्भ, फाईल्स, एका लेखकाचा समग्र अभ्यास करून एक संग्रहालय उभारता येईल असं पूर्वी वाटायचं... शिवाजी विद्यापीठ, खांडेकर कुटुंबीय व अन्य वरील सर्व स्रोतांच्या मदतीतून ते उभारल्यानंतरही रोज माझ्या व्यक्तिगत संदर्भ संग्रहात, साधनात भरच पडते आहे. आता वाटतंय की वि. स. खांडेकर संशोधन विद्यापीठ उभारता येईल असं त्यांचं भारतीय, वैश्विक रूप आहे... हे कुणाला अतिशयोक्तीचे वाटले तर तो त्या व्यक्तीच्या मर्यादेचा, कोतेपणाचाच भाग मानता येईल.

हे सारं आठवायचं कारणही तसं आहे. परवा गमभन प्रकाशनचं पत्र आलं. त्यांचं प्रकाशन दरवर्षी मराठी साहित्यकारांची छायाचित्रं असलेलं कॅलेंडर प्रकाशित करतं.. आगामी वर्षाच्या कॅलेंडरसाठी वि. स. खांडेकरांवर मी लिहावं अशी त्यांची इच्छा होती... अट होती हजार शब्दांची... अगणित शब्दांचा माणूस हजार शब्दांत सामावणं अशक्य वाटत होतं. अलीकडे एका संस्थेसाठी त्यांचं छोटेखानी चरित्र, दुसऱ्या एका प्रकाशनासाठी स्मारक ग्रंथ तयार करत असताना मी अनुभवलं आहे की, वि. स. खांडेकरांचा लोकसंग्रह प्रचंड होता... पत्रव्यवहार अफाट, लेखन अखंड (मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या सावट वर्षात प्रकाशन खंड असला तरी लेखन खंड नव्हता!) वक्तृत्व अटकेपार... मी अलीकडेच त्यांच्या पटकथांचं संपादन हातावेगळं केलं नि व्यक्तिचित्रे, पत्रे, भाषणे वाचतो आहे. व्यक्तिचित्रं खांडेकरांनी लिहिलेली व खांडेकरांची इतरांनी चितारलेली... पत्रं खांडेकरांनी लिहिलेली व खांडेकरांना इतरांनी लिहिलेली... लेख, समीक्षा खांडेकरांनी लिहिलेल्या व खांडेकरांच्या साहित्यावर इतरांनी लिहिलेले लेख नि समीक्षा.

वि. स. खांडेकरांचा पत्रव्यवहार, वि. स. खांडेकरांचे साहित्यिक ऋणानुबंध, संशोधन, पीएच.डी. होऊ शकेल... पण वेळ कुणाला आहे? (सुदैवानं मी नुकताच निवृत्त झाल्यानं मला मात्र आहे नक्की!) वि. स. खांडेकरांचं मोठेपण समजून घेताना मला शेक्सपियरचं मोठेपण लक्षात येत रहातं... सर विस्टन चर्चिल एकदा म्हणाले होते की, 'आम्ही एकवेळ आमचं साम्राज्य बहाल करू पण शेक्सपियर नाही देणार.' वि. स. खांडेकरांचं जीवन व कार्य मला शेक्सपियरपेक्षा तसुभरही कमी नाही वाटत.

वि. स. खांडेकरांचं मोठेपण त्यांना इतरेजनांनी लिहिलेल्या व त्यांनी इतरांना लिहिलेल्या पत्रव्यवहारातून प्रकर्षानं जाणवतं. वाचक, साहित्यिक, संपादक, प्रकाशक, स्नेही, राजकारणी (अपवाद) सर्वांची पत्रे त्यांना येत. साऱ्यांना उत्तरं पाठवायचा त्यांचा प्रघात होता. आलेल्या पत्राला उत्तर पाठवल्याची नोंद ते आलेल्या पत्रावर करीत. त्यावर पाठवलेल्या उत्तराचे मुद्दे टिपून ठेवत. समकालीन साहित्यिक वि. स. खांडेकरांना आपल्या नवप्रकाशित रचना पाठवत. अभिप्राय विचारत. परीक्षणं लिहिण्याची विनंती करीत. मासिकांचे संपादक वि. स. खांडेकरांचे लेखन गृहीत धरूनच विशेषांकाची योजना करीत.

कथाकार य. गो. जोशी साहित्यिक होते तसे संपादक व प्रकाशकही. त्यांना एक लघुकथा संग्रह संपादित करून प्रकाशित करायचा होता, पण मानधन द्यायची परिस्थिती नव्हती. त्यांनी इतर लेखकांबरोबर वि. स. खांडेकरांना पत्र लिहिलं होतं. त्यात म्हटलं होतं की, 'माझ्या मनात येत्या दिवाळीत एक लघुकथा संग्रह प्रसिद्ध करावयाचा आहे आणि तो म्हणजे प्रत्येक लघुकथा लेखकाची एक एक त्याची आवडती गोष्ट. अशा २४ गोष्टी म्हणजे २४ लेखक. ...आपणही एक गोष्ट पाठवा. सदर संग्रहाकरिता मी 'विनामोबदला' गोष्टी मागणार आहे. याचा अर्थ कोणाला काही द्यायचे नाही असा नसून २४ लेखकांशी संबंध येणार असल्यामुळे जबाबदारी अंगावर न घेता, मोबदला कबूल न करता पुस्तक विक्री होताच मला जो शक्य व इष्ट वाटेल तो मी देणार आहे. लेखकाचे श्रम व अपेक्षा मी जाणतो. पण माझ्या परिस्थितीनुरूप मला सावधपणाने वागायला हवे.' वि. स. खांडेकरांनी त्यांना गोष्ट पाठवली होती हे वेगळे सांगायला नको. यातून वि. स. खांडेकर व य. गो. जोशी यांच्यातील जवळीक व जिव्हाळा जसा व्यक्त होतो तसाच य. गो. जोशी यांची स्थिती, प्रकाशन व्यवसायाची सन १९३४ ची ओढग्रस्तताही स्पष्ट होते.

सन १९३६ची गोष्ट. वि. स. खांडेकर ट्यूटोरियल इंग्लिश स्कूल शिरोड्याची मुख्याध्यापकाची नोकरी सोडून मास्टर विनायकांच्या 'हंस' पिक्चर्समध्ये कथालेखक म्हणून दाखल झाले होते. 'छाया' या पहिल्या पटकथेचं लेखन सुरू होतं. त्यात वि. स. खांडेकरांना एका प्रसंगात कवी भा. रा. तांबे 'घन तमी शुक्र बघ राज्य करी' आणि 'माझे कोडे' या कवितेची काही कडवी वापरावयाची होती. भाऊंनी त्यांना तसं विनंती पत्र लिहिलं. उत्तरात भा. रा. ताम्ब्यांनी लिहिलं होतं, 'मी या कार्डाने माझी पूर्ण संमती कळवीत आहे. मला वाटते एवढ्याशा गोष्टीसाठी संमती ती कशाला हवी? आपला मजवर एवढाही अधिकार नाही का?' यातून एकाची नम्रता तर दुसऱ्याची उदारता स्पष्ट होते. हंस, प्रफुल्ल, नवयुग, रघुवीर चित्र निकेतन, फेमस फिल्म सारख्या चित्रपट संस्था व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाकडे उपलब्ध कागदपत्रे, पत्रव्यवहार यातून वि. स. खांडेकरांचे मास्टर विनायक, बाबूराव पेंढारकर, आचार्य अत्रे, अमृतलाल नागर, बा. भ. बोरकर प्रभृतींशी व त्यांचे खांडेकरांशी असलेले दृढ संबंध, घनिष्टता स्पष्ट होते.

त्यावेळी अधिकांश लेखक कार्डावर लिहीत. स्वहस्ताक्षरात अधिकांश लिहीत. पण प्रा. ना. सी. फडके यांचा रुबाब व शिस्त और होती. सहसा छापील लेटर हेडवर लिहीत. पत्रे इंग्रजी असत. स्वाक्षरी इंग्रजी. लेटरपॅडही इंग्रजीत छापलेले असे. प्रा. ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांच्या विचारात, दृष्टीमध्ये फरक, मतभेद असले तरी व्यक्तिगत जीवनात, पत्रव्यवहारात सख्य होतं. सन १९३७ च्या दरम्यान वि. स. खांडेकर 'ज्योत्स्ना' मासिकाचे संपादन करीत. (खरं तर वा. रा. ढवळे ते करीत व वि. स. खांडेकर त्यात नियमित लिहीत.) ऑक्टोबर १९३७च्या अंकात त्यांनी प्रा. ना. सी. फडके यांच्या 'साहित्य आणि संसार'बद्दल परीक्षण लिहिलं होतं. ना. सी. फडके यांनी ते वाचून लिहिलं होतं, ''I read your review of my book with great interest. Your conteintion that I have acted like an expert lawyer and brought only supporting evidence in the court would apply to anyone making out his case, wouldn't it? What do you do when maintaining the opposite view? A part from this however your review is very appriciative and I must sincerely thank you for it.'' या पत्रातून दोन समकालीनांचे मतभेद एकमेकांचा अनादर न करता ज्या भाषा-संस्कार व सभ्यतेने व्यक्त होतात त्यातून दोघांची रुजुता स्पष्ट होते. त्यातील प्रा. फडके यांचं इंग्रजीवरील प्रभुत्व जसं व्यक्त होतं तसा करारीपणाही. या पत्राच्या शेवटी प्रा. फडके यांनी वि. स. खांडेकरांना दिलेलं चहाचं आमंत्रण केवळ खानदानी सौजन्य व्यक्त करणारं!

प्रा. ना. सी. फडके, प्रा. माधवराव पटवर्धन (कवी माधव ज्युलियन), प्रा. व्ही. के. गोकाक १९३६-३८ च्या दरम्यान कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये शिकवत. प्रा. फडके तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, मानसशास्त्र. प्रा. पटवर्धन फार्सी (पर्शियन) तर प्रा. गोकाक इंग्रजी शिकवत. या तिघांचा आणि वि. स. खांडेकरांचा घनिष्ट संबंध होता. प्रा. गोकाक काही काळ सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये होते. तेव्हा सांगलीचा समावेश सातारा जिल्ह्यात होता. त्या काळात (१९३८) ते नुकतेच विदेशात दोन वर्षे राहून परतले होते. वि. स. खांडेकरांनी प्रा. गोकाकना नवप्रकाशित 'दोन ध्रुव' कादंबरी व 'ज्योत्स्ना' मासिकाचा अंक माईणकरांच्या हाती पाठवला होता. कादंबरी वाचून प्रा. गोकाकांसारख्या कवी, समीक्षक, शिक्षणतज्ज्ञांनी लिहिलं होतं, ''I had a mind to write to you and tell you how very much I liked the novel which strove to depict the class struggle in India and the stories that were full of wisdom. But that was not possible then. I took this opportunity to pay an ungrudging tribute to your genius.'' पुढे योगायोग असा की वि. स. खांडेकरांना ज्ञानपीठ पारितोषिक दिलं जावं म्हणून आग्रही असणाऱ्यात प्रा. व्ही. के. गोकाक हे एक होते. त्यावेळी भारतीय ज्ञानपीठाचं मोठं कौतुक झालं नि प्रा. गोकाकना त्याच वर्षी निवड समितीचं अध्यक्ष बनवलं गेलं. असेच संबंध माधव ज्युलियनांशीही होते. ते आपल्या रचना प्रकाशनापूर्वी वि. स. खांडेकरांना दाखवीत असत. त्यांच्या 'विरहतरंग'च्या सुधारित आवृत्तीचं प्रकाशनपूर्व संस्करण वि. स. खांडेकरांनी केलं आहे.

वि. स. खांडेकरांचा नि. ग. त्र्यं. माडखोलकरांचा ऋणानुबंध ते न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांचे लेखनिक असल्यापासूनचा. वि. स. खांडेकरांची त्यांची मैत्री मतभेदपूर्ण लिखाणातून झाली होती. त्याचं असं झालं की सन १९१९च्या जुलैच्या 'नवयुग' मासिकात ग. त्र्यं. माडखोलकरांचा 'केशवसुतांचा संप्रदाय' शीर्षकाचा लेख प्रकाशित झाला. त्यात माडखोलकरांनी गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी) यांची 'दसरा' कविता म्हणजे केशवसुतांच्या 'तुतारी'चे अधम अनुकरण असल्याचं लिहिलं होतं. खांडेकरांच्या ते वाचनात आलं. त्यांना ते पटलं नाही. खांडेकरांनी त्याला प्रत्युत्तर म्हणून 'हा हन्त हन्त' शीर्षक लेख लिहिला. तो नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना विलक्षण आवडला. हे ग. त्र्यं. माडखोलकरांनीच खांडेकरांना कळवलं. पुढे एकदा गडकऱ्यांनी खांडेकरांची ओळख 'कोल्हटकरांच्या गादीचा वारस' म्हणून करून दिली होती. खांडेकरांचे नि माडखोलकरांचे ऋणानुबंध केवळ साहित्यिक नव्हते तर घरगुतीही होते ते माडखोलकर-खांडेकरांचा अभ्यास करणाऱ्यांच्या लक्षात आल्यावाचून राहत नाहीत. उभयता एकमेकांना जिव्हाळ्यानं लिहित. एकदा माडखोलकरांनी वि. स. खांडेकरांची खुशाली जाणून घेताना पृच्छा केली होती की, ''आपली सर्व गृहस्थिती मला कळावी अशी माझी इच्छा आहे. 'संविभक्तं हि दुःखं' ही उक्ति आपण जाणताच; व मला वाटते मी आपला 'स्निग्धजन' खचित आहे आणि त्यामुळेच हे धाडस केले.'' हा काळ १९२१ चा. पुढे पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं. ते दैनिक ज्ञानप्रकाश, दै. तरुण भारत (नागपूर)चे संपादक झाले. दैनिक केसरीत ते टिळकांच्या मृत्यूनंतर जायचं घाटत होतं. तो मोठा इतिहास आहे. हा स्नेह इतका की दोघं समकालीन जीवन (१८९७ ते १९७६) जगले. (दोघांनाही मराठी साहित्यात 'भाऊसाहेब' नावानंच संबोधलं जायचं हा आणखी एक योगायोग!) माडखोलकर दोन वर्षांनी लहान इतकाच फरक. १९७२ ला वि. स. खांडेकरांची मुळात अधुदृष्टी पूर्णपणे गेली. ही वार्ता सन १९७२च्या दिवाळीत माडखोलकरांच्या कानी पडली. बंधुतुल्य माडखोलकर विकल झाले. त्यांनी खांडेकरांना धीर देत लिहिलं होतं, ''मोझार्टला (जर्मन संगीतकार) बहिरेपण आणि मिल्टनला (इंग्रजी कवी) आंधळेपण उतारवयात आल्यावरही एकाने आपले संगीतरचनेचे

आणि दुसऱ्याने काव्यरचनेचे आपले व्रत अखंड चालू ठेवले होते, हे आपणास माहीत आहेच. मी हा उपदेश म्हणून लिहित नाही. तो माझा अधिकारही नाही. पण आपला विवेक आणि धीर ही दोन्ही इतकी मोठी आहेत की, त्यांच्या जोरावर आपण शेवटपर्यंत कार्यरत रहाल अशी मला खात्री वाटते.'' अन ते खरंही ठरलं. शेवटच्या दिवाळी अंकापर्यंत (१९७५) ते लिहित राहिले होते.

वि. स. खांडेकर सर्व नवोदित लेखकांचं आशास्थान अन् स्थिर लेखकांचं प्रेरणा केंद्र होतं. नवं वाचायचं. त्याला अभिप्राय कळवायचा. नवोदितांची संपादक, प्रकाशकांकडे शिफारस करायची. संपादक, प्रकाशकांनी नाही ऐकलं तर पदरमोड करून अशांचं लेखन प्रकाशित करायचं हा उमेदपणा खांडेकरच करू जाणे. त्यामुळे नवलेखक, कवी, नाटककारांची नित्य उठबस, भेटणं, पत्रं नित्याची गोष्ट होती. या नवोदितांना वि. स. खांडेकर कल्पतरूपेक्षा कमी नसायचे, हे कवी समीक्षक शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या उदाहरणावरून स्पष्ट होईल. ते इंदूरला रहात. वय विशीतलं. मराठी भाषा पण रहाणं मध्यप्रदेशात. मातृभाषेची विलक्षण ओढ. हिंदी, मराठीत दोन्हीत लिहित. पण मराठीत आपलं नाव व्हावं अशी आंतरिक इच्छा. मोठा भाऊ गजानन माधव मुक्तिबोध हिंदी कवी म्हणून स्थिरावलेला. मराठीत कथा, कविता लिहूनही प्रकाशित होत नाही हे पाहून त्यांनी एकदा खांडेकरांना लिहिलं, ''नाही तर महाराष्ट्राच्या थंडगार उपेक्षेशी परत एकदा टक्कर देण्याची ताकद कुठं माझ्यात होती? मी माझ्या या दोन कृती (वाळवंटातील कळ्या आणि याचक या त्या कथा) घेऊन परत एकदा शेवटचा प्रयत्न करून पाहावा म्हणून महाराष्ट्रासमोर यायचा प्रयत्न करीत आहे. आपण जर त्याचे चीज करून ज्योत्स्नेत स्थान दिलेत तरच मी मराठीत पुढे लिहीन. तसे न झाल्यास मला परत हिंदीच्या तोंडाकडे पाहावे लागेल.'' पण तशी वेळ मुक्तिबोधांवरच काय कुसुमाग्रज, चिं. त्र्यं. खानोलकर, रणजित देसाई प्रभृती साहित्यिकांवर आली नाही याचे श्रेय खांडेकरांच्या साहाय्यकारी स्वभावासच द्यावे लागेल.

अनेक साहित्यिक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ते वि. स. खांडेकरांच्या पासंगामुळे. ही परंपरा स्वातंत्र्यपूर्व काळापासून दिसून येते. कुणाचे सूचक, कुणाचे अनुमोदक, कुणाचे प्रसारक, कुणाचे समर्थक तर कधी तटस्थ अशा अनेक भूमिका खांडेकरांनी पार पडल्या हे या संमेलनांच्या इतिहासाची पाने चाळताना लक्षात येते. तीच गोष्ट नाट्य संमेलनांची पण. एका अर्थाने वि. स. खांडेकरांनी स्वांतत्र्योत्तर महाराष्ट्राचं सांस्कृतिक नेतृत्व केलं. त्यांनी पिढ्या घडवण्याचं कार्य केलं. 'देवाचे देवाला नि सीझरचे सीझरला.' या म्हणीनुसार त्यांनी विवेकानं साहित्य व्यवहार केला. मतभेदाचे प्रसंग आले तरी सभ्यता सोडली नाही, पण आपल्या मतप्रदर्शनात कचखऊपणाही दाखवला नाही. आचार्य अत्रे यांच्याशी 'ललित'मधील झटापट असो की लघुनिबंधाचे जनक कोण? याची डॉ. आनंद यादव यांनी छेडलेली चर्चा असो, साऱ्यात ज्याचं माप त्याच्या पदरात टाकण्याचा त्यांचा विवेक महाराष्ट्र सारस्वत विसरू शकणार नाही. वि. स. खांडेकर हे करू शकले कारण त्यांच्यातला समाजशिक्षक नेहमी जागा असायचा.

चित्रकार धनंजय कीर यांची सन १९६३ च्या दरम्यान दृष्टी अधू झाली नि त्यांचं लेखन मंदावलं (खरं तर संपलं!) खायची भ्रांत होती. हे वृत्तपत्रात आलं तसं वि. स. खांडेकर अस्वस्थ झाले. त्यांनी कीरांना पत्रावर पत्रं लिहिली. कीरांचं एक उत्तर नाही, म्हणून त्यांचे स्नेही रमेश शिंदे यांना वि. स. खांडेकरांनी शोधून काढलं. त्यांच्या करवी प्रयत्न केले; पण कीर काही बधले नाही. समदु:खी असल्याने (दृष्टिमांद्य) खांडेकरांची अस्वस्थता दिवसागणिक वाढत होती. कीरांच्या बाजूनं नकाराचं, उपेक्षेचे कारणही सबळ होतं. यशवंतराव चव्हाण त्यावेळी मुख्यमंत्री होते. आचार्य अत्रेंनी त्यांच्या हे कानावर घातलेलं. निवेदन द्या म्हटल्यावर ते दिल्याचं अत्रे सांगत... पण काही घडलं नव्हतं... परत हात दाखवून अवलक्षण कशाला असं धनंजय कीरांना वाटायचं... खांडेकरांची तगमग, तळमळ पाहून एकदा कीरांनी आपली भूमिका स्पष्ट केली (याच वेळी पटवर्धन बुवा, अनंतराव गद्रे प्रभृतींची अशीच परवड चाललेली.) ''मी डोळ्याने अपंग, अधु झालो हे खरे, परंतु सरकारकडे मी याचना करावयास जाणार नाही. माझ्या मनास ते मानवत नाही. अर्ज करणे म्हणजेच याचना करणे. मी जे कार्य केले त्याविषयी सरकारला काही गुणग्राहकता वाटत असेल तर सरकारने त्याची दखल घ्यावी... माझे कार्य मी कोणत्या स्वार्थी हेतूने केले नाही... 'भिक्षा पात्र अवलंबणे, जळो जिणे लाजिरवाणे' हे अगदी सत्य आहे. डोळे उघडे आहेत, तोपर्यंत मी घेतलेले कार्य तडीस नेऊन स्वाभिमानाने जगण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन.'' नंतर वि. स. खांडेकरांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाने स्वत: घरी जाऊन त्यांना अर्थसाहाय्य दिले होते... कीर बहुधा त्यावेळी रत्नागिरी मुक्कामी आपल्या आप्तांकडे होते असे आठवते.

विदुषी इरावतीबाई कर्वे, समाजसेविका नि 'स्त्री जीवनाची नवी क्षितिजे'च्या लेखिका सौ. कमलाताई टिळक, मालतीबाई किर्लोस्कर, कथाकार सुशीला पगारिया– अनेकजण भाऊंना लिहीत. भाऊही उत्तरं पाठवत. विद्यार्थिनी वाचकांची पत्रे, संवाद, भेटणं ही असायचं. भाऊ वडिलकीच्या नात्यानं सर्वांना लिहीत, बोलत, भेटत. त्यांच्या साहित्यातील स्त्री पात्रे, त्यांच्या अष्टनायिका मानसकन्याच होत्या. स्त्रीजीवन सुधारावं, त्यांनी शिकावं, नुसतं शिक्षित न होता सुशिक्षित व्हावं असं त्यांना वाटायचं. त्यांची

अपूर्ण कादंबरी 'सोनेरी स्वप्नं भगलेली' हिंदीत पूर्ण करताना आणि तशीच अपूर्ण कादंबरी 'नवी स्त्री' मराठीत संपादित करताना वि. स. खांडेकरांचा जो पुरोगामी दृष्टिकोन प्रत्ययास आला त्यातून ते 'वंचितांचे वाली' म्हणून समोर येतात. हीच गोष्ट दलितांविषयी. 'ध्वज फडकत ठेवू या'मध्येही प्रत्ययास येते.

कथाकार जी. ए. कुलकर्णी, व्यवहाराने सार्वजनिक नव्हते, पण त्यांचा पत्रव्यवहार चोखंदळांशी नित्य असायचा. हे त्यांच्या प्रकाशित पत्रसंग्रहांवरून (जी.एं.ची निवडक पत्रे खंड १,२,३,४) स्पष्ट होते. जी. ए. स्वत:हून फार कमी लोकांना लिहित. त्यात आत्मश्लाघा अपवादानेच दिसून येते; पण याला अपवाद होता. वि. स. खांडेकरांचा. जी.एं.च्या 'काजळमाया' कथासंग्रहास साहित्य अकादमीचा पुरस्कार लाभल्यावर त्यांनी स्वत:हून त्याबद्दल जर कुणाला लिहिलं असेल तर ते होते वि. स. खांडेकर. जी. एं.नी जयवंत दळवी यांना एकदा केवळ खांडेकरांवर पत्र लिहिलं होतं. वरील पत्रांच्या तिसऱ्या खंडात ते समाविष्ट करण्यात आलं आहे. त्यातूनही जी. एं.च्या मनात असलेली वि. स. खांडेकरांविषयीची 'श्रद्धा' स्पष्ट होते. खांडेकरांच्या साहित्याबद्दल, जी. एं.चे मतभेद होते पण 'माणूस' म्हणून त्यांचे आतडे पायात घुटमळायचेच.

जी.एं.सारखंच प्रा. नरहर कुरुंदकरांचं. समीक्षक म्हणून धाक असलेला व आपल्या प्रखर विचारांनी महाराष्ट्रास अंतर्मुख करणारा वक्ता वि. स. खांडेकरांपुढे मात्र नतमस्तक असायचा. वासुदेवशास्त्री खरे यांनी स्थापन केलेल्या मिरजेच्या वाचनालयाची व्याख्यानमाला बरीच जुनी आहे. वि. स. खांडेकर मूळचे सांगलीचे असल्याने खरे शास्त्री, नाटककार देवल प्रभृतींचा प्रभाव खांडेकरांवर होता. त्या व्याख्यानमालेस प्रा. कुरुंदकरांनी जावं म्हणून त्यांना खांडेकरांनी आग्रह केला होता. तो स्वीकारणारं एक छोटं पत्र प्रा. कुरुंदकरांनी वि. स. खांडेकरांना लिहिलं होतं. त्यात खुशालीची विचारपूस होती. शेवटी लिहिलं होतं, ''दीर्घकाळ विविध प्रकारची महाराष्ट्राची सेवा करून झाल्यानंतर आपण आता अवभृत स्नानास मोकळे झालेले आहात. इतकाच साऱ्या घटनांचा मी अर्थ लावतो. ह्या वातावरणात आपले आत्मवृत्त पूर्ण झाले तर मग बाहेरचा अंधारही आतल्या प्रकाशासमोर नमला असे मग म्हणावे लागेल.''

वि. स. खांडेकर संपादक, प्रकाशकांना वारंवार लिहित. संपादकांना सल्ला देत. संपादक तो शिराधार्य मानत. किर्लोस्कर मासिकाने स्त्री, दलितादी वंचितांची तळी उचलायचं धोरण जाहीर केलं होतं ते खांडेकरांच्या प्रेम नि प्रभावामुळेच. खांडेकरांचा नि किर्लोस्कर कुटुंबांचा संबंध जुना. 'किर्लोस्कर' पूर्वी त्याचं रूप 'किर्लोस्कर खबर' होतं. प्रामुख्यानं ते जाहिरात पत्रक होतं. त्यातही खांडेकर लिहायचे. 'किर्लोस्कर'नी आपल्या मासिकात व्यंगचित्र प्रकाशनास प्रारंभ केला तेव्हा वि. स. खांडेकरांनी व्यंगचित्राचे अनेक विषय 'किर्लोस्कर'ला सुचविले होते. खांडेकरांच्या अनेक लेखांना 'किर्लोस्कर'ने व्यंगचित्रांनी सजवल्याचं दिसून येतं. खांडेकर अत्यल्प मानधन घेऊन 'किर्लोस्कर'साठी लिहित राहिले ते कौटुंबिक संबंधांमुळेच.

वि. स. खांडेकर आणि समकालीन वाचक, साहित्यिक, संपादक, चित्रपट सृष्टीतील कलावंत, तंत्रज्ञ असा विपुल पत्रव्यवहार अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. तो एकत्र करून त्याची वर्गवारी, विषय, आशय, शैली, पत्रपद्धती, पत्रस्वरूप, मायने, प्रशस्ती, हस्ताक्षर इ. अंगाने करून त्यातून वि. स. खांडेकरांचा पुनर्शोध शक्य आहे. या व्यापातून दिसणारे खांडेकर म्हणजे माणूसपणाचं मोहोळ होय. लोकाभिमुख होणं ही खांडेकरांची उपजत वृत्ती होती. तो त्यांचा स्वभाव होता. प्रारंभी मित्रांना गोष्टी सांगणं, नंतर लेखन, भाषण, पत्र लिहिणं, आल्या-गेल्यांशी बोलत राहणं यातून ते स्पष्ट होतं. संपर्कात आलेल्या प्रत्येकास खांडेकर आपले वाटत याचं रहस्य त्यांच्या संवाद शैली व कौशल्यात आहे. लहान-मोठा असा भेद त्यांनी संवादात कधी केला नाही. प्रत्येकास आपल्या मनातलं सांगून निश्चिन्त होण्याचं ठिकाण होते खांडेकर! त्यांचं हे रूप चर्चच्या त्या पादऱ्याप्रमाणे असायचं. जो तो येऊन आपला कबुली जबाब देऊन मोकळा व्हायचा. हे केवळ वयाचं मोठेपण नव्हतं. त्यात प्रतिभेचा चमत्कार, विचार वैभव, भाषासौंदर्य व सर्वात महत्त्वाचे आत्मीयता होती.

आत्मीय खांडेकर कुणाच्या श्रद्धेचा तर कुणाच्या असुयेचा भाग ठरले. पण खांडेकरांनी त्याचा विचार न करता आपलं मैत्र जपलं. हे मैत्र बाबा आमटे, बाबा मोहोड, विनोबांशी होतं. डॉ. श्रीराम लागू, वसंत कानेटकर, रणजित देसाईंशी होतं. नाटक आणि खांडेकर, सिनेमा आणि खांडेकर, समाजसेवक आणि खांडेकर असेही पत्रव्यवहाराच्या अभ्यासाचे विषय होऊ शकतील. वा. रा. ढवळे, अनंतराव कुलकर्णी, रा. ज. देशमुख, ग. पां. परचुरे, द. ना. मोघे, अनंत हरी गद्रे, नामदेवराव व्हटकर यांच्यासारखे प्रकाशक असोत वा किर्लोस्कर, मित्र, विरकुड, यदुनाथ थत्ते यांच्यासारखे संपादक असोत, सर्वांशी वि. स. खांडकरांचा पत्र संवाद असायचा. वाचकांशी संवाद हे खांडेकरांचं आगळं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. चिमुरड्या वाचकासही ते लिहित. त्यात मराठी, गुजराती, बंगाली भाषिकांचा समावेश असायचा. कोण सहमत तर कोण असहमत. असहमतांशीही सख्यपूर्ण संवादात खांडेकरांचं मोठेपण सामावलेलं दिसतं. खांडेकर कुणास सविस्तर तर कुणास त्रोटक लिहित, पण आलेल्या प्रत्येक पत्रास उत्तर धाडायचा त्यांचा प्रयत्न असायचा. स्वत:हून लिहिण्याचीही त्यांना सवय होती. विशेषत: नवोदितांना त्यांचं लेखन वाचून प्रशस्ती कळवायची सवय केवळ अनुकरणीय होती. वि. स. खांडेकरांनी मराठी माणसाच्या मनात जे आदराचं स्थान निर्माण

केलं होतं, ते केवळ साहित्यातून नाही तर पत्र, मैत्री, पत्रसवांद हेही त्याचं मोठं कारण होतं असं अभ्यास करताना लक्षात येतं. सन १९२० ते १९७६ असा ५६ वर्षांचा खांडेकरांचा पत्रप्रपंच म्हणजे त्या काळची माणसे व मने यांचं विशुद्ध प्रतिबिंबच.

त्यात एकविसाव्या शतकातील वाचकांनी स्वत: न्याहाळायला हवं. आजच्या असंवाद स्थितीची कोंडी कदाचित त्यातून फुटेल आणि नव्या युगाचा नवा संवाद सुरू होईल, माध्यम कदाचित वेगळं असू शकेल.

**डॉ. सुनीलकुमार लवटे**
'निशांकूर' राजीव गांधी रिंग रोड,
रणनवरे वसाहत, सुर्वे नगरजवळ,
कोल्हापूर ४१६ ००७
फोन नं. - ०२३१ - २३२४४०५/२६८०११२
drsklawate@gmail.com


# वि. स. खांडेकर यांची पुस्तके

**कादंबरी**

| | |
|---|---|
| ययाति | २०० |
| अमृतवेल | १०० |
| सुखाचा शोध | ९० |
| पहिले प्रेम | १०० |
| रिकामा देव्हारा | १०० |
| नवी स्त्री | १०० |
| सोनेरीस्वप्नं-भंगलेली | १०० |
| जळलेला मोहोर | १२० |
| पांढरे ढग | १५० |
| उल्का | १७० |
| दोन मने | १६० |
| हिरवा चाफा | १७० |
| दोन ध्रुव | २०० |
| क्रौंचवध | २०० |
| अश्रू | २०० |

**कथासंग्रह**

| | |
|---|---|
| सरत्या सरी | ५० |
| सांजवात | ६० |
| ढगाआडचे चांदणे | ६० |
| जीवनकला | ६० |
| फुले आणि काटे | ७० |
| समाधीवरली फुले | ७० |
| कालची स्वप्ने | ७० |
| चंदेरी स्वप्ने | ७० |
| उ:शाप | ७० |
| स्वप्न आणि सत्य | ७० |
| हस्ताचा पाऊस | ७० |
| पाकळ्या | ८० |
| अबोली | ८० |
| सूर्यकमळे (अनु.) | ८० |
| दवबिंदू | ८० |
| स्त्री आणि पुरुष | ८० |
| विद्युत प्रकाश | ९० |
| आजची स्वप्ने | ९० |
| अश्रू आणि हास्य | ९० |
| फुले आणि दगड | ९० |
| घरट्याबाहेर | ९० |
| पहिली लाट | ९० |
| विकसन | १०० |
| भाऊबीज | १२० |
| प्रीतीचा शोध | १५० |
| प्रसाद | १५० |
| मुरली | १८० |

**रूपककथासंग्रह**

| | |
|---|---|
| सोनेरी सावल्या (अनु.) | ४० |
| वेचलेली फुले (अनु.) | ५० |
| मृगजळातील कळ्या | ५० |
| कलिका | ५० |
| क्षितिजस्पर्श | ८० |
| सुवर्णकण (खलिल जिब्रान) (अनु.) | ८० |
| वनदेवता | १०० |

**लघुनिबंध संग्रह**

| | |
|---|---|
| अविनाश | ५० |
| तिसरा प्रहर | ६० |
| हिरवळ | ६० |
| अजून येतो वास फुलांना | ६० |
| चांदण्यात | ७० |
| रानफुले | ७० |
| मुखवटे | ७० |
| कल्पलता | ७० |
| धुके | ७० |
| सांजसावल्या | ८० |
| सायंकाल | ८० |
| वासंतिका | ९० |

**लेख/समीक्षा संग्रह**

| | |
|---|---|
| दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी | ७० |
| गोकर्णीची फुले | ८० |

**व्यक्ती आणि वाङ्मय**

| | |
|---|---|
| केशवसुत : काव्य आणि कला | १०० |

**आत्मचरित्र/आत्मकथन**

| | |
|---|---|
| सशाचे सिंहावलोकन | ८० |
| पहिली पावलं | ९० |
| एका पानाची कहाणी | २५० |

**मुलाखत संग्रह**

| | |
|---|---|
| ऋतू न्याहाळणारं पान (संपा.) | १३० |

**व्यक्तिचित्रे**

| | |
|---|---|
| ते दिवस, ती माणसे | ८० |

**संपादित साहित्य**

| | |
|---|---|
| आस्तिक | ९० |
| सुशीलेचा देव | १०० |

**निवडक कथा**

| | |
|---|---|
| गुदगुल्या | ५० |

**निवडक काव्य**

| | |
|---|---|
| काव्यज्योती | ५० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

# खांडेकरांच्या पुस्तकांचे हक्क

ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी श्री. वि. स. खांडेकर यांच्या पुस्तकांच्या हक्काबद्दल सुप्रीम कोर्टाने त्यांच्या वारसांच्या बाजूने दि. ९ सप्टेंबर २०१० रोजी निकाल दिला. सुप्रीम कोर्टाची ऑर्डर येथे देत आहोत.

IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL APPELLATE JURISDICTION

CIVIL APPEAL NOS. 7270-7271 OF 2005

DESHMUKH & CO. (PUBLISHERS) PVT. LTD. ... Appellant

VERSUS

AVINASH VISHNU KHANDEKAR & ORS. ... Respondents

## ORDER

After having spent nearly 45 minutes with Mr. M. S. Nargolkar senior advocate for the appellant, we are unable to see any substance in these appeals. There is nothing on record to show how the right under the agreement dated May 19, 1973 passed or to the present appellant from the late. Shri R. J. Deshmukh (who was originally the party to the agreemant)

Clause 10 of the agreement provided for the devolution of Shri R. J. Deshmukh's rights under the Agreement in the following manner.

"10. The rights acquired by Shri R. J. Deshmukh, owner of Deshmukh & Co. under this agreement shall come into effect after his death **as per his deed of disposition**". (emphasis supplied)

There is no testamentary disposition made by the late Shri R. J. Deshmukh on record to show any devolution of his right or interest under the agreement to his wife and through her to the present appellant.

These appeals are bound to fail on that score alone.

The Civil Appeals are dismissed.

NEW DELHI



................................
(AFTAB ALAM)

SEPTEMBER 09, 2010



..............................
(R. M. LODHA)




**गाणे हा एक प्रचंड मोठा महासागर आहे. त्यात आपली आपली होडी टाकून विहार करणारे कलावंत जगभर आहेत. कुणाची होडी मोठी असेल, कुणाची छोटी; पण प्रवासाचं ध्येय एकच. गाणं हे तत्त्वज्ञानच आहे. अध्यात्म आहे. गाणारे गाऊन गेल्यावरही त्यांच्या स्वरांनी आपल्याला काय वाटतं हे आपलं तत्त्वज्ञान आहे.**

डॉ. भवान महाजन

अगदी लहानपणी मी पाह्यलेला पहिला सिनेमा. रामराज्य. वर उघडे आभाळ दिसायचे अशा तट्ट्यांनी तयार केलेल्या,थेटरात या 'रामराज्य'ला आम्ही बऱ्याच वेळा गेलो. त्यातल्या गाण्याची पद्यावली माझी आत्या अन् बहीण यांना पाठ होती. दिवेलागणीनंतर दोघीजणी कंदिलाच्या मंद उजेडात झोपाळ्याच्या लयबद्ध कुरकुरच्या साथीने सगळी गाणी म्हणायच्या. माझ्यासाठी त्या गाण्यांची गायिका माझी बहीणच. 'सुवर्णरथ दिव्य तो रवीचा' या गाण्यापासून सुरुवात करीत अनेक गाणी ती म्हणे. 'चल उचल पाऊले आश्रम हरिणी जायाचे ग दुरी' हे उडत्या चालीचे गाणे झाल्यानंतर पुन्हा गंभीर रसाची गाणी येत. सिनेमाच्या अखेरीस सीतेला भूमी गिळून टाकते त्यावेळी आणि थोडे नंतर गेली 'गेली त्यागमयी' हे गाणे पाहणारे डोळे पुशीत बाहेर पडत. 'जिवाजिवाची दुर्दैवा रे कशी केली दैना, रानीवनी हिंडते राघवा मिथिलेची मैना' हे गाणे असेच व्याकूळ करी. आपल्या गळ्यातून रामराज्याच्या गाण्यांचे सर्व रंग समोर उभे करी.

लहानपणी गाण्याच्या त्या झोपाळ्यावर जो मी जाऊन बसलो तो झोका आजपर्यंत मला जोजवतो आहे.

तसे पैठणमध्ये गाण्याचे वातावरण होतेच. नाथ मंदिरात नाथांनी पूजलेल्या विजरी पांडुरंगाच्या मूर्तीसमोर कितीतरी नामवंत गायक हजेरी लावून जात. आजोबांच्या सोबतीनं त्यातले बरेच कार्यक्रम मी ऐकले. भजनं, कीर्तनं ऐकली. भानुदास एकनाथचा गजर, टाळमृदुंगाचे आवाज, गोदेच्या वाळवंटातून मध्यरात्रीनंतर येणारा एक 'रव', एकनाथषष्ठीच्या वेळी यात्रा मैदानांतून कानावर येणारी धोंडूकोंडूच्या तमाशाची ढोलकी हे सर्व कानात कोणताही प्रयत्न न करताच ठाण देऊन बसलेत हे आता उमगते.

या आवाजाच्या दुनियेत पूर आलेल्या गोदावरीच्या घाटावर आपटल्यानंतर मध्यरात्री स्पष्ट ऐकायला येणारा तो आवाजही खोलवर मिसळलेला आहेच.

पहिल्या-दुसऱ्या वर्गात असताना ४०-५० मुलांच्या तोंडून 'बे एके बे, बे दुणे चार' सुरू व्हायचे ते 'तीसेकतीस'पर्यंत एका लयीत चालायचे तोही एका कोरससारखा आवाज मनात

घुसला. थोड्या पुढल्या काळात भाजी मंडई भरे, तिथे रोज संध्याकाळी अगदी मोठ्या आवाजात कुणीतरी रेडिओ लावून ठेवी तो बस स्टँडवर बसल्याजागी छान ऐकायला येई. हा रेडिओ कधी दिसला नाही. तो कुणाचा आहे हे कळले नाही, पण ते स्टेशन लागायचे स्पष्ट! 'मैं तेरा चांद तू मेरी चांदनी', 'ये दुनिया है यहाँ दिलका लगाना सबको आता है' असली गाणी पाठ होऊन गेली होती. 'अब तेरे सिवा कौन मेरा कृष्ण कन्हैया, भगवान किनारे को लगा दे मेरी नय्या' या गाण्याच्या सुरांनी मनातल्या आर्त कोपऱ्यात कायम जागा मिळविली.

या सर्व गाण्यांबरोबरच गणेशोत्सवामध्ये भरणाऱ्या मेळ्यांतून गाणे कानावर पडे. सिनेमातल्या गाण्यांच्या चालीवर तयार केलेली मराठी गाणी भन्नाट चालत. 'कौसल्येचा राम बाई' या गाण्याच्या चालीवर दत्तू टाक यांनी आमच्या नवकिरण मेळ्यासाठी एक गाणे लिहिले होते. 'नगरवासीयांनो आमुचा घ्यावा रामराम, आमचा घ्यावा रामराम. कलाप्रवीण नसलो तरीही करू चला सेवा, नसो आम्ही कल्पक कोणी घेवूनी विसावा, करू आम्ही काम घ्यावा रामराम.' ट ला ट लावून तयार केलेले हे गाणे मुलांच्या एकत्र कोरसमध्ये प्रेक्षक श्रोत्यांची पकडे घेत असे. काही शब्दांची ओढाताणही आमच्या एकत्र आवाजात सुस्य होत असावी. नाहीतरी शब्द हे गाण्यात नंबर दोनच्या स्थानावर असे म्हटले जाते याचा प्रत्यय आम्ही तेव्हाच घेतला होता असे आज वाटते.

'नागिन' या सिनेमातल्या तत्कालीन अगदी गाजलेल्या 'सुनो रसिया, सुनो रसिया काहे को जलाये जिआ आजा' यासारख्या गाण्यांच्या चालीवर अंबादास तेली यांच्या भजनी मंडळात 'भोळ्या शंकरा, भोळ्या शंकरा, नवसाला पाव माझ्या आता' हे दर शनिवारी मारुतीच्या मंदिरात म्हणत. त्यांचा आवाज अगदी गोड. त्यांनी स्वत: रचलेल्या या गाण्यात खंजिरीच्या साथीने गाणारे त्यांचे मंडळ असं काही दंग होऊन जाई की तेल संपत आलेल्या दिव्याच्या उजेडात साक्षात हनुमंतसुद्धा ते शंकरस्तवन ऐकत असतील असं वाटे. उन्हाळ्यात गच्चीवर आम्ही झोपायचो, तिथून ह्या मंदिरातला अगदी फिकट पिवळा उजेड तेवढा दिसायचा! रात्रीच्या नीरव शांततेत या भजनी मंडळाची भजने ऐकत आम्ही झोपेच्या आधीन व्हायचो.

भाजी मंडईतला तो रेडिओ सोडला तर गावात दोन-तीन ठिकाणी रेडिओ होते. हे सर्व एव्हरेडीच्या मोठ्या बॅटरीवर चालत. पण आमच्या आवडीची गाणी ऐकायला म्हणून कुणाकडे जाऊन बसायची बिशाद नव्हती. एखादे वेळेसच एखाद्या भल्या माणसाने मोठ्या आवाजात रेडिओ लावलेला असेल तर गल्ल्यातून हिंडताना, खेळताना गाणं कानावर पडायचं. गीत रामायणाची काही गाणी कशीबशी अर्धवट कानावर पडायची. बाजारातल्या दोन-तीन हॉटेलातून रेडिओ असायचा, पण हॉटेल आमच्यासाठी निषिद्ध!

पुढं काही दिवसांनी आमच्या हेअर कटिंग सलूनचे मालक बाबूसिंग व चुन्नीलाल यांनी छोटा फिलिप्सचा रेडिओ आणला.

भिंतीला आलेले पोपडे दिसू नयेत म्हणून तशाच भिंतीवर चुना देऊन सिनेमाची मोठाली पोस्टर्स त्यावर व्यवस्थित चिकटवून आणि रेडिओची भर करून त्यांनी दुकान मस्त केलं होतं. साकी, नगीना, आवारा, बावरे नैन यासारख्या सिनेमाच्या जाहिराती कटिंगसाठी नंबर लावून बसलो की दिसत रहायच्या. त्यांच्याकडे कटिंगसाठी येणारे ड्रायव्हर, कंडक्टर, मालट्रकचे क्लिनर बोलायचे तेही सिनेमाबद्दल. 'कल के खेल में मजा नही आया यार', 'अरे तुम जुगनू देखोगे तर रोकर वापस आवोगे', 'गाने तो है एक गाव की कहानी में.' भिंतीवरची पोस्टर्स, त्यात दिसणाऱ्या सुरैय्या, बीना राय. मधुबाला यांना घेऊन शबिस्तानच्या पोस्टरमध्ये घोड्यावर स्वार झालेला शाम पळून जात असेल का? असा प्रश्न पडायचा. अगदी अचानक जुगनू पहायला मिळाला. त्यात त्याचे लग्न त्याला हवे तिथे होऊ देत नाहीत. तेव्हा नोटांचा वडिलांवर वर्षाव करीत पहाडाच्या एका शिखरावरून उडी घेऊन तो जीव देतो असे काहीतरी कथानक त्यात होते. सिनेमाला आलेली सगळी माणसं सुन्न होऊन सुख पावत! फिल्म ठीक है लेकिन गाने खास नही अशी त्यावरची समीक्षा ह्या कटिंग सलूनमध्येच ऐकली.

एक गाणं लहानपणी खूप काळजात घुसलं. 'द्या हो आंधळ्याला पैस कुणी द्या.' हे गणेशोत्सवातल्या मेळ्यात चाललं. एकाच चालीचं ते गाणं दोन मेळ्यांत होतं. पुढे अनेक वर्षांनी 'चौदहवी का चांद' सिनेमा एकाच वेळी दोन थेटरात असा योग होता. त्या गाण्याची चाल 'आह'मधल्या 'आजारे अब मेरा दिल पुकारे' या बेहतरीन गाण्याची होती. हे खूप पुढे कळलं. औरंगाबादेत येऊन तो सिनेमा पाहून ते गाणं खूप वेळेस ऐकून किंवा त्याची रेकॉर्ड मिळवून फोनोवर ती ऐकून त्या चालीवर मराठी शब्द पेरण्याची कला काही भाग्यवान मडळींना जमलेली होती हेच खरे!

एका मराठी गाण्याने अशीच सगळ्यांची पकड तेव्हा घेतली होती. ते म्हणजे 'रिमझिम पाऊस पडे सारखा, यमुनेलाही पूर चढे, पाणीच पाणी चहुकडे ग बाई गेला मोहन कुणीकडे!' जानकी अय्यर यांना गणेशोत्सवात बोलावून प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून हे गाणे ऐकण्याची संधी हा आमच्या कुंडलीतला मोठा योग होता.

'जा घेऊन संदेश पाखरा' हे गाणे औरंगाबाद रेडिओ स्टेशनवरून गाणारे विश्वनाथ पोहेकर आपल्या गल्लीत राहतात ह्याचं मोठं अप्रूप वाटायचं.

असं सगळं आजूबाजूला घडत होतं, तरीही गाण्याच्या बाबतीत माझं मन अक्कापाशीच येऊन थांबायचं. नगरच्या किल्ल्याचे

आत्मवृत्त सांगणारे 'बेइमान झालो पुरा पुरा' अक्काच्या गळ्यातून उतरलेलं ऐकणं ही मेजवानी होती. विनोबाजींच्या समोर आमच्या घराच्या बैठकीत 'ती पहा ती पहा बापुजींची प्राणज्योती' अक्का म्हणाली तेव्हा अक्काच्या आवाजानं विनोबाजी गहिवरलेले पाहिले. ही दोन्ही गाणी गजाननराव वाटवे यांची; पण माझ्याकरिता अक्काची!

गावात शास्त्रीय संगीताची चांगली जाणकार मंडळी होती. त्यात एकनाथांची वंशस्थ मंडळी. भागवत बुवा हे गाणे शिकवीत. त्यांच्याकडे सकाळी ४ वाजता गाणे शिकायला जाणाऱ्यांमध्ये माझे वडील एक होते. आणि नारायणराव चव्हाण तसेच नंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषविलेले शंकरराव चव्हाण ही मंडळीही त्यात होती. 'एकच प्याला' सारखी नाट्यकृती तिथल्या तेव्हाच्या हौशी कलाकारांनी सादर केलेली होती.

कॉलेजात प्रवेश केल्यावर गाण्याची भूक सिनेमामुळे भागत राहिली आणि वाढतच राहिली. तेव्हाचे सिनेमे असे असायचे की सिनेमाची कथा कशीही असो, दोन-तीन तरी श्रवणीय गाणी त्यात असायचीच. त्यामुळे उरलेल्या सिनेमांत आम्ही काहीतरी चांगले शोधून एंजॉय करायचो. अशा सिनेमातल्या गाण्यांचा मुकुटमणी शोभेल असा होता 'लुटेरा'. मग त्याच ओळीत 'आया तुफान', 'मि. एक्स इन बॉम्बे'. सारंगा नावाच्या एका सिनेमात तर एकवीस गाणी होती. हा दिवाना हूँ मैं व सारंगा तेरीयाद में ही मुकेशची दोन गाणी, 'आप के गीत' पासून बिनाकापर्यंत गाजत होती.

या काळात मराठी सिनेमापेक्षा भावगीते सरस होती असे वाटते. 'विसरशील खास मला, विसरूनी जारे विसरून जा...' ही आशाताईंची दोन गाणी तर कायमची मनात रुतून बसली. ती गाणी तेव्हापासूनच रेडिओवरूनच यायची. क्वचित आपण दुसऱ्या कुणाकडे गेलो तर त्यांच्या रेडिओवर ती कानावर पडली की मन तिकडे ओढलं जायचं. संभाषणात रस वाटायचा नाही. नंतर असं झाल्याबद्दल ओशाळून गेल्यासारखंही व्हायचं.

या सुमारासच ऐकलेले सुमन कल्याणपूर यांचे 'दिन रात तुला मी किती स्मरू, जन हसती मला मी काय करू?' करुणार्त सुरांचं ते गाणं आजही मनात बसलंय. 'दूर आर्त सांग कुणी, छेडिली असावरी' किंवा 'कुणाला प्रेम मागावे जिवाचे दुःख सांगावे' ही गाणी त्याच जातीतली. पण माझ्याकरिता बहुतांश गाणी अक्काच्या गळ्यांतून माझ्या स्मरणपटलावर कोरली गेली. तिच्या तोंडून तर मुरारबाजी, खंडोबल्लाळ यांचे पोवाडेसुद्धा उत्कृष्ट होऊन बाहेर पडत. मुरारबाजीच्या पोवाड्यात तर मुरारबाजीला त्याची पत्नी ओवाळते तेव्हाच्या ओळी 'बोलली असे ती अबला, डोळ्यांतून अश्रू ढळला, ओवाळूनी मग नाथाला जाहली धन्य ते वेळा जी' ऐकल्यावर डोळे पाण्याने भरून न येणे शक्यच नाही. आपण लिहितो त्यापेक्षाही वाचकांना चालच ऐकवता आली तर ती खरी मजा असं वाटत राहातं.

बरोबरीच्या मित्रांमध्ये असे काहीजण होते की ते शास्त्रीय गाणेही बऱ्यापैकी जाणीत होते. संगीताच्या एकदोन परीक्षाही पास होते. मेडिकलचे शिक्षण घेणाऱ्यांमध्ये असे पुष्कळजण होते हे तेव्हाच्या सांस्कृतिक जीवनाचे चित्र म्हणायला हवे. अशा मित्रांच्या मी 'नादी' लागलो, पण त्यामुळे जीवन समृद्ध झाले.

एका अशा मित्राला हार्मोनियमही वाजवता येई. त्याच्याबरोबर अनेकदा बाळकृष्ण महाराजांच्या मंदिरात गुरुवारी भजनासाठी जायचो. भजनी मंडळात भजने म्हणणारी ठराविक मंडळी त्यांचे त्यांचे पेट भजन अगदी हातखंडा पद्धतीने गात. त्यांना इतरांच्या टाळ्यांची साथ जीव तोडून व्हायची. एकमेकांची गाणी अशी जीवतोड साथीनं गाणारी माणसं जागण्याच्या इतर क्षेत्रांत हे प्रेम विसरून का बरं जात असतील हे कोडं मला नेहमीच पडलेलं आहे, पण अशा दुःखावरचा इलाजही गाणं हाच आहे. अशा मित्रांमुळे अमुक एका गाण्यांत अमुक रागाचा आधार आहे हे कळल्यावर अगदी धक्का बसायचा! गाणं हे महासागरासारखं असून आपण साधी गाणी म्हणून जी ऐकतो त्यातली बरीच अशा रागावर आधारित आहेत हे कळल्यामुळे शास्त्रीय संगीताकडे मन ओढले जाऊ लागले. सिनेमातली गाणी भावगीते, पोवाडे हे सर्व रागदारी संगीताच्या आधारावर असतात आणि त्याच्या लोकप्रियते मागे त्या त्या रागाचं मानवी मनाला होणारे 'अपील' ही एक मोठी गोष्ट आहे अशी भूमिका तयार होऊ लागली. भैरवी, मालकंस, दरबारी, सारंग, देस हे सिनेमातल्या गाण्यांतून भरपूर वापरलेले राग आहेत.

'मन तरपत हरी दर्शन को आज', 'अखियन संग अखिया लागे आज' हे मालकंस वंशावळीतले आहेत.

'दो हंसों का जोडा', 'दिया ना बुझे रे आज हमारा', 'तुम्हे और क्या दूं मै दिलके सिवा' ही सर्वसामान्यांच्या हृदयाला भिडणारी गाणी ठरली, त्यामध्ये 'भैरवी' या रागाचे मोठेपण आहे. अर्थात त्यावर चाल तयार करणे आणि त्यासाठी सुयोग्य, समर्पक शब्द मिळणे हेही तेवढंच मोठं काम आहे ही जाणीव आहे. कधी कधी काही गाणी एखाद्या रागाचे चित्र उभी करण्यात पूर्ण यशस्वी ठरतात. राग हा प्रकाशमान सूर्य असेल तर गाणी ही त्याच्या चिमुकल्या प्रकाश किरणासारखी! कमी प्रखर पण आल्हाददायक आणि प्रकाशाचे इतर सर्व गुण असलेली!

गाणी आणि त्यांचे मूळ 'राग' शोधण्याचा एक चाळा मनात सुरू झाला. मनातल्या मनात गाणी घोळू लागली अन् स्वतःच्या बुद्धीनं अन अंदाजानं मी हे राग जाणून घेऊ लागलो. जाणकार मित्रांकडून ते चूक-बरोबर ठरवू लागलो. महत्त्वाचे हे की या प्रक्रियेने मला विलक्षण आनंद होऊ लागला.

सिनेमाची गाणी तर ऐकत होतोच; मग पार्श्वसंगीत लक्ष देऊन ऐकू लागलो. त्यामध्ये वाजणारे व्हायोलिन, सतार-सारंगीचे

पीसेस सिनेमातला तो तो प्रसंग कसा परिपूर्ण करतात हे समजून घेऊ लागलो. 'मोगले आझम'मध्ये सलीम महालातल्या कारंजापासून निघणाऱ्या पाण्यावर कमळामधून प्रेम पत्र पाठवतो ही कल्पना अगदी रोमँटिक. त्या कमळाचा प्रवास दाखविताना नौशाद यांनी उस्ताद हलीम जाफरखान यांच्या सतारीचा उपयोग केला आहे. दृश्याइतकाच तोही चांगला आहे. पुढे मला हेही कळत गेले की, मोठे मोठे शास्त्रीय संगीतकार सिनेमासाठी भरपूर गायन वादन करतात. पं. रामनारायण यांच्या सारंगीने कित्येक गाणी गहिरी केलेली आहेत. 'जीवन ज्योत जले' हे गृहस्थीमधील आशा भोसलेंचे गाणे ते मधुबन मे राधिका या गाण्यात पुढे आलेला सतारीचा तुकडा जाफरखान यांचा आहे. 'बसंतबहार'मध्ये तर शंकर जयकिशन यांनी पं. भीमसेन जोशी व मन्ना डे यांच्या आवाजात गाणे पेश केलंय. ओ. पी. नय्यर यांच्याकडे पं. शिवकुमार शर्मा, पं. हरिप्रसाद चौरासिया यांची हजेरी लागून गेलेली आहेच.

१९६२पासून शास्त्रीय गाणे मन:पूर्वक ऐकायला सुरुवात केली. आकाशवाणीवरचे संगीत सभांचे कार्यकम रात्री व्हायचे. ते ऐकण्याने गोडी वाढली. तिथून पुढे मनामध्ये गाण्याच्या वाटा वाढल्या. कोणतीही वाट निवडून ऐका, अगदी भन्नाट सोबतीला कुणी असेल तर वाटचाल चांगलीच; पण कुणी नसेल तर वाटच सोबत करते.

१९६२ मध्येच केव्हातरी औरंगाबादेत भीमसेन जोशी यांचा कार्यक्रम होता. स्वारी रागावलेली दिसली.

कार्यक्रम सुरू झाला. समोर बसलेल्या चांगल्याचांगल्या जाणकारांना राग ओळखता येईना. मग मध्येच गाणे थांबवून पंडितजी म्हणाले, 'हा राग नटसूर्यकंस! वर्तमानपत्रात गाण्याचं समीक्षण लिहिणारे कुणी इथे आहेत का? परवाच माझ्यावर टीका करताना त्यांनी लिहिले की पंडितजी सारखे सारखे तेच राग म्हणतात. सतत अगदी नवीन कुठून कोण आणू शकतो? दुसरं असं की ज्यांच्यासाठी गातो त्यांना ते रुचले पाहिजे आणि नवीन म्हणजेच चांगले असेही नसते.' मध्यंतरापर्यंत गाणे रंगले नव्हते; पण मध्यंतरानंतर पंडितजी तब्येतीनं गायले. अन् मैफल 'जोगियान' संपली. 'पिया मिलन की आस'. ही चीज पुढेही त्यांच्याकडून ऐकली. तिच्याबद्दलचे किस्सेही ऐकले. पण त्याविशी त्या जोगियाने रडवले. सगळे सभागृह स्तब्ध. त्या आर्तस्वरांनी सगळे श्रोते अंतर्मुख झाले.

कार्यक्रम संपल्यावर अवाक्षर न बोलता सगळा श्रोतृ वर्ग चालत होता. सायकल हातात ठेवून मी इतरांबरोबर चालत होतो. सायकलवर बसण्याच्या आवाजाने ही स्तब्धता भंग करू नये याची खबरदारी घेत मी चालतच राहिलो.

इंग्लंडमध्ये एका हुरहूरलेल्या संध्याकाळी लिव्हरपूलहून दुसऱ्या एका मित्राकडे भर पावसात छोट्या ऑस्टिन गाडीतून तीन साडेतीन तास ड्राइव्ह करून आम्ही पोहोचलो. आधीच्या भेटीच्या गप्पा संपल्यावर सगळेजण पत्त्यांचा डाव मांडून बसले. मी त्यातला अडाणी असल्याने एकटाच बसलो होतो. मनातला एकटेपणा वाढला.

त्याच्या फ्लॅटमध्येच वरच्या खोलीत गेलो. तिथे भारतातूनच त्याने तिकडे नेलेला रेकॉर्ड प्लेअर होता. अन शेजारीच काही लाँगप्ले रेकॉर्ड होत्या.

कुमार गंधर्वांची एक रेकॉर्ड सुरू केली. रात्रीचे दोन वाजलेले असतील. एका बाजूने सहेली तोडी अन् दुसरी बाजू बिहाद भैरव अशी ती रेकॉर्ड होती. क्षणातच कुमारांच्या आवाजाने पकड घेतली. गाण्यातले एक मोठे तीर्थस्थळ आहे हे माहीत होते अन् औरंगाबादच्या तीन दिवसांच्या एका संगीत संमेलनात त्यांचे गायन ऐकलं होतं, पण इंग्लंडमध्ये मनाच्या त्या वेगळ्या अवस्थेत कुमारांच्या आवाजाने जबरदस्त पकड घेतली. दोन्हीहीमधून कुमारांच्या स्वरांचे लगाव, सनईसारखी मिंड जाणवणारे सुरांचे आरोह अवरोह आणि काळजाचा ठाव घेणारी आर्तता ही त्यांच्या श्रेष्ठत्वाची खूण होती. ती सहेली तोडी अन् बिहाद भैरव हे म्हणजे एखाद्या शिवभक्तानं शंकराच्या पिंडीवर अभिषेक पात्राची धार लावून बसावं आणि मनानं व्यक्त विरक्त व्हावं अशी मनाची अवस्था करून टाकणारी.

१९६२-६३मध्ये पं. जसराज (वय ८) त्यांचे वडील बंधू पं. मणिरामजी यांच्यासह पैठणच्या एकनाथ मंदिरात हजेरी लावण्यासाठी आले होते. जसराजजींना तक्क्यावर बसविल्यानंतर त्यांचे हात तबल्यापर्यंत पोचत. मणिराजजी गात.

गाण्याची आवड असलेल्या अन् गाणे थोडेसे शिकलेल्या माझ्या वडिलांनी या जोडीला कार्यक्रमानंतर घरी आणून तीन दिवस ठेवले आणि ओळखीच्या, प्रेमाच्या व नात्याच्या एका घरी चिठ्ठी देऊन बीडला पाठविले. ते घर देशपांड्यांचे होते. तिथे ही जोडी काही महिने राहिली. त्या घरातल्या गोपाळशी जसराजांशी समवयस्कतेतून व समस्वभावातून मैत्री जडली. पुढे बीड सोडून ही भावंडे नांदेड, हैद्राबाद वगैर ठिकाणी गेली आणि आठवणीतूनही गेली.

या गोपाळने १९६२ साली मुंबई केंद्रावरून एक गाणे ऐकले. त्या गायकाचे नाव होते पं. जसराज! आठवणीतला जसराज हाच का असे वाटून पत्रव्यवहार केला. 'होय. तुमच्याकडे राह्यलो होतो तो जसराज मीच आहे' असे पत्राचे उत्तर आले. झाले. आठवणींचे तंबोरे जुळले आणि बीडला त्यांचे गाणे ठरले.

दरम्यानच्या काळात गोपाळराव देशपांडे हे पैठणकरांचे म्हणजे आमच्या घराचे जावई झालेले होते अन् पदवीधर होऊनही नोकरी न करता कापड दुकान चालवीत होते. ते नावाजलेले दुकान होते. दुकान अतिशय सुबक. मोगऱ्याच्या फुलासारखे व्यक्तिमत्त्व असलेला हा माणूस संगीतवेडा, पुष्पवेडा, रंगवेडा

होता. फक्त फुलझाडांच्या बिया आणण्यासाठी बीडहून पुण्याला जाणारा हा माणूस, कापडखरेदीसाठी बाहेर जात असे, पण रंगसंगती, गाणे यात त्याचा जीव होता. लहानपणी बरोबरच्या नात्याने एका घरात खेळल्यामुळे जसराज हा जीवश्च कंठश्च मित्र नव्याने मिळाला. गोपाळरावांचे दोन घनिष्ठ मित्र डॉ. पेंढरकर आणि राजाभाऊ अमलेकर हे होते. पेंढरकर हे एक उत्कृष्ट डॉक्टर. त्यांनाही फुलझाडं आणि गाण्याची आवड. या दोहोंमध्ये राजाभाऊ असलेकर हा एक विनोदाचा जिवंत झरा. पण या त्रिमूर्तीचे पंचप्राण होते गाण्यात. तत्कालीन बीडमध्ये यांच्या प्रयत्नाने संगीत मंडळ स्थापन झाले होते आणि पदरमोड करून घरच्या ज्येष्ठांचा राग सहन करून गाण्याची आवड त्यांनी जोपासली होती. सवाई गंधर्व महोत्सवाला हे तिघे बीडहून अगदी नियमितपणे वारकऱ्याप्रमाणे जात. पुढे पुढे या त्रिकुटात औरंगाबादहून मीही सामील होऊ लागलो. त्या तिघांसमवेत बसल्यामुळे मला गाण्याच्या अफाट विस्ताराचे थोडे थोडे दर्शन होत होते.

गोपाळरावांच्या एका पोस्टकार्डावर उस्ताद बिस्मिल्ला खान यांनी बीडचा कार्यक्रम घेतला. अन या पत्रामुळे इथे यावेच लागले असे त्यांनी जाहीरही केले.

कार्यक्रमात खासाहेबांनी वाजविलेला मालकंस हा ऐकलेल्या मालकंसच्या यादीत उच्चस्थानी जाऊन बसलेला आहे. पुढे एका सवाई गंधर्व महोत्सवात त्यांनी एखाद्या रत्नहारासारखा मालकंस पेश केला. दहा हजारांचा समुदाय त्यांना दाद देत होता. त्यामध्ये माझीही एक दाद होती. ही आठवण मोठी आहे.

बीडच्या या म्युझिक सर्कलने पं. भीमसेन जोशी, पं. वसंतराव देशपांडे, सौ. मालिनी राजूरकर यासारख्यांचे कार्यक्रम घडवून आणले. बहुतेक सर्व कार्यक्रमांना मी औरंगाबादहून गेलो होतो. मालिनी राजूरकर गोपाळरावांच्या घरीच उतरल्या होत्या. कार्यक्रमाला जाण्यापूर्वी घरकामात काही मदत करू का असे त्यांनी अक्काला विचारले होते. ही त्यांच्या मोठ्या मनाची एक खूण. जवाहर भवनात झालेल्या त्यांच्या कार्यक्रमाची सांगता त्यांनी 'तम निशेचा सरला' या भैरवीने केली होती. खरोखरीच मनातला अंधार आणि मळभ दूर करणारे विलक्षण सूर आणि मालिनीताईंचे शालीन व्यक्तिमत्त्व ही कंठ संगीताला मिळालेली देणगीच आहे!

अशाच एका कार्यक्रमात त्याकाळी तान के कप्तान म्हणून ज्यांची ख्याती होती अशा नसीर अहमद यांचे गाणे झाले होते. कार्यक्रम उत्कृष्ट झाला होता, पण उल्लेखनीय आणि अजूनही स्मरणपटलावर कायम अशी चीज म्हणजे त्यांचा 'किरवानी'. 'बहुत दिन बीते पिया नही आये' पुढल्या काही ओळींचा अर्थ असा होता की 'जाताना चार दिवस येतो असे म्हणून गेले होते पण त्यांना काय माहीत की हे जग दोनच दिवसांचे आहे म्हणून.'

बीडमध्ये पं. जसराजजींचे खूप कार्यक्रम झाले. कधी जाहीर मोठ्या सभागृहात, तर काही गोपाळरावांच्या जुन्या प्रासादतुल्य वाड्यात! मधोमध अंगणाची सोडलेली जागा आणि भोवताली माडी. शेणानं स्वच्छ सारवलेल्या जमिनीवर अंथरलेली बिछायत. लाल विटांच्या या वाड्याचा दगडी जिना आणि हा चढून येणारी बीडची अन् आसपासची खास मंडळी. जिल्हाधिकारी वगैरे गाण्याचे रसिक गाणे ऐकत आहेत हे दृश्य मनात कोरले गेलेले! 'मान जा मरे मोरे पिया'ही दरबारी रागातील बंदिश पंडितजी या माडीत पहिल्यांदा गायले. इथेच त्यांनी गायलेले ललत, मल्हारचे प्रकार, नायकी कानडा हे राग रसिक बीडकरांनी ऐकले. गोपाळरावांना श्रद्धांजली वाहणाऱ्या एका कार्यक्रमात या माडीने पंडितजींचा नायकी कानडा इथल्या प्रत्येक खांडांत आणि दांड्यात सामावून घेतलेला आहे. एखाद्या रसिकाला त्यातून 'खेलोना हमसंग होली' ही बंदिश आजही ऐकायला मिळेल. या माडीत पंडितजींच्या बरोबर आलेले अप्पा जळगावकर, उस्ताद निजामुद्दीन यांच्या गप्पाही गाण्याइतक्या रंगल्या होत्या.

या वाड्यातल्या मोठ्या चौफुल्यावर बसून एका दुपारी जसराजजी त्यांच्या तब्बेतीनं 'तेरे बिन सावन कैसे बीता' हे लताबाईंचे गाणे सहज म्हणून गायले होते. डॉ. पेंढरकर, अमलेकर आणि गोपाळराव हे पंडितजी गेल्यावर त्यांच्या गाण्यासकट इतर गप्पांची आठवण काढत बसलेले मी बघितले आहेत. माहेर सोडून सासरी आलेल्या स्त्रीसारखी एक हुरहूर त्यांना कित्येक दिवस वाटत राहायची. डॉक्टर गाणे शिकलेले होते. त्यामुळे त्यांना गाणे अधिक समजायचे!

बीड बस स्टँडजवळच्या त्यांच्या घरात बाहेर गुलाब फुलायचे अन् आत गाणे. मी बीडला एकदा गेलो असताना अक्काकडे जाण्यापूर्वी त्यांच्या घरी गेलो होतो तेव्हा त्यांनी नव्याने आणलेली लक्ष्मीशंकर अन निर्मलादेवी यांची जुगलबंदीची मोठी रेकॉर्ड ऐकविली. पाणावलेल्या डोळ्यांनी पण समाधानाने मगच मी अक्काकडे गेलो.

असे हे डॉ. पेंढरकर मधुमेहाने ग्रस्त झाल्यावर पुण्यात राहायला गेले. तेव्हा रोटरी क्लबतर्फे पं. जसराजांचा एक कार्यक्रम टिळक स्मारकमध्ये होता, दोन्ही पाय भप्प सुजलेले असताना ते श्रोत्यात जाऊन बसले आणि पंडितजींना 'हंसध्वनी' गायला कुणी सांगेल का अशी विचारणा माझ्याजवळ त्यांनी केली. पंडितजींना 'फर्माईश' केलेली आवडत नाही हे माहीत असूनही कोणत्यातरी प्रकारे मी हे बोललो. त्यावर पंडितजी काही म्हणाले नाहीत पण कार्यक्रमात हंसध्वनी गायले. त्यातल्या द्रुतमध्ये गायलेल्या 'राम सुमीर राम' ऐकताना डॉक्टरांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहात होत्या. कित्येकदा सत्य हे अगदी अंशाने असते अन् त्यावर खोटेपणाचा मुलामा चढवला जातो. डॉ. पेंढरकरांनी आपल्या अखेरच्या क्षणी 'जसराजजी ऐकवा' असे मुलाला सांगितले आणि बिलासखानी तोडीच्या त्या स्वरामध्ये डॉक्टर विलीन झाले ही एक सत्य घटना!

गोपाळराव अन् डॉक्टर हे एकमेकांकडील गुलाबाच्या कुंड्या दाखविण्यात अगदी रमून जात. आपल्याजवळच्या ठेवणीतल्या पैठण्या शालू स्त्रियांनी आपआपसात दाखवाव्यात तसं त्यांना होऊन जायचं. कापसाच्या बोंडाला फुलोरा आला तेव्हा रंगाचा नजारा अमलेकरांना दाखविण्यासाठी बसने गेलेले गोपाळराव मेंदूतील रक्तस्त्रावाने बेशुद्ध झाले ते कायमचे. बीडमधला रंगात आलेला एक ख्याल मध्येच बंद पडला.

पंडित जसराज यांच्या गाण्याचे इंद्रधनुष्य सतत बहरतच गेले, पण त्यांची बीड आणि पैठणची माया कधी कमी झाली नाही. १९७२ साली ३१ ऑगस्टला मी पंडितजींना घेऊन पैठणला गेलो. आदले दिवशीच औरंगाबादेत 'रसिक'तर्फे त्यांचा कार्यक्रम झाला होता. पैठणला आमच्या राहत्या घरात ते गायले. त्यासाठी आवश्यक ती सर्व तयारी व खटपट माझ्या मोठ्या भावाने केली. मोठ्या मोठ्या फळ्या टाकून अंगणाचा खड्डा बुजविण्यात आला होता. माझे वडील तात्यासाहेब गाण्याचे चांगले जाणकार! त्यांच्यासमोर गाताना पंडितजींही खूष होते.

इथल्या गाण्याची सुरुवात पंडितजींनी 'बिहाग' रागाने केली होती. पुढे त्यांनीच ही माहिती दिली की 'देखो मोही रंग मे भीगोये डाली' ही बंदिश आमच्या पैठणच्या घराने प्रथम ऐकली. ते रंग अजून विटलेले नाहीत. त्यांचे गाणे अनेक वेळेस ऐकण्याचा योग आला. त्यांच्या वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे बंदिशीचे बोल फार कसोशीने स्पष्टपणाने रसिकांपर्यंत पोचविण्याची त्यांची हातोटी. औरंगाबादेत नरहर कुरुंदकर अगदी संगीत संमेलनाचे उद्‌घाटन प्रसंगी हृदयविकाराने अचानक गेले. उर्वरित संमेलन त्यांना श्रद्धांजलीपर झाले. त्यावेळी सरस्वती भुवनात जसराज यांनी गायलेला दरबारी कानडा अविस्मरणीय होता. तशीच जोग मिखावन आये ही भैरवीही.

पैठणच्या वैजनाथ संगीत संमेलनासाठी १९८१ मध्ये फेब्रुवारी २७, २८ व मार्च १ या दिवशी पं. हरिप्रसाद चौरासिया, पं. जसराज, उस्ताद झाकीर हुसेन, सौ. पद्मा तळवलकर, श्री. सुरेश तळवलकर, श्री. ब्रिजनारायण (सरोद) आणि पं. जितेंद्र अभिषेकी हे कलाकार आले होते. यावर कित्येकांचा विश्वास बसणार नाही. या संमेलनाचा आर्थिक भार माझ्या शालेय जीवनातील एक शिक्षक आणि संत एकनाथांचे वंशस्थ श्री. मधुबुवा गोसावी यांनी सोसला होता. वर लागणाऱ्या व्यवस्थापनात मी होतो.

पुढे 'इंडिया टुडे'ला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये उ. झाकीर हुसेन यांनी आपल्या लक्षात राहिलेल्या कार्यक्रमांत पैठणच्या या कार्यक्रमाचा उल्लेख केला होता. हरीजी आणि झाकीर यांनी जोग व नंतरची पहाडी ठुमरी अशी काही पेश केली होती की तेव्हाची ७००-८०० लोकांची गर्दी त्या वादनात बुडून गेली होती. श्रोत्यांचे असे तल्लीन होणेच झाकीर यांना भावले होते.

दुसऱ्या दिवशी ब्रिजनारायण यांचे सरोदवादन आधी झाले आणि नंतर सौ. पद्मा तळवलकरांचा भूप. तो फारच लक्षणीय होता. या कार्यक्रमात पं. जसराज यांनी सादर केलेला एका तासाचा मालकंस हा त्यांनी गायलेल्या मालकंसामध्ये वरच्या तोडीचा होता असे आजही ते म्हणतात. साथीला उस्ताद झाकीर अन् हार्मोनियमचे जादूगार श्री. अप्पा जळगावकर. 'रात्र थंडीची' होती पण गाण्याची ऊब सर्वांना पोचत होती. रांगोळीच्या रेषांना धक्का न लागू देता रांगोळीत रंग भरण्याचे कसब अप्पांना होते. मालकंसमधील तराण्याने मैफलीचा आनंद शिगेला पोहोचला. मग सकलबन गगन पवन चलत ही मिंडप्रधान खमाज बहारची चीज रंग भरून गेली. येरी मा ऽ ऽ वरची समेवर येतानाची मिंड तर विलक्षण विलोभनीय असते. या चीजेमध्ये कोकिळेच्या स्वराचा आभास निर्माण करण्याची जसराजजींची खासियत. हिऱ्याला कोंदण मिळण्यासारखी असते ही बंदिश आणि त्यांची व श्रोत्यांची 'लाडकी माता कालिका' ही अडाण्यातली चीज ह्या त्यांचे गाणे कळसाला नेई. काही महिन्यांपूर्वीच त्यांची माता कलिका हैद्राबादमध्ये ते करीत असतात त्या वडिलांच्या पुण्यतिथीच्या संमेलनात ऐकली. माँ या एकाक्षरी शब्दाची व्याप्ती, तिचे मोठेपण जसराज एवढ्या विविध प्रकारांनी गाऊन दाखवितात की स्वरात गुंतलेल्या त्यांच्या चेहऱ्यावर त्यांना मातेचे दर्शन होत असल्यासारखे जाणवते. तोंडाने वाहवाची दाद देणारे श्रोते पुढे डोळ्यांवाटे अश्रुधारांनीच दाद देत राहतात. त्यावर उत्तररात्रीचा भटियार अन मग जीवघेणी भैरवी यांनी पहिल्या दिवसाची सांगता झाली होती. एवढे मोठे कलाकार सकाळी विमानाने औरंगाबादला आले. तेव्हाच्या जायकवाडी धरणावरचे एक कार्यकारी अभियंता यांनी आपल्या अधिकारातील उत्कृष्ट वाहन दिले होते. त्यामुळे थेट विमानतळ ते जायकवाडी रेस्ट हाऊस हे कलाकार आले. या संमेलनाची सांगता पं. जितेंद्र अभिषेकींनी केली होती. त्यांनी अबीर गुलाल उधळीत रंग हा चोखोबांचा अभंग असा काही गायला की तो एक 'अभंग' आठवण होऊन बसला. पैठण नगरी, गोदावरीचा किनारा, माडाच्या बाजूलाच संत एकनाथांचे समाधी मंदीर आणि 'उंबरठ्याशी कैसे शिवू आम्ही जातीहीन' असे आक्रोशाने विचारणारा चोखा डोळ्यांसमोर उभा राहिला... समतेच्या तत्त्वाची एवढी चांगली मांडणी आणि पेशकारी अभिषेकीच करू जाणोत! शब्दावर विशिष्ट आघात करण्याची त्यांची लकब अजोडच! अबीर गुलालानंतर वातावरणात उडालेला हा गुलाल खाली बसविण्यासाठी 'सर्वात्मका सर्वेश्वराची' शिंपण केली गेली. चोखोबांनी मनात उठविलेला वणवा शांत करण्यासाठी असे आवश्यक होते.

पैठणसारख्या लहान गावात १९८१मध्ये सात-आठशे लोकांनी गाणे ऐकावे आणि तेही मनापासून.ही गोष्ट पुन्हा हेच सांगते की तेथे पाहिजे जातीचे (कलाकार) म्हणजे शास्त्रीय संगीताचे अवघडपण सुलभ होऊन जाते.

५ ऑगस्ट १९८१ रोजी पुण्याला लक्ष्मी क्रीडा मंदिरात जसराजजींचा एक आठवणीतला लँडमार्क असा कार्यक्रम ऐकला. मध्यंतराआधीचा 'मेघ' जमून आलेला होता. या आठवणीची दुसरी एक बाजूला अशी की प्रख्यात सिनेनट श्री. विनोद खन्ना हे तेव्हा ओशोंचे शिष्य बनलेले होते अन् पंडितजींकडे गाणे शिकत होते. त्यांनी घातलेल्या भगव्या वस्त्रामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलून दिसत होते. त्यांच्या संन्यासीपणाचे वेगळेच वैभव दिसत होते. मी विनोद खन्नांच्या शेजारच्या खुर्चीवर बसलो होतो. माझी स्थिती क्षणभर दोलायमान झाली. शेजारी 'आध्यात्मिक' सौंदर्य होते तर समोर साक्षात अध्यात्म होते. प्रेक्षकांना विचलित करण्याचे सामर्थ्य जरी विनोद खन्नांमध्ये होते तरीही श्रोते पंडितजींच्या 'मेघा'ने सचैल भिजले होते. पंडितजींचा 'मेघ' असा काही होता की श्रोत्यांना सचैल स्नानच घडले. बाहेर पाऊस बरसत होता आणि आत मेघ या ऋतुप्रधान रागामध्ये पंडितजींनी केलेले 'मिंड... काम' पैठणीवरच्या जरतारी कामासारखे होते. 'मनवा नही माने' ही बंदिश अशा काही नजाकतीने समोर येत गेली की हळू सुरू झालेला पाऊस निसर्गत:च वाढतो तसे झाले. मंद्रसप्तकात पंडितजींनी काढलेले स्वर, काळजाला भिडणारा खर्ज, यामुळे पावसाआधी मेघ दाटून यावे तसेच झाले. नंतरच्या वाढत्या लयीत मधूनच मिंड विलक्षण वेगळा प्रत्यय देऊन जात होती. नागपंचमीच्या झोक्याने वर जाऊन तोंडापाशी हिरवीगार डहाळी लागून जावी अन् तो स्पर्श शरीरभर तसा हा अनुभव होता. 'डर लागे मोहे दामिनोको' या बंदिशीमधून रागाचे पूर्ण व्यक्तिमत्त्व समोर आले. मध्यंतरानंतर प्रथम एक भजन झाले पण ह्या 'मेघा'नंतर आता काही नको असे वाटत असतानाच पंडितजींची 'भटियारात' अशी तंद्री लागली की 'कोई नही अपना, ये जग रैन का सपना'त श्रोत्यांना घेऊन गेले. सुखासीन 'मेघा'मध्ये गुरफटलेले श्रोते वास्तवात शिरले. एवढा विस्तृत 'भटियार' त्यांच्याकडून प्रथमच ऐकला. वास्तवाची जाण करून देणारे ते स्वर श्रोत्यांना विव्हळ करून गेले.

पंडितजींनी त्या दिवशी भैरवी गायली नाही. त्या 'भटियार'तून सर्व काही मिळाले होते.

एव्हाना रात्रीचा दीड वाजला होता. बाहेरचा पाऊस थांबला होता आणि बाहेर पडणारा श्रोतृवर्ग वेगळ्याच उदात्त शांततेत होता. चांगलं गाणं असाच परिणाम करीत असतं!

दुसरे दिवशी सकाळी ११ वाजताच पंडितजींचा 'वंग देश' या बंगल्यात खाजगी कार्यक्रम होता. मी आणि माझा भाऊ असे दोघे तिथे पोचलो. 'सारंग' व त्याच्या विविध प्रकारांनी अकरा वाजता सुरू झालेली ती सभा दुपारी पावणे दोन वाजता संपली. रागांना विशिष्ट वेळा असतात ते ठीकच आहे असे वाटते. गाणाऱ्याच्या कुवतीनुसार त्या रागाचे चित्र समोर येत असते. त्या दिवशी दुपारच्या गाण्याने उन्हाची तीव्रता जाणवू दिली नाही. उलट रात्रीच्या मेघ व भटियारवर सारंगाची झुळूक तेवढीच आल्हाददायक होती.

माझ्या रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी जसराजजी हे आवर्जून आले. अन खूप कमी सोयी असलेल्या दारासमोरच्या रस्त्यावर आम्ही उभ्या केलेल्या स्टेजवर १० डिसेंबरच्या रात्री सुरुवातीला नट गाऊन त्यांनी श्रोत्यांना जणू आपल्या ताब्यात घेतले. अप्पा जळगावकरांचा हार्मोनियम साथीला होताच. तबल्यावर होते रमेश सामंत आणि पंडितजींकडे गाण शिकायला सुरुवात केलेला गोड गळ्याचा अन् तल्लख बुद्धिमत्तेचा त्यांचा आताचा पं. संजीव अभ्यंकर! मध्यंतरानंतरचा मधुकंस अतिशय रंगतदार झाला होता. मग सुहाग कानडा. मग पंडितजींची एक आवडीची चीज म्हणजे 'और राग सब बने बराती दुल्हा राग वसंत, मदन महोत्सव आज सखीरी बिदा भयो हेमंत' ही!

'सुमीरन करले मेरे मन' ह्या गुरुनानकांच्या भजनाने-भैरवीने हा कार्यक्रम संपला होता. 'कहे नानकरी सुनो भगवंता. या जगमे कोई नही अपना' हे तत्त्वज्ञान विविध भारतीयांनी आपल्या मनावर ठसविण्याचे केलेले प्रयत्न सतत जाणवत असतात. सुरांच्या माध्यमांतून शब्दांच्या साह्यानं हे तत्त्वज्ञान पटवून घेत रहावं!

शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात अजून कितीतरी असे वीर-महावीर आहेत की आपलं जीवन समृद्ध करण्यात ज्यांचा फार मोठा वाटा आहे. गौरीशंकराएवढ्या उंचीवर पोचलेले आणि भारतीय संगीत जगभर पोचवणारे भारतरत्न पं. रविशंकर यांची सतार कित्येक वर्षे आपल्याला रिझवीत आहे. त्यांची एकूण जीवनपद्धती परदेशस्थासारखी नियंत्रित शिस्तबद्ध आहे. मँचेस्टर आणि लिव्हरपूल येथे त्यांचे कार्यक्रम ऐकले ते त्यांच्या लौकिकाला शोभणारे होतेच.पण अगदी घड्याळ लावून दोन तासाचा कार्यक्रम देण्यामुळे श्रोते अजूनही खूष असत. युरोपमधल्या एका जागतिक पातळीवरच्या संगीत संमेलनाचा समारोप त्यांच्या सतारवादनाने व्हायचा होता. त्यांची वेळ येऊन कार्यक्रम सुरू झाल्यावर पाऊस सुरू झाला. पावसाची बुरबुर होती, पण जमलेला ५० हजारांचा समुदाय केवळ सभ्यता आणि शिस्त म्हणूनच बसून नव्हता तर सतार वादनाने त्यांना खिळवून ठेवलेले होते. हजारो छत्र्या उघडलेल्या समुदायाची छायाचित्रे पाहून कोणीही थक्क व्हावे असेच हे दृश्य होते. कार्यक्रम संपल्यावर केवळ दोन मिनिटांत आभार मानणाऱ्या व्यक्तीचं भाषणही तेव्हाच्या त्या लाँग प्ले रेकॉर्डमध्ये आलेलं होतं. ते असं; ''थँक्यु मिस्टर शंकर, थँक्यू अगेन, ही प्लेड सो वेल आणि ही केप्ट ऑन प्लेइंग ऑल थ्रु द रेन.''

संगीताच्या शक्तीचा हा आणखी एक पुरावा!

यहुदी म्युन्युविन या जगद्‌विख्यात व्हायोलिन वादकाबरोबर झालेले त्यांचे कार्यक्रम, संगीत विचारांची त्यांची देवाण-घेवाण हे सर्व अभ्यासा सारखे आहे. रविशंकरांमुळे परदेशात भारतीय

संगीतासाठी दरवाजे खुले झाले आणि नंतर अनेक भारतीय कलाकारांना तिकडे जाण्यासाठी योग्य असे वातावरण मिळाले यात शंका नाही. त्यांच्यासारखेच कार्य उस्ताद अलीअकबर, उस्ताद अल्लारखाँ, उस्ताद विलायत खाँ वगैरे कलाकारांनी केले आणि भारतीय शास्त्रीय संगीताची ध्वजा उंचावत ठेवली.

किशोरी अमोणकरांचा भूप आजही हृदयात वास करून आहे.

मी इंग्लंडमध्ये असताना आर्थिक सुबत्तेमुळे तिकडे लाँग प्ले रेकॉर्ड्स भरभर विकत घेता येत होत्या. लंडन किंवा मँचेस्टरला साड्यांची दुकाने निघालेली होती. तिथे भारतीय दुकानदार साड्या, मसाले व रेकॉर्ड्स दुकानात ठेवत. या रेकॉर्ड्स विकत आणून त्यातल्या फार आवडत्या रेकॉर्ड्स टेप करून मग 'कारटेप'मध्ये त्या ऐकणे हा मोठा विरंगुळा असायचा. जुन्या आवडलेल्या हिंदी सिनेमाच्या शास्त्रीय संगीताच्या आणि पुढे पुढे पश्चिमात्त्य शास्त्रीय संगीत किंवा हलक्याफुलक्या गाण्यांच्या रेकॉर्ड्स घेण्याचा सपाटा मी लावला होता.

श्रीमती प्रभा अत्रे यांची तेव्हा नवीन आलेली मरुबिहाग व कलावती राग असलेली रेकॉर्ड मनात एक स्पेशल जागा करून बसलेली आहे. विशेषत: 'तन मन धन तोपे वार' ही कलावती रागातली बंदिश किती वेळा ऐकली असेल याची मोजदाद नाही. पुढे कित्येक वर्षांनी वेरुळ महोत्सवात औरंगाबादला त्यांचे गाणे झाले तेव्हा इथला एक गानप्रेमी मित्र श्याम खांबेकर यांच्यामुळे प्रभाताईंच्या भेटीचा योग आला. त्या पंचतारांकित हॉटेलात उतरलेल्या असूनही आणि गाण्याच्या दुसऱ्या दिवशी संध्याकाळी विमानाने मुंबईला जायचे असूनही श्यामच्या घरी व नंतर माझ्या घरी आल्या तेव्हा तन मन धन तोपे वारू अशी आमची अवस्था झाली. त्यांना बिबीका मकबरा, पाणचक्की वगैरे दाखविण्यासाठी माझ्या गाडीतून आम्ही बरोबर गेलो. वागण्या-बोलण्यात मोकळेपणा स्वच्छपणा असा की त्यांच्या गळ्यासारखाच! असे असूनही स्वत:ची प्रतिष्ठा जपण्याबाबत अतिशय दक्ष असे त्यांचे व्यक्तिमत्त्व. मराठी भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व स्वरासारखंच. माझ्या पत्नीने लिहिलेलं पुस्तक त्यांना भेट म्हणून दिलं. ते वाचून पत्राने त्यावर टिप्पणी करण्याइतका नेमकेपणा आणि औदार्यही त्यांच्याजवळ होते. अचूकपणाची खात्री करणाऱ्या या ओळी त्यांच्याचः

'एखादं गीत असं छेडावं
शब्दापलिकडे बोलकं व्हावं.
एखादं भजन असं गावं
निर्गुणाचं कोडं सुटावं.'

असे विचार करणारी ही गायिका त्या निर्गुणाच्या शोधात सुराच्या मार्गानं वाटचाल करीत गेली आहे.

पं. कुमार गंधर्वांच्या संध्याकाळच्या रागांची आठवण अशीच.

स्कॉटलंडमधल्या वृक्ष सौंदर्याचा अनुभव घेत बारक्या-बारक्या वळणदार रस्त्यावर गाडी चालवत जाताना संध्याकाळचे त्यांचे 'राग' वाटेवर जणू काही दिवे लावीत जात. या बारीक छोट्या वळणासारखीच कुमारांची एखादी तान! मासळीनं पाण्याच्या पृष्ठभागावर क्षणात रांगोळी काढावी अन पुन्हा लुप्त व्हावं तशी!

पं. रामनारायण यांच्या सारंगीवादनाचा एक 'वीक एन्ड' होता लिव्हरपूल विद्यापीठात. त्यावेळी त्यांनी यमन रागाची माहिती ब्रिटिश श्रोत्यांना दिली. त्यांचे वादन तर सारंगी वादनाचा एक उत्कृष्ट नमुना होतेच पण त्यांचे निवेदनही तसेच. ही मोठी कलाकार मंडळी त्यांच्या शक्तीने अंतिमत: भारताचीच माहिती जगाला करून देत असतात. हीच माणसे आपले खरे 'ॲम्बेसेडर' नाहीत का?

आमचे इंग्लंडमधले सगळे छोटे मोठे प्रवास या सर्व कलाकारांनी सजविले. परवीन सुलतानांचा, वसंतराव देशपांडेंचा मारवा, लक्ष्मीशंकरांच्या रेकॉर्डमधली (रविशंकरांची) किरवानी रागातील बंदिश 'नट लाजरा अतिसुंदरा' ही मौल्यवान शिदोरी होती.

वर्डस्वर्थच्या जन्मभूमीत लेक डिस्ट्रीक्टमध्ये वळणदार रस्त्यातून जाता-येताना आशा भोसलेंचे 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे' हे नुकतेच टेप करून मिळविलेले गाणे पुन: पुन्हा ऐकले आणि सतत हुरहूर वाढविण्यातले सुख भोगले.

खरे तर स्वेच्छेने इंग्लंडात गेल्यावर दूरदेशी राहिले रे घर माझे अशी खंत करण्यात अर्थ नव्हता, पण माझ्या बाबतीत तरी ते खरे होते. तीच गोष्ट स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या ने मजशी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला ह्या गाण्याची. ब्रायटन या गावच्या समुद्रकिनारी गेलो. तिथे करड्या रंगाचा समुद्र पाहून सावरकरांनी या समुद्रकिनाऱ्यावरच ही रचना केली होती याच्या आठवणीने रोमांचित झालो.

एका संध्याकाळी तिथे असलेल्या डॉ. इक्बाल नावाच्या पाकिस्तानी डॉक्टरबरोबर ब्रॅडफर्डला जाऊन गझल गायकीचा बादशहा मेहदी हसन यांचा कार्यक्रम ऐकला. तेव्हा पावेतो गझल ऐकण्यात माझी फार प्रगती नव्हती पण त्या कार्यक्रमांत त्यांनी गायलेल्या 'अब के हम बिछडे' या गझलने मनात पक्के स्थान तयार केले. याच कार्यक्रमांत आवडलेली दुसरी गझल म्हणजे 'भुली बिसरी चंद उमीदे' ही होती. लगेचच ती टेप मिळवून तिचीही पारायणे केली. ती अजूनही चालूच असतात!

आपले संगीत ऐकणे चालू असतानाच तिकडचेही संगीत कानावर पडत होतेच. त्या संगीताची जातच वेगळी, पण हलकेफुलके, जाहिरातीसाठी वापरले जाणारे, आपल्या भावगीतासारखं वाटणारं 'बॅले' किंवा ऑपेरामध्ये असलेलं अन् शेवटी वेस्टर्न क्लासिकल असे ऐकण्यात आले आणि प्रांजळपणे सांगायचं तर पुष्कळ आवडलंही. छोट्या छोट्या ॲड्समध्ये वापरलेले वाद्यसंगीताचे तुकडे मन ओढून घेणारे असायचे. 'लिफ्ट' या पेयाची विक्री वाढविण्यासाठी तयार केलेली ही जाहिरात त्या पेयाइतकीच चटकदार होती. लहान मुलासाठी

काढलेल्या कित्येक रेकॉर्ड्स अतिशय चांगल्या अन् मनाची पकड घेणाऱ्या होत्या. छोट्या छोट्या बाहुल्यांना दाखवून आणि खाली एखादे खेळणारे मूल दाखवून एक ॲड अशी केलेली होती की त्या बाहुल्यांना उद्देशूनच गाणे केले गेले.

'Don't just sit there upon the shelf
get down and dance and please yourself' असे ते गाणे होते.

तिथल्या वसंतऋतूचे स्वागत करण्यासाठी तयार केलेले, गाणे आवडले. चाल ऐकल्यावर तर मनाला खूपच भावले.

'Birds bess and all flowers and trees
Bushes on the line
girls and boys and yellow butterflies
singing hello Summer times
summer time brings a lot of friends
nothing on the mind
Till sun goes down and people around
singing hello summer time'

अगदी साध्या तालावरची ही रचना. फुलावर फुलपाखरं रेंगाळावीत तशीच मनावर अजून रेंगाळते आहे.

तिथले पॉप संगीत अर्थातच तिथे पॉप्युलर! आपल्याकडे 'बिनाका गीतमाला' सारख्या आठवड्याला होणाऱ्या कार्यक्रमाप्रमाणे गायकांचे कार्यक्रम तेथेही होते. क्लिफ रिचर्ड हा खूप आवडायचा. नाना मुस्कोरी ही ग्रीक गायिका पण लवचिक अन भावनेला आवाहन करण्याची किमयी साधीत असायची. 'ऑसमंड ब्रदर्स' हे एक तिकडे तेव्हा उठलेलं वादळच होतं. लव्ह मी फॉर अ रीझन हे गाणं खरोखर उत्कृष्ट होतं. ऑसमंड्स बंधूंच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी बाहेर ॲम्ब्युलन्सेस असायच्या. त्यांच्या गाण्यानं बेभान होणाऱ्या मुलींना रुग्णालयात नेण्यासाठी!

या गाण्याच्या गर्दीत माझ्या मनावर ठसलेला अजून एक गायक म्हणजे जॉन डेन्व्हर. अमेरिकन वेस्टर्न गाणी गाणारा हा गायक आजसुद्धा आपल्याकडे परिचित आहे. त्याच्या रेकॉर्ड्स मिळतातही. अमेरिकेतल्या खेड्याचं चित्रण त्यानं लिहिलेल्या गाण्यातून आहे अन् त्याच्या चाली अतिशय सोप्या अन् अमेरिकन लोकसंगीतातून आलेल्या. त्याच्या रचनेचा हा एक नमुना त्याच्या उत्कृष्ट प्रामाणिक स्वरांना गिटार व व्हायोलिन यांची मिळणारी भव्य साथ हे विलक्षण मिश्रण होतं.

You fill up my senses
like night in the forest;
Like moutains in spring time
like a walk in the desert
like a sleepy blue ocean

किशोर कुमारच्या 'जातीतला' स्वच्छ मोकळा, धारदार आवाज ऐकून प्रेमाची महती जाणणं, व्यक्त करणं ही काही केवळ भारतीयांचीच मिरासदारी नाही हे पटवणारं हे गाणं. इंग्लडचं वेगळ असं शास्त्रीय संगीत नाही. वेस्टर्न क्लासिकल हे पश्चिम जगाचं संगीत आहे. त्यांच्या आणि आपल्या संगीतातला मोठा फरक म्हणजे 'ताल'! विविध तालांमध्ये आपलं संगीत आहे तर त्यांच्या संगीताला वेगळा असा ताल नाही. त्या संगीताचा आपसूक अंगभूत ताल आहे. आपल्या वाद्य संगीतात आलाप, जोड असतात तसा! पण वाद्यवादकांची मोठी संख्या, त्याचं शिस्तबद्ध एकत्रित येणं, काही स्वरांचं टोकाला जाणं, अनेक वाद्यांनी तसंच एकत्रितपणानं शिगेला पोचणे हे सगळं भव्य परिणाम केल्याखेरीज राहात नाही.

मोझार्ट, बिथोवन, स्ट्रॉस, चेकावस्की असे पट्टीचे मोठमोठे संगीतकार तिकडे होऊन गेले. त्यांनी तयार करून ठेवलेल्या रचना नवनवीन वाद्यवृंद वाजवतात. भावनांचा उदात्तपणा प्रकट करण्यामध्ये त्या कमी नसतात. कित्येक मोठ्या संगीतकारांच्या रचना आधार मानून 'बॅले'मध्ये पार्श्वभूमीवर खुबीने त्या वापरल्या गेलेल्या आम्ही टीव्हीवर पाहायचो. तेव्हा गाणं आणि संगीत या क्षेत्राच्या मोठेपणाचीच जाणीव सतत होत राहायची.

कित्येक गाजलेल्या इंग्रजी सिनेमांच्या टायटल संगीत रचना गाण्याइतक्याच लोकप्रिय झालेल्या आहेत.

ब्रिज ऑन दि रिव्हर क्वाय, व्हेअर इगल्स डेअर, व्हॅनडेर वॉक, हवाई फाईव्ह ओ इत्यादी नावं त्यामुळेच जवळची. गॉडफादरसाठी वापरल्या गेलेल्या पार्श्वसंगीताच्या रेकॉर्डचा खप रेकॉर्ड ब्रेक करणारा ठरला. गूढ आणि भीतिदायक वातावरण निर्मिती करणारे ते पार्श्वसंगीत हे पार्श्वसंगीताचा उत्कृष्ट नमुना ठरलेलं आहे. भारतीय सिनेमावाल्या संगीतकारांनाही या पार्श्वसंगीताची फार मोठी जाण आहे.

पार्श्वसंगीत तर कधी कधी पुढे घडणाऱ्या प्रसंगांची पूर्वसूचनाही देत असतं. प्रसंगाला उठावदार करणारे संगीताचे असंख्य प्रकार आहेत आणि असायलाच हवेत. व्यक्ती, देश, वातावरण यानुसार संगीतही बदलत राहणार. पण अखेरीस मानवी भावना तर त्याच असतात. मग भावनेचे प्रदर्शन करणारी संगीताची भाषा बदलून बदलून किती बदलेल? तिचा आत्मा एकच असणार नाही का?

आज, ह्या विचारांनी मनात गर्दी करायचं कारण असं की 'लाँग प्ले' रेकॉर्ड्सची दोन मोठी खोकी स्वच्छ करायला काढली. माझ्याजवळ जवळजवळ दीडशे रेकॉर्ड्स आहेत.

त्या रेकॉर्डच्या कव्हरवरची चित्रं, कलाकारांचे चेहरे, चेहऱ्यावरचे भाव हे सगळं पाहून आठवणींची पिन स्मरण पटलावर फिरू लागली. गाणं हे क्षेत्रच किती विस्तृत आहे हे जाणवू लागलं. लंडनमध्ये रेकॉर्ड्स विकत घेताना 'ये एक मराठी रेकॉर्ड है' असे म्हणत दुकानदारानं त्या रेकॉर्डवर पिन ठेवली. अन् तुकोबांचे शब्द, लताबाईंच्या आवाजात श्रीनिवास

खळ्यांच्या संगीतावर स्वार होऊन बाहेर आले. त्यांनी सचैल भिजवीत 'भेटीलागी जिवा लागली रे आस'. परदेशामध्ये हा मायेचा पदर आपल्यावर कोण घालतंय असं वाटून आम्ही दोघे ढसढसा रडलो आणि सुख पावलो.

गाणे हा एक प्रचंड मोठा महासागर आहे. त्यात आपली आपली होडी टाकून विहार करणारे कलावंत जगभर आहेत. कुणाची होडी मोठी असेल, कुणाची छोटी; पण प्रवासाचं ध्येय एकच. गाणं हे तत्त्वज्ञानच आहे. अध्यात्म आहे. गाणारे गाऊन गेल्यावरही त्यांच्या स्वरांनी आपल्याला काय वाटतं हे आपलं तत्त्वज्ञान आहे. त्या कलाकाराला काय अभिप्रेत होतं हा वेगळा विषय आहे. आपण ऐकणारे आपला अर्थ लावू शकतो, प्रवास करणाऱ्या या सगळ्या होड्या एकमेकांशी न भांडता आपला मार्ग आक्रमित असतात. मोठ्या शानदार होडीची मजा वेगळी तर केवळ छोट्या शिडावर सागरात आलेल्या होडीचीही शान कमी नाही. प्राणपणानं ते शीड फुगवलं की बस्स! आनंदाची जात एकच!

आईचा शब्द हे गाणंच अन् मर्तिकाच्या वेळी होणारा आक्रोश हेही गाणंच.

आणि गाणं हे आपल्याजवळ असतंच! 'मला ते समजत नाही' असं म्हणू नये. ते ऐकावं म्हणजे समजतं आणि समजल्यावर पुन: पुन्हा अधिक समजतं, आनंद देतं!!

**डॉ. भवान महाजन**
कल्याणी नर्सिंग होम, न्यू समर्थ नगर,
औरंगाबाद ४३१ ००१
मोबा. नं. ९८२३८३१२४२




१५०रु. पोस्टेज २५रु.

**जन्मठेप** — गिरिजा कीर

नवे कोरे

पैशामागे लागलेले आई-वडील मुलांना आदर्श वाटत नाहीत. शरीर ही प्रदर्शनाची वस्तू समजून तिची किंमत वसूल करणाऱ्या मुली मानसिक प्रदूषणाला कारणीभूत आहेत.
उत्तान दृश्यं तरुण मनाला चाळवतात.
सत्तेसाठी चालणारी साठमारी पाहिली की प्रश्न पडतो,
नव्या पिढीपुढे आज कोणती श्रद्धास्थानं आहेत?
ज्यांचा सूर्य मावळला आहे तेच आज प्रकाशाचा शोध घेताहेत;
स्वतःची दिवली घेऊन मार्ग काढताहेत.
शिक्षा भोगत असणाऱ्या कैद्यांकडून समाज काय अपेक्षा करतो?
शिक्षा भोगून तावूनसुलाखून निघालेले हे तरुण मनातल्या श्रद्धांना झळ पोचू देत नाहीत.
त्यांना चांगलं व्हायचं असतं. त्यासाठी आपण आपला आश्वासक हात पुढे केला पाहिजे.

**आकाशवेध**
गिरिजा कीर

जीवनाच्या अथांग सागरप्रवाहात अस्वस्थतेच्या लाटा भरती-ओहोटीसारख्या उठतात.
त्यातच मनस्वी माणूस स्वत:चं आभाळ शोधून वेगळ्या पाऊलवाटेनं प्रवासाला जातो.
रोजच्याच अंगणात आलेला एखादा नवीन किरण सारं जीवनच उजळून जातो.
मानवी मनाची स्पंदनं अलगद टिपत भावभावनांचे कल्लोळ
उरात बाळगून 'स्व' जागृत करणाऱ्या हृदयस्पर्शी कथा.
गिरिजा कीर यांच्या हळुवार लेखणीतून साकारलेला प्रतिभासंपन्न आविष्कार!

१३०रु. पोस्टेज २५रु.



**मराठवाड्यातले दिवस** (पृष्ठ ४० वरून )

अनंतरावांचा एका व्यक्तीशी स्नेह नसे; त्यांचा स्नेह असे तो कुटुंबाशी. चंद्रकांत, रसाळ किंवा मी यांच्या कुटुंबाचेच ते स्नेही होते. चंद्रकांतचे बोलणे जरा अघळपघळ आणि बरेच स्वातंत्र्य घेणारे असे. पुढे वर्षभराने सुधीर रसाळ औरंगाबादला आला आणि प्राध्यापक झाला. आम्हा तिघांशी गप्पा मारताना अनंतरावांची पालकाची भूमिका कायम असली तरी त्या काळात दोन पिढ्यांचे समोरासमोरील संवाद जसे अंतर राखून होत, तसे ते नसत. आपल्या मुलाच्या वयाच्या लोकांशी बोलताना मित्रत्वाची सहजता त्यांच्या बोलण्यात कायम असे. फक्त वडिलकीचे एक पथ्य त्यांनी पाळलेले होते. त्यांची पिढी आपल्या मुलाचे किंवा आपल्या मुलासारखे असलेल्याचे समोर कौतुक करीत नसे. अनंतरावांना आमचे कौतुक नव्हते असे नाही; फक्त ते ज्याचे त्याला ऐकायला मिळत नसे. आमचे काही चांगले वाटले, तर त्याचे कौतुक इतरांसमोर होई.

'मराठवाडा' अर्धसाप्ताहिकात दर गुरुवारी 'गोफणगुंडा' नावाचे राजकीय फिरक्या घेणारे एक सदर चंद्रकांत लिहीत असे. गोफणगुंडा लिहिणारा 'टेहळ्या' कोण, याची औरंगाबादेत वाङ्मयीन आणि राजकीय दोन्ही वर्तुळांत चर्चा असे. बरेच दिवस मलाही हे गुपित ठाऊक नव्हते. पुढे चंद्रकांतने काही कारणाने हे लेखन बंद केले, तेव्हा अनंतरावांनी 'तू हे सदर काही दिवस लिही', असे मला सांगितले. मी आठ-नऊ अंकांतच 'गोफणगुंडा' लिहिला. त्यातला 'संत तुकारामाचे डिपॉझिट जप्त होते' हा एक लेख खूपच गाजला आणि उमाकांत ठोमऱ्यांच्या 'वीणा' मासिकाने तो पुनर्मुद्रित केला. ज्ञानेश्वर, तुकाराम अशी सगळी संतमंडळी निवडणूक लढवण्याचे ठरवतात व आपल्यातर्फे उमेदवार म्हणून तुकारामाला उभे करतात. निवडणूक कशी जिंकायची, याचे तंत्र संतांना माहीतच नव्हते, त्यामुळे संत तुकारामाचा पराभव होतो आणि मंबाजी निवडून येतो, असे आजच्या लोकशाही अवस्थेचे उपरोधिक दर्शन घडवणारे कथानक त्या लेखात सांगितले होते. त्याच कथानकाचा वापर करून नंतर मराठीत एक नाटक लिहिण्यात आले; पण त्या नाटकात कुठेही गोफणगुंडाचा किंवा टेहळ्याचा उल्लेखही केला गेला नव्हता.

अनंतरावांनी मुद्दाम अमुक विषयावर तू लिही, असे मला क्वचितच सांगितले; पण मी लिहिलेल्या लेखांना 'मराठवाड्या'त स्थान मिळे. राजकारण, कायदा असेच माझ्या लेखांचे बहुधा विषय असत. स्थानिक स्वराज्य कायद्यातील दुरुस्त्यांपासून समाजवादी ऐक्यापर्यंत मी लेखणी चालवली. एक-दोन वेळा प्रासंगिक महत्त्वामुळे अनंतरावांनी माझा लेख पहिल्या पानावरसुद्धा छापला. पण माझ्या लेखाबद्दलसुद्धा अनंतरावांनी माझ्याशी चर्चा केली, असे कधी झाले नाही.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यालयासाठी मी राहत असलेल्या सरस्वती कॉलनीतीलच एक छोटी इमारत भाड्याने घेण्यात आली होती. अनंतराव, न. शे. पोहनेरकर, भगवंत देशमुख अशी परिषदेची ज्येष्ठ कार्यकर्ती मंडळी रोज संध्याकाळी परिषदेच्या कार्यालयात जमत. कामही होई आणि गप्पाही होत.

साहित्य परिषदेच्या तेव्हा मराठवाड्यात अनेक ठिकाणी शाखा होत्या. परिषदेचे मुखपत्र म्हणून 'प्रतिष्ठान' हे मासिक दरमहा प्रसिद्ध होई. परिषद मराठीच्या काही परीक्षाही घेई व त्याला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी बसत. निजामी राजवटीत मराठी भाषा आणि साहित्य यांची नुसतीच हेळसांड नव्हे, तर गळचेपी झाली होती. आता भाषा आणि वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठी परिषद प्रयत्न करीत होती. कोणताही व्यक्तिगत फायदा नसताना एखाद्या चांगल्या उद्दिष्टासाठी सार्वजनिक संस्था चालवून तिचे काम निरलसपणे व सातत्याने कसे करावे याचा वस्तुपाठच साहित्य परिषदेच्या रूपाने ही ज्येष्ठ मंडळी देत असताना मी पाहत होतो. परिषदेच्या कामात त्यांनी आपल्या तरुण मित्रांनाही सहभागी करून घेतले. तु. शं. कुलकर्णी आणि सुधीर रसाळ हे दोघे परिषदेचे काम दीर्घकाळ करीत होते. तु. शं. कार्यालयीन कामात मूळचाच तरबेज. त्याचे हे कौशल्य परिषदेला उपयोगी पडले. रसाळ प्रतिष्ठानच्या संपादनासाठी साहित्य निवडणे, मिळवणे यापासून अंक पाठवताना रॅपरवर पत्ते लिहिण्यापर्यंत सगळी कामे करायचा. प्रतिष्ठानची मुद्रिते तपासण्याचे दर महिन्यातले पाच-सहा दिवस खाणारे काम तो आणि तु.शं. यांनी वर्षोगणती केले. परिषदेच्या शाखा स्थापन करण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी जाऊन प्रयत्न करावे असे ठरले, तेव्हा अनेक जण वेगवेगळ्या गावी गेले. मी आणि रसाळ दोघे मिळून दोन - तीन ठिकाणी गेलो आणि तेथे शाखा स्थापन केल्या.

१९५८ मध्ये विद्यापीठ सुरू झाले. त्यात जे विभाग अगदी प्रारंभी सुरू होणार होते, त्यात मराठी भाषा व वाङ्मय या विभागाचा समावेश होता. विद्यापीठाचे कार्यालय सुरू झाले असले तरी प्राध्यापकांच्या रीतसर नेमणुका अजून व्हावयाच्या होत्या. मराठी विभाग सांभाळण्याची तात्पुरती जबाबदारी औरंगाबादच्या शासकीय महाविद्यालयाकडे देण्यात आली होती. सुदैवाने प्रा. भगवंत देशमुख हे तेथे मराठीचे प्राध्यापक म्हणून आले होते. काही दिवसांनंतर प्राचार्यपदी मा. गो. देशमुख आले आणि या महाविद्यालयातच एम.ए.साठीचे दोन शिक्षक आम्हाला उपलब्ध झाले. विद्यार्थ्यांची नोंदणी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात झाली असली तरी वर्ग मात्र औरंगपुऱ्यातल्या विद्यापीठाच्या जागेत भरत. पूर्वीच्या सरकारी मिडल स्कूलच्या इमारतीत विद्यापीठाने आपला तात्पुरता संसार थाटला होता.

लवकरच विद्यापीठाच्या मराठी विभागात प्राध्यापक म्हणून वा. ल. कुलकर्णी आणि प्रपाठक म्हणून यु. म. पठाण यांच्या

नेमणुका झाल्या. अधिव्याख्याता म्हणून त्या वेळी शासकीय महाविद्यालयात प्राध्यापक असलेल्या सुधीर रसाळची निवड झाली होती. परंतु या पदाच्या नियुक्तीसाठी आवश्यक असलेला शिकवण्याचा अनुभव पूर्ण होण्यास अद्याप सहा महिने बाकी होते. त्याचा तो अनुभव पूर्ण झाल्यानंतर त्याला नियुक्तीचे पत्र द्यावे, असे निवड समितीने म्हटले होते.

एम. ए.चे वर्ग सुरू झाले आणि एका नव्या ज्ञानप्रक्रियेची ओळख होऊ लागली. माझ्या स्वभावालाही जुळणारी अशी ती पद्धत होती. शिक्षकाची तयार मते विद्यार्थ्यांनी तशीच स्वीकारून पाठ करावी, असे वा. लं.ना वाटत नसे. वाङ्मयाकडे कसे पाहावे, त्यातले चांगले - वाईट कसे निवडावे याबद्दल विद्यार्थ्यांना विचार करायला शिकवावे, ही वा. लं.ची पद्धत होती. वा.ल. ट्युटोरियल्स् लिहायला लावत. ती स्वतः तपासून देत. त्यातील विद्यार्थ्यांची विधानेच तपासत असे नाही, तर शुद्धलेखनही बारकाईने तपासत. संदर्भग्रंथांची यादी त्यांनी दिलेली असे. ती सगळी पुस्तके वाचायला ते सांगत. एखाद्या पुस्तकातील टिपणे काढून तीच विद्यार्थ्यांना लिहून घेण्यास सांगण्याची काही प्राध्यापकांची पद्धत असते; मात्र वा.लं.नी कधीही अशी टिपणे मुलांना लिहून घ्यायला सांगितली नाहीत. वा.ल. हे तेव्हा मराठी अध्ययन-अध्यापक आणि वाङ्मयक्षेत्रात मोठी प्रभाव असलेले व्यक्तिमत्त्व होते. काही विद्यार्थ्यांनी वा. लं.च्या समीक्षेतील शब्दप्रयोगच नव्हे, तर बोलताना मधेच टाचा उंच करून बोलण्यासारख्या वा.लं.च्या शारीरिक लकबीही उचलल्या होत्या. वा. लं. च्या स्नेहाबरोबर त्यांच्या सर्व कुटुंबाचाही स्नेह होण्याचे भाग्य मला मिळाले; पण त्यांच्या अक्षराचा माझ्या अक्षरावरील काही काळ असलेला थोडा प्रभाव वगळला, तर इतर बाबतीत त्यांचे अनुकरण माझ्याकडून झाले नाही.

भगवंतराव देशमुख जुन्या पठडीत वाढलेले असले व स्वतः प्राचीन वाङ्मयाचे अभ्यासक असले, तरी नव्या लेखनाने भारलेल्या पिढीचे प्रतिनिधी होते. केशवसुत आणि त्यानंतरच्या नव्या वाङ्मयाचे मोकळेपणाने स्वागत आणि रसग्रहण करायला मराठवाड्यातील मुलांना भालचंद्रमहाराज कहाळेकर आणि भगवंतराव देशमुख यांनीच प्रथम शिकवले. जुन्या-नव्याचा सेतू म्हणूनच कहाळेकर - भगवंतरावांना ओळखले पाहिजे. मा. गो. देशमुख हे थोड्या जादा खेळकरपणाने शिकवत. गंभीर वाङ्मयीन प्रश्नाबद्दलची मतेही ते रंजक करण्याचा प्रयत्न करीत. वा.लं.चा असा प्रयत्न असे की, प्रत्येक प्राध्यापकाने आलटून-पालटून सर्व विषय शिकवण्याची तयारी ठेवली पाहिजे. एकच विषय सतत शिकवण्याने ते शिकविणे नीरस होण्याचा संभव असतो. वा.ल. त्यासाठी दर वर्षी सहकाऱ्यांना नव्याने काम वाटून देत. स्वतः तेही वेगवेगळे विषय शिकवीत.

सहा महिन्यांतच सुधीर रसाळ आम्हाला शिकवण्यासाठी आला. अगदी जवळचा, रोज चार - पाच तास बरोबर असणारा, अरे-तुरेतला मित्र आता गुरूच्या भूमिकेत येणार होता. मी आणि चंद्रकांत आपला शिक्षक म्हणून त्याच्याशी कसे वागतो याचे अनेक वर्गमित्रांना कुतहूल होते. पण आम्हाला काहीच अडचण आली नाही. सकाळी सुधीर (त्याला आम्ही बापू म्हणत असू) आपल्या घरून निघून गुलमंडीवर येई. मी आणि चंद्रकांतही तेथे येत असू. कामाक्षी भुवन नावाचे गोपाळराव किणी या कारवारी गृहस्थांच्या मालकीचे उपाहारगृह होते. तेथे आम्ही एकत्र जमून चहा घेत असू. हॉटेलच्या मागच्या भागात एक मांडव होता. त्या वेलीच्या मांडवाखाली शांतपणे गप्पा मारत चहा घेता येत असे. चालू चहा तेव्हा दोन आण्याला व स्पेशल चार आण्याला मिळे. आम्ही एक स्पेशल व एक चालू, असा दोन चहांचा 'मिक्स' घेत असू. पैसे कमी लागत हे तर कारण होतेच, शिवाय स्पेशल चहा भयानक गोड व चालू फार पांचट असे. दोन्हींची मिळून चव जरा बरी होई. चहा आणि गप्पा संपवून बापूच्या तासापूर्वी पाच मिनिटे विद्यापीठात पोहोचू अशा बेताने आम्ही एकत्र पायीच निघत असू. विद्यापीठ जवळच होते. विद्यापीठाच्या फाटकात आलो की बापू डावीकडे प्राध्यापकाच्या खोलीकडे जाई. आम्ही दोघे माडीवर वर्गात जाऊन बसत असू. बापूचा वर्ग आम्ही कधी चुकवला नाही. केवळ मित्रकर्तव्य म्हणून आम्ही तासाला बसत नव्हतो. बापू अभ्यासपूर्वक शिकवे. निष्ठेने शिकवणे त्याने त्याच्या वडलांकडून घेतले होते. इतर प्राध्यापकांना आम्ही जसे प्रश्न विचारात असू, तसेच त्याला विचारत असू. त्याच्या वर्गातही आमचे वागणे नम्र विद्यार्थ्यांचेच असे आणि तो मुखवटा नसे.

मे १९५९ मध्ये एलएल.बी. च्या दुसऱ्या वर्षाचा निकाल आला. मी, वसंत पाटील आणि वसंत साने असे तिघे पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालो. लगेच वकिलीला जाता आले असते. परंतु एम.ए. ला प्रवेश घेतलेला होता. एक वर्ष पूर्णही झाले होते. तीही पदवी मिळवावयाचीच होती. म्हणून आणखी एक वर्ष औरंगाबादमध्ये राहायचे होते.

मी एम.ए. ला असतानाच नववे मराठवाडा साहित्य संमेलन औरंगाबादेत झाले. सत्तावन्नमध्ये झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या जागेवरच ते झाले. मराठवाडा साहित्य परिषदेचे एक संस्थापक आणि प्राचीन वाङ्मयाचे एक संशोधक न. शे. पोहनेरकर संमेलनाचे अध्यक्ष होते. मी पहिल्यांदाच मराठवाडा साहित्य संमेलनाला हजर राहत होतो. पुढे मग मी सलगपणे बऱ्याच संमेलनांना हजर राहिलो. संमेलनाच्या निमित्ताने मुंबई मराठी साहित्य संघाच्या नाट्यशाखेने बसवलेली 'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' ही दोन नाटके झाली. नेटका प्रयोग आणि उत्तम अभिनय या दोन्हींमुळे ती बराच काळ स्मरणात राहिली.

मी नाशिकला मामाकडे १९४८ मध्ये काही महिने असताना

राष्ट्र सेवादलाच्या शाखेवर जात होतो. त्या वेळी माझे वय नऊ-दहा वर्षांचे होते. त्या वयात राष्ट्र सेवादलाच्या राजकीय विचारांचा माझा परिचय होणे शक्यच नव्हते. पुढे औरंगाबादला आल्यावर १९६० मध्ये राष्ट्र सेवादलाच्या कलापथकाचे मराठवाड्यात दौरे झाले. वसंत बापट, लीलाधर हेगडे, दादा कोंडके, राम नगरकर, बापू देशमुख, लीला चांदोरकर वगैरे मंडळी 'बिनबियाचे झाड' या व्यंकटेश माडगूळकरांच्या वगाचे प्रयोग करीत. बापट आणि हेगडे यांचा परिचय पुढे दृढ झाला. राज्यपुनर्रचनेनंतर औरंगाबादला आलेल्या 'मराठवाडा' पत्राचे संपादक अनंत भालेराव, समाजवादी पक्षाचे काशीनाथ नावंदर वगैरेंची सेवादलाला मदत असे. एस. एम. जोशी किंवा नानासाहेब गोरे औरंगाबादला आले म्हणजे त्यांची भाषणे होत. सरस्वती भुवन सभागृहाजवळच माझे घर असल्यामुळे एक-दोन वेळा एसेमची उतरण्याची व्यवस्था माझ्या खोलीवरच करण्यात आली होती. नावंदर, बन्सीलाल लड्ढा, काशीनाथ कुलकर्णी आदी तेव्हा औरंगाबादेत समाजवादी पक्षाचे काम करीत. समाजवादी पक्ष आणि राष्ट्र सेवादल यांच्याबद्दल याच काळात माझ्या मनात ममत्व निर्माण होत होते.

एम.ए. ला पहिला वर्ग मिळाल्यामुळे वकिलीपेक्षा प्राध्यापकीला प्राधान्य देण्याला एक समर्थनीय कारण मिळाले होते. मी कोणता व्यवसाय करावा, हे ठरवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य वडलांनी मला दिले होते. त्यांनी आपले मतसुद्धा व्यक्त केले नव्हते. एम.ए. चा निकाल आल्याबरोबर मी अंबाजोगाईचे स्वामी रामानंद तीर्थांनी स्थापन केलेले योगेश्वरी महाविद्यालय आणि आमचे मिलिंद महाविद्यालय अशा दोन ठिकाणी अर्ज करून ठेवले. मिलिंद महाविद्यालयात त्या वर्षी मराठीची जागाच निघणार नव्हती; पण पुढे मागे जागा झाल्यास विचार व्हावा म्हणून तो अर्ज होता. अंबाजोगाईच्या महाविद्यालयात मराठीची जागा होती. व्यवस्थापनातले लोक मला ओळखतही होते. परंतु काही मराठीचे तास व काही हिंदीचे तास घेऊ शकणारा दोन्ही विषयांचे चार-चार पेपर्स घेऊन एम.ए. झालेला एक प्राध्यापक त्यांना मिळाला. त्याला घेतल्यामुळे एका प्राध्यापकाचा पगारही वाचणार होता. नाही तर दोन वेगवेगळे प्राध्यापक नेमावे लागले असते. व्यवस्थापनाने व्यावहारिक विचार केला आणि त्या प्राध्यापकाची नेमणूक केली. मला त्यांनी मुलाखतीलाही बोलावले नव्हते. अर्थात काय घडले आहे, ते मला कळाले होते.

रामचंद्र गोविंद ऊर्फ बाबासाहेब परांजपे हे हैदराबाद स्वातंत्र्यलढ्यातील ज्येष्ठ नेते. अंबाजोगाईच्या शिक्षण संस्थेचे ते एक संस्थापक आणि दीर्घकाळ मार्गदर्शक होते. ते आता लातूरला स्थायिक झाले होते. लातूरला एक महाविद्यालय नव्याने सुरू करण्याचा तेथील व्यापारी मंडळींचा विचार होता. त्यासाठी ते बाबासाहेबांचे मार्गदर्शन घेत असत. अंबाजोगाईत माझी नेमणूक झालेली नाही, हे बाबासाहेबांना कळाले होते. त्यांनी मला निरोप केला की 'अमुक तारखेला लातूरच्या महाविद्यालयातील नेमणुकीसाठी मुलाखती आहेत; तू सरळ मुलाखतीच्या वेळेला हजर राहा.' खरे म्हणजे मी लातूरला अर्जच केलेला नव्हता. मी येतो, असे मी बाबासाहेबांना कळवले.

मुलाखतीसाठी बीडहून लातूरला बसने निघालो. मुलाखती बारा वाजता होत्या. त्यापूर्वी तासभर अगोदर लातूरला पोहोचणाऱ्या बसने निघालो होतो. लातूरजवळच पण अलीकडे असलेल्या मांजरा नदीवर तेव्हा पूल नव्हता. नदीला पूर आला होता आणि फरशीवर तीन - चार फूट पाणी असल्यामुळे बस अलीकडेच थांबवण्यात आली होती. बसचे सगळे प्रवासी खाली उतरून पुराची मौज पाहत होते. मी मात्र मुलाखतीचे काय होणार, या विचाराने अस्वस्थ होतो. दुपारी चार वाजता पाणी ओसरले आणि बस उरलेले पाच-सहा मैल धावून लातूरला पोहोचली. बस स्टॅण्डच्या पूर्वीच पूरणमल पॉलिटेक्निकची इमारत दिसली. त्याच इमारतीत महाविद्यालय चालणार होते. वाहकाला विनंती करून मी तेथेच उतरलो.

इमारतीत जाऊन या या कारणामुळे मला मुलाखतीला वेळेवर येता आले नाही, असा निरोप बाबासाहेबांना द्यावा आणि परत बीडला जावे, असे मी ठरवले होते. आत सर्वत्र शुकशुकाट होता. फक्त ऑफिसची खोली उघडी होती व त्यात एक कारकून बसलेला होता. त्याच्याजवळ मी जाऊन बाबासाहेबांची चौकशी केली. 'मुलाखती तीन वाजताच संपल्या. सगळेच लोक घरी गेले', असे त्याने सांगितले व मी माझे नाव सांगताच 'बाबासाहेबांनी तुम्हाला देण्यासाठी हे पाकीट दिले आहे.' असे सांगून माझ्या हातात एक पाकीट दिले. पाकिटात माझी मराठीचा प्राध्यापक म्हणून नेमणूक करणारे पत्र होते. मला हा अनपेक्षित धक्काच होता. अर्ज न करता, मुलाखतीला वेळेवर हजर न राहता माझ्या परोक्ष संस्थेने माझी निवड केली होती. बाबासाहेबांचा माझ्यावर आणि संस्थेचा बाबासाहेबांवर विश्वास होता.

माझी मराठी वाङ्मयाची आवड आणि माझे वक्तृत्व हे दोन्ही काही योगायोगाने बाबासाहेबांनी पाहिले होते. सेवा दलाच्या शाखेवर बाबासाहेबांना बोलावले असताना शाखाप्रमुख म्हणून मला एक- दोन वेळा प्रास्ताविक भाषण करण्याची संधी मिळाली होती. स्वतः बाबासाहेब वाङ्मयावर प्रेम करणारे होते. म्हणूनच चौथ्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना निवडण्यात आले होते. बाबासाहेबांचे वक्तृत्व तरुणांना चेतवणारे असे.

लातूरला गेल्यानंतर जीवनधर शहरकर आणि बाबासाहेब परांजपे यांनी अवघ्या आठवड्याभरात माझी नीट व्यवस्था लावून दिली. सावेवाडी नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात साव्यांच्या मालकीच्या एका छोट्या बंगल्याच्या अर्ध्या भागात भाड्याने राहत. मोठे बांधकाम कंत्राटदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

साव्यांची लातुरात दोन चित्रपटगृहेही होती. बाबासाहेबांविषयी त्यांना विशेष आदरही होता. त्याच आवारात मागच्या बाजूला वर सिमेंटचे पत्रे असलेली रांगेने एकमेकाला लागून असलेली चार-पाच घरे होती. त्यांपैकी एक घर बाबासाहेबांनी मला द्यावयास लावले. सोळा रुपये भाडे होते आणि ते मला परवडणारे होते. पगार २०० ते ४०० या वेतनश्रेणीत २०० अधिक ३५ रुपये महागाई भत्ता असा २३५ रुपये मिळणार होता. बाबासाहेबांनी स्वातंत्र्यसैनिक असलेल्या सदाशिव स्वामी नावाच्या लिंगायत गृहस्थांकडे माझी जेवणाची व्यवस्था लावून दिली. घरगुती आणि साधे जेवण मिळण्याची सोय त्यामुळे झाली. स्वामींच्या घरात स्वच्छता काटेकोर असे. लखलखीत घासलेली आणि चमकणारी पितळी भांडी आणि रोज नियमाने सारवलेली जमीन हे दृश्य प्रसन्न करणारे असे. स्वामीबाईंचे सोवळे मात्र कडक असे. पाणी भरलेल्या रांजणाला मी हात लावलेलाही त्यांना चालत नसे. काही काळ खोलीवर त्यांच्याकडून डबाही येत असे.

बाबासाहेब राहत ते घर त्याच आवारात असल्यामुळे ते अनेक वेळा माझ्या खोलीवर येत, तर कधी मला त्यांच्याकडे बोलावून घेत. बाबासाहेबांचे आयुष्य शिक्षक आणि राजकीय कार्यकर्ते म्हणून गेल्यामुळे त्यांना खूप बोलावेसे वाटे आणि बोलायला नेहमी उपलब्ध मीच असे. त्यांच्या पत्नी सिंधुताई शासकीय नोकरी करीत होत्या. त्यांना महिन्यातून पंधरा-वीस दिवस तरी दौरा असे. त्या काळात बाबासाहेब एकटेच असत. माझ्या खोलीवर आले म्हणजे 'तुझ्याकडे लोक येतात-जातात; कपबशा जास्त हव्यात' असे सांगत आणि स्वतःच आपल्या घरात जाऊन तेथल्या पाच-सहा कपबशा माझ्या खोलीवर आणून ठेवीत. पाणी साठवायला माझ्याकडे घागर, कळशी अगर मोठे भांडे काहीच नव्हते. बाबासाहेब म्हणत, 'सिंधूने दोन-तीन घागरी उगीच जमा केल्यात.' दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडील एक घागर आणि एखादी कळशी माझ्या खोलीवर आणून ठेवलेली मला दिसे.

दौरा संपवून लातूरला सिंधुताई परत आल्या म्हणजे आपल्या घरातले बरेचसे सामान अदृश्य झाल्याचे त्यांना आढळून येई. बाबासाहेबांचा स्वभाव पूर्ण माहीत असल्यामुळे त्यांना सामान कुठे गेले असावे याचा अंदाज येई आणि त्या माझ्या खोलीवर येत. मी तत्परतेने त्यांना त्या वस्तू परत घेऊन जायला मदत करीत असे. परंतु पुन्हा त्या दौऱ्यावर गेल्यानंतर पूर्वीचाच प्रकार होई. कपबशा, घागरी आणि इतर किरकोळ सामानाच्या या प्रवासफेऱ्या मी लातूर सोडेपर्यंत थांबल्याच नव्हत्या. बाबासाहेब चळवळीच्या काळात विद्यार्थ्यांच्या खोल्यांवरच राहत. त्यांनी लग्नही स्वातंत्र्य मिळाल्यावर केले होते. आपले घर आणि ज्याच्यावर आपण पुत्रवत् माया करतो, त्याचे घर वेगवेगळे असते, हे त्यांच्या मनाला मान्यच नसे. अशा संन्याशाशी संसार करताना सिंधुताईंमधल्या गृहिणीची फारच ओढाताण होत असली पाहिजे.

नव्यानेच स्थापन होत असलेले आमचे दयानंद महाविद्यालय लातुरातील पहिले महाविद्यालय. लातुरात व्यापाराची समृद्धी असली तरी उच्च शिक्षणाची सोय नव्हती, ती आता होत होती. महाविद्यालय आणि त्यातली प्राध्यापकमंडळी हे गावच्या आकर्षणाचे विषय होते. प्राध्यापक विद्वान असल्याचे गृहीत धरण्याचा तो काळ होता. बहुतेक संध्याकाळी गावातल्या हमरस्त्यावर असलेल्या बिरदीचंदजींच्या स्टेशनरी आणि पुस्तकाच्या दुकानात थोडा वेळ बसलो म्हणजे येणारे-जाणारे अनेक लोक मुद्दाम भेटून जात. दयाराम सूरजमल रस्त्यावर एका पत्र्याच्या माडीत जीवनधर राहत होता. तो आणि त्याची बायको दोघेही नोकरी करीत. जीवनधरची आई त्याच्याबरोबरच मलाही जेवणाचा आग्रह करी. दुसरे घर म्हणजे वासुदेव बेंबळकरांचे. त्यांच्या घरी मी सुटीच्या दिवशी जवळजवळ दिवसभर असे. वासुदेवराव जीवनधरप्रमाणेच राजस्थान विद्यालयात शिक्षक होते. रत्नप्रभावहिनीही शिक्षिका होत्या. बेंबळकरांची त्या वेळी छोटी असलेली दोन्ही मुले - विनय आणि मिलिंद हा माझ्यासाठी एक विरंगुळाच होता. राष्ट्र सेवादलाच्या संस्कारात वाढलेले हे कुटुंब माझे लातुरातले घरच झाले होते.

लातूरपासून महाराष्ट्र-कर्नाटकाची सरहद्द जवळ होती. या भागातला शेतमाल लातूरच्या मोंढ्यातच विक्रीसाठी येत असे. लातूरला झालेले महाविद्यालय ही सीमाभागातल्या गरीब मुलांसाठी एक मोठीच सोय होती. काही मुले लातूरला मोंढ्यातल्या आपल्या अडत्याच्या दुकानातच राहत. रात्री तेथेच झोपत. सकाळी उठून दुकानाबाहेर असलेल्या नळावर अंघोळी आटोपत आणि नंतर बसस्टॅण्डवर जाऊन गावाकडून आलेला जेवणाचा डबा घेऊन येत व थोडेसे खाऊन मग महाविद्यालयात येत. एकदाच सकाळी आलेला डबा रात्रीच्या जेवणालाही पुरे. या मुलांच्या मराठी बोलण्यावर स्वाभाविकपणेच कानडी उच्चाराची झाक असे. मी एकदा वा.लं.ना सहज ही गोष्ट सांगितली. ते म्हणाले, ''अशा मुलांना मराठी शिकवणे, हे आपल्यासाठी एक आव्हानच आहे असे तू समजले पाहिजेस.'' सगळ्या अडचणींना तोंड देत शिकणारी ही मुले अतिशय सालस आणि प्रामाणिक होती. निष्ठेने अभ्यास करीत व न समजलेले पुन्हा विचारून समजून घेत.

वर्गात पँट घातलेल्या विद्यार्थ्यांची संख्या बोटावर मोजता येण्याएवढीच होती. बहुतेक मुले इस्त्री नसलेली साधी पांढरी विजार आणि त्यावर कॉलर असलेला कोणत्या तरी रंगाचा शर्ट

अशाच पोशाखात असत. मराठी किंवा हिंदी अशी दुसरी भाषा घेता येत असे. हिंदी सोपे आहे, असा सार्वत्रिक समज हिंदीच्या अभ्यासक्रमामुळे पसरलेला होता. त्याला कारणही होते. आठवी-नववीत जे हिंदी पुस्तक अभ्यासाला होते, तेच महाविद्यालयातही लावण्यात आले होते. प्रारंभी त्यामुळे मराठीपेक्षा हिंदीला जास्त मुले होती. पंधराएक दिवसानंतर हे प्रमाण बदलले आणि मराठी जास्त मुलांनी घेतले. सुमारे १३०-३५ मुलांचा मराठीचा वर्ग असे. माझ्या आवाजाचा आणि वक्तृत्वाच्या सरावाचा मला या वेळी चांगला उपयोग झाला.

महाविद्यालयाच्या प्राध्यापकांत अनेक ज्येष्ठ मंडळी होती. निवृत्तीनंतर पुन्हा काम करायला आलेलेही काही होते. तरुण अविवाहित होतो आम्ही दोघेच; मी आणि खानदेशातल्या सावद्याचे राजा गचके. त्याच इमारतीत चालणाऱ्या पूरणमल तंत्रनिकेतनात शिकवणारे प्राध्यापक मात्र बहुतेक सगळे तरुण होते. रवींद्र गोवंडे, जयंत वैद्य, संभाजी भिडे अशा काहींशी माझा स्नेहही झाला. संभाजी भिडे हे एक फार वेगळे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून भिड्यांनी आसाममध्येही काम केले होते. स्वच्छ पांढरे दुहेरी काष्टा असलेले धोतर आणि त्यावर एक शर्ट असा त्यांचा महाविद्यालयातही पोशाख असे. चहासुद्धा न पिणारा भिडे त्याच्या घरून आलेले पापड भाजून देऊन आमचे स्वागत करत असे. त्यांच्या मनातली आमच्याबद्दलची आपुलकी सहज कळणारी असे. राजकीय मते जुळली नाहीत तरी आपल्याला वाटणाऱ्या मार्गाने सार्वजनिक काम करणाऱ्या भिड्यांशी आमचे संबंध म्हणूनच स्नेहाचे होते.

लातूरला त्या काळात नाटकाचे वातावरण होते. दर वर्षी होणाऱ्या राज्य नाट्यस्पर्धेला लातुरातून दोन - तीन तरी नाटके जात. प्रा. कचरूलालजी पुरोहित, म्हैसकरगुरुजी, हेमलता शहरकर, वासुदेव बेंबळकर, तंत्रनिकेतनातले गोवंडे वगैरेंचा समावेश तर असेच; पण गोदावरीदेवी कन्या प्रशालेतल्या शिक्षिकाही त्यात भाग घेत. नाटकात प्रत्यक्ष भूमिका करणाऱ्यापेक्षा आनंदाने आपल्याच घरचे ते कार्य आहे, असे मानणाऱ्या मित्रांची संख्या मोठी असे. गावाचे वातावरण नाट्यमय होऊन जाई.

आमच्या महाविद्यालयात एक मराठी वाङ्मय मंडळ आम्ही स्थापन केले होते. त्याचे रीतसर उद्घाटन करण्यासाठी मी अनंत भालेरावांना आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भगवंत देशमुखांना निमंत्रित केले होते. कार्यक्रमाला प्रारंभ झाल्यावर अनंतरावांची मी औपचारिक ओळख करून द्यायला उभा राहिलो, तेव्हा व्यासपीठावर उपस्थित असलेल्या बाबासाहेब परांजप्यांनी मला बसायला सांगून अनंतरावांची ओळख स्वतःच करून दिली. अनंतरावांचे कष्टमय परंतु निष्ठेचे जीवन दीर्घकाळ पाहिलेल्या बाबासाहेबांनी केलेली यथार्थ शब्दयोजना आणि त्यांचे उत्स्फूर्त वक्तृत्व आजही माझ्या स्मरणात आहे. 'धवलचारित्र्याचा तेजस्वी पत्रकार' असे बाबासाहेबांनी अनंतरावांचे वर्णन केले होते.

महाविद्यालय नवीन होते. मुली महाविद्यालयात शिकण्याचा गावाचा नवीन अनुभव होता. मुलींना त्रास देणे वगैरे प्रकार अद्याप सुरू झाले नव्हते. मात्र आठवड्यातून दोन - चार पत्रे तरी मुलींच्या नावाने येत. एकदा प्राचार्य तीन - चार दिवस रजेवर जाणार होते. त्यांनी मला बोलावून एक काम सांगितले की, 'मुलींच्या नावाने जे टपाल येईल, त्यातील त्यांच्या नातेवाइकांची पत्रे त्यांना द्या आणि इतर निनावी वगैरे टपाल असेल, तर ते न देता फाडून टाका.' प्राचार्यच ते काम नेहमी करीत असावेत. मी पत्रांचे हे सेन्सॉर दोनच दिवस केले. त्यात एक - दोनच पत्रे निनावी होती. ती मी अर्थात फाडून टाकली. आठ - पंधरा दिवस झाल्यानंतर वर्गातल्या मुलांना मी गमतीने म्हणालो, ''प्रेमपत्रे कशी लिहावीत, हे जरा शिकून घ्या. गावात चालणाऱ्या सिनेमाचे 'डायलॉग' तुमच्या पत्रात कशाला लिहिता? ते शब्द सिनेमातल्या नायकाचे आहेत; तुमचे नाहीत. स्वतःची भावना स्वतःच्या शब्दांत व्यक्त करता आली पाहिजे आणि ती खरी पाहिजे, खेळ नव्हे.'' आजच्या काळात विद्यार्थ्यांची पत्रे फोडून पाहण्याचा अधिकार कोणीही प्राचार्य वापरणार नाही. मुलींनाही ते आवडणार नाही.

गावात राष्ट्र सेवादलाच्या संस्कारांत वाढलेला आणि त्याविषयी प्रेम बाळगणारा आमचा मोठा गट होता. जीवनधरकडे 'साधने'चे अंक येत व ते ग्राहकांना वाटले जात. बापू काळदाते दोन - तीन महिन्याला येत. तेव्हा ते मराठवाड्यासाठी सेवादलाचे पूर्णवेळ सेवक होते. विचाराने समाजवादी नसलेल्या मित्रांचीसुद्धा सेवादलाच्या उपक्रमात आम्हाला साथ असे.

गावात एकच महाविद्यालय असेल, तर त्यातला मराठीचा प्राध्यापक हा गावाच्या सांस्कृतिक घडामोडीत एक महत्त्वाचा घटक आपोआप बनतो. १ ऑगस्टला लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी होती. नागरिकांनी ती मोठ्या प्रमाणावर साजरी करण्याचे ठरवले होते. त्या सभेत एक वक्ता मीही होतो. लातूरला एक टिळक गिरणी नावाने ओळखली जाणारी बंद गिरणी होती. लोकमान्यांनी ब्रिटिशहद्दीबाहेर ती मुद्दाम काढली असावी. टिळकांचे भाचे त्याचे व्यवस्थापन करीत, हे मी टिळक चरित्रात वाचले होते. त्या रिकाम्या पडलेल्या या गिरणीच्या जवळ वस्ती झाल्यास त्याला टिळकनगर नाव द्यावे, अशी मी सूचना केली. आज लातुरात टिळकनगर तेथे अस्तित्वात आहे.

माझ्या काही जवळच्या मित्रांच्या कार्यक्रमपत्रिकेवर माझे लग्न जुळवणे, हा त्यांनी स्वतःच ठरवलेला प्राधान्याचा विषय होता. मला मुली सुचवणे आणि मुलींच्या बापांना माझे नाव सुचवणे, असे त्यांचे काम चाललेले असे. वासुदेव बेंबळकर

आणि जीवनधरचा त्यात प्रमुख भाग असे. मला त्या वेळी लग्न करायचे नसल्यामुळे त्यांचे हे परिश्रम फुकट जाणार होते. तसे त्यांना मी अनेक वेळा सांगितलेही; पण त्यांना माझा निश्चय डळमळेल, असा विश्वास वाटत असावा. लातूर सोडल्यानंतर सात वर्षांनी माझा विवाह झाला.

लातूरला एकच अडचण होती– ती म्हणजे, पिण्याचे पाणी. शहरापासून सहा मैल दूर असलेल्या साईवरून पाणी यायचे आणि ते फारच अपुरे होते. पाण्याला दाबच नसल्यामुळे खड्डा करून त्यात नळ घ्यावा लागे. नळाला पहिली पाच मिनिटे फक्त चिखल येई. नंतर दहा मिनिटे गढूळ पाणी येऊन नळ बंद होई. या पाण्यामुळे माझे पचन बिघडले. दुसरीकडे जाण्याचा निर्णय नाइलाजाने घ्यावा लागला. मराठीची जागा पुन्हा शोधण्याऐवजी वकिलीचा मार्ग घ्यावा, असे मी ठरवले. प्राध्यापकाच्या पगारापेक्षा वकिलीत खात्रीने थोडे अधिक पैसे मिळालेच असते. का कुणास ठाऊक, सरळ बीडला वडलांबरोबर वकिलीला जाण्याऐवजी मी आणखी एक टप्पा मधे घेतला. औरंगाबादच्या माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालयात अंशकालीन प्राध्यापक म्हणून मी रुजू झालो आणि काशीनाथ नावंदरांच्या ऑफिसमध्ये वकिलीला प्रारंभ केला. हा प्रयोग फक्त सहा महिने टिकला. त्या वेळी न्यायालयात रोज उपयोगी पडणारे कायदे मला शिकवावयाला मिळण्याऐवजी वकिलीत फारसा उपयोग नसलेले विषय माझ्या वाट्याला दिले होते. त्यामुळे रोज एक तास शिकवण्यासाठी चार तास अभ्यास करावा लागे आणि एक तास शिकवण्याबद्दल दहा रुपये मिळत. हा सर्व प्रकार थांबवून वकिलीच करायची तर घरीच केलेली बरी, असा शहाणपणाचा निर्णय मी घेतला आणि जानेवारी १९६३ मध्ये वडलांबरोबर वकिली सुरू केली. एकदाचा रस्ता निश्चित झाला होता.

**नरेन्द्र चपळगावकर,**
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५
फोन नं. ०२४०-२३३११६६
nanajudge@yahoo.com

**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन आठवड्याचे सातही दिवस नियमित सुरू राहील.
वेळ -सोम. ते शनि. ९.३० ते ६.३०
रविवारी सकाळी १० ते ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**

**आगामी**

# आदिपर्व

**मालोजीराजे भोसले**
**यांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक कादंबरी**




**डॉ. प्रमिला जरग**

सोळाव्या शतकात निजामशाही, आदिलशाही, मोगल यांच्यात सत्तासंघर्ष सुरू होता; त्यात लढणारे मात्र या भूमीचे पुत्र होते.
विध्वंस होत होता इथल्या भूमीचा. विध्वंस होणारी आपली भूमी, युद्धात आणि सततच्या दुष्काळात होरपळणारी रयत, श्रद्धास्थानांची होणारी दुरवस्था, याचा सल उरात ठेवूनच हा पराक्रमी योद्धा त्या काळाच्या निजामशाहीत वावरला.
स्वपराक्रमाने 'सरगुऱ्हो'सारख्या सर्वोच्च दरबारी पदावर गेला. शहाजीमहाराजांनी सहा वर्षे चालवलेली प्रतिनिजामशाही, स्वतंत्रपणे राज्यकारभार चालवण्याचा केलेला धाडसी प्रयत्न; पुढे त्यांच्या व जिजाऊंच्या प्रेरणेने शिवरायांनी स्थापन केलेले स्वतंत्र हिंदवी स्वराज्य– यामागे मालोजीराजेंच्या शौर्याचा, पराक्रमाचा वारसा आहे.
छत्रपती शिवरायांच्या कर्तबगारीतून साकारलेल्या सार्वभौम हिंदवी स्वराज्याचा धागा मालोजीराजेंपर्यंत जातो.
मालोजीराजेंच्या कर्तृत्वाची ओळख मराठी वाचकांना करून देण्याचा प्रयत्न आजवर झालेला नाही.
'आदिपर्व' या कादंबरीने ही उणीव भरून काढलेली आहे. इतिहासाशी प्रामाणिक राहून लिहिलेली ही अभ्यासपूर्ण कादंबरी मराठी ऐतिहासिक कादंबरीची परंपरा समृद्ध करणारी आहे.

**गगनभरारी** (पृष्ठ ४४ वरून)

गोरामोरा झाला. पुढे मंत्री झालेले अभयसिंहराजे भोसले त्या वर्गात होते. सुदैवाने एका लेब्राटने ग्रंथालयातून आणलेल्या जुन्या पुस्तकात ते वाक्य होते. हे त्याने पटकन उठून सांगताच पोर्ट्यांनी वर्ग डोक्यावर घेतला. पुढे मी शेक्सपिअरच्या गावातच अशा बदललेल्या त्याच्या नाटकांवर संशोधन करायला गेलो, तेव्हा त्या गोंधळाचे मूळ सापडले! असे योगायोग खूप वेळा कसे काय जुळतात? ईश्वरी 'लीला' आणि अस्तित्ववादाचा तुलनात्मक अभ्यास व्हायला हवा.

सकाळी कष्टाचं काम असले म्हणजे जेवण जाम व्हायचं, वर्गात जोरात पेंग यायची. एस. एस. भोसलेसर 'पवनाकाठचा धोंडी' शिकवत होते. विद्यार्थ्यांत फार लोकप्रिय. त्यात अविवाहित. वक्तृत्व कसदार. बोलणं भलतंच टोकदार. ते पुस्तकात न बघता पान क्रमांक व मुख्य मुद्दे सांगायचे. मध्येच एखाद्या विद्यार्थ्याला विचारायचे, ''सांगा पुढचा मुद्दा, प्रसंग.'' विद्यार्थी-विद्यार्थिनी कुणीही असो; उत्तर चुकले, तर बाहेर हाकलायचे. एक दिवस आमचा नंबर लागला. सुदैवाने त्यांनी नाव-गाव विचारले. ''आमच्या जिल्ह्याची लाज अशी घालवू नका, तासानंतर भेटा!'' या प्रसंगाने माझ्या आयुष्यात इंग्रजीला मराठीची जोड मिळाली. कारण भोसलेसर दररोज आमच्या मेसमध्ये वसतिगृहातील डबा जेवायला यायचे.

मराठीचा शंकर दुधाळे हा गारगोटीजवळच्या शामगावचा. धनगराच्या या पोराचं हस्ताक्षर आणि मराठी वाचनाचं वेड आगळं होतं. भोसलेसर ढीगभर पुस्तकं घेऊन यायचे. आपले लेख त्याच्याकडे पुनर्लेखनासाठी द्यायचे. गोनीदांच्या कादंबऱ्यांवरचे त्यांचे लेख 'महाराष्ट्र टाइम्स'च्या पुरवणीत शंकर सारडांनी छापले होते. त्या सारडांना भेटायला दुधाळे मला एकदा घेऊन गेला होता. प्रा. बळवंत देशमुख डान्स करीत मराठी शिकवायचे. त्यांच्या कविता अधूनमधून प्रसिद्ध होत. कॉलेजच्या नियतकालिकात त्यांनी माझा 'श्रमाची झाली फुले' हा लेख छापला. हे माझे पहिले लेखन. भोसलेसरांनी वक्तृत्व स्पर्धांत भाग घ्यायला लावला. पानवळसरही मार्गदर्शन करायचे. भगरेसरांनी लेबर स्कीमचा आदर्श विद्यार्थी व वक्ता म्हणून बक्षिसे दिली. बेळगावच्या गोगटे ढाल स्पर्धेत मला उत्स्फूर्त भाषणात पहिला नंबर मिळाला. प्राचार्य उनउनेसाहेबांनी मी परतायच्या आत कॉलेजच्या गेटवर लावलेला तो अभिनंदनाचा मोठा बोर्ड मला आजही खुणावतो. त्यांनीच शुद्ध मराठी न बोलता येणाऱ्या अडाणी पाटलाच्या पोराला जगभरच्या नामवंत विद्यापीठांत इंग्रजीत बोलण्यासाठी दरवाजे खुले केले. हे ऋण मी वेळोवेळी माझ्या ग्रंथांच्या अर्पणपत्रिकांत फेडलेले दिसेल. पुढे पानवळसर प्राचार्य झाले. त्यांनीच मला युरोपला पाठवले. फार मोठी मदत केली.

ते सामाजिक चळवळी व वाङ्मयीन वादांचे मंतरलेले दिवस होते. कुसुमाग्रज, रणजित देसाई, माडखोलकर अशा दिग्गजांची भाषणे व्हायची. यशवंतराव चव्हाण, एनडीसर, शरदराव पवार, धनंजयराव गाडगीळ ही संस्थेशी संबंधित मंडळी होती. संस्थेच्या आजीव सेवकांच्या बैठका कॉलेजवर व्हायच्या. तेव्हा त्यांची सेवा लेब्राटांनाच करावी लागे. बऱ्याच नामवंतांना त्यांनी टोपण नावे ठेवली होती. त्यातील काही ग्रहांना घाबरून राहावं लागे. पण लेब्राटचं खरं स्पिरिट हळूहळू कळू लागलं.

अण्णांच्या या जनतेच्या रथाचे धारकरी, ही नशाच और होती. छिद्रान्वेषाचे ते वयही नव्हते. मला सगळेच थोर वाटत. याचा अर्थ लेब्राट हे अण्णांच्या विशिष्ट तत्त्वज्ञानामुळे लोचट झाले नाहीत. अंघोळीनंतर एका आजीव सेवकानं बापू तेल्याला अंडरपॅन्ट धुवायला सांगितलं. तो प्राचार्यच शिष्ट असावा. पोरांनी ठरवलं, अंडरपॅन्ट वाळत घालताना आत थोडी खाजकुयली लावायची! पण कुणीतरी पीजी सरांच्यापर्यंत ती बाब नेली, त्यांनी ते काम स्पष्टपणे नाकारायला पाठबळ दिले आणि अनर्थ टळला!

उडदामाजी काळे-गोरे असणारच, हे उमगू लागले. पण माणसं समजून घेण्यातला भाबडेपणा तसाच राहिला.

एफ.वाय.नंतर कोयना धरणावर कारकुनाच्या नोकरीसाठी मुलाखतीला गेलो. लेखी परीक्षेनंतर तोंडी मुलाखत घेणारे देशपांडे आडनावाची पाटी असणारे सावळे जाडे गृहस्थ होते. त्यांनी सुरुवातीलाच सांगितले,

''पाटील, तुम्हाला मार्क्स चांगले आहेत. हस्ताक्षर उत्तम. करिअर अर्ध्यात सोडू नका. पदवी सहज मिळवाल.''

''सर, घरची परिस्थिती...''

''ती काही असो. मी कोल्हापूरचाच आहे. मी गोखले कॉलजचे प्राचार्य एम. आर. देसाईंना पत्र देतो, ते तुम्हाला मदत करतील.''

''मी नोकरी करीत परीक्षा देईन...''

''या चरकात ते शक्य नाही. मला तुम्हाला नेमणूक पत्र द्यावेच लागेल, पण इथं येऊ नका...''

ऑर्डर गावी आली. दारुड्या भाऊ पाटील बाबांना दम भरायला आला. 'नोकरी करायची नाही आताच', ही त्याची 'ऑर्डर' पास झाली. आजोबा चार वर्षांपूर्वी वारले. खाते फोडायला तलाठी देशपांड्यांनी फक्त शेर-अडशिरी भुईमुगाच्या शेंगा वडिलांकडं मागितल्या होत्या. 'दोन देशपांड्यांचा शोध' हा लेख मी पुढे लिहिला. मला एकदाच भेटलेली गुणी माणसं, हा एक वेगळा विषय आहे.

नामदेव दुंगडेकर माझा खरा स्पर्धक. माझा वरचा, क्रमांक एक टिकवायचा म्हणून मी ईर्ष्येने संख्याशास्त्र हा विषय त्याच्याबरोबर घेतला. आयत्या वेळी परीक्षा हॉलमध्ये सूत्रे आठवेनात. एस.वाय.ला ते दोन पेपर मागे ठेवले. हे अपयश पचवले. पीजी सरांची बदली कराडला गतवर्षीच झाली होती. त्यांना इंग्रजी स्पेशलचा वर्ग

चालवायला हुशार विद्यार्थी हवेच होते. तीन वर्षे साताऱ्याला काढल्यानंतर पुढची एम.ए. पर्यंतची तीन वर्षे मी एस. जी. एम. कॉलेजचा विद्यार्थी होतो. तेथून मी स्टॅटचे दोन पेपर्स ऑक्टोबरला दिले. ८४% मार्क्स पडले. त्यामुळे टी.वाय.ला इंग्रजीत विद्यापीठात दुसरा नंबर आला. स्कॉलरशिप मिळाली. कराडच्या रोटरी क्लबच्या वक्तृत्व स्पर्धेत पहिला क्रमांक मिळाला. या साऱ्या आठवणी १२ मार्चला यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या समाधिस्थळी प्रमुख पाहुणा म्हणून भाषण द्यायला जाताना सलग आठवत होत्या. मोठ्या भूकंपात मी कराडच्या वसतिगृहात होतो; तोच कोयनानगरला क्लार्क असतो तर? त्या कॉलेजचे नावच सद्‌गुरू गाडगेमहाराजांचं होतं. त्याने मला पुढे डॉ. पंजाबराव देशमुखांच्या प्रबंधाच्या मराठी अनुवादासाठी गोव्यातून अमरावती विद्यापीठात नेले. अण्णा आणि बाबांची पुण्याईची शिदोरी आजही उपयोगी पडते. डॉ. देशमुखांचा प्रबंध १९३३ मध्ये ऑक्सफर्डने छापला होता, हे फार उशिरा कळले.

'सगाम'मधील काना काढून अनुस्वारात बदलावा आणि 'संगम' करावा, एवढे सांस्कृतिक संगमाचे ते एक प्रतीक आहे. त्याला शेजारच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधील श्रीमंताची बाळे 'मठ' म्हणायची. दोन दाढीधारी थोर पुरुषांच्या अपूर्व कर्तृत्वाचा तो संगम होता. पुण्याच्या हमालांच्या घामाच्या पैशातून त्या कॉलेजचे डिपॉझिट पुणे विद्यापीठाच्या तिजोरीत गेले, तेव्हा त्याची परवानगी मिळाली होती. शिवाजी कॉलेजपेक्षा इथले वातावरण फार वेगळे होते. यशवंतराव चव्हाण यांच्याविरोधी निवडणुका लढवणारे वकील केशवराव पवार स्थानिक समितीत होते. सर्व जाती-धर्म व राजकीय पक्षाची मंडळी एकत्र यायची. हा चव्हाणसाहेबांचा हुकमी मतदारसंघ. पण कॉलेजमधील वातावरण मात्र काँग्रेसविरोधी वाटायचे. शेजारी सायन्स कॉलेज 'साहेबांनी'च काढायला लावले, असा प्रवाद होता. वसतिगृहाची इमारत छोटी होती. गावाबाहेर ते असल्याने वाहतुकीची सोय नव्हती. प्र. के. अत्र्यांचे समकालीन व संस्थेचे आजीव सदस्य 'काका' सुभेदारसाहेब हे उपप्राचार्य होते. संस्थेत हायस्कूलचे हेडमास्तर व आजीव सेवक तसेच संगीतकार श्री. जोशी होते. ही जोडी नेहमी कोटात असायची. बहुजनांत विरघळलेले ब्राह्मण, अशीच त्यांची प्रतिमा होती. सुभेदारसाहेब वक्तृत्व स्पर्धांत मला भाग घ्यायला लावायचे. सुभेदारकाकी फार साध्या व प्रेमळ होत्या. धिप्पाड सरांना निद्रानाशाचा विकार होता. त्यामुळे त्यांचे वाचन दांडगे होते. पहाडी आवाज, अजस्र देह आणि गोरा रंग यामुळे ते परग्रहावरचेच वाटत. रातराणीच्या वासाची त्यांची ॲलर्जी भयानक होती.

मुलींचे वसतिगृह तेव्हा नव्हते. पण प्रा. सुमन पाटील स्वत:च्या निवासातच जवळच्या छोट्या खोल्यांत पंधरा-वीस मुलींची सोय करायच्या. त्याला खोडसाळ पोरं शादीसुमनी मंडळ म्हणायची. बाईंचा मराठी विषय आणि लोकगीतांचं वेड, खेड्यापाड्यांत संचार आणि स्वच्छ उच्चार यामुळं त्या लोकप्रिय वक्त्या झाल्या. त्यांच्याबरोबर तरुण प्रा. एम. ए. शेख (इंग्रजी) व प्रा. वसंतराव मोरे यांचे त्रिकूट जमले. अशा तत्कालीन गुरूंच्या शेजारी ट्यूटर म्हणून बसायला मिळेल, असे मलाही वाटले नव्हते. कर्जाऊ व मेरिट अशा दोन्ही शिष्यवृत्त्यांनी मला मोठा आधार दिला, पण ते पैसे वर्षाच्या शेवटी मिळायचे. नडले मात्र कधीच नाही. 'लेब्राट' म्हणून आता कुणी बोलवत नव्हतं, पण मेसचं जेवण फारच कमी दर्जाचं वाटे. वसतिगृहातील मुलांच्या आठवणी लिहायला हव्यात. मोठा ग्रंथच होईल. भूकंपग्रस्तांना अन्न व वस्त्रे पुरवण्यासाठी काढलेली कराडमधील फेरी, नाट्यप्रयोगाची खपवलेली तिकिटे, खेळ-स्पर्धांत चिअर-अपसाठी काढलेली सोंगे वगैरे फारच धमाल उद्योग होते. पण स्कॉलरशिपचे पैसे वारांगनांवर उधळणारे महाभाग मी रेक्टर झाल्यानंतर पकडले होते. सोन्यातच गुण नसला, तर गुरुजी लोखंडाचं काय करणार?

इथे लेबर स्कीम नव्हती, पण पीजीसर निवडक मुलांना किरकोळ कामे द्यायच्या सूचना मानेसरांना द्यायचे. रेक्टर मानेसर मराठीचे. त्यांना सगळे संत मानेच म्हणायचे; एवढे त्यांचे बोलणे, चालणे, वागणेही संथच होते. तत्त्वज्ञानाचे ज. रा. दाभोळेसरांचे संथ, शुद्ध बोलणे हा एक चर्चेचा व त्यांचे नाटकाचे दिग्दर्शन हा गमतीचा विषय होता. अर्धग्रामीण असं हे कॉलेज. सैदापूरच्या कॅनॉलच्या काठानं मी एकटाच पार संगमाजवळ जायचो. स्वप्नं साधीच. हायस्कूल मास्तर किंवा जास्तीत जास्त प्राध्यापक. प्रशासकीय सेवेत स्पर्धा परीक्षेत उतरून जायचं कधी मनात आलंच नाही. आमचे काही समकालीन फौजदार-अंमलदार झाले. विशेषत: पाटण तालुक्यातील जास्त मुलं बाळासाहेब देसाईंमुळे अधिकारी झाल्याचा प्रचार होता. पण मोटारभाड्यालाच पुरेसे पैसे नसल्यानं परीक्षा देत बसायचं साधं सुचलं नाही. सहज त्यात पास झालो असतो. खेळ आणि वेळेचं गणित कधी जुळलंच नाही. हुशार/स्कॉलर शिक्का मात्र कायम होता. त्यामुळेच कदाचित पुढे शिवाजी कॉलेजवर लेक्चरर झाल्यावर एकदा एन. सी. ऑफिसरसाठी 'रिजेक्ट' झालो असेल. 'अेडी' जगताप व 'आरके' शिंदेंनी नाव सुचवूनही त्या क्षेत्रात बाद ठरलो. जगतापसर फिजिकल डायरेक्टर. 'बुलेट' वापरणारा बागणीकर जबरदस्त माणूस पुढे आमचा शेजारी झाला. त्यांचं नाव 'बुलेट' पडलं होतं. विकृत, व्यसनी वगैरे नमुने खूप पाहिले. काहींनी पुढे मला छळलेही.

कॉलेजच्या मुलांची टोपण नावं देण्याची कल्पकता आणि संस्कृती यावर खरं तर प्रबंध व्हायला हवा. साताऱ्यापेक्षा इथं ही टोपण नावं फार वेगळी होती. साताऱ्याला राजधानीचं पर्यावरण होतं. थेट आजीव सेवकांना मालिशवाला, विमानपट्टी, होल्या व्हल्चर, चमच, स्पून्या आणि त्रिव्हीलर असली चमत्कारिक

नावे होती. इथं ते सरंजामदारी वारं नव्हतं. कार चुकूनच कॉलेजवर पाहिली असेल. सायकलीच जास्त. नाटकांत काम करणारी हिरोईन सर्वांत सुंदर वाटायची, मेकअपमुळे! फिशपॉन्ड्स असेच– म्हशी, बैल, वांगी, चवळी, झेंडू, येरंड वर्गातले. संपूर्ण कॉलेज या रूपकात बसायचं. पैलवान शिवा फाटक नि तान्या चव्हाण माझे वर्गमित्र. तान्या साला पैलवान असून अशी चटपटीत नावं देण्यात आणि माणसं पारखण्यात फार पटाईत. शिवा फौजदार झाला, तेव्हा त्याचा फेटा बांधून जंगी सत्कार झाला. बागायतदाराचं बाळ घोड्यावरून दौडतच कॉलेजात आलं होतं. मी प्राचार्य झालो कोपर्ड्याला आणि त्याच्या हस्ते कुस्तीगिरांचा सत्कार ठेवला. योगायोगाची मालिका फार मोठी आहे.

तान्या पुढं प्राध्यापक झाला इंग्रजीचा. पण स्थलांतरं करीत सहकारी बँकेत घुसला. प्राध्यापकांना मुरम्या, क्रॉसग्रास, पटमार, तबला, चिरफाळ्या इ. आणि लेडिजना लिंगक्रिप-झिंग, लेट-रिंग, टेल-रिंग, झिग-झगा-झॅग अशी इंग्रजी शब्दांची त्याची भन्नाट रूपांतरं फक्त आमच्या ग्रुपलाच कळायची. तो अभ्यास दिवसा कधीच करताना दिसला नाही. पण त्याला मार्क्स चांगले पडायचे. उंच, लुकडा गडी; फार तगडा नव्हता. परधर्मीय पोरीत गुंतला होता म्हणतात. सातारच्या बऱ्याच गमती सांगायच्या राहिल्या. जे. एस. पाटील आमच्या वसतिगृहाचा मार्केटिअर लेब्राट. सायकलनं भाजी टाकायला जायचा. लेडीज होस्टेलची कॅशिअर राधा खरात फारच गच्च आणि देखणी. पोरं तिच्यावर मरायची. हा उंच, गोरापान, नाकेला, देखणा पाटील. कर्मवीर अण्णांनी अनेक आंतरजातीय विवाह लावले होते. तो धागा पकडून पोरं जेएसला चिडवायची. त्याचं नावच 'किसन' पाडलं. 'राधा तुझ्याकडं का बघते?', 'अरे, तुझ्या गावची माहिती आमच्या गावच्या मालतीला विचारत होती' अशा फिरक्या ठरवून सुरू झाल्या. एका चौकडीनं त्याला असा फुलवत एवढ्या उंचीवर नेला की, तो रात्री झोपेत चाळवायला लागला. 'राधा ऽ मी तुझा किसन, भाजीवाला ना... लेब्राटवाला. डिअर कम निअर, उद्या येणार मार्केटिंगला?' तिच्या रूमकडे त्याच्या फेऱ्या वाढल्या. ती बी. ए. झाली; हा नापास! 'नाटक बसतं आहे'मध्ये मला माधव सायनाकरनं नाटककाराची भूमिका दिली. 'Hostel Day' समारंभात ते सादर केलं. पुढं मी नाटकावर पीएच.डी. केली; कन्येनेदेखील!

कराडला एक संकट माझ्या स्कॉलर प्रतिमेवर आले. एस. के. थोरात नावाच्या मुलाने अचानक टी. वाय. स्पेशल इंग्लिशच्या वर्गात अचानक प्रवेश घेतला. तो म्हणे, कोल्हापूरला कॉलेजला होता. मध्येच हायस्कूल टीचर झाला. त्याची इंग्रजीची संपूर्ण डिक्शनरी तोंडपाठ होती. लोकमान्य टिळकांची कुणी परीक्षा घेतली की नाही कोण जाणे, डिक्शनरी पाठ केल्याची; पण मी एक दिवस घाबरून त्या धीर-गंभीर 'मंक'च्या खोलीत गेलो. माझ्या पहिल्या नंबरला धोका होता. शिवाय हा 'घोक्या' वसतिगृहात माझी झोप उडवायला आमच्याच विंगला टपकला होता. मी शब्दकोश पाठांतराचा विषय काढताच त्याने अंगावरचा एखादा किडा झटकावा तसं मलाच टिचकीनं उडवलं. पीजीसरांसारख्या एकपाठी बॅरिस्टरला त्यानं पहिल्याच भेटीत कशी डिक्शनरी शोधायला लावली, तो प्रसंग मोठ्या थाटात ऐकवला. इंद्राचीच ही अवस्था, तिथं या पामराचा– ऐरावताचा काय टिकाव लागणार? तो नेहमीच शब्दकोश जवळ ठेवायचा. त्याने तो माझ्या दोन मित्रांसमक्ष समोर फेकला. ''विचारा एक शब्द– त्याच्या मागचे-पुढचे दहा शब्द सर्व स्पेलिंग, त्याचे पोटशब्द अर्थासह सांगतो.'' आम्हाला अवघड वाटणारे सारे शब्द विचारले. टेपरेकॉर्डर वाजवल्यासारखी उत्तरे मिळत गेली. माझ्या काळजाने ठाव सोडला. आता आपलं काही खरं नाही! त्यात स्टॅटची दोन पेपरांची थकबाकी माझ्या डोक्यावर होती. नववर्षारंभी त्यात ८४% मार्क्स मिळाल्याचे कळले. तो सरासरीत माझ्याजवळ येणे कठीण होते. पण इंग्रजीच्या सर्वच पेपरमध्ये पुढं गेला, तर काय? आम्ही एकूण तेरा जणच वर्गात होतो. एक रिपिटर मुस्लिम मुलगी कधीतरी यायची. मी सावधपणे दुप्पट जोमाने अभ्यास सुरू केला. तरी निकाल कळेपर्यंत काळजी कुरतडत होती. ईर्ष्येचा फटका मी सोसत होतो. 'डिक्शनरीवाला' हे टोपण नावच त्याला पडले होते. मॅट्रिकच्या वर्गात एका शब्दाचे स्पेलिंग व अर्थ त्याला सांगता आला नव्हता. तेव्हा शिक्षकाने मुलींसमोर त्याचा अपमान केला. त्या मुलींत त्याची कुणी राधा होती. हा त्याच क्षणी वर्गाबाहेर गेला. वर्षभर डिक्शनरी पाठ केली. त्या शिक्षकाला जाहीर आव्हान दिले. त्याची शाळेत जाऊन चांगली जिरवली. पुन्हा मॅट्रिकला बाहेरून बसला. अशा वाघाशी आता माझी निकाली झुंज होती. पण घडले भलतेच. थोरात सर्व विषयांत नापास! फक्त कंपलसरी इंग्लिश काठावर सुटलेलं. हे घडलंच कसं? या प्रश्नाचे उत्तर मला कित्येक वर्षे मिळाले नव्हते.

डॉ. निशिकांत मिरजकरांनी सेवानिवृत्तीनंतर मला दिल्ली विद्यापीठात यूजीसी व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून बोलावले, जेथे पाऊल ठेवायला मिळाले नसते, तेथे विद्वान म्हणून महिनाभर सन्मानाने राहायला, व्याख्याने द्यायला जाणे घडले. हादेखील या गाडगेबाबा मठाच्या पुण्याईचाच एक धागा आहे. मी ट्यूटर झाल्यावर लेब्राटची प्रतिष्ठा वाढली. मुलांच्या मेसमध्ये जेवण बरं नव्हतं. राहायला वसतिगृहात. शेजारच्या सायन्स कॉलेजचं वसतिगृह व 'भोज्याचं' कॅन्टीन फार चांगलं होतं. तेथे मराठीचे प्रा. मिरजकर व अर्थशास्त्राचे जाधव, कॉमर्सचे मेघे की मोघे अशा चौघांचा दाट परिचय झाला. १९६८ मध्ये पुढे गोवा विद्यापीठाकडून माझ्या ग्रंथाच्या प्रकाशन अनुदानासाठीचे हस्तलिखित तपासायला त्यांच्याकडेच गेले, हे विशेष. ते तेव्हाचे 'अेबी' पाटील या एम.ए.च्या वर्गातील विद्यार्थ्याला विसरले होते. याचाही पुरावा अंबेजोगाईला मला मिळाला. ते आनंद पाटील

'कागूद'वाला कथा, कादंबरीवर व तुलनाकाराला ओळखत होते. संयोजकांच्या पत्रात एक मार्मिक उल्लेख होता. 'दिल्लीच्या मिरजकरसरांनी तुमचं नाव सुचवलं आहे. यावेच.' मी सहकुटुंब गोव्यातून त्या तौलनिक साहित्यावरील परिषदेला गेलो. ते प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ललित मिरजकरांच्याबरोबर आले होते. मी त्यांना भोज्याच्या कॅन्टीनबद्दल विचारलं, तेव्हा ते चमकले. तो 'एबी' ते पूर्ण विसरून गेले होते. आनंद पाटील या लेखक-तुलनाकाराला मानत होते. दिल्लीत या उभयतांनी माझ्या इंग्रजीत पीएच.डी. करणाऱ्या मनीषा या कन्येचीही सोय केली. त्यांना व शंकर सारडांना मी 'तरवा' अर्पण केले. हे औपचारिक आहे. अशा गुणिजनांनी मला लिहिता ठेवत समृद्ध केलं. आश्चर्य म्हणजे, डिक्शनरीवाला थोरात दिल्ली विद्यापीठात माझा पाठलाग करीत आला. चर्चासत्रात माझं भाषण झालं. चहाच्या वेळी केरळमधल्या एका विदुषीनं जाहीरपणे कौतुक करीत काही प्रश्न विचारले, ''फॅन्टॅस्टिक! आय कान्ट बिलिव्ह इट. वॉट ए रीडिंग! ग्रेट स्कॉलरशिप. प्रथम वाटतं, हा महान लेखक-समीक्षकांची नावे फेकून प्रदर्शन करतोय. त्यावर विश्वासच बसतच नाही. कारण व्यक्तिमत्त्व 'रस्टिक' आहे. पण त्या ग्रंथांचा सर्व तपशील अंगावर कोसळत जातो. ग्रेट वॉतरफॉल नायगारा ऑफ इन्तलेक्त. हे तुम्हाला एवढं आठवतं कसं? खरोखर साठीत सेवानिवृत्त झाला आहात की नाही? इन डेप्थ स्टडी केव्हा केला एवढा?''

मला हीच प्रतिक्रिया भारतात व भारताबाहेरही बऱ्याच वेळा ऐकायला मिळालीय. सिमल्यात निवडक २१ विद्वानांचे चर्चासत्र होते. सौ. गीता माझ्याबरोबर होती. तिला विनंती करून सौ. कानन या आयएएस अधिकाऱ्याच्या पत्नीनं जेवायला जाताना मुद्दाम परिचय करून घेतला. ती तमिळ व इंग्रजीमधील मोठी लेखिका आहे. कादंबरी लिहायला तिथे आली होती. ती हसत म्हणाली, ''डॉ. पाटील, तुम्हाला इथं बोलावलंच कसं? राष्ट्रीय चर्चासत्रे म्हणजे परस्पर प्रशंसा क्लब अँड लॉबीज् गेम्स असतात. तुम्ही तर बड्याबड्यांना सोलून काढता. यू आर ॲन इन्टलेक्चुअल टेरर. ते पुन्हा कधीच बोलावणार नाहीत.'' मी म्हणालो, ''मॅडम, हे दार बंद होईल; तुमच्यासारखे नवे दरवाजे उघडतील. पृथ्वी विशाल आहे...'' मद्रासला थोर अनुवादक डॉ. इंदर, औरंगाबादला प्रसिद्ध लेखिका डॉ. छाया महाजन, चीनमध्ये भेटलेली इंग्लंडची मार्गारेट जॉली, हॉलंडमधील ड्रीमस्टॅट, जर्मनीचा हार्डर अशी कितीतरी प्रांजळ माणसांची याच प्रकारची मूल्यमापनं माझ्या खात्यावर जमा आहेत. याचे श्रेय मी माझ्यावर वाचनाचे संस्कार करणारे शिक्षक व पूर्वज शोधानंतर अलीकडे पुराव्याने पक्क्या झालेल्या आनुवंशिकतेला देतो. दैनंदिनी मी कॉलेजमध्ये वहीत लिहीत असे. पुढे वाचनाच्या नोंदी ठेवायची सवय लागली. पेज रीडिंग 'पीजी'सरांनी शिकवलं. केवळ पाठांतराने इंग्रजी भाषा व सांस्कृतिक साक्षरता अंगी बाणत नाही. मी एकटा असताना थॉमस हार्डीची 'टू ऑन अ टॉवर' एफ.वाय.मध्ये कळत नाही, म्हणून रडलो होतो. हा ध्यास मोठा होता. दीर्घ अनुभव, परदेशप्रवास व चिंतनानंतर आता कुठे आत्मविश्वास आला आहे.

पीजीसरांपेक्षा परीक्षेच्या दृष्टीने सुमतीबाईंचे शिकवणे शिस्तबद्ध व नियमित असे. परीक्षेची फी भरण्यासाठी दलित गाडेकरबरोबर मी दोन संडास उपसायचे काम केले. अशा राबणाऱ्या मुलांचे पीजीसर जाहीर कौतुक करीत. एकदा २२ सप्टेंबरला यशवंतराव चव्हाणसाहेब कर्मवीर जयंतीचे पाहुणे होते. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण होते. त्यांनी रोप लावले. तत्कालीन अर्थमंत्री यशवंतराव मोहिते झारी घेऊन पुढे सरसावले. त्यांना अडवत साहेब म्हणाले, ''अहो, थांबा. माझं सगळं पुण्य तुमच्यामागे येईल. मुख्यमंत्री व्हाल. द्या, मीच माझं रोपटं वाढवतो!'' हास्याचा तो स्फोट अजून आठवतो. अशी उत्तुंग उंचीची माणसं पाहिलीच असे नव्हे; त्यांनी अनुभवांमधून तशा प्रतिमा आमच्या मनावर ठसवल्या. माझेच उदाहरण आज महाभारतातल्या मिथकासारखे आजच्या ज्ञानविक्री केंद्रातील लाखो रुपये फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच वाटेल. माझ्याच माजी हायस्कूलमध्ये शिक्षकाच्या नोकरीची ऑर्डर मुख्याध्यापकांनी काढली होती. उन्हाळी सुट्टीत मॅट्रिकला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे जादा तास घ्यायला लावले होते. त्यातच नक्की अडकलो असतो. पण पीजीसरांनी विरोध केला. एम. ए. करायचा आग्रह धरला. काहीतरी मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

माझ्याच कॉलेजवर मला ट्यूटर फेलो म्हणून नेमणूक मिळाली. त्या निवडीचा तपशील आज संस्थेलाच नातेवाइकांची संस्थाने बनवण्याच्या काळात कल्पितच वाटेल. संस्थेत ट्यूटरच्या तीन जागा आणि अठरा अर्ज होते. त्यात आजीव सेवकांची तीन मुले आणि आधी नेमलेल्या दोघांचे एम. ए. अपूर्ण होते. त्यात सर्वांत ज्येष्ठ लाईफ मेंबर व विनावेतन दीर्घकाळ सचिवाचे काम करणारे वकील इस्माईल मुल्लासाहेबांच्या मुलीला ती संधी द्यावी, असा एकमताचा ठरावच जणू सर्व आजीव सेवकांनी केला होता. सर्व मुलाखती झाल्या, तरी कुणीच काही बोलेना. कुणीतरी मुलींच्या अर्जाचे घोडे दामटले. मुल्लासाहेबांनी क्लार्ककडचे अर्ज स्वत: चाळले. स्वत:च्या मुलीचा अर्ज बाजूला ठेवला. सर्वांत जास्त मार्क्स आणि लेब्राट म्हणून माझा अर्ज ऑर्डर काढायला सर्वप्रथम दिला. स्वत:च्या मुलीला नोकरीची गरज नसल्याचं जाहीर केलं. कुठे सापडतील आज या मुशीतील माणसं? त्यांचं नाव लॉ कॉलेजला दिलं आहे. पोवई नाक्यावर एस.टी. किंवा कार वर्तुळात वळण घेते, तेव्हा त्या थोर पुरुषाला नेहमी मनातल्या मनात पश्चिमेकडे मान वळवत हात जोडतो.

अचानक पीजीसरांची चिठ्ठी आली, 'आज टी.वाय. कंपलसरी इंग्रजीचा तास घे.' टी.वाय.बी.ए.चा कधीही तास घ्यावा लागेल, ही पूर्वसूचना होती. पण वसतिगृहातील 'एब्या' म्हणून कालपर्यंत बोलावणारे महाभाग बातमी कळताच ढोलच बडवायचे राहिले.

मी ट्यूटर शोभावा म्हणून कॉटनचा एकच पॅन्ट-मॅनिला शिवला होता. नोटबुक घेऊन वर्गात गेलो. उभा राहायला जागा नव्हती. फजिती बघायला मंडळी जमलेली. मलाही माहिती नव्हतं, की माझा हा पहिला तास फार मोठा सांस्कृतिक इतिहास घडवणारा आहे. १८५७मध्ये विद्यापीठे स्थापना होऊ लागली. बडोद्याचा अपवाद वगळता कुठल्याही विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचा प्रमुख व प्रोफेसर आजवर भोसले-देशमुख-पाटील-मोहिते निवडपद्धतीने कधीच झाला नव्हता. तो मान मला गोव्यात 'मावशीनं' आधी दिला. 'आई मरू दे' असं म्हणायचो, म्हणून शब्दश: लढल्यानंतर आईनं नांदेडला जरा मोठ्या गादीवर बसवलं! सद्गुरूच्या गादीचा हा वारसा थेट ऑक्सफर्ड, केंब्रिजच्या गाभाऱ्यात पोहोचण्याचं सामर्थ्य त्या दिवशी महाराजांच्या मठातल्या त्या मंत्रानं दिलं असावं. उत्तरवासाहतिक तुलनाकाराची भूमिका तयार होत गेली.

यशवंतराव चव्हाणसाहेबांचे दुसरे विरोधक नामवंत वकील व्ही. एन. पाटील यांचा भाचा सुहास मोहिते सायन्सचा ट्यूटर होता. पुढे तो आर्मीत गेला. माधव सायनाकर मेजर जनरल झाला. तसाच हा उमदा दोस्त. त्याच्या कॅमेऱ्यानं मी आजीचे फोटो काढले होते. ती घरातील किती मोठी ठेव आहे, हे माझी 'इच्छामरण' कादंबरी वाचलेल्यांच्या लक्षात येईल. तीच त्या मुखपृष्ठावर पन्नास वर्षांनंतर अवतरली आहे. त्याच वर्षी संक्रातीचे तिळगूळ द्यायला आम्ही पीजीसरांच्या बंगल्यावर सायंकाळी गेलो. शिपायानं दार उघडून बोलावताच आत गेलो. खुर्चीवर नीट बसायच्या आधीच तिळगूळ द्यायला सुहास वाकला. एवढ्यात सरांचा भडिमार सुरू झाला,

''बघ बघ, सुहास, नोकरी मिळून चार-सहा महिने झाले नाहीत. बापाला लंगोट मिळत नसेल. बघ ह्याचं हे थेर...''

मला धक्काच बसला. सुहास लहानपणापासून साहेबांच्या घरात वावरलेला. त्यालाही लवकर कारण कळेना. सरांच्या हातवाऱ्यांवरूनही त्याला काही बोध होईना. धाडस करून त्यानं विचारलं,

''कशासाठी त्याला एवढा झापताय साहेब?''

''अरे, या महागड्या कपड्यांची काही गरज...''

''म्हणून संक्रात फुटली त्याच्यावर? अहो सर, ही सर्वांत स्वस्त खळीच्या कॉटनची विजार-शर्टाची जोडी आहे. रेडिमेड मांजरपाटाचं जाडंभरडं कापड वापरून दिवस काढले. हेदेखील त्यापेक्षा एखाद्या आण्यानं महाग असेल.'' –सुहास.

''असू द्या. नव्या कपड्यावर धम्मक लाडू द्या त्याला. आधी खूप मिळालेत. बिचारा तिळगूळ घ्या, गोड बोला म्हणायला आला आणि मिळाला कडू कडू डोस. घ्या, तिळाच्या लाडवानं तोंड गोड करा!''

म्हणून सुमतीबाई पुढं आल्या आणि सुहासनं जोरदार हसत टाळी वाजवली. याच लाडवाच्या स्निग्धतेनं लेब्राटला रॉटरडॅमला बर्फाळ थंडीत रात्रभर जिवंत ठेवला आणि ॲम्स्टरडॅमच्या गुंडांना कात्रजचा घाट दाखवायचं बळ दिलं. प्रवासवर्णनात असे बरेच प्रसंग मी नोंदवले आहेत.

याच वर्षीच्या उन्हाळ्यात या संस्कारांनी मला आयुष्यातील सर्वांत महत्त्वाच्या सप्तपदीकडे नेले. थोरला बापू मामा आपल्या लेकीचं लगीन ठरवून बसला होता. मामा व आमच्या पिताजींचे विळा-भोपळ्याचे सख्य. इनामदाराच्या पोरीला हुंडा घेऊन पत्करणार नाही, हा माझा ठाम विचार. मामाची पोर देखणी. माझी आई कुठं एम.ए. होती? चार मित्रांना कळवून गेलो दोघेच नरसोबाच्या वाडीला. गुरुदत्ताच्या साक्षीनं लावलं लग्न. त्या काळी हा मोठा बॉम्बस्फोट होता. तेच संस्कार डॉक्टर-इंजिनिअर मुलांच्या लग्नात जपले. काहीही मागितले नाही, पण मराठा समाजच अडाणी. गंजलेल्या तलवारीनं आपल्यातल्या हत्तीचे पाय तोडून त्याचा उंदीर करण्यात त्यांना धन्यता. उलट, लेखणीची परंपरा असणारे आपल्या उंदराला झूल घालून हत्ती म्हणून कसा मिरवतात याचा अर्थ लावायचा अनुभव कॉलेजातच आला.

पुणे विद्यापीठाचे इंग्रजी विभागप्रमुख डॉ. एस. नागराजन यांची larger than life image सर्वांना माहीत आहे. मला एम.ए.ला शेक्सपिअरच्या पेपरात त्यांनी ४५% मार्क्स दिल्याने पहिला वर्ग तर गेलाच, पण टक्केवारीही कोसळली. त्यांना उद्धृते आवडत नाहीत. 'मेजर फॉर मेजर' संपादित करणारा इंग्लंडमध्ये पीएच.डी. केलेला हा त्या काळचा एकमेव विद्वान महाराष्ट्रात होता. तो दबदबा हा वसाहतवादाचा भाग आहे, हे मला ते सतरा वर्षांनंतर बर्लिन येथील जागतिक शेक्सपिअर मेळाव्यात 'भारतातील शेक्सपिअरचे स्वागत'वरील चर्चेत उतरल्यानंतर लक्षात आले. आता ते माझ्या आखाड्यात उतरले होते. मी कोल्हापूरचे खासबाग पाहिलेला माणूस. तौलनिक साहित्य हा माझा खास प्रांत. त्यांचा पहिला वर्ग घालवण्याची संधी अज्ञात शक्तीने मला दिली, तिचे मी आभार मानले. मी भलत्याच आनंदात होतो. पण नागराजन किती उंचीचा व मोठ्या मनाचा माणूस आहे, हे काही वर्षांनी बंगलोरला केंद्रीय साहित्य अकादमीने घेतलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात लक्षात आले. आता हा डरकाळ्या फोडणारा वाघ पार थकला होता. त्यांनी व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' व कन्नडमधील कादंबऱ्यांवर पेपर सादर केला. मी शांतपणे बसून राहिलो. नंतर त्यांचे अभिनंदन केलं. या वयात वाचन-चिंतन ताजं ठेवल्याबद्दल थोडं चांगलं बोललो. बर्लिन त्यांच्या लक्षात असावं. ''आनंद, तू तुलनाकार. तुला माडगूळकरांविषयीचे मुद्दे कसे वाटले? एकही प्रश्न का विचारला नाहीस? मला तुझ्या प्रगतीविषयी आनंद वाटतो, उत्सुकता असते...'' मी आदराने त्यांच्यापुढे नतमस्तक झालो. याला कुठल्या 'लीला' म्हणायचे?

काही वर्षांपूर्वी शिवाजी कॉलेजचा माजी विद्यार्थी म्हणून 'नॅक' मूल्यांकन समितीसमोर हजर राहण्याविषयी पत्र आले. मी पूर्वीचे उपकार स्मरून नांदेडहून साताऱ्याला स्वखर्चाने गेलो.

पण मी स्वत: नॅक पीअर टीमचा सदस्य आहे, हे कुणालाही सांगितले नाही. एक मोठा ग्रंथ 'लेब्राट' नावाने लिहायला मित्र सांगतात. तसे अनुभवही खूप आहेत. मात्र, दोन्ही कॉलेजनी दिलेल्या शिदोरीला मी सेवानिवृत्त झाल्यानंतर अपघातानेच वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. हे सगळे काही कादंबऱ्यांत मांडावे लागेल. ही साधी झोंबा-झोंबी नाही. आजवर सातत्याने चाललेला प्रारंभी उल्लेखिलेला clough च्या कवितेतील झगडा आहे. हा struggle माझ्या समग्र लेखनात पाझरला आहे. इंग्रजीतील चार व हिंदीत अनुवादित झालेल्या दोन ग्रंथांमधून तो भारतभरच नव्हे, तर जगभर पसरला आहे. उदा. गोव्यातील गोम्सची 'द ब्राह्मण' व लॅम्बर्ट मस्कऱ्हेनासची 'सॉरोइंग लाईज माय लँड' या दोन कादंबऱ्यांवरचा तौलनिक लेख कॅनडातील जगप्रसिद्ध 'एरियल'मध्ये प्रसिद्ध झाला. न्यूयॉर्कजवळच्या ऱ्होड्स आयलंड विद्यापीठातील (निग्रो) ब्लॅक प्राध्यापकाच्या पत्रामुळे मला अत्यानंद झाला. कारण त्याने लॅम्बर्टची कादंबरी पाठ्यपुस्तक म्हणून नेमायला मागितली होती. तशी ती नेमली गेली. परवाही पोर्तुगालहून त्या लेखासंदर्भात ई-मेल आला. वळचणीचं कुठलं पाणी कुठल्या आढ्याला कसं गेलं? ही साधी सक्सेस स्टोरी किंवा थ्रिलरचा ट्रेलर नाही. सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतराचे पुरावे आहेत. मात्र, त्या संदर्भातच एका प्रसंगाने आरपार बदलून गेले. आजवरच्या जगण्याचेच सारे संदर्भ बदलले.

चारच महिन्यांपूर्वी घरच्या कामासाठी तालुक्याच्या मामलेदार कचेरीत गेलो होतो. ''साहेब, इकडं कुणीकडं वाट चुकलात?'' बांबवडे हायस्कूलमधील वसंतराव ज्ञानदेव शिंगण मला विचारीत होता. गडी माझ्या पुढच्या वर्गात घोटीव बैदुलागत होता, तसाच सत्तरी जवळ आली तरी घोटीव. मोडीतज्ज्ञ म्हणून अनेक लोकांना मदत करीत असल्याचं त्यानं सांगितलं. पाच मिनिटांत त्याने माझ्या पूर्वजांचे १९१० पासूनचे 'संकपाळ-पाटील कुणबी' नोंदीचे उतारे दाखवायला आणले. ते मला अर्धशतकापूर्वीच मिळाले असते तर? मला लेब्राट व्हावे लागले नसते. पीएच.डी. लवकर झालो असतो. गोव्याला जावे लागले नसते. मुलं सहज एम.बी.बी.एस., आयआयटी झाली असती. परदेशी गगनभरारीची परंपरा समृद्धीकडे वळली असती. जणू मी शेख महंमदचाच वारस बनलो. एवढ्यात त्याने उताऱ्यातील मोडी तपशील समजावून दिला. शिवाजीमहाराजांच्या काळचा ताम्रपट, शाहूमहाराजांच्या चार सनदा आणि पाटीलकी या नोंदी दाखवल्या. ती कागदपत्रे कोल्हापुरातील पुराभिलेखा विभागातून काढायला सांगितलं. 'ओबीसी' जात प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाला जोडण्याकरिता उताऱ्यांच्या नकला झेरॉक्स मशिनवर काढायला शिपायाला पाठवलं.

बाबूराव बागूलांची 'जेव्हा मी जात चोरली होती' ही कथा वाचली होती; पण 'माझी जेव्हा जातच हरवली होती', त्याचं काय? त्याला जबाबदार कोण? मला हे सगळं काम्यू व काफ्काच्या absurd विसंगत, तर्कदुष्ट संदर्भहीन पात्रासारखं वाटू लागलं. 'द कासल'मधील नायक 'के'ला आपणाला इथं कुणी, कशासाठी, का नोकरीला आणलंय; हे शेवटपर्यंत कळत नाही. लेब्राट म्हणून राबत असता 'बेसकाट'ना खासगीत सवर्ण मुले 'सरकारचे जावई' म्हणायची. स्कॉलरशिपचे पैसे मिळताच सारं वसतिगृह झगमगून उठायचं. सारे लेब्राट सदैव मळकट-फाटक्या कपड्यांत. १२००च्या खाली फी सवलतदेखील नसती तर? आता या ओबीसी जात प्रमाणपत्राचा उपयोग काय? नातवंडं क्रिमी लेअरमध्ये. नेमकी क्रीमच त्यांच्या आड येणार. सरकारी धोरण आणि आपल्या जगण्यातला संबंध कसा लावायचा? दिवसेंदिवस ही ॲबसर्डिटी वाढतच चाललीय.

पुराभिलेखा विभागातील उत्साही गुडमॅनर्ड गणेश खोडके यांनी दफ्तरातील मोडी कागदपत्रे पुढे मांडत कॉफीची ऑर्डर दिली. फार वर्षांनंतर एवढे आदरातिथ्य करणारे दोन तरी अधिकारी कोल्हापुरात भेटले! दुसरे नामवंत कलेक्टर लक्ष्मीकांत देशमुख. लेखक ही आमची एक वेगळी 'जात'. तीच मला जगभर जास्त उपयोगी पडली आहे. यातील 'पूर्व दिव्य भव्य ज्यांचे'चा पुरावाच माझ्यासमोर होता. त्या नकलांतील एका दत्तक प्रकरणातील दाव्यात 'वंशावळ' दाखल केली होती. तो खटला पूर्वजानं जिंकला होता. शुद्ध बीज नसल्यानं दत्तक विधान फेटाळण्याचा तो दावा राजदरबारी मान्य झाला होता. आजी शतायुषी होती. वडील आज नव्वदीत हरभरे कडाडाऽ फोडतात. माझे दोन दात काढलेत! वडिलांची जन्मतारीखसुद्धा या नोंदीत सापडली. आता लख्ख प्रकाश पडत चालला. वडील एका घराला 'कडव्यांची निपज' का म्हणत, हे उमगलं. मामाचं आडनाव महाडिक-पाटील मला माहीत होतं. तिसऱ्या पिढीत आमचा घरोबा माझ्या लग्नामुळं जुळलेला. वंशावळीत 'कुरवाडी' असा स्पष्ट उल्लेख होता. मी ॲलेक्स हॅलेपासून बराक ओबामांपर्यंत अनेक ब्लॅक लेखकांचे पूर्वजशोधावरील ग्रंथ वाचले आहेत. या कागदपत्रांनी माझं संपूर्ण भावविश्वच ढवळून काढलं.

आमचा जाधवर नावाचा एक वंजारी मित्र साताऱ्याला लेबर स्कीममध्ये होता. मुख्यमंत्री वसंतराव नाईकांनी हा समाज श्रीमंत असल्याने त्यांना सवलती नाकारल्या. जाधवर त्यांना रोज शिव्या द्यायचा. त्याने जात प्रमाणपत्रावर 'व'चा 'ब' केला. सवलती मिळाल्या. पण तो हायस्कूल मास्तरच राहिला. मी एम.ए. करीत असतानाच वसतिगृहाचा मानसेवी रेक्टर झालो. डी. जे. भालेकरसर एकदम नाकासमोर जाणारा गरीब माणूस. त्यांचे इंग्रजी व्याकरण ए-वन. ते वसतिगृहातील मुलांच्या कटकटी माझ्यावरच सोपवायचे. वायदंडे नावाच्या मुलाने एकाचा बूट चोरला. ती चोरी शोधण्यात यश आले. पहिल्याच वर्षी प्रवेश घेतलेला 'पेइंग'सीटमधला झकपक संजय साबळे मध्यरात्री आमचं दार ठोठावत आला. फारच घाबरला होता. त्याच्या सिनिअर पार्टनरनं त्याला नको तिथं नेला होता. गौतम कांबळेबद्दलचे प्रवाद माझ्या कानी आले होते. आता पुरावाच समोर आला.

संजय तपशील सांगायला घाबरत होता. त्याला वेश्येकडे सोडून संजय गुल झाला. तिने कपडे उतरवताच हा घाबरला. अर्ध्यात खेळ सोडल्याची शिक्षा मिळणार म्हणून आमच्या आश्रयाला आला. कांबळेनं त्या रात्री गावी पलायन केल्याचं दुसऱ्या दिवशी कळलं. त्याच्या पुढचं टोक पुढे मला गोव्यात बघायला मिळालं. महामंडळाचा संचालक झालेला बेसकाट मित्र कॅब्रेला चलायचा मला आग्रह करीत होता. त्यावर मी कथाच लिहिली आहे. या 'लीला' सर्वच जातिधर्मांत सुरू असतात. त्यांचा व पाश्चात्त्य ॲबसर्ड व अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा तुलनात्मक अभ्यास व्हायला हवा. सवलती माणसं बिघडवतात, असा अमेरिकेचा दावा आहे.

जातीयवादाचे चटके मला फार बसले. होरपळलो तरी माघार घेतली नाही. भल्याभल्यांचे पितळ उघडे पाडले. पेन्शन मंजुरीच्या आड ही 'जात' व प्रदेश आलाच. आता 'यशवंतराव चव्हाण आणि त्यांचे विश्वसाहित्याचे वाचन' या विषयावर ग्रंथ लिहीत आहे. त्या आधी पंजाबातील प्रकाशकासाठी लिहिलेल्या ग्रंथात ''Comparative castealisation : self and other in Indian Literature'' या सैद्धांतिक लेखाचा समावेश केला आहे. हे भारतातील पहिले वेगळे सिद्धांतन ठरावे. इथे मला यशवंतराव चव्हाणांच्या आदर्शांनी धीर दिला. कॉलेजजीवनात जवळ असूनही त्यांच्याबद्दल फारसा आदर नव्हता. आज मला मराठी साहित्यातील 'यशवंतरावच' व्हावे, असे वाटते. माझ्या ग्रंथाला अमेरिकेतील प्रख्यात तुलनाकार स्टीव्हन टोटोसी प्रस्तावना लिहीत आहेत. ह्या कासवाच्या शर्यतीला जात प्रमाणपत्रानं नव्हे, तर 'लेब्राट'च्या संचितानं बळ दिलं. कथाकार शंकर पाटलांनी 'कागूद'वाला पाटील 'ग्रामीण साहित्याचा उगवता सूर्य' म्हटलं होतं. कागूदचा नायक लेब्राट आहे. 'मदं'नी 'इन्टरनॅशनल पाटील केलं.' मी अजूनही विद्यार्थी आहे. गेल्याच वर्षी फिल्म इन्स्टिट्यूटचं रसग्रहण शिबिर केलं. 'अ'ज्ञानही पाहिलं. श्रम योजनेनं ताठ कणा, प्रखर बुद्धी, चांगलं वक्तृत्व आणि सामाजिक भान दिल्यामुळं ही उमेद टिकून आहे. अनेक मर्यादा मान्य करूनही कॉलेजनं जे दिलं, तेच मला गगनभराऱ्यांत 'तारक' ठरलं आहे. शेक्सपिअरचं एक वाक्य मला नेहमी आठवतं :

Things won are done,
Joy's soul lies in doing.
Troilous and Cressida (1602)

**प्रा. डॉ. आनंद पाटील**
२०२, 'प्रतिक्षा', सर्वे नं. ९६,
कोथरूड, पुणे ४११ ०३८
मो. नं. ०९८२३७७०४३५
dr_anandpatil@rediffmail.com

**मना सर्जना**

२री आवृत्ती

**डॉ. अनिल गांधी**




**२००रु.** पोस्टेज २५रु.

मानवी जीवन 'त्रिमित' आहे. जीवनाला लांबी (वय), रुंदी (प्रकृती) आणि खोली (इतरांसाठी तुम्ही काय केले) आहे. माणसाचे खरे मोठेपण या तिसऱ्या मितीवर ठरते. अशा व्यक्ती समाजात चारित्र्यसंपन्न आणि आदर्श ठरतात. त्याग, साधेपणा, इतरांच्या गरजांची जाणीव अशा अनेक पैलूंचे दर्शन ज्यांच्या व्यक्तिमत्त्वातून घडते, त्यापैकी डॉ. अनिल गांधी 'कनिष्ठिकधिष्ठित' आहेत.

त्यांच्या या पुस्तकात त्यांनी आपल्या वैद्यकीय विषयाखेरीज, आर्थिक गुंतवणूक, व्यावसायिक नीतिमत्ता, पृथ्वीची व्युत्पत्ती, आदिवासींसाठी आश्रमशाळा, महाराष्ट्र टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अशा इतरही विषयांवरील आपले चिंतन व्यक्त केले आहे.

एकूणच ही आत्मकथा मननीय, चिंतनीय आणि वाचनीय अशी आहे.

**– डॉ. ह. वि. सरदेसाई**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,**



# वाचक कुठली पुस्तके घेतात? कुठली पुस्तके वाचतात?

## एक अनौपचारिक पहाणी

या दिवाळी अंकासाठी आम्ही एक स्पर्धा जाहीर केली होती. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली होती.  अट एवढीच होती की इ.स. २००९-२०१० मध्ये एकापेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत. वाचकांनी खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे (जास्तीत जास्त दहा) पोस्टकार्डावर लिहून कळवावी. असं सांगण्यात आले होते.

वाचकांनी या स्पर्धेला भरघोस प्रतिसाद दिला. जागेच्या अभावी सर्वांची नावे आणि पुस्तके येथे देता येत नाहीत. लॉट टाकून निवडलेल्या ३० वाचकांनी कळविलेल्या पुस्तकांची नावे येथे देत आहोत. त्यापैकी पहिल्या दोघांना प्रत्येकी १ हजार रुपयांची पुस्तके पुरस्कार म्हणून पाठवण्यात येतील. यादीतील पुढच्या पाच स्पर्धकांना प्रत्येकी उत्तेजनार्थ ३००रु.ची पुस्तके देण्यात येतील. त्यांनी आमच्या सूचीतून त्या पुस्तकांची नावे कळवावी.

या पहाणीतून निघणारे निष्कर्ष उद्‌बोधक ठरतील.

**भाग्यवंत विजेते (२)**

नॉट विदाऊट माय डॉटर, बॉर्न कन्फ्यूज्ड, द सिमिऑन चेंबर, चौघीजणी, संभाजी, आय डेअर, ज्ञान तेचि देव, झोंबी

**सौ. लता विद्वांस,**
९३,लोकमान्य नगर, इन्दौर ४५२ ००९.

विद्यार्थी असा असावा, शिक्षण घेता-देता, माझी जन्मठेप, ययाती, चला, प्रयोग करूया!, आई, गणगोत, मी कसा झालो?, गुणवान मुलांचं संगोपन, अमृतवेल

**सौ. राधिका मुकुंद पांडे**
घर नं. १९, कलोती नगर, अमरावती ४४४ ६०६

**उत्तेजनार्थ (५)**

कहाणी २ भावांची,  बंडखोर बंडू, माता वैष्णोदेवी, एका पानाची कहाणी, राक्षसांच्या गोष्टी, संत गाडगेबाबा, जातक कथा, स्वामी विवेकानंद, गोष्टीरूप श्रीरामजन्म, श्रीसदगुरू ब्रह्मानंदबुवा महाराज चरित्र

**सौ. मंगल नरसिंह कुलकर्णी,**
दवबिंदू आश्रम सोसा., विजयनगर (प) वानलेसवाडी.

नॉट गॉन विथ द विंड, नोबेल ललना, जीवनवेध, गंगाजळी-४, व्यासांचा वारसा, जा दिल की दास्ता, आवरण, गोष्टी जन्मांतरीच्या, रॉय किणीकर : माणूस आणि साहित्य, समईच्या शुभ्रकळ्या

**अरविंद श्रीधर पुजारी,**
'परिपूर्ती' मोरया नगर, विजयपूर नाका, सोलापूर ४१३ ००४

कुरुक्षेत्रानंतर, कटिंग फ्री, माय फॅमिली इज ऑल आय हॅव, भोगले जे दुःख त्याला, शूट टू किल, वन नाईट @ द कॉल सेंटर, शिंडलर्स लिस्ट, कॅच मी इफ यू कॅन, आवरण, प्रस्थान

**सौ. सविता राजेंद्र जाधव,**
१४, यशवंत कॉलनी, गोडोली, सातारा

टारफुला, डवरणी, पाटलांची चंची, खुळ्याची चावडी, धिंड, इल्लम, तुक्याची आवली, पुरचंडी, आदिताल

**अनिल सावरकर,**
६१'श्रीकृपा', दुर्गा नगर, माने वाडा रोड, नागपूर ४४० ०२४

चिमणरावांचे चऱ्हाट, कोसला, ययाती, चक्र, दौलत, बनगरवाडी, स्वामी, विशाखा, रणांगण, ऋतुचक्र

**अजाबराव मारोती भगत**
अंबिका नगर, दिग्रस, जि. यवतमाळ ४४५ २०३

**इतर**

गोष्टी माणसांच्या, वाइज ॲण्ड अदरवाइज, एक होता कार्व्हर, समिधा, माझी मुलुखगिरी, सावर रे (भाग१ते४), आमचा बाप अन आम्ही, महानायक, खिडकीलाही डोळे असतात, किमयागार

**सौ. प्राजक्ता प्रकाश फडके,** सांगली ४१६ ४१६.

नॉट गॉन विथ द विंड, प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स, आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान, एन्जल्स अँड डेमन्स, शिंडलर्स लिस्ट, शांताराम, अमरगीत, हॅरी पॉटर भाग-४,

**सदानंद दत्तात्रय उकीडवे,** इचलकरंजी ४१६ ११५.

श्रीमान योगी, व्यक्ती आणि वल्ली, बॉर्न कन्फ्युज्ड, नॉट विदाऊट माय डॉटर, इडली ऑर्किड, द अलकेमिस्ट, वन नाईट ॲट कॉल सेंटर, द दा विंची कोड, ओमेर्ता, चौघीजणी.

**सौ. मीनल विद्वांस,** इन्दौर (म.प्र.)

सामान्यातील असामान्य, नापास मुलांची गोष्ट, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, हाती ज्यांच्या शून्य होते, खाली जमीन वर आकाश, खरीखुरी टीम इंडिया, होय व्यसनमुक्ती शक्य आहे, गोष्टी माणसांच्या.

**कुमुद दाणे,** चंद्रपुर ४४२ ४०१

या सुखांनो, रंग सुखाचे, नॉट विदाऊट माय डॉटर, परमवीर चक्र, विज्ञान पोलिस कथा, चला! उठा! कामाला लागा, व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स, आरोग्यासाठी योग.

**सौ. पुष्पलता रमेश आलबाल,** मुंबई ४०० ०१२.

टु द लास्ट बुलेट, अंटार्क्टिका, अनादि अनंत सावरकर, भावनांचे ओसाड प्रदेश, देस-परदेस, गुंजेचा पाला, आक्रित, जलजिज्ञासा, मधुमेह, अण्णाभाऊ साठे निवडक साहित्य

**अजित वंजारे,** पुणे ४११ ००९.

समग्र माते नर्मदे, मास्तरांची सावली, व्हाय नॉट आय, नियोग, अंगाई ते गझल रूबाई, मालटेकडीवरून, चित्रलिपी, स्त्रीदल,चांदणचुरा.

**अनुराधा साळवेकर,** ठाणे ४२१ २०२.

योद्धा शेतकरी, लढणाऱ्यांच्या मुलाखती, एका साध्या सत्यासाठी, अमृतवेल, दोस्त, अमेरिका, मेकअप उतरल्यावर, फुले आणि पत्री, माणसं भेटलेली न भेटलेली, ताजमहालमध्ये सरपंच.

**गोपाळ रिठे,** अमरावती

युगान्त, नाथसंप्रदाय, इरावती कर्वे, मुसलमान संत कवी, ज्ञानेश्वरी, आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान, पूर्णिया, आमार मेयेबेला, ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी.

**जगन्नाथ मंडाले,** सोलापूर ४१५ ३०७.

श्यामची आई, असे शोध अशा कथा, आठवणी, खेळातील विज्ञान, सूर्य:एक तोंडओळख, वारणेचा वाघ, जेव्हा माणूस जागा होतो, दूर गेलेले घर, डोंगरीच्या तुरुंगातील एकशे एक दिवस, आपला मान आपला अभिमान.

**हेमंत ठाकरे,** चंद्रपूर

मौनराग, संवादाचा सुवाओ, स्वरार्थरमणी, ययाति, क्रौंचवध, हिरवा चाफा, अबोली, अमृतवेल, आस्वादक संगीत समीक्षा, आधुनिक मराठी काव्यसंपदा, ॲज आय सी, अमरगीत.

**मोहना मार्डीक,** नागपूर

मास्तरांची सावली, मी नंदा, रातवा, निरागस-एक इझम, आणखी एक जन्म, ती आणि मी, एक धागा सुताचा, आश्रम नावाचं घर, टु द लास्ट बुलेट, व्हाय नॉट आय, माय नेम इज सल्मा, मी अनिता राकेश सांगतेय.

**मेधा ओक,** मुंबई

आजच्या ठळक बातम्या, परीक्षेला पर्याय काय, टू द लास्ट बुलेट, नवभारताचे शिल्पकार, एक विजयपथ, वपु महोत्सव, २६:११ ऑपरेशन मुंबई, प्रतिकूलतेवर मात, चिकन सूप फॉर द सोल, स्ट्रगलर्स.

**रणजितसिंह डिसले,** सोलापूर

श्यामची आई, भारतीय संस्कृती, राजा शिवछत्रपती, श्री विठ्ठल:एक महासमन्वय, गांधी, प्रवासी पक्षी, हाऊ टू सक्सीड, द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाइफ.

**भीमराव गुंडे,** सोलापूर

चिनी माती, एका मारवाड्याची गोष्ट, दुर्ग भ्रमण गाथा, मंजिल ए मक्सूद, व्हाया वस्त्रहरण,प्रकाशवाटा, मी मुंबईचा महापौर.

**सतीश गुप्ते,** मुंबई ४०० ०९२.

तत्त्वमसी, अकरा कोटी गॅलन पाणी-स्टडफार्म, झुळूक अमेरिकन तोऱ्याची, ७२ मैल, निवडक मराठी एकांकिका, वेताळाच्या आरोग्य कथा,

**मुग्धा सावले,** मुंबई ४०० ०६६

गोष्टी जन्मांतरीच्या, आजची बदलती चाळीशी, कार्य संस्कृती, काळाचा छोटा इतिहास, आठवणीतल्या कविता (भाग १ते४), आरोग्याचा अर्थ.

**सौ. माधुरी यादवाडकर,** अहमदनगर

शिंडलर्स लिस्ट, द डायरी ऑफ मेरी बर्ग, हिरॉईन ऑफ द डेझर्ट, इन द नेम ऑफ ऑनर, कॅच मी इफ यू कॅन, नेगल.

**एम. के. मेंडजोगे,** कल्याण

समग्र माते नर्मदे, उमाक्का, गंधनाते, योगी, कृष्णाचे अभंग-अग्निसमाधीचे अभंग, रत्नकोळ, मी अनिता राकेश सांगतेय,फाळणीचे हत्याकांड.

**श्रीनिवास कुरणे,** कोल्हापूर-१.

आय डेअर, अदम्य जिद्द, एन्जल्स ॲण्ड डेमन्स, बाळमासा, सुखद बालसंगोपन, चीपर बाय द डझन, डायरी ऑफ ॲन फ्रँक, फाइव्ह पॉईंट समवन, तो आणि ती, कॅट ओ नाइन टेल्स, कॅच मी इफ यू कॅन, नटरंग.

**देवदास नामदेव कदम,** ठाणे ४२१ ५०६.

प्रकाशवाटा, सामान्यातले असामान्य, खरेखुरे आयडाल्स, कॉलनी, मृद्गंध, अमृता इमरोज-एक प्रेम कहाणी, मनातल्या घरात, मोर, स्वत:विषयी, समिधा.

**सौ. सुनीता खानवेलकर,** अहमदनगर ४१४ ००३.

तोत्तोचान, चैतन्याचे चांदणे, किकीनाक, प्रदूषण, अक्षरशिल्पे भाग-१, प्रयोगातून विज्ञान, मॅड (आर्ट ॲन्ड क्राफ्ट) बुक -५, प्रतापसूर्य बाजीराव

**आकाश देशपांडे,** सातारा ४१५ ००२.

इडली ऑर्किड आणि मी, वाईज अँड अदरवाईज, विष्णुमूर्ते नमस्तुभ्यम्, सम्राट अशोक चरित्र, शारदा संगीत, डोन्ट लूज यूवर माईंड लूज युवर वेट, वाचा आणि गप्प बसा, कबीर.

**डॉ. श्री. ल. कर्वे,** मुलूंड(पूर्व), मुंबई ४०० ०८१.

## रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

**कादंबरी**

| | |
|---|---|
| स्वामी | १६० |
| (राज्य पुरस्कार १९६२/ ह.ना.आपटे पुरस्कार १९६३/ साहित्य अकादमी पुरस्कार १९६४) | |
| श्रीमान योगी | ४०० |
| अभोगी | १५० |
| राधेय | १५० |
| पावनखिंड | १०० |
| माझा गाव | १५० |
| समिधा | १२० |
| बारी | १२० |
| राजा रविवर्मा | १८० |
| प्रतिक्षा | ८० |
| शेकरा | ७० |
| लक्ष्यवेध | ९० |

**कथासंग्रह**

| | |
|---|---|
| रुपमहाल | ९० |
| मधुमती | ९० |
| कमोदिनी | १२० |
| आलेख | १२० |
| गंधाली | १२० |
| मोरपंखी सावल्या | ६० |
| कातळ | ९० |
| मेघ | १०० |
| आषाढ | ८० |
| वैशाख | ९० |
| प्रपात | १०० |
| संकेत | ८० |
| बाबुलमोरा | १२५ |
| मेख मोगरी | ७० |

**नाटके/एकांकिका**

| | |
|---|---|
| श्रीमानयोगी | ६० |
| लोकनायक | ५० |
| संगीत तानसेन | ३० |
| कांचनमृग | ४० |
| पंख जाहले वैरी | ५० |
| पांगुळगाडा | ६० |
| तुझी वाट वेगळी | ६० |
| सावली उन्हाची | ५० |

## व. पु. काळे यांची साहित्यसंपदा

**कथासंग्रह**

| | |
|---|---|
| वपु ८५ | ६० |
| संवादिनी | ७० |
| मोडेन पण वाकणार नाही | ८० |
| नवरा म्हणावा आपला | ८० |
| वलय | १०० |
| स्वर | १०० |
| इन्टिमेट | १०० |
| बाई बायको कॅलेंडर | १०० |
| वपुर्वाई | १०० |
| वन फॉर द रोड | १०० |
| मी माणूस शोधतोय | १०० |
| हुंकार | १०० |
| गोष्ट हातातली होती! | १०० |
| झोपाळा | १०० |
| गुलमोहोर | १०० |
| चतुर्भुज | १०० |
| मायाबाजार | ११० |
| कर्मचारी | ११० |
| का रे भुललासी | १२० |
| ऐक सखे | १४० |
| भुलभुलैय्या | १२० |
| काही खरं काही खोटं | १२० |
| तप्तपदी | १४० |
| सखी | १२० |
| दोस्त | १२० |
| महोत्सव | १५० |
| घर हरवलेली माणसं | १४० |
| रंग मनाचे | १८० |

**वैचारिक**

| | |
|---|---|
| आपण सारे अर्जुन | १२० |

**कादंबरी**

| | |
|---|---|
| ठिकरी | ६० |
| तू भ्रमत आहासी वाया | ७० |
| ही वाट एकटीची | १२० |
| (राज्य पुरस्कार १९७०-७१) | |
| पार्टनर | १२० |

**ललित**

| | |
|---|---|
| दुनिया तुला विसरेल | ५० |
| पाणपोई | ५० |
| फॅण्टसी एक प्रेयसी | ९० |
| निमित्त | १०० |
| प्रेममयी | १०० |
| माझं माझ्यापाशी? | १०० |
| कथा कथनाची कथा | १३० |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | १६० |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | २०० |
| वपुर्झा | १८० |
| रंगपंचमी | २०० |

**व्यक्तिचित्र**

| | |
|---|---|
| सांगे वडिलांची कीर्ती | ७० |
| चिअर्स | १०० |
| माणसं | १४० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

### सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे. कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे, हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे, ही नम्र विनंती.

---

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

# बालनगरी

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| आसामचे महान संत | प्रसाद बर्वे | १५८ |
| आठवणीची कुपी | अनघा तांबोळी | १६६ |






# आसामचे महान संत ‘शंकरदेव’

तेराव्या ते सोळाव्या शतकांमध्ये भारतभर चळवळींनी कळत-नकळत तत्कालीन कर्मठ आणि संकुचित विचारांना मागे सारून धार्मिक तसंच सामाजिक प्रबोधनाचं काम केलं. त्यात ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, नरसी मेहता, मीराबाई, कबीर, चैतन्य, रामानुजम, आंडाळ, पेरिय आळवार अशा अनेक संतांची नावं घेता येतील. यांतच आसाममधले ‘शंकरदेव’ यांचं नाव महत्त्वाचं आहे.

आसाममध्ये ‘भुयां’ परिवार म्हणजे जमीनदार परिवार. या भुयांच्या प्रमुखाला ‘शिरोमणी’ ही पदवी मिळे. अशाच एका शिरोमणी भुयां असलेल्या ‘कुसुंबर’ आणि त्यांची पत्नी ‘सत्यसंध्या’ या जोडप्याच्या पोटी सन १४४९च्या विजयादशमीच्या दिवशी नौगाव जिल्ह्यातल्या ‘आलिपुखुडी’ या गावी एक तेजस्वी बालकानं जन्म घेतला. त्याचं नाव ‘शंकर’ असं ठेवण्यात आलं. अगदी बालवयातच शंकराच्या आई-वडिलांचं निधन झालं, म्हणून त्याचा सांभाळ त्याची आजी ‘खेरसुती’ यांनी केला.

शंकरचं बालपण खेळ खेळण्यात, ब्रह्मपुत्र नदीत पोहण्यात, जंगलातून भटकण्यात आणि घरात मोठ्यांना मदत करण्यात जात होतं. लहानपणापासूनच

शंकर निर्भय होता. जेव्हा तो दहा वर्षांचा होता, तेव्हा त्यानं वाटेत आलेल्या एका सापाला शेपटीनं उचलून दूर फेकून दिलं होतं. तो पक्षी किंवा हरणं पकडायचा आणि त्यांच्याशी खेळून, त्यांना गोंजारून त्यांना अजिबात न दुखवता सोडून द्यायचा.

शंकरचे पूर्वज सर्वच जण चांगले शिक्षित होते. त्याच्या आजीला वाटू लागलं की, शंकरनंपण चांगलं शिकावं, म्हणून ती त्याला एका 'तुल'मध्ये, म्हणजेच एका पाठशाळेत घेऊन जाते. तिथे गुरू असतात 'महेंद्र कंदली'. ते खूपच नावाजलेले शिक्षक असतात. पण तिथे लहानग्या शंकरचं मन रमत नाही. तो शाळेला दांडी मारण्याचं मनात आणतो. हे कळल्यावर त्याच्या आजीला खूपच दु:ख होतं. हे दु:ख शंकर सहन करू शकत नाही. तो मन लावून अभ्यास करायचं ठरवतो. लवकरच तो खूप हुशार विद्यार्थी म्हणून पुढे येतो आणि आपल्या गुरूचा लाडका शिष्य बनतो. हा प्रतिभावान शिष्य लहान वयातच फक्त 'अ' हा स्वर व्यंजनांबरोबर वापरून, जिच्या पहिल्या दोन ओळी 'करतल कमल, कमलदल नयन' अशा आहेत, अशी एक कविता करतो. गुरूंच्या लक्षात येतं की, हा पुढे नक्कीच कोणी श्रेष्ठ पुरुष बनणार आहे. म्हणून ते त्याच्या नावापुढे 'देव' ही पदवी लावतात.

पाठशाळेत तो वेद, उपनिषदे, तंत्र, तसंच विविध काव्यांचा अभ्यास करतो. अभ्यासाबरोबरच तो नियमितपणे जोर-बैठका आणि योगासनं करतो त्यामुळे त्याचं शरीरही सुदृढ आणि लवचिक बनतं. एक मस्तवाल बैल त्याच्यावर धावून येतो, तेव्हा तो त्याच्या शिंगांना धरून मागे रेटत नेऊन त्याला पळवून लावतो. ऐन पावसाळ्यात पाण्यानं तुडुंब भरलेली, वेगात वाहणारी विस्तीर्ण ब्रह्मपुत्र नदी तो सहज पोहून जातो. उत्तम आरोग्याची देणगी त्याला जन्मभरासाठी मिळालेली असते.

शंकरदेवांचं पाठशाळेतलं शिक्षण संपलं तरी त्यांची अजूनही खूप शिकत राहण्याची इच्छा असते. त्यांचा ओढा अध्यात्माकडे जास्त असतो. त्यांना त्यांच्या वडिलांकडून आलेलं 'शिरोमणी भुयां' हे स्थान मिळवण्यात अजिबात रस नसतो; परंतु कुटुंबातील व्यक्तींच्या

आग्रहामुळे ते 'हो' म्हणतात.

वयाच्या बाविसाव्या वर्षी त्यांचा विवाह 'सूर्यवती'शी होतो. पुढे त्यांना एक गोजिरवाणी मुलगी होते. तिचं नाव 'हरिप्रिया' असं ठेवलं जातं. परंतु लाडानं सगळे तिला 'मनू' म्हणून हाक मारत. लवकरच त्यांची पत्नी स्वर्गवासी होते.

पुन्हा ते आध्यात्मिक चिंतनाकडे ओढले जातात आणि तीर्थयात्रेला जाण्याचं ठरवतात.

'शिरोमणी' बनण्यामध्ये त्यांना रस नसला तरी ते आपल्या लोकांच्या सुखासाठी नेहमी झटतात. वारंवार येणाऱ्या पुरामुळे त्रस्त झालेल्या लोकांसाठी ते 'तेंबूवनी' नदीचे दोन्ही किनारे बांधून काढतात आणि या छोट्या नदीच्या प्रवाहाला दिशा देतात. पावसाळ्यात प्रचंड पूर आणि नंतर पाण्याची तीव्र टंचाई, हे दोन्ही प्रश्न सोडवतात.

कालांतराने मनूचं लग्न 'हरी' या मुलाशी होतं. पुढे शंकरदेव आपली जबाबदारी हरीवर सोपवून आणि शिरोमणीपदाचा कारभार विश्वासू नातेवाइकाकडे देऊन तीर्थयात्रेला निघतात.

वयाच्या बत्तिसाव्या वर्षी आपले गुरू कंदली यांना बरोबर घेऊन सतरा यात्रेकरूंसोबत कधी पायी चालत, तर कधी नावेतून ते जगन्नाथपुरी, वाराणसी, प्रयाग, सीताकुंड, अयोध्या, मथुरा, वृंदावनाची यात्रा करतात. या दरम्यान अनेक विषयांवर अनेक जाणकार लोकांशी त्यांची चर्चा होते. त्यांची दृष्टी खूप रुंदावते.

बारा वर्षांनी ही यात्रा संपवून ते परत घरी येतात.

यात्रेमध्ये त्यांची भक्तिमार्गाशी ओळख होते. देवापर्यंत पोहोचायला हा मार्ग साधा, सरळ आणि तरीही प्रभावी असल्याचं त्यांना कळून चुकतं.

त्या काळी लोक विविध देव, दगड, झाडं, प्राणी यांची पूजा करीत. प्राण्यांचे बळी देत. धार्मिक विधी क्लिष्ट, अवघड आणि खर्चिक होते; म्हणून देवापर्यंत पोहोचणं, हे सामान्य जनांना जमणं अवघड होऊन बसलं होतं.

या सर्वांवर भक्तिधर्म हा सर्वांत आदर्श असा उपाय आहे, अशी शंकरदेवांची खात्री पटली. विष्णू आणि त्याचा अवतार कृष्ण यांची पूजा करून, त्यांची भक्ती करून ईश्वरप्राप्ती सहज

शक्य आहे, असं सांगून त्यांनी एक नवीन संप्रदाय स्थापन केला आणि त्याला 'एक शरण नाम धर्म'नाव दिलं

दैनंदिन व्यवहार सुरूच ठेवून देवाची भक्ती करणं, देवाची आठवण काढणं, हे आता सहज शक्य झालं होतं.

नवीन संप्रदाय स्थापल्यावर लोकांना एकत्र येऊन प्रार्थना म्हणण्यासाठी आणि धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा विषयांवर चर्चा करण्यासाठी त्यांनी एक छोटं सभागृह तयार केलं. त्याला नाव दिलं 'नामघर'. त्यात भजन, कीर्तन होऊ लागलं; कथा सांगितल्या जाऊ लागल्या आणि हे सगळं सर्वसामान्यांना कळेल अशा आसामी भाषेतच घडू लागलं. यामुळे लोकांचा ओढा नामघराकडे वाढू लागला. समाजातील सर्व स्तरांतले लोक नामघरात एकत्र येऊ लागले.

एकदा शंकरदेवांनी विष्णूचं माहात्म्य दाखवणारं एक नाटक रचलं आणि ते लोकांसमोर सादर केलं. त्याला नाव दिलं 'चिन्ह जात्रा' ('चिन्ह' म्हणजे 'चित्र' आणि 'जात्रा' म्हणजे 'नाटक').

शंकरदेवांनी स्वत: एका मोठ्या कापडावर विष्णूसंबंधी, वैकुंठ इत्यादीचे देखावे रंगवले आणि या रंगवलेल्या मोठ्या पडद्याच्या पार्श्वभूमीवर नाटक झालं. संगीत, वादन, चित्रकला, कथानक, गद्य, पद्य या अशा सर्व स्वरूपांतली 'चिन्ह जात्रा' त्यांनी रंगवली. हा सर्व प्रकार लोकांना खूप नवीन होता. शंकरदेव हे महापुरुष' समजले जाऊ लागले. भजनं, कीर्तनं हाही देवपूजेचाच मार्ग आहे हा भक्तीचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचायला सुरुवात झाली.

याच काळात भुयां आणि 'कचारी' लोकांमध्ये जमिनीवरून वाद व्हायला सुरुवात झाली. कचारी लोक भुयां लोकांच्या शेतांवर, घरांवर हल्ला करुन लुटालूट करायचे. नाइलाजानं भुयां लोकांनी गाव सोडून ब्रह्मपुत्रा ओलांडून उत्तर तीरावरचे जाऊन 'गांवमोऊ' गाव गाठले.

त्या वेळी शंकरदेवांचं वय होतं सदुसष्ट वर्षे. इथेसुद्धा शंकरदेवांनी जनतेला भक्तीचा मार्ग दाखवला. याच काळात शंकरदेवांना 'माधवदेव' नावाचा एक महान शिष्य मिळाला.

'एक शरण नाम धर्म'च्या खूप सोप्या आणि सर्वांना जमेल, परवडेल अशा मार्गावर लोक जाऊ लागल्यामुळे लोकांना न कळणाऱ्या संस्कृतमध्ये प्रार्थना म्हणणाऱ्या, तसंच खर्चिक आणि क्लिष्ट विधी करायला सांगणाऱ्या पुरोहितांना शंकरदेवांचा मत्सर वाटू लागला. शंकरदेव धर्म भ्रष्ट करत आहेत, अशी तक्रार त्यांनी राजा 'सुहुंगमुंग'कडे केली. राजानं शंकरदेवांना बंदी बनवलं. त्यांचं म्हणणं पटल्यानं त्यांना मुक्तही केलं. शंकरदेवांसह भुयां लोकांना राजानं जंगली हत्ती पकडण्याचं काम दिलं. राजानं सांगितलेलं काम शंकरदेव नीट करत नाहीयेत, असा आरोप पुढे त्यांच्यावर ठेवण्यात आला. शंकरदेवांची स्वत:ची कशीबशी सुटका झाली; परंतु त्यांचा शिष्य माधवदेव आणि जावई हरी सुटू शकले नाहीत. न्याय-निवाडा झाला. माधवदेव निर्दोष सिद्ध झाले, परंतु हरीला मृत्युदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. शंकरदेव खूप व्यथित झाले आणि त्यांनी अहोम राज्य कायमचं सोडून देण्याचं ठरवलं.

कामरूप राज्यात 'पाटबौशी' या गावी त्यांनी मुक्काम केला. भगवद्गीतेच्या बऱ्याच अध्यायांचं आसामीत भाषांतर केलं. 'कुरुक्षेत्र', 'रुक्मिणीहरण', 'भक्ती प्रदीप' अशा काही रचना केल्या. इथेच त्यांनी 'भक्ती रत्नाकर' या नावाची एक संस्कृत रचनाही केली. शंकरदेवांच्या सांगण्यावरून माधवदेवांनी 'नामघोष' ही रचना केली. आसामी भाषेतील भक्ती संप्रदायाची एक उत्कृष्ट रचना म्हणून ती आजही पाहिली जाते.

कामरूप राज्याची त्या वेळी राजधानी होती 'कोच बिहार'. येथे 'कोच' वंशाचा राजा 'नरनारायण' राज्य करत होता आणि त्याचा सेनापती होता त्याचा भाऊ 'चिलाराय'. या दोन्ही भावांना ज्ञानी लोकांबद्दल आदर होता.

चिलारायच्या कानावर शंकरदेवांची महती पडते आणि त्याला या महापुरुषाची भेट घेण्याची इच्छा होते. शंकरदेवांना आदरानं तो आपल्या महाली बोलवतो. त्यांचं योग्य आतिथ्य करून त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करतो. नंतर आपला भाऊ राजा नरनारायण याची पण भेट करवून देतो. 'तांतीकुची' या विणकरांच्या गावातील विणकराकडून शंकरदेव कृष्णजन्म ते कंसवधापर्यंतचा कापडाचा पट रंगवून

घेतात आणि तो कापडाचा पट घेऊन राजाच्या दरबारात हजर होतात. तो पट एवढा मोठा असतो की, त्याला वाहून न्यायला साठ माणसं लागली, असं म्हणतात. राजाला तो पट खूप आवडतो आणि शंकरदेवांवर त्याची मर्जी बसते.

राजाची शंकरदेवांवर झालेली कृपा काही लोकांना बघवत नाही.

शंकरदेव दुसऱ्यांदा तीर्थयात्रेला निघतात. तेव्हा त्यांचं वय असतं एकशे एक वर्षे. 'कालिंदी आई' (आसामी भाषेत 'आई'ला 'आई' हाच शब्द आहे)– शंकरदेवांची दुसरी पत्नी, माधवदेवांना जगन्नाथपुरीहूनच परत फिरा, असं सांगते. तिला शंकरदेवांच्या तब्येतीची काळजी वाटत असते.

या तीर्थयात्रेत शंकरदेवांची भेट प्रसिद्ध संत कबीर यांच्या कन्येशी होते, असं म्हटलं जातं.

घरी परतल्यावर त्यांची वाढती लोकप्रियता बघून काही लोकांचा मत्सर अजूनच वाढतो. ते राजा नरनारायणाकडे शंकरदेवांनी धर्म भ्रष्ट केला आहे, अशी तक्रार करतात. राजा त्यांना सभेत बोलावून घेतो. राजा काही धर्ममार्तंडांबरोबर शंकरदेवांची वादविवाद स्पर्धा घडवून आणतो. यात शंकरदेवांनी दिलेल्या उत्तरांमुळे राजा पूर्णपणे संतुष्ट होतो. 'भागवता'मधील मुख्य प्रसंगाचं थोडक्यात वर्णन करणारं काव्य एका दिवसात लिहून आणा, अशी आज्ञा देतो. ही रचना पूर्ण करून फक्त शंकरदेवच दुसऱ्या दिवशी राजदरबारात हजर होतात. या रचनेचं नाव असतं 'गुणमाला'. या रचनेचं वर्णन 'हत्तीला एका छोट्या डबीत बसवलं', असं केलं जातं. राजाला शंकरदेवांची महती कळते. तो त्यांचा सत्कार करतो आणि पुन्हा पाटबौशीला आदराने पाठवून देतो.

राजदरबारी शंकरदेवांचं येणं-जाणं वाढतं. राजा त्यांच्या 'एक शरण नाम धर्म' या भक्तिमार्गी संप्रदायाकडे आकर्षित होतो आणि स्वत:ला या संप्रदायात सामावून घेण्याविषयी शंकरदेवांना विनंती करतो.

शंकरदेव त्याला राजाची कर्तव्ये समजावून देतात. राजासाठी हा मार्ग योग्य नाही, त्यांनी प्रजाहित लक्षात

घेऊन चांगल्या प्रकारे राज्यच केलं पाहिजे, असं पटवून देण्याचा प्रयत्न करतात; परंतु राजा आग्रहच धरतो आणि म्हणून राजाला शिष्यत्व देण्याचा दिवस शंकरदेव नक्की करतात.

हाताच्या अंगठ्यावर आलेला एक फोड त्यांना खूप त्रास देत असतो, पुढे हे दुखणं वाढतच जातं.

शंकरदेवांना आपला शेवट जवळ आल्याची जाणीव होते. ''माझा शिष्य माधवदेव आणि माझ्यात काही फरक नसल्यामुळे माझ्यानंतर माझा उत्तराधिकारी तोच असेल'', असं शंकरदेव सांगून जगाचा निरोप घेतात. त्या वेळी त्यांचं वय असतं एकशे वीस वर्षे.

शंकरदेवांनंतर 'एक शरण नाम धर्म' या भक्तिपंथाची जबाबदारी माधवदेव समर्थपणे पेलतात आणि पूर्ण अहोम-कामरूप प्रदेशात त्याचा प्रसार होतो.

भक्ती संप्रदायाचा प्रसार आसाममध्ये करून तळागाळातल्या लोकांपर्यंत देवाला पोहोचवण्याचं मोठं कार्य करणारे शंकरदेव हे महान रचनाकारसुद्धा होते. त्यांनी रचलेला साहित्यसंभार मोठा आहे. 'अमृतमंथन' तसंच 'रुक्मिणीहरण' सारख्या दहा मोठ्या काव्यरचना, 'निमी - नवसिद्ध संवाद'सारख्या तत्त्वज्ञानावर आधारित पाच रचना, भागवताचं आणि रामायणाच्या उत्तरकांडाचं तसंच भगवद्गीतेच्या बऱ्याच अध्यायांचं आसामीत भाषांतर, 'श्रीराम विजय' आणि 'पारिजातहरण'सारखी सहा नाटकं या सर्व रचनांना भक्ती संप्रदायात महत्त्वाचं स्थान आहे.

संत शिरोमणी, गायक, वादक, चित्रकार, नाटककार, अभिनेता, लेखक, कवी अशा विविध पैलूंनी युक्त असलेले शंकरदेव आसामी जनमानसात आजही अढळ स्थानावर विराजमान आहेत.

**प्रसाद ग. बर्वे**
रो हाऊस एस.डी. ७, हिमाली,
सर्वे नं. ८+१३/१/२, एरंडवणा,
पुणे ४११ ००४
फोन - ९८२२८९८९९३
pragarve@yahoo.co.in

## चित्र रंगवा






## अनघा तांबोळी

**खळ्यामध्ये आम्ही वेगवेगळे खेळ खेळायचो. लपाछपी, डब्बा ऐसपैस, लंगडी, खो-खो वगैरे. खळ्याच्या बाजूला गाई-म्हशींचा गोठा होता. तिथे गाई-म्हशी, बैल बांधलेले असायचे. ते कायम खाली मान घालून मनोभावे चारा खात शेपटीने माशा उडवत गळ्यातल्या घुंगरांचा, घंटांचा आवाज करत असायचे.**

असेन तेव्हा मी सात-आठ वर्षांची.

आम्ही डोंबिवलीला रहात होतो. माझ्या मोठ्या आतेबहिणीचं लग्न ठरल्याचं पत्र आलं. माझ्या बाबांना दोन भाऊ आणि तीन बहिणी. सगळ्यात मोठ्या आत्याच्या मोठ्या मुलीचं लग्न होतं. घरातलं ते पहिलंच कार्य. लग्न आमच्या गावी म्हणजे टिंघरीला करायचं ठरत होतं. आमचं टिंघरी म्हणजे मालेगावपासून २० किमी असलेलं एक १०० एक उंबऱ्यांचं छोटंसं गाव. त्या वेळेला तर गावात वीज, पाणी म्हणजे पाईपलाईन, संडास वगैरे काही नव्हतं. इंटर्नशीप डॉक्टर पण एकच असायचा आणि तोही ॲपरेंटसशिपसाठी आलेला. आजूबाजूला २-४ खेड्यांना मिळून एक त्यामुळे कायमच जाग्यावर नसायचा. खेड्यामध्ये मातीची, धाब्याची घरं, चिकटून चिकटून. घरं एकमेकांना समांतर आणि त्यांच्यामधून छोट्या छोट्या गल्ल्या गेलेल्या. घरांची रचना अशी होती की गल्लीमध्ये काही घरांची तोंडं उघडायची तर काहींच्या पाठी! गल्ल्यांमधून सांडपाण्याच्या गटारीही गेलेल्या असायच्या.

गावात कडूलिंबाचे भरपूर वृक्ष होते. त्यामुळे दुपारचं रणरणतं ऊनही फारसं जाणवायचं नाही. माझे आजोबा त्याकाळचे जमीनदार असल्याने त्यांनीच राममंदीर आणि शाळा बांधलेली होती. माझे मोठे काका सरपंच होते. त्यांच्या शब्दाला गावात मोठा मान होता. ''टिंघरीच्या दादांकडे जायचंय'' एवढ्या एकाच वाक्यावर मालेगाव स्टँडवर नवखा पाहुणा बरोबर घरी

पोहचत असे. गाव तसं शेतकऱ्यांचं होतं. त्यामुळे गावात प्रत्येकाचं घरं होतं आणि आजूबाजूला हिरवीगार पसरलेली शेती.

गावाला वेढून बाजूने एक नदी गेलेली आहे. त्यामुळे प्रत्येकाला शेतात जाण्यासाठी नदीच्या पात्रातूनच जावं यावं लागे. पावसाळ्यात नदीला बऱ्यापैकी पाणी असे. नदीतल्या शेवाळलेल्या गोट्यांवरून घसरत, धडपळत आपले कपडे सावरत जाणं-येणं चालायचं. अनेकदा बैलगाड्या गोट्यांमध्ये रुतून बसत असायच्या. मग बाप्पेमंडळी मागनं गाडीला ढकलत, पुढून बैलांना चुचकारत गाडीला बाहेर काढत.

गावाला बस स्टँड किंवा स्टॉप अशी एक ठराविक जागा नव्हती. बस सरळ रस्त्यावरून पात्रात शिरायची. कडमडत कडमडत पाण्यातून बाहेर यायची. चढ चढायची आणि दमून भागून जिथे थांबायची, तो तिचा स्टॉप.

बस पकडण्याची तिथे एक निराळीच तऱ्हा असायची. तिथे बस येणार म्हणून लवकर जाऊन थांबायची गरज नव्हती. कारण कोणतीच बस वेळापत्रकाप्रमाणे यायची नाही. गावात तीन दिशांनी बस यई. एक धुळ्याकडून, मालेगावंकडून, गाळण्याकडून.

बस आली की नाही, ती कुठल्या दिशेने येतेय आणि साधारण कितीवेळात पोहोचेल, हे गावातल्या प्रत्येकाला बसच्या आवाजावरून, जागेवरूनही न उठता सांगता यायचं! त्यासाठी उंबऱ्याबाहेरही जायची त्यांना गरज नसायची. इतकं त्या सगळ्यांचं ह्या बाबतीतलं कसब लक्षवेधी आवाजवेधी असं होतं. याबद्दल मला आश्चर्य वाटायचं.

माझ्यासारख्या मुंबईत वाढणाऱ्या मुलीला ह्या सगळ्या गोष्टी हव्याहव्याशा वाटायच्या. ताईच्या लग्नाच्या तयारीला आम्ही १५ दिवस अगोदर गावी येऊन पोहोचलो. मी, माझा लहान भाऊ आणि माझे आई-बाबा.

आम्ही आल्यावर काका-काकू, आजी-आजोबा, आत्या सगळ्यांना खूप आनंद झाला. आजीने आमच्यावरून मीठ-मोहऱ्या उतरवून दृष्ट काढून टाकली.

माझी आजी फार प्रेमळ होती. उंच, गोरीपान, दिसायला खूप सुंदर होती. मोठं ठसठशीत लाल कुंकू लावायची आणि छान मऊमऊ नऊवारी लुगडं नेसायची.

हळूहळू पाहुणे मंडळी जमू लागली. सगळ्या आत्या-काका, त्यांची मुलं, चुलत मंडळी आणि इतर नातेवाईक. अशी मोठी माणसं घरात जवळजवळ१५-२० तर लहान मुलं ३५-४०

आमचं टिंघरीचं घर खूप मोठं. त्याला गावातले लोक 'वाडाच' म्हणायचे. घराला मोठी अशी आयताकृती बैठक, बैठकीत २०-२५ लोक एकाच वेळी जेवायला सहज बसू शकतील इतकी. मध्ये ४-५ गुळगुळीत खांब होते. त्यांचा उपयोग आम्ही लहान मुलांना त्यांच्याभोवती खेळायला नाहीतर जाऊन धाडकन आपटून टेंगूळ आणायला होत असे.

बैठकीच्या बाजूला आंबे ठेवायची खोली, आडाची खोली कम नहाणी घर, देवाची खोली, जेवायची खोली, मोठं स्वयंपाकघर, त्यामागे साठवणुकीची अंधारी खोली, बैठकीच्या बाहेर ओसरली मग ओटा आणि मागे-पुढे सारवलेलं मोठ्ठंच्या मोठं अंगण!

आम्ही इतकी माणसं घरात होतो पण जाणवायचंच नाही. आम्हा मुलांची तर प्रचंड मस्ती चाललेली असायची. आमच्या सगळ्यांच्या आयांनी आम्हाला इथे वाऱ्यावर सोडलं होतं म्हणायला हरकत नाही.

सकाळी उठल्यावर आम्हाला गरम गरम असं म्हशीचं दाट दूध साखर घालून मिळत असे. आजीकडे चहाचं काम असायचं. आजी चुल्ह्यासमोर,

फुंकणीने जाळ करत बसलेली असे. तिच्या भोवती पाट घेऊन सगळ्यांना बसायला सांगायची. दुधाळ असा मस्त चहा सगळ्यांना आग्रहाने पाजायची. हवं तितकं दूध, हवा तितका चहा प्या. रोज सकाळचा तो प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा येतोय आणि आजीच्या हातचा तो चहा... बसं रे बस!

त्यानंतर अंघोळीसाठी गडबड उडे. नहाणीघरातच आड होता. आडाला बाराही महिने थंडगार पाणी असायचं. दोनचार सुनांकडे आडातून अंघोळीचं पाणी उपसून द्यायचं काम असे. त्या काही कामात असतील तर गडीमाणसं पाणी उपसायचं काम करत. ते आम्हाला एक घंगाळं, ७-८ बादल्या भरून पाणी काढून ठेवत आणि आम्ही ४-५ जणी मनसोक्त अर्धा अर्धा तास जोपर्यंत दुसरा ग्रुप बाहेरून दार ठोठावत नाही किंवा आयांचा ओरडा ऐकू येत नाही तोपर्यंत अंघोळ करत असू.

मोठी मुलं मात्र शेतावर जाऊन पंपाच्या धबधब्याखालती अंघोळी करत.

आडाच्या आजूबाजूला रंगीबेरंगी बेडकं दिसत आणि त्यांचं आम्हाला अप्रुप वाटायचं. ती बेडकं आपल्याचकडे बघतायत असं प्रत्येकाला वाटायचं.

शेतात जे पिकायचं ते शक्यतो पानात असायचं. त्यामुळे बाजरीची भाकरी अन् तिळाची तिखट चटणी, कैरीचं लोणचं आणि कांदा हा नाश्ता असायचा. ७-८ मुलांचा एकेक ग्रुप जेवायच्या खोलीत न्याहारीला बसायचा. मध्ये एक मोठं ताट. त्यात ताज्या ताज्या खरपूस भाकऱ्या टाकल्या जायच्या. कांदे फोडले जायचे, चटण्या वाढल्या जायच्या आणि क्षणात अंतर्धान पावायच्या. नवीन भाकरी पानात पडल्यावर प्रत्येकी १-२ घासच मिळायचे. पण शेवटचा घास मात्र पानात खूप वेळ रेंगाळायचा. 'तू घे तू घे' यातच फार वेळ जायचा की, लगेच दुसरी भाकरी. फार स्किल्ड जॉब होता. कारण पान रिकामं राहता कामा नये असा आजीचा खाक्या असायचा. मुलांनी मागायच्या आत वस्तू पानात पडली पाहिजे. हे काम नेहमी माझी आई करायची. काकूंपैकी कुणीतरी २-३ भाकऱ्या थापत आणि आई सप्लाय करत असे. आईच्या चपळतेमुळे आणि बडबड करून आम्हाला बोलण्यात गुंतवून ठेवण्याच्या खुबीने बहुतेक ते काम तिच्याकडे आलं होतं.

न्याहारीनंतर मात्र मोठ्या माणसांची पांगापांग होई. कुणी लग्नाच्या खरेदीसाठी मालेगावला, कुणी निमंत्रणासाठी घरोघरी, कुणी शेतावर.

बायका कायम स्वयंपाक घरात पुढच्या जेवणाची तयारी नाहीतर, लग्नासाठी धान्य साफ करणे, भरणे, लाडू, चिवडा आणि कायकाय पदार्थ बनवणे अशी कामं करत असायच्या, पण कुणाच्याच चेहऱ्यावर कधी शिण नसायचा.

कधी त्या खोलीतून तर कधी त्या खोलीतून हास्याच्या लकेरी ऐकू यायच्या आणि मग उत्साही मेंबर्स आपलं हातचं काम सोडून तिकडे काय चाललंय, ते जाणायला जायचे.

लाडू वळणे, हळदअक्षतेच्या पुड्या भरणे, पत्रिकेवर नाव घालणे, हळदकुंकवाच्या खुणा करणे अशा कामांसाठी आमच्या 'वानरसेनेला' खास आमंत्रण असायचं.

घरात खूप उच्छाद मांडला की आम्हाला शेतावर हाकलून देण्यात येई अंधार होईपर्यंत घरात पाऊल टाकायचं नाही अशी सक्त ताकीदही मिळे.

खळ्यामध्ये आम्ही वेगवेगळे खेळ खेळायचो. लपाछपी, डब्बा ऐसपैस, लंगडी, खो-खो वगैरे. खळ्याच्या बाजूला गाई-म्हशींचा गोठा होता. तिथे गाई-म्हशी, बैल बांधलेले असायचे. ते कायम खाली मान घालून मनोभावे चारा खात शेपटीने माशा उडवत गळ्यातल्या घुंगरांचा, घंटांचा आवाज करत असायचे.

शेतावरती मजूर बाया-माणसं, कापणी, खुरपणी, शिंदणी, नांगरणी वगैरे काम करत . आमची त्यांच्याशी



दोस्ती होती. ते आम्हाला तयार भुईमुगाच्या शेंगा बरोबर काढून द्यायचे. काटेरी बोरीतून बोरं पाडणे, चिंचा पाडणे, फुलं तोडणे, डाळिंब तोडणे, बिना चपलांचं चिखलामधून चालणे, बैलांच्या खोड्या काढणे, वासरांच्या शेपट्या पिरगाळणे अशी विचित्र कृत्येही आम्ही करत असू. त्यामुळे हातापायात काटे रुतणे, लहान-सहान जखमा होणे, छोटे-मोठे किडा मुंगी चावणे अशा गोष्टी आमच्यामध्ये आम होत्या. अशा प्रकारच्या प्रत्येक रोगावर आमचा एकच जालीम उपाय असायचा. तो म्हणजे खोबरेल तेलात फेसपावडर (पॉण्ड्स) कालवून त्या ठिकाणी लावणे हा!

असाच केव्हातरी खेळात खेळता माझ्या डाव्या तळहातात एक छोटा काटा गेला. तो टोचत असल्याने घाबरून मी तो काढलाच नाही. तो तसाच २-३ दिवस राहिला आणि मग तो जरा खोल गेला आणि तिथे पू झाला. ती जागा लाल झाली. आमचा 'पॉण्ड्स मलमाचा' उपाय आम्ही मुले करतच होतो. पण हाताचा ठणका हळूहळू वाढू लागला आणि माझं खेळातही लक्ष लागेनासं झालं. पण एवढं होऊनही मोठ्या माणसांना सांगायचं मला सुचलं नाही. ५-६ दिवसांत त्या जागेवर तळहातावर अर्ध वर्तुळाकार लाल-पिवळा फोड तयार झाला. तो प्रचंड दुखू लागला आणि त्यामुळे मला तापही आला आता आईकडे जाण्यावाचून गत्यंतर नव्हतं. आईने आणि काकूने पोटीस की काय ते बांधून माझ्या दुखण्यात आणखीन भर घातली होती. माझं रडणं-ओरडणं बघून इतरांची मस्तीही बरीचशी कमी झाली होती.

प्रत्येकजण आळीपाळीने येऊन माझ्या फोडावरून बोट फिरवून जात होता, त्याच्या रंग-रूपावरून चर्चा करत होता. दिवसेंदिवस त्याच्यात होणारा बदलाची जो तो नोंद घेत होता. त्याला आता आलेल्या तोंडामुळे मला आता तो बेढब दिसत होता, पण कुणाला तरी तो पिकलेल्या आंब्यासारखा, कुणाला संत्र्यासारखा तर कुणाला पेढ्याच्या मोदकासारखा दिसत होता. त्यांची अशी बोलणी ऐकल्यावर 'ईऽ ऽ बाई!' असं म्हणून बायका त्यांना टपली मारत होत्या, पण मला त्यांच्या प्रतिमेचं नेहमीचं कौतुक वाटलं.

माझ्या तळहातावरच्या फोडाला सगळ्या कोनांमधून निरखत होते. दहा दिवस होत आले परंतु तो काही फुटायचं नाव घेईना तेव्हा माझ्या काकाने केस हातात घेतली आणि मला डॉक्टरकडे घेऊन गेला. 'फोड कापणार इथपासून ते तुझा हात कापणार' इथपर्यंत प्रत्येकानं मला घाबरवलं होतं, दवाखान्यात जे घडलं, त्याचं वर्णन केवळ 'अवर्णनीय' हा एकच शब्द करू शकतो. मी

दवाखान्यातनं 'लोकर सोलून काढलेल्या मेंढीसारखी मुकाट' बाहेर आले. घामाने माझा फ्रॉक भिजला होता तर ओरडून माझा घसा पार बसला होता. हाताला मोठ्ठं बँडेज होतं. माझ्या तोंडातनं एकही शब्द बाहेर पडत नव्हता. सगळी मंडळी आमच्याभोवती जमली होती. काकानं सगळ्यांसमोर माझी कौतुकानं पाठ थोपटली.

सगळेजण माझ्याकडे सहानुभूतीने आणि कौतुकाने पाहत होते. आजीने मला एकटीला स्पेशल लोण्याचा गोळा साखर घालून दिला. काकूनेही जेवताना 'भरवू का?' म्हणून विचारलं. मी इतकी लाजून गेले ना! या फोड प्रकरणाने माझे बरेच दिवस वाया गेले होते ते आता दामदुप्पटीने भरून काढू लागले.

ताईचं लग्न हळूहळू जवळ येऊ लागलं.

पोरींची मेंदी काढायला सुरुवात झाली. मेंदीचा पाला तोडणे, वाटणे, वस्त्रगाळ करण्यापासून सुरुवात होती. ताईचे उखाणे पाठ करून घेणे, तिला प्रचंड प्रमाणात चिडवा-चिडवी करणे, तिच्याबरोबर केळवणाला जाणे असं चाललं होतं. होता होता लग्नाचा दिवस उजाडला. वाजंत्री वाजत होती. घरातल्या बायका आधीच नक्षत्रासारख्या दिसणाऱ्या ताईला सजवत होत्या. लग्न राममंदीरात लागणार होतं. तिला वाजत गाजत तिथपर्यंत नेण्यात आलं.

आत्या अन् काहीजणी मुसमुसत होत्या. कारण काही त्यावेळी समजलं नाही.

प्रचंड गर्दी झाली होती. पंचक्रोशीतली मंडळी, आप्तस्वकीय, नातेवाईक मंडळींचा एकच गलका झाला होता. नवीन कपडे घातलेला, रंगीबेरंगी असा प्रचंड जनसमुदाय झाडावरून मला दिसत होता. सगळेजण हातात अक्षता घेऊन उभे होते.

'आली लग्नघटिका' वगैरे झाल्यावर गुरुजींनी आंतरपाट दूर केला आणि एकदम मघाच्या रडारडीचं कारण समजलं. आता हा जीजाजी म्हणवून घेणारा अचानक उपटसुंभासारखा आलेला माणूस आमच्या ताईला अगदी हक्कानं आमच्यातून घेऊन जाणार होता आणि माझा उत्साहचं अगदी गळून गेला. मला जीजाजींचा त्याक्षणी अगदी खूप राग आला. एखाद्या सुंदर राजकन्येला बळजबरीने ओढून नेणाऱ्या राक्षसासारखे भासले मला ते!

त्यांच्याच जवळ जाऊन मी उभी राहिले आणि त्यांचं निरीक्षण करू लागले. मोठमोठ्या डोळ्यांनी रागाने मी त्यांच्याकडे बघत होते. लग्नानंतरचे विधी करण्यात ते गुंग होते, अचानक त्यांचं माझ्याकडे लक्ष गेलं. गोडं हसून प्रेमानं बघत, माझ्या हातावर त्यांनी एक पेढा ठेवला आणि माझा गालगुच्चा घेतला.

मी ताईकडे बघितलं तर तीही आनंदाने हसत होती.

चला म्हणजे राक्षस वाटला तितका दुष्ट नव्हता तर, अन् बळजबरीचा तर काहीच मामला नव्हता. माझ्याच डोक्यावरची मोठीच जबाबदारी उतरल्यासारखं मला वाटलं!

ह्या सगळ्या गोष्टींना आता २५ वर्षे झालीत! त्याच ताईला परवा बरं नसताना दवाखान्यात भेटायला गेले तर हाच 'राक्षस' ताईचं डोकं चेपत बसलेला दिसला, तिला फळांचे छोटे-छोटे तुकडे भरवताना दिसला. मला एकदम स्वत:चीच लाज वाटली. इतकी वर्षे झाली तरी आपण आजूनही त्यांना राक्षसच का म्हणतो? त्या दोघांना बघितलं आणि मनाच्या कुठल्यातरी कुपीत जपून ठेवलेलं हे आठवणीचं अत्तर पटकन बाहेर आलं.

**अनघा तांबोळी**
बनशंकरी, बंगलोर
फोन - ०९८८६६७४०२९/
०९८८६००२१६४

# लाडकी

आई बाबांच्या गट्टीफूऽत
घुसमटे ग जीव माझा
काय सांगू ग सखे तुला
आई न् बाबाही हवा मला

वय माझे असे कोवळेसे
बाहुलीसंगे खेळायचे
खेळता खेळता दमायचे
अन् मांडीवरती निजायचे

घरी असेना कुणी
घास मला भरवायला...
चिऊ-काऊची गोष्ट सांगून
रडे माझे आवरायला

चॉकलेटचे ढीग घेऊन
मी तरी सांग काय करू?
कार्टूनमधल्या गोष्टींमध्ये
आईबाबा कुठे शोधू?

बाबा, तुला आहे ना रे आईबाबा
पुरवेल ना हट्ट त्यांनी जोजावून तुला?
मग मी असा काय गुन्हा केला?
का न मिळे मला आईबापाचा लळा?

दूरदेशी तुम्ही जाता ना...
सोडून मला एकटीला?
डोळा आणत नाही मी
पाणी...
म्हणजे रडू येत नाही का
मला?



निर्जीव वस्तूंसंगे मी
किती बरं खेळायचं?
आठव येता तुमचा
मी कशात मन गुंतवायचं?
बागेमध्ये कधी गेलो
आता मला आठवेना
तिघांची ती अंगतपंगत
मन विसरता विसरेना...!

आपले तिघांचे नाही का रे सँडविच होते...
मी टमाटर अन् दोघे तुम्ही ब्रेड होते...
आठवलं का तुम्हाला आपलं लकी नाणं?
खोबरं, खजूर अन खसखशीचं गाणं?

देवबाप्पा तुझी मी लाडकी आहे ना रे?
खरं सांग बरं मी वाईट आहे का रे?
जादूने तू आमच्या घरात
'बट्टी' आणून टाक
नाहीतर सरळच सांगते
माझे डोळेतरी झाक!

**अनघा तांबोळी**

# गमतीदार बातमी स्पर्धा

### अस्वलाने चालवली मोटार

डेनवर (अमेरिका) येथील लार्कस्पर भागात एक विचित्र घटना घडली. रस्त्यावर फिरणारे एक भटके अस्वल थेट एका मोटारीत शिरले. आश्चर्याची बाब म्हणजे मोटारीचे दरवाजे 'लॉक' केलेले होते. तरीही अस्वल महाशयांनी दरवाजा उघडून आत प्रवेश केलाच. मोटारीत असलेल्या एका सँडविचसाठी अस्वलाने हा पराक्रम केला. प्रत्यक्षात फार त्याच्या हाती काही लागले नाही. त्यामुळे चिडून त्याने मोटारीतच गोंधळाला सुरुवात केली. त्यातच त्याचा पंजा चुकून गिअरवर पडला. त्यामुळे मोटार जागची हलली आणि काही अंतरावर असलेल्या झुडपावर जाऊन आदळली. झाल्या प्रकाराने मोटारमालक जागा झाला. तेव्हा त्याला धक्काच बसला. कारण जागा सोडून मोटार बऱ्याच अंतरावर गेली होती. नीट पाहिल्यावर त्याला मोटारीत अस्वल शिरल्याचे दिसले. मग पोलिसांना पाचारण करून अस्वलाची मोटारीतून सुटका करण्यात आली. पण या सगळ्या गोंधळात मोटारीची मात्र वाट लागली.

(सकाळ, २७/७/२०१०)

ओंकार उदय लोखंडे
१० इ, विश्वास सोसायटी, सांगली, ४१६४१६

### प्लॅस्टिक बॅग, नव्हे इनक्युबेटर

लंडन येथील एका मेडिकल क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीने प्लॅस्टिक बॅगचा वापर इन्क्युबेटरसारखा करून एका मुलीचा जीव वाचवला.

दिलेल्या तारखेच्या १४ आठवडे आधी सोफी थॉमलिन्सनचा जन्म हॉस्पिटलमध्ये आणणाऱ्या ॲम्ब्युलन्समध्ये झाला. ॲम्ब्युलन्समध्ये असलेला इन्क्युबेटर या बाळासाठी खूपच मोठा होता, म्हणून या पॅरामेडिकल क्षेत्रात काम करणाऱ्या रॉब डेलजिएलने मुलीला वाचवण्यासाठी प्लॅस्टिक बॅगलाच इन्क्युबेटर बनवून टाकले. या बॅगचा वापर औषधे फेकण्यासाठी केला जातो. हॉस्पिटलमध्ये आणल्यावर दोन आठवड्यांपर्यंत या बाळाला आयसीयूमध्ये ठेवण्यात आले.

हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी रॉबचे कौतुक केले. कारण ॲम्ब्युलन्समध्ये जन्मलेल्या या कमी वजनाच्या बाळाला लगेचच ऊब मिळाली नसती, तर कदाचित ते वाचू शकले नसते. योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याने रॉबचे डॉक्टरांनी कौतुक केले, तर मुलीच्या आईने तर त्याचे तोंडभरून आभार मानले.

(मुंबई चौफेर, १४/८/२०१०)

श्वेता विनोद अन्वेकर
११ सायन्स, जाधव गल्ली, मु. पो. चांदोरी, ता. निफाड, नाशिक

## माकडाने घेतले मांजराच्या पिलाला दत्तक

पंचतंत्राच्या गोष्टींत आपण नेहमीच प्राण्यांची दोस्ती, एकमेकांप्रती प्रेमा याबद्दल वाचतो. आजच्या जमान्यात या गोष्टी कालबाह्यच आहेत. मात्र, इंडोनेशियातील बाली येथील मंकी फॉरेस्ट पार्क येथे अनोखे दृश्य पाहायला मिळाले.

मंकी फॉरेस्ट पार्कातील मकाक जातीच्या माकडाने मांजरीच्या छोट्या पिलाला दत्तक घेतले आहे. हे माकड या मांजरीच्या पिलाची काळजी घेत होते.

आकाश चारुदत्त देशपांडे, ८वी,
सरस्वती अपार्टमेंट, १५४ मंगळवार पेठ, सातारा ४१५ ००२

## विसराळू चोरटा

अनेकदा नागरिकांच्या दक्षतेमुळे, पोलिसांच्या चाणाक्षपणामुळे चोर पकडला जातो, पण चोराच्याच मूर्खपणामुळे तो गोत्यात आला, तर त्याला काय म्हणावे? अमेरिकेतील बफेलो शहराजवळील ईडन येथे अशी एक घटना घडली. भरदुपारी दरोडा घालायला एक चोर बँकेत गेला. तो कॅशिअरपाशी पोचला आणि त्याने पैशांची मागणीही केली. पण अचानक त्याला एक फोन आला आणि त्यानंतर तो पैसे न घेता तसाच बाहेर सटकला. पोलिसांना या घटनेबाबत खबर देण्यात आल्यानंतर तपासात असे आढळले, की या चोराने 'मास्क'च घातला नव्हता. म्हणजे 'मास्क' त्याच्या गळ्यात अडकवलेला होता, पण तो चढवायचा तेवढा राहिला होता. बहुधा बाहेर असलेल्या त्याच्या साथीदाराने तसे त्याला फोनवरून कळवले आणि तो दरोडा न घालताच पसार झाला.

सौमित्र समीर मोने, ४थी,
१६ ब हनुमाननगर, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

## मधमाशांनी केले पोलिसाला बंदी

ऐकायला विचित्र वाटत असले तरी हे खरे आहे. अमेरिकेतील उत्तर कॅरोलिना मध्ये मधमाशांच्या एका घोळक्याने एका पोलीस कर्मचाऱ्याला तब्बल तीन तास बंदी केले होते. पोलीस दलात कार्यरत ब्रेंडन जेनकिन्स रॅलीफ शहरात रस्त्यावर झालेल्या अपघाताची पाहणी करीत होते. अपघातग्रस्त ट्रकवर मधमाशांची ६० पोळी होती. साधारण पोळी वाहून नेण्याचे काम रात्रीच्या वेळी केले जाते. या वेळी मधमाशा आपल्या पोळ्यांमधेच असतात. मात्र ट्रकला अपघात झाल्यामुळे आणि सूर्योदयामुळे उष्णता जाणवू लागल्यावर मधमाशा पोळ्यातून बाहेर आल्या. मधमाशा चवताळल्यामुळे ब्रेंडन ज्या गाडीतून आला, त्या गाडीकडे त्यांनी धाव घेतली. त्यांची संख्या पाहता, परिसरात गाडी ही एकमेव अशी वस्तू होती, ज्या ठिकाणी त्या मधमाशा एकत्रितरीत्या बसू शकत होत्या. मधमाशांची आक्रमकता पाहून गाडीच्या काचा बंद करून ब्रेंडन गाडीतच बसून राहिला. जवळपास तीन तास या माशा गाडीवर बसल्या होत्या. त्यांच्यामुळे गाडी पूर्णपणे झाकली गेली होती. त्यानंतर या मधमाशांना पकडण्यासाठी मधमाशा पाळणाऱ्या तज्ज्ञ जेनिफर केलर यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी मधमाशांवर साखरेचे पाणी शिंपडले तेव्हा माशांनी एकमेकांना चाटण्यास सुरुवात केली. हळूहळू सर्व मधमाशा एका ठिकाणी जमा झाल्या आणि आपल्या पोळ्यात दाखल झाल्या.

(लोकमत, २०/८/२०१०)

रणजितसिंह डिसले
अलिपूर रोड, कनकळस प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी, जि. सोलापूर - ४१३ ४११

**बाटलीत अडकले अस्वल**

अमेरिकेत सुमारे दहा दिवस तहानेने आणि भूकेने व्याकून होऊन भटकत असलेल्या अस्वलाच्या पिलाचे डोके अखेर प्लॅस्टिकच्या बाटलीतून काढण्यात यश आले. फ्लोरिडा राज्यातील बियरस्डेल शहरात काहीतरी खायला मिळेल, या आशेने भटकत असलेल्या या अस्वलाच्या पिलाने कचराकुंडीत तोंड घातले आणि त्याचे डोके एका बाटलीत अडकले. त्याला जीवदान देणाऱ्या वैज्ञानिकांनी सांगितले की बाटलीत तोंड अडकल्यामुळे या अस्वलाला काहीही खाता-पिता येत नव्हते. त्यामुळे ते मृत्यूच्या दाढेत पोचले होते. या पिलाला पकडण्यासाठी अनेकदा प्रयत्न करण्यात आले. मात्र, त्याची आई हे प्रयत्न हाणून पाडत होती. अखेर अस्वलाचे डोके बाटलीतून बाहेर काढण्यात आले.

परिमल असनाटे, बारावी
अभिनंदन, राऊतवाडी,अकोला ४४४ ००५

**ऑक्टोपसच ठरला हीरो**

यंदाचा फुटबॉल विश्वकरंडक कोण पटकावणार? याविषयी अंदाज बांधण्यात अनेक फुटबॉल तज्ज्ञ कचरत होते. कारण , संभाव्य विजेतेपदाच्या शर्यतीत असणारे संघ एकामागून एक बाहेर पडत होते. पण, जर्मनीत असा एक ज्योतिषी होता, की तो सातत्याने स्पर्धेतील सामन्याविषयी अंदाज व्यक्त करत होता आणि ते खरे ठरत होते. हा ज्योतिषी कुणी मनुष्यप्राणी नव्हता, तर ऑक्टोपस हा जलचर प्राणी हे अंदाज व्यक्त करत होता. जर्मनीच्या 'सी लाईफ अॅक्वेरियम'मध्ये या ऑक्टोपसचे वास्तव्य असून, त्याचे पॉल असे नामकरण करण्यात आले आहे.

युरोपियन देशांत फुटबॉल हा साहजिकच जिव्हाळ्याचा विषय. युरो २००८ स्पर्धेपासून त्याने अंदाज व्यक्त करण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्याने सहा अंदाज वर्तवले, त्यापैकी पाच अंदाज बरोबर ठरले.

विश्वकरंडक स्पर्धेतही त्याने जर्मनीच्या संघाविषयी अचूक अंदाज वर्तवले. त्यामुळे त्याची लोकप्रियता अधिक वाढली. पण स्पेन आणि त्याचे जुने ऋणानुबंध असावेत. कारण, युरो स्पर्धेच्या अंतिम लढतीत त्याचा जर्मनी जिंकणार हा अंदाज चुकला. त्यावेळी स्पेनने त्यांना पराभूत करून विजेतेपद मिळविले. या वेळी तर त्याने थेट स्पेनच्या बाजूने कौल दिला. तो खरा ठरला आणि तोपर्यंत जर्मनीत 'हीरो' असणारा पॉल त्यांच्या दृष्टीने 'व्हिलन' ठरला. त्याला 'फ्राय' करून खाऊन टाका असे म्हणण्यापर्यंत वेळ गेली.

त्यावेळी स्पेनच्या राष्ट्राध्यक्षांचे प्राणीप्रेम जागे झाले. त्यांनी त्याला संपूर्ण संरक्षण देण्याची तयारी दाखवली. इतकेच नाही, तर स्पेन मधील एका उद्योगपतीने त्याला ३८ हजार डॉलरला खरेदी करण्याची तयारी दर्शविली. जर्मनीविरुद्ध लढतीनंतरही पॉलने अंतिम फेरीसाठी स्पेनच्या बाजूने कौल दिला आणि तो केवळ स्पेनच्या नव्हे, तर फुटबॉल विश्वाचा 'हीरो' ठरला. तो सध्या अडीच वर्षांचा आहे.

(सकाळ, १३/७/२०१०)

अपूर्व अश्विन चिटणीस, ३ री,
२४, ताडीवाला रोड, पुणे ४११ ००१

## चोरट्या मांजरीमुळे मालक हैराण

चोरट्या मांजरा बद्दलच्या तक्रारींमुळे सध्या ब्रिटनमधील पोलीस हैराण आहेत. या मांजरीला कोणती शिक्षा द्यावी, असा प्रश्न त्यांना पडला आहे. मांजरीचे मालक पीटर आणि बिरगिटर वेसमेंटल यांनीच तिला पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

ऑस्कर नावाच्या मांजरीला शेजाऱ्यांचे कपडे आणि वस्तू चोरण्याची सवय आहे. गेल्या १३ वर्षांत मांजरीने ७० वेळा चोऱ्या केल्या आहेत. ऑस्करमुळे आपलेही नाव बदनाम होत असल्याची भीती वेसमेंटल दाम्पत्याला आहे. सुरुवातीला जेव्हा ऑस्कर वस्तू आणायची तेव्हा आमच्यासाठी काहीतरी भेट आणते म्हणून आनंद व्हायचा, मात्र तिच्या रोजच्या चोऱ्यांमुळे आम्ही हैराण झालोय असे सेवानिवृत्त शिक्षक पीटर सांगतात. ऑस्कर चोर नसून बदमाश मांजर असल्याचे बिरगिट सांगतात. पोलिसांनी या मांजरीचे ठसे घेतले आहेत.

(लोकमत, १९/७/२०१०)

हेमंत किसनजी ठाकरे
माळी मोहल्ला वार्ड क्र. ३, मु. पो. नवरगाव ता. सिन्देवाडी, जि. चंद्रपूर ४४१ २२६

## ठिपके जोडा चित्र काढा



## बालनगरी

# चित्रमय रंगतदार कथा

### वृषाली पटवर्धन

| | |
|---|---|
| चतुर बोकोबा आणि इतर कथा | ३० |
| नशीबवान शेखर आणि इतर कथा | ३० |
| लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा | ३० |

### चारुता पुराणिक

| | |
|---|---|
| सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा | ३० |
| हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या | ३० |
| सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या | ३० |

*(फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००८)*
*('राजहंस प्रकाशन' पुरस्कार) (अ.भा.म.प्रकाशक संघ-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७)*

| | |
|---|---|
| लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या | ३० |

### विजया देशपांडे

| | |
|---|---|
| निद्राराणी आणि इतर कथा | ३० |

### अरुंधती पंडित

| | |
|---|---|
| जादूचं खीरपात्र आणि इतर कथा | ३० |

### मंजूषा आमडेकर

| | |
|---|---|
| टिंबक टू आणि इतर कथा | ३० |
| गम्मत गोष्टी | ३० |
| धमाल गोष्टी | ५० |
| मजेदार लोककथा | ३० |
| आदर्श लोककथा | ३० |
| राजाचं गुपित आणि इतर कथा | ३० |
| ढुम ढुम ढुमाक ढुम आणि इतर कथा | ३० |
| सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी | ३० |
| ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी | ३० |

### अर्चना ओक

| | |
|---|---|
| बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी | ३० |
| चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी | ३० |
| छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी | ५० |
| छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी | ३० |

### उमा खरे

| | |
|---|---|
| गंपू चिंपू आणि इतर कथा | ३० |
| मैत्रीचे मोल आणि इतर कथा | ३० |
| सिंड्रेला आणि इतर कथा | ३० |
| घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी | ३० |
| गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी | ३० |

### उज्ज्वला केळकर

| | |
|---|---|
| बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी | ३० |
| गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी | ३० |

### राजीव तांबे

| | |
|---|---|
| बंटू बसला ढगात आणि इतर कथा | ५० |
| बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा | ५० |

### निर्मला मोने

| | |
|---|---|
| घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी | ३० |
| अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी | ३० |
| खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी | ३० |
| जादूचं बटण आणि इतर गोष्टी | ३० |
| जादूचं रबर आणि इतर गोष्टी | ३० |
| जादूचं तळं आणि इतर गोष्टी | ३० |

### ईशान पुणेकर

| | |
|---|---|
| गोष्टी पानोपानी | ३० |
| गोष्टी मनोमनी | ३० |
| गोष्टी कानोकानी | ३० |

### संस्मिता गुप्ते

| | |
|---|---|
| चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी | ५० |
| जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी | ५० |



| | |
|---|---|
| पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी | ५० |
| पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी | ५० |

**फ्रँकलिन : पोलेत बूर्ज्वा : अनु. मंजूषा आमडेकर**

| | |
|---|---|
| फ्रँकलिन आणि दंतपरी | ५० |
| फ्रँकलिन थाप मारतो | ५० |
| फ्रँकलिन आणि अंधारगुडुप | ५० |
| फ्रँकलिनची दादागिरी | ५० |
| फ्रँकलिन हरवतो | ५० |
| फ्रँकलिनचा पसारा | ५० |
| फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा | ५० |
| फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी | ५० |
| चल, आटप लवकर, फ्रँकलिन | ५० |
| फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा | ५० |
| फ्रँकलिन शाळेत जातो | ५० |
| फ्रँकलिनचं पांघरूण | ५० |
| फ्रँकलिन आणि सण | ५० |
| फ्रँकलिनचा वाईट दिवस | ५० |
| फ्रँकलिन सायकल चालवतो | ५० |
| फ्रँकलिनचा नवा मित्र | ५० |
| फ्रँकलिन आणि वादळी पाऊस | ५० |
| फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल | ५० |
| शाळेच्या नाटकात फ्रँकलिन | ५० |

**आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा**

**मोहन वेल्हाळ**

| | |
|---|---|
| हितोपदेश : बोधप्रद कथा | ३० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | ३० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | ३० |
| हितोपदेश : रोचक कथा | ३० |

**निर्मला सारडा**

| | |
|---|---|
| जातक कथा : मनोरंजक | ३० |
| जातक कथा : प्रेरक | ३० |
| जातक कथा : रोचक | ३० |
| जातक कथा : शिक्षाप्रद | ३० |
| शेखचिल्लीचे किस्से | २५ |

**मंजूषा आमडेकर**

| | |
|---|---|
| मन्नो | २५ |

**माधव मोर्डेकर**

| | |
|---|---|
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | ३० |

**अरुंधती महाम्बरे**

| | |
|---|---|
| रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी | ३० |
| ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी | ३० |
| बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी | ३० |

**तेनालीराम मालिका : मंजूषा आमडेकर**

| | |
|---|---|
| बुद्धिमान तेनालीराम | ३० |
| जगावेगळा तेनालीराम | ३० |
| चतुर तेनालीराम | ३० |
| न्यायप्रिय तेनालीराम | ३० |
| समयसूचक तेनालीराम | ३० |
| लाडका तेनालीराम | ३० |
| प्रसंगावधानी तेनालीराम | ३० |
| निर्भय तेनालीराम | ३० |
| राज्याचे भूषण तेनालीराम | ३० |
| हजरजबाबी तेनालीराम | ३० |
| हुशार तेनालीराम | ३० |
| विनोदवीर तेनालीराम | ३० |
| मजेदार तेनालीराम | ३० |
| परोपकारी तेनालीराम | ३० |

**बिरबल मालिका : निर्मला सारडा**

| | |
|---|---|
| विनोदवीर बिरबल | ३० |
| लाजवाब बिरबल | ३० |
| बुद्धिमान बिरबल | ३० |
| चतुर बिरबल | ३० |

**ससोबा-हसोबा मालिका : राजीव तांबे**

| | |
|---|---|
| शेपटीवालं झाड आणि इतर कथा | ५० |
| ससुल्या आणि इतर कथा | ५० |
| शूर ससोबा आणि इतर कथा | ५० |
| चला चहा पिऊया आणि इतर कथा | ५० |
| छत्रीची जादू आणि इतर कथा | ३० |
| *(महाराष्ट्र राज्य पुरस्कार - कवी दत्त पुरस्कार २००८-०९)* | |
| झॅकपॅक शोध आणि इतर कथा | ३० |

**गुरुशिष्य कथा : शरद दळवी**

| | |
|---|---|
| कसोटी आणि इतर कथा | ३० |
| सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा | ३० |

**जंगल कथा : शरद दळवी**

| | |
|---|---|
| इमानी मित्र आणि इतर गोष्टी | ३० |
| पंचरंगी खार आणि इतर गोष्टी | ३० |

**जंगल जंमत मालिका**

**वैशाली कार्लेकर**

| | |
|---|---|
| जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी | ३० |
| फट्फजिती आणि जंमत गोष्टी | ३० |

**निर्मला मोने**

| | |
|---|---|
| गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी | ३० |
| सिंहाचं उड्डाण आणि जंमत गोष्टी | ३० |
| सोनेरी चोच आणि जंमत गोष्टी | ३० |
| पिंटू पेलिकन आणि जंमत गोष्टी | ३० |
| तल्लख मोती आणि जंमत गोष्टी | ३० |
| लालतोंडी चोर आणि जंमत गोष्टी | ३० |
| उंटाची मान आणि जंमत गोष्टी | ३० |

**अरुंधती महाम्बरे**

| | |
|---|---|
| बूम बूम बैल आणि जम्मत गोष्टी | ५० |
| तीन छोटे मासे आणि जम्मत गोष्टी | ५० |

**छोटुशा बब्बडच्या गमतीदार गोष्टी : राजीव तांबे**

| | |
|---|---|
| चंपी मालीश आणि था..था..था! | ३० |
| दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी | ३० |
| गुळाची ढेप आणि सरबत | ३० |
| सू सुटका आणि रंगीत डोंगर | ३० |

**बोधकथा : शरद दळवी**

| | |
|---|---|
| महाकवि कालिदास आणि बोधकथा | ३० |
| मोह आणि बोधकथा | ३० |
| न्याय आणि बोधकथा | ३० |

**चातुर्यकथा : शरद दळवी**

| | |
|---|---|
| बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा | ३० |
| प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा | ३० |

**विज्ञान नवलाई : डॉ. बाळ फोंडके**

| | |
|---|---|
| अंतराळ | ३० |
| आपले पूर्वज | ३० |
| भूगोल | ३० |
| खगोल | ३० |
| पशू-पक्षी | ३० |
| प्राणिजगत | ३० |

*(या सहा पुस्तकांचा संच घेणे आवश्यक आहे.)*

**शरद दळवी**

| | |
|---|---|
| खरा मित्र आणि इतर गोष्टी | ३० |
| एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी | ३० |
| आजीचं घर आणि इतर गोष्टी | ३० |

**शकुन्तला फडणीस**

| | |
|---|---|
| पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी | ३० |
| पैज जिंकली छोट्यानं आणि इतर गोष्टी | ३० |
| आजीचा धडा आणि इतर गोष्टी | ३० |

**सीक्रेट सेव्हन मालिका : एनिड ब्लायटन**

**अनु. प्रियंका कुलकर्णी**

| | |
|---|---|
| द सीक्रेट सेव्हन | ८० |
| सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम | ८० |
| शाब्बास, सीक्रेट सेव्हन | ८० |
| रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन | ८० |
| आगे बढो, सीक्रेट सेव्हन | ८० |
| सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी | ८० |
| सीक्रेट सेव्हनची सरशी | ८० |
| सीक्रेट सेव्हन झिंदाबाद | ८० |
| सीक्रेट सेव्हन आणि रहस्य | ८० |
| सीक्रेट सेव्हन समोर कोडं | ८० |
| सीक्रेट सेव्हनची आतषबाजी | ८० |
| 'गुणवान' सीक्रेट सेव्हन | ८० |
| सीक्रेट सेव्हनला धक्का | ८० |
| सावधान! सीक्रेट सेव्हन | ८० |
| सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत | ८० |

**युद्ध चित्रकथा**

**अनु. प्रा. प्रसाद बर्वे**

| | |
|---|---|
| दहशतीचे बेट (इवो जिमाची लढाई) | ६० |

**अनु. निर्मला मोने**

| | |
|---|---|
| साम्राज्याचा पाडाव (मिडवेची लढाई) | ६० |

**संस्कारक्षम कथा/कविता : वि.स. खांडेकर**

| | |
|---|---|
| सूर्यास्त | ३० |
| यज्ञकुंड | ३० |
| मध्यरात्र | ५० |
| घरटे | ४० |
| अस्थी | ४० |

**आनंद यादव**

| | |
|---|---|
| सैनिक हो...तुमच्यासाठी | ३० |

**हॅरी पॉटर मालिका : जे.के. रोलिंग**

**बाळ उर्ध्वरेषे**

| | |
|---|---|
| हॅरी पॉटर आणि परीस | १९५ |

**मंजूषा आमडेकर**

| | |
|---|---|
| हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर | १९५ |
| हॅरी पॉटर आणि अग्निचषक | ३२५ |

**प्रियंका कुलकर्णी**

| | |
|---|---|
| हॅरी पॉटर आणि अझ्कबानचा कैदी | १९५ |